श्रीसयाजीवि… …गणीदारांस सन १९०९ सालची भेट.

श्री

रंगनाथी योगवासिष्ठ.

प्राकृत ओंवीबद्ध ग्रंथ.

(सुबोध टीपा आणि प्रस्तावना यांसह)

सब जगहपर बी.ती है!!

जसमाईनकी बींछुकी दवा.

चाहे जैसे जहरीले बिछूका जहर एक मिनटमें रफु होजाता है लाखों पुडियां आजमाई गई और पुरी अकशीर साबीत हुई. एक पुडीयासें १०—२० दर्दीयोंका तडपना छू मतर होता है. १०० पुडियाका १, रु. व ५० पुडियाका ||=

जसमाईनकी तापकी दवा.

सिर्फ तीन पुडियासें चाहे जैसा जहरी बुखार नेस्तनाबुद होजाता है. प्लेग, मलेरिया, रोजना बुखार, एकांतरा, चौथैया, वगैरा फौरन गुमहोता है. और दर्दीको नई जींदगीका सुख मिलता है १०० पुडियाका १ रुपया ५० पु. ||=

बुखारसें घटी हुई ताकतकों पीछी लानेके लिये. जसमाईनकी तापकी दवाका ईस्तेमाल करना जरुरी साबीत हुवा है.

बुढ्ढा जुवान होता है!!

क्यों? कैसे? जसमाईनके खीजाबसे! सफेद बाल काला बनाने के लिये इस खीजाबसें बढकर और कोई दवाई नहीं है. अगर झूठा साबीत हो दुनादाम वापस देनेको तयार है. सीसीपर जसमाईनकानाम बराबर देख लेना. वर ना नक्कालोंकेहातपर फंस पडोगे. दाम फीसीसी मय खुबसूरत ब्रशके सिर्फ १ दर्जनके १०रु.

पत्ता—जसमाईन इंडिया एजन्सी,

पो० नं. २ बम्बई.

श्री

रंगनाथी योगवासिष्ठ.

प्राकृत ओवीबद्ध ग्रंथ.

(सुबोध टीपा आणि प्रस्तावना यांसह.)

जयानाहीं सद्गुरूसी भेटी । तया प्रवेशु कैंचा वासिष्ठीं ॥
यालागीं अध्यात्मशास्त्राच्या मुकुटीं । वासिष्ठरत्न शोभे ॥ ९५ ॥
यालागीं सर्व प्रकारें । वासिष्ठीं प्रवेशु करा वारे ॥
अर्थु कळलिया निर्धारें । ब्रह्मचि तुम्ही ॥ ९६ ॥

रं. यो. वा. वैराग्य प्रकरण.

प्रकाशक,

दामोदर सांवळाराम आणि मंडळी,

प्रिंटर्स, पब्लिशर्स व कमिशन एजंटस, ठाकुरद्वार-मुंबई.

मुंबई,

'इंदुप्रकाश' स्टीम प्रेसमध्यें छापिला.

शके १८३०; सन १९०८.

किंमत दीड रुपया.

प्रस्तावना.

योगवासिष्ठ ह्या मूळ ग्रंथाचे ३२००० श्लोक आहेत; व तो वेदांतानें परिपूर्ण आहे. ह्या बत्तीस हजार श्लोकांपैकीं, २२९ श्लोक निवडून त्यांस 'लघु योगवासिष्ठ' असें नांव दिलेलें आहे. हेच सवा दोनशें श्लोक मूलभूत धरून श्री रंगनाथस्वामींनीं प्राकृत जनाकारितां प्रस्तुत ग्रंथ ओंवीबद्ध केलेला आहे. मूळ योगवासिष्ठाचीं, १ वैराग्य, २ मुमुक्षुव्यवहार, ३ जगदुत्पत्ति, ४ जगत्स्थिति, ५ जगल्लय आणि ६ निर्वाण, अशीं सहा प्रकरणें आहेत. 'लघु योगवासिष्ठ' या नांवाचा एक संस्कृत ग्रंथ आहे, तोही ह्या ग्रंथाचा संक्षेप असून त्यांतील सहाही प्रकरणांचीं हींच नांवें आहेत. मुळांतील आख्यानें व उपाख्यानेंही यांत आहेत; व यावरच रामानंद नामक यतींची संस्कृत टीका आहे. प्रस्तुत ग्रंथाचीं दहा प्रकरणें आहेत—१ वैराग्य, २ जगन्मिथ्यात्व, ३ जीवन्मुक्ति, ४ मनोलय, ५ वासनोपशम, ६ आत्ममनन, ७ आत्मशुद्धि, ८ आत्मार्चन, ९ आत्मनिरूपण आणि १० निर्वाण (शून्याशून्ययोग) येणेंप्रमाणें हीं दहा प्रकरणें आहेत. प्रस्तुत ग्रंथ ही निवडक श्लोकांवरील टीका असल्यामुळें उपाख्यानें व आख्यानें हीं अर्थातच यांत नाहींत. ही टीका वेदान्त शास्त्राला धरून केलेली असल्यामुळें याची भाषाही शास्त्रीय झाली आहे. संस्कृत भाषेशीं चांगला परिचय असल्याशिवाय ही टीका बरोबर कळावयास अडचण पडणें साहजिक आहे. ही अडचण दूर करावयाची ह्मणजे अशा ग्रंथाचें मराठी भाषेंत अर्थासह सरळ विवरणच दिलें पाहिजे. वेदांत विषय आधींच गहन, त्यांत थोडी बहुत गती झाल्याशिवाय साधारण जनास तो अर्थातच दुर्बोध, ह्मणून शुद्ध मराठी वाचकांकारितां अशा ग्रंथांचें सटीप व सार्थ विवरण देऊन भाषांतर देणेंच जरूर आहे. व अशा प्रकारचा प्रयत्न करण्याचा आमचा हेतु आहे. तो पूर्ण करणार सर्वशक्तिमान प्रभु समर्थ आहे.

ह्या ग्रंथाच्या कर्तृत्वासंबंधानें थोडासा वाद आहे. कारण रंगनाथ या नांवाचे दोन कवि प्रसिद्ध होते. एक पैठणचे मोगरेकर रंगनाथ व दुसरे निगडीकर रंगनाथ. ग्रंथाच्या शेवटीं कांहीं प्रतींत मोगरेकर रंगनाथाची व कांहीं प्रतींत निगडीकरांची गुरुपरंपरा आढळते. अशा स्थितीमुळें हा ग्रंथ कोणत्या रंगनाथांनीं केला असावा, असा साहजिक प्रश्न उत्पन्न होतो. परंतु मोगरेकर रंगनाथांची 'चित्सदानंद लहरी' या नांवाची श्रीमद्भगवद्गीतेवरील

टीका उपलब्ध आहे. या टीकेंतील भाषासरणी व प्रस्तुत ग्रंथांतील भाषासरणी अगदीं सारखी आहे, शिवाय 'चित्सदानंदलहरी' ग्रंथाच्या शेवटीं आपण योगवासिष्ठ केल्याचा स्पष्ट उल्लेख मोगरेकर रंगनाथांनीं केला आहे .तो असाः—

"हें वाशिष्ठसाराचें निरूपण । जालें असें पैं संपूर्ण ॥
त्या उपरी ग्रंथराज निर्माण । गीतानामें संपूर्ण जाला असे ॥"

यावरून मोगरेकर रंगनाथ स्वामींनींच प्रथम योगवासिष्ठ व नंतर चित्सदानंदलहरी, असे क्रमानें हे दोन ग्रंथ केल्याचें दिसून येतें. असो; ग्रंथाचें कर्तृत्व कोणाकडे गेलें तरी त्याच्या उत्तमत्वांत काडीमात्र कमतरता येत नाहीं. योगवासिष्ठासारख्या गहन विषयाच्या ग्रंथाचें थोडक्यांत सार प्राकृत भाषेंत करून रंगनाथस्वामींनीं मुमुक्षु जनांवर उपकार केले आहेत यांत संशय नाहीं. रंगनाथस्वामींनीं ग्रंथसमाप्तीचा शक, स्थान वगैरे माहिती दिली आहे, तीं येणेंप्रमाणेंः—

स्वस्ति नृप शालिवाहन । सर्व शकांमाजी शक गहन । वर्ष पंचदशशत त्रिंशतगुण । कालिकालाभिधान संवत्सराचें ॥ षड्ऋतुमाजी श्रेष्ठपणें । श्रीशरदऋतुनामें येणें । आश्वीन मास अतिशुद्धपणें । अष्टगुणें अष्टमी ॥ गुरुवासर सद्गुरुपणें । निर्जरानुग्रहें दैत्यां उणें । आणि ह्मणून नाम येणें । सुंदरपणें विराजित ॥ सुकर्मा योगकाळीं । सम्पूर्ण ग्रंथाची समाप्ति झाली । श्रीसद्गुरुरायें पुरविली आळी । परमानंद दिवाळी भाविकां केली ॥ तेंचि तें निरूपण सुखसमाधानीं । श्रवणें करी परमानंदधणी । ह्मणोनि परिसावें अनुदिनि । करी विनवणी श्रीकृष्णदास ॥ आतां ग्रंथ समाप्तीचें स्थान । जैंकां सर्व अलंकरण । तेंही परिसावें सांगेन । अतिउत्तम जाण सर्वां क्षत्रीं ॥ जैसे सर्व अवयवांमाजी एक । आपुलिया शोभा शोभे नासिक । तैसें उत्तम क्षेत्रांमाजी नासिक । उत्तम देख उत्तमाचें जें ॥ सर्व अवयव अतिसुंदर । सुकोमळ सुभव शरीर । त्याहीवरी लेइले अळंकार । शोभाप्रचुर अनुपम्य ॥ तेथें एक नासिकचि नसतां । सर्वही सुंदरता जाय वृथा । तैसें एक नासिकेंवीण समस्तां । काश्यादि तीर्थां शोभा कैशी ॥ ह्मणोनि सर्व क्षेत्रांचें अळंकार । तेंचि नासिक नाम महाक्षेत्र । तें चतुर्युगांचें नगर । दक्षिण तीर गोदावरीचें ॥ श्लोक ॥ कृते तु पद्मनगरं त्रेतायां च त्रिकंटकम् । द्वापारे तु जनस्थाने कलौ नासिकमुच्यते ॥ ऐसें हें चतुर्युगाचें नगर । पवित्र आणि महाक्षेत्र । यावरी श्रीमद्गोदावरी तीर । ब्रह्मरूप नीर जयेचें ॥ क्षेत्र स्वामी श्रीसुंदरनारायण । जेथें विरिंचीचें झालें कपाळ मोक्षण । ह्मणोनि कपालेश्वर नामें श्रीभवजाण । ब्रह्म निर्गुण शंकर वेषें ॥ हा देखोनि देवसमाज । आणि क्षेत्रामाजीक्षेत्रराज । तीर्थांमाजी गंगा विराज । ह्मणोनी श्री रघुराज आले स्वयें ॥ पंचवटिकेसी करूनि वस्ती । असतां सीता लक्ष्मणेंसी विश्वमूर्ति । करूनियां सर्व राक्षसांची शांति । येथें विश्रांति निजानंदें ॥ अरुणासंगमातीरीं । पूर्वाभिमुख सरस्वती संगमकरीं ।

स्मरणमात्रें ब्रह्महत्या निवारीं । स्नानें करी भवरोगावेगळें ॥ ऐसा हा क्षेत्राचा महिमा । बोलो न शके स्वयें ब्रह्मा । तेथें समाप्ति पाववया ग्रंथोत्तमा । जेथें श्रीरामा वस्ति नित्य ॥ क्षेत्रीं श्रीरामाचें अधिष्ठान । ग्रंथीं श्री रघुनाथ पूर्ण । एवं नाहीं श्रीरामावांचुन । सर्वत्र संपूर्ण श्रीरघुनाथ ॥ श्रोता वक्ता श्री रघुनाथ । श्री रघुनाथची ग्रंथ ग्रंथार्थ । क्षेत्र क्षेत्रज्ञ श्री रघुनाथ । परिपूर्णार्थे श्रीरघुनाथा ॥ आजन्ममरणस्तववरी । निवास केलिया काशिपुरीं । जें फळ होतसे मुक्तीवरी । तेंचि क्षणार्धें करी पंचवटीसी ॥ अर्धयाम परिमाण । केलिया पंचवटीसी निवासन । काशीवासाचें फळ पूर्ण । पावे निर्वाण निश्चयेंसी ॥ संमति ॥ आजन्ममरणाभ्यासाद्वाराणश्यां निवासिनाम् । तत्फलं अर्धयामेण पंचवट्यां तु राघव । जन्मांतर सहस्रेषु काशीवासस्य यत्फलम् । तत्फलं अर्धयामेण पंचवट्यां तु राघव ॥ गोदायास्तीरमाश्रित्य यस्तु प्राणान्विमुंचति । व्याचष्टे तारकं ब्रह्म साक्षाद्देवो महेश्वरः ॥ टीका ॥ ह्मणोनि श्री रघुनाथ आपण । पंचवटिके करी निवासन । तया क्षेत्राचा महिमा वदेल कोण । ब्रह्मनिर्वाण नांदे तेथें ॥ तें क्षेत्रचि ब्रह्मरूप जाण । हें मागें केलें निर्वचन । ग्रंथग्रंथार्थें व्याख्यान । ब्रह्मपरिपूर्ण पूर्णत्वें ॥

अनुक्रमणिका.

श्री रंगनाथस्वामीकृत

योगवासिष्ठ ।

श्रीगणेशाय नमः ।। श्रीसरस्वत्यै नमः ।। श्रीमत्सद्गुरुनिजानंदाय नमः ।। जयजय श्रीसहजानंद । परात्पर परम बोध । सच्चिदानंदैक अगाध । श्रीगुरुवर्या ।। १ ।। जयजय नित्य निर्मळ । स्वप्रकाशाखिलमंगळ । जयजय पूर्णानंद सोज्वळ । श्रीगुरुवर्या ।।२।। जयजय पूर्णानंदघन । विहितद्रष्टादृश्यदर्शन । चित्सुखाब्धि जगदैकभान । श्रीगुरुवर्या ।।३।। जयजय स्वसंवेद्य । जयजय परात्परैकवंद्य । सर्वातीत सर्वाद्य । श्रीगुरुवर्या ।। ४ ।। जयजय निजानंदनिरंतर । जयजय प्रकाशकर । जयजय नित्यानंदभास्कर । श्रीगुरुवर्या ।। ५ ।। जयजय गुणत्रयविरहित । जयजय सर्व सर्वातीत । ज्ञातृज्ञेयज्ञानविरहित । श्रीगुरुवर्या ।। ६ ।। जयजय सर्वोत्तम । पंचविंशतितत्त्वोत्तम । सर्वसाक्षी परम । श्रीगुरुवर्या ।। ७ ।। जयजय जगद्गुरो । पूर्णानंदैककल्पतरो । निरतिशयानंदप्रवरो । श्रीगुरुवर्या ।।८।। जयजय अकल कलाशून्य । सच्चिदानंदैकचैतन्यघन । सर्वत्रैक सर्वविहीन । श्रीगुरुवर्या ।। ९ ।। जयजय श्रीनिजानंदमूर्ते । मूर्त्तामूर्तैक अमूर्ते । नित्यनिरंजन विश्वपते । श्रीगुरुवर्या ।। १० ।। ऐसे दश श्लोकींचें स्तवन । प्राकृत वाणी केलें जाण । तोषावया तुजलागून । श्रीगुरुवर्या ।।११।। ह्मणो तूं बाप तूं माये । येणें तुझी स्तुति नोहे । तुझें रूप सर्वथा स्तव्य नव्हे । अरूपपणें ।। १२ ।। यालागीं मौन तुझें स्तवन । अक्रियता तेंची पूजन । न चिंतन हेंचि ध्यान । ध्येयविहीन ।। १३ ।। ययापरी तुझें भजन । तूं सर्व इंद्रियां अग्राह्य जाण । स्वसंवेद्यत्व संपूर्ण । ययालागीं तुज ।। १४ ।। करितांचि जी नमन । स्वयें ब्रह्मचि होइजे संपूर्ण । तेथ इतरा सिद्धींची कोण । गणना करी ।। १५ ।। ऐसिया जी गुरुमूर्त्ति । तुज वंदूनि पुढतपुढती । करीतसें जी आर्त्तमति । सामरस्यें तुज ।। १६ ।। यालागीं माझी वाक्यसिद्धि । करीं कृपारसायनासिद्धि । जेणें ऐश्वर्य तुझें बोधी । ग्रंथव्याजें ।। १७ ।। हे ऐकोनिया विनवणी । प्रसन्न श्रीगुरु चिंतामणि । प्रकाश करिता जाला वाणी । निजानंदे ।।१८।। वरदकर ठेवूनि शिरीं । ग्रंथ निर्माणीं आज्ञा करी । तोची प्रसादु अंगीकारी । महाप्रसाद हे ।।१९।। तुझी व्यक्ति तोचि गणेशु । करी सकळ विघ्नांचा नाशु । तुझी वाचा तोची प्रकाशु । शारदेचा ।।२०।। यालागीं तुज वाणी सर्व लाभे । परी सर्व लाभें तूं न लाभे । यालागीं तुझ्या वंदनीं शोभे । सर्वां वंदन ।। २१ ।। जैसें वृक्षमूळसिंचनीं । शाखोपशाखा

१ प्रयत्न न करितां आनंदरूप असलेला. २ आत्मज्ञानामुळें सर्वत्र मंगलरूप भासणारा. ३ सत्व, रज, तम या गुणाशिवाय. ४ पंचवीस तत्वांहून उत्तम. ५ कांहीं न करणें. ६ याप्रमाणें ७ एकत्वानें.

पाने पाणी । शाखा सिंपतां निर्वाणी । कोरडें मूळ ॥२२॥ यालागीं सर्वपणें तूं येक । हा पूर्वींच बोलिलों विवेकु । कोणी करील कुतर्कु । ह्मणऊनियां ॥ २३ ॥ (सद्गुरूस दृष्टान्ता त्यागुन । पदार्थमात्र न दिसे पूर्ण । सर्वांभूतीं एक चैतन्य । बाह्यांतरीं व्यापक ॥ १ ॥) ह्मणोनी केलें तुज नमन । तेणें सर्व देवां सर्व सिद्धि वंदन । जाहलेंचि असेल परिपूर्ण । श्रीगुरुराया ॥ २४ ॥ येणें वचनें श्रीगुरुरावो । संतोषोनि दिधला पसावो । ह्मणतो ग्रंथ बोलें साभिमानो । अति गोडपणें ॥ २५ ॥ तूं जें जें प्रमेय बोलसी । तें तें वेदार्थचि परियेसी । सुख होय सज्जनांसी । तैंची करी निरूपण ॥ २६ ॥ तो महा प्रसाद घेवोनी शिरीं । प्रेमें चरणद्वय नमस्कारी । जी जी महा प्रसाद संसारी । लाधलों आजी ॥२७॥ तरी तुम्ही होतांचि प्रसन्नता । सिद्धपणाची याया ग्रंथा । तेथें तूंची होवोनि श्रोता । वदवीं मज करूनि ॥ २८ ॥ ऐसी करी विनंति इतुकी । तंव वरदहस्त ठेवी मस्तकीं । तेणें मी होउनि परम सुखी । बोलें ग्रंथु ॥ २९ ॥ आतां साधु जनांसि करूं नमन । जयां दीनोद्धारीं सामर्थ्य पूर्ण । ज्यांसि जालिया अनन्यशरण । ब्रह्म पूर्ण पैलाभे ॥ ३० ॥ तयां योग्य निरूपण । करावया सामर्थ्य धरी कोण । परी ते भावाचे भोक्ते जाण । कृपाळत्वें ॥३१॥ जैसें नेणतें जें बाळ । पितृमुखीं घाली कवळ । स्वयें करूनि अळमाळ । सुखची पसरी ॥ ३२ ॥ ऐसिया स्नेहाची जाति । नेणें युक्तायुक्त प्रतीति । बाळकें दिधलें तें अति प्रीति । अंगिकारि तूं ॥ ३३ ॥ तैसा मीही संतांचा पढियंतां । ते अंगिकारिती भव्ळता नेणता । तेणेंचि होइन सरता । तिहीं लोकीं ॥ ३४ ॥ यालागीं बोबडी बोली । बोलेन ग्रंथ नव्हाळी । श्रोता वक्ता ज्ञानांशुमाळी । श्रीगुरु स्वामी ॥ ३५ ॥ सहज पूर्ण निजरंगाचा । ग्रंथ बोलेन रसाळ वाचा । जो संवाद श्रीवसिष्ठाचा । परब्रह्मेसी ॥ ३६ ॥ परब्रह्म जें कां निर्वाण । तेंचि लीलाविग्रही जालें जाण । तारावया भक्तजन । साकाररूपें ॥ ३७ ॥ जरी धरिलें रूप साकार । तरी ब्रह्म तें निर्विकार । अज्ञान भ्रमें विकार । मानिति मूढजन ॥ ३८ ॥ यालागीं भक्तानुग्रहार्थ जाण । श्रीरघुनाथावतार पूर्ण । पूर्णानंदैक चिद्धन । सकारलेंही ॥३९॥ धरूनि तनु अति श्यामळ । राजीवलोचन सकोमळ । पूर्ण गात्र वेल्हाळ । मायिकपणें ॥ ४० ॥ स्वयें निष्प्रपंच आपण । करी प्रपंचाचें विडंबन । आणि शरणागता जाण । आनंदकारी ॥ ४१ ॥ जरी रूप धरिलें साकार । तरी सच्चिदानंद निर्विकार । न लोपोनियां अति सुंदर । मिरवी रूपा ॥ ४२ ॥ नूतन जलधर जयापरी । अति श्यामता वाणे शरीरीं । नाना अतस पुष्पांचियापरी । अंगकांति आंगीं ॥ ४३ ॥ अरुणवर्ण चरणतळें । जैसें नभ सिंदुरें डवरिलें । तैसें पादतळ मिरवलें । अति सुरंग ॥ ४४ ॥ तया ध्वज वज्र ऊर्ध्व रेखांकित । पद्मद्वयें शोभा दावित । पद्मप्रदेश

१ प्रसाद, २ ही रंगनाथांची गुरुपरंपरा होय. ३ लीलेनें शरीर धारण करणार. ३ भक्तांवर कृपा करण्यासाठीं. ४ कोंवळा रंगाची.

सुनील शोभत । तोडरयुक्त ॥ ४५ ॥ वांकी नूपुरें चरणीं । त्यांचा नादु तोचि वेदध्वनि । उरुपोटरियांची मिरवणी । अलोकिकपणें ॥ ४६ ॥ कटितटीं कसिलें पीतवसन । पीतांबरु केला परिधान । विद्युल्लता वेढी सजलघन । तैसा शोभे ॥ ४७ ॥ वरी साडेपंधरयाची मेखला । रत्नखचित दीप्तिमेळा । तेज न समाये नभ मंडळा । सतेजपणें ॥ ४८ ॥ तळीं मोतियांच्या झल्लरी । क्षुद्रघंटिका वाजती नानापरी । मनोहर दोंदावरी । दक्षिणावर्त्तनाभी ॥ ४९ ॥ जें कीं ब्रह्मयाचें जन्मस्थान । चराचरांचे विश्रांतिभुवन । तेथूनि रोमराजि सकोमलपण । हृदयावरी ॥ ५० ॥ हृदय अति विशाळ । जैसें चिदाकाश अति निर्मळ । दक्षिणांगीं सकोमळ । श्रीवत्सपद ॥ ५१ ॥ वामभागीं श्रीविराजित । ते शोभा न बोलवे ईषत् । कंठीं कौस्तुभ झळाळित । तेजें लोपत दिनमणि ॥ ५२ ॥ चौभुजांचा अंतर्भाव । दोंचि भुजीं केला गौरव । चौं भुजांची बरव । दावी दों भुजीं ॥ ५३ ॥ अभय वरद हस्त दोनी । उभारले भक्तांलागुनी । कार्यसमयीं धनुष्यबाण घेउनी । मिरवी शोभा ॥ ५४ ॥ दशांगुळें वीरकंकणें । अंगदादि मिरवती भूषणें । मुखशोभा वरिती चंद्रकिरणें । अति सुढाळत्वें[२] ॥ ५५ ॥ मकराकारें[३] रत्नजडित । कर्णीं कुंडलें तळपत । ते दीप्ति[४] असे पडत । गंडस्थळावरी ॥ ५६ ॥ हनुवटी शुद्ध पातळ । श्मश्रु बाणताती कोमळ । अधर सुंदर वेल्हाळ । वोष्ठद्वय ॥ ५७ ॥ स्मितहास्य मिरवे वदनीं । तेथें पुरे भक्तांचीं धणी । स्थिरावले सर्व विसरोनि । अवयवसमूह ॥ ५८ जैसें दालिंबफल विकासत । अंतरीं बीज झळाळित । तैसी ओष्ठामाजी शोभत । दंतपंक्ति ॥ ५९ ॥ बोलतां चौकीचे दंत झळाळिती । तेणें लोपे सूर्याची दीप्ति । नासिक मनोहर सरळ स्थिति । सुंदरपणें ॥ ६० ॥ वायु हिंडतां सैराट[६] । विसरला आत्मसुखाची वाट । मग राहिला निकट । नासापुटीं ॥ ६१ ॥ प्राणरूपीं करी अवस्थान[७] । रामाच्या नासापुटीं विश्रमोन । राहिला आनंदें-करून । घ्राणरूपें ॥ ६२ ॥ राजीवनयन अति सुरेख । नयनप्रांत आरक्त पीयूख । वर्षत अवलोकन संतोख । भक्त परम सुख पावती ॥ ६३ ॥ भोंवयारखा धनुष्याकार । व्यंकटा सुनीळमनोहर । मदनासीच करिती मार । लावण्यपणें ॥ ६४ ॥ जैसें ब्रह्मसुख निश्चळ । तैसें मनोहर विशाळ कपाळ । वरी कुंकुमकेशरांकित निर्मळ । चंदन शोभे ॥ ६५ ॥ आकर्ण रेखिला टिळा । मध्यें रत्नाक्षतांचा टिळकु भला । ते शोभे बोलतां पांगुळा । वाचा होती ॥ ६६ ॥ रत्नखचित मुकुट शिरीं । खणोखणीं हिरियांची हारी । नीळ शोभे शिखरावरी । अनर्घ्यपणें ॥ ६७ ॥ जैसा षोडशकळीं पुरला । शरत्काळीं पौर्णिमे उगवला । वर्तुळ सोज्वळ शोभला । गगनीं इंदु ॥ ६८ ॥ तैसी मुखशोभा निरुपम । पूर्ण चंद्रही उपमेसि विषम । देखोनि भक्तोत्तम । उल्हासती ॥ ६९ ॥ देखोनियां

---

१ उत्तम सुवर्णाची. २ शोभेमुळें. ३ माशाच्या आकाराची. ४ तेज. ५ इच्छा; हौस. ६ इकडे तिकडे ७ राहणें.

रघुनाथासी । परमानंदु संसारियांसि । वा समाधि होय विरक्तांसी । अपूर्व काय ॥ ७० ॥ म्यालागीं सच्चिदानंदघन । साकारत्वें रघुनाथ आपण । अवलंबोनि अज्ञानपण । मनुष्यत्व मिरवी ॥ ७१ ॥ तो स्वयें जऱ्ही ज्ञानमूर्त्ति । तऱ्ही लौकिकीं न प्रगटिली व्यक्ति । जन तारावया प्रश्नोक्ति । करी नेणता ऐसी ॥ ७२ ॥ याचिया प्रश्नाचें उत्तर । देता श्रीवसिष्ठ चतुर । यथानाम ग्रंथ पूर्वापर । वासिष्ठ बोलिजे ॥ ७३ ॥ परमगुरुत्वें जो वरिष्ठ । ज्ञान-विज्ञानें अति श्रेष्ठ । म्हणोनि बोलिजे वसिष्ठ ज्ञानगुरु ॥ ७४ ॥ बोलिला श्रीरामाप्रति । त्या संवादाची परम ख्याति । भोगितातो विमलमति । योगेश्वर जे ॥ ७५ ॥ आतां राम-पदाचें व्याख्यान । यथामति करूं निरूपण । राम बोलिजे कोण्या गुणें । तेंही सांगों ॥ ७६ ॥ यदर्थी स्वयें श्रुति । रामपदातें वाखाणिती । तेंचि कृपा करूनि संतीं । सारार्थ ऐकावें ॥ ७७ ॥

श्रुति ॥ रमंते योगिनोऽनंते सत्यानंदे चिदात्मनि । इति रामपदेनासौ परंब्रह्माभिधीयते ॥

शमदमादिसाधनीं संपन्न ॥ जे योगीश्वर परम पावन । ते निरंतर रमती तें स्थान । परब्रह्म बोलिजे ॥ ७८ ॥ तोंचि रामरूपें असे वर्त्तत । त्यासिच परब्रह्म बोलिजेत । जें कीं सत्यज्ञानानंद अनंत । प्रियत्वें आत्मा ॥ ७९ ॥ सत्य शब्दें सत्ता बोलिजे । अस्तित्वें जे सर्वत्र सुंझे । घटःसन् पटःसन् म्हणिजे । तेचि सत्ता ॥८०॥ आहे शब्दें जें जें बोलिती । ते ते जाण सत्तेची व्यक्ति । सत्ता अनुस्यूतें अबाधिती । वर्ते सर्वत्र ॥ ८१ ॥ आहेपणें जें जें भासे । तें तें वस्तु जाण विश्वासें । तेथोंचि ज्ञान आनंदु वसे । केवळीं पाहतां ॥ ८२ ॥ सर्वांचें निरसणें । केवळ उरे जे सत्तारूपपणें । तेथेंचि आनंद कोंदलेपणें । स्वतःसिद्ध ॥ ८३ ॥ सत्ता जेथें जेथें भासे । तेथील विशिष्ट येकसरिसें । प्रत्यक्ष जो पदार्थ दिसे । तो सांडावा कीं ॥८४॥ दृश्य तें तंव मिथ्यभत । म्हणऊन टाकावें समस्त । केवळ सत्तांचि सुनिश्चित । निवडोनि घ्यावी ॥ ८५ ॥ तेहि सत्ता जे जड नव्हे । केवळ ज्ञानरूप आहे । ज्ञानविहीन केवीं राहे । सत्ता सत्तारूपें ॥८६॥ तें सकळांचें प्रकाशक । ज्ञानमात्राचि जें येक । सत्तामिश्रित सम्यर्क् । नाहीं अनेक जिये ठायीं ॥ ८७ ॥ ज्ञाना-वेगळी जे सत्ता । ते जडत्वें पाषाणतुल्यता । म्हणवोनि युक्त ते तत्वता । चित्कला पूर्ण ॥ ८८ ॥ सत्ता आणि प्रकाश । आतुडे जेथ सुख अंसोस । आहेचि पैं निराभास । स्वतःसिद्ध ॥ ८९ ॥ दुसरें मिश्रित नसतां । केवळ सुख प्रकाशतां । पाविजेचि कीं ब्रह्मवेत्ता । योगीश्वरीं ॥ ९० ॥ ऐसें असोनियांही अनंत । त्रिविध परिच्छेद विरहित । देश काळ वस्तु हे निश्चित । परिच्छेद तिन्ही ॥ ९१ ॥

---

१ शुद्ध अंतःकरण झालेले. २ 'राम' या शब्दाचें. ३ विचार करून काढलेला अर्थ. ४ राहते. ५ एकसारखी भरलेली. ६ स्वतःच उत्पन्न झालेला. ७ अस्तित्व, खरेपणा. ८ चांगली. ९ मोठें.

+ संमति श्लोक+ दिक्कालाद्यनवच्छिन्नानंतचिन्मात्रमूर्तये । स्वानुभूत्यैकसाराय नमः शांताय तेजसे ॥ १ ॥

आतां परिच्छेदत्रयाचें लक्षण । तेंही सांग सांगेन । श्रोतां होऊनि सावधान । परिसावें जी ॥ ९२ ॥ ग्राम येक येकला असे । त्या सभोंवतें अरण्य वसे । परी सर्वत्र व्यापक ग्राम नसे । ह्मणोनि परिच्छिन्नता ॥ ९३ ॥ ह्मणोनि ग्राम एकदेशी जाला । सर्वत्र नाहीं तोचि देखिला । ह्मणोनि देशपरिच्छेद त्या आला । नश्वर भला याचिलागीं ॥ ९४ ॥ जें देशें करूनि परिच्छेदलें । तें नश्वर सहजें जालें । तैसें ब्रह्म नव्हे तें व्यापलें । सर्वत्र देशीं ॥ ९५ ॥ ब्रह्म तें तंव सदोदित । सर्व देशीं सर्वत्र असत । ग्राम तो भूमिचवरि दिसत । नाहीं वर्त्तत सर्व लोकीं ॥ ९६ ॥ ब्रह्म तें स्वर्गमृत्युपाताळभुवनीं । पुरोनि उरलेंसे निर्वाणीं । सर्वत्र सर्व देशीं भरोनि । कोंदलेंसे ॥ ९७ ॥ आतां काळपरिच्छेद तो ऐसा । पदार्थमात्रीं दिसे सहसा । क्षणें दिसे क्षणें नाश । पावतु जाये ॥ ९८ ॥ येके काळीं घट दिसे । तोचि कल्पांतुवरी नसे । मध्येंचि अल्प काळें नासे । ह्मणोनि नसे सर्वदा ॥ ९९ ॥ पुष्पादि पदार्थ देखिजेती । क्षण येका नाहींच होती । वस्त्र नूतन षण्मासाती । असेचिना ॥ १०० ॥ तैसें दिवसाचें रात्रीं नाहीं । रात्रींचे दिवसा न भेटे काहीं । स्वप्नीं तरी तियें दोन्हीही । असतीचना ॥ १ ॥ एके काळीं वर्त्तमान । आणि दुसरे काळीं जें क्षीण । तो काळपरिच्छेद संपूर्ण । सर्व पदार्थीं ॥ २ ॥ हेंचि नश्वरपणाचें लक्षण । जें क्षणें उदयो क्षणें क्षीण । ह्मणोनि तो अनात्मा जाण । नेतिमुखें निरसे ॥ ३ ॥ तैसें नव्हे परब्रह्म । सर्वकाळीं सर्वदा सम । अवस्थात्रयीं नव्हे विषम । येक रूपत्वें ॥ ४ ॥ ह्मणोनि काळें नाहीं परिच्छेदलें । ह्मणोनि अनंत नामासि आलें । अंतु नाहीं कोणत्या बोले । तिहीं प्रकारें जया ॥ ५ ॥ तैसाचि वस्तुपरिच्छेद नसे । दुसरें तयाहूनि जेथें न दिसे । तें वस्तु अपरिच्छेद ऐसें । जाणावें कीं ॥ ६ ॥ आकाश सर्वत्र सर्व देशीं । आहे हे प्रतीति जगासी । आणि काळें नाश नाही तयासी । हेंही देखिलें ॥ ७ ॥ स्वर्गमृत्युपाताळीं । नानाब्रह्मांडांच्या मेळीं । असे आकाशयोकळी । सर्व देशीं ॥ ८ ॥ आकाशेंवीण ठावो रिता । नाहींच जाणिजे सर्वथा । तैसें सर्वकाळीं तिनी अवस्थां । आकाश असे ॥ ९ ॥ ह्मणोनि देशकाळपरिच्छेद । आकाशास नाहीं बाध । तेचि तें देश काळ निर्विवाद । वर्त्तत असे ॥ ११० ॥ परी पृथ्व्यादिकें महाभूतें । दुजेपणें असती वर्ततें । घटपटादि व्यक्तें । नाना भासती ॥ ११ ॥ येणें वस्तुपरिच्छेद आला त्यासी । ह्मणोनि दृश्य नश्वर सर्वांसी । आत्मा निरंश आनंदराशि । अपरिच्छेद ॥ १२ ॥ ह्मणोनि दुजें नाहीं तैसें । जगडवाळ तो अध्यारोप भासे । तें मिथ्यापणें नाहीं ऐसें । येणें विचारें ॥ १३ ॥ ह्मणोनि देशकाळवस्तुविचारें । परिच्छेद नाहीं सर्व प्रकारें । अंतु न पवे कोणे निर्धारें । ह्मणोनि अनंतु बोलिजे ॥ १४ ॥ यालागीं सत्ता सुखरूप प्रकाश । अनंत

१ नेमका. २ नाश. ३ उपायानें.

अपरिच्छेद्य निरंश । आत्मा प्रिय उदास । ब्रह्मऐसें ॥ १५ ॥ (एवं दिक्कालाद्यनवच्छिन्न । अनंत तथा चिद्धन । स्वानुभूत्येक रस जाण । शांत आणि तेजोरूप ॥ १ ॥) येणें तिन्ही भेद निरसले । जे स्वजातीय विजातीय स्वगत बोलिले । तेही आतां सांगों भले । प्रसंगेंचि ॥ १६ ॥ देहादिप्रपंच तितुका विजाति । भेदु नाहीं तयाप्रति । ते नश्वरपणें मिथ्या भासती । सत्य त्रिजगतीं परब्रह्म ॥ १७ ॥ सत्य दुसरें जरी असे । तरी वस्तूसि परिच्छेद दिसे । दुजें नसतां तेंचि वसे । परिपूर्णत्वें ॥ १८ ॥ विजातीय जरी साचें असतें । तरी ब्रह्मोसि भेदु दावितें । तें सत्य नसतां येकुलतें । येकत्वें ब्रह्म ॥ १९ ॥ शुक्तिकेच्या ठायीं रजतें । भासलेपणें काय भेदु दावित । कीं रज्जुसर्पासि भेदु भासत । दृढपणें ॥ १२० ॥ भासतां न भासतां भेदु नाहीं । जरी मृगजळ रश्मीच्या ठायीं । नाना स्वप्नपुरुषासि कांहीं । भेदु करी ॥ २१ ॥ तैसें भासतांही जगडंबाळ । मिथ्यापणें ब्रह्मचि केवळ । भेदु नसोनि नित्य निर्मळ । अद्वयपणें ॥ २२ ॥ आणि कारणाचें जें कार्यजात । तितुकें कारणचि जाण निश्चित । नाहीं भेदु तया असत । येक रूपत्वें ॥ २३ ॥ तैसी जगाची उत्पत्तिलयस्थिति । ब्रह्मावेगळी कोठें वर्त्तती । ह्मणोनि तेचि तें गुणनिश्चिती । भेदु तो मिथ्या ॥ २४ ॥ सुवर्णाचें कार्य अळंकार । तें सुवर्णचि मनोहर । नाहीं तेथ भेदांतर । तयापरी हें ॥ २५ ॥ तैसेपरी सजाति । ईश्वरब्रह्मादित्रय भासती । ते तंव स्वतः चिद्धनमूर्त्ति । भेदु तो औपाधिक ॥ २६ ॥ माया अविद्येचिया प्रतीति । जीवेश्वरासि भेद भासती । तेही अनेक स्फुरती । अज्ञानवशें ॥ २७ ॥ तऱ्ही मुळीं अविद्या नव्हे विद्यमान । मिथ्यापणेंचि व्यर्थ भान । लटिकेनि साचासि भिन्नपण । तें तंव न घडे ॥ २८ ॥ मुखापुढें अनेक दर्पण । दावितां मुखा आलें अनेकपण । तऱ्ही मुख काय जालें भिन्न भिन्न । विचारितां ॥ २९ ॥ नाना घटांच्या अनेकपणीं । भासतांही नव्हे अनेक तरणि । तो येकुला येक स्वस्थानीं । भेदुकाहाणी असत्य ॥ १३० ॥ शर्करेचा परिवारु केला । तो शर्करेसि भिन्न नाहीं जाला । साकरपणेंचि संचला । येकरूपत्वें ॥ ३१ ॥ तैसे जीवेश्वर भिन्न भासती । हे तंव समूळ मिथ्या भ्रांती । ह्मणोनि येकत्वा नय खंति । येकपणेंचि ॥ ३२ ॥ ह्मणोनि भेद सजाति । ब्रह्मासि नाहीं सर्वार्थी । येकत्वें अभेदमूर्त्ति । निघोटपणें ॥ ३३ ॥ आतां भेदु बोलिजे स्वगत । सत्य ज्ञान सुखादि येथ । तऱ्ही तें एकस्वरूपचि निश्चित । भेदु तदंर्गत राहेना ॥ ३४ ॥ सत्ता ज्ञानाहूनि भिन्न नसे । ज्ञानहीन तें जड असे । जड तें अनात्मा सर्वांशें । मिथ्याभूत ॥३५॥ अथवा ज्ञान सत्तेहूनि वेगळें । ह्मणतांचि तें कल्पित जालें । कल्पितासि सत्यत्व कोणे बोलें । विचारिजे ॥ ३६ ॥ ह्मणौनि सत्ता आणि ज्ञान । परस्परें नव्हती भिन्न । तैसोंचि सुखही तज्ञपणजाण । अभिन्नपणेंसी

---

१ ज्याचे विभाग होत नाहीं असा. २ त्रयस्थ. ३ स्वर्ग, मृत्यु, पाताळ या तीन्हीं लोकांत. ४ खरें. ५ एकटें. ६ मोतशिंपीच्या. ७ रुपें. ८ दोरी व साप असा भेद. ९ किरणांच्या. १० फार मोटें.

॥ ३७ ॥ सुख सत्तेहूनि वेगळें करितां । तरी तें सुख कल्पित तत्वता । विषयसुखाचे परी नश्वरता । येईल तया ॥ ३८ ॥ सत्ता सुखावेगळी जाण । असतां येथें प्रवर्त्ते कोण । सुखेंविण पाषाण । सेवी कोण्ही ॥ ३९ ॥ आतां सुखावेगळें ज्ञान । तेंही तें ऐसेंचि जाण । सुखही ज्ञानेंविण । तेंही जड ॥ १४० ॥ एवं सत्ता प्रकाश सुख । परस्परें येकत्वें येक । स्वगतभेद निःशेख । नाहींच ब्रह्मीं ॥ ४१ ॥ ह्मणोनि ब्रह्म तें अद्वयानंद । सच्चिदानंद अगाध । नाहीं तया देशकाळविच्छेद । अनंतपणें ॥ ४२ ॥ ऐसें जें ब्रह्म बोलिजे । तेंचि राम शब्दें जाणिजे । राम तो सच्चिदानंद सहजें । बोले स्वयें श्रुति ॥ ४३ ॥ येणें रामपदाचें व्याख्यान । वाखाणिलें सच्चिदानंद जाण । इत्यादि शब्दें ब्रह्म निर्वाण । बोलिजे रामु ॥ ४४ ॥ हें महावाक्याचें रहस्य । जीवब्रह्माचें सामरस्य । ब्रह्मस्वरूप सावकाश । बोलिलें होय ॥ ४५ ॥ सच्चिदानंदपद वाखाणिलें । सर्व ग्रंथाचें सार बोलिलें । तें रामपदें सिद्ध जालें । शब्द ब्रह्म सर्व ॥ ४६ ॥ असो अनुभवी जाणती मातु । येरां नकळे हा वृत्तांत । परी अनुभवियांलागीं हा ग्रंथु । आरंभिलासे ॥ ४७ ॥ असो एवंभूत हा रघुनाथ । रामपदें ब्रह्म सदोदित । तो श्रोता वासिष्ठाचा येथ । जगउद्धारक ॥ ४८ ॥ या रामवसिष्ठांचा संवाद । तें वासिष्ठ बोलिजे विशद । शतकोटि रामायण अनुवाद । श्रीवाल्मीकीनें केला ॥ ४९ ॥ त्यामाजी गोड निरूपण । सर्वांसि विश्रांतीचें स्थान । तें हें वासिष्ठसार जाण । ग्रंथरावो ॥ १५० ॥ जिहीं देखिलें नाहीं वासिष्ठ । तयां न चुकली संसारकष्ट । अज्ञानें जालें निकृष्ट । ज्ञानाभावें ॥ ५१ ॥ संसृति चुकवायाचें मूळ । येक ब्रह्मज्ञानचि निर्मळ । येर उपाय तो केवळ । काळक्षेप करणें ॥ ५२ ॥ व्रत तप दान तीर्थाटन । यज्ञादिसाधन गहन । तें संसृतीसीच कारण । आत्मज्ञानेंविरहित ॥ ५३ ॥ तया आत्मज्ञानाचें निजमंदिर । कीं ज्ञानरूपचि मनोहर । तेंचि तें वासिष्ठसार । ग्रंथरूपें ॥ ५४ ॥

संमती श्लोक ॥ यावन्नानुग्रहः साक्षाज्जायते परमेश्वरात् । तावन्न सद्गुरुः कश्चित्सच्छास्त्रमपि नो लभेत् ॥ १॥

जया नाहीं सद्गुरुसि भेटी । तया प्रवेशु कैंचा वासिष्ठीं । यालागीं अध्यात्मशास्त्राच्या मुकुटीं । वासिष्ठरत्न शोभे ॥ ५५ ॥ यालागीं सर्व प्रकारें । वासिष्ठीं प्रवेशु करा बारे । अर्थु कळलिया निर्धारें । ब्रह्मचि तुह्मी ॥ ५६ ॥ परब्रह्मचि वसिष्ठ राम । या दोघांचा संवाद निरूपम । तो ग्रंथव्याजें परम । ब्रह्मरूप ॥ ५७ ॥ त्याही मधील प्रकरणांतरीं । श्लोक निवडूनियां चतुरीं । वासिष्ठसारकुसरी । नवनीत ॥ ५८ ॥ प्रकरणानुक्रमेंविशेषें । श्लोकसंबंध प्रकरण मिषें । वासिष्ठाचें सर्वांशें । प्रतिबिंब ॥ ५९ ॥ सर्व वासिष्ठाचा अर्थसार । तेंचि बोलिजे वासिष्ठसार । भाग्यें उत्कंठ जो चतुर । तयासीचि लाभे ॥ ६० वासिष्ठसाराचा श्लोकचरण । त्याचे अर्थीं होतां श्रवण । समाधिसुख आपण । बाणे स्वयें

१ वेळ घालविणें. २ मंद. ३ ग्रंथमिषानें. ४ कौशल्ययुक्त. ५ श्लोकाचा चवथा भाग. ६ ठसतें.

॥ ६१ ॥ समाधिचि वरी तयासी । जे निर्वाण तुर्यग परियेसीं । कृतकृत्यता अनायासीं । समाधि त्या लाभे ॥ ६२ ॥ तेंचि करावया निरूपण । वंदुनि श्रीगुरूचे चरण । करूनि संतांसि नमन । अवधानें मागें ॥ ६३ ॥ तुह्मीं दिधलिया अवधान । मुकया वक्तृत्व संपूर्ण । सार वक्ताचि मुकावे जाण । अनवसरें तुमचेनी ॥ ६४ ॥ यालागीं मायबाप जे तुह्मीं संत । त्यांप्रति विनवितसें आर्त । अवधानाचें दान दत्त । करावें ह्मणोनि ॥ ६५ ॥ तुमचेनि ऐश्वर्य बोलता । साशंक तुह्मीं अवधान नेदितां । तुमच्या कृपाकटाक्षें पूर्णता । बाणे सर्वांपरी ॥ ६६ ॥ यालागीं पूर्ण द्यावे अवधान । तुह्मी बोलविला मी बोलेन । पुंसा पढविजे आपण । स्वसंतोषाचिलागीं ॥ ६७ ॥ ऐसिये विनवणीसाठीं । संतीं पाहिलें कृपा दृष्टि । आतां ग्रंथु उठाउठी । बोलेन मी ॥ ६८ ॥ तंव संत ह्मणती भलाभला । तुवां थोर उपकार केला । ब्रह्मानंदाचासोहळा । भोगविसी आह्मां ॥ ६९ ॥ आतां झडकरी कथन करीं । विलंबु न करीं क्षणभरी । तोचि प्रसादु वंदुनि शिरीं । ग्रंथु वैखरी बोले माझी ॥ १७० ॥ अहो वासिष्ठसाराचें व्याख्यान । महाराष्ट्रवाणी करणें जाण । हें तों अपाडें अघटमान । सर्वांपरी ॥ ७१ ॥ समुद्र तरायालागीं । होडगें मेळविजे आशेलागीं । तसें हें सर्वांगीं । अपाड असे ॥ ७२ ॥ परी येथ इतुकाचि भिंवसा । जे कर्णधार सद्गुरू ऐसा । आणि तुमचे कृपेचा सहसा । सुवायो साह्य ॥ ७३ ॥ इतुकी सामग्री करितां । ग्रंथाब्धि हेळा तरतां । प्रयास नाहींत सर्वथा । ह्मणोनि प्रवर्तलों ॥ ७४ ॥ जो वाचादिकांचा प्रकाशकु । तो वदविता श्रीगुरुनायकु । आणि तुमचा पूर्ण कृपावलोकु । तेणे सकळ सिद्धी ॥ ७५ ॥ आतां ग्रंथार्थुचि बोलेन । श्रोतीं द्यावें अवधान । श्रीरघुनाथ वैराग्य पूर्ण । असतांचि दावी ॥ ७६ ॥ तो स्वयें परब्रह्म निर्गुण । वैराग्यसाधनीं साध्य जाण । ते वस्तूसि वैराग्य पूर्ण । हा लौकिकार्थ ॥ ७७ ॥ लोकसंग्रहार्थ आपण । दावी आपणा अज्ञानपण । वैराग्य आणि गुरुभजन । लोकसंग्रहार्थ ॥ ७८ ॥ जो परब्रह्मपुतळा । त्यांसि कैंची अज्ञानकळा । वैराग्यादिसाधनमेळा । तोही तैसाची ॥ ७९ ॥ बाप कृपाळू जगजेठी । जगदुद्धार स्थूनि दृष्टि । गुरुशिष्यसंवादु प्रकटी । नेण होउनी ॥ ८० ॥ स्वयेंचि परब्रह्म आपण । वरी नटोनियां रामपण । नेण होऊनि वैराग्य पूर्ण । शोभवी आंगीं ॥ ८१ ॥ पृथ्वीचीं तीर्थें करावया । श्रीराम पुसती दशरथराया । राजा श्रीरामासी आज्ञा द्यावया । प्राणांत मानी ॥ ८२ ॥ ह्मणे रघुनाथाचे वियोगेंकरून । तत्काळ जाती माझे प्राण । ह्मणऊनि राहिला आलिंगुन । श्रीरघुनाथासी ॥ ८३ ॥ कोण्हेपरी न सोडि रामासी । ह्मणे तूं जाऊं नको तीर्थयात्रेसी । तुझेनि वियोगें प्राणासि । मुकेन जाण मी ॥ ८४ ॥ पुढील देखोनि कार्यार्था । वसिष्ठ ह्मणती राया दशरथा । आज्ञा देई श्रीरघु

१ लक्ष. २ बोलकेपणा. ३ पीडित. ४ लवकर. ५ चांगलें; वाहवा ! ६ कठीण. ७ न होणारें. ८ धैर्य. ९ सुकाणूं धरणारा. १० वारा.

नाथा । तीर्थाटणासी ॥ ८५ ॥ तंव रघुनाथ ह्मणती रायासी । मी शीघ्र येईन तुह्मांपाशीं माझें मन तुमचे पायांसीं । लीन असे निरंतर ॥ ८६ ॥ मग अतिप्रयासें दशरथ । श्रीरघुनाथासि आज्ञा देत । रघुनाथवियोगें माता समस्त । व्याकुळ जाल्या ॥ ८७ ॥ असो आज्ञा घेऊनि रघुपति । सारे वंदूनि गुरु माता भूपति । अल्प सेनेसिपृथ्वीपाति । प्रस्थान करी ॥ ८८ ॥ पुष्करादितीर्थें समस्तें । प्रयाग वाराणसी कुरुक्षेत्र जेथें । द्वारका श्रीशैल्य सेतूतें । गेले श्रीराम ॥ ८९ ॥ इत्यादि तीर्थें सांगो किति । तीर्थ पवित्र करावया श्रीरघुपति । आपुलेनि चरणस्पर्शें विश्वमूर्ति । पवित्र करी ॥१९०॥ (मूळ ग्रंथीं तीर्थ विस्तार ॥ केला असे अपरंपार । येथें तात्पर्यें ज्ञान मात्र । संक्षिप्त वर्णिलीं ॥ १ ॥) ऐसीं सकळ पृथ्वीसीं [१]तीर्थें । पवित्र केलीं श्रीरघुनाथें । जैसी मंत्रविद्या ग्रहणातें । शुद्ध कीजे ॥ ९१ ॥ ऐसें पवित्र करूनि सर्व तीर्थांसी । रघुनाथ आले अयोध्येसी । हें ऐकोनि राजा स्वमानसीं । संतोष मानी ॥ ९२ ॥ नगर शृंगारिलें नानापरी । राजा पुढारला सैन्य संभारीं । राम देखोनियां जिव्हारीं । उचंबळला ॥ ९३ ॥ आनंद न समाये सृष्टीं । श्रीराम कंठीं घाली मिठी । येरे चरण वंदुनि [३]पोटीं । लीन जाला ॥९४॥ परस्पर सुखें सुखावले । परमानंदें निवाले । तें सुख न बोलवे बोले । वैखरी वाचा ॥ ९५ ॥ एवं गुरुपूर्वक माता तिन्हीं । रघुराज वंदी प्रेमेंकरूनी । अयोध्येच्या सकळ जनीं । महोत्सव सर्वीं थोर केला ॥ ९६ ॥ देशोदेशींचे प्रजा लोक । राजेही आले मांडलिक । रघुनाथदर्शनीं सकळीक । परमानंद पावले ॥ ९७ ॥ नगरांत आणूनि रघुनाथासी । सोहळा केला अति उल्हासेंसी । सुखें राहिले स्वर्गवासी । आनंदभरित ॥ ९८ ॥ ऐसा सकळांसि उत्साह जाला । परी रघुनाथ न मनी राज्य सोहळा । स्वगृहीं राहे उद्वेगला । भोगवर्जित ॥ ९९ ॥ राज दर्शना कदापि न जाती । नाहीं बाळक्रीडेची आसक्ति । नसे राजोपचाराची प्रीति । उद्विग्न चित्तीं सर्वदा ॥ २०० ॥ राजा कळवळोनि भेटीसी । बोलावूं धाडी रघुनाथासी । तरी पितृवचनार्थ सभेसी । क्षण येक येती ॥ १ ॥ तेथही उद्विग्न होऊनि बैसे । सर्वांगीं [४]कोमाइला दिसे । तें राजा देखोनि निजमानसें । दुःख मानी ॥ २ ॥ आदरें पुसे रघुनाथासी । बारे तुज कोण चिंता मानसीं । वर्त्ते ते सांग आह्मांसीं । यथार्थ रामा ॥ ३ ॥ तुजउद्विग्न वोसावलें देखोन । मज दुःख होतसे दारुण । कारण न सांगतां प्राण । जातील माझे ॥ ४ ॥ तुज जें असेल अपेक्षित । तें मी देईन निश्चित । परी चिंताग्रस्त । राहों नको बापा ॥ ५ ॥ तुझेनि सुखें सुख आह्मांसी । तुझेनि दुःखें प्राणांत परियेसीं । तरी सांग व्यथा कोण मानसीं । [५]आधि कीं [६]व्याधि ॥ ६ ॥ तंव राम ह्मणे भूपाळा । तुमचेनि आह्मां नित्य सोहळा । आधिव्याधीचा मेळा । तेथ कैंचा ॥ ७ ॥ इत्यादि गौरववचनीं ।

---

१ तीर्थजातें असा पाठ आहे. २ करी श्रीरघुनाथ असा पाठ. ३ रायाच्या पोटीं असा पाठ. ४ उदास झालेला. ५ मानसिक दुःख. ६ शारिरिक दुःख.

परिहार देत जे कोदंडपाणी । ऐसे क्रमले स्वभुवनीं । कित्येक दिवस ॥ ८ ॥ रघुनाथासि उद्विग्न असतां । राजा राणी यांसि व्याकुलता । राज्य गोड न वाटे चित्ता । राजा मुख्य सकळांसीं ॥ ९ ॥ ऐसे क्रमले दिवस किती । तंव अपूर्व वर्तलें अयोध्येप्रति । ते आयिकावें एकाग्र चित्तीं । कथासंगति सांगेन ॥ २१० ॥ विश्वामित्र महाऋषि । तेणें यागु आरंभिला संभ्रमेसी । बोलवूनि समस्तां ऋषींसीं । आपुल्या आश्रमीं ॥ ११ ॥ आचार्य होते पोते उद्गाते । मिळोनि महोत्साहें बहुते । अवदान देती अग्नीतें । स्वहाकारमंत्रें ॥ १२ ॥ तेथ येऊनियां राक्षसी । यागु विध्वंसिला क्षणार्धेसी । ऋषि दुःखी जाला मानसीं । पुनः यागासी आरंभिलें ॥१३॥ तोही पूर्णाहुति पावतां । यागु विध्वंसिला चरणघाता । ऋषि आरंभी मागुता । तोही विध्वंसिला ॥ १४ ॥ ऐसा जो जो याग आरंभी ऋषि । तो तो विध्वंसिजे राक्षसीं । विश्वामित्र दुखवला मानसीं । ह्मणे कोणासि सांगावें ॥ १५ ॥ जें जें निवारण करी आपण । त्याचें राक्षस करिती विध्वंसन । न चले मंत्राचें सामर्थ्य जाण । ह्मणोनि दुःखी ॥ १६ ॥ ह्मणे मी कोणासि जाऊं शरण । कोण करील माझें समाधान । रावण बळें राक्षस दारुण । अनिर्वार्य देवां ॥ १७ ॥ (मारीच सुबाहु माजले थोर । सवें असंख्य रजनीचर । साह्य असती दुष्ट समग्र । दुःख अपार मज देती ॥ १ ॥) इंद्रासि सांगों गार्‍हाणें । तरी तो लपला असे भेणें । आतां पारिपत्य माझें कोणें । करिजेल येथें ॥ १८ ॥ चंद्रसूर्यादि जे देव । तेही पराभविले सर्व । ते सांडुनि आपुलें वैभव । कार्य मात्र चालविती ॥ १९ ॥ आतां भूमंडळींचे भूपति । तेही रावणाभेणे पळती । त्यांच काय या राक्षसांप्रति । सामर्थ्य चाले ॥ २२० ॥ ऐसा आकुलव्याकुल मनीं । होऊनि लोटला मेदिनी । श्वासोच्छ्वास टाकी मुनि । अति दुःख करी ॥ २१ ॥ ह्मणे महाविष्णु विमुख आह्मांसी । ह्मणोनि उपेक्षिलें यागासी । यज्ञरक्षक सर्वांसी । त्यावीण नाहीं ॥ २२ ॥ ऐसें मुहूर्तें दोनी दुःख करितां । तंव अकस्मात स्मृति जाली चित्ता । ह्मणे भगवंत तत्वता । अवतरला असे ॥ २३ ॥ राया दशरथाचे उदरीं । श्री रघुनाथ रावणारि । अवतरला असे महामारी । राक्षसांतक ॥ २४ ॥ तो स्वतःसिद्ध असतां श्रीरघुपति । कायसी यागचिंता मज चित्तीं । जाऊनि दशरथाप्रति । रामलक्ष्मण मागतां ॥ २५ ॥ ऐसें विचारूनियां मनीं । ह्मणे बाप भाग्य माझें ये जनीं । आजि रघुनाथ डोळे भरुनी । झडकरी पाहों ॥ २६ ॥ तो आणोनियां यागासी । समस्तां निर्दळील राक्षसांसी । यज्ञ समर्पूं रघुनाथासी । प्रत्यक्ष सिद्ध ॥ २७ ॥ ज्याचेनि उद्देशें यागु कीजे । त्यासि प्रत्यक्ष जरी समर्पिजे । तरी कृतकृत्य होइजे । आणि कीर्ति जगीं ॥ २८ ॥ ऐसा निश्चय करूनी । प्रस्थान केलें तत्क्षणीं । बहुत शिष्य परिवारूनी । अयोध्येसि आला ॥ २९ ॥ तंव रायें आयिकिली मातु । सामोरा आला धांवतु । प्रेमें

१ धनुर्धारी. २ गेले. ३ आमंत्र्या करूत. ४ यज्ञ. ५ हौसेनें. ६ अजिंक्य ७ जाणें, गमन.

चरणांसि लागतु । सभेसि बैसविला ॥ २३० ॥ पूजा करोनि षोडशोपचारीं[1] । कर जोडोनि विज्ञप्ति करी । ह्मणे आज्ञा कार्य ते झडकरी । देईं महंता ॥ ३१ ॥ येरु ह्मणे राया अजमुता[2] । आह्मां अपेक्षा नाहीं तुज राज्य करितां । सकळ सिद्धि असती प्राप्ता । तुझेनि सामर्थ्यें ॥ ३२ ॥ परी इतुकें माझें मनोगत । आरंभिला यागु करीं समाप्त । त्यासि राक्षस अति उपद्रवित । विध्वंसिती यज्ञ ॥ ३३ ॥ यासि करितां उपाय कोटीं । परी नव्हे यज्ञसिद्धीसि भेटी । ह्मणोनि आठवली बुद्धि पोटीं । ते तूं आयिक राया ॥ ३४ ॥ जरी हें तुज सांगों कार्यांतर । तरी राक्षस असती अति थोर । तुझेनि न करवे संहार । बहुता काळें ॥ ३५ ॥ याळागीं मागेन तेंचि देईं । तूं सत्यसत्वधीर[4] वीर पाहीं । राक्षस निर्दळिसी सर्वही । परी बहुत दिवस लागती ॥ ३६ ॥ तुझी कीर्ति महाथोर । तूं शूरा माजी महाशूर । शुक्रासि केला महामार । हें तंव मी जाणतु ॥ ३७ ॥ परी आतां येकचि करीं । मागेन तें देईं झडकरीं । रामलक्ष्मण यज्ञरक्षणावरी । देईं मज ॥ ३८ ॥ आणीक न मागें गा तुज । देईं लक्ष्मणासहित रघुराज । इतुकेनि माझा कार्यसमाज । सिद्धि पावेल ॥ ३९ ॥ इतुकें आइकतांचि वचन । राजा जाला मूर्च्छापन्न[5] । भूमी पडला आसनाहून विस्मरण पावला ॥ २४० ॥ मुहूर्त येक जाला सावध । दुःखें दाटला अगाध । वाच न फुटे जाला सद्गद । ह्मणे हें काये सांगितलें ॥ ४१ जरी राज्य मागतासि मुनिराया अथवा प्राण देतों तुज लागोनियां । स्त्रिया भांडार स्वाधीया । न वंचीं[6] मी ॥ ४२ ॥ प रामलक्ष्मणासि मागितलें । हें थोर अनुचित केलें । जे कां मज न वचे दिधलें । प्राण गेलि ॥ ४३ ॥ अगा रघुनाथाविण राज्य सकळ । ते व्यर्थ शरीर तळमळ । स्त्रियादिभोग अमंगळ । मानितों मी ॥ ४४ ॥ किंबहुना शरीर प्राण । रघुनाथेंविण शवतुल्य[7] जाण । रामेंविण पाळी कवण । अनिकुत्सित ॥ ४५ ॥ तेथ देश दुर्ग भांडार[8] । हे तंव अतिशयेंसि नश्वर । रघुनाथेंविण संसार । वांतान्न मानीं ॥ ४६ ॥ याकारणें गा सुमुनि । रघुनाथ नेदीं भरंवसेनी । लटिकी जाली जह्मी वाणी । त्रिप्रकारें माझी ॥ ४७ ॥ जन्हीं जाती माझे प्राण । तऱ्ही नेदीं श्रीरामलक्ष्मण । इतुकें आयकूनि ब्राह्मण । अति उद्विग्न[9] जाला ॥ ४८ ॥ ह्मणे याचक गेलिया पराङ्मुख । तो गृहस्थासि महादोख । नको आग्रह करूं देख । पराङ्मुख मी जातों ॥ ४९ ॥ राजा ह्मणे ऋषिराया । मज रघुनाथेंविण श्रम कर्म कां क्रिया । तपादिसाधनें सर्व माया । अंतवंत मानीं ॥ २५० ॥ नाना वर्णाश्रमाचार । ते तोंपर्यंत साचार । जंव प्राप्त नव्हे रघुवीर । तंवचि वरी ॥ ५१ ॥ वर्णाश्रम नानाधर्म । तपादिसाधन नित्यकर्म । यांचा तोंचिवरी संभ्रम । जंव रामु न भेटे ॥ ५२ ॥ श्रीराम जालिया प्राप्त । सर्व वर्णाश्रमाचार व्यर्थ । तो जाण दुःखमूळ समस्त । संसारदायक

१ सोळा प्रकारचे जे उपचार आहेत त्यांनीं. २ हे श्रेष्ठा. ३ दशरथा. ४ सत्य, सत्व, धैर्य व शौर्य हीं अंगीं असलेला. ५ मूर्च्छित. ६ देतां येत नाहीं. ७ प्रेतासारखें. ८ खजिना. ९ उदास.

॥ ५३ ॥ ह्मणोनि जऱ्ही वर्णाश्रमधर्मजाति । मिथ्या जाली माझी भारती । तऱ्ही मी नेदीं श्रीरघुपति । सत्य जाण ॥ ५४ ॥ ऐसें वचन ऐकोनी । क्रोधाविष्ट जाला मुनी । मग चालिला कोपोनी । द्वाराबाहेरी ॥ ५५ ॥ तंव वसिष्ठ ह्मणती रायासी । नको विन्मुख धाडूं विश्वामित्रासी । तो जाण स्वयें तपोराशि शापील तुज ॥ ५६ ॥ आणि जे जे सूर्यवंशींचे भूपति । ते याचकासि विन्मुख न होती । त्यासि देती देहादिसंपत्ति । हें तुह्मांसि विदित ॥ ५७ ॥ यालागीं गा राया दशरथा । बोलावूनि आणी महंता । त्यासि सवें श्रीरघुनाथा । भय सर्वथा त्या नाहीं ॥ ५८ ॥ राम शूरांमाजी जगजेठी । सकळां राक्षसां करील आटी । यज्ञसिद्धि उठाउठी । करील जाण ॥ ५९ ॥ रघुनाथ पराभवेल ह्मणोनिही । सर्वथा भय न धरीं मनीं । राम शूरांचा मुकुटमणि । जाण निर्धारें ॥ २६० ॥ मागुती बोलावूनि विश्वामित्रासी । रायें नमस्कारिला संभ्रमेंसी । ह्मणे तूं रघुनाथासी । मागतोसि मज ॥ ६१ ॥ राक्षस जुनाट जुंझार । बहु समुदाय आणि महावीर । श्रीराम ज्यालि सकुमार । पंचदश वर्षांचा ॥ ६२ ॥ विद्याभ्यास तरी अपूर्व केला । परी संग्रामीं नाहीं निवडला । आणि याचा मज वियोग जाला । क्षणमात्र न साहे ॥ ६३ ॥ तंव विश्वामित्र ह्मणे रायासी । तूं अद्यापि श्रीराम नेणेसी । परब्रह्म अवतरलें तुझे वंशीं । धन्य कूस मातेची ६४ ॥ वैकुंठनाथ आला पोटा । तुज वानुरें भाग्योत्कटा । तूं अज्ञानें नेमसी वैकुंठा । श्रीरघुनाथासी ॥ ६५ ॥ सकळ दैत्यांसी निर्दळण । करावें साधुजनांचें पाळण । ह्मणोनि रामरूपें अवतरण । महाविष्णूनें केलें ॥ ६६ ॥ हा निर्दळील दैत्यांसी । तारील तुझिया वंशासी । अयोध्या हे वैकुंठासी । नेईल राया ॥ ६७ ॥ राया कोण तूं तप केलोसी । कां कवतीं फोडिलें सर्व देहासी । तेणें पोटा आला हृषीकेशी । श्रीरामरूपें ॥ ६८ ॥ ह्मणोनि चिंता न करीं श्रीरामाची । हा तंव शांति करील राक्षसांची । सिद्धि करील माझिया यज्ञाची । आणि कीर्ति करील ॥ ६९ ॥ हा योगियाचें समाधान । आणि सकळ तीर्थांसि परम पावन । हा चित्सुखाब्धि निरंजन । पुत्र तुझा ॥ २७० ॥ श्रीराम आमुची विश्रांति । श्रीराम शांतीची परम शांति । श्रीराम कीर्तीची परम कीर्ति । मंगळमूर्ति श्रीरामु ॥ ७१ ॥ श्रीराम ब्रह्मादिकांचा नियंता । श्रीराम विश्वस्थिति संहारकर्त्ता । श्रीराम जगातें उद्धरिता । स्वज्ञानें करुनी ॥ ७२ ॥ श्रीराम मंगळाचें मंगळ । श्रीराम परब्रह्म निष्कळ । श्रीराम नित्य निर्मळ । चिद्घनैकरूप ॥ ७३ ॥ ऐसें ऐकोनि ऋषिवचन । राजा दशरथ सुखसंपन्न । वसिष्ठासि समाधि पूर्ण । समाधान सभेसी ॥ ७४ ॥ आनंद रायाचे मनीं । लागला विश्वामित्राचे चरणीं । ह्मणे निवालों तुझिया वचनीं । लोटांगणीं साष्टांग ॥ ७५ ॥ मग बोलाऊं धाडिलें रघुनाथासी । ह्मणे राम देईन गा तुज-

१ श्रेष्ठ. २ योद्धे. ३ पंधरा. ४ युद्धांत. ५ कसलेला. ६ तपश्चर्या केलीस. ७ मारणें. ८ ताब्यांत देणार. ९ जगाची उत्पत्ति, स्थिति व लय करणारा.

पासीं । भय नाहीं मानसीं । तुझेनि वचनें ॥ ७६ ॥ तंव हेर धाडी श्रीरामापासी । ह्मणती रावो बोलाविती तुह्मांसी । राम वचनमात्रें सभेसी । येता जाला ॥ ७७ ॥ साष्टांग नमस्कार केला वसिष्ठांसीं । तैसाचि विश्वामित्रा आणि रायासी । रायें आलिंगूनि रामासी । बैसविला पुढें ॥ ७८ ॥ शिरावघ्राण करूनि दिधलें चुंबन । वेळोवेळां करी मुखावलोकन । ह्मणे कोमाईलें दिसे तुझें वदन । कोणा काजा सांग पां ॥ ७९ ॥ तीर्थाटण करूनि आलियावरी । कांहीं भोग न भावती शरीरीं । वैराग्य उपजतसे भारी । तें कारण सांगिजे ॥ २८० ॥ रघुनाथ चिंताक्रांत मानसीं । विनविता जाला विश्वामित्रासी । ह्मणे मनोगत सांगेन तुह्मांपासीं । तें आयिकें ऋषिवर्या ॥ ८१ ॥ नावडती तरुणस्त्रियांचे भोग । भोग तितुका क्षयरोग । स्त्रीसंगें अभंग । किती सांगों ॥ ८२ ॥ स्त्रीसंगें दुःख कोटि । स्त्रीसंगें विपरीत दृष्टि । स्त्रीसंगें रौरवेंसी भेटि । होये देखा ॥ ८३ ॥ आणिकही आयिकें ऋषि-राया । मन उठिलें विषयावरूनियां । नावडती भोगक्रिया । कोण्हेही विषयीं ॥ ८४ ॥ अतिप्रीती साधुचरणीं । उपजताहे प्रतिदिनीं । इतर पदार्थ कोण्ही । नावडती मज ॥ ८५ ॥ नावडे देह सौभाग्य । नावडे वैभव राजयोग्य । नावडे स्त्रियाचें कटाक्ष भोग्य । विरक्त... ॥ ८६ ॥ नावडे बंधु मित्र संपति । नावडे खेळेंन कर्माकृति । स्वधर्माचरणीं उदास वृत्ति नावडोनियां ॥ ८७ ॥ नावडे देहादि उपचार । नावडे ज्ञाति गोत्र कुळाचार । सुगंधादि अष्ट प्रकार । भोगाचे जे ॥ ८८ ॥ सुगंध परिमळादि चंदन । पुष्पें शृंगारादि वनिते जाण । वस्त्रें नाना परीची परिधान । पितांबराचें ॥ ८९ ॥ गीत गायन नृत्यांगना । तो संभ्रम नावडे कांहीं मना । तांबूल खाद्य आणि भोजना । मन न रिघे ॥ २९० ॥ तैसेंचि शयनाचे अवसरीं । नावडे पर्यंक सुमनसेजारी । भूषणेंही नानापरी । कनककुंडला-दिकें ॥ ९१ ॥ ऐसें इत्यादि सांगों किती । नावडे देहादि इंद्रियसंपत्ति । वासना शरीरीं नाना उठती । तेणें निर्बुजे बहु ॥ ९२ ॥ तैसें मनही महा वोढाळ । क्षणभरी न राहे निश्चळ । करी संसारीं तळमळ । व्याकुळपणें ॥ ९३ ॥ स्थिर करितांही क्षणभरी । धांवोनि जाय विषयांवरी । अहोरात्र वणवणें करी । तेणें भारी क्षोभ होत ॥ ८४ ॥ यया मनावा-सनेच्या संगें । अतिशयें मी अहाळू लागें । तें दुःख कायसें सांगें । स्वामीप्रति ॥ ९५ ॥ मन हें अखंड श्वानाचेपरी । विषयांलागीं वणवण करी । तेणें दुःख होतसे भारी । किती सांगों ॥ ९६ ॥

+ संमतिश्लोक + इतश्चेतश्च सुव्यग्रं व्यर्थमेवाभिधावति । दूराद्दूरतरं दीनं ग्रामे कौलेयको यथा ॥

या मनाचें वोढाळपण । किती सांगो तुजलागोन । इतस्ततः धांवे विषयाकारण । उडी घाली भलतेथें ॥ ९७ ॥ प्राप्तविषयीं आसक्ति धरी । अप्राप्ताची अतिशये चाड करी । अविद्यमानालागीं नानापरी । मनोरथ भावी ॥ ९८ ॥ प्राप्तविषयींही व्यग्रता । तेथही

---

१ मस्तक हुंगणें. २ आवडतात. ३ आनंदकारक कर्में. ४ शोभविणें. ५ खेळणें. ६ स्त्रिया. ७ कला-वंतिणी. ८ विडा. ९ पलंग. १० दगदग.

नाहीं स्थिरता । व्यर्थचि धांवे इतस्तता । नसतां प्राप्त ॥ ९९ ॥ देखिलें आयिकिलें देशांतर । अतिदूर बहु दुर्धर । तेथही उडी घाली सत्वर । अत्याभिलाषें ॥ ३०० ॥ सप्तपाताळें मृत्युलोक । सप्तस्वर्गादि ब्रह्मलोक । क्षणार्धें हिंडे जैसें रंक । दीन होऊनियां ॥ १ ॥ जैसें थोरा ग्रामाच्या ठायीं । श्वान हिंडे दिवसरात्रींही । बहु भक्ष्य मिळालिया इतरही । पाहतुचि असे ॥ २ ॥ गजाचें कलेवरही प्राप्त असतां । गुरगुरूं लागे दुसरें देखतां । थोडें मानूनि इतरार्था । अभिलाषित ॥ ३ ॥

संमतिश्लोक । श्रीरा० । न प्राप्नोति क्वचित्किंचित्प्राप्तैरपि महाधनैः । नांतः संपूर्णतामेति करंडक इवांबुभिः ।

ऐसे नानामनोरथ करितां । प्राप्त्यर्थ नाहीं सर्वथा । तऱ्ही न राहे हिंडतां । नानास्थानें ॥ ४ ॥ ऐसेन महाप्रयासेंकरून । भाग्योदयें लाधल्या महाधन । अथवा सार्वभौम इंद्रस्थान । लाधलें जऱ्ही ॥ ५ ॥ तऱ्ही ते संपूर्णता न मानी । वणवण करी अनुदिनीं । तृष्णाकुलित त्रिभुवनीं । हिंडे सदा ॥ ६ ॥ भरिलेंसि न भरे सर्वथा । तृप्तचि न पवे तृप्तता । रिजे तंव तंव होय रीता । अतृप्तपणें ॥ ७ ॥

संमतिश्लोक । न जातु कामः कामानामुपभोगेन शाम्यती । हविषा कृष्णवर्त्मेव भूय एवाभिवर्द्धते ।

जंव जंव भोगी विषयाजात । तंव तंव वणवण करी बहुत । तिलाज्याहुतीनें पूरित । कृशानु जैसा ॥ ८ ॥ शमवावयालागुनी । घृतधारा विझविती महा अग्नि । अधिकाचि लागे गगनीं । थोरावलेपणें ॥ ९ ॥ नाना वणवणेचे विषयीं प्राप्तविषयें रिता सर्वही । भरिजे तंव रिता पाहीं । मनःकोश हा ॥ ३१० ॥ जैसा वेणकरंडक । जों जों भरिजे त्यांत उदक । तंव रिताचि अधिक । जैसा तैसा ॥ ११ ॥ जंव जंव तो भरिजे नीरें । तंव तंव सर्वही रितीं द्वारें । कांहीं केलियाही न भरे । कल्पांतवरी ॥ १२ ॥ तैसें मन हें मुनिराया । पूर्णता नपवे कांहीं केलिया । यासि काय करावें जी स्वामिया । उपाय सांगा ॥ १३ ॥

संमतिश्लोक । श्रीराम० । क्रूरेण जडतां यातस्तृष्णाभार्यानुगामिना । शवः कौलेयकेनेव ब्रह्मन्भुक्तोस्मि चेतसा ।

अगा अतिक्रूर हें मन जाण । यासि तृष्णा भार्या सहाय पूर्ण । तियेमागें जाय धांवोन । स्त्रीसंग जन हें ॥ १४ ॥ तृष्णा धांवे जे जे पदार्थीं । तेथ मन उडी घाली अवचितीं । ऐसें त्रैलोक्य जऱ्ही हिंडती । तरी तृप्ति नाहीं ॥ १५ ॥ ते तृष्णा भार्येचेनि संगें । मन हें सैरा धांवों लागे । अतिक्रूरता पावे वेगें । आणि महाजडता ॥ १६ ॥ या मनाचेनि संगें मजलागून । देहीं जडतां बाणली पूर्ण । आपण आपणातें विसरोन । हे दशा प्राप्त ॥ १७ ॥ ऐसा जालिया मनाधीन । हें फाडफाडोंन खाये तृष्णेंकरून । जैसें शवातें तोडी फाडी श्वान । तयाचिपरी ॥ १८ ॥ तैसें ब्रह्मस्वरूप ऋषीश्वरा । फाडफाडूं खादलें गा या मन सैरा । याचा मज लागला भेदरा । कासावीस होतसें ॥ १९ ॥ रात्रंदिवस माझ्या आंगीं ।

मोठ्या इच्छेनें. २ मदें. ३ पुष्कळ द्रव्य. ४ अनेक विषय. ५ तीळ व तूप यांच्या आहुतीनें. ६ अग्नि. ७ मनरूप खजिना. ८ वेळवाचें नळकांडें. ९ तिच्यामागें. १० भीति.

लागलीसे गा तृष्णाधगी । अग्नि लागला शिर भागीं । निववीं मज ॥ ३२० ॥ या मनतृ-
ष्णेचेनि संगति । कामक्रोधलोभादि उठिती । तें दुःख सांगों कोणाप्रति । मुनिराया ॥ २१ ॥
यापासूनि सोडवीं मजलागून । ह्मणोनि घातलें लोटांगण । त्राहें त्राहें ह्मणोन । करुणा
बोलें ॥ २२ ॥ लघुवासिष्ठीं श्रीरघुनाथ । वैराग्य बोले जें अद्भुत । तितुकें लिहितां विस्तृत ।
ग्रंथ वाढेल ॥ २३ ॥ यालागीं अल्प निरूपणें । ग्रंथ संपादिला वैराग्य येणें । देहो कुश्चित
रघुनाथ ह्मणे । नावडे मज ॥ २४ ॥ शरीर हें दुर्गंधीचें घर । सकळ रोगांचें बिढार ।
वात पित्त श्लेष्मा निरंतर । वर्ते तेथें ॥ २५ ॥ याचेनि संगें दुःख भारी । उपचारितां
नानाउपचारीं । परी हें नश्वर सर्वांहीं प्रकारीं । काये सांगों ॥ २६ ॥ ऐसें येक बोलों
किती । बोलतां दुःखचि आठवे चित्तीं । चिळसि येतसे पुढतपुढती । या संसारिकाची ॥ २७ ॥
यालागीं आयिकें ऋषिराया । सोडवीं पासोनि भवभया । जेणें सुखरूप होऊनियां । वर्ते मी
जैसा ॥ २८ ॥ ऐसें वैराग्य बोलतां श्रीरामासी । विस्मय सकळां सुरवरांसी । वसिष्ठ-
विश्वामित्र राजासी । आणि ऋषीं सकळां ॥ २९ ॥ तेथ मिळाले सुरवर किन्नर । पन्नग
गंधर्व विद्याधर । तितुकियांसि चमत्कार थोर । सकळ सभा विस्मित ॥ ३३० ॥ श्रीरा-
माची अल्प वयसा । वैराग्य पूर्ण बाणलें सहसा । सद्गुरु भेटावया ऐसा । मनोभाव दिसे
॥ ३१ ॥ सकळ नावडोनियां चित्तीं । येक साधुचरणीं अतिप्रीति । हेचि जाणावी शुद्ध-
मति ज्ञानभूमिका ॥ ३२ ॥ हें देखोनि विश्वामित्रासी । आनंदु न समाये मानसीं ।
ह्मणे धन्य या सूर्यवंशासी । पाहिलें आजी ॥ ३३ ॥ ह्मणे धन्य धन्य हा दशरथ ।
जयासि पुत्र हा रघुनाथ । धन्य हा वसिष्ठ पुरोहित । इये वंशीं ॥ ३४ ॥ श्रीराम पर-
ब्रह्म आपण । तोही वैराग्य दावी पूर्ण । वसिष्ठ तुझें ज्ञान संपूर्ण । उपदेशीं रामा ॥ ३५ ॥
आजी तुजसारिखा सद्गुरु । आणि श्रीराम वैराग्याचें पूर्ण तारूं । कासिया लाविसी
उशीरु । ज्ञानदाना ॥ ३६ ॥ वसिष्ठ ह्मणे विश्वामित्रासी । ज्ञानोपदेश करीं रघुनाथासी ।
येरु ह्मणे तुमचे शिष्यासी । मज सांगों नये ॥ ३७ ॥ आणिकांचा शिष्य शुद्धी ।
आपण बोधूं नये स्वार्थबुद्धि । चाळवितां निरयांब्धीं । पडिजे जाण ॥ ३८ ॥ यालागीं
सूर्यवंशीं तूं कुलगुरु । ज्ञानोपदेष्टा वक्ता चतुरु । श्रीराम वैराग्यें उदारु । उशीरु येथ न
लावीं ॥ ३९ ॥ वैराग्य बाणलें असतां शिष्यासी । विलंबु करूं नये ज्ञानोपदेशीं ।
आत्मविद्या सच्छिष्यासी । द्यावी तत्काळ ॥ ३४० ॥ मग वसिष्ठ ह्मणती परियेसा ।
शिष्यासि वैराग्य जालें सहसा । परी गुरु न प्रार्थितां तैसा । उपदेशा पात्र नव्हे ॥ ४१ ॥
गुरूसि शरण येऊनि प्रश्न । शिष्य न करी जंव आर्त्त होऊन । तंव उपदेश करणें हें
दूषण । गुरुत्वासि ये ॥ ४२ ॥ अभिलाषें करूनि बलात्कारें । शिष्यासि उपदेशिजे
सादरें । तेथ गुरुत्व बोस पडे खरें । संप्रदायधी ॥ ४३ ॥ ऐसें बोलिले जंव वसिष्ठऋषि ।

---

१ तृष्णेची आग. २ फार मोठें. ३ बिऱ्हाड. ४ पासून. ५ नरकांत. ६ ज्ञान शिकविणारा.

तंव श्रीराम लागे चरणासी । ह्मणे शरण आलों स्वामींसी । उद्धरा मज ॥ ४४ ॥ वंशीं स्वामी असतां कुलगुरु । आणि आह्मांसि बाधी संसारु । हा तंव विस्मयो थोरु । सद्गुरुराया ॥ ४५ ॥ तुझें जालिया दर्शन । अविद्येचें भस्म पूण । कृपाकटाक्षें संपूर्ण । ब्रह्मत्व लाभे ॥ ४६ ॥ यालागीं जी कृपासमुद्रा । स्नेहपूर्वक जी ऋषिवरा । मोहाचिया महापूरा । तारीं मज ॥ ४७ ॥ ऐसें प्रार्थितां ऋषिश्वरासी । कृपा उपजली वसिष्ठासी । ह्मणे बारे रामा परियेसीं । सांगेन तूज ॥ ४८ ॥ वैराग्यपूर्वक[1] ज्ञानविज्ञान[2] । तुजलागीं सांगों संपूर्ण । जेणें तूं ब्रह्म पूर्ण । होसी स्वानुभवें ॥ ४९ ॥ ऐसी प्रतिज्ञा स्वीकारुनी । श्रीरामासि सन्मुख वैसउनी । सांगेन तें आतां निजश्रवणीं । आयका श्रोते हो ॥ ३५० ॥ आधींच श्रीराम ज्ञाता वरिष्ठ । वरि उपदेशकर्त्ता श्रीवसिष्ठ । तें ज्ञान अतिश्रेष्ठ । उपनिषदार्थ ॥ ५१ ॥ दशधा[3] निरूपण दशप्रकरणीं । 'दोन शतें एकविंशति[4]' श्लोक वाखाणी । श्लोकरूपें श्रुति कोडिसवाणी । दृढ संतजनीं सेवावी ॥ ५२ ॥ वैराग्यादिनिर्वाणांत । दशप्रकरणीं यथोचित । वासिष्ठसाराचा विस्तार येथ । ज्ञानरूपें ॥ ५३ ॥ त्यामाजी प्रथम वैराग्यप्रकरण । स्वयें बोले वसिष्ठ आपण । त्यांतही दिसे ब्रह्मज्ञान । अनुष्ठितांची ॥ ५४ ॥ प्रकरणाहूनि प्रकरण सार । अर्थगांभीर्यें गंभीर । एकापरीस एक थोर । अर्थपुष्टीकरूनी[5] ॥ ५५ ॥ श्लोक श्लोकातें वियें[6] । अर्थ अर्थातें प्रसवे । अभिप्राय अभिप्रायें । प्रकट करिजे ॥ ५६ ॥ ऐसा हा ग्रंथ सज्जनीं । आयिकावा आर्त्तीं श्रवणीं । श्रवणमात्रेंचि तत्क्षणीं । कृतकृत्यता होये ॥ ५७ ॥ इये ग्रंथीं अधिकारी । ज्यासि श्रवणीं आवडी अंतरीं । आणि ब्रह्मत्वाची प्राप्ति पुरी । इच्छा जया असे ॥ ५८ ॥ तेंचि श्लोकावेनि मिसें । प्रकटिजेल आपैसें[7] । जें कीं बोलिले असे ऐसें । श्रीवासिष्ठऋषि ॥ ५९ ॥ श्रीरघुनाथ समित्पाणि[8] होऊन । श्रीगुरूसि प्रदक्षिणा करून । साष्टांग करी वंदन । शिष्यसंप्रदायें ॥ ६० ॥ प्रार्थना करूनि नानापरी । वैराग्य निरूपिलें पूर्विल्यापरी । ह्मणे तारीं गे संसारीं । बुडालों स्वामी ॥ ३६१ ॥ तंव कळवळोनियां वसिष्ठमुनि । शिरीं हस्त ठेवूनि तत्क्षणीं । ह्मणे बारे आयिक तुजलागुनी । करीन भवावेगळें ॥ ६२ ॥ तेंचि आयिक निरूपण । जें कीं स्वयें वाल्मीक बोलोन । शतकोटि ग्रंथ रामायण । निर्मिलें स्वयें ॥ ६३ ॥ त्यामाजी माझी उक्ति जे तुजप्रति । त्यालागीं वासिष्ठ ऐसें ह्मणती । वदली वाल्मिकाची भारती[9] । भाविष्य पुढील ॥ ६४ ॥ तयामधील निरूपण । सांगेन आधीं वैराग्यप्रकरण । या ग्रंथाचा अधिकारी पूर्ण । वोळखावा ऐसा ॥ ६५ ॥ तेंचि आतां येकाग्र होऊन । सर्वांगाचे करीं श्रवण । सांगेन त्याचें मनन । निदिध्यासन[10] करावें ॥ ६६ ॥ तरी अधिकारी तो येथ ऐसा । आतां आयिक वीरविलासा । त्यासाचि

१ प्रथम वैराग्य. २ मग ज्ञान व नंतर विज्ञान. ३ दहाप्रकारचें. ४ दोनशें एकवीस. ५ स्पष्ट असलेली. ६ उत्पन्न करितो. ७ आपोआप. ८ हातीं समिधा घेऊन. ९ वाणी. १० एकसारखा विचार.

उपतिष्ठे उपदेशा । सर्वथा जाण ॥ ६७ ॥ ऐसें वाल्मिकीचें वचन । बोले अधिकारियाचें लक्षण । तें ऐकें एकाग्र मन । करूनि रामा ॥ ६८ ॥

वा० ॥ अहं बद्धो विमुक्तः स्यामिति यस्यास्ति निश्चयः ।
नात्यंतमज्ञो नो तज्ज्ञः सोस्मिञ्छास्त्रेऽधिकारवान् ॥ १ ॥

जो कीं अत्यंत अज्ञान । जड मूढ मळिन जाण । देहोचि हा आपण । बोध जया ॥ ६९ ॥ मीपण तें देहाचे माथां । देहापरतें नेणे सर्वथा । देहसंबंधी आप्तता । ममकारेंकरूनी ॥ ३७० ॥ अहं देहासीचि बोले । स्त्रीपुत्रादि ममकारा आले । इतर कांहींच नकळे । तो अति अज्ञानी ॥ ७१ ॥ मी कोण काइ येथें आहें । कोणाचा कोठून आलों हें । बद्ध कीं मुक्त असें पाहे । हें कांहीं नेणें ॥ ७२ ॥ केवळ शिश्नोदरेंपरायण । व्यवहारीं अतिदक्ष पूर्ण । देवत्वें मानी येक पाषाण । संपूर्ण भावें ॥ ७३ ॥ तोचि अति अज्ञान जाण । तो अधिकारी नव्हे पूर्ण । जया देव कोण मी कवण । उमजेचिना ॥ ७४ ॥ जैसें सिनीवालीचें निशीथ । वरी जलदें जालें अंबर युक्त । तैसें जयाचें अंतस्थ । गडदपणें ॥ ७५ ॥ तयासि काइसें श्रवण । तो केवीं जाणे ब्रह्मज्ञान । बद्ध अथवा मुक्तपण । न स्मरे दोन्ही ॥ ॥ ७६ ॥ आपण येकु देहावेगळा । बांधला अज्ञानशृंखळा । इतुकीही स्मरणवेळा । नाहींच जयासी ॥ ७७ ॥ ऐसा जो अज्ञान अति । तो अधिकारी नव्हे इये ग्रंथीं । जो स्वयें उदास श्रवणार्थी । मळिनपणें ॥ ७८ ॥ तो वारिला अंत्यजाचेपरी । नाहीं श्रवणाधिकारी गा रावंणारी । अत्यंत ज्ञानी तोही सर्वोपरी । अधिकारी नव्हे ॥ ७९ ॥ ' तज्ज्ञ ' शब्दें परोक्षज्ञानी । ऐसा तर्क करील कोण्ही । यालागीं अत्यंत पदसूचनीं । दोनी पदांसी ॥ ३८० ॥ अत्यंत तज्ज्ञ ह्मणिजे जाण । जयासि असे अपरोक्षज्ञान । तो येथ काय करील श्रवण । समाधान जयासी असे ॥ ८१ ॥ तो ब्रह्मानंदें डुळतु । देहीं देहाची नेणे मातु । नेणे दुजें विश्वाआंतु । आपणाविण ॥ ८२ ॥ ऐसा जो का ब्रह्मज्ञाता । तो नव्हे अधिकारी तत्वता । सर्व ब्रह्मानंदें तृप्तता । बाणली जया ॥ ८३ ॥ पूर्णाचें बोलतां लक्षण । तन्हीं पुढां असे जीवन्मुक्तिप्रकरण । तेथ कीजेल निरूपण । ह्मणोनि अल्प केलें ॥ ८४ ॥ ह्मणोनि तो नव्हे अधिकारी । जो पूर्णपणें जगामाझारी । श्रवण साधन तो काय करी । धालेपणें ॥ ८५ ॥ जो भोजन करूनि बैसला । त्यासि पाकव्यापार काय बोलिला । ग्रामपावोनि सुखें वाडला । त्यासि मार्गु काय ॥ ८६ ॥ यालागीं जया पूर्ण ज्ञान । तोही अधिकारी नव्हे जाण । सांगेन अधिकारीयांचें चिन्ह । तेंचि आयिका ॥ ८७ ॥ जो कां अत्यंत नव्हे ज्ञानी । अपरोक्षानुभव नेणे स्वप्नीं । ना जो अत्यंत अज्ञानी । जडमूढपणें ॥ ८८ ॥

---

१ विषयांच्या मार्गे लागलेला. २ अमावास्येचा. ३ अंधकार. ४ मेघानीं. ५ कालक्रमभंगामुळें हें विशेषण चिन्त्य आहे. ६ साक्षात ज्ञान. ७ केलें जाइल. ८ स्वयंपाकाचा उद्योग ९ सुखी झाला.

आतां दोहींहूनि जो मध्यस्थ । तोचि येथ अधिकारी प्रस्तुत । त्याचा सांगेन वृत्तांत । अति विस्तारें तुज ॥ ८९ ॥ जयासी आपाद कळला अर्थ । जाणे कोण मी देहातीत । परी अज्ञानें असे आवृत । बद्धरूपें ॥ ३९० ॥ जो साधनचतुष्टयसंपन्न । तोचि येथ अधिकारी जाण । जो नव्हे ज्ञानी ना अज्ञान । तोचि अधिकारी ॥ ९१ ॥ आतां साधनचतुष्टय तें कोण । त्याचें साक्षेपें करूं विवरण । करूनि येकाग्र मन । आयिकें रघुनाथा ॥९२॥ प्रथम नित्यानित्यवस्तुविवेक । नित्य तें आत्मस्वरूप येक । ऐसें अपरोक्ष कळलें देख । येर अनित्य सर्वही ॥ ९३ ॥ देहादिप्रपंच सर्व । तो अनित्य नश्वर सावेव । हा जयासी विवेकभाव । जागती आंगीं ॥ ९४ ॥ दुसरें साधन रघुपति । इहामुत्रादिफलभोगविरक्ति इहलोकींचे भोग नावडती । जरी प्राप्ति स्वाराज्य ॥ ९५ ॥ तैसेंचि परलोकस्वर्गादिसुख । तें मानी वांतान्न देख । ऐसें जें वैराग्य चोख । बाणे जया ॥ ९६ ॥ यदर्थीं वेदसंमति । येकाग्र आयिकें विश्वतोमूर्ति । वैराग्याची स्वरूपस्थिति । सांगेन तुज ॥ ९७ ॥

संमति श्लोक । ब्रह्मलोकतृणीकारो वैराग्यस्यावधिर्मतः ॥

अगा ब्रह्मलोकपर्यंत । तृणतुल्य भोग जया समस्त । तोचि तो वैराग्य युक्त । इहामुत्रादि विरागु ॥९८॥ तिसरें शमादिषट्कसाधन । याचेंही सांगेन विवरण । करूनि सावधान मन । आयिकें राया ॥ ९९ ॥ मन बुद्धि विषयांवरून आवरिजे । तया नांव अंतरिंद्रियनिग्रह बोलिजे । तोचि शम ऐसा ह्मणिजे । षट्कांचें प्रथम ॥ ४०० ॥ दुसरा तो दम रघुनाथा । बाह्येंद्रियवृत्तिनिरोध सर्वथा । स्वस्वव्यापारीं विमुखता । करावी त्यांकरवीं ॥ १ ॥ तिसरें साधन उपरति । तयाची ऐसी स्वरूपगति । दमिलीं इंद्रियें मागुतीं । करूं नेदावीं ॥ २ ॥ आवरिलीं इंद्रियें मागुतेनी । प्रवर्तों नेदावीं विषयांलागुनी । हेचि उपरति भरंवसेनी । जाण रघुपति ॥ ३ ॥ आतां चौथी तितिक्षा ऐसी । सर्व सहावें द्वंद्वांसी । आपुलिया जे आचारासी । शीतोष्णें होती ॥ ४ ॥ संध्यास्नानादिकर्म करितां । शीतोष्मा बाधी गा रघुनाथा । तीं तीं साहावीं सर्वदा । तैसींचि सुख दुःख ॥ ५ ॥ प्रारब्धाचेनियोगें । दुःखें जे होती भोगें । ते ते साहावें जाणूनि वेगें । तेचि तितिक्षा ॥ ६ ॥ सद्गुरु आणि सद्वचनाचे ठायीं । विश्वासु उपजे अनपायीं । तेचि शुद्ध श्रद्धा जाण येथही । पांचवें साधन ॥ ७ ॥ आतां समाधान ऐसें जाण । सर्व विषयीं उपरम पूर्ण । परी श्रवणादरुसमाधान । सुख जें होये ॥ ८ ॥ हेंची शमदमादिषट्क जाण । चौंहीमाजीं तिसरें साधन । चौथें मुमुक्षिता पूर्ण । उपजे जया ॥ ९ ॥ देहेंद्रियांहूनि व्यतिरक्त । आपण जाणे निश्चित । बंध जाण अज्ञानकृत । तेणें तळमळी ॥ ४१० ॥ अपरोक्षबोध तऱ्हीं नाहीं जाला । परमानंदें नसे धाला । परी विषयसंगासि कंटाळला । यालागीं न प्रवर्ते

---

१ ओकून पडलेलें अन्न. ११ दद.

॥ ११ ॥ सामान्याकारें जाणे आपणासी । परकीयत्व देखे देहेंद्रियासी । ह्मणोनि अत्यंत अज्ञानी तयासी । ह्मणों नये १२ ॥ आतां अत्यंत ज्ञानी ह्मणिजे । तरी अपरोक्षानुभव तेणें नेणिजे । दोन्ही नाहीं ह्मणतां सुझे । बद्धता आपुली ॥ १३ ॥ ह्मणोनि तो नव्हे अत्यंत ज्ञानी । ना तो नव्हे अत्यंत अज्ञानी । सामान्य ज्ञान वर्ते त्या लागुनी । ह्मणोनि मध्यस्थ तो ॥ १४ ॥ ऐसा साधनचतुष्टयसंपन्न । आपली बद्धता जाणे पूर्ण । तोचि येथ अधिकारी जाण । श्रीरघुराया ॥ १५ ॥ अनादि अज्ञानें भ्रमला । परी ह्मणजे मज बंध जाला । या उपाय पाहिजे केला । सुटिकेलागीं ॥ १६ ॥ बद्धासि सुटिका आहे । ऐसेंही पूर्णता जाणताहे । सेविल्या सद्गुरूचे पाये । मोक्ष सिद्धचि ॥ १७ ॥ आतां ऐसा उपाय करीन । सद्गुरूसि जाईन शरण । तेणें उपदेशिल्या ज्ञान । मोक्ष सिद्ध होये ॥ १८ ॥ ऐसा निश्चयो जयासी । सर्वदा उदास विषयांसी । तोचि यया शास्त्रासी । अधिकारी जाण ॥ १९ ॥ यया शास्त्राचे ठायीं । तोचि येकु अधिकारी पाहीं । इतर ते नव्हती हेंही । निरूपिलें मागें ॥ ४२० ॥ ऐसा जो अधिकारी । वैराग्यविषयव्यापारी । आणि साधुभजनीं पुरी । आवडी जया ॥ २१ ॥ साधुभजनीं आवडी । नावडे विषयांची गोडी ।ययासी अनुग्रह निरवडी । पाहिजे ईश्वराचा ॥ २२ ॥ ईश्वरानुग्रहाविण । हें अर्थद्वयें न घडे जाण । आतां ईश्वरानुग्रह केसेन । होईल तें सांगें ॥ २३ ॥ जें कीं कर्म नित्यनैमित्तिक । जें कीं वर्णाश्रमनियामक । तें करूनियां सम्यक । ईश्वरीं अर्पावें ॥ २४ ॥ संध्यास्नानादि प्रतिदिनीं । अग्निहोत्रादि यजनीं । तें नित्यकर्म केलियावांचुनीं । प्रत्यवाय करी ॥ २५ ॥ तें जाणावें नित्यकर्म । नैमित्तिकाचें सांगेन वर्म । राहुग्रयागादि- पितृधर्म । वर्षादि जाण ॥ २६ ॥ नित्यकर्माहूनि जें उंचावे । तें तें नैमित्तिक जाणावें । तें भक्तीकरूनि अनुष्ठावें । अत्यादरें ॥ २७ ॥ तें ईश्वरा निष्कामबुद्धि अर्पण । विनियोग पूर्वक जाण । करणें तें ईश्वरभजन । अनन्यपणें ॥ २८ ॥ तेणें होय अंतःकरणशुद्धि । क्षयातें पावे पापसमृद्धि । ईश्वरीं प्रेमा निरवधि । भक्ति उपजे ॥ २९ ॥ ईश्वरीं जे अनन्य प्रीति । तेचि जाण विमळ भक्ति । तेणें आभारे विश्वमूर्ति । सर्वेश्वर तो ॥ ४३० ॥ ईश्वर आभारलेपणें । भक्तासि अनुग्रह करणें । तेणें वैराग्य तीव्रपणें । उपजे देहीं ॥ ३१ ॥ ईश्वरानुग्रहें साधुसंगति । करणें हें ऊपजे सर्वदा चित्तीं । साधु सेवेची परम आर्ति । नित्य तृप्ति साधुसंगें ॥ ३२ ॥ जो परम भाग्यें आथिला असेल । त्यासीचि अनुग्रह ईश्वराचा होईल । अनुग्रहाची खुण सकळ । ऐक सांगों ॥ ३३ ॥ ईश्वरानुग्रहें विषयविरक्ति । ईश्वरानुग्रहें शमदमप्राप्ति । ईश्वरानुग्रहें विमल भक्ति । साधुसंगति ईश्वरानुग्रहें ॥ ३४ ॥ ईश्वरानुग्रहें साधु भेटावा । एसी आवडी उपजे जीवा । ईश्वरानुग्रहें दयेचा

१ स्पष्ट होते. २ चार प्रकारच्या साधनांनीं युक्त. ३ वैराग्य प्राप्तीचीं साधनें प्राप्त करून घेणारा. ४ खरोखरा. ५ हे दोन अर्थ. ६ वर्ण (ब्राह्मणादिक) व आश्रम (ब्रह्मचर्यादि) यांचे नियमन करणारें.

बोलावा । हा जाणावा ईश्वरानुग्रह ॥ ३५ ॥ अगा ईश्वरानुग्रहाविण । नुपजे करावें साधुसेवन । त्याचेनि मुखें शास्त्र श्रवण । नुपजे पूर्ण वसिष्ठ बोले ॥ ३६ ॥ तया श्लोकाची व्युत्पत्ति । येकाग्र आयिकावी सांवीत्ति । श्रीवासिष्ठ महामति । अतिप्रीति अनुवादे ॥ ३७ ॥

॥ व० उ० ॥ यावन्नानुग्रहः साक्षाज्जायते परमेश्वरात् ॥ तावन्न सद्गुरुं कश्चित्सच्छास्त्रमपि नो लभेत् ॥ २॥

जोंपर्यंत रघुनाथा । ईश्वरानुग्रह नव्हे तत्वता । तों गुरुप्राप्तीची आवडी ताता । कदा कल्पांतीं उपजेना ॥ ३८ ॥ येक ह्मणती अनुग्रह तोचि । जे सर्वदा संपन्नता संपत्तीची । परलोकीं स्वर्गभोगाची । प्राप्ति साची जेणें होये ॥ ३९ ॥ हा तंव अनुग्रह सामान्य । ह्मणऊन ' साक्षात् ' पद घेतलें जाण । जें उभय सुखांचें वैरस्यपण । ईश्वरानुग्रहें ॥ ४० ॥ साक्षात् ईश्वरानुग्रहेंविण । न घडे सद्गुरूसि दर्शन । भेटल्या सद्गुरु जाण । भावार्थ पूर्ण तेथ उपजे ॥ ४१ ॥ उपजलाही सद्भावो । प्रसन्न जाला सद्गुरुरावो । परी प्रश्नाचा प्रस्तावो । करणें हा भाव उपजेना ॥ ४२ ॥ न करितां सद्गुरूसि प्रश्न । न करितां सच्छास्त्रकथन । शिष्यासि न घडे श्रवण । चित्तीं वणवण अपूर्णतेची ॥ ४३ ॥ मुख्य शास्त्र तें महावाक्य । जें सद्गुरुमुखींचें बीजभूतक । श्रवणमात्रेंचि अज्ञानपूर्वक । विश्वावलोक मावळे ॥ ४४ ॥ जेणें समूळ तुटे संसार । तेंचि सशास्त्रअक्षर । सकळां शास्त्रांचें सार । गुह्यतर सकळ विद्या ॥ ४५ ॥ महावाक्य तें सूत्रभूत जाण । इतर वेदांत ते वृत्तिस्थान । वाक्यश्रवणेंही असंभावन । जालिया श्रवण वेदांताचें ॥ ४६ ॥ महावाक्येंचि साक्षात्कार जाला । तरी वेदातश्रवण कासयाला । तो नव्हतां संभावना जयाला । वेदांता आयिकावें ॥ ४७ ॥ ह्मणोनि महावाक्य तें सूत्र होये । सर्व वेदात तें वृत्तिरूपें अंग पाहें । ह्मणोनि सच्छास्त्र तें आन नव्हें । बोलिला पाहे ह्मणउनी ॥ ४८ ॥ यालागीं त्याचें गुरुमुखें श्रवण । ईश्वरानुग्रहावांचून । कल्पांतीं न घडे जाण । करितांही प्रयत्न सहस्रावधि ॥ ४९ ॥ यालागीं परब्रह्म तो सद्गुरु । ज्याचेनि शब्दमात्रें तुटे संसारु । होय प्रपंच मृगजळपूरु । साक्षात्कार स्वरूपेंसी ॥ ५० ॥ अथवा ईश्वराचे अनुग्रहेंविण । न घडे सद्गुरूचें दर्शन जेथें न घडे सद्गुरूसेवन । तेथें शास्त्रश्रवण तें कैचें ॥ ५१ ॥ शास्त्राचार हें ज्ञानाप्रती । अंतरंग साधन गा रघुपति । ईश्वरानुग्रहेंविण नव्हे प्राप्ति । जाण सर्वार्थी दोहींची ॥ ५२ ॥ आता संसारार्णवलंघनीं । नाहीं सद्गुरूवांचुनी । शब्दमात्र सांगतां श्रवणीं । संसार स्वप्नीं दिसेना ॥ ५३ ॥

महानुभावसंपर्कात्संसारार्णवलंघने । युक्तिः संप्राप्यते राम दृढा नौरिव नाविकात् ॥ ३ ॥

संसाराब्धि महाथोर । तेथ अज्ञानजळ अपार । कामक्रोधांच्या लहरी फार । तेणें परपार न पाविजे ॥ ५४ ॥ लहरींचें महाथोर भांडण । तेणें ज्ञानतारूं बुडविती संपूर्ण । काम क्रोध

१ संसाररूपी मृगजळाचा पूर. २ शास्त्रप्रमाणें वागणें. ३ संसार समुद्र तरून जाण्यास. ४ लाटा.

हे वैरी जाण । निपटूनि ज्ञान निर्दळिती ॥ ५५ ॥ कामक्रोधांचिया वळसा । ज्ञानतारू बुडतां सहसा । तें नाहींचि करिती गा वीरेशा । अपभ्रंशा मूळ हेंचि ॥ ५६ ॥ यदर्थी भगवंत आपण । पार्थासि[1] बोले वचन । सर्व शास्त्रांसि प्रमाण । प्रकाशमान भगवद्गीता ॥ ५७ ॥

संमति श्लोक ॥ काम एष क्रोध एष रजोगुणसमुद्भवः महाशनो महपाप्मा विद्ध्येनमिह वैरिणम् ॥

यालागीं वैरी हे अज्ञान । काम क्रोध सबळ जाण । त्या लहरी संपूर्णनिबिडघन । अज्ञानजळीं ॥ ५८ ॥ रजोगुणाचा महावात[2] । तेणें कामक्रोधलहरी उसळत । ज्ञानतारू अकस्मात । सामग्रीसहित[3] बुडोनि जाये ॥ ५९ ॥ तेथ गुणात्रयवृत्तीचें[4] भरितें । भरिती वासना खारियातें । तेणें जळें सभोंवतें । मार्गु तेथें दिसेना ॥ ४६० ॥ नानाभोगेच्छा तेंचि क्षारपण[5] । तेणें तें सेवितां नये जाण । सेविलें तरी निर्धारें मरण । अकारण प्राप्त होये ॥ ६१ ॥ तेथें बुद्धिनेत्र उघडूनि पाहतां । तेणें नेत्रीं भरे क्षारता । मग निबुजूं लागे तत्वतां । मार्गु आतां कोण देखे ॥ ६२ ॥ तेथ प्रमादाचे[6] वळसे । विपरीतज्ञानें उठती कैसे । आपण विसरोनि अनारिसें । देखे पिसें जयापरी ॥ ६३ ॥ स्वर्ग नरक हे मर्यादा । त्याहूनि वरतें न चढे कदा । तेथ कामक्रोधाची बाधा । उसंत[7] कदा न पविजे ॥ ६४ ॥ त्या जळामाजी नाना जळचर । मीनं मद मत्सर मगर । तयांचा अतिमार थोर । सगळा नर गिळिती ॥ ६५ ॥ मदमीनाचे तोंडीं पडिले । ते तेणेंचि चघळूनि टाकिले । मत्सरमगरामिठीं सांपडले । ते गेले न येतीचि ॥ ६६ ॥ दंभ नक्र महाथोर । भयंकर अतिप्रचुर । ते ज्ञानतारू चकचूर । अतिसत्वर करिताती ॥ ६७ ॥ ऐसिया महासमुद्रा आंत । कोण पां तरले अकस्मात । स्वभुजा तरावया उद्यत । येक आर्त निघाले ॥ ६८ ॥ ते नेणपणाच्या वळसां । बुडोनि गेले गा सहसा । येक कर्ममार्गाचे धारवसां । पडिले जन्ममृत्यूच्या ॥ ६९ ॥ विधिनिषेधाच्या कुमार्गीं । पडती नरकीं चढती स्वर्गीं । ते बुडाले आशेलागीं । कर्ममार्गीं चालतां ॥ ४७० ॥ येकीं नाना विद्यागुरु सेविले । ते तयांचे कांसे लागले । ते मदमीनें गिळिले । नाहीं निघाले दोघेजण ॥ ७१ ॥ येकीं देहवयसेची पेटी । बांधली अभिमानप्रवृत्तिपोटीं । ते कामलहरीचे कपाटीं । थावरां शेवटीं घातले ॥ ७२ ॥ येक शब्दज्ञानाचे होडगां । वैसले भरंवसा धरूनि पैं गा । ते भरले अनेका मार्गा । बुडाले वेगां शुद्धी नाहीं ॥ ७३ ॥ येक तपाचा धरूनि भरंवसा । भवसमुद्र तरावयाच्या आशा । रिघाले ते गर्ववळसां । पडले सहसा न निघतीच ॥ ७४ ॥ ऐसे नानाउपाय करूनि । नानासाधनें साधुनी । प्रवर्तले भवार्णवलंघनीं । परी गेले बुडोनि रघुवर्या ॥ ७५ ॥ यालागीं गा

---

१ अर्जुनास. २ मोठा वायु. ३ आंतील पदार्थांसह. ४ सत्व, रज, तम यांचें. ५ खारटपण. ६ मोहाचे. ७ विश्रान्ति. ८ मासा.

रघुनाथा । भवार्णवलंघनासि ताता । येकाचि उपावो तत्वतां । सांगेन आतां परियेसीं ॥ ७६ ॥ तरी संपर्कें महानुभावाचेनी । अपरोक्ष ज्ञान पावोनी । तेणेंचि तरिजे भरंवसेनी । अतिनिर्वाणीं भवार्णवु ॥ ७७ ॥ अगा महानुभाव शब्दें सद्गुरु । याचा परिस पां विचारु । थोर सामर्थ्याचा सागरु । अतिगंभीर पूर्णत्वें ॥ ७८ ॥ सर्वही विद्या कौशल्यानिष्ठ । अज्ञानछेदनीं अतिवरिष्ठ । ह्मणऊनियां सकळां श्रेष्ठ । सामर्थ्य उत्कट गुरुत्वें ॥ ७९ ॥ येव्हडें सामर्थ्य जयापाशीं । तें महानुभावत्व बोलिजे गुरूसी । त्यापासाव युक्ति पाविजे ऐसी । जे अज्ञानासि निर्दळी ॥ ४८० ॥ सद्गुरूचेनि चरणस्पर्शें । ज्ञान पाविजे आपैसें । तेंचि भवाब्धि तरावया ऐसें । सावकाश दृढ तारूं ॥ ८१ ॥ दृढ शब्दें बोलिजे अविनाश । ज्यासि नाहीं असंभावनादिकीं नाश । तें ज्ञानतारूं सावकाश । सद्गुरु परेश भेटवी ॥ ८२ ॥ महारण्यामध्यें नदी । पुरें दाटली जैसा जलधि । तें तरावयाचिया संधीं; । नाना उपायीं तरवेना ॥ ८३ ॥ तेथें नावाडी अकस्मात । दृढ नाव घेऊनि जाला प्राप्त । ते लाहोनियां त्वरित । संकट तेथ तरिजेचि कीं ॥ ८४ ॥ तैसें सद्गुरुपासूनि ज्ञानतारूं । लाधलें ते पावले पैल पारु । इतरां भावार्णवीं अपाय थोरु । तो सविस्तर सांगितला ॥ ८५ ॥ यालागीं गा रघुपती । जाणतीं नेणतीं सद्गुरुमूर्त्ति । उपासावी अनन्यगति । परम प्राप्ति पावावया ॥ ८६ ॥ अथवा गुरु न करितां साधुसंगति । तत्संगें वासनादि मळ जाती । सद्गुरु सेवावा हे उपजे आर्ति[1] । यालागीं सेविती महानुभाव ॥ ८७ ॥ ह्मणोनि महानुभावसंपर्कें । ज्ञान पाविजे निकें । भवार्णवलंघनीं कौतुकें । तारूंचि निकें[2] ऐसें असे ॥ ८८ ॥ यालागीं जेथ नसती महानुभाव । तो देश अथवा नगर गांव । सांडावा गा सर्वथैव । श्लोकभाव परियेसीं ॥ ८९ ॥

यस्मिन्देशे हि तत्वज्ञो नास्ति सज्जनपादपः । सफलः शीतलच्छायो न तत्र दिवसं वसेत् ॥ ४ ॥

जे देशीं नाहीं सज्जन । तो देश नव्हे महारण्य । जे ग्रामीं नाहीं सज्जन । तें स्मशान गा रघुराया ॥ ४९० ॥ जो महारण्यांत पडला । अतिसंतापें तापला । क्षुधातृषा असे पिडला । अति दगदगला चालतां ॥ ९१ ॥ तया कल्पवृक्ष भेटला सफळ । कल्पिलें पुरवी आणि शीतळ । तो तापादि सकळमेळ । शमवी सकळ सेविलिया ॥ ९२ ॥ तैसा जो संसारतापें तापे । तया विनाविजे सज्जनपादपें[3] । जो वाणला असेल अनुतापें । संसारें जो ॥ ९३ ॥ वृक्ष अनेकही भेटती । परी ते पुरऊं न आर्ति शकती । खैरआदी बोरी जाति । वृक्ष ह्मणती आपणया[4] ॥ ९४ अर्कवृक्षादि ताड बाभूळ । सांवरी[5] सादोडे इत्यादि सकळ । हे जातीकरूनि वृक्षकुळ । परी तळमळ शमवितीना ॥ ९५ ॥ तैसे भेटती अनेक सज्जन । जपी तपी व्रतीजाण । याज्ञिककर्मी शब्दज्ञान । अतिनिर्वाण जयांपासीं ॥ ९६ ॥

१ इच्छा. २ खरें. ३ साधुरूपी वृक्षानें. ४ आपणाला. ५ रुईवगैरे

येक बहूदक कुटीचक वनचर। येक पर्वतवासी कंथाधर। येक भगवे येक दिगंबर। नानावेषधर जे असती ॥ ९७॥ येक माळ मुद्रा धरिती। येक ते जटाजूट वाढविती। येक जटी द्विजटी त्रिजटी असती। बहु देखिजती उदासपणें ॥ ९८॥ येक कक्षोपस्थीं जटा वाढविती। दीर्घजटी बोलिजती। येक ते नखें वाढविती। मौनवृत्ति सदाचार ॥ ९९ ॥ येक ते परीव्राजक सन्यासी। एक ते बोलिजती कर्मसंन्यासी। येक दंडी त्रिदंडी ऐसी। नानावेषीं शोभती ॥ ५०० ॥ येक ते करपात्र करिती। येक ते गोमुखें जेविती। येक ते यथेष्ट भक्षिती। भिक्षा करिती येक मेळें ॥ १ ॥ येक ते अन्न धुवोनि जेविती। येक सर्वत्र येकत्र करिती। येक ते परहस्तें जेविती। येक विटबुं करिती नानाविध ॥ २ ॥ येका पंचगृहीं नेम। येकासि मौनाचा अतिसंभ्रम। येक ते निंब हिरडे भक्षून। इंद्रियें दमन करिताती ॥ ३ ॥ येक शिश्नाचा मुंगा घेती। येक वृषण नाभिस्थाना नेती। हेचि उपाये इंद्रियदमनाप्रति। येक करिती स्वस्वमतें ॥ ४ ॥ इतुकियांतें लोक भावना। सज्जन ह्मणती गा सज्ञाना। ते भेटलिया भवभावना। छेदु अज्ञाना काय होय ॥ ५ ॥ यालागीं अन्य वृक्षांची सरी। या सज्जनांसि दिधली पुरी। संतापु क्षुधा तृषा निवारी। येर वृक्षीं ते तरी शक्ति नाहीं ॥ ६ ॥ ऐसिया सज्जनांचेनि दर्शनें। केवीं जाईल अज्ञान तेणें। अज्ञान निरासेंविण निवणें। कोण्हेही गुणें घडोचिना ७ ॥ तत्वज्ञ आणि सज्जन। हें एकार्थ पदद्वय जाण। पुनरुक्त कोण्ही आशंकन। करी त्या वचन निवारण हें ॥ ८ ॥ सज्जन शब्दें तैसा तर्क करिती। जरी हे महानुभाव बोलिजती। ह्मणोनि तत्वज्ञ पद महामति। वसिष्ठ सर्वार्थी बोलिले ॥ ९ ॥ अथवा सज्जन शब्दें जाण। सत्कर्मानुष्ठाता शास्त्रज्ञ। आणि तत्वज्ञ उत्तम। तेचि संपूर्ण कल्पवृक्ष ॥ ५१० ॥ तत्त्व शब्दें बोलिजे परब्रह्म। तें जाणे तो तत्त्वज्ञ। तत्त्वज्ञ होत्साता सज्जनोत्तम। निरूपम सर्वार्थी ॥ ११ ॥ ऐसा वृक्ष जो कीं तत्त्वज्ञ। त्यासिच बोलिजे सज्जन। तो जे देशीं नाहीं जाण। तेथें दिवस क्षण न बसावें ॥ १२ ॥ तो देशु नव्हे परदेशु। ग्राम नव्हे तो नरकवासु। गृह नव्हे तो कारागृहनिवासु। जेथें शुद्धांशु सज्जन नाहीं ॥ १३ ॥ ते देशीं एक क्षण। सर्वथा राहों नये गा जाण। रघुनाथा तूं सर्वज्ञ। हेचि खुण जाणावी ॥ १४ ॥ असत्संगें नरक होती। ह्मणोनि न करावी ते संमति। सत्संगें होये मुक्तिप्राप्ति। ह्मणोनि सत्संगति सर्वदा करीं ॥ १५ ॥ जे कीं आपणातें नेणोन। स्त्रैजर्णन स्त्रिये आधीन। नरक त्यांचे संगतीकरून। एस श्रीभगवान स्वयें बोले ॥ १६ ॥

संमती श्लोक। महत्सेवां द्वारमाहुर्विमुक्तेस्तमोद्वारं योषितां संगिसंगम्। महांतस्ते समचित्ताः प्रशांत विमन्यवः सुहृदः साधवो ये। रहूगणैतत्तपसा न याति न चेज्यया निर्वपणाद्गृहाद्वा। न छंदसा नैव जलाग्नि-

---

१ हात हेंच भांडें. २ पांच घरीं भिक्षेस जाण्याचा नियम. ३ मोठा आनंद. ४ इंद्रियें ताब्यांत ठेविण्यास. ५ एकाच अर्थाचीं. ६ दोन पदें. ७ बंदिखान्यामध्यें राहणें. ८ स्त्रियांच्या नादीं लागणारे.

सूर्यैर्विना महत्पादरजोऽभिषेचनम् । नैषां मतिस्तावदुरुक्रमांघ्रिं स्पृशत्यनर्थापगमो यदर्थः । महीयसां पादरजोभिषेकं निष्किंचनानां न वृणीत यावत् । संसारेऽस्मिन्क्षणार्धोऽपि सत्संगः शेवधिर्नृणाम् ।

इत्यादि वचनें त्याहावीं किती । सत्संगें[1] होये मुक्तिप्राप्ति । असत्संगें[2] नरक होती । ऐसें श्रीपति स्वयें बोले ॥ १७ ॥ सत्सेवा तें मोक्षाचें द्वार । स्त्रीसांगियांच्या संगें नरक घोर । यालागींच सत्संग निरंतर । दृढतर करावा कीं. ॥ १८ ॥ ब्रह्मीं ज्यांचें सर्वदाचित्त । समब्रह्मत्व विश्व हें देखत । अधमोत्तम सर्वथा नेणत । सदोदीत ब्रह्मपणें ॥ १९ ॥ अत एव ते अतिशयेंसि शांत । विश्वोपाधी[3] न स्फुरे किंचित । सर्व देखती ब्रह्म निश्चित । ह्मणोनि गलित क्रोध ज्यांचा ॥ ५२० ॥ दुसरेपणें दुसरें स्फुरावें । तेंही प्रतिकूळत्वें जऱ्ही भासावें । तऱ्हीच क्रोध तेथें संभवे । येऱ्हवीं नव्हे ब्रह्मदृष्टया ॥ २१ ॥ प्रतिकूळ कोण्हा न देखती । ह्मणोनि सर्वांचें सुहृदयस्थ होती । उपकार नापेक्षून उपकार करिती । सोडविती भवबंधा ॥ २२ ॥ यायालागीं ते कृपाळू । संसारें गांजिल्या दीनाचे दयाळू । आपपर नेणोनि स्नेहाळू । अति कनवाळू सदयपणें ॥ २३ ॥ ऐसीं साधुलक्षणें बोलावीं किती । पारु नाहीं गा साधुकीर्ति । जे लक्षणें ब्रह्मीं वर्तती । तेचि स्थिती सज्जनांची ॥ २४ ॥ ते सादाचारें निर्मळ । कामक्रोधादि त्यां नाहीं आडळ[4] । राहाटी वाचा जयांची सरळ । तृप्त केवळ परमानंदें ॥ २५ ॥ ऐसेंचि जडभरत रहूगणाप्रति । ह्मणे साधूविण नव्हे ब्रह्मप्राप्ति । यज्ञ तप दान संन्यासगति । नव्हे प्राप्ति वेदाध्ययनें ॥ २६ ॥ जळअग्निसूर्यउपासना[5] । केलिया ब्रह्मप्राप्ति नव्हे जाणा । न सेवितां येक सज्जना । न करितां स्नाना तत्पादरजें ॥ २७ ॥ शास्त्राभ्यासें जालेंही जें ज्ञान । परी अपरोक्षता नव्हेचि जाण । न सेवितां संतपादरजःकण । बुद्धीसि स्पर्शन स्वरूपीं न घडे ॥ २८ ॥ जैसें निधिलाभें अतिसुख आहे । तैसें क्षणार्धें सत्संगें होये । परी विषयसुख नश्वर आहे । सत्संगें पाहे ब्रह्मसुख ॥ २९ ॥ आणीकही गा रघुनाथा । साधुसंगेंविण साधन ताता । केलियाहीं होती वृथा । सत्संग न करितां जाण तूं ॥ ५३० ॥ ऐसें षड्गुणैश्वर्यसंपन्न । स्वयें बोले श्रीकृष्ण । उद्धवाप्रति जिवींची खूण । बाहे उर्भऊन[6] बोलती ॥ ३१ ॥

संमति श्लोक । न रोधयति मां योगो न सांख्यं धर्म एव च ॥ न स्वाध्यायस्तपस्त्याग इष्टापूर्तं न दक्षिणा ॥ १ ॥ व्रतानि यज्ञश्छंदांसि तीर्थानि नियमा यमाः ॥ यथावरुंधे सत्संगः सर्वसंगापहो हि माम् ॥ २ ॥

ह्मणे अरे उद्धवा परियेसीं । अष्टांगयोग अतिप्रयासीं । केलिया जाण सर्वस्वेंसी । मज हृदयस्थासि नेणती ते ॥ ३२ ॥ तैसें आत्मानात्मविवेक[7] । बोलिलें सांख्यशास्त्र सांख्य । तेंही मज यश करी देख । ध्यानासि सम्यक नागवें[8] मी ॥ ३३ ॥ तरी सत्संगें पावले कोण । तेंही आतां तुज सांगेन । आइक येकाग्र करूनि मन । ह्मणे श्रीकृष्ण उद्ध

---

१ साधूंच्या सहवासानें. २ दुर्जनाच्या संगतीनें. ३ जगाचा अडथळा. ४ स्पर्श. ५ उदक, अग्नि व सूर्य यांची भक्ति. ६ हात वर करून. ७ आत्मा व अनात्मा यासंबंधीं विचार. ८ सांपडत नाहीं.

चासि ॥ ३४ ॥ जेहीं जेहीं सत्संग केला । तयांसिचि मी प्राप्त जाला । येरां संसारचि उरला । अन्यसाधनांला प्रवर्त्तले जे ॥ ३५ ॥

संमति श्लोक । सत्संगेन हि दैतेया यातुधाना मृगाः खगाः । गंधर्वाप्सरसो नागाः सिद्धाश्चारणगुह्यकाः ।
विद्याधरा मनुष्येषु वैश्याः शूद्राः स्त्रियोऽत्यजाः । रजस्तमः प्रकृतयस्तस्मिंस्तस्मिन्युगे युगे ।
बहवो मत्पदं प्राप्तास्त्वाष्ट्रका यादवादयः । वृषपर्वा बलिर्बाणो मयश्चाऽथ विभीषणः ।
सुग्रीवो हनुमानृक्षो गजो गृध्रो वणिक्पथः । व्याधः कुब्जा व्रजे गोप्यो यज्ञपत्न्यस्तथा परे ।
ते नाधीतश्रुतिगणा नोपासितमहत्तमाः । अव्रतातप्ततपसः सत्संगान्मामुपागताः ।
केवलेन हि भावेन गोप्या गावा नगा मृगाः । येऽन्ये मूढधियो नागाः सिद्धामामीयुरंजसा ।
य न योगेन सांख्येन दानव्रततपोऽध्वरैः । व्याख्यास्वाध्यायसंन्यासैः प्राप्नुयाद्यत्नवानपि ।

म्हणोनि सत्संगें दैत्यांसी मुक्ती । राक्षसां सत्संगें माझी प्राप्ति । मृग पक्षी यांसि सत्संगति । माझी प्राप्ति जाली असे ॥ ३६ ॥ गंधर्व अप्सरा नाग देख । सिद्ध चारण आणि गुह्यक । विद्याधर आणि मनुष्यप्रमुख । सत्संगें मत्सुख पावले ॥ ३७ ॥ मनुष्यांमाजी हीनयाति । वैश्य शूद्र स्त्रिया सुमति । अतिचांडाळ अंत्यजाति । तेही मत्प्राप्ति सत्संगें ॥ ३८ ॥ अगा रजतमप्रधाना । जयांच्या प्रकृति असती हीना । तेही पावले मज जाणा । सेवितां सज्जनां भक्तिभावें ॥ ३९ ॥ ऐसे सांगिजे किती । माझें स्वरूप पावले साधुसंगति । वृत्रासुर प्रल्हादप्रभृति । नेणोंकिती पावले मज ॥ ५४० ॥ वृषपर्वा बलि आणि बाण । मयदैत्य आणि बिभीषण । वानरांमाजी सुग्रीव हनुमान । ऋक्षराज जाण पावले ॥ ४१ ॥ जटायु आणि तुळाधार । वाणि गज गृध्र पापसार । तोही पावला माझें घर । थोर बडिवार सत्संगाचा ॥ ४२ ॥ धर्मव्याध पापमूर्त्ति । त्यासिही सत्संगें माझी प्राप्ति । कुब्जा तीं ठायींचि वक्र होती । तीसि सत्संगति मीचि प्राप्त ॥ ४३ ॥ अगा वृंदावनींच्या गौळणी । कोण ज्ञान तयांलागुनी । स्त्रीजाति आणि वसति वनीं । आचारकरणी काय त्यांची ॥ ४४ ॥ आणखीं याज्ञिकांचिया स्त्रिया । यज्ञपत्न्या बोलिलिया । मूढ जाति अज्ञानाचिया । असती घडलिया ब्रह्मेंनी ॥ ४५ ॥ तिहीं वेदशास्त्र नाहीं पढिन्नलें । तिहीं गुरु नाहीं सेविले । व्रततपादी नाहीं केलें । सत्संगेंचि पावले स्वरूप माझें ॥ ४६ ॥ अगा जें कीं माझें स्वरूप । न पाविजे साधन करितां अमूप । योग सांख्य दान व्रत तप । याग अमूप जरी केले ॥ ४७ ॥ सकळ शास्त्रासि अभ्यासिलें । कां नित्य वेदाध्ययन केलें । संन्यासी विधीनें जाले । प्रयत्न केले नानाविध ॥ ४८ ॥ तरी सत्संगेंविण जाण । मी प्राप्त नव्हे संपूर्ण । सत्संगें सर्व साधन । मत्प्राप्तीकारणें साधुसंग ॥ ४९ ॥ साधुसंगें सर्व प्राप्ति । साधुसेवनें साधनसंपत्ति । करणें न लगे गा सर्वार्थी । सत्संगें तृप्ति स्वानंदाची ॥ ५५० ॥

---

१ झालों. २ पशूस. ३ रजोगुण व तमोगुण ह्यांनीं युक्त. ४ जांबुवंत. ५ तागडी हातीं घेणारा. ६ परब्रह्म स्वरूपाच्या योगानें.

संमति श्लोक । यथोपश्रयमाणस्य भगवंतं विभावसुम् । शीतं भयं तमश्चेति साधून्संसेवतस्तथा । निमज्योन्मजतां घोरे भवाब्धौ परमायनम् । संतो ब्रह्मविदः शांता नौर्दृढेवाप्सु मज्जताम् । अन्नं हि प्राणिनां प्राण आर्त्तानां शरणं त्वहम् । धर्मो वित्तं नृणां प्रेत्य संतोऽर्वाग्बिभ्यतोरणम् । संतो दिशंति चक्षूंषि बहिरर्कः समुत्थितः । देवता बांधवाः संतः संत आत्माऽहमेव च ।

येका अग्नीचें केलिया सेवन । शीतभय जाय संपूर्ण । अंधकारु जाय नाशोन । समाधान जैसें होये ॥ ५१ ॥ तैसें येक सत्संगें करूनि । कर्मादिजाड्य[1] जाय नासोनी । आगामी[2] जे संसारश्रेणि[3] ॥ त्याचें मनीं जें भय वाटत होतें ॥ ५२ ॥ अथवा यमपुरींच्या यातना । भय जें उपजवी मना । कांपों लागे जन्ममरणा । तें अर्धक्षणामाजी जाये ॥ ५३ ॥ कर्मजाड्य आणि भयाचें मूळ । तें येक अज्ञानाचि केवळ । ते सत्संगें जाय तत्काळ । सुखकल्लोळ साधुसंगें ॥ ५४ ॥ म्हणोनि संत ते अग्निरूप जाण । सत्संगें होय अज्ञानछेदन । पळोनि जाय संसारदैन्य । सुखसंपन्न ब्रह्मानंदें । ५५ ॥ अथवा संसारसमुद्रामाझारीं । परम दुःखाच्या महाघोरीं । बुडती निघती योनिद्वारीं । कुत्सित मार्गीं उच्चनीचा ॥ ५६ ॥ श्वानसूकरादिका योनि । तेथें बुडे निघे मागुतेनी । उसंतु नाहीं अर्ध क्षणीं । भोगितां योनि नानाविधा ॥ ५७ ॥ तें चुकवावयाकारणें । किजेती नाना साधनें । तेणें कायचि होये योनिभोगणें । वैसे धरणें फलभोगाचें ॥ ५८ ॥ तया भवार्णवाच्या[4] महापुरीं । ब्रह्मनिष्ठसाधु भेट जरी । तरी क्षणार्धें बुडतां निवारी । पैलपारीं पाववी ॥ ५९ ॥ जैसी दृढ नाव पावे समुद्रीं बुडतां । तरीचि तो तरे अपाया बहुतां । तेथें अन्य साधनें नाना करितां । बुडे सर्वथा नावेविण ॥ ६० ॥ तैसें सत्समागमेविण । योनीमाजी बुडणें जाण । न चुकेचि गहन । दुःख दारुण न चुकेचि ॥ ६१ ॥ जैसें प्राणियासि अन्नाचि प्राण । पीडितासी मीचि येक शरण्य । तैसें संसारियासि सरंक्षण । साधु जाण सर्वस्वेंसी ॥ ६२ ॥ कां परलोकीं प्राणियासी । धर्माचि वित्त परियेसीं । तेसे संत हे बुडतयासी भयभीतासी रक्षक[5] ॥ ६३ ॥ अगा साधूचें निजमाहिमान । सरी न पवे सूर्यनारायण । तो डोळ्यां बाह्य प्रकाशी जाण । अंतरज्ञान न प्रकटी ॥ ६४ ॥ तैसा नव्हे तो सद्गुरुनाथ । सबाह्य अंतरा प्रकाश करित । कृपाकटाक्षें क्षणांत । करी भस्मांत संसार हा ॥ ६५ ॥ यालागीं सर्व देवता संत जाण । संत बंधु मित्र सुहृद सज्जन । संत प्रियत्वें आत्मा पूर्ण । संत चिद्धन ब्रह्मरूप ॥ ६६ ॥ संत माता संत पिता । संत सर्वस्वीं कुलदेवता । संत भवार्णवीं तारूं तत्वता । होय कृतार्थता सत्संगें ॥ ६७ ॥ म्हणोनि सज्जनवृक्ष सेविल्या । त्यांचें दर्शन तें शीतळ छाया । जेणें पाप ताप हारोनियां । जिज्ञासा तया वरी वेगें ॥ ६८ ॥ कीं तयासि जाल्या शरण । अविद्येचें

१ कर्म केल्यापासून प्राप्त झालेलें अज्ञान. २ पुढें येणारी. ३ जन्म मृत्युची माळा. ४ संसारसमुद्राच्या. ५ रक्षण करणारा.

भस्मपूर्ण । फळ तोंचि पावे ब्रह्मपण । ओर्तिहरण[1] सर्वार्थी ॥ ६९ ॥ ऐसा सज्जन पादप[2] निर्मळ । सफळ[3] सीतळ प्रांजळ । संसारीक जे तळमळ । हरी सकळ कृपामात्रें ॥५७०॥ ऐसें संत जेथें नसती । क्षणही तेथें नसावें सीतापति । संतमहिमा उद्धवाप्रति । बोलिले श्रीपति तें सांगितले ॥ ७१ ॥ यालागीं सर्वदा सेव्य[4] संत । जे संसारार्णवलंघनीं[5] समर्थ । ते जेथें असती सर्वदा तेथ । वसावें नित्य रघुनाथा ॥ ७२ ॥

सदा संतोऽभिगंतव्या यद्यप्युपदिशंति न । या हि स्वैरकथास्तेषामुपदेशा भवंति ताः ॥ ५ ॥

यालागीं सर्वदा भक्तिभावें । संतांपासींं गा रामा जावें । गेलिया संत स्वभावें । उपदेश भावें करितील ॥ ७३ ॥ ते मेघाचेपरी उदार । उपदेश करिती वेदांतसार । जेणें अज्ञानपूर्वकसंसार । भस्मसार होऊनि ठाके ॥ ७४ ॥ यद्यपि जऱ्ही उपदेश न करिती । तऱ्ही प्राप्ति न चुके गा रघुपति । ते ज्या स्वैरकथा[6] करिती । त्याचि होती उपदेशा ॥ ७५ ॥ संतांचें जें सहज बोलणें । तें महावाक्यासि करी ठेंगणें । उठती संसाराचें धरणें । कर्म करणें तोचि विधि ॥ ७६ ॥ यालागीं संतांजवळि गेलिया । समूळ तुटोनि जाये माया । न सांधितां पावे आपणया । जाय विलया भवभय ॥ ७७ ॥ संत सेविलिया भावें । काय काय वा लभ्य नव्हे । तें चित्त देऊनि परिसावें । सांगेन स्वभावें श्लोकार्थें ॥ ७८ ॥

शून्यमा पूर्णतामेति मृतिरप्यमृताय ते । आपत्संपदिवाभाति विद्वज्जनसमागतात् ॥ ६ ॥

तोचि श्लोकार्थ ऐसा । एकाग्र आयिकें गा वीरेशा । ज्ञानेंविण दशदिशा । सदा वोसा अनात्मपणें ॥ ७९ ॥ रिती बुद्धि आत्मेनविण । अनात्मपणें रितें अंतःकरण । इंद्रियें वोसें आत्मयावांचून । देह तो जाण अवघा रिता ॥ ५८० ॥ सकळांसि जालें शून्यपण । देश ग्राम शून्य जाण । शून्य चंद्र सूर्यनारायण । विश्व शून्य अनात्मत्वें ॥ ८१ ॥ शून्य तीर्थ क्षेत्र जाण । तेथ देवता उदक पाषाण । शून्य अग्नि आणि ब्राह्मण । कर्माचरण शून्यत्वें ॥ ८२ ॥ शून्य दशदिशा अंतराळ । शून्य अवघे कुळाचळ[7] । शून्य सप्तही पाताळ । शून्य भूगोल अनात्मपणें ॥ ८३ ॥ जेणें देखे तेंही शून्य । जेणें चाले तें शून्य जाण । जेणें बोधे तेंही शून्य । जाण शून्यें प्रकाशकु ॥ ८४ ॥ एवं अंतर्बाह्य सकळ शून्यता । देश विदेश अवघी शून्यता । आत्मेनविण अवघा रिता । पोकळ सर्वथा अनात्मपणें ॥ ८५ ॥ तेंचि अवघें सत्समागमेंकरून । शून्यचि पावे पूर्णपण । ज्ञान पाविजे सत्संगेंकरून । अनात्मपण[8] नाहींच होये ॥ ८६ ॥ तें अवघें सत्समागमास्तव । ज्ञान पाविजे गा अपूर्व । तेणें शून्य तेंचि पूर्ण सर्व । 'खल्विदंब्रह्म' होऊनि ठाये ॥ ८७ ॥ जो हारपला होता आत्मा । सर्व भासत होता अनात्मा । त्याची लोपली सर्व गरिमा ।

---

१ संकटें नाहींशीं करणारें. २ वृक्ष ३ फळें आलेला. ४ सेवा करावयास योग्य. ५ संसाररूपी समुद्राच्या पलीकडे जाण्यास. ६ स्वच्छंदानें बोललेल्या गोष्टी. ७ मेरू वगैरे कुल पर्वत. ८ आत्म्याविषयींचें अज्ञान.

सर्व आत्मा होऊनि ठेला ॥ ८८ ॥ जैसे रज्जूच्या ठायीं नाना भ्रम । रज्जु लोपोनि अनेक परम । धारा माळा भुजंगोत्तम । अज्ञानकर्म इयापरी ॥ ८९ ॥ तेंचि सम्यक् ज्ञानें-करुनी । जरी पाहिजे न्याहाळुनी । तरी तेचि देहीं नानात्व जाउनी । रज्जू निर्वाणी उरे येक ॥ ५९० ॥ तैसें सद्गुरूकृपेकरून । समूळ तुटलिया अज्ञान । हारपोनि जाये विश्व-स्वप्न । उरे परिपूर्ण ब्रह्म येक ॥ ९१ ॥ तव्हां शून्य तें जालें अशून्य । नाहीं तें जालें परिपूर्ण । सद्गुरुकृपेचें फळलेपण । ब्रह्म निर्वाण उरे येक ॥ ९२ ॥ तेणें दाहाही दिशा परिपूर्ण । दिशा विदिशा परिपूर्ण । बुद्धींद्रिय अंतःकरण । तेंहि परिपूर्ण ब्रह्मत्वें ॥ ९३ ॥ देह तोचि आत्मा पूर्ण । देश ग्राम चंद्र तपन । विश्वचि आत्मा परिपूर्ण । तीर्थ क्षेत्र पूर्ण पूर्णत्वें ॥ ९४ ॥ उदक पाषाण पंचभूतें । चराचर कर्माकर्म तें । अंतराळ कुलाचल रितें । ब्रह्मापरतें असेचिना ॥ ९५ ॥ देखणें देखावें तत्वतां । चालतां बोलतां आयिकतां । बुद्धि बोध बोधकता । सर्वां परिपूर्णता पूर्णपणें ॥ ९६ ॥ बाह्य आणि अभ्यंतर । आरतें परतें परावर । सर्वही सर्व प्रकार । ब्रह्म निरंतर ब्रह्मत्वें ॥ ९७ ॥ आतां येक येक किती बोलावें । सर्व परिपूर्णचि स्वभावें । शून्य तें परिपूर्णता पावे । संतांचे सेवेकरूनियां ॥ ९८ ॥ ऐसेनिही जो जाला मृत्यु । तो मोक्षरूपें अमृतु । कोण्ही प्राकृत मृत्यु ह्मणतु । तोही अमृत्यु धन्यपणें ॥ ९९ ॥ सत्संगे जो जाला मृत्यु । तोचि ह्मणतां अति अमृत्यु । हेंही होय ऐसा अर्थु । परि सिद्धांतपूर्वक ॥ ६०० ॥ आपत्ति तेचि संपत्ति । सत्संगें विपत्ति ते नव्हे आपत्ति । ऐसेंही येक ह्मणती । दुःख चित्तीं न वाटे ह्मणोनी ॥ १ ॥ तरी मुख्य अर्थाचें लक्षण । येकाग्र आइक सांगेन । ज्ञानी तो तंव अकिंचन । परिग्रह-शून्य सर्वार्थीं ॥ २ ॥ ते बाह्यदृष्टी दिसे आपत्ति । परिस्वानंदें सुखसंपत्ति । ऐश्वर्य पूर्ण त्रिजगती । स्वाराज्य प्राप्ति स्वाराज्यें ॥ ३ ॥ समागमें ब्रह्मविदाचेनी[2] । सर्वही तया पूर्व-पणीं । यालागीं दुर्लभ त्रिभुवनीं । जनतारणीं[3] ब्रह्मवेत्ता ॥ ४ ॥ ब्रह्मवेत्ता नसता अवनी-वरी । तरी सकलही जन बुडते संसारीं । या महामोहाच्या पुरीं । कोण पां तारी साधू-विण ॥ ५ ॥ अथवा असतांही ब्रह्मज्ञानी । ते राहते निरंतर समाधानीं । निर्विकल्पसमाधि अवलंबुनी । जरी निर्वाणीं राहते ॥ ६ ॥ तरी उपदेशव्यवहार कैसा होता । कोण या मुमुक्षांसि तारिता । तरी अज्ञानपुरे लोक दाटता । दुःखें बुडता भवार्णवीं ॥ ७ ॥

ज्ञानिनामपि चित्तं चेत्केवलात्मसुखोदितम् । सत्वाः संसारदुःखार्त्ताः कं यांति शरणं तदा ॥ ७ ॥

यालागीं ऋषिनायक । वसिष्ठ बोलिला आनंदें श्लोक । तयाचा हीं अर्थ विशेष । आयिका सकळ श्रोते हो ॥ ८ ॥ अथवा ज्ञानीही असती मिळत । ते दर्शना स्पर्शनासि फावत । तेणेंचि लोक तरत । जे भाग्यवंत सभाग्यपणें ॥ ९ ॥ ज्ञानी दुर्लभ संसारीं । सुलभाही आर्ति नुपजे पुरी । आर्ति जालियाही सहस्रांतरीं । येखादाचि वरी साधूसी

१ सूर्य. २ ब्रह्म जाणणाराचे. ३ लोकांचा उद्धार करावयास.

॥ ६१० ॥ ऐसिया साधूचें चित्त । केवळ आत्मसुखीं उद्यत । जालिया संसारपीडित । सत्वर शरणागत कोणा जाणें ॥ ११ ॥ ज्ञानियाचें जरी चित्त । सर्वदा होतें वस्तुगत । बाह्य पदार्थ नेणत । सुखसंवलित आत्मत्वें ॥ १२ ॥ तो निर्विकल्प समाधि । साधूंसि असतां निरवधि । केवल आत्मसुखैकाब्धीं । मनःशुद्धि विसरोनि जाये ॥ १३ ॥ तेथें चालणें ना बोलणें । नाहीं व्युत्थान पाहणें । नाहीं कर्माचें करणें । आपणेविण न देखे ॥ १४ ॥ ऐसे सर्वदा समाधिस्थ । निरंतर राहाते जरी संत । तरी लोक जे अज्ञानवृत्त । शरणांगत कोणासी जाते ॥ १५ ॥ संतांसि शरण जावया । जो संसारें पिडिला प्राणिया । अति दुःखें दाटला निघावया । मार्गु न दिसे जया तो अधिकारी ॥ १६ ॥ येणें अतिवैराग्य सूचलें । तें अखंड जया बाणलें । त्यासिच डोळे उपजले । जाय वहिलें शरण संतां ॥ १७ ॥ यालागीं संसारदुःखें करूनी । अत्यंत पिडिला जो प्राणी । त्यासि विश्रांति संतचरणीं । सुख अनुदिनीं सत्संगें ॥ १८ ॥ अगा सत्संगेंचि वैराग्यज्ञान । सत्सगें कर्मानुष्ठानें । सत्संगें भक्ति उपजे पूर्ण । आणि विज्ञान सत्संगें ॥ १९ ॥ सत्संगें जप तप ध्यान । सत्संगें अष्टांगयोगसाधन । सत्संगें जया योगनिर्वाण । सत्संगें जाण शमदमादि होती ॥ ६२० ॥ सत्संगें भाव उपजे देहीं । सत्संगें सद्गुरुभेटि पाहीं । सत्संगेंचि देहीं विदेही । ब्रह्मत्व पाहीं सत्संगें ॥ २१ ॥ सत्संगें संसारा नाशु । सत्संगें अज्ञनाचा ध्वंसु । सत्संगें प्राप्त परेशु । स्वरूपीं वासु सत्संगें ॥ २२ ॥ सत्संगें अष्टमासिद्धि । सत्संगें प्राप्त महारिद्धि । सत्संगें तरिजे भवाब्धि । आधि व्याधि हरे सकळ ॥ २३ ॥ सत्संगें होय स्वाराज्यप्राप्ति । सत्संगें बाणे निजशांति । सत्संगें स्वस्वरूपप्राप्ति । सत्संगें गति सर्वांतें ॥ २४ ॥ सत्संगें अंतःकरण निर्मळ । सत्संगें तुटे वासनाजाळ । सत्संगें सुखाचासुकाळ । सत्संगें मेळ सत्वशुद्धीचा ॥ २५ ॥ अगा सत्संगापरतें कांहीं । या त्रैलोक्यांत वरतें नाहीं । यालागीं सर्वदा भलेंतेनही । सत्संग सर्वदा करावा ॥ २६ ॥ यालागीं सत्संगावांचून । कोण्हेही साधनेंकरून । अज्ञान हें तुटे जाण । कल्पांतीं पूर्ण रघुनाथा ॥ २७ ॥ अज्ञाननिरासावांचून । कदा नुपजे ब्रह्मज्ञान । ब्रह्मज्ञानेंविण समाधान । नव्हे जाण रघुवर्या ॥ २८ ॥ समाधान जालियावांचून । ब्रह्मता न बाणे पूर्ण । ब्रह्मतेविण गा जन्ममरण । विश्वभानभ्रम न चुके ॥ २९ ॥ यालागीं कृपेनें जाणोनि संत । राहिले संप्रज्ञातसमाधिस्थ । जन तारावया उद्यत । कृपावंत कळवळोनी ॥ ६३० ॥ जें आर्तासि सांगावें ज्ञान । तेणें तोडावें संसारबंधन । जन मुक्त करावे जाण । स्वयें आपण विचरोनि ॥ ३१ ॥ जे दुसरियासि नये उपकारा । त्यां काय वाहोनि ज्ञानभारा । न पुसतां सांगणें तो पसरा । सैरावैरा बोलों नये ॥ ३२ ॥

---

१ अज्ञानामध्यें गुरफटलेले. २ कर्म करणें. ३ यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, ध्यान, धारणा व समाधि हीं योगाचीं आठ अंगें. ४ आत्मस्वरूपाची, ब्रह्माची. ५ कशेंही करून.

जो संसारदुःखें अति आर्त्त । श्रीगुरुसि होय शरणागत । तयासि सांगिजे तोचि सार्थ-कार्थ । ज्ञान निश्चित रघुनाथा ॥ ३३ ॥

तज्ज्ञानं स च शास्त्रार्थस्तद्विज्ञानमखंडितम् । सच्छिष्याय विरक्ताय साधो यदुपदिश्यते ॥ १८ ॥

तेंचि ज्ञान तोचि शास्त्रार्थ । तीच विज्ञान अखंडित । जें सच्छिष्य आणि विरक्त । त्यालागीं निश्चित उपदेशिजे ॥ ३४ ॥ हें श्लोक पदव्याख्यान । याचें सांगिजेल विवरण । तेंचि भावार्थटीका जाण । परिपूर्ण परियेसा ॥ ३५ ॥ ज्या शिष्यासि उपदेशिजे ज्ञान । त्याचें रघुनाथा ऐक चिन्ह । संक्षेपें तुज सांगेन । जाणसी खूण ज्ञानमूर्ति ॥ ३६ ॥ सच्छिष्य शब्दें सर्व सूचिलें । तेथें विरक्त पदें बोलिलें । पुनरुक्त[1] नव्हे येणें बोलें । तरी काय बोलिलें आयिका ॥ ३७ ॥ जेणें निषिद्ध कर्म त्यागुनी । काम्य कर्म सांडी वोलांडुनी । कर्मफल तें अंतवंत[2] ह्मणोनी । उपेक्षूनि टाकी जो कां ॥ ३८ ॥ करी सत्कर्मानुष्ठान । नित्य नैमित्तिक[3] अहेतुकपण । तेंही ईश्वरार्पण करून । जालें अंतःकरण शुद्ध ज्याचें ॥ ३९ ॥ जैं निष्काम कर्म करणें । तैं समूळ कामतेनें उपडणें । तेंही जरी ईश्वरार्पण करणें । वरारिघवर्णे चित्तशुद्धीतें ॥ ६४० ॥ ऐसी चित्तशुद्धि निर्मळ । बोलणें पाहणें ज्याचें प्रांजल । कदा कल्पांतीं नव्हे कुटिल । वर्त्तती सरल इंद्रियें ज्याचीं ॥ ४१ ॥ सदा पवित्र गंगा जैसी । निर्मळ जल यमुना तैसी । अकर्मवासनेचिया लेशी । नव्हे सहसा समोर जो ॥ ४२ ॥ पाणी जेणें जेउतें नेलें । ते-उतें आग्रहेंविण चालिलें । तैसें जयाचें वर्त्तणें जालें । आग्रह गेले जयापासुनि ॥ ४३ ॥ नवल अवगुणरहितवाचा । शुभेच्छासंकल्पु जयाचा । शुभेच्छा या बोलाचा । भाव साचा परियेसा ॥ ४४ ॥ जें नश्वरपणें अमंगल । जयाचा परिणाम कुश्चळ[4] । तें विषयसुख सकळ । अतिकुटिळ इंद्रादिक भोग ॥ ४५ ॥ अमंगळ नश्वर जें जाण । ज्याचा परिणाम दुःखनिर्वाण[5] । तें अशुभ बोलिजे विषयाचरण । सप्रपंचपूर्ण रघुनाथा ॥ ४६ ॥ या सर्वांच्या निरासीं जें उर्वरित । ज्याचेनि प्रकाशें सर्व प्रकाशत । जें कीं अविनाशी पूर्ण भरित । अबाधित कालत्रयीं ॥ ४७ ॥ तेंचि शुभ गा रघुपति । जया ब्रह्म बोलिजे त्रिजगतीं । त्याची व्हावी मज प्राप्ति । दृढ आर्ति[6] ते शुभेच्छा ॥ ४८ ॥ हे शुभेच्छा गा जयासी । तो सच्छिष्य रामा परियेसीं । कुसंग नावडे जयासी । मनोमानसी गुरुभजन ॥ ४९ ॥ गुरु देव गुरु तीर्थ । गुरु तप दान गुरुव्रत । सद्गुरु जाण कुलदैवत । मंत्रतंत्रार्थ श्रीगुरु जया ॥ ६५० ॥ गुरु जननी गुरु पिता । गुरु सर्वेश्वरु गुरु ज्ञाता । सकळ शास्त्रार्थवक्ता[7] । गुरुपरता[8] देव नेणे ॥ ५१ ॥ गुरु कुलधर्म कुलाचार । गुरु सद्विद्या सदा-

---

१ पुनः सांगितलेलें. २ नाश होणारे. ३ विशेष कारणामुळें केलेलें. ४ वाईट. ५ अतिदुःख ६ इच्छा. ७ शास्त्राचा अर्थ सांगणारा. ८ गुरुहून श्रेष्ठ.

चार । गुरु ज्ञानदातृत्वें[1] उदार । विष्णु ब्रह्मा हर गुरुमूर्ति ॥ ५२ ॥ ऐसा अनन्यपणें गुरुवांचुनी । कांहीं नेणें जाग्रति स्वप्नीं । गुरुरूपें मनीं नयनीं । न विसंबे क्षणी मन अवधानपणे ॥ ५३ ॥ हें जाण सच्छिष्याचें लक्षण । अतिशुद्ध आणि मन । शास्त्रश्रवणीं मेधा[3] पूर्ण । अतिप्रज्ञा सुबुद्धि ॥ ५४ ॥ जयासि सप्रेम ईश्वरीं भक्ति । पापवासना नुपजे चित्तीं । बसावें आवडे येकांतीं । अंतरास्थिति बाह्य फांवे ॥ ५५ ॥ जे उदार मनाचे । जे अविकल्प भावाचे । जे अलंकार सद्बुद्धीचे । परम भाग्याचे सभाग्यपणें ॥ ५६ ॥ हें सच्छिष्याचें लक्षण । सांगितलें तुज संपूर्ण । आतां वैराग्यवंत तो कोण । परिसें खूण रघुनाथा ॥ ५७ ॥ जया नावडे इंद्रियवर्ग[5] । जया नावडे देहसंग । देहाचाचि मानीं उबग । सर्वार्थाचा संगु देहयोगें ॥ ५८ ॥ देह नावडावयाचें कारण । रघुनाथा तुज सांगेन । याचें एकैक नश्वरपण । कुश्चळ जाण सर्वार्थी ॥ ५९ ॥ देह केवळ अस्थीचें घर । देहीं मांस मज्जा रुधिर । देहीं पूय पंक क्रमि थोर । विष्ठा मूत्र देह विकारी ॥ ६६० ॥ देहासि असती षड्विकार । अस्ति जायतें विवर्द्धते[7] प्रकार । विपरिणमते अपक्षीयते हे थोर । विनश्यति मार मरणाचा ॥ ६१ ॥ या एक विकाराचें दुःख । सांगतां अतिअटक । मन कंटाळे सम्यक । तऱ्हीही ऐक सांगतों रामा ॥ ६२ ॥ मातेचिये ऋतुकालीं । पितियाच्या संयोगमेळीं । प्राणापानाचिये उसाळीं । रेत कमळीं अणुमात्र पडे ॥ ६३ ॥ येथें मातेचें विटाळरक्त । त्यामाजी पितृरेत असे पडत । एकत्र जालिया होत । लिंगदेहमिश्रितस्थळदेह ॥ ६४ ॥ हें अस्तिविकाराचें लक्षण । तें दुःख मूळकारण । गर्भवास दारुण । यातना कठिण नरकाहुनी ॥ ६५ ॥ मळमूत्राचे दाथरीं । उकडत नवमासवरी । अधोमुख वांझोनि योनिद्वारीं । चरफड करी अति दुःखें ॥ ६६ ॥ तें अतिदुर्गंधीचें स्थान । तेथही तोडिती जंतु दारुण । तया क्षतांसी फणफण । कट्वम्लतीक्ष्ण अन्नरसलागे ॥ ६७ ॥ तया गर्भाची अतिव्यथा । कवणा सांगावी रघुनाथा । नाहीं श्रोता नाहीं परिहारकर्ता । येकयेकुलता आपणाचि ॥ ६८ ॥ नकरी कोण्ही संबोखन । नेदी माता स्तनपान । येकला भोगी निर्वाण । नाहीं समाधान या विवेकाचें ॥ ६९ ॥ असो हें सांगतां अति विस्तार । जायते आयिकें दुसरा विकार । उत्पत्ति होतां योनिद्वार । सांकडें थोर निर्गमीं ॥ ६७० ॥ तेथ अतिप्रयासें करुनी । बाहेर पडे मूर्च्छा येउनी । दुःखें सोहंकार विसरोनी । कोहं ध्वनि थोर करी ॥ ७१ ॥ आक्रंदोनि बाहेरी पडे । कोहंस्वरें दीर्घ रडे । कांहीं कंटिया न सु वाडे । करी चरफड नेणोनी ॥ ७२ ॥ तें दुःख अतिदारुण । बोलतां असे गहन । करितां नालखंडन । दुःखें मन वेडावे ॥ ७४ ॥ अथवा उत्पत्ति ते जायते विकार । झाला असतां तो अस्तिप्रकार । विवर्द्धते तो तिसरा विकार । त्याचा विचार सांगेन ॥ ७५ ॥

---

१ दान देण्यामुळें. २ लक्ष दिल्यामुळें. ३ बुद्धि. ४ प्राप्त होतें. ५ इंद्रियांचा समुदाय. ६ कंटाळा. ७ वाढतो.

विवर्द्धते हा विकार तिसरा। देह वाढिन्नला गा रघुवीरा। क्षुधा पिडी तयाचा उदरा। व्यथा थोरा त्यामध्यें ॥ ७५ ॥ दुग्ध बोळे पिळिती तोंडीं। तेणें न धाये त्याची कुडी। उपवासी सदाचरफडी। मग स्तनीं गोडी लाविती ॥ ७६ ॥ अति मृदु त्याची त्वचा। सुरवाड नाहीं आस्तरणाचा। काठिण्यें पिडे परी सांगावयाचा। पवाड वाचा पावेना ॥ ७७ ॥ अखंड मळमूत्रीं लोळे। मुखीं पूर पडती लाळे। नरकयातना कळे। ते दुःख-सोहळे देखोनी ॥ ७८ ॥ असो हें सांगणें किती। ऐक चतुर्थ विकाराची गति। विपरिणमते त्पत्ति। आयिक रघुपति ऐसी असे ॥ ७९ ॥ जें विशेषीं परिणाम पावे। त्यासी विपरिणमते ह्मणावें। अथवा विविधा अवस्थीं परिणाम पावे। तेंचि जाणावें विपरिणाम ॥ ६८० ॥ विविधरूपें तारुण्यवस्था। चारी असती गा रघुनाथा। ते संमति सांगेन आतां। त्या श्लोकार्था परिस पां ॥ ८१ ॥

संमति श्लोक। कौमारं पंचमाब्दं च पौगंडं दशमावधि। कैशोरमा पंडदशाद्यौवनं तु ततः परम्।

येही चौं अवस्थीं परिणामला। देह परिणामवंत पावला। कौमारपणीं अतिपिडिला। इंद्रियबला न पवेचि ॥ ८२ ॥ रांगता चालतां बलहीन। पडत जाये मुरकुंडी खाऊन। मळमूत्राचें विलेपन। सुखें भक्षण त्याचें करी ॥ ८३ ॥ हें पांचावरुषांभीतरी। मग साहाव्यापासूनि दाहावरी। पौगंडदशा दुसरी। खेळे भारी बालकपणें ॥ ८४ ॥ दाहा-पासूनि पंधरांत। किशोरदशा अतिश्रांत। नेणे आपुले हिताहित। नाहीं पडत खेळे प्रीति ॥ ८५ ॥ गुरु पितर ताडर्ण करिती। नित्य विद्यभ्यासु करविती। तें न लागोनियां चित्तीं। खेळीं प्रीति आवडे ॥८६॥ तो अभ्यासाचा निर्बंधु। वरी क्षुधेतृषेचा पावे बाधु। पराधीनपणें उपरोधु। नाहीं बोधु आत्मविषयीं ॥ ८७ ॥ हें सरलियानंतरें। यौवनता पावे अतिभरे। आलें कामाचें भेंडरे। योनिद्वारें धांडोळितु ॥ ८८ ॥ मग देखे आपली ना परावी। स्त्रीव्यक्ति डोळां देखावी। मग अहंता हारवी। भुले सर्वां भावीं दर्शनमात्रें ॥ ८९ ॥ तेणें नावडे धर्माचरण। नावडे तप दान याग यजन। नावडे ईश्वराचें भजन। परावर्त्तन येथ कैचें ॥ ६९० ॥ सर्व चिंतनीं स्त्रीमूर्ति। कानीं ऐके योषितांची कीर्ति। सर्वदा स्त्रीयेची उपास्ति। परावृत्ति असेचिना ॥ ९१ ॥ स्त्रीपुढें नावडे स्नान। स्त्रीपुढें नावढे भोजन। स्त्रीपुढें नावडे वर्तन। स्त्रीच पुण्य धर्म जया ॥ ९२ ॥ स्त्रीपुढें नावडे मातापिता। स्त्रीपुढें नावडे बंधुभ्राता। स्त्रीपुढें नावडे गुरु देवता। सर्व ताता नावडे ॥ ९३ ॥ स्त्रियेलागीं सर्वस्व देणें। स्त्रियेलागीं प्राण वेचणें। स्त्रियेलागीं जन्ममरणें। स्त्रिया कोण्हें न पाहावी ॥ ९४ ॥ स्त्रियेच्या ठायींच मन। परी स्त्रिया त्याच्याठायीं उदासीन। तें दुःख सांगतां अतिगहन। स्त्रीनिर्भर्त्सन किती सांगों ॥ ९५ ॥ जऱ्ही

---

१ वाढतो. २ वाढला. ३ तृप्त होत नाहीं. ४ पक्क होतो. ५ रूपांतर पावला. ६ पांच वर्षांचा होई-पर्यंत. ७ आंगास लागणें. ८ शिक्षा. ९ भीति. १० जवळ राहणें. ११ मागें फिरणें. १२ चांगली वागणूक.

निर्भर्त्सिलिया स्त्रिया । तऱ्ही न निवर्ते गा रघुराया । जेवीं खेरी टेक्रीं नेदी खरा तया । परी तो तेथूनियां न परते ॥ ९६ ॥ स्त्रीसंगें जरी लज्जा । थोर जाली गा रघुराजा । तऱ्ही न निवर्ते आत्मकाजा । भवर्चे वोजें श्वान जैसा ॥ ९७ ॥ जऱ्ही पावे मृत्यूचा ठावो । तऱ्ही नुबगे ज्याचा मनोभावो । बळी द्यावया नेला पहा हो । मैथुनभावो न संडी मेंढा ॥९८॥ ऐसेनि अपत्यें होती तियेसी । तोचि निगडु पडला पायांसी । भरणपोषणीं वृद्ध पोसी । कासाविसी थोर होये ॥ ९९ ॥ तेणें अति थोरावला । ह्मणे मी आतां गृहस्थ जाला । तंव अकस्मात जरेनें व्यापिला । मोहें मोहिला सर्वांपरी ॥ ७०० ॥ अपक्षीयते पांचवा विकार । पावला दुःखाचा डोंगर । क्षुधेतृषेचा आतु थोर । वणवण पुर तृष्णेचा ॥ १ ॥ वली पलित येतां आंगासी । थोर होतसे कासाविसी । शुभ्र केश वेंचितां प्रतिदिवसीं । शंके जनांसि कळेल ॥ २ ॥ वृद्ध ह्मणतां मरणभार । वाहे लज्जेचा डोंगर । वय चोरूनि मी चतुर । वयविचार थोडा मज ॥ ३ ॥ ऐसें ह्मणे परी न निवर्ते । आत्मविचारीं मन रितें । विषय वासनांचि अति आर्ते । रिघे तेथें बलात्कारें ॥ ४ ॥ तया वार्धक्याचा वारा । आंगीं वाणतांचि गा रघुवीरा । मोहाचेनि तो माजिरा । होये सैरा ममतेनी ॥५॥ सकळ इंद्रियां क्षीणपण । बळतेज जालें क्षीण जाण । परी चित्तीं अतिशय वणवण । काम पूर्ण कदा नव्हे ॥६॥ स्त्रीपुत्रादिक होती उदास । असतां द्रव्य नये हातास । तेणें चिंता वाहे बहुवस । चित्तीं हव्यास वासनेचा ॥ ७ ॥ हातपाय होती खुळे । सौंदर्य ठायींच पळे । इंद्रियें सांडविली बळें । कोणी कळवळे ऐसें नाहीं ॥८॥ सर्वांसि उबग होये । ह्मणती ह्मातारा वांचला आहे । हा मरे तरी बरवें पाहे । नवसिये पाहे नवसित ॥ ९ ॥ रात्रंदिवस खोकितां उजागरा । ह्मणती रात्रीं जागवी ह्मातारा । कंपु सुटला सर्व शरीरा । आयुष्य मातेरा सर्व केला ॥ ७१० ॥ काठी टेंकणें धरितु आहे । तरी चालतां चाचरी जाये । ह्मणे देव कोठें गेला आहे । मृत्यु कां नये मजलागीं ॥११॥ ऐसा कष्ट नानापरी । अनेक व्याधि उठिती शरीरीं । अतिदुःखाच्या डोंगरीं । पडे भारी शोकयुक्त ॥ १२ ॥ तरी मोह न संडी स्त्रीपुत्रांचा । सुना नातू सोस पशूंचा । ह्मणे हा सर्व प्रपंचु आमुचा । परी उपरतीचा लेशु नाहीं ॥ १३ ॥ हें किती सांगावें गा रघुपति । या अनुभवाची सकळां प्राप्ति । येक स्वयें भोगिताती । तरुण देखती आणिकांचा ॥ १४ ॥ जें प्रगट जगामाझारी । तेंचि तें किती बोलावें वैखरी । अपूर्वार्थी बोलिजे तें तरी । सर्वांपरी उत्तमोत्तम ॥ १५ ॥ तरी अपूर्वार्थ तो ऐसा असे । जो कोण्हासि कळला नसे । तोचि उपदेशीं सर्वांसें । अनुभव नसे लोकां ज्याचा ॥ १६ ॥ तो परमार्थ अतिगुप्त । सर्व लोकांसि नाहीं प्राप्त । यालागीं न बोलणें हा पुरुषार्थ । येरु व्यर्थ शीण करणें ॥ १७ ॥ जें लोकांमाजी प्रगट आहे । ज्याचा अनुभव सकळांसि होये । त्याचा अनुवाद करूनि काये । व्यर्थ वाचे

---

१ गाढवी. २ सवयांनें. त्रास. ४ नवीन अर्थानें युक्त.

इंद्रिय शिणावावें ॥ १८ ॥ परी याचें कारण रघुपति । इतुकेंचि आहे विश्वमूर्ति । ऐसें वैराग्य ज्या शिष्याप्रति । स्मरे चित्तीं संसारदुःख ॥ १९ ॥ तोचि जाण वैराग्यवंत । त्यासि ज्ञानोपदेश कीजे त्वरित । हें न स्मरे जो किंचित । त्यालागीं हा अर्थ निरूपिला ॥ ७२० ॥ जोकीं अत्यंत अज्ञानी जन । अनुभविलें दुःख नेणती जाण । तयालागीं केलें कथन । आइक पूर्ण वैराग्य हें ॥ २१ ॥ तेंचि वैराग्य कसें । हें सांगावयाचेनि मिसें । दुःखदर्शन आपैसें । अवस्थाविशेषें सांगावया ॥ २२ ॥ यालागीं मक्याचाचि अनुवाद । केलिया सर्वथा नाहीं बाध । जे वैराग्यार्थ नेणती अतिमंद । त्यांसि विशद करणें लागे ॥ २३ ॥ जे स्वयेंचि वैराग्यवंत आपण । तयांप्रति नलगे हें निरूपण । षड्विकारीं दुःख दारुण । सांगा या खूण मंदांप्रति ॥ २४ ॥ अपक्षीयते पांचवा विकार । तें जाण वार्धक्य अति थोर । महादुःख अतिदुर्धर । नाहीं पार सांगतां ॥ २५ ॥ देहचि तंव दुःखाचा राशि । तेथ वार्धक्य तें पात्र चिळसी । येणें देणें सर्व दुःखासी । नाहीं पापासि मर्यादा ॥ २६ ॥ विनश्यति हा षड्विकारु । तेथें मरण तें दुःखाचा डोंगरु । तें सांगतां भय थोरु । नाहीं पारु ह्मणोनियां ॥ २७ ॥ जितुकें आपुलें होतें मानिलें । तें वृद्धपणीं सकळ राहिलें । मग मरणासि काय उरलें । उपेगा गेलें कवणासि ॥ २८ ॥ मर-णाचेनि दुःखरासि । कोठें नाहीं गा परियेसीं । तें सांगतां वाचेसि । उरी कैसी उरेल ॥ २९ ॥ स्त्री पुत्र सकळ सोयरीं । तन धन तें राहिलें दुरी । तो बोढिजेतसे यमकिंकरीं । तें दुःख भारी काय सांगों ॥ ७३० ॥ तेणें दुःखें बोभांऊं जाये । तंव वाचा राहिली उपेगा नये । काकुळती आपुल्याकडे पाहे । ते चंद्री होये ह्मणती सकळें ॥ ३१ ॥ पाहतां बोलतां सांगतां । नये परी विकार इंद्रियां समस्तां । तेणें अतिबीभत्स दिसतां । भय समस्तां उपजत ॥ ३२ ॥ तो काकुळती सांगावया करी । येर ह्मणती लागली चंद्री । बोलावया मुख पसरी । ह्मणती खरी मरणवेळा ॥ ३३ ॥ दुःखें हातपाये खोडी । शरीर वळे मुरकुंडी । मळमूत्रें करितु चरफडी । लाळ ताडीं अनिवार ॥ ३४ ॥ मरणाचें दुःख ऐसें । तें सांगतां नये अतिसोसें । अल्पचि सांगितलें असे । जाणावया सकळांतें ॥ ३५ ॥ षड्विकारांचें दुःख ऐसें । तें सदा स्मरतु जाय मानसें । हेंचि वैराग्य विशेषें । सर्वदा असे ज्यासी ॥ ३६ ॥ ऐसें देहादि सर्व दृश्यजात । तें देखे दुःखभरित । तेणें उदास वृत्ति संतत । अनासक्त सर्वदा जो ॥ ३७ ॥ ऐसा जो वैराग्यवंत । आणि सच्छिष्य जो पूर्वोक्त । यालागीं सांगिजेल ज्ञानार्थ । तोचि यथार्थ ज्ञानमाहिमा ॥ ३८ ॥ ऐसिया सत्पात्र सच्छिष्यासी । न पुसतां ज्ञान सांगावें हृषीकेशी । तया बोलिजे ज्ञानशब्दासी । येरु उपदेशीं सदा रिता ॥ ३९ ॥ बीज तें बीज नव्हे जाण । जें असत्क्षेत्रीं पेरीलें जाण । फळ

---

१ पुनः सांगणें. २ अज्ञानांला. ३ म्हातारपण. ४ नाश पावतो. ५ दुःखाची रास. ६ मोठ्यानें ओरडू पाहातो. ७ डोळे फिरणें. ८ दुःखानें भरलेलें. ९ ज्ञानाचें महत्व. १० वाईट शेतांत.

नये ऋतूविण । कोटि प्रयत्न करितांही ॥ ७४० ॥ ह्मणोनि बीजशब्दीं तें बोलिलें ज्ञान । त्यासि सत्क्षेत्र सच्छिष्य निपुण । तेथ वाही तें वैराग्य पूर्ण । श्रद्धा जाण ओलावा ॥ ४१ ॥ तिये भूमीसि जें पेरिलें । तेंचि बीजशब्दें बोलिलें । तेणे अद्भुत विस्तारिलें । अपरिमित फळें ॥ ४२ ॥ अगा सद्बीज जरी जालें । ऊखरीं न वाहितां पेरिलें । तें बीजाचि परी वायां गेलें । नाहीं फळलें ह्मणोनी ॥ ४३ ॥ यालागीं बीज तें बीज नव्हे । तें सत्क्षेत्रेंविण वायां जाये । तैसें असच्छिष्या दिधलें होये । तें विज्ञान नोहे सर्वार्थी ॥ ४४ ॥ नाहीं वैराग्य ज्या शिष्यासी । ज्ञान वायां जाय सांगितलें त्यासी । यालागीं ज्ञानशब्द विज्ञानासी । न घडे सर्वांशीं रघुराया ॥ ४५ ॥ सच्छिष्यवृक्षजरी असिला । परी वैराग्यऋतुभरें नाहीं मांडला । तऱ्ही कदा नये बोध फळा । जऱ्ही सिंजला शास्त्रजलें ॥ ४६ यालागीं सच्छिष्य आणि वैराग्यवंतु । सांगतांचि ज्ञान चढे त्याच्या हातु । ह्मणोनि तें विज्ञान हा फलितार्थु । निश्चितार्थु बोलिला ॥ ४७ ॥ तें वैराग्य नव्हे निश्चित । जें खडन पावे अखंडित । दुःखकाळीं वैराग्यवंत । सुखीं आसक्त विषयांसी ॥ ४८ ॥ यालागीं ताच वैराग्य गा रघुनाथा । जें अवस्थात्रयीं न नाशे सर्वथा । पाठीच लागे गा दवडितां । ते अखंडता वैराग्याची ॥ ४९ ॥ प्राप्त जालियाही इंद्रियार्थ । शोभनाध्यासु न करी चित्त । नश्वरत्वें वैरस्यें भासत । नव्हे उद्यत कोण्हे समयीं ॥ ७५० ॥ हेचि वैराग्याची अखंडता । शिष्याप्रति अखंड उपदेशितां । विमुख होये इंद्रियार्था । जैसी पतिव्रता पुरपुरुषीं ॥ ५१ ॥ कां ज्ञाननिष्ठासि महासिद्धि । प्राप्त जालियाही नव्हे उच्च बुद्धि । वोसंडोनि विशुद्धि । अखंड बोधीं बोधला जो ॥ ५२ ॥ कां विषें रांधिली पक्वान्नें । तें जेवणार जरी वरवें जाणे । तो लोटोनि पळे भाणें । न परते कोण्हे पायां पडतां ॥ ५३ ॥ परिणाम देखोनि दुःखांत । चिळस मानी जयाचें चित्त । आवचटें पाय पडला कश्मलांत । चिळस जन्मांत विसरेना ॥ ५४ ॥ जरी मृत्तिका जळें धुतला । वरी चंदनादिकीं चर्चिला । परी विसरेना त्या कश्मलाला । अति कंटाळा स्मरतांची ॥ ५५ ॥ तैसे जरी विषय टाकिले । ज्ञानाचे मार्गी लागले । तेही चिळस नाहीं विसरले । विषय देखिले रम्य जरी ॥ ५६ ॥ ऐसें तेंचि तें वैराग्य जाण । शिष्यचित्तीं बाणे संपूर्ण । अखंडशब्दें नव्हे क्षीण । भोग संपूर्ण दावितांही ॥ ५७ ॥ ऐसा तोचि तो शास्त्रार्थ । सच्छिष्यासि बोध यथार्थ । शास्त्राचा हा फलितार्थ । ज्ञान हस्तगत तत्काळ होये ॥ ५८ ॥ या श्लोकाचा मथितार्थ इतुका । परियेसीं गा रघुकुळतिलका । सार्थकता हेचि ज्ञानाटिळका । सच्छिष्य निका प्रबोधिजे ॥ ५९ ॥ येथ येकाचि कारण गा रघुपति । जरी झाली शास्त्रव्युत्पत्ति । आणि गुरुही उपदेश करिती । परी नसतां शुद्ध मति न फळे

१ संयोग पावल्या. २ शिंपणें केलें. ३ शास्त्ररूपी उदकानें. ४ चांगला उपभोग घेणें. ५ निरसपणता. ६ भांडीं. ७ घाणीमध्यें. ८ उटी लावली. ९ हातीं आलेलें. १० शास्त्राचें ज्ञान.

शिष्या ॥ ७६० ॥ शुद्ध मति नसतां । तो उपदेशु जाय रिता । परी गुरुशास्त्राचा बोध- कर्ता । कदा कल्पांता घडेना कीं ॥ ६१ ॥ शिष्य असतां अशुद्धमति । तरी गुरु शास्त्रें काय करिती । जरी स्वयें आला लक्ष्मीपति । तरी स्वरूप प्राप्ति न करवे ॥ ६२ ॥ हेंचि करावया निरूपण । श्लोकद्वय श्रीवसिष्ठ आपण । बोलती तें ऐकाग्र मन । संतीं करून आयिकावें ॥ ६३ ॥

उपदेशक्रमो राम व्यवस्थामात्रपालनम् ॥ ज्ञप्तेस्तु कारणं शुद्धा शिष्यप्रज्ञैव केवला ॥ ९ ॥

अगा एक शिष्य एक गुरु । गुरु शिष्याकरी उपदेशाचारु । हा ईश्वरापासूनि व्यवहारु । उत्तरोत्तरु चालिला असे ॥ ६४ ॥ प्रबुद्धें अबुद्ध बोधवावा । जागृतें प्रसुप्त चेतवावा । हा परंपराचारु पाळावा । परी आपुल्या भावा आपण येत ॥ ६५ ॥ येक निरंजनीं असे निजेला । त्यासि चेतवावया कोण गेला । चेता चेतविता स्वयेंचि जाला । नाहीं केला सावधु कोण्हें ॥ ६६ ॥ तैसा अज्ञानें जो दाटला । तोचि सामग्रीनें उवाइला । वैराग्यादि सकळ मेळा । करी येकवळा आपणाचि ॥ ६७ तया सद्बुद्धि कवणें दिधली । शमदमा- दिसंपत्ति कैसी आली । सत्संगति कैसी लाधली । कोणें केली धांवाधांवी ॥ ६८ ॥ तेव्हां सद्गुरु नाहीं आला । नाहीं अंतरीं विवेक उपजला । विषयांचा कंटाळा । कोणें लिहिला त्याचे हृदयीं ॥ ६९ ॥ जरी सद्गुरु कारण यासी । तरी पितराचि गुरु बाळकासी । ते विद्यादि प्रवर्त्तविती संसारासी । तो तयासी उदास ॥ ७७० ॥ मारूनि स्वव्यापार शिकविती । तो तेंचि कांहीं नघे चित्तीं । शास्त्रश्रवणीं अतिआर्ति । साधुसंगति आवडे ॥ ७१ ॥ साधू- पासूनि उठवूनि नेती । स्वउद्यमीं प्रवर्त्तविती । परी तें कांहींच न लगे चित्तीं । करी पुढती । तेंचि स्वयें ॥ ७२ ॥ स्नानसंध्या करूं नेदिती । दर्भपाणि झाला पां ह्मणती । जपतपादि सांडारिती । परी त्याची मती परतेना ॥ ७३ ॥ अथवा सद्विद्याकर्म शिकवितां । विपरीताचि आचरे तत्वतां । नानाप्रयत्नही करितां । उच्छृंखलता अधिकचि ॥ ७४ ॥ ऐसा पूर्वकर्माचेनि संस्कारें । सत्कर्मीचि बुद्धि प्रसरे । तेथ कोण कोणें प्रकारें । सांग पुरें उपदेशिले ॥ ७५ ॥ यालागीं सद्बुद्धीसि कारण । आपला आपणचि जाण । यद र्थी श्रीभगवंत आपण । सांगे स्वूण अर्जुनासी ॥ ७६ ॥

संमती श्लोक ॥ आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः । बंधुरात्मात्मनस्तस्य येनात्मैवात्मनाजितः ।

यालागीं गा रघुपती । मुख्य कारण गा ज्ञानाप्रति । अतिशुद्ध शिष्याची मती । स्वरूपस्थिति जेणें लाभे ॥ ७७ ॥ एवकारें ज्ञानाप्रति कारण । शिष्यप्रज्ञाचि सूचिली जाण । उपदेशक्रमु तो पाळण । विधिमात्र जाण रघुनाथा ॥ ७८ ॥ शिष्यासि नसतां शुद्ध प्रज्ञा । गुरुनें उपदेशिल्या ज्ञाना । तरी व्यर्थ शीणु गा ज्ञाना । न घडे सज्ञाना ज्ञाना- चीं ॥ ७९ ॥ शिष्याची शुद्ध मती असतां । साधन चतुष्टय अतितीव्रता । येथें गुरूनें

१ दुष्टबुद्धीची. २ दोन श्लोक. ३ पुढें पुढें. ४ सुचविली. ५ बुद्धि.

महावाक्य बोधितां । अपरोक्षता तात्काळ होये ॥ ७८० ॥ तेथें गुरुसि न लगती आयास । करणें नलगे योगाभ्यास । आत्मा स्वयंभ प्रकाश । विश्वाभास परमानंदें ॥ ८१ ॥

न शास्त्रैर्नापि गुरुणा दृश्यते परमेश्वरः । दृश्यते स्वात्मनैवात्मा स्वया सत्वस्थया धिया ॥ १० ॥

नानाशास्त्र अथवा गुरुनें जाण । नव्हे कदा आत्मदर्शन । देखिजे आपणा आपण । साह्य पूर्ण सात्विक बुद्धि ॥ ८२ ॥ नव्हतां शिष्याची शुद्ध मति । जऱ्ही नानाशास्त्रें अभ्यासिजेती । अथवा सद्गुरु स्वयें उपदेशिती । परी स्वरूपप्राप्ति कदा नव्हे ॥ ८३ ॥ तेथें वरकड साधनांचा पाड काये । जे स्वरूपप्राप्तीकारितां पाहे । कारितांही अनेक उपाये । ह्मता नये ब्रह्मज्ञान ॥ ८४ ॥ तेथें रघुनाथ ह्मणती श्रीगुरुमूर्ति । साधन अंतरंग शास्त्र व्युत्पत्ति । तेणेंही नव्हे ब्रह्मप्राप्ति । या बोलाची जीति बहु ॥ ८५ ॥ सद्गुरुदर्शनेंचि स्वरूपप्राप्ति । ते उपदेशितांही नव्हे हे विप्रतिपत्ति । हें ऐकोनि माझिया चित्तीं । संशयप्राप्ति जाली असे ॥ ८६ ॥ आत्मप्राप्तिचें मुख्य कारण । सद्गुरु आणि शास्त्रश्रवण । तेणेंही नव्हे संशय पूर्ण । उद्विग्न मन गुरुराया ॥ ८७ ॥ मुख्य साधनप्राप्ति असतां । स्वरूप कां नँ प्रकाशे गुरुनाथा । शिष्यप्रज्ञेची शुद्धता । कां अपेक्षितां मुख्यत्वें ॥ ८८ ॥ आत्मा काय अप्रकाशक असे । येही साधनीं न प्रकाशे । शिष्यप्रज्ञेचें कारण कायिसें । मज सावकासें सांगावें ॥ ८९ ॥ तंव वसिष्ठ ह्मणती परियेसीं । सांगेन विवंचना तुजपासीं । आयिक येकाग्र मानसीं । जेणें तुजपासीं संशय नुरे ॥ ७९० ॥ आत्मा स्वयें स्वप्रकाश । साधनें प्रकाशती काय त्यास । तो आपणा आपण स्वप्रकाश । परप्रकाश कदा नव्हे ॥ ९१ ॥ तूं ह्मणसी आत्मा स्वयेंचि प्रकाशे । तरी सर्वां जना कां न दिसे । कायसें अज्ञानाचें पिसें । विश्व भ्रंशे कोणा अर्था ॥ ९२ ॥ आत्मा स्वप्रकाश रघुनाथा । या बोला नाहीं गा अन्यथा । परी अज्ञान न तुटे गा सर्वथा । जाण तत्वतां गुरुवाक्येंविण ॥ ९३ ॥ तें गुरुवाक्यही आलें ह्मता । परी साह्य बुद्धि पाहिजे सत्वस्था । बुद्धिसि वाक्याची व्यंजकता । तेणें तत्वता अज्ञान तुटे ॥ ९४ ॥ उपशमात्मक जो सत्वगुण । तेणें अति शुद्ध बुद्धिज तीक्ष्ण । ते अंतर्मुख होतांचि समूळ अज्ञान । भस्मांत पूर्ण होऊनि जाये ॥ ९५ ॥ मंत्रौषधस्थानीं बुद्धिशास्त्र जाण । गुरुवाक्य अग्नीसि व्यंजकपण । अग्नि लागतांचि मंत्रपाषाण । करी कारण आपुलें ॥ ९६ ॥ मंत्रौषध नसतांचि तीक्ष्ण । काय करी गुरुवाक्य दीपन । तैसें दुसरें शास्त्रश्रवण । अकारण दोन्ही होती ॥ ९७ ॥ यालागीं सद्गुरु आणि शास्त्रश्रवण । हें आत्मप्राप्तीचें मुख्य कारण । परी शिष्यप्रज्ञा नव्हतां जाण । नव्हे ज्ञान यालागीं ॥ ९८ ॥ आणि प्रतिबंध जो होता अज्ञान । तें निरसलें न लगतां क्षण । उरे आत्मस्वरूप परिपूर्ण । स्वप्रकाशघन स्वप्रकाशें ॥ ९९ ॥ यालागीं शिष्यबुद्धीची

---

१ प्रत्यक्ष ज्ञान. २ ब्रह्मप्राप्ति. ३ शास्त्र ऐकणें. ४ उदासीन झालेलें. ५ स्पष्ट होत नाहीं. ६ प्रकाश नसलेला. ७ विचार. ८ शांतीनें भरलेला. ९ शिष्याची बुद्धि.

कारणता । मुख्य बोलिली गा रघुनाथा । आत्मा स्वप्रकाश तत्वता । दोन्ही कथा निरूपिल्या ॥ ८०० ॥ ह्मणौनि आत्मदर्शनीं शुद्ध मति । शिष्यासि पाहिजे गा रघुपति । तेचि ज्ञानाची उत्पाति । झाल्या कल्पांतीं नासेना ॥ १ या ज्ञानाचें सामर्थ्य ऐक । एकवार जालिया सम्यक । न नासे गा येकायेक । वाढे अधिक सतेजपणें ॥ २ ॥

सर्वा बहिःकला जंतोरनभ्यासेन नश्यति ॥ इयं ज्ञानकला त्वंतः सकृज्जाताभिवर्द्धते ॥ ११ ॥

प्राणियांच्या सर्व बहिःकला । त्या अनभ्यासें नासती सकळा । सकृत् जालिया ज्ञानकळा । वाढे सोज्वळा प्रकाशपणें ॥ ३ ॥ सकळ लोक अभ्यास करिती । चौदा विद्या चौसष्ट कळा शिकती । त्या अभ्यासेंविण नाशती । आइक रघुपति सांगेन ॥ ४ ॥ अगा सकळ विद्यांचें अधिष्ठान । सकळांची उत्पत्ति जेथून । सकळांचें मूळभूत कारण । सकळां प्रमाण हा वेदु ॥ ५ ॥ तो वेदु प्रयासेंकरुनी । अभ्यास करिती अनुदिनीं । तोही त्रिपक्ष अभ्यासेंवांचुनी । जाती विसरोनि क्षणमात्रें ॥ ६ ॥ तेथें इतर विद्या ज्या ज्या असती । ज्यांसि नानाप्रयास करिती । तें नाशे गा रघुपति । विस्मय चित्तीं काय होय ॥ ७ ॥ जेथ वेद विसरला ह्मणती । नाठवे शास्त्रांची व्युत्पति । स्तोत्रें शिकलों त्यांची मति । न स्फुरती अनाभ्यासे ॥ ८ ॥ नानाभाषा शिकती बोलती । त्या अनाभ्यासे विसरलो ह्मणती । एवं किती बोलावी व्युत्पत्ति । सर्वही नाशती अनभ्यासे ॥ ९ बहिःकळा ह्मणिजती ते काय । अंतःशब्दें बोलिजे तें काय । बाह्यनाशे अंतराची वृद्धि होय । कारण काय गुरुवर्या ॥ ८१० ॥ ऐसिया आक्षेपासि उत्तर । देता जाला वसिष्ठ अतिचतुर । आइक याचाही विचार । सविस्तर सांगेन ॥ ११ ॥ तरी बाह्य जितुकें बोलिजे । तें तें दृश्यप्रपंच ह्मणिजे । अंतःशब्दें ब्रह्म सहजें । हे खूण जाणिजे रघुराज ॥ १२ ॥ मनबुध्यादिकांसि जे ज्ञेयज्ञान । तें तें दृश्यप्रपंच जाण । ह्मणोनि बाह्य हें अभिधान । बोले प्रमाण उपनिषदें ॥ १३ ॥ इंद्रियें जो ग्राह्य पदार्थ । तो बहिःशब्दें हा फलितार्थ । इंद्रियां नेणवे अंतरर्थ । ऐसा समर्थ वेदु बोले ॥ १४ ॥ तेंचि अतिनिदर्शन । रघुनाथा तुज सांगेन । जें वेदु बोलिला आपण । तेंचि निर्वाण श्रुति वाक्य ॥ १५ ॥

॥ संमति श्रुति ॥ परांचि खानि व्यतृणत्स्वयंभूस्तस्मात्पराङ् पश्यति नांतरात्मा ॥

स्वयंभूशब्दें चतुरानन । तेणें बहिर्मुख केलिया इंद्रियें मन । ह्मणऊनि तीं बाह्य देखती जाण । अंतरखूण नेणती ॥ १६ ॥ ह्मणऊनि इंद्रिय प्रकाशतें दृश्यजात । याचें अंतर तें ब्रह्म सदोदित । तें सर्वांचें प्रकाशक साक्षिभूत । अंतर ह्मणिजे तयालागीं ॥ १७ ॥ जें सकळांचें प्रकाशक । जया नाहीं सामान्य विशेख । ह्मणऊनि अंतःशब्दें सम्यक् । बोलती देख परब्रह्म ॥ १८ ॥ त्यासि विषयीं करिजे ज्ञान । तें तंव अंतर सर्वांहून ।

---

१ अभ्यास नसल्यास. २ दररोज. ३ जाणतां येतें असें. ४ घेतां येण्याजोगा. ५ निष्पन्न झालेला अर्थ. ६ दृष्टीस पडणारे सर्व पदार्थ.

जया ब्रह्मेसि सांन्निध्यपण । तेचि खूण अंतराची ॥ १९ ॥ एकापरीस एक अंतर । ऐसा शास्त्रही करी निर्धार । अर्जुनासि सर्वेश्वर । यादववर बोलिला ॥ ८२० ॥

॥संमति श्लोक ॥ ॥ इंद्रियाणी पराण्याहुरिंद्रियेभ्यः परं मनः ॥ मनसस्तु परा बुद्धिर्यो बुद्धेः परतस्तु सः॥

बाह्य प्रपंचाहून जाण । देह तो आंतर[1] सर्वांहून । देहापरीस इंद्रियगण । याहूनि मन आंतर असे ॥ २१ ॥ मनाहूनि बुद्धि आंतर । बुद्धिहूनि ब्रह्म निर्विकार[2] । यालागीं सर्वांचेंही आंतर । ब्रह्म साचार न चुके ॥ २२ ॥ शुद्ध बुद्धीची जे वृत्ति । तियेसिचि ज्ञान बोलती । तें ज्ञान आंतर सर्वार्थी । जाण सीतापति रघुवर्या ॥ २३ ॥ यालागीं अंतरपणें श्रेष्ठ ज्ञान । बहिःकळा बाह्यत्वें हीन । अंतरासी सत्यत्वें बुद्धि जाण । बाह्य तें क्षीण असत्यत्वें ॥ २४ ॥ बाह्य असत्य सर्व कळा । अनाभ्यासें नासती सकळा । अंतरसत्यत्वें वाढे ज्ञानकळा । येक वेळ जालिया ॥ २५ ॥ ऐसें ज्ञान तें गुरुविण । सर्वथा नुपजे गा जाण । केलीयाही कोटी प्रयत्न । शास्त्रश्रवण जरी केलें ॥ २६ ॥ पूर्वश्लोकीं काय सूचिलें । जऱ्ही गुरु अथवा शास्त्र जालें । तऱ्ही शिष्यासि न वचे बोधिलें । कारण बोलिलें शिष्य-प्रज्ञ[3] ॥ २७ ॥ जऱ्ही परीस सगुण जाला । पूर्ण सामर्थ्ये आथिला । जरी पाषाणीं लाविला । तरी काय तयाला सुवर्ण करी ॥ २८ ॥ परिसाचें सामर्थ्य तों यथार्थु । परी पाहिजे तयासि अष्टधातु । तें लोह अथवा नीचांतु । तऱ्ही निश्चितु[4] सुवर्ण करी ॥ २९ ॥ तैसा गुरु आणि शास्त्रमहिमा । ते तंव न चुके गा रघुरामा । परी शिष्य शुद्ध बरी समा । पाहिजे राघा शुद्धमति[5] ॥ ८२० ॥ जऱ्ही गुरु अतिकुशल जाला । तऱ्ही बोधील मनुष्याला । परी पशु आणोनि ठेला[6] । न वचे बोधिला नानायुक्ति ॥ ३१ ॥ शास्त्रव्यु-त्पत्ति प्राज्ञासी । परी केल्या नव्हती मूर्खासी । यालागीं कारण शिष्यप्रज्ञेसी । ज्ञानाभ्यासीं बोलिलें ॥ ३२ ॥ परी असें ज्ञानें शुद्ध जाला । शास्त्राभ्यासही बरवा केला । तरी सद्गु-रुवांचूनि बोधिला । नाहीं देखिला तिहीं लोकीं ॥ ३३ ॥ अज्ञानें अपरोक्षीं ज्ञान जाला । तो अपरोक्षानुभव पाहिजे केला । ऐसा अपरोक्षानुभव गुरुवेगळा । नाहीं देखिला रघुनाथा ॥ ३४ ॥ गुरुवेगळें जरी होय ज्ञान । शिष्यप्रज्ञाचि कारण । तरी सद्गुरु सेवावा हें वचन । वेद प्रमाण काय बोले ॥ ३५ ॥ आणि मागें शास्त्रमहिमान बोलिलें । तें सकळ गुरुसंगेंचि पावले । परी गुरुविण ज्ञान जालें । ऐसें न बोले कोणीही ॥ ३६ ॥ यदर्थीं[7] वचनें बोलावीं किती । स्वयें श्रुतिही असें बोलती । तेंचि आइकें एकाग्रमति । तुजप्रति कांहीं सांगों ॥ ३७ ॥

॥ संमति श्रुति ॥ ॥ तद्विज्ञानार्थं स गुरुमेवाभिगच्छेत्समित्पाणिः श्रोत्रियं ब्रह्मनिष्ठम् ॥

आचार्यवान्पुरुषो वेद ॥ नैषा तर्केण मतिरापनेया प्रोक्तान्येनैव सुज्ञानाय प्रेष्ठ ॥

संमतिगुरुगीता ॥ यस्य देवे परा भक्तिर्यथा देवे तथा गुरौ ॥ तस्यैते कथिता ह्यर्थाः प्रकाशन्ते महात्मनः ॥

---

१ आंतले. २ विकार नसलेल. ३ शिष्याची बुद्धि. ४ निःशंकपणें. ५ बुद्धि चांगली असलेला. ६ रेडा. ७ याच अर्थाची.

ऐसेंचि श्रीकृष्णनाथु । अर्जुनासि गीता सांगतु । चतुर्थाध्यायीं हे मातु । ह्मणे शरणागतु गुरूसि होई ॥ ३८ ॥

संमतिश्लोक । तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया । उपदेक्ष्यंति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः ॥

ऐसेंचि कृष्ण ब्रह्ममूर्ति । एकादशीं बोले उद्धवाप्रति । सद्गुरु तो माझीच मूर्ति । अनन्यगति भजावें ॥ ३९ ॥

संमतिश्लोक ॥ आचार्यं मां विजानीयान्नावमन्येत कर्हिचित् ॥ न मर्त्यबुद्ध्या सूयेत सर्वदेवमयो गुरुः ॥ तस्माद्गुरुं प्रपद्येत जिज्ञासुः श्रेय उत्तमम् । शाब्दे परे च निष्णातं ब्रह्मण्युपशमाश्रयम् । एतत्सर्वं गुरोर्भक्त्या पुरुषोह्यंजसा जयेत् । यस्य साक्षाद्भगवति ज्ञानदीपप्रदे गुरौ । मर्त्यासद्धीः श्रुतं तस्य सर्वं कुंजरशौचवत् ॥

ऐसें अनेका शास्त्रीं निरूपण । अपरोक्ष ज्ञानासि गुरूचि कारण । गुरूवेगळें सर्वही अनुमान । न पवे खूण अनुभवाची ॥ ८४० ॥ जऱ्ही सर्व शास्त्र मुखोद्गत जालें । तेणें परोक्ष ज्ञानही हाता आलें । परी स्वरूप न प्रकाशे कांहीं केलें । सद्गुरुबोलें वांचुनी ॥ ४१ ॥

संमतिश्लोक । नैषां मतिस्तावदुरुक्रमांघ्रिं स्पृशत्यनर्थापगमो यदर्थः ।
महीयसां पादरजोभिषेकं निष्किंचनानां न वृणीत यावत् ॥

जऱ्ही जालें शास्त्रश्रवण । प्रज्ञा जाली तीव्र दारुण । तऱ्ही न कळे स्वरूपस्पर्शन । कल्पांतीं जाण रघुनाथा ॥ ४२ ॥ अगा सद्गुरूची चरणधुळि । तिणें न करी जंव आंघोळि । तंव बुद्धि स्वरूपाजवळि । कोण्हे काळीं न जाय रामा ॥ ४३ ॥ यालागीं सद्गुरूवांचून । अपरोक्षानुभव नव्हे जाण । न तुटे मिथ्या भ्रम अज्ञान । नव्हतां शरण अनन्य भावें ॥ ४४ ॥

स्वकंठेपि स्थितं वस्तु यथा न प्राप्यते भ्रमात् । भ्रमांते तद्वदात्मापि गुरुवाक्यतः ॥ १२ ॥

जऱ्ही आपणचि आत्मा स्वयंप्रकाश । गुप्त नव्हे उघड उदास । ज्याचेनि भासे सर्व भास । इंद्रियें सावकाश वर्त्तती ॥ ४५ ॥ सकळ इंद्रियांचें वर्त्तन । नव्हे आत्मसत्तेविण । सर्वद्रा सर्वांचें करी भान । जो परिपूर्ण सर्वात्मकु ॥ ४६ ॥ तो आत्मा स्वयें आपण । सर्वसाक्षी अपरोक्ष जाण । त्यातेंचि नेणिजे हें विचित्रपण । नेणतां खूण सद्गुरुची ॥ ४७ ॥ यालागीं सद्गुरुवाक्यावांचुनी । अपरोक्षता नव्हे भरंवसेनी । जैसे दहा पुरुष असतां एकपणीं । आपणा न मनी भ्रमपणें ॥ ४८ ॥ दहा समागमीं ग्रामांतरा । एकत्र चालले गा रघुवीरा । मार्गीं मोजिती तंव नव लेखांचारा । दहावा खरा चुकलासे ॥ ४९ ॥ तो नवांजणातेंचि गणी । आपण दहावा भ्रमें न गणी । चुकुर होय तये क्षणीं । न देखे नयनीं दहावा पुरुषु ॥ ८५० ॥ मग तो प्राणांत करी व्यथा । परी आपणा न गणी सर्वथा । तंव कोणीएक आला अवचिता । सांगती व्यथा तयाप्रति ॥ ५१ ॥ तो मागुता गणवी तयांसी । तंव तो नवांसिचि मोजी परियेसी । येरु हातीं धरूनि दावी त्यासी । दशम 'त्वमसि' ह्मणोनियां ॥ ५२ ॥ तेव्हां तो भ्रमातें विसरला । आपण

---

१ तोंडपाठ. २ आत्मस्वरूप हातीं देणें. ३ पायधूळ. ४ परगांवीं. ५ गणतीत. ६ आश्चर्यचकित ७ [illegible] आहेस.

आपणा प्राप्त जाला । ह्मणे तं उपकारी गा भला । मजचि मजला भेटविलें ॥ ५३ ॥ तेणें तुझिया उपकारा उत्तीर्ण । आतां मी कैसा होईन । अनादिभ्रम दूर करून । आपणा आपण भेटविलें ॥ ५४ ॥ मी असतां आपण । कोण भ्रम जाला पर्णे । विसरलों माझें मीपण । शोक दारुण करित होतों ॥ ५५ ॥ त्या शोकाचें कारण । भ्रमरूप जें अज्ञान । तें तुवां निरसिलें न लागतां क्षण । हातीं धरून मज दिधलें ॥ ५६ ॥ तैसा आत्माचि असतां आपण । अपरोक्ष सिद्ध जाण । परी प्राप्त नव्हे सद्गुरूविण । जाण ती खूण तोचि दावी ॥ ५७ ॥ जैसें आपुले स्वकंठींचें चामीकर । अथवा मणि वस्तु सुंदर हार । असतांचि भ्रम थोर । विस्मरण फार जैसें होये ॥ ५८ ॥ असोनि त्यालागीं चुकुर होती । इतस्ततः भ्रमें पाहती । येकें दाखविल्या भ्रमांतीं । वस्तु पावती स्वकंठींची ॥ ५९ ॥ तैसा हा जंव भ्रम आहे । तंव स्वस्वरूप प्राप्त नोहे । सद्गुरुवचनें भ्रम जाये । तरी सिद्धचि होये आपआपणा ॥ ८६० ॥ हें निरूपण केलें तुजप्रति । गुरूविण नाहीं स्वस्वरूपप्राप्ति । गुरुभजनें ज्या वस्तु प्राप्य अंतीं । धन्य त्रिजगतीं ते पुरुष ॥ ६१ ॥ आतां नरदेह पावलियावरी । जे स्वस्वरूप नेणती ये शरीरीं । ते व्यर्थ जन्मले संसारीं । आइक राघवा सांगेन ॥ ६२ ॥ त्याचें श्लोकद्वयें निरूपण । आइक रघुनाथा सांगेन । वोजे लावया अज्ञानजन । त्यांचें निंदन करिजेत ॥ ६३ ॥

स्वस्वरूपमजनन्वै जनोऽयं दैववर्जितः । विषयेपि सुखं वेत्ति पश्चात्पाके विषान्नवत् ॥ १३ ॥

स्वस्वरूप नेणता जो जन । ज्या कारणास्तव तो दैवहीन । विषयींच सुख जाणे संपूर्ण । जैसें विषान्न परिपाकें ॥ ६४ ॥ जो दैवें सांडिला नरु । हीनभाग्य करंटा निष्ठुरु । त्यासीच स्वस्वरूपीं विसरु । विषयीं भरु सुखालागीं ॥ ६५ ॥ परी विषय तें अतिदुःख । हें कांहीं कळीया नेणती मूर्ख । पांघुरविलें अल्प सुख । तेणें आळुक विषयीं सदा ॥ ६६ ॥ विषयीं सुख आहे ह्मणती । ते अतिमूर्ख गा रघुपति । जे दुग्धाची चवी नेणती । तृणें धाती पशु जैसे ॥ ६७ ॥ विषयांच्या ठायीं दुःख आहे । हें सांगितल्याही ठावें नोहे । जैसी विषें रांधिली रसोये । भुकेला खाये नेणोनी ॥ ६८ ॥ मग विष आपण करी । जेवणारातें जिवें मारी । तैसा विषय सेवी तो दुःखसागरीं । भ्रमाच्या पुरीं बुडोनि जाये ॥ ६९ ॥ मग नुमजे तेथूनि कोणेपरी । तळवट वे स्थावरांतरीं । नानायोनि भोगी भारी । अज्ञानपुरीं पडलिया ॥ ८७० ॥

बुद्ध्वाण्यत्यंतवैरस्यं यः पदार्थेषु दुर्मतिः । बध्नाति वासनां भूयो नरो नासौ स गर्दभः ॥ १४ ॥

अगा हे विषय अतिविरस । सेवितां वासना वाढे असोस । इंद्रियें क्षीण तरी वाढविती सोस । सावकाश तृप्ति नव्हे ॥ ७१ ॥ विषय सेवितां वाटे सुख । क्षणेंचि अतिशय होय

---

१ उतराई. २ फार वेळपर्यंत असलेली भ्रांति. ३ सोनें, सोन्याचा दागिना. ४ इकडे तिकडे. ५ मार्गास. ६ निंदा. ७ न जाणणारा. ८ प्रेम. ९ गवतानें. १० अन्न. ११ दडपण.

दुःख । परिणामीं तरी अतिविख । होय मारक अतिशय ॥ ७२ ॥ ऐसें जाणोनि अत्यंत वैरस्यता । दुःख पावे विषय सेवितां । मागुती वासना धांवे इंद्रियार्थी । कदा कल्पांता परतेना ॥ ७३ ॥ तो अतिदुष्ट दुर्मति । पापाचारी निंद्य अति । तो नररूपें गर्दभमूर्ति । सांगों किती रघुनाथा ॥ ७४ ॥ गर्दभ धांवे गर्दभीपाठीं । ते लागों नेदी पायें लोटी । तरी न सोडी तियेची पाठी । वासना लाठी मागुती करी ॥ ७५ ॥ दुःख अनुभवितसे शरीरीं । परी वासना तेथूनि दुरी न करी । पापी निर्लज्ज दुराचारी । अविचारी तैसा नर ॥ ७६ ॥ यालागीं गा रघुनाथा । सकळ दुःख वासनेच्या माथां । ह्मणोनि वासनालेश तत्वतां । उपजों चित्ता नेदावा ॥ ७७ ॥ भलतियेचि पदार्थी । उपजली वासना घाली अनर्थी । तें समूळ ऐकें गा रघुपति । सविस्तर तुजप्रति सांगेन ॥ ७८ ॥

यत्किंचिदपि संकल्पान्नरो दुःखे निमज्जति । न किंचिदपि संकल्पात् सुखमक्षय्यमश्नुते ॥ १५ ॥

तरी ऐकें गा रघुनाथा । दुःखसागरु वासनेच्या माथां । ते वासनेची जेथूनि प्रौढता । ऐकें तत्वतां सांगेन ॥ ७९ ॥ मुख्य अज्ञान तें द्विप्रकार । आवरण आणि विक्षेपाकार । सांगेन याचाही विचार । आवरणप्रकार तो ऐसा ॥ ८८० ॥ अज्ञानाचें जें आश्रयभूत । तें शुद्धब्रह्मचि गा निश्चित । ज्याचेनि तेथें प्रकाशत । तें तदाश्रितचि बोलावें ॥ ८१ ॥ तें आपल्या आश्रयातें आंवरी । नेण करीक्षणाभीतरी । हें अज्ञानरूप निर्धारीं । करी पूर्ण विस्मरणदशा ॥ ८२ ॥ आपुलें आपणासि नेणें । केलें पैं अज्ञानें येणें । जळोद्भव बाबुलीचें होणें । आच्छादी पूर्ण निजाश्रयो ॥ ८३ ॥ हें आवरणात्मक अज्ञान । तेंचि आक्षेप करी निवाण । विस्मरण काय येक भान । न करी जाण रघुवर्या ॥ ८४ ॥ मुख्य आपुलें नेणणें तोचि अज्ञानार्थु । तेणें काय येक न घडे अनर्थु । विपरीत ज्ञान भ्रमार्थु । स्वयें व्यर्थु उपजलें ॥ ८५ ॥ प्रथम अहं हा पूर्ण संकल्प । तोचि देहाकारें वाढला अमूप । जेणें वाढे वासनापादप । पापारूप दुःखमूळ ॥ ८६ ॥ मुख्य वासनेची वाढी । संकल्पापासाव होय तेवढी । वासनादार्ढ्यें अनर्थ कोडी । दुःखपरवडी उत्तरोत्तर ॥ ८७ ॥ हा संकल्प किंचित् कदाचितही । जरी उद्भवला लिंगदेहीं । तो प्रौढ वासनारूप होय पाहीं । बुडबुडे डोहीं दुःखाचे ॥ ८८ ॥ दुःखसागरीं बुडावयाचें कारण । अणुमात्रचि संकल्प जाण । प्राणी मरणाउपरी मरण । पावे निर्वाण कल्पकोटि ॥ ८९ ॥ आतां न पावावया दुःखमरण । उपायाचें सांगेन कारण । आधिक देवा चित्त देऊन । अतिनिर्वाण उपाय हा ॥ ८९० ॥ तरी स्वस्वरूपाचेनि विस्मरणें । जो संकल्प उठी देहपणें । तो उगीं नेदावा सावधपणें । वासना जेणें प्रौढ नव्हे ॥ ९१ ॥ अतिवैराग्यें मुमुक्षुता । दृढ

---

१ मनुष्याच्या रूपानें. २ प्रत्यक्ष गाढव. ३ दोन प्रकारचें. ४ झांकणारें. ५ भलतेंच भासविणारें. ६ शेवाळीचें. ७ इच्छारूपी झाड ८ वासनेच्या मोठेपणामुळें. ९ देऊं नये.

बाणली ज्याचे चित्ता । तेणें आणि का न करावें उपायार्था । गमन तीर्थी न करावें ॥ ९२ ॥ नानासाधनें धर्माचरण । तीर्थ यज्ञ तपादिदान । हें सकळ दुःखासीच कारण । सुखा कारणें येकही नव्हे ॥ ९३ ॥ तेण सर्वदा सावध होउनि । संकल्प उठों नेदावा कोणी । तेणें सुख भरे त्रिभुवनीं । दुःख स्वप्नीं न देखे ॥ ९४ ॥ सुखरूप तोचि आपण । दुःखस्वरूप तें विपरीत भान । संकल्पक्षयीं फावे आपण । सुखसंपन्न तेणेंकरुनी ॥ ९५ ॥ यालागीं अक्षय्यसुख जें नित्यानंद । परमानंदक अगाध । तें तो पावे निर्बाध । निर्विवाद परमानंदें ॥ ९६ ॥ जें धर्मादितीथ करणें । तेणें अधिकचि वासनेतें वाढविणें । वासनावृद्धीनें दुःखाच जण । फार करणें आपणाचि ॥ ९७ ॥ साधनें साधावीं सुखाकारणें । आणि दुःखचि जरी वाढे तेणें । तरी आपुल्या पायीं लेववणें । निगड करणें दुःखरूप ॥ ९८ ॥ जो अत्यंत असेल जडमूढ । त्यासिच साधनें अति गोड । परी विचार न करिती दृढ । साधनें प्रौढ कां प्रवर्तलीं ॥ ९९ ॥ लौकिक परमार्थाचीं साधनें । तींही नित्य सुखदुःखासि कारणें । आणि विपरीताथ पाविजे तेणें । तरी कां करणें सायास ते ॥ १०० ॥ययालागीं गा रघुपति । संकल्पक्षयींच सुखप्राप्ति । म्हणोनि अणुमात्रही संकल्पाप्रति । चित्तवृत्ति वाढों नेदीं ॥ १ ॥ ऐसेनि संकल्पीं उठिला वासनांकुर । तरी निवर्तवावा धरोनि धीर । जो वार्तिककर्त्ता उदार । निवर्त्तनीं सुखसागर संमति परियेसा ॥ २ ॥ जो कीं भाग्यवंत सुरेश्वर । जो वार्तिककर्त्ता सादर । तेणें केला जो निर्धार । श्रुत्यनुसार परियेसा ॥ ३ ॥

॥ संमतिवार्तिक ॥ यतो यतो निवर्तेत विमुच्येत ततस्ततः । निवर्त्तनाद्धि सर्वत्र नवेत्ति दुःखमण्वपि ॥

वासना निवर्त्तविजे ज्याज्यापासुनि । मुक्त होइजे ते ते स्थानीं । जितुकी वासना काढिजे विषयांहुनी । सुख निर्वाणीं तितुकेंचि होये ॥ ४ ॥ जों जों पदार्थांहुनि मन काढिजे । तों तों सुखाची प्राप्ति पाविजे । जों जों वासना वाढविजे । दुःख लाहिजे तितुकेंचि ॥ ५ ॥ जरी सर्वत्र निवृत्ति जाली । तरी सुखाची संपत्ति हाता आली । अणुमात्रही दुःखवोली । कदाकाळीं नाइके तो ॥ ६ ॥ यालागीं सर्वदा तेंचि करावें । संकल्पातें उपजों नेदावें । वासनारूप जालियाही त्यजावें । विषय बरवे जऱ्ही जाले ॥ ७ ॥ ऐसेनि विषयीं वासना जरी धरिती । तेणें दुःखा वेंरेपडे होती । शेवटीं विषयसुखाची प्राप्ति । व्यर्थ भ्रांति स्वप्न जैसें ॥ ८ ॥

यथा स्वप्ने मुहूर्तः स्यात् संवत्सरशतभ्रमः । तथा मायाविलासोऽयं जायते जाग्रतिभ्रमः ॥ १६ ॥

स्वप्नींचें राज्यादि सकळ । मुहूर्त येक भोग अमंगळ । परी भोगितां सरे तत्काळ । लगतां वेळ रघुनाथा ॥ ९ ॥ तो भोग भ्रमेंकरुनी । शतसंवत्सर दीर्घ मानी । लटिका

---

१ वासना नष्ट झाल्यावर. २ दागिन्याप्रमाणें घालणें. ३ बेडी. ४ सुरेश्वराचार्य, (मंडन मिश्र) ५ ताबेदार. ६ शंभर वर्षें.

चि परी हर्ष हानी । दावी दोन्ही अतिभ्रमें ॥ ९१० ॥ राज्यप्राप्तीनें अति आनंदु । तें गेलिया वाटे अतिखेदु । पुत्रादि[1] मरणविषादु । अल्पाचि विषादु बहु मानी ॥ ११ ॥ तेंचि स्वप्न सरोनि जाये । भ्रमे मानी बहुकाळ आहे । अल्पाचि परी शतवर्षे पाहे । अक्षयी होये तयालागीं ॥ १२ ॥ त्या येकाचि क्षणामाझारी । अपत्य उपजविलें जें करी । तें मेलिया शोक भारी । बुडे पुरीं मोहाच्या ॥ १३ ॥ पूर्वी स्वप्नीं सामान्य[2] होता । मग अपूर्व राज्य आलें हाता । तें गेलिया मागुती रिता । करी चिंता अतिदुःखें ॥ १४ ॥ ऐसे हर्षविषादें[3] स्वप्नीं । प्रत्यक्ष भोगी आपुल्या मनीं । विचारितां क्षणाची करणी । बहु हर्ष मानी अतिभ्रमें ॥ १५ ॥ तैसे जागृतीच्या ठायीं । सकळ मायामय विलास पाहीं । त्याचि विलासास्तव पाहीं । भ्रमडोहीं बुडे रामा ॥ १६ ॥ हाही क्षण येकाचा भोगु । परी कल्पायेवढा मानी चांगु । नव्हे सावधु न धरी उबगु । अति निःसंगु भ्रमेंकरुनी ॥ १७ ॥ आतां प्रपंचीं असोनियांही मुक्त । जो शुभाशुभासि अलिप्त । त्याची वसिष्ठ स्तुति करित । श्लोकद्वयांत परियेसा ॥ १८ ॥

श्लोक:—अंतःशीतलया बुद्ध्या रागद्वेषविमुक्तया ॥ साक्षिवत्पश्यतीदं हि जीवितं तस्य शोभते ॥ १७ ॥

जो रागद्वेषविहीन । तेंहीं अंतरशीलबुद्धीकरून । जो साक्षित्वें करी विश्वभान । जीवित धन्य त्याचें राया ॥ १९ ॥ आतां ऐक गा रघुपति । जो प्रपंचीं अलिप्तगति । त्याची कळा सांगेन वर्त्तती । येकाग्रचित्तीं परियेसीं ॥ ९२० ॥ ज्याची अंतरीं शीतळबुद्धि । जो रागद्वेषीं न जळे त्रिशुद्धि । तोचि शीतल निरवधि । ऐक सुबुद्धी रघुवर्या ॥ २१[4] ॥ बुद्धीचें जें जळजळपण । ते रागद्वेष दोन्ही जाण । विषयीं प्रीति तो राग पूर्ण द्वेषाची खूण परियेसीं ॥ २२ ॥ प्रीतिचा जो विषय असे । त्यासि घातक जो प्रतिकूल असे । तेथें बुद्धि जे कुसमुसे[6] । द्वेष ऐसें या नाम ॥ २३ ॥ या दोहीं करूनि विमुक्तता । तेचि बुद्धीची शीतळता । अंतःशब्दें सूक्ष्मता । अति शुद्धता बोलली ॥ २४ ॥ ऐसीये बुद्धीकरून । स्वयें साक्षी होये जो आपण । साक्षित्वेंचि सर्व करी वर्त्तन । अलिप्तपणें सर्वांतरीं ॥ २५ ॥ जैसा दीप साक्षि भूतु । गृहव्यापारीं अनासक्तु[7] । तो सकळां प्रकाशूनि वर्त्ततु । प्रकाशवंतु सूर्य जैसा ॥ २६ ॥ ऐसा वर्त्ततांही जगा आंत । साक्षित्वें देखे जग समस्त । तयाचें जीवित शोभत । धन्य निश्चित तो जगीं ॥ २७ ॥ तयाचें धन्य जालेपण । तोचि सर्वज्ञाचा सर्वज्ञ । जो वर्त्ततसे साक्षी होऊन । धन्य धन्य तोचि येकु ॥ २८ ॥

येन सम्यक्परिज्ञातं हेयोपादेयमुज्झता । चित्तस्यांतः स्थितं चित्तं जीवितं तस्य शोभते ॥ १८ ॥

अगा जेणें पुरुषें रघुनाथा । हेयोपादेय[8] जाणोनि तत्वतां । त्यागु करिजे न विचारितां । आइकें कथा सांगेन ॥ २९ ॥ हेयशब्दें त्याज्य अर्थु । प्रतिकूळ विषय बोलिजेतु । उपा-

---

१ मेल्याचें दुःख. २ हलका मनुष्य. ३ आनंद व दुःख. ४ प्रीति अथवा द्वेष हीं नसलेला. ५ [illegible]. ६ कुरकुरते. ७ कांहीं न करणारा. ८ त्याज्य व ग्राह्य.

देय जो घेइजेतु । जो प्रियप्रियार्थु सानुकूळ ॥ १३० ॥ घेणें आणि टाकणें दोन्ही । निःशेष गेलीं जयापासुनी । चित्त चित्तीं स्थिरावोनी । राहे निर्वाणीं निजरूपें ॥ ३१ ॥ चित्तांत घालिजे चित्त । याचा कैसा निश्चतार्थ । तरीच होणें संकल्पातीत । राहे निश्चित स्वयें रूप ॥३२॥ चित्ताचें गेलिया चित्तपण । चित्त चित्तीं अचित्त होणें । सर्व संकल्पविहीन । राहे परिपूर्ण पूर्णत्वें ॥ ३३ ॥ चित्त राहिल्या चित्तीं पूर्ण । नुपजे संकल्प देहस्फुरण । देहस्फुर्तीविण प्रपंच भान । नव्हे खूण जाण रामा ॥ ३४ ॥ देहो हा संकल्प नुठी । ह्मणजे चित्तीं चित्ता पडली मिठी । तेणें आनंदु न मोडे सृष्टीं । धन्य जगजेठी तो येक ॥ ३५ ॥ अथवा चित्ताचा अंत जेथें होत । चित्त निःशेष समाप्ति पावत । आत्मस्वरूपीं जें स्थिर चित्त । धन्य जीवित तयाचें ॥ ३६ ॥ तयाचें जिणें शोभिवंत । तोचि धन्य तिहीं लोकांत । ज्याचें समरसे चित्तीं चित्त । सुखें उन्नत सर्वदा ॥ ३७ ॥ सर्व यज्ञादिसाधनांचें फळ । तोचि पावला गा सकळ । देहीं असोनि देहावेगळ । सुखकल्लोळ सुखरूपें ॥ ३८ ॥ येरु जो संकल्पें गांजिला । देहबुद्धीचा अंकिला । तो वासनाजाळीं सांपडला । दुःखकल्लोळां बुडोनि जाये ॥ ३९ ॥ देहबुद्धीनें जें जें करी । तें तें दुःखासि भरोवरी । विश्रांति नाहीं ज्याच्या अंतरीं । बाह्यात्कारीं काय होय ॥ १४० ॥ अंतरीं असे ज्वरें पिडिला । बाह्य चंदन शीतळ चर्चिला । तो निवेल काय उपचारिला । जही सिंचिला शीतळनीरें ॥ ४१ ॥ किंवा येकु सुळीं द्यावया नेतां । कोटि तळमळ त्याचिया चित्ता । त्यासि नानाभोग उपचार करितां । शेंदुरें माथा शोभविती ॥ ४२ ॥ सर्वांगा लाविती चंदन । नानापुष्पें शृंगारभरण । वाद्यध्वनी गर्जे गगन । देती भक्षण अपूर्व वस्तु ॥ ४३ ॥ इतुका करोनि सोहळा सकळ । परी अणुमात्र क्षीण नव्हे जळजळ तरी त्या समारंभा कोण फळ । नाहीं निश्चळ मन ज्याचें ॥ ४४ ॥ तैसे नाना यागादि करिती । लौकिकीं दीक्षितपणाची कीर्ति । समारंभें अवभृथा जाती । असो व्यक्ति किती करावी ॥ ४५ ॥ तेणें कोण सुख उपजेल । काये मन हें निश्चळ होईल । देखोनियां सुख केवळ । काये नवल तेथें जालें ॥ ४६ ॥ काये चित्ता जालें समाधान । कीं चुकलें तयाचें आयागमन । हें नव्हतां जें करी जाण । तो विटंब पूर्ण गा रघुनाथा ॥ ४७ ॥ अंतरीं अतिदुःखें असे भरला । बाह्य थोर समारंभ केला । कडू दुधिया गुळें माखिला । अंतरीं जाला गोड काये ॥ ४८ ॥ कांतहीनेसि सौभाग्यउपचार । कालिया वाढे दुःखाचि फार । अंतरीं जळजळ अपार । काय करील उपचारा ॥ ४९ ॥ यालागीं राहे ज्याचें चित्तीं चित्त । त्याचेंच जिणें शोभिवंत । येरु शवरूपें जंत । वासनायुक्त चित्त ज्याचें ॥१५०॥ अगा वासनाक्षयाचें सुख । तिहीं लोकीं नाहीं देख । ऐसें भारतीं सम्यक । बोले आयिक व्यासमुनि ॥ ५१ ॥

१ परब्रह्माचे ठायीं. २ कल्पनांच्या पलीकडील. ३ ताबेदार झाला. ४ दुःखांच्या लाटांत. ५ अलंकार घालणें. ६ यज्ञकर्तेपणाची. ७ अवभृथ स्नानाला. ८ विधवेला.

संमति श्लोक ॥ यच्च कामसुखं लोके यच्च दिव्यं महत्सुखम् । तृष्णाक्षयसुखस्यैते नार्हतः षोडशीं कलाम् ।

अगा इहलोकींचें जें कामसुख । परी तें सामान्य नव्हे देख । राजा चक्रवर्ती जो एक । नाहीं आणिक स्पर्धी जया ॥ ५२ ॥ इतरांसि भयदारुण । आणि कामसुखही अपूर्ण । शरीर रोगी भार्येसि कुरूपपण । स्वेच्छावर्त्तन जयासि नाहीं ॥ ५३ ॥ यालागीं बोलिला चक्रवर्ती । त्यासि स्पर्धा नाहीं पृथ्वीप्रति । सकल काम पूर्ण असती । चित्तानुवर्त्ती पुत्र भार्या ॥ ५४ ॥ सकळही राज्य स्वाधीन । शरीरासि आरोग्यता दृढपण । स्त्रीही सुंदर परिपूर्ण । कांहीं अपूर्ण असेचिना ॥ ५५ ॥ त्याचें जें कीं कामसुख । कां स्वर्गीं जें कां इंद्रादिक । त्यासि उपमा नाहीं आणिक । शतमखीं सम्यक लभ्य जें कां ॥ ५६ ॥ इयें दोन्हीं सुखें ऐसीं असती । आणि तृष्णा वासना येकी बोलिजेती । त्याचेनि क्षये जे सुखप्राप्ति । खद्योत होती दोन्ही सर्वे ॥ ५७ ॥ तृष्णाक्षयाची सोळावी कळा । ये दोन्ही न पावती गा केवळा । तृष्णाक्षयसुखाचा सोहळा । क्षयमूळा अविनाशु सर्वांशें ॥ ५८ ॥ यालागीं संकल्पक्षयीं जे सुखप्राप्ति । तें सुख नाहीं गा त्रिजगतीं । इंद्रादिपदांची कोणी गति । जळमळ चित्तीं सर्वदा ॥ ५९ ॥ जे साक्षी होऊनि वर्त्ते देहीं । त्या देहादि गेलिया नाठवे कांहीं । जया आत्मबुद्धि वर्त्ते देहीं । देहनाशें त्याही आत्मनाशु ॥ ९६० ॥ आत्मा अविनाशी नित्य शुद्ध । देह तंव विनाशी प्रतिषिद्ध । देहनाशें आत्मया बाध । अनिर्बंद्‌ मानिती ॥ ६१ ॥ हेंचि निरूपावया स्पष्टपणें । श्लोकां पांचांचें निरूपणें । आत्मा अनात्मा वेगळेपणें । जाणिजे मनें तैसें कीजेल ॥ ६२ ॥ यांचा वक्ता श्रीवासिष्ठमुनि । श्रोता स्वयें कोदंडपाणि । तया निरूपणाची श्रेणि । चित्त देऊनि परियेसा ॥ ६३ ॥

हृदयाकाशमात्रस्य विनाशो देहनाशतः । व्यर्थं भूतानि शोचंति नष्ट आत्मेति शंकया ॥ ३९ ॥

अगा देहाचेनि नाशें । हृदयकाश नाशलें दिसे । तैसीच भूतें शोचिती देहनाशें । आत्मा नाशे ह्मणोनी ॥ ६४ ॥ तरी श्रीरघुनाथा आइक । आकाश असे सर्व व्यापक । त्यासि घटाकाश मठाकाश येक । भिन्न सम्यक महाकाश ॥ ६५ ॥ तैसेंचि सकल देहीं भिन्न । आकाश मानिती आन आन । घटभंगें आकाश भिन्न । परिछिन्न नासलें ॥ ६६ ॥ तैसेंचि देहनाशें व्योमनाश । ऐसें मानिती सावकाश । जेणें जो व्यापक आकाश । अविनाश अपरिच्छिन्न ॥ ६७ ॥ तेथ देहाचेनि विनाशें । हृदयाकाश नासलें दिसे । तोही भ्रमु अज्ञानांशें । येऱ्हवी जैसें तैसेंची ॥ ६८ ॥ देह नाशला पाहीं । आकाश तेथूनि गेलें नाहीं । गमनागमन दोन्हीही । कल्पी तया हीं अज्ञानत्वें ॥ ६९ ॥ तैसेंचि देहाचेनि नाशें । मानिती आत्मा नासला ऐसें । परी तो अविनाशु सर्वांशें । नाश पिसें मानिती ॥ ९७० ॥ जया नाहीं मुळीं दृष्टि । त्यासि परस्परें भेददृष्टि । तेथ आत्मा परिच्छिन्न हे गोष्टी । भ्रमदृष्टि घडेचि कीं ॥ ७१ ॥ आत्मयाचें व्यापकपण । नाहीं जयासि पैं

१ इच्छेप्रमाणें वागणें. २ हे प्रियकरा. ३ निषेध केलेला. ४ अनुक्रम. ५ मठामधील पोकळी.

दर्शन । त्यासि देहचि आत्मा पूर्ण ज्ञान । मरणें मरण देहाचेनि ॥ ७२ ॥ देहनाश आत्मा नाशे । ऐसे दृढ मानिती लोक पिसे । शोक करिती असोसे । व्यर्थचि ऐसे भ्रमजगीं ॥ ७३ ॥ सर्वत्र आत्मा असे येक । वस्तुमात्रीं जो व्यापक । परी पदार्थनाशें सम्यक । येकायेक अविनाशु तो ॥ ७४ ॥ पदार्थी आइकें निदर्शन । विबुधवर्या तुज सांगेन । जेणें दृष्टांतें बुझेसी पूर्ण । संशय क्षीण जेणें होये ॥ ७५ ॥

घटादिषु प्रणष्टेषु यथाकाशमखंडितम् । तथा देहेषु नष्टेषु देही नित्यमलेपकः ॥ २० ॥

तरी आयिकें दशरथनंदना । दशग्रीवविध्वंसना । तरी घट पट पदार्थ नाना । विश्वरचना विचित्र असे ॥ ७६ ॥ त्या त्या पदार्थाआंत । आकाश सर्वत्र वर्त्तत । अंतर्बाह्य अनुस्यूत । असे सतत सर्वदा ॥ ७७ ॥ ते नसल्या घट पट पदार्थ । आकाश न नासे गा अखंडितार्थ । खंडलें मोडलें हा अर्थ । नाहीं यथार्थ लिंपेना ॥ ७८ ॥ पदार्थ जळाल्या तें न जळे । आतपें तापल्या न पोळे । उदकीं बुडाल्या न विरे जळें । नव्हे मैळें मळादिकीं ॥ ७९ ॥ पदार्थजन्में न पावे उत्पत्ति । पदार्थनाशें न पावे शांति । धूलिधूसरादिवृत्ती । मेळस्थिति पावेना ॥ ८० ॥ तैसें देहादिप्रपंचजात । व्यापूनि आत्मा एक संतत । नाहीं आत्मयाविरहित । किंचित कदाचित कोण्हीही ॥ ८१ ॥ परी त्याचेनि संगें नव्हे संगी । त्याचेनि भंगें नव्हे भंगी । त्याचेनि रंगें नव्हे रंगी । अतीव निःसंगी उदासपणें ॥८२॥ देहनाशें नव्हे नाशु । देहव्यापारें स्वयें उदासु । देहलेपें स्वयें शुद्धांशु । अविनाशु सर्वदा ॥ ८३ ॥

न जायते न म्रियते कश्चित्किंचित्कदाचन ॥ जगद्विवर्तरूपेण केवळं ब्रह्म जृंभते ॥ २१ ॥

अगा जया नाहीं उत्पत्ति । उत्पत्ति अभावें मृत्यूची अमाप्ति । उपजती ते सर्व नाशती । विप्रतिपत्ति तेथ नाहीं ॥ ८४ ॥ जें उपजलें तें सर्वदा नासे । नासलें तें सर्वदा दिसे । तेथ पडिकार नासलाचि असे । अनायासें भासाचि ॥ ८५ ॥ उत्पत्तीचेनि निरासें । पडिकार नासलाचि असे । तेथ नाहीं अनारिसें । नलगे पदांशें बोलावें ॥ ८६ ॥ 'कश्चित् किंचित् कदाचित्' । यया पदांचा ऐसा अर्थ । काचितशब्दें स्थूळ बोलिजेत । किंचित ईषत वस्तुत्वें ॥ ८७ ॥ कदाचित् काळ सूचिला । ऐसा पदत्रयार्थ भासला । येणेंकरूनि नाहीं बोलिला । जन्मनाश भला आत्मयासी ॥ ८८ ॥ काळदेशवस्तुविशेषें । आत्मयासि परिच्छिन्नता दिसे । यालागीं पदत्रयविन्यासें । अविनाश ऐसें बोलिलें ॥ ८९ ॥ काचित् शब्दें कोणे ठायीं । येणें देश सूचिला पाहीं । देशीं उत्पत्ति नाशु नाहीं । आत्मा सर्वही सर्वपणें ॥ ९० ॥ आत्मा ऐकदेशीं असे । अन्य देशें काय पडलीं वोसें । आत्मेनविण रितें नसे । उपजे नाशे भ्रांतिचि कीं ॥ ९१ ॥ कदाचित् ह्मणजे कोणे समयीं । येणें

१ शहाण्यामध्ये श्रेष्ठा. २ समजशील. ३ एकसारखें भरलेलें. ४ धुळीमुळें धुरकट रंगाचें. ५ वोहरें. ६ तीन शब्दांचा अर्थ. ७ आत्म्यावांचून.

काळ सूचिला पाहीं । तरी काळें आत्म्यासि नाश नाहीं । काळत्रयीं अबाधितें ॥ ९२ ॥ उत्पत्ति स्थिति प्रलय । हा येकुचि काळ अनुमेय । यासि विभागुचे काळत्रय । व्यापागानुमेय बोलती ॥ ९३ ॥ काळाचें जें अस्तित्वपण । न घडे गा आत्मेनविण । आत्मेनविण भांसकपण । काळज्ञान आत्मेन होये ॥ ९४ ॥ काळत्रयें जे काळविभाग । आत्मेनविण न घडे सांग । आत्मा नसतां उत्पत्तिभोग । कैसोनि सांग रघुनाथा ॥ ९५ ॥ आत्मा नसतां कोठें उत्पत्ति । तयाविण जगा कैंची स्थिति । स्थिति नसतां नाशाप्रति । कोण व्यक्ति येईल ॥ ९६ ॥ उत्पत्ति स्थिति आणि नाश । हे आत्मयाच्या ठायीं भ्रमांश । आत्मा सर्वदा अविनाश । नाहीं लेश जन्ममरणाचा ॥ ९७ ॥ रजताचें जन्ममरण । नाहीं देखिलें शुक्तिविण । शुक्तीसि तेणें असे वर्त्तन । शुक्तिभिन्न असेचिना ॥ ९८ ॥ भुजंगाचें जन्ममरण । नाहीं देखिलें रज्जूविण । स्थितिकाळींही जाण । नाहीं वर्त्तन कदाचित् ॥ ९९ ॥ तैसी जगाचि वर्त्तते स्थिति । वस्तूविण नाहीं नाश प्राप्ति । आत्मेविण जागृति । सुषुप्ति स्वप्न असेचिना ॥ १००० ॥ आत्मेविण कोणीच स्थिति । आत्म्याच्या ठाया अवस्थात्रय वर्त्तती । निमिषोन्मेषें[२] आत्मेन होती । दिवारात्रि ब्रह्मीं वर्त्ते ॥ १ ॥ आत्मा काळ नव्हे परिच्छिन्न । काळें नव्हे जन्ममरण । वस्तु वस्तुत्वें परिपूर्ण । नव्हे क्षीण किंचि ॥ २ ॥ वस्तु वस्तुत्वें अखंड स्थिती । वस्तु वस्तुत्वें अखंड प्राप्ति । वस्तु वस्तुत्वें प्रकाशगति । वस्तु व्यक्तीविण स्वयें ॥ ३ ॥ वस्तु अखंडचिद्विलास । वस्तु अखंड स्वप्रकाश । वस्तु काळत्रयीं अविनाश । सावकाश पूर्णत्वें ॥ ४ ॥ तया कैंचें जन्ममरण । अज अव्यय नित्यानंदघन । स्वप्रकाश चिद्गगन । अतिगहन अपार ॥ ५ ॥ अनात्मयाची जन्ममरणकथा । ते आरोपिती आत्मयाच्या माथां । ते समूळ भ्रांति गा रघुनाथा । नव्हे तत्वतां ज्ञानदृष्टि ॥ ६ ॥ जय हें वास्तव असावें । तरी उत्पत्ति नाश या मानावे । जग चिद्विवर्तरूप आघवें । ब्रह्म स्वभावें विस्तारलें ॥ ७ ॥ जैसा शुक्तिकेचा विवर्त्त रजत । तेणें रूपें शुक्तिच भासत । परी रजत वस्तुत्वें सत्य । न घडे निश्चित रघुनाथा ॥ ८ ॥ दिनमणिरश्मीचा विवर्त्त । तें हें मृगांभ बोलिजेत । परी तेणें रूपेंचि विजृंभत । रश्मीताचि भासत जळरूपें ॥ ९ ॥ तैसें जग विवर्त्तरूपें ब्रह्मचि येक । ब्रह्मचि शोभे गा सम्यक । ब्रह्मेविण दुजें नाहीं देख । एकीएक तेंचि तें ॥ १०१० ॥

आकाशादपि विस्तीर्णः शुद्धः सूक्ष्मोऽव्ययः शिवः । य आत्मा स कथं राम जायते म्रियतेऽथवा ॥ २२ ॥

अगा जें आकाशाहूनि विस्तीर्ण । जयासि मर्यादाचि नाहीं जाण । वस्तुता जें उपमेविण । पूर्णानंदघन पूर्णत्वें ॥ ११ ॥ आघवीं असती तीन परिमाणें । एक अणु परिमाण मध्यम परिमाण । तिसरें जाण महत्परिमाण । इतुकें गणन परिमाणांचें ॥ १२ ॥ त्यांमाजी आकाश हें महत्परिमाण । शास्त्रसिद्ध केलें जाण । आत्मा तो निःपरिमाण ।

---

१ उघडपणास. २ डोळे उघडणें व झांकणें. ३ एक आणि ज्ञानानंदरूप. ४ भ्रमाप्रमाणें.

उपजे विहीन यालागीं ॥ १३ ॥ तैसीच शुद्धअशुद्धाची व्यावृत्ति । ह्मणोनि ब्रह्मासि शुद्ध ह्मणती । यालागून त्रयाचि व्याप्ति । नाहीं वर्त्तती जिये ठायीं ॥ १४ ॥ नेतिमुखें अनात्मानिरासु । केलिया उरे शुद्धांशु । तोचि शुद्ध बोलिजे परेशु । भ्रमनिरासु तेथ होये ॥ १५ ॥ तेंचि शुद्धशब्दें बोलिजे । शुद्धत्वें सूक्ष्म ह्मणिजे । जें जें शुद्ध सूक्ष्म वदिजे । जाणोनि व्याजें रघुनाथा ॥ १६ ॥ जें जें अशुद्ध करणग्राह्य । तें तें अशुद्ध अनात्म बाह्य । अतींद्रिय शुद्ध सबाह्य । अतिगुह्य सूक्ष्मपण ॥ १७ ॥ जें जें शुद्ध आणि सूक्ष्म । तेंचि तें बोलिजे अव्यय परम । जया व्यय नाहीं तें सर्वोत्तम । परब्रह्म परात्पर ॥ १८ ॥ जें उत्पत्तिवंत षड्विकार । तेंचि तें व्यय पावतसे क्षर । ब्रह्म व्ययातीत अक्षर । निर्विकार सत्यत्वें ॥ १९ ॥ जया कालत्रयीं व्यथा नाहीं । तेंचि तें सर्वदा शिवरूप पाहीं । दुःखव्यावृत्ति केलियाही । कोणे समयीं दुःखरूप नव्हे ॥ १०२० ॥ जें कीं उत्पत्तिक्षयातें पावे । तें दुःखरूपाचि स्वभावें । ब्रह्म तें षड्विकाररहित जाणावें । ह्मणोनि स्वभावें सुखरूप ॥ २१ ॥ यालागीं सर्वदा जें सुखरूप । तेंचि शिवत्व बोलिजे अमूप । जें कीं आनंदाचें पडेंप । जें निर्लेप सर्वदा ॥ २२ ॥ एवंविध जो आत्मा । तो कैसा उपजे निमे गा रघूत्तमा । ऐसेनि बोलिजे तो रामा । मूळभ्रमा सत्य जाण ॥ २३ ॥

सर्वमेकमिदं शांतमादिमध्यांतवर्जितम् । भावाभाव विनिर्मुक्तमिति मत्वा सुखी भव ॥ २३ ॥

मुख्य भ्रम हाचि रघुपति । शुद्धब्रह्मीं विश्व आरोपिती । हे अविचारी संशुद्धि ह्मणती । विचाराप्रति असेचिना ॥ २४ ॥ स्थाणूच्या ठायीं चोरभ्रमु जाला । तो अविचारीं सिद्धी गेला । तेणें कार्यार्थ उपजला । विस्तारिला भयकंपु दोन्ही ॥ २५ ॥ तोचि विचारूनि पाहतां । तंव तो स्थाणुचि तत्वतां । चोर तेथें विचारितां । समूळ वृथा रघुवर्या ॥ २६ ॥ नाना रज्जुचे ठायीं जैसें । अहि धारा माळादिभ्रमु भासे । त्याचें मुख्य स्वरूप पाहतां दिसे । सावकाश रज्जूचि येकी ॥ २७ ॥ तैसें अज्ञानभ्रमें करूनी । ब्रह्म विश्वाभासें देखिजे नयनीं । हे अविचाराची करणी । विचारक्षणीं नाहींच होये ॥ २८ ॥ मृगांभाचें मूळ पाहतां । रश्मीवांचूनि नाहीं तत्वतां । तैसें प्रपंचस्वरूपीं विचारितां । वस्तु तत्वतां अढळपणें ॥ २९ ॥ तसा विश्वाभास तो भ्रम । त्याचें निजरूप तें परब्रह्म । हे खूण जाण गुरुगम्य । अतिवर्म जाणतया ॥ १०३० ॥ हें चराचरविश्व सर्व । तें येक परब्रह्मचि स्वयमेव । येथें नाहीं गा आणिक भाव । करोनि अनुभव पाहें रामा ॥ ३१ ॥ अगा जयाविण जें नाहीं । तें वस्तुत्वेंचि पाहीं । येथ नाहीं आणि कांहीं । संशय देहीं उपजोंचि नेदी ॥ ३१ ॥ साचावेगळें लटकेंचि नाहीं । हें तंव अनुभवसिद्धचि पाहीं । रजतसिद्धि स्वतंत्र कांहीं । शुक्तीविण नाहीं देखिली ॥ ३३ ॥ दिसणें न दिसणें भुजं-

१ आत्म्याहून इतर पदार्थांचें निरसन. २ परमात्मा ३ इंद्रियांनीं घेतलें जाणारें. ४ शोभा. ५ आरोप करितात. ६ शुद्धपणा. ७ गुरुपासून जाणण्याची. ८ रूपें असा भास.

गासी । रज्जूविण असे कोणे देशीं । यालागीं तो तियेसी । भिन्नतोसि पावेना ॥ ३४ ॥ अभिन्न ह्मणतां वस्तु आन नव्हे । भिन्न तरी कोण पदार्थु आहे । भिन्नाभिन्न ते कोणीचि नव्हे । यालागीं होय रज्जुचि येकु ॥ ३५ ॥ तैसें विश्व हें सत्तें ह्मणावें । तरी ब्रह्माचेगळें सिद्ध नव्हे । आणि स्वतंत्र वस्तुत्वें असावें । न संभवे अनात्मपणें ॥ ३६ ॥ जें जें इंद्रियांसि दृश्य होये । तें तें जाण अनात्माचि आहे । अनात्मा तें नाशिवंत पाहें । अनुमान आहे वेदशास्त्रीं ॥ ३७ ॥ प्रपंच मिथ्या दृश्यत्वांत । जें जें दृश्य मिथ्या भूत । जैसा घट दृश्यत्वें नाशिवंत । सर्वथा असत्य मिथ्यापणें ॥ ३८ ॥ ऐसीं अनुमानें अनंतें । वेदांतशास्त्रीं उपपादिते । करिती ग्रंथविस्तारातें । वाणी प्राकृतें किती बोलावें ॥ ३९ ॥ यालागीं सर्व विश्व ब्रह्म बोलिजे । ऐसेंचि वेदें निरूपिजे । 'सर्वं खल्विदं ब्रह्म' जें । तेथ बुझिजे ह्याचि अर्थु ॥ १०४० ॥ सर्व विश्व हे ब्रह्मस्थिति । ऐस सर्वदा बोलती श्रुति । परिणाम नव्हे विश्वमूर्त्ति । संशय चित्तीं ह्मणी धरा ॥ ४१ ॥ विश्व हें ब्रह्माचा विवर्तु । ऐसें बोले वेदांतसिद्धांतु । याचा पूर्वींच दिधला दृष्टांतु । नव्हे मातु अनारिसी ॥ ४२ ॥ यालागीं सव विश्व हें येक । येक शब्दें ब्रह्मचि सम्यक् । तेंचि तें परी नाहीं आणिक । शांत कौतुक परियेसा ॥ ४३ ॥ शांतशब्दें अविकारी । नाहीं विकार तिळभरी । क्षोभ नाहीं जयाभीतरी । तेंचि सर्वोपरी शांत जाण ॥ ४४ ॥ जें आदिमध्यांतवर्जित । तेंचि तें ब्रह्म सदोदित । नाहीं उपजलें देखिजेत । कोण ह्मणिजेत आदियासी ॥ ४५ ॥ जे वस्तूसि आदि नाहीं । तें राहे वसे कोणे ठायीं । स्थितीविण नाश नाहीं । अविनाश पाहीं ययालागीं ॥ ४६ ॥ जयासि आदि मध्य अंत । ते वस्तु अपायी नाशिवंत । जैसा घट आदिमध्यांतवंत । नाशेचि निश्चित रघुनाथा ॥ ४७ ॥ पृथ्वीपासोनि जन्म घटासी । स्थिति आश्रयही तयासी । भूमिच निर्वाण लयासी । निश्चयेंसी न चुके ॥ ४८ ॥ जिये वस्तूसि आदि असे । ते सर्वथा शेवटीं नासे । या तिहींविरहित वस्तु असे । अखंड वर्त्ततसे अविनाशपणें ॥ ४९ ॥ या ब्रह्माचीं मातापिता । कोण तें सांगें जानकीकांता । यासि आश्रय कोण तो वसता । मा नाश तत्वतां कोणे ठायीं ॥ १०५० ॥ जयापासाव सर्व जालें । परी तें जैसें तैसेंचि संचलें । विश्वोत्पत्ती नाहीं वेंचिलें । नाहीं नाशलें विश्वनाशें ॥ ५१ ॥ सर्वांचें जें आदिभूत । आदि मध्य अंत विवर्जित । तेंचि ब्रह्म सदोदित । विश्वभरित परिपूर्ण ॥५२॥ जें कीं भावाभावविनिर्मुक्त । तेंचि ब्रह्म जाण विविक्त । भावशब्दें अस्तित्व । अतिशून्यार्थ तो अभाव ॥ ५३ ॥ अस्तिशब्दें नव्हे दृश्य । अभाव शब्दें नव्हे अदृश्य । दृश्यादृश्य सामरस्य । वस्तु अनिर्देश्य काहींच नव्हे ॥ ५४ ॥ अथवा भावशब्दें कार्य जाण । अभाव बोलिजे कारण । कार्य-

---

१ खरें असलेलें. २ सांगितलेलीं. ३ विकार. ४ प्रारंभ, मध्य व शेवट हे ज्यास आहेत असा. ५ विश्वाची उत्पत्ति झाल्यामुळें

कारणविहीन । वस्तु पूर्ण पूर्णत्वें ॥ ५५ ॥ येक कार्यशब्दें वस्तु असावें । तरी कारण ब्रह्माचि बोलावें । ब्रह्माचि कार्य ह्मणावें । तरी कारण न संभवे ब्रह्मासि पैं ॥ ५६ ॥ या लागीं कार्यकारणविहीन । ब्रह्माचि येक परिपूर्ण । अथवा भावशब्दें स्थूळ जाण । सूक्ष्म पूर्ण अभाव तो ॥ ५७ ॥ स्थूलसूक्ष्मशब्दें विश्व बोलिजे । तें तंव अनात्मपणें ब्रह्म नोंव्हिजे ह्मणिजे तें अविनाश सहजें । भावाभाव नाहीं तेथ ॥ ५८ ॥ ऐसें ब्रह्म जाणोनि । सुखिया होई सुखरूप होउनी । अल्पही दुःख स्वप्नीं । जनीं वनीं न देखसी ॥ ५९ ॥ हेंचि बोलिजे गा ज्ञान । येणेंचि होइजे गा सुखसंपन्न । हेंचि नेणिजे तेंचि अज्ञान । दुःखकारण सर्वार्थीं ॥ १०६० ॥ शहाणा बोलिजे ज्ञानवंत । मूर्ख तो अज्ञानी ह्मणिजेत । मूर्खाचें मौर्ख्य हें तंव जीवित । अतिनिंदित सर्वार्थीं ॥ ६१ ॥ मूर्खाचें जिणें तें व्यर्थ । तो नररूपें गाढव मूर्तिमंत । पापी निंद्य हतजीवित । निंदितार्थ परियेसीं ॥ ६२ ॥

वरं शरावहस्तस्य चांडालागारवीथिषु । भिक्षार्थमटनं राम न मौर्ख्यं हतजीवितम् ॥ २४ ॥

अगा हातीं घेऊनि खापर । चांडाळाच्या घरोघर । भिक्षार्थ हिंडणें तें थोर । अतिवीरश्रेष्ठपणें ॥ ६३ ॥ चांडाळगृहाचिया वीथीं । हिंडणें खापर घेऊनिया हातीं । भिक्षा मागणें दीनवृत्ती । श्रेष्ठत्ववृत्ती तीतें ह्मणिजे ॥ ६४ ॥ परी मौर्ख्यंकरूनि उपहत । जें कीं अमंगळ जीवित । तयापरीस तेंचि हित । जें कीं पूर्वोक्त रघुनाथा ॥ ६५ ॥ अतिमूर्खता तेंचि अज्ञान । अज्ञानी याचें व्यर्थ जीवन । धिक् धिक् तें ज्ञातेपण । प्रपंचीं वर्तन जेणें होय ॥ ६६ ॥ परमानंदाची प्राप्ति । जया नाहीं गा विश्वमूर्ति । तयाचें जिणें त्रीजगतीं । जाण सर्वार्थीं उपहत ॥ ६७ ॥ मुख्य ज्ञानावांचूनि जें वर्त्तन । तेंचि समूळ जाण मूर्खपण । त्याचें जीवित शवरूप जाण । आनंदघन प्राप्त नाहीं ॥ ६८ ॥ तयापरिस गा रघुपति । हिंडणें उत्तम चांडाळवीथीं । भिक्षा मागावी दीनवृत्ती । परी मूर्खस्थिति नसावें ॥ ६९ ॥ अथवा ज्ञानालागीं अंत्यजागृहीं । हातीं खापर घेऊनि प्रत्यहीं । भिक्षा मागोनि ज्ञान देहीं । साधावें पाहीं जाणतेनी ॥ १०७० ॥ परी मूर्खपणें नसावें सर्वथा । अज्ञानी मूर्खाचें जन्म वृथा । तें तव तुच्छ गा रघुनाथा । सवाह्यरिता ज्ञानशून्य जो ॥ ७१ ॥ अमा मूर्खपणायेवढें दुःख । तिहीं लोकीं नाहीं गा देख । जही उपजले दोष अनेक । दुःखदायक ते नव्हती ॥ ७२ ॥

न व्याधिर्न विषं वापि तथान्यद्वापि भूतले । दुःखाय स्वशरीरस्थं मौर्ख्यमेतद्यथा नृणाम् ॥ ७२ ॥

ये; शरीरीं नानाव्याधींकरून । शूल ताप क्षयरोग कुष्ट जाण । जलोदर ऐसे दारुण । यियें नव्हती पूर्ण दुःखहेतु ॥ ७३ ॥ ऐसिया अनेक व्याधि । दुःखदायक नव्हती त्रिशुद्धि । तैसेंचि विषपानीं दुःखसमृद्धि । जाल्या क्षयव्याधि दुःख नव्हे ॥ ७४ ॥ उदकीं बुडतां महापुरीं । तैसें दुःख नव्हे गा शरीरीं । गृहभंग पुत्रशोक भारी । दुःख-

१ विहीन=नसलेलें. २ होत नाहीं. ३ जिवंत असून मेल्यासारखा. ४ गर्द्दात. ५ दुःखयुक्त. ६ मूळव्याध.

सागरीं बुडविती ना ॥ ७५ ॥ तैसेंच अबद्ध पाठ ह्मणतां । आपत्तिदुःख नेदी सर्वथा । दारिद्रदुःखें नानापरी पिडितां । नेदी आकांता इत्यादि दुःखें ॥ ७६ ॥ अनेक दुःखें ये भूतळीं । असंख्य आहेत पापमळीं । परी ऐसिये दुःखजाळीं । मौर्ख्यें तळमेळी ऐसी नाहीं ॥ ७७ ॥ ॥ इत्यादिकीं जें दुःख होये । तें कालेंकरूनि नाशोनि जाये । दीर्घ काळ परी ये देहीं होताहे । देहांतर पाहे नेदिती ॥ ७८ ॥ मूर्खपणाचें दुःख कैसें । त्यासि प्रतिकार औषध नसे । ज्ञानेंविण कोटि कल्पांशें । भोगवितसे दुःखसंपत्ति ॥७९॥ येरें दुःखें औषधें काळें । नाशोनि जाती गा सकळें । मौर्ख्य तें वाढतें इत्यादिमेळे । कोण्हे काळें शमेना कीं ॥ १०८० ॥ आतां मौर्ख्याचें दुःख कैसें । तेंही सांगों अल्पचि ऐसें । सावधान होऊनि विश्वेशें । सावकाशें परिसावें ॥ ८१ ॥ तरी स्वशरीरीं जे मूर्खता । तेचि मनुष्यासि दुःखरूपता । जेणें निज विसरोनि अनर्था । पडे सर्वथा कल्पकोटी ॥८२॥ तरी मूर्खतातें मुख्य अज्ञान । अज्ञानें देहबुद्धि होये पूर्ण । देह बुद्धीनें मीतूंपण । स्त्री पुत्र जाण देहबुद्ध्या ॥ ८३ ॥ 'इदं मम' पशु आणि संपत्ति । वैभव पुत्र सुना नाती । इष्टमित्र सुहृद सांगाती । सर्वही असती देहबुद्धीस्तव ॥ ८४ ॥ स्वामी सेवक इतर जन । त्याहूनि इतर वैरीगण । हे देहबुद्धीस्तव संपूर्ण । नाहीं आन रघुनाथा ॥ ८५ ॥ त्यांचेनि संयोगें सुखप्राप्ति । वियोगें करूनि दुःख अति । प्रियभाषणें सुख उन्नति । अप्रियें व्याप्ति दुःखाची ॥ ८६ ॥ स्वशरीरदुःखें करूनी । आरबळंतु जाय प्रतिक्षणीं । स्वकीयांचे दुःख त्याहुनि । दुःख मानी आपणया ॥ ८७ ॥ ह्मणे माझा प्राण जरी जाता । आणि या पशूची जरी वरी होती व्यथा । तरी थोर पावतों पुरुषार्था । ऐसें दुःख नसतां भावोनी ॥ ८८ ॥ इत्यादि नानादुःखें इहलोकीं । तो परलोकीं काय होईल सुखी । स्वकीयांचेनि संगें अनेकीं । होय नरकीं यातनाभोग ॥ ८९ ॥ इतुकियांचें मूळ मूर्खपण । मूर्खपणें दुःख दारुण । मूर्खपणें अधःपतन । योनिभोगणें जाण मूर्खत्वें होय ॥१०९०॥ मूर्खपणें दुःखाचे डोंगर । मूर्खपणें विषाचा सागर । मूर्खपणें नरक थोर । यातना फार मूर्खपणें ॥ ९१ ॥ मूर्खपण योनिदायक । मूर्खपण ज्ञानछेदक । मूर्खपण अतिनरक । क्लेश सम्यक मूर्खपणें ॥ ९२ ॥ मूर्खपण तें अज्ञान गा रघुपति । हें पूर्वींच सांगितलें तुजप्रति । याची टाकावी संगति । हें सर्वार्थी भवदायक ॥ ९३ ॥ नाना व्याधि शोक दुःखें होती । तेंहीं अज्ञान-कृतचि गा रघुपति । अज्ञानेंचि देहबुद्धि वाढती । दुःखप्राप्ति तेणेंचि होये ॥ ९४ ॥ तें आंगीं नसतां मूर्खपण । मी देह ऐसें ह्मणे कोण । देहबुद्धि नसतां दुःखानुसंधान । शोक दारुण कोणासी ॥ ९५ ॥ यालागीं दुःखाचें मुख्य कारण । तें हें मुख्य मुर्खत्व अज्ञान । तें नसतां सुखसंपन्न । दुःखभान स्वप्नीं नाहीं ॥ ९६ ॥ येथ संपलें वैराग्यप्रक-

---

१ बरें करण्याचा उपाय. २ मूर्खपणाचें. ३ फार वेळपर्यंत. ४ हें. ५ माझें. ६ एकत्र असल्यामुळें. ७ क्षीण होत. ८ अनेक जन्म घेवविणारें. ९ संसारांत घालणारें.

रण । वैराग्याचा मथितार्थ इतुका पूर्ण । ज्ञानसाधनीं वैराग्य कारण । अन्य साधन असेचिना ॥ ९७ ॥ वैराग्येंविण न साधे ज्ञान । वैराग्येंविण इंद्रियें प्रत्यकप्रवीण । नव्हतीं साधितां साधन । सहस्र जाण कल्पकोटि ॥ ९८ ॥ वैराग्येंविण विवेक नाहीं । वैराग्यविण निर्मूळ सर्वही । वैराग्येंविण न घडे कांहीं । भक्ति ज्ञान कहीं उपजेचिना ॥ ९९ ॥ यालागीं सर्वस्वासि कारण । येक वैराग्य अकृत्रिम जाण । वैराग्य तेथेंचि स्थिरज्ञान । नाहीं आन रघुनाथा ॥११००॥ वैराग्येंविण नाहीं ज्ञान। ज्ञानेंविण कैंचें साधन । शांतिसुख जें संपूर्ण । वैराग्येंविण प्राप्त कैंचें ॥१॥ यालागीं गा रघुनाथा । असावी वैराग्याची पूर्णता । तेणेंविण नये हाता । ज्ञान तत्वता परियेसीं ॥ २ ॥ नानासाधनें करिजेती । तरी वैराग्येंविण नव्हे प्राप्ति । यदर्थीं श्रुति असे बोलती । ऐक रघुपति सांगेन ॥ ३ ॥

संमतिश्रुति ॥ न कर्मणा न प्रजया धनेन त्यागेनैके अमृतत्वमानशुः

अगा कर्म करितां नव्हे ज्ञान । कर्म तें अविद्यैक पूर्ण । परस्परें अविरोध जाण । अज्ञानछेदन कैसें होये ॥ ४ ॥

संमति श्लोक ॥ अविरोधितया कर्म नाविद्यां विनिवर्तयेत् ॥ विद्याविद्यां निहंत्येव तेजस्तिमिरसंघवत् ॥

ययालागीं गा रघुपति । अविद्या कर्माची जनिती । ययालागीं कर्म अविद्या न निवर्ती । आथिक व्यक्ति सांगेन ॥ ५ ॥ रश्मीपासाव जें मृगजळ । तें काय रश्मि नाशील सकळ । किंवा उदकाचे जे कल्लोळ । तेणें जळ वाढे कीं नाशे ॥ ६ ॥ यालागीं अज्ञानाचें विरोधी । तें ज्ञान अज्ञानासि बाधी । तेज नाशी अंधकारसंमृद्धि । परी तमासि तम बाधी हें न घडे ॥ ७ ॥ यालागीं कर्म अज्ञान न निरसे । पुत्रें अज्ञान नाशे कैसें । ह्मणती वेदें बोलिलें असे । तेंही कैसें सांगेन ॥ ८ ॥

संमतिश्रुति ॥ नापुत्रस्य लोकोस्तीति तत्सर्वे पशवो विदुः ।

ऐसें प्रत्यक्ष बोले श्रुति । पुत्रें मोक्ष होय ह्मणती । तरी पुत्रें होय स्वर्गप्राप्ति । अज्ञाननिवृत्ति कदा नव्हे ॥ ९ ॥ अथवा धनादिकांचेनि दानें । कैसेनि नाश पाविजे अज्ञानें । अधिकचि फार होइजे तेणें । फळ भोगणें नानायोनि ॥ १११० ॥ ज्ञानोत्पत्तीचा उपावो ताता । मुख्य त्यागुचि बोलिजे गा रघुनाथा । त्यागु तोचि वैराग्य सर्वथा । अनुभवाच्या माथां पाविजे तेणें ॥ ११ ॥ यालागीं ब्रह्मप्राप्तीप्रति । ऐक वैराग्य कारण गा रघुपति । वैराग्येंविण ज्ञानाची उक्ति । व्यर्थ बोलती वाचाळपणें ॥ १२ ॥ येथ अष्टावक्रसंमति । कारण वैराग्य बोलिलें ज्ञानाप्रति । तेचि ऐकें जानकीपति । संशय चित्तीं न राहे जेणें ॥ १३ ॥

संमतिश्लोक ॥ मुक्तिमिच्छसि चेतात विषयान्विषवत्यज । क्षमार्जवदयातोषं सत्यं पीयूषवद्भज ।

इत्यादिकी नानासंमति । येथें लेहाविया गा किती । येक वैराग्यचि ज्ञानाप्रति । स्वरूपप्राप्तीसि कारण ॥ १४ ॥ तंव रघुनाथ ह्मणती जी गुरुराया । थोर संशय मना माझिया ।

१ कल्पांती. २ अज्ञानापासून उत्पन्न झालेलें. ३ उत्पन्न करणारी. ४ किरणांपासून. ५ काळोख. ६ अज्ञान नाहींसें होणें. ७ बोलणें.

उपजल्या तो त्यजावया । समर्थ स्वामिया तूं येकु ॥ १५ ॥ अनेका शास्त्रीं वैराग्य बोलिलें । निग्रह निग्रपणें सर्व दूषिले । विषयदुःखही स्वतः अनुभविलें । नश्वर देखिलें सर्वांपरी ॥ १६ ॥ ऐसें असोनियां श्रीगुरुराया । वैराग्य नुपजे काय ह्मणोनियां । अधिक प्रीती विषयीं लागावया । कारण स्वामिया निरूपिजे ॥ १७ ॥ तंव वसिष्ठ ह्मणती गा रघुपति । तेथें हेंचि कारण गा महामति । विषय शाश्वत मानूनि भुलती । मिथ्यात्व चित्तीं बाणेना ॥ १८ ॥ जऱ्ही नानाशास्त्रें आइकती । तऱ्ही वैराग्य नुपजे चित्तीं । उपजल्याही क्षणाप्रति । नाश सर्वार्थीं मळिणपणें ॥ १९ ॥ विषयीं सुखदुःखही देखती । नाशिल्याचीं होय प्रतीति । परी मिथ्यत्व नुपजें चित्तीं । ह्मणोनि सेविती तेंचि तें ॥ ११२० ॥ प्रारब्धकर्में चित्त मळिण । तेणें वैराग्य न बाणे जाण । जगसत्यत्वें नव्हे वैराग्य पूर्ण । जाण खूण रघुवर्या ॥ २१ ॥ तें वैराग्य नुपजावया कारण । जंव विषयीं नव्हे मिथ्याभान । मिथ्या दर्शनें वैराग्य पूर्ण । न साधितां आपण पाठीलागे ॥ २२ ॥ अनेक साधनें साधितां । कांहींच वैराग्य नुपजे चित्ता । जग हें मिथ्यात्वें जाणतां । वैराग्य तत्त्वतां पूर्ण होये ॥ २३ ॥ मिथ्या वस्तूचा निश्चयो जालिया । मग प्रीति न धरी तया विषया । यालागीं मिथ्यत्वें देखावया । दृश्या यया सर्वदा ॥ २४ ॥ हें ऐकोनि श्रीरघुपति । बोलता जाला श्रीगुरूप्रति । जगमिथ्यत्वाची प्रतीति । कोणेरीती होय स्वामी ॥ २५ ॥ सत्य जग असतां श्रीगुरुराया । तें मिथ्या कैसेनि ये आया । तें मजप्रति सांगावया । कृपा करोनियां अनुवादावें ॥ २६ ॥ आयिकोनि श्रीरघुनाथाची वाणी । श्रीवसिष्ठ हर्षनिर्भर मनीं । ह्मणे धन्य शिष्याशिरोमणि । अंतःकरणीं लागटपणें ॥ २७ ॥ हेंचि वैराग्याचें लक्षण । परमार्थ प्राप्तीसि तळमळ पूर्ण । चित्तीं लागलिया पूर्ण । लागटपण येणेंचि नावें ॥ २८ ॥ अति श्रद्धा जरी असेल चित्तीं । तेणेंचि करी प्रश्नोक्ति । गुरुवचनें अतिप्रीती । स्वीकारिती अत्यादरें ॥ २९ ॥ परी आइक आतां रघुपति । सांगेन तुझिया प्रश्नाची उत्तरोक्ति । तें येकाग्र ऐकतां चित्तीं । तें मिथ्या प्रतीति प्रपंचु हा ॥ ११३० ॥ तें उत्तरप्रकरणेंकरूनी । सांगेन तुज कोदंडपाणी । तोंचि ऐके चित्त देउनी । परमार्थाधणी जेणें होये ॥ ३१ ॥ ऐसें वसिष्ठऋषि बोलिले । येथें पूर्वप्रकरण संपलें । तें यथामती वाखाणिलें । सिद्धि पावलें सद्गुरुकृपें ॥ ३२ ॥ सहज पूर्ण निज रंगास । सर्वां विषयीं होये उदास । तेंचि वैराग्य सावकाश । विषयलेश नाभिलाषिजे ॥ ३३ ॥

इति श्रीयोगवासिष्ठसारे श्रीवसिष्ठरामसंवादे प्रथमं वैराग्यप्रकरणं समाप्तम् ।

---

१ टाकावयास. २ विषयांपासून उत्पन्न होणारें दुःख. ३ ठसत नाहीं. ४ पहाण्यानें. ५ कोणत्या प्रकारानें. ६ प्रत्ययास. ७ प्रश्न विचारणें. ८ उत्तर दिलेलें भाषण.

॥ श्रीः ॥

प्रकरण २ रें.

जगन्मिथ्याप्रकरण

श्रीगणेशाय नमः । । श्रीमत्सद्गुरुनिजानंदाय नमः । जयजय श्रीगुरुराया । नमन करूनि तुझिया पायां । ब्रह्मकथा निरूपावया । देई स्वामीया उन्मेषु[1] मज ॥ १ ॥ तुझी कृपा जालियावरी । वेदार्थु बोले वैखरी । तेथें अपूर्व काय जी अवधारी । भवगजकेसरी[2] परियेसीं ॥ २ ॥ तुझी होतांचि कृपादृष्टि । होय अपरोक्षस्वरूपासि भेटी । तेथें सिद्ध होये वाचक सृष्टि । शब्दपरिपाटीं काय नवल ॥ ३ ॥ तूं वाचादि इंद्रियाचा ईश । म्हणोनि बोलिजे हृषीकेश । करिसी सर्व करणां प्रकाश । जगन्निवास स्वप्रकाशें ॥ ४ ॥ इत्यर्थीं बोलतसे श्रुति । तूं सर्वेंद्रिया प्रकाशमूर्त्ति । परी इंद्रियें तुज नेणती । ऐक संमति श्रीगुरुराया ॥ ५ ॥

संमति श्रुति । यद्वाचा नाभ्युदितं येन वागभ्युद्यत इति ।

वाचा हें जाण उपलक्षण[3] । परी सर्वेंद्रियें नेणती जाण । आणि वाचादिकांचें प्रकाशन[4] । स्वयें आपण तूंचि येक ॥ ६ ॥

संमति श्रुति । यन्मनसा न मनुते येनाहुर्मनो मतम् । तदेव ब्रह्म त्वं विद्धि नेदं यदिदमुपासते ।
यच्चक्षुषा न पश्यति येन चक्षूंषि पश्यति । तदेव ब्रह्म त्वं विद्धि इति ।
यच्छ्रोत्रेण शृणोति येन श्रोत्रमिदम् श्रुतम् । तदेव ब्रह्म त्वं विद्धि इति ।

एवं सकळांचा मथितार्थ ऐसा । कोण्हीच तुज न प्रकाशिती विश्वेशा । तूंचि प्रवर्त्तकु स्वप्रकाशा । इंद्रिया ऐसा प्रकाशि ॥ ७ ॥ जें कीं सकळांते प्रकाशि । तेंचि परब्रह्म सर्वस्वेंसी । ऐसें श्रुति सांगे सर्वांसी । उपासावयासि निरंतर ॥ ८ ॥ जे ऐसें जाणूनि न करिती उपास्ति । त्यांसि परम नाशु बोले श्रुति । तें भवार्णवींच हिंडती । निरेंया[5] जाती निश्चयेंसी ॥ ९ ॥ ‘ न चेदिहावेदीन्महती विनष्टिः ’ । इत्यादि वचनें सांगे गोष्टी । न भजती ते पडती कपाटीं[6] । कल्पकोटी ऐसे देव ॥ १० ॥ ऐसा सर्वेंद्रियांचा प्रकाशन । जाणोनि तुज मी अनन्यशरण । तेणें तुज जालिया प्रसन्न । ग्रंथ निर्मीन काय नवल ॥ ११ ॥ जयाचिया ईक्षणसत्ता । जीवासि ब्रह्म पण होय पूर्णता । ग्रंथ निर्माण करितां । कोण कोण या अर्थी सांकडें ॥ १२ ॥ जेथ सृष्ट्यादिव्यापार । तो तंव मायिक व्यवहार । करणें नव्हे अपूर्व थोर । तेथ इतर किती सांगों ॥ १३ ॥ तेथें वाचा कवित्व

---

१ स्फूर्ति. २ संसाररूपी हत्तीचा नाश करणाऱ्या सिंहा ! ३ बाह्य लक्षण. ४ प्रगट करणारें. ५ नरकांत. ६ संकटांत. ७ रचीन.

बोलणें । हें तंव ब्रह्मत्वीं न्यून । ययालागीं चोजे करणें । माझेनि मनें न करिजे ॥ १४ ॥ मी तंव सकळ पदार्थी मंद । तो तुझिया कृपा पावोनि बोध । जालों स्वस्वरूप अगाध । चिदानंदबोध पूर्णत्वें ॥ १५ ॥ त्या मज हें ग्रंथनिर्माण । करावया कोण प्रयोजन । परी बालपणाचे ढेंकर पूर्ण । स्वरूपवर्णन तुझेंचि करीं ॥ १६ ॥ आणि ग्रंथव्याख्यान करीं । इये श्लाघ्यतेची कोण पां थोरी । जयासि समर्थ अंगिकारी । तो हें करी काय नवल ॥ १७ ॥ क्षीरार्णव[3] अंगणप्रदेशीं[4] । जाला असे जया पुरुषासी । सर्वदा तृप्त ह्मणणें त्यासि । अपूर्वतेसि काये मिळे ॥ १८ ॥ नाना धनंजयासि कंसारी[5] । आत्मत्वें स्वयें अंगीकारी । तत्पुरुषार्थे कौरव संहारी । वर्णितां भारी काये होये ॥ १९ ॥ तेणें सृष्ट्यादिकार्य जऱ्ही केलें । तऱ्ही तेथें काय नवल जालें । जयासि ईश्वरें आत्मत्वें मानिलें । कौरव मारिले हें काय नवल ॥ २० ॥ नातरी जनकतनुजापती[6] । स्तकीयत्वें मानिला मारुति । तेणें लंकादहन क्षणा प्रति । त्रिजगतीं ख्याति केली तेणें ॥ २१ ॥ इत्यादिकीं त्रैलोक्यसंहरण । अथवा केल्या उत्पन्न पाळण । येथें नाहीं अपूर्वपण । तेथें हें करणें काये वानिजे ॥ २२ ॥ अथवा तेणें सत्यवतीसुतें । कृपावलोकनें पाहिलें सूतातें । तेणें संजयें धृतराष्ट्रातें । निववविलें पुरतें ब्रह्मानंदें ॥ २३ ॥ यालागीं समर्थाचें कृपावलोकन । जालिया अनाधिकारीही होय पूर्ण । सर्वत्र सर्वदा नव्हे न्यून । तेथें मी अपूर्ण काय होयें ॥ २४ ॥ तैसा मी तुमचा आंगीकेला[8] । विशेषें आत्मत्वें मानिला । तो मी जो बोलिला बोला । तो कां वेदतुल्या[9] येईना ॥ २५ ॥ माझें अहंकरण तूंचि येकु । सर्वेंद्रियां प्रकाशकु । साक्षी होऊन प्रवर्त्तकु । येकला येकु तूंचि स्वामी ॥ २६ ॥ माझें करणें आणि न करणें । सर्वही तुवां येकेंचि तेणें । आणि संकल्पिजे[10] जें जें मन । तें सर्वही होणें तुवांचि ॥ २७ ॥ माझी जें जें वदे वाचा । तो तो शब्दार्थु तूंचि साचा । यालागीं जें बोलणें याचा । विस्मयो साचा नव्हे स्वामी ॥ २८ ॥ तेथें म्या काये तुज प्रार्थावें । स्वामी ग्रंथव्याख्यान बोलावें । जेथें माझें मीपण गौरवें । तूंचि स्वभावें जालासी ॥२९॥ तेथें तुजवेगळा मी कैसा उरें । जें कां प्रार्थी सकोमळ उत्तरें । वदता वदविता साचोकारें । तूंचि तूं निर्धारें सर्वत्र ॥ ३० ॥ तें हो शुद्ध अथवा अशुद्ध । तूंपणें अवघेंचि विशुद्ध । ऐसें बोलतां वाचा जाली सद्गद । ह्मणोनि सुबद्ध आलिंगी ॥ ३१ ॥ प्रेमें आलिंगूनि सद्गुरुरायें । आज्ञा केली ग्रंथीं इये । ह्मणे बोलतू ग्रंथप्रमेयें[11] । संस्कृतान्वयें सप्रेमें ॥३२॥ ऐसा पावोनि प्रसादु । तेणें ब्रह्मांडीं न समाये आनंदु । ह्मणे प्रसादें ग्रंथ सिद्धु । स्वतःसिद्धु तुझेनि ॥ ३३ ॥ सद्गुरुअनुग्रहें[12] आतां । ग्रंथव्याख्यान यथार्थता । करील सद्गुरुचि तें श्रोतां । सावधानता परिसावें ॥ ३४ ॥ तरी वैराग्यप्रकरणाचे अंतीं । बोलिले ऐसें

१ कौतुक. २ तृप्तीचे. ३ दुधाचा समुद्र. ४ अंगण्यांत, दारांत. ५ कृष्ण. ६ सीतापति रामचंद्र. ७ व्यामानें. ८ अंगिकारिलेला. ९ वेदांच्या बरोबरीचें. १० कल्पना करावी. ११ ग्रंथरूपी सिद्धांत. १२ गुरुकृपेनें.

रघुनाथाप्रति । जे वैराग्येंविण ज्ञानोत्पत्ति । कदाकल्पांतीं घडेना ॥ ३५ ॥ आणि ज्ञानाविण जें जीवित । तें अतिमौर्ख्यत्वें उपहत । सर्वार्थीं होय निंदित । अतिकुश्चित जडपणें ॥ ३६ ॥ चांडाळगृहीं भिक्षाटण । करणें तें श्रेष्ठपण । परी निंद्यत्वें मौर्ख्यता कनिष्ठ जाण । दुःखकारण सर्वार्थीं ॥ ३७ ॥ मूर्खता जाऊनियां ज्ञान । होआवया वैराग्यचि संपूर्ण । वैराग्यासि मूळ मिथ्यात्वदर्शन । हेंचि कारण सर्वार्थीं ॥ ३८ ॥ हेंहीं केलें असे निरूपण । तथापि ग्रंथारंभीं स्मरण । अर्थान्वयें अनुसंधान । स्मरण पूर्ण व्हावया ॥ ३९ ॥ जग मिथ्यापणें दर्शन । अथवा सत्यत्वें होय भान । या दोहींसि मनचि कारण । मनेंचि बंधनमोक्षहि ॥ ४० ॥ तंव रघुनाथ आक्षेपिती । ह्मणे जी श्रीवसिष्ठ सद्गुरुमूर्ती । जे केलिया प्रतिज्ञा मजप्रति । जगमिथ्यास्थिति सांगावें ॥ ४१ ॥ ते आपुली प्रतिज्ञा साच करीं । जगन्मिथ्यात्व सांग झडकरीं । वैराग्य सदृढ जेणेंकरी । जालिया पुरी नवजाये ॥ ४२ ॥ ऐसी प्रार्थना आइकोनि मुनि । अति हर्षनिर्भर अंतःकरणीं । ह्मणे रघुनाथा तुजलागुनी । सांगेन तें मनीं दृढ धरीं ॥४३॥ तरी प्रपंचसंहार आणि उत्पत्ती । त्यासि मनचि कारण गा महामति । मनाचे शांतीनें विश्वशांति । मनोत्पत्ती उत्पन्न ॥४४॥ यदर्थीं पुढें उत्तर । सांगेन तुज सविस्तर । मनोनिग्रहप्रकार । आणीक विचार असेना ॥४५॥

संयमान्मनसः शांतिमेति संसारसंभ्रमः । चंद्रे चास्तमये प्राप्ते यथा क्षीरमहार्णवः ॥ १ ॥

(विस्मरण स्वरूपाचें । तोचि संसारविभ्रम सांचे । विशेष भ्रम ह्मणोनि याचें । विभ्रम ऐसें अभिधान ॥ १ ॥ भ्रमाचें रूप संसारभान । यालागीं संसारभ्रम बोलिला जाण । मुळींचा विपरीत भान ह्मणोन । विशेषाकारें बोलिला ॥ २ ॥) नानाविचित्र हा संसारभ्रम । असत्यपणेंचि साचा नेम । कर्म सर्वदा आहे विषम । न वटे भ्रम निरोधल्या ॥ ४६ ॥ जैसे स्वप्नींचे जे जे पदार्थ । भ्रमरूपचि यथार्थ । शय्येवरी एकाकी शयित । तेथ अपरिमित पदार्थ कैंचे ॥ ४७ ॥ हस्ती अश्व रथ पदाति । तेथ चतुरंग सेनेची ख्याति । देखणें कालगति । राहाटी पुरती सर्वांची ॥ ४८ ॥ तें काय रघुनाथा साच होतें । कीं मनचि परिणमलें तेथें । हें सांग पां मज निरुतें । रचिलें तेथें कोणें हें ॥ ४९ ॥ तेथें सर्व व्यवहार करी । झांकी नेत्रें देखे भारी । श्रवणें आयके शब्दकुसरी । न चलतां करी गमनक्रिया ॥ ५० ॥ पोटाळलिया हातें देणें घेणें । निश्चेष्टकरणीं सर्व करणें । हें काय साच कीं मनें होणें । जाण या खुणें रघुवर्या ॥ ५१ ॥ तेंचि मन उपशम पावतां । तेव्हडी रचना होय वृथा । जागृति होऊनि पाहतां । न दिसे तत्वतां कांहींचि ॥ ५२ ॥ स्वप्नहेंही संभ्रमरूप ख्याळ । मन परिणाये विस्तारे सकळ । तेंचि मन होतां निश्चळ तेव्हडें जाण नाहींच होये ॥ ५३ ॥ तैसा हा संसारसंकल्पभ्रम । तो जाण मनाचाचि

१ मारलें. २ अशा [illegible]. ३ जगाच्या खोटेपणाचें स्वरूप. ४ मन ताब्यांत ठेवण्याचे प्रकार.
५ स्थिर केल्यावर.

परिणाम । तेंचि मन पावल्या उपरम । तोही उपरम पावत ॥ ५४ ॥ जैसा चंद्राचेनि उदयें पूर्णता । क्षीरार्णव भरे भरितां । तोचि चंद्र अस्तग्रया पावतां । अस्तवे सर्वथा भरितेंही ॥ ५५ ॥ ये संसारभ्रांतीकारण । येक मनचि रघुनाथा जाण । मनोदयें उदय पूर्ण । होये क्षीण मनोलयीं ॥ ५६ ॥

चित्तोन्मेषनिमेषाभ्यां संसारस्योदयक्षयौ । वासनाप्राणसंरोधादनिमेषं मनः कुरु ॥ २ ॥

चित्तउन्मेषनिमेषेंकरून । संसारासि उदय[१] क्षय जाण । उन्मेषशब्दें उदय पूर्ण । अस्तु जाण निमेषता ॥ ५७ ॥ अगा प्रपंचोन्मुखता मनाची । मनाची उन्मेषता तोचि । तेणें अनर्थपरंपरा भवाची । असे होतचि परियेसीं ॥ ५८ ॥ प्रपंचोन्मुखता मनाचें । हें विस्मरण स्वस्वरूपाचें । हेंचि अनर्थपुनरावृत्तीचें । जीवासि साचें येणेंचि होये ॥ ५९ ॥ मनाचा अस्तु तो अनिमेषता[३] । जालिया स्वरूपीं सावधानता । प्रपंच पावे अस्तमयता[४] । न भासे तत्वतां मिथ्यापणें ॥ ६० ॥ अगा साचचि प्रपंचु वस्तुता । तरी मनाच्या अस्तेंही असता । ह्मणोनि मनोलय जाण तत्वतां । नासे पुरता मनोनाशें ॥ ६१ ॥ याकारणें गा रघुनाथा । प्रपंचोन्मुख होऊं नेदावें चित्ता । याची करावी अनिमेषता । स्वरूपीं तत्वतां बोधावें ॥ ६२ ॥ अनिमेष करावया चित्त । येथें कोण उपाय प्रस्तुत । ऐसें ह्मणसी तरी बहुत । असती निश्चित रघुराया ॥ ६३ ॥ तरी चित्तनिमेष करावया । अनंत उपाय करिती रघुराया । परी तथासिचि येती सहाया । निवृत्ति यया न करवे ॥ ६४ ॥ तरी ययाच्या उपायाप्रति । येकचि कारण गा रघुपति । सांगेन तें एकाग्र चित्तीं । अयोध्यापति परिस पां ॥ ६५ ॥ तरी प्राणांवासनांचेनि संयोगें । मन हें सैरा धांवों लागे । प्राणनिश्चळें राहे उगें । सांडी वेगें संकल्पजाळ[५] ॥ ६६ ॥ मन निश्चळही असतां । वासना उठती अकस्माता । तेणेंकरूनि चळ होतसे चित्ता । अनावरता[६] अद्भुत ॥ ६७ ॥ (विषयापासून वासना वळवावी । ते पुनः परत न आणावी । मध्येंचि स्थिरता करावी । निरालंबीं तियेचि ॥ १ ॥ निरालंबीं वासना ठेविता । घडे प्राणांची निरोधता । प्राणनिरोध झाला असतां । वासना वितळोन जाय ॥ २ ॥ वासना जेथें नाहीं । तेथें मनचि बोलों नये कांहीं । मनाचेनि अभावें पाहीं । हें भवभान न दिसे ॥ ३ ॥ भवभान जें न भासे । तें सर्वत्र स्वरूपाचि असे । तेणें करावें साधन ऐसें । प्राण निरोधापासुनि ॥ ४ ॥) तंव रघुनाथ ह्मणे जी श्रीसद्गुरु । हा तंव विस्मय वाटे थोरु । मन स्थिर असतां वासनाभिरु । उठतां प्रकारु कैसा होये ॥ ६८ ॥ मनचि जरी स्वयें उठी । तरीच वासना पुरविती पाठी । मन निश्चळ वासना लाठी । हे तंव गोष्टि अपूर्व ॥ ६९ ॥ तरी वासनेचें रूप कसें । तें सांगावें स्वामी विन्यासें । तंव ऋषि ह्मणती सावकाशें । अपूर्व ऐसें सांगेन ॥ ७० ॥ तरी पूर्वकमाचेनि संस्कारें । जे

---

१ नाहींसें होतें. २ उत्पत्ति. ३ डोळे न मिटणें. ४ नाश. ५ कल्पनांचा पसारा. ६ न आवरायासारखा.

जे वृत्तीसि पदार्थ स्फुरे । ते ते जाणावी निर्धारें । वासना चतुरें इयापरी ॥ ७१ ॥ मनें निश्चळ असतां देहीं । घटपटत्वें स्फुरे जें पाहीं । तोचि संस्कार वासनारूपेंही । उठे पाहीं विबुद्धनाथा ॥ ७२ ॥ अथवा देहीं अकस्मात । क्रोधलोभ असती उपजत । मग तेणेंचि मन असे वेष्टित । होय निश्चित पदार्था ॥ ७३ ॥ कां जे येक वेळे देखिलें आइकिलें । जें जें कांहीं अनुभविलें । तेणेंचि संस्कारें मागुतें स्मरलें । तेंचि भलें वासनारूप ॥७४॥ यालागीं मनासि चंचळता होआवया । दोनचि कारणें गा रघुराया । प्राण आणि वासना इया । करिती चित्ता या चंचळत्वा ॥७५॥ तऱ्ही तुवां येकचि करावें । वासनाप्राणातेंचि रोधावें । तेणें चित्त हें स्वभावें । अनिमेष भावें होईल ॥ ७६ ॥ अनिमेष जालिया मन । मग कैचें होईल प्रपंचभान । मिथ्या हें मिथ्यत्वाचि जाण । जग हें स्वप्न ऐसें भासे ॥७७॥

अयं हि स्वविकल्पोत्थः स्वविकल्पपरिक्षयात् । जायते दग्धसंसारो निःसार इति निश्चयः ॥ ३ ॥

अगा हा सर्व संसार । स्वविकल्पेंची साचार । विकल्प क्षयींच असार । भस्मसात होऊनि जाये ॥ ७८ ॥ स्वस्वरूपविस्मरणें बहिर्मुखता । जेधवां चित्तवृत्तीसि होता । तोचि विकल्प जाण तत्वतां । संसार व्यथा उपजे जेणें ॥ ७९ ॥ या विकल्पापासाव उत्पत्ति । या संसाराची होये गा रघुपती । विकल्पक्षयींच दग्धस्थिति । जाय भस्मांतीं निश्चयें ॥ ८० ॥ येक लवमात्रही स्वरूपीं विस्मरण । होतांचि विक्षेप होये दारुण । देहादिप्रपंचाचें भान । सत्यत्वें पूर्ण भासो लागे ॥ ८१ ॥ तेचि स्वरूपीं सावध होतां । विपरीत देहादि सर्व तत्वतां । न स्फुरे गा रघुनाथा । पावे भस्मता विकल्प ॥ ८२ ॥ जैसा वेणु जळोनि भस्मसागर । तैसा भव होये निःसार । बोधरूपें कार्यप्रकार । न करवे साचार बाधलेपणें ॥ ८३ ॥ अगा संसाराची वृद्धि । हे तंव अविचारित सांसिद्धि । विचाराप्रति क्षणार्धीं । न राहे सुबुद्धि रामचंद्रा ॥ ८४ ॥

परिज्ञानेन सर्पत्वं चित्रसर्पस्य नश्यति । यथा तथैव संसारः स्थित एवोपशाम्यति ॥ ४ ॥

चित्रींचा देखोनि महाभुजंग । अतिभयकंपें कांपे आंग । देहांतुचि पावे सांग । यथार्थ अव्यंग मानूनियां ॥ ८५ ॥ तोचि परिज्ञानें पाहतां । सर्पत्व नासोनि जाय तत्वतां । तैसाचि हा संसार ताता । होय वृथा सम्यक ज्ञानें ॥ ८६ ॥ अगा अविचारें संसाराची फरारी । विचारें न राहे क्षणभरी । यालागीं संसारभरोवरी । सर्व प्रकारीं भ्रममूळ ॥ ८७ ॥ हा मिथ्याचि तो मिथ्या किती । बोलावा गा श्रीरघुपति । मनःकल्पित सर्वार्थीं । आइकें पुढती सांगेन ॥ ८८ ॥

पुंसो निजमनोमोहकल्पितो दुःखदः स्मृतः । संसाररचिरवेतालो विचारेण प्रलीयते ॥ ५ ॥

अगा मुख्य परब्रह्मीं जें अज्ञान । तद्रूप तो मनोमोह जाण । तेणें काल्पित संसार

---

१ हे ज्ञान्यांच्या श्रेष्ठा. २ संसाराचें स्मरण. ३ आपणच्च काढलेला संशय. ४ बाहेरील पदार्थंच पाहणें. ५ आपोआप मिळालेला. ६ प्राप्ति. ७ दोष रहित. ८ खऱ्या समजानें.

दारुण । सत्यत्वें पूर्ण कल्पिला ॥ ८९ ॥ जेवीं बागुल बाळकाप्रति । आला ह्मणून भय दाविती । तेणें यथार्थ मानूनि भ्रांतमति । दुःख अति देखतसे ॥ ९० ॥ बाळक आपुलेंनि विसरें । वेताळाचें मानूनि भेडरें । तेणें दुःख शोकादि स्फुरे । पावे निर्धारें मरणांतु ॥ ९१ ॥ तैसें मुळींचेनि अज्ञानें करून । मनोमोह महादारुण । तेणें संसार कल्पिला जाण । लटिकाचि पूर्ण साच केला ॥ ९२ ॥ लटिकाचि परी सर्व दुःखातें देता । नानायोनि भोगविता । सांगतां याची दुःखवार्ता । मन सर्वथा कंटाळे ॥ ९३ ॥ मुख्य स्वरूप आत्मयाची विस्मृति । जाली तेव्हांचि दुःखाची प्राप्ति । ते गणितां नये अभिव्यक्ती । अपार गति ययाची ॥ ९४ ॥ आपणातें नेणोनि पाहिजे । तंव दीर्घसंसार-बागुल देखिजे । याचेनि दुःखें सहजें । आंगीं वाजे आकल्पांत ॥ ९५ ॥ जऱ्ही हा विचारें पाहिला । तऱ्ही निःशेष जाण हरपला । याचा मागुही बुडाला । नाहीं देखिला कोठेंही ॥ ९६ ॥ अगा स्वप्नींचें वोडंबर । विस्मृतीनें दिसे महाथोर । प्रबोधमात्रेचि निःसार । भस्मसार होऊनि जाये ॥ ९७ ॥ जैसें वोडंबरीचेनि अनेकपणें । क्षणयेक बुद्धीसि भ्रमणें । विचारूनि पाहिजे मनें । न दिसे कोण्हे पदार्थींही ॥ ९८ ॥ तैसा हा संसारबागुल । साचपणें स्फुरला सकळ । विचारें पाहतां निर्मूळ । मिथ्या फोल होऊनि जाये ॥ ९९ ॥ यालागीं गा रावणारि । मिथ्याभूत हा सर्वांपरी । ययातें सुखोपायेंचि मारीं । विचारें करीं येकलेनि ॥ १०० ॥ अगा सम्यक विचारु जो रघुपति । तेचि संसाराची समूळ शांति । स्थिर न राहे विचाराप्रति । क्षणें भस्मांतीं पावतसे ॥ १ ॥ हा जरी वास्तव साच असता । तरीं ज्ञानादिकीं ही न लोटता । हा स्वयें मिथ्याचि तत्वतां । भासे वृथा अविचारें ॥ २ ॥ हा संसारभ्रमु गा रघुनाथा । हे केवळ मायाचि तत्वता । मायेवेगळें विचारितां । मूळ सर्वथा असेचिना ॥ ३ ॥ तेंचि ऐक आतां सांगेन । मायाशब्दें मिथ्या जाण । तेंचि तें अज्ञान संपूर्ण । जाण खूण विबुद्धवर्या ॥ ४ ॥

ईदृशी राम मायेयं या स्वनाशेन हर्षदा । न लक्ष्यते स्वभावोऽस्याः प्रेक्ष्यमाणैव नश्यति ॥ ६ ॥

अगा विश्वरूपें जाण हे माया । हर्ष देतसे स्वनाशेंकरूनियां । सम्यक दर्शनें जाय नासोनियां । स्वभावें राया अलक्षपणें ॥ ५ ॥ जो कीं प्रपंच मिथ्याभूत । तोचि ते माया जाण निश्चित । इयेचा स्वभाव अलक्षित । वेंचतांही सत्य मानतसे ॥ ६ ॥ खळाळीवेगें वाहिजे जळें । तेथें तें गेलेंचि ऐसें कळे । तें मागोनि जैसें तैसें मिळे । यालागीं न कळे वेचलें ऐसें ॥ ७ ॥ खळाळी ऐसें वाहतां । जळ वेगें जात असतां । परी उणें न पडे सर्वथा । मिळे तत्वतां ह्मणोनी ॥ ८ ॥ जातां वेगें तरी दिसे । परी तेथें शुष्क पडलें न दिसे । मागोन मिळे जैसें तैसें । ह्मणोनि भ्रंशे देखोनि बुद्धि ॥ ९ ॥ ऐसेनिही भ्रमले-

---

१ बागुलबावा, कल्पित भय. २ स्पष्टता. ३ ज्ञान झाल्याबरोबर. ४ खरोखर. दूर न जातां. ५ लक्षांत न येण्यामुळें.

पणें जाण । अपरि दिवसीं खलाळी येऊन । ह्मणती तेंचि जळ हें जाण । वेंचलेंपण लक्षवेना ॥ ११० ॥ तैसें घडतां मोडतां ही विश्वकोटि । जना लक्षवेना भ्रमदृष्टी । तेंचि हे साच ऐसी गोष्टि । परिपाठें अनादि भासे ॥ ११ ॥ नाना आलातचक्राचियेपरी । वेगें अखंडचि दिसे भंवरी । अलक्षपणें स्वयें भंवरीपरी । जना भारी भासत ॥ १२ ॥ तेचि स्थिरावोनि पाहिजे । तंव परिच्छिन्न अणुमात्र देखिजे । मग कोलीत ऐसें वोळखिजे । निश्चित कीजे सम्यक ज्ञानें ॥ १३ ॥ तैसें जग हें जितुकेंचि मोडे । तितुकें तेणेंचि काळें घडे । वेचतांही रितें न पडे । ह्मणोनि साच मानी ॥ १४ ॥ यालागीं स्वभावो मायेचा । अलक्ष लक्षवेना तिचा । परी स्वनाशें हे आनंदाचा । सोहळा साचा करितसे ॥ १५ ॥ मायाशब्दें शुद्ध अज्ञान । जेसें स्वसुखासि केलें व्यवधान । प्रत्यक्ष परी आच्छिन्न । केलें पूर्ण नास्ति ऐसें ॥ १६ ॥ नास्ति नेव प्रकाशते' । ऐसें केलें स्वतः सिद्धातें । ते नाशिलिया स्वप्रकाशातें । आपणात पाविजे ॥ १७ ॥ त्या मायेचे उद्भवें दुःखप्राप्ति । इयेचेनि नाशें सुखसंपत्ति । ह्मणोनि इयेचा लयोचि गा सुमति । करावा सर्वार्थी रघुपुंगवा ॥ १८ ॥ अगा तूं ऐसें ह्मणसी । इयेचेनि व्यापें वर्त्तणें त्रैलोक्यासी । आणि आच्छादक आत्मयासी । ते कैसेनि निवर्त्तेल ॥ १९ ॥ जियेचें भय सिद्धसाधकांसी । जपी तपी परिव्राजकांसी । जे कीं नागवियाही शरिरेंसी । जनां सर्वांसी छळित असे ॥ १२० ॥ ते नाशलिया कैसी नासे । आनंदघन कैसा प्रकाशे । तरी ऐसें हें अनारिसें । सर्वथा विश्वेशें न मानावें ॥ २१ ॥ अगा मायेची येव्हडी थोरी । शेवटीं नाशे क्षणाभीतरी । परी न नाशे उपायसहस्रीं । सर्व प्रकारीं विचारेंविण ॥ २२ ॥ विचारशब्दें सम्यक ज्ञान । तेणेंची सर्वथा नाशे अज्ञान । ज्ञानेंविण सर्व साधन । वृथा जाण कोटीवरी ॥ २३ ॥ इयेतें नाशावयालागीं । जे जे उपाय वाणती आंगीं । तेणें अधिकाचि साधनांगीं । इंधनें आगि प्रबळे जैसी ॥ २४ ॥ तैसें नित्यनैमित्तिक कार्यानुष्ठान । अग्निहोत्रादि सर्वही यज्ञ । जप तप अध्ययन तीर्थाटण । उद्यापन व्रतादिकांचें ॥ २५ ॥ इत्यादि साधनेंही करितां । हें तंव मायाकार्या तत्वतां । कार्यकारणपुष्टता । न विचारितां घडेचि कीं ॥ २६ ॥ प्रपंच तोडावयाकारणें । नित्य प्रपंचानुसंधान करणें । तरी तो तुटे कीं वाढे तेणें । विचार सर्वज्ञ करावा ॥ २७ ॥ नाना तोडावया इंद्रजाळ । पारवी आम्रवृक्षादि सकळ मेळ । तें केलिया तुटे कीं प्रबळ । होय हें सकळ विचारीजे ॥ २८ ॥ यालागीं नाना साधनें जे करिजेती । तेणें मायाचि वाढे सर्वार्थी । ह्मणोनि येके विचारेंचि क्षणाप्रति । नाश सर्वार्थी करावा ॥ २९ ॥ तरी रघुपति येकचि करावें । नाना उपाय सांडावे । सम्यक विचारूनि पाहावें । तेणें

---

१ दुसऱ्यादिवशीं, पुढें. २ स्पष्ट. ३ नाहीं व भासतही नाहीं. ४ नाश. ५ रघुकुलामध्यें श्रेष्ठा. ६ संन्याशांस. ७ सरपणानें. ८ गारुड्याचें कृत्य.

निरसावें मायेतें ॥ १३० ॥ अगा सम्यक विचाराच्या अंतीं । माया नाहींच होये गा सुमति । आंधार पाहिजे लावून वाति । तो कोण्हेच प्रातीं दिसेना ॥ ३१ ॥ येरव्हीं तमाचा पारु नेणिजे । व्यक्तिसि नये कोण्हे व्याजें । नानाउपाय तयासि कीजे । तरी तो सहजें काये जाये ॥ ३२ ॥ त्यासि अनेक उपाय करिता । न निवर्त्ते गा रघुनाथा । हातीं दिवटी घेऊनि पाहतां । नाहींच सर्वथा ऐसें होये ॥ ३३ ॥ नाना स्वप्नसंभ्रमाची भरोवरी । अपरिमित दिसतसे भारी । दवडितां नानाउपचारी । कोटी प्रकारीं न निवर्त्ते ॥ ३४ ॥ तेचि प्रबोधोनि पाहिजे । तंव तें कोठेंचि न दिखिजे । तैसी माया विचार-व्याजें । पाहतां सहजें नाहींच होये ॥ ३५ ॥ अगा अविचारेंसि संसार भासे । तो विचारेंचि क्षणमात्रें नाशे । ह्मणऊनि उपाय आँन नसे । दृढ विश्वासें जाणावें ॥ ३६ ॥ जऱ्ही कोणी ऐसें ह्मणती । मुळीं साधनें कायि दूषिलीं असती । तऱ्ही लटिकेंसि कां पां दूषिजती । अतएव गति हे निर्मूळ दिसे ॥ ३७ ॥ तरी प्रेक्षमाणैव या एवकारें । सर्व ही दूषिलीं साधनांतरें । येक प्रेक्षमाणचि साचोकारें । जाण निर्धारें नाशहेतु ॥ ३८ ॥ यालागीं संस्कृत देखिलियाविण । न करिजे ईषतही निरूपण । तुह्मी श्रोते असा शास्त्र-ज्ञ । सर्व हे खूण जाणतसा ॥ ३९ ॥ सर्व एवकारें साधनां इतरांची व्यावृत्ति । केली जाणा सर्वार्थी । येक ईक्षणमात्रचि नाशाप्रति । साधन सुमति बोलिजे ॥ १४० ॥ ययालागीं गा रघुपति । मायेच्या समूळ नाशाप्रति । येक ज्ञानमात्रचि सर्वार्थी । आन गति असेचिना ॥ ४१ ॥ तेणें सम्यक ज्ञानें नाशिली । तरी माया नाहीं ऐसी जाली । तेथें आनंदाची दिवाळी । लाभे नव्हाळी न साधतां ॥ ४२ ॥ अगा माया नाशावयाचें कोडें । कायसें पां तुज येवढें । हे अनिर्वाच्या परी संत न घडे । जाण धडफुडे मिथ्यारूप ॥ ४३ ॥ मिथ्या तें मिथ्याचि असे । नाशावया प्रयास कायसे । तें विचारें करूनि नासे । मृगांभ जैसें कां रज्जुसर्प ॥ ४४ ॥ अधिष्ठानें जें अध्यारोपित । तें तंव साच नव्हे गा निश्चित । तें भ्रममात्र परी विचारें भस्मांत । होये क्षणांत रघुवर्या ॥ ४५ ॥ तैसी हे माया जाण । अधिष्ठानब्रह्मीं आरोप पूर्ण । ते विचारेंचि होतसे क्षीण । प्रयास कोण साधनांचे ॥ ४६ ॥ आणि हे द्वादशविकल्पीं विकल्पित । ह्मणोनि हे कदा नव्हे संत । तेंचि ऐकें प्रस्तुत । विकल्पार्थ रघुनाथा ॥ ४७ ॥ जरी माया सत्य ह्मणसी । तरी संत तें अबाधित परियेसीं । इयेचा बाधुज्ञानें देखसी । तरी सत्य कैसी ह्मणावी ॥ ४८ ॥ संत तें त्रिकाळीं अबाधित । जैसें ब्रह्म तें नित्य सदोदीत । तैसी ते नव्हे निश्चित । असे बाधित सम्यक ज्ञानें ॥ ४९ ॥ जरी हे माया सत्य असती । तरी ज्ञानाचेनि बापें न नाशती । आणि हे तरी ज्ञानें असे बाधिती । तरी सत्य कसे रितीं

---

१ मायेच्या विचाराच्या मिषानें. २ दुसरा. ३ 'एव' यापदानें. ४ पहावयाचें. ५ राहण्याचें ठिकाण जें ब्रह्म. ६ संत्-खरें.

ह्मणाल ॥ १५० ॥ ययालागीं हे नव्हे सत्य । असत्य ह्मणतां तरी भासत । खपु-ष्पासी असत्य । नव्हे निभ्रांत रघुराया ॥ ५१ ॥ असत्य तें त्रिकाळीं ही न भासावें । वंध्यापुत्राऐसे निःशेष नसावें । माया तरी तैसी नव्हे । प्रत्यक्ष संभवे विश्वाकारें ॥ ५२ ॥ तैसें मायेचें असणें । नाहीं सत्य ना असत्यपणें । इयेचें यथातथ्य कोण्हे । नव्हे प्रमाणें षड्विधें ॥ ५३ ॥ आतां सदसत ह्मणावी माया । तरी हेंही न घडे गा रघुराया । दोन्हीच पदार्थ बोलावया । असती यया जगामाजी ॥ ५४ ॥ येक तो जाण सत्य पदार्थ । येक तो असे असतार्थ । परी येकुचि कांहीं सत्यासत्य । ऐसा पदार्थ असेचिना ॥ ५५ ॥ अगा सत तें नव्हे असत । असत तें नव्हे सत । ह्मणोनि दोन्हींसि येकार्थ । सदसत घडेना ॥ ५६ ॥ आतां विशद विद्विलक्षण । ह्मणिजे संता असंताहूनि भिन्न । हें तंव घडे गा प्रमाण । सदसद्विलक्षण माया होये ॥ ५७ ॥ यालागीं सद्विल-क्षणता । मायेसि घडेचि गा तत्वतां । सदसद्विलक्षण तें सर्वथा । सत्य ना असत्यता अनिर्वाच्य ॥ ५८ ॥ जे जे वस्तु अनिर्वाच्य होये । ते ते न साधितां मिथ्या पाहे । शुक्तीसि रजतें अनिर्वाच्य होये । तैशी पाहे माया ही ॥ ५९ ॥ जैसें स्वप्न कां मृगजळ । सत्य ह्मणतां नाशे तत्काळ । असंत ह्मणतां प्रांजळ । ह्मणोनि पोकळ अनिर्वाच्य तें ॥ १६० ॥ संत कीं असंत ज्या बोलतां नये । ते ते वस्तु अनिर्वाच्य पाहें । मायेचें यथातथ्य ऐसें आहे । यालागीं होये अनिर्वाच्य ते ॥ ६१ ॥ अनिर्वाच्य तें मिथ्याभूत । हें जाण पां निश्चित । विचारें विलय पावत । नाहींच होत क्षणमात्रें ॥ ६२ ॥ आतां ब्रह्मेसि माया भिन्न । तरी स्वतंत्र पदार्थ आहेत कोण । ब्रह्म सद्वय नव्हे जाण । अद्वय पूर्ण येकरस ॥ ६३ ॥ ब्रह्मावेगळें वस्तु यथार्थ । कोण्ही असतां कां पदार्थ । तरी ब्रह्मासि सद्वयत्व । येतें निश्चित राघवा ॥ ६४ ॥ ब्रह्म तें अद्वय स्वतःसिद्ध । ऐसें श्रुति बोलती प्रसिद्ध । सद्वय स्थापितीं तें विरुद्ध । श्रुति अगाध परियेसा ॥ ६५ ॥

संमति श्रुति ॥ ॥ एकमेवाद्वितीय ब्रह्मनेह नानास्ति किंच नेति ।

एकं एव अद्वितीयं ऐसें । तीन पदें एकार्थांशें । बोलिलें तें विन्यासें । सांगों विश्वेशें परिसावें ॥ ६६ ॥ एकं पदेंचि कार्यार्थ होता । तरी पदत्रय बोलें कोण्या अर्था । तेंही सांगेन तत्वतां । आयिक आतां रघुनाथा ॥ ६७ ॥ तरी विजातीय सजातीय स्वगत । हे ब्रह्मीं भेद कल्पित । तयाची व्यावृत्ति निश्चित । केली निभ्रांत पदत्रयें ॥ ६८ ॥ तरी एकं या पदें विजाती भाव । व्यावर्त्तिला अनात्मप्रपंच सर्व । एवकारें सजातीय जीव । जाण सर्व व्यावर्त्तिले ॥ ६९ ॥ जो कीं प्रपंचु आनात्मा । तो तंव वेगळा नाहीं ब्रह्मा । रज्जूसि अभिन्नत्वें भुजंगोत्तमा । तैसें रामा मानीं सत्यसिद्ध ॥ १७० ॥ गंधा-

१ आकाशांतील कल्पित फुलाप्रमाणें. २ खोटा पदार्थ. सत याहून निराळा. ३ सांगतां न येणारी. ४ शिंपीचे ठायीं रुपें. ५ दुजेपणा असणें. ६ निवारण केला. ७ अनात्म्यामुळें भासणारा प्रपंच.

क्षत लाविताँ रज्जु सर्पासी । तरी सर्प राहिला कोण्हे देशीं । रितें शोभलें रज्जूसी । यालागीं रज्जूसि अभिन्न ॥ ७१ ॥ आतां सजातीय जे जीवजाति । ते तंव चतन्य गा रघुपति । नानावर्टीं सूर्य भासती । काय भिन्न होती मुख्य तरणीसी ॥ ७२ ॥ यालागीं भेद विजातीय सजाति । ब्रह्मासि न घडे कोण अर्थीं । ह्मणोनि एकमेव ह्मणे श्रुति । विश्वमूर्ती यया भावें ॥ ७३ ॥ आतां अद्वितीयभावें स्वगतभेद । तोही निरसिला गा विशद । ब्रह्म तें जाण अद्वयानंद । अतिअगाध सर्वत्र ॥ ७४ ॥ स्वगतभेद सत् चित् आनंद । तिहीं पदीं भासे जो भेद । तोचि येणें निरसिला विशद । अद्वयानंद ब्रह्म येक ॥ ७५ ॥ त्या तिहीं पदांचें एकपण । रामपदव्याख्यानीं केलें पूर्ण । वैराग्यप्रकरणीं विशद जाण । अनुभवरूप प्राप्त जेणें कां ॥ ७६ ॥ येथेंहीं विस्तारें सांगिजे । तरी ग्रंथविस्तारु येणें व्याजें । यालागीं अल्पाचि बोलिजे । सर्वज्ञा सहजें बुझतील ॥ ७७ ॥ इतुकाचि कोण्ही ह्मणेल विस्तारु । तरी हा तंव केला ब्रह्मविचारु । विपश्चितासि हाचि प्रियकरु । सेविती सार अत्यादरें ॥७८॥ जें कीं प्रापंचिक बोलणें । तयासिचि विस्तारु ह्मणणें । ब्रह्मवेत्त्यासि जाड जेणें । विस्तारु कोणें त्या ह्मणिजे ॥७९॥ आणि या ग्रंथाचें हृद्गत । तें तंव ब्रह्मचि जाण निश्चित । यालागीं करूनि एकाग्रचित्त । ग्रंथार्थ निश्चित परियेसा ॥ १८० ॥ तरी ऐसेंचि बोलताती श्रुति । ब्रह्म तें अद्वैताचि गति । येथें दुसरें मायादि विश्वस्थिति । कैंची प्रतीति येईल ॥ ८१ ॥ ईह ब्रह्मणि ना ना किंचिन्नास्ति । ऐसें प्रत्यक्ष बोले श्रुति । तरी माया भिन्नत्वें वर्त्तती । कोणे प्रांतीं ब्रह्माचिये ॥ ८२ ॥ यालागीं भिन्नत्व मायेसी । सर्वथा न घडे गा परियेसीं । अभिन्न तरी जैसी तैसी । ब्रह्मा-ऐसी असावी ॥ ८३ ॥ ब्रह्म जेसें स्वप्रकाश निचोट । तैसीच असावी हे ब्रह्मनिष्ठ । प्रपंचाकारें प्रगट । प्रकाशें स्पष्ट नसावी ॥ ८४ ॥ ह्मणऊन घडे भिन्नपण । आतां ह्मणावी भिन्नाभिन्न । हें तंव वचनाचि अप्रमाण । भिन्नभिन्न घडेना ॥ ८५ ॥ भिन्न तें तंव नव्हे अभिन्न । अभिन्न तें नव्हे भिन्न । येकचि पदार्थ भिन्नाभिन्न । कदा जाण घडेना ॥ ८६ ॥ आतां भिन्नाभिन्नविलक्षण । हें तंव सर्वथा न घडेचि जाण । माया अनिर्वाच्य संपूर्ण । निर्वचन न करवे ॥ ८७ ॥ माया व्यक्त ना अव्यक्त । अथवा नव्हे व्यक्ताव्यक्त । व्यक्ताव्यक्तविलक्षण निश्चित । अनिर्वाच्यार्थ संपूर्ण ॥ ८८ ॥ जैसें शुक्तिचा ठाईं रजत । तें नव्हे सत ना असत । कदापि नव्हे सदसत । लक्षण निश्चित अनिर्वाच्यपणें ॥ ८९ ॥ ना तें सदसद्विलक्षण । शुक्तिसि भिन्न ना अभिन्न । ना तें भिन्नाभिन्नविलक्षण । अनिर्वाच्य जाण मिथ्याभासें ॥ १९० ॥ जऱ्ही तो अनिर्वाच्य पदार्थ । तो तो सर्वथा जाण मिथ्याभूत । तो सम्यक् ईक्षणेंचि असे नाशत । उपायशत तया कायसें ॥ ९१ ॥ तैसी

१ 'राम' या पदाचा अर्थ. २ या ब्रह्मामध्यें काांहीं देखील नाहींच नाहीं. ३ व्याख्यान. ४ स्पष्ट व अस्पष्ट यांहून वेगळा. ५ पहाण्यानें.

अनिर्वाच्य जाण माया । ते ते प्रेक्षणें नासेचि गा रघुराया । तेथ अनेक उपाय करावया । कारण यया असेचिना ॥९२॥ अगा सद्गुरूचेनि लब्धबोधें । इक्षणमात्रेंचि माया बाधे । मग असिजे गा निजबोधें । परमानंदें परिपूर्ण ॥९३॥ अगा मायेचा निरास न करितां । स्वस्वरूप न प्रकाशे गा रघुनाथा । तेंचि सांगेन आतां । समाधान चित्ता जेणें होये ॥ ९४ ॥

अहो विचित्रा मायेयं तात विश्वविमोहिनी ॥ सर्वांगप्रोतमप्यात्मा यमात्मानं न पश्यति ॥ ७ ॥

हें थोर आश्चर्य रघुराया । अतिविचित्र हे दृढावली माया । विश्वातें मोह करूनियां । करी आत्मया आच्छादन ॥ ९५ ॥ तो मायेचा आच्छादनविकार । सांगेन तुज पंचप्रकार । पंचपर्वा ऐसें वेदांतीं थोर । करिती निर्धार इयेचा ॥ ९६ ॥ तैसिया पातंजलीचिया युक्ति । पंचक्लेशा इतें ह्मणती । तेचि पंचपर्वा विश्वमूर्ति । जें कीं वेदांतीं बोलिलें ॥ ९७ ॥ तयांचीं नांवें गा श्रीनिवासा । आइकें येकाग्रमानसा । अविद्या अस्मिता राग द्वेषाभिनिवेशा ॥ ऐसिया भावा करूनियां ॥ ९८ ॥ तऱ्ही येक ते माया दुजी ते अस्मिता । तिसरा राग आणि द्वेष चौथा । पांचवा अभिनिवेश सर्वथा । व्याख्यान सर्वथा परियेसीं ॥ ९९ ॥ तरी स्वस्वरूपाचें करी जे आवरण । तियेचें नांव अविद्या जाण । स्वतःसिद्धाचें होये विस्मरण । येव्हडी पूर्ण शक्ति जियेची ॥ २०० ॥ अस्मिता ह्मणिजे विपरितभावना । देहात्मबुद्धि जे विचक्षणा । हें द्वितीय पर्व गा रघुनंदना । भवभावना विक्षेप हा पैं ॥ १ ॥ देहाचे ठायीं अतिप्रीति । तें तिसरें पर्व गा राग ह्मणती । त्यासि प्रतिकूळ ते द्वेषाभिव्यक्ति । पर्वव्युत्पत्ति चतुर्थाची ॥ २ ॥ देहाभिनिवेशें अहं कृश स्थूळ । बाळ युवा वृद्ध इत्यादि मेळ । आपण जीत मेलों मे तळमळ । पर्व सकळ पंचम हें ॥ ३ ॥ देहमरणें आपण मृत्य । अजरामरासि मानिती सत्य । देहविकारास मस्तकीं घेत । तेणें भ्रमत नानायोनि ॥ ४ ॥ स्वयें स्वप्रकाश निर्मळ निरंजन । अज अमर चैतन्यघन । तयासि येव्हडी दशा जियेचेन । तियेतें जाण माया ह्मणती ॥ ५ ॥ ते जाण विश्वाची मोहनी । मोह करी स्वरूप भुलवुनी । तेंचि सांगेन कार्मुकपाणी । चित्त देऊनी परियेसीं ॥ ६ ॥ यया मोहाचें मोहकपण । विश्वीं आत्मा असतां प्रोत पूर्ण । अनेका मण्यांमाजी सूत्र येक जाण । अनुस्यूत घन निबिड हा ॥ ७ ॥ हेंचि विचित्रपण इये मायेचें । आच्छादन करी स्वसिद्धाचें । प्रकाशन करी विपरीताचें । जेणें जनाचें ज्ञान भ्रंशे ॥ ८ ॥ येक स्वरूपभूत जे कीं नित्यज्ञान । तेंचि वेची प्रपंचाकार करून । तेंचि दृश्यत्वें बैसे सत्यत्व घेऊन । मोह दारुण जाण हाचि ॥ ९ ॥ नाना शर्कराकणीं येकचि गोडी । अथवा दीपकळिकां प्रकाशप्रौढी । अनेका विस्फुलिंगीं उष्णता गाढी । येकचि परवडी सर्वां जैसी ॥ २१० ॥ कां तंतु जैसा पटाभीतरीं । प्रोत असे गा सर्वांपरी । तैसा आत्मा हा विश्वांतरीं । निरं-

---

१ स्थिर झाली. २ योगशास्त्रप्रमाणें. ३–७ हीं पांच क्लेशाचीं नांवें. ८ क्लेशाचें स्थान. ९ अज्ञाचें. १० वस्त्रांमध्यें.

तरि अखंडत्वें ॥ ११ ॥ असोनियां अपरोक्ष सत्य । जैसा तैसा न देखिजेत । हेंचि मोहाचें मोहक पण अद्भुत । करी विपरीत देहपणें ॥ १२ ॥ जें कीं सर्वथा सर्वगत । तें ब्रम्हाचि नाहीं केलें निश्चित । आणि अनात्म जें विपरीत । तेंचि कुश्चित भासवी ॥ १३ ॥ तरी या विश्वाची असत्यता । तुज मी सांगेन रघुनाथा । असत्याची असत्यता । सत्य भ्रांता मानली ॥ १४ ॥

यद्इदं दृश्यते किंचित्तन्नास्ति किमपि स्फुटं । यथा गंधर्वनगरं यथा वारि मरुस्थले ॥ ८ ॥

आगा जे जे कांहीं वस्तु देखिजे । जे जे मनादिइंद्रियीं प्रकाशिजे । ते ते मिथ्याभूत सहजें । दृश्य रघुराजें जाणावें ॥ १५ ॥ अगा जे वस्तूचे आहेपण । तेंचि विचारें स्पष्ट नाहीं जाण । ते वस्तु नाहीं संपूर्ण । हेचि खूण जाणावी ॥ १६ ॥ अगा जें विचारें न राहे । तैसीचि वस्तु कोण आहे । हेंचि दृढ विचारूनियां पाहें । जेणें होये निश्चळ दृढ ॥ १७ ॥ यया विश्वायेव्हडें वोडंबर । साच ऐसें दिसे सविस्तर । निर्धारूनि करितां विचार । तंव तें अस्थिर आभासमात्रें ॥ १८ ॥ जरी तूं ऐसें ह्मणसी । तरी प्रत्यक्ष देखिजे प्रपंचासी । मा लटिकें कैसें ह्मणावें यासी । संदेहासि होतसे ॥ १९ ॥ तरी रघुनाथा ऐसें जाण । हे तंव भ्रमाचें कार्य संपूर्ण । सत्य वस्तूच्या ठाईं आभासमान । तें अज्ञानें जाण भासत ॥ २२० ॥ जैसें आकाशीं गंधर्वनगर । भ्रमें अधिष्ठानीं दिसे साचार । तयाचा करितां विचार । मिथ्याचि फार भासतसे ॥ २१ ॥ नाना मरुस्थळाच्या ठायीं । जैसें मृगांभ दिसे पाहीं । परी तें अज्ञानें साच ऐसेंही । भ्रमें कांहीं भासत ॥ २२ ॥ तेंचि विचारें निर्धारूनि पाहतां । जळ येथें नाहींच तत्वतां । तो केवळ भ्रमुचि गा रघुनाथा । स्थळ तत्वतां जैसें तैसें ॥ २३ ॥ तैसें भ्रममूळचि हें सर्व जग । भ्रमेंचि भासतसे सांग । विचारूनि पाहतां चांग । तंव तें व्यंग मिथ्यापणें ॥ २४ ॥ जें कीं निर्धारितां न राहे । ते वस्तु सर्वथा साच नव्हे । जागृत होऊनियां पाहे । तंव स्वप्न काय भासत ॥ २५ ॥

यत्तु नो दृश्यते किंचिदंते वस्त्वपि किंचन । अविनाशं यदस्तीह तत्तदात्मेति कथ्यते ॥ ९ ॥

तैसा आत्मा नव्हे जाण । प्रपंचाऐसा नव्हे दृश्यमान । प्रपंचांतीं कोण्ही पदार्थ पण । नाहीं निपटून कोणीही ॥ २६ ॥ कोण्हीही पदार्थ नव्हतां । आणि नाशु तरी नाहीं सर्वथा । तेंचि तें सर्वत्र पाहतां । आहे तत्वतां चित्सुखपणें ॥ २७ ॥ (जें जवळी असतां ही दिसों नेणे । परंतु न वेष्टिजे अभाव गुणें । ज्ञप्तिमात्र अविनाशपणें । ये शरीरीं नांदतसे) ऐसें अविनाश जें संत । कोण्ही पदार्थ ही न मिळत । तयासिच आत्मा ह्मणिजेत । जाण निश्चित रघुराया ॥ २८ ॥ जें कीं सर्वेंद्रियांसि ग्राह्य जाण । ह्मणऊनि स्थूळ दृश्यमान । तें तें नश्वर मिथ्यापण । मागां खूण सांगितली ॥ २९ ॥

पसारा. २ जलरहित देशांत. ३ मृगजळ. ४ विचार करून. ५ घेण्यास योग्य.

आत्मा प्रपंचनाशें न नासे । प्रपंचोत्पत्ती उपजणें नसे । तेंचि तें जाण सर्वांशें । येर तें भ्रंशे दृश्यजात ॥ २३० ॥ तरी कायानिमित्त हें भासे । लटिकेंचि कोठें आभासे । हें पुससी तरी सावकाशें । सांगेन परियेसें रघूत्तमा ॥ ३१ ॥

स्वज्ञानदर्पणे स्फारे सस्मता वस्तुजातयः । इमास्ताः प्रतिबिंबंति सरसीव तटद्रुमा ॥ १० ॥

अगा स्वज्ञानेंदर्पणाचे ठायीं । समस्त वस्तुजात प्रतिबिंबती पाहीं । ज्ञानेंविण विचारितां कांहीं । सर्वथा नाहीं कोठेंही गा ॥ ३२ ॥ जें हें स्वरूपभूतविज्ञान । वृत्तिरूपज्ञानाहूनि भिन्न । तेंचि तो जाण ज्ञानदर्पण । विश्व हें संपूर्ण जेथें बिंबे ॥ ३३ ॥ प्रपंची अनुस्यूत सर्व ज्ञान । ज्ञानाच्या ठायीं सर्व भासमान । नाहीं अणुमात्र ज्ञानेंविण । पाहें खूण विचारुनी ॥ ३४ ॥ सर्व विश्व पदार्थजात । येका ज्ञानाच्याच ठायीं प्रतिबिंबत । सरोवरतटींचे द्रुम समस्त । प्रतिबिंबत जैसे ॥ ३५ ॥ कोण्ही ऐसें ह्मणताती । तटीं साच देखिलें द्रुमजाति । तरीच ते द्रुतीं प्रतिबिंबती । नसतां प्रतीति कैसी होये ॥ ३६ ॥ तैसा वस्तूच्या ठायीं प्रतिबिंबला । तरी पूर्वी पप्रंच साच कोण्हें देखिला । साचेंविण मूळ भ्रमाला । कोण मेळा सांग पां ॥ ३७ ॥ नैय्यायिकाचें मत ऐसें । साचचि हा प्रपंच असे । साचासिच भ्रम ऐसें । कां पां मानसें मानावें ॥ ३८ ॥ ना हो तुझी ह्मणतां भ्रमचि होये । तरी भ्रमाची सामग्री काये । जैसा शुक्तीच्या ठायीं भ्रमुचा आहे । सामग्री पाहे तेथें असे ॥ ३९ ॥ तेथें सामान्य शुक्तिचें ज्ञान । विशेष नीलपृष्ठ त्रिकोणाचें अज्ञान । ऐसें कोण्ही येक पदार्थाचें ज्ञान । रजतस्मरण देशांतरीचें ॥ २४० ॥ अन्यस्थळीं रजत साच देखिलें । तरी तेंचि शुक्तिकेसि भासलें । अन्यथा येथें उगलें । कोणा बोलें भासेल ॥ ४१ ॥ तैसें सामान्य ब्रह्माचे ज्ञान । आणि विशेष पदार्थाचें अज्ञान । साचचि पदार्थाचें स्मरण । जालें ह्मणऊन भ्रम ह्मणतां ॥ ४२ ॥ न कदाचिदनीदृशं जगत् । ऐसें श्रुति असे बोलत । जग नाहीं ऐसा निभ्रांत । काळ ईषर्त असेचिना ॥ ४३ ॥ प्रपंच सर्वदा साच आहे । तरी सर्वत्र स्मरतु जाये । अन्यथा असत्याची प्रतीति होये । ऐसें काय विचारिजे ॥ ४४ ॥ येके ठायीं साच वस्तु देखिजे । तरी ते सादृश्य स्मरिजे । अन्यथा कहीं नुपजे । भ्रम नुदिजे निर्मूळ ॥ ४५ ॥ आणि भ्रमुचि जरी ह्मणतां । तरीशुक्तिका रजतरूपेंचि कां देखतां । इतर पदार्थ प्रतीतिपथा । कां पां सर्वथा नयेचि ॥ ४६ ॥ तरी आयिका येथें उत्तर । जें कां बोलिजेल मनोहर । जेणें संदेहसागराचा पार । पावसी साचार अनायासें ॥ ४७ ॥ अहो रजतभ्रमाप्रति कारण । मुख्य शक्तिचें अज्ञान । तेणेंचि होय रजतभान । सामग्रीविण अनायासे ॥ ४८ ॥ अज्ञान जालियानंतरें । तेथ काय येक न स्फुरे । स्वप्नींचा शरीरच्छेद निर्धारें । कोणे प्रकारें

१ दिसणाऱ्या सर्व वस्तु. २ आत्मज्ञानाच्या आरशांत. ३ सर्वत्र असलेलें. ४ काळया रंगाची पाठ. ५ रुप्याची आठवण. ६ थोडासा. ७ आपल्या अंगाचे तुकडे होणें.

देखिजे ॥ ४९ ॥ तुह्मीं ह्मणाल जागृतीचा उलथा । तेचि ते जाण स्वप्नावस्था । तरी जागृतीसि स्वशरीर छेदतां । सांग तत्वतां कोठें देखिलें ॥ २५० ॥ आणि स्वप्नीं गगनभक्षण । करितुसे स्वयें आपण । हेंचि जागृतीमाजी कोण । देखे चिन्ह विपरीत ॥ ५१ ॥ आणि तुह्मीं ऐसें बोलिलेती । दोषसामग्रीविण नव्हे भ्रांति । जैसी शुक्तिसी चाकचिक्याची व्यक्ति । दोषप्रतीति होतसे ॥ ५२ ॥ जैसा रजता चाकचिक्यादि असे । तैसेचि शुक्तिकेसिही प्रतीति भासे । देखोनियां लोक पिसे । रजत ऐसें मानिती ॥ ५३ ॥ स्वप्नीं स्वप्नप्रपंचासी । सादृश्यें दोष कोण आरोपिसी । तेथ कारण येक अज्ञानासी । जे कीं आपणासी विस्मृति ॥ ५४ ॥ आपुलिया नेणणियावांचून । स्वप्नीं सामग्री आहे कोण । ना सादृश्य ना दोषदर्शन । येक अज्ञानावांचूनियां ॥ ५५ ॥ आणि सादृश्यें जरी भ्रमु होये । तऱ्ही ब्रह्मेसि प्रपंच सादृश्य काये । ब्रह्म निर्गुण पूर्णानंद पाहे । व्यापक आहे सर्वत्र ॥ ५६ ॥ स्वप्रकाश स्वयंवेद्य । निरवयव निर्वेद्य[1] । प्रपंच सगुण दुःखाद्य । अतिनिंद्य भावयुक्त ॥ ५७ ॥ परिच्छिन्न परप्रकाश । पैरसंवेद्य[2] सावयवांश । अविद्याभूत आणि दृश्य । विश्व दृश्य तें नश्वरपणें ॥ ५८ ॥ यया परस्परें सादृश्य काये । विचारितां बहु अंतर आहे । यालागीं सादृश्य भ्रम नोहे । अज्ञानें पाहे होतसे ॥ ५९ ॥ हे जाण पां अनिर्वचनीय अन्यथा ख्याति । निर्धारूनि ठेविलें वेदांतीं । अन्यथा शास्त्रांनिया युक्ति । सर्वेही निश्चिती दूषूनियां ॥ २६० ॥ आणि ब्रह्माच्या ठायीं । सामान्य विशेष सर्वदा नाहीं । ब्रह्म तें निःसामान्य अनपायी । निर्विशेष पाहीं सर्वदा ॥ ६१ ॥ ब्रह्मीं सामान्य विशेष बोलतां । श्रुतीसि येतसे अप्रमाणता । आणि श्रुतीविरुद्ध बोलतां । पाषंड तत्वतां आंगीं वाजे ॥ ६२ ॥ गोच्या ठायीं सामान्य गोत्वें । विशेष खंडत्व मुंडत्व । तेसें ब्रह्मीं सामान्य विशेषत्व । कैचें सत्व नाना तर्की ॥ ६३ ॥ कां शुक्तीचा ठायीं शुक्ति सामान्य । विशेष तें नीलपृष्ठ त्रिकोण । तैसें ब्रह्मीं विशेष सामान्य । सांगा कोण वर्त्तनम ॥ ६४ ॥ नाहीं सामान्यशब्दें समस्त । विशेष शब्दें बोलिजे व्यस्त । ऐसें समस्त व्यस्तात्मक वस्तु सत्य । ब्रह्म निश्चित ऐसें असे ॥ ६५ ॥ समस्तशब्दें निर्विकार । व्यस्तशब्दें प्रपंचाकार । समस्तव्यस्तात्मक निर्धार । ब्रह्म साचार ह्मणाल तुह्मीं ॥ ६६ ॥ आकार गेलिया विशेष । उरे सामान्य निर्विशेष । यालागीं भ्रमसामग्री सावकाश । असे असंगा परब्रह्मीं ॥ ६७ ॥ ब्रह्म निर्विकार होये । प्रपंचाकारही तेंचि आहे । जैसें सुवर्ण येक सोनें आहे । तेंचि पाहे कटकाँकारीं ॥ ६८ ॥ तरी सुवर्णविकारी परिणाम । अलंकाररूपें जालें हेम । तैसें नव्हे परब्रह्म । सर्वदा सम परिणामशून्य ॥ ६९ ॥ विश्व ब्रह्माचा परिणाम । हें बोलणेंचि अतिविषम । विकारशून्य परब्रह्म । तेथें परिणाम कैसा

१ दोषिमध्यें घडणारे प्रकार. २ आपल्यामुळेंच जाणले जाणारे. ३ जाणण्यास कठीण. ४ दुसऱ्या पदार्थाच्या योगानें जाणावयाचें. ५ गायपणा. ६ शिंगें वगैरे नसणें. ७ कडें वगैरे दागिन्यांच्या रूपानें.

घडे ॥ २७० ॥ ब्रह्म सर्वदा निर्विकार । तेथ परिणाम कैंचा जगदाकार । हें बोलणोंचि अविचार । होय निर्धार भ्रममूळ ॥ ७१ ॥ जे जे वस्तु परिणामवंत । ते ते जाणावी नाशवंत । दुग्ध परिणामूनि दधि होत । स्वयें नाशत नामरूपें ॥ ७२ ॥ जे कीं परिणामवाद बोलती । ते सर्वथा कांहींच नेणती । ते शब्दज्ञानीच ह्मणिजेती । अनुभवें नेणती सर्वथा ॥ ७३ ॥ परिणामी तें विकारवंत । सांश जाणावें निश्चित । ब्रह्म अविकारी निरंश बोलत । श्रुतिसंमत परियेसा ॥ ७४ ॥ ब्रह्म परिणामीं प्रपंचाकार असतें । तरी वेदें विश्व कां निषेधिजेतें । 'नेतिनेति' येणें अर्थें । प्रपंचातें निराकारी ॥ ७५ ॥ आणीकही वेद श्रुति । प्रपंचातें निषेधिती । निषेधबोधीं ब्रह्मस्थिति । तेचि श्रोतीं परिसिजे ॥ ७६ ॥

॥ अपूर्वमनपरमनंतरमबाह्यमिति ॥

पूर्वशब्दें बोलिजे कारण । तें तंव शुद्ध अज्ञान । ब्रह्म कार्यकारणविहीन । नव्हे अज्ञान सर्वथा ॥ ७७ ॥ अपरशब्दें कार्यजात । दृश्यप्रपंच हा समस्त । ब्रह्म कार्य नव्हे निश्चित । उभयातीत अनादिपणें ॥ ७८ ॥ ना ब्रह्म कोण्हाचेंही अंतर । दुसरा पदार्थ नाहीं साचार । बाह्यही नव्हे निरंतर । निर्विकार सर्वत्रपणें ॥ ७९ ॥ येक वस्तु साच असावें तरी त्यासि अंतर्बाह्य बोलावें । प्रपंचासि सत्यत्व न संभवे । ह्मणऊनि हें नव्हे सर्वथा ॥ २८० ॥ ऐसी प्रपंचाची व्यावृत्ति । सर्वप्रकारें करितसे श्रुति । ब्रह्म प्रपंचरूप हे स्थिति । अघट सर्वार्थी घडेना ॥ ८१ ॥ ब्रह्म सर्वथा निर्विशेप । त्यासि कैंचें सामान्यविशेप । श्रुति निषेधी प्रपंचास । तेंचि सावकाश परियेसा ॥ ८२ ॥

समंति श्रुति ॥ ॥ अस्थूलमनणुमदीर्घमन्हस्वमिति ॥

ब्रह्म दीर्घ ना अदीर्घ स्थूळ । अणु ना ह्रस्व केवळ । तें ज्ञप्तिमात्र निष्फळ । अतिनिर्मळ निःसंगपणें ॥ ८३ ॥ स्थूळसूक्ष्मपणें प्रपंच घडे । परी ब्रह्म हें कांहींच न घडे । ह्मणूनि श्रुति हें स्थूळादिकोंडें । अतिनिवाडें निषेधी ॥ ८४ ॥ यालागीं जग जैसें आहे तैसेंयासी । ब्रह्म ह्मणती तेणें रूपेंसी । सर्वथा वर्म न कळे त्यांसी । मानिती ब्रह्मासि विशेप सामान्य ॥ ८५ ॥ यालगीं भ्रमाचें कारण । मुख्य येकचि गा अज्ञान । तेणें विचित्र भ्रम हा जाण । अधिष्ठानीं पूर्ण भासत ॥ ८६ ॥ तैसें अज्ञानदर्पणाचा ठायीं । विश्व हें विचित्र भासे पाहीं । केवळ अज्ञानावांचूनि कांहीं । पाहातां सर्वही हेंचि फळ ॥ ८७ ॥ यालागीं गा रघुनाथा । विश्व हें समूळ विचारितां । ब्रह्मीं स्फुरतसे मिथ्या साच भ्रांता भ्रमास्तव ॥ ८८ ॥

सर्गाश्चित्स्पंदमात्रात्मा सम्यग्दृष्टौ विलीयते । उदेत्यसम्यग्दृष्ट्या तु रज्वां सर्पभ्रमो यथा ॥ ११ ॥

हा सर्ग समस्त विश्वरचना । तें सर्वही ज्ञानमात्राचें गा रघुनंदना । नामरूप भासे तो भ्रमु जाणा । नाहीं चिद्घनावांचूनि आन ॥ ८९ ॥ सम्यक्ज्ञानें विचारूनि पाहतां । तंव

---

१ नाश होणारी. २ नाहीं ह्मणून सांगते. ३ निराकरण. ४ फक्त जाणतां येणारें. ५ उत्पत्ति.

नाहींच होये सर्वथा । येऱ्हवीं अज्ञानें उद्‍बुद्धता । पावे ताता जगदाभास ॥ २९० ॥ ययाचें उपजणें निमणें । होतसे गा ज्ञानाज्ञानें । पावे ताता उदय अज्ञानें । लीन ज्ञानें होतसे ॥ ९१ ॥ जैसी रज्जूच्या ठाईं सर्पबुद्धि । रज्जूअज्ञानें भयकंपबुद्धि । सम्यक दृष्टीनें निरवधि । नाहीं त्रिशुद्धि पावतुसे ॥ ९२ ॥ तेवीं सुखदुःखासि कारण । ज्ञानें सुख अज्ञानें दुःख दारुण । बंधमोक्षासि मूळ ज्ञानाज्ञान । जाण हे खूण रघुराया ॥ ९३ ॥ अज्ञानें भोगवासना उठी । सर्व संसार वासनेच्या पोटीं । संसारीं जन्ममरणाची आटी । दुःखकोटि उत्तरोत्तर ॥ ९४ ॥

भोगवासनया याति बंधो दार्ढ्यमवस्तुजः ॥ तयोपशांतया याति बंधो जगति तानवं ॥ १२ ॥

विषयभोगवासनेंकरून । भवबंध दृढ पावे जाण । विचारितां याचें कारण । मुख्य अज्ञान रघुराया ॥ ९५ ॥ आणि अज्ञान विचारितां । कोण्ही न मिळे पदार्था । हें अवस्तुभूतमूळ तत्वतां । जाण ताता निर्धारीं ॥ ९६ ॥ न विचारितां तरी भरलें आहे । विचारितां नाहीं होये । हें नाहींचपणें हों पाहें । स्फुरलें आहें अवस्तुपणें ॥ ९७ ॥ याचे विकल्प बोलतां । तरी मायेचे बोलिजे ताता । ते मायाच अज्ञान तत्वतां । दोन्ही सर्वथा असती ना ॥ ९८ ॥ ऐसें अवस्थाभूत अज्ञान । त्यापासाव भवबंध जाण । दृढता पावे संपूर्ण । वाढतां पूर्ण भोगेच्छा ॥ ९९ ॥ तिये भोगवासनेची शांति । समूळ जाली गा रघुपति । तेणेही बंध जाये क्षयाप्रति । तन्मूल ह्मणती जयासी ॥ ३०० ॥ अज्ञानकृत बंध जाण । अज्ञानक्षयें बंधही क्षीण । बंध नाहीं तोचि मोक्ष पूर्ण । जाण खूण रघुवर्या ॥ १ ॥ अगा मोह तोचि इतुका रघुपती । कीं मनासि सत्यत्वें विश्वप्रतीति । मनाचेनि चंचळत्वें उपजती । तन्नाशें शांति प्रपंचाची ॥ २ ॥

मनः संपद्यते तस्मान्महतः परमात्मनः ॥ सुस्थिरादस्थिराकारं तरंगा इव वारिधेः ॥ १३ ॥

याही मनाची उत्पत्ति । ब्रह्माचिपासाव रघुपती । मनोत्पत्तीनें विश्वप्रतीति । अन्य गति असेचिना ॥ ३ ॥ जो कीं परमात्मा व्यापकपणें । जयातें श्रुति ब्रह्म ह्मणें । तेथूनि मनासि उपजणें । चंचळपणें रघुपुंगवा ॥ ४ ॥ परी रघुनाथा ऐसें ह्मणसी । ब्रह्म सुस्थिर निश्चळ सर्वांशी । त्यापासाव चंचळत्व मनासी । उत्पत्ति कैसी घडेल ॥ ५ ॥ तरी आइक तुज सांगेन । स्थिरापासाव चंचलोद्गमन । जैसा क्षीराब्धि निश्चळ पूर्ण । स्थिरता जाण गांभीर्यें ॥ ६ ॥ तयापासाव अतिचंचळ । उठतसे बुबुदजाळ । क्षणिक स्थिर सकळ । स्थिर प्रांजळ भासती ॥ ७ ॥ तैसे या मनाचे उद्गार । चंचळत्वें उठती संभार । तोंचि हें विश्व चराचर । क्षणभंगुर मनोमय ॥ ८ ॥

यत्स्वयं स्वैरमेवाशु संकल्पयति नित्यशः ॥ तेनेयमिंद्रजालश्रीर्जगति प्रवितन्यते ॥ १४ ॥

---

१ वरवर दिसणें. २ त्रास. ३ वस्तुतः नसलेलें. ४ जग आहे अशी खात्री. ५ त्यांच्या नाशानें. ६ स्थिर. ७ चंचलाची उत्पत्ति. ८ बुडबुडे. ९ उत्पन्न होणें. १० क्षणभर टिकणारें.

हेंचि मन स्वयें गा रघुनाथा । यथास्वेच्छे अतिशीघ्रता । निरंतर विश्व कल्पितां । उसंत सर्वथा नाहीं त्यासी ॥ ९ ॥ तेणें मनसंकल्पें करूनी । विश्वइंद्रजाळ भासे नयनीं । जैसा इंद्रजाळिक जनीं । संकल्पेंकरूनि विश्वरूप दावी ॥ ३१० ॥ इंद्रजाळकाचेनि संकल्पें । येव्हडे इंद्रजाळ आरोपे । पक्षांचीं पारखीं रूपें । चर्मी सापें दाखवी ॥ ११ ॥ तें येव्हडे साचाचिसारिखें दिसे । पाहतां साच कांहींच नसे । तैसें मनसंकल्पेंचि विश्व-भासे । सर्वथा नसे साच कांहीं ॥ १२ ॥ जागृत अवस्थेचे ठायीं । हें मनाचि इंद्रजाल कल्पी पाहीं । त्या नाम विश्व ह्मणती सर्वेही । विचित्र पाहीं श्यामसुंदरा ॥ १३ ॥ मनकल्पनेविरहित । जग नाहींच गा निश्चित । कोण पदार्थ साच येथ । भासे जगांत विचारिजे ॥ १४ ॥ अगा याची प्रतीति रघुनाथा । करूनि पाहें पां आतां । मन स्वरूपीं निमग्न असतां । प्रपंच सर्वथा न दिसे ॥ १५ ॥ मनचि विरोलें स्वरूपीं । मग प्रपंच कोण संकल्पी । ह्मणऊनि हा संकल्पारोपी । असंकल्पीं न भासत ॥ १६ ॥ हा मनाचेनि संकल्पें उठी । मन स्वरूपस्थ जाल्या कदा न उठी । तरी मनकल्पित हे गोष्टी । साच जगजेठी जाण पां ॥ १७ ॥ स्वरूपानुभव नाहीं जयासी । कैसें प्रत्यया येईल त्यासी । तरी सुषुप्तीचा अनुभव समग्रांसी । लहानाथोरासि होतसे ॥ १८ ॥ सुषुप्तीसि मन नाहीं । तेथें येकु आत्माचि पाहीं । तेथें मनाचे अभावें जग नाहीं । ऐसा सर्वांही अनुभव असे ॥ १९ ॥ अगा प्रपंच जरी साच असता । तरी सुषुप्तीसिही भासता । कालत्रयीं न नाशता । जाण रघुनाथा हेंचि खूण ॥ ३२० ॥ आणि स्वप्नींही जागृतीऐसा । न देखिजे जैसा तैसा । तेथें दिसे विपरीत ठसा । भासे वीरेशा मनकल्पित ॥ २१ ॥ ऐसें जागृतीं येक कल्पिलें । स्वप्नीं आणीकचि विस्तारलें । सुषुप्तीसि नाहींच जालें । ह्मणे या बोलें नश्वर ॥ २२ ॥ जें कीं साच वस्तु असे । तें कालत्रयीं असे जैसें तैसें । सर्वथा न भासे अनारिसें । खूण विश्वेशें जाणावी ॥ २३ ॥ जैसा आत्मा सर्वदा संत । कालत्रयीं अबाधित । विपरीत नव्हे ईषत् । असे तंतु येकरूप ॥ २४ ॥ तैसें विश्व हें साच असतें । तरी कालत्रयींही न बाधिजेतें । आणि विपरीत नें भासतें । सर्वदा असतें जैसें तैसें ॥ २५ ॥ यालागीं असंत सर्वांपरी । हें मनसंकल्पा भरोवरी । मनोदयें घे फरारी । नाहीं उरी मनोलयें ॥ २६ ॥ यथालागीं जागृतिदशे । मनचि हे इंद्रजाळ प्रकाशे । कल्पित परी साच ऐसें । मानिजे मानसें रघुवीरा ॥ २७ ॥

यथा बालस्य वेतालो मृतिपर्यंत दुःखदः । असदेव सदाकारं तथा मूढमतेर्जगत् ॥ २५ ॥

अगा बाळकासि जैसा वेताळ । साचपणें देतसे तळमळ । मृत्युपर्यंत दुःखकल्लोळ । करी सकळ दुःखमय ॥ २८ ॥ बाळासि[7] बागुल दाविती । तो वस्तुता[8] नये व्यक्ति ।

---

१ विश्रांति. २ गारुडी. ३ निरनिराळी. ४ मग्न झालें. ५ निद्रेचा. ६ ज्याला बाध नाहीं असा. ७ गारुड्याचें कृत्य. ८ स्पष्टपणाला.

तेथें शब्दमात्राचीच व्याप्ति । दुःखसंतति तितुकेनी ॥ २९ ॥ त्याबागुलाचेनि भयेंकरून । बाळ कांपे गदगदून । दुःख करी अति दारुण । शोक संपूर्ण मृत्यूवरी ॥ २३० ॥ बागुल आला ह्मणती । तंव तंव पीडे दुःखाच्या आर्ती । आप्तें केलिया वेतालनिवृत्ति । सुखसंपत्ति पावतु ॥ ३१ शब्देंचि ह्मणती बागुल आला । तो दुःखरूप होये तयाला । मृत्यूपर्यंत दुःखसोहाळा । दे त्या वेळा अढळपणें ॥ ३२ ॥ गेला ह्मणतांचि आप्तवचन । अतिसुख मानी अंतःकरण । तैसा हा लटिकाचि संसारपूर्ण । दुःख दारुण देत असे ॥ ३३ ॥ अज्ञानें मूढता बुद्धीसी । परिपूर्ण जया मनुष्यासी । साच संसार होये तयासी । दे दुःखासिवेताळापरी ॥ ३४ ॥ संसार साच तरी नाहीं । परी अज्ञानें साच मानिती सर्वही । बाळासि बागुल जैसा पाहीं । दुःख अनपायी देत असे ॥ ३५ ॥ तैसा मरणांतर मरण । पावतु साच मानून । तंव तंव दे दुःख दारुण । संसार पूर्ण भासवी ॥ ३६ ॥ हा सत्यत्वें आला ना गेला । केवळ शब्दमात्रेंचि विरूढला । परी दुःखरूप असे जाला । अज्ञानाला रघुराया ॥ ३७ ॥ पाहतां हा असदाकार । अज्ञानें भासे संसार । यासि जो जो कीजे प्रतिकार । तेणेंचि फार होऊं लागे ॥ ३८ ॥ जरी भाग्यें भेटे सद्गुरु । तरीच सरे हा भवपूरु । येऱ्हवीं अतिदुर्धरु । दुःखसागरु दुःखात्मक ॥ ३९ ॥ शुद्धब्रह्माचे ठायीं । हा अक्षरूपें भासे पाहीं । तेणेंचि भांबावती सर्वही । विचार कहीं न करितां ॥ ३४० ॥

अव्युत्पन्नस्य कृतके कनके कटके यथा । कटकज्ञप्तिरेवास्ति न मनागपि हेमधीः ॥ १६ ॥

अगा सुवर्णाचेनि अलंकार । केलिया कटकसंभार । तेथें कटकबुद्धिचि निर्धार । करी सत्वर अव्युत्पन्न ॥ ४१ ॥ तया अव्युत्पन्ना पुरुषासी । अळंकारीं पृथक् बुद्धि निश्चियेंसी । होय परी सुवर्ण ऐसी । नव्हे परियेसीं बुद्धि त्याची ॥ ४२ ॥ जेसें ज्याचें नाम आकार देखती । ते ते तैसेची यथार्थ मानिती । परी अधिष्ठानीं रघुपती । बुद्धि सर्वार्थी न रिघे त्याची ॥ ४३ ॥ दृष्टि तरी प्रत्यक्ष सुवर्ण देखती । परी सुवर्णाकारें नव्हे चित्तवृत्ति । नामरूपेंचिकरूनि भ्रांति । होये सर्वार्थी रघुपुंगवा ॥ ४४ ॥ हेंचि आश्चर्य गा रघुनाथा । प्रत्यक्ष यथार्थ वस्तु देखतां । विपरीत भास होये चित्ता । अपूर्वता काये सांगें ॥ ४५ ॥ येवढें भ्रांतीचें बळ । देखणे दृष्टीसि घाली पडळ । शुद्धासिचि करि मळ । देखे वरळ पिचाच जैसा ॥ ४६ ॥ तैसा अपरोक्ष आत्मा स्वतःसिद्ध । त्याचा भ्रमें करूनियां बोध । नामरूपात्मक हें विरुद्ध । देखे अंध शुद्धस्वरूपीं ॥ ४७ ॥ अगा नामरूपासाठीं । वस्तु दवडिली बारावाटीं । असत्प्रपंच देखे दृष्टी । साचपणें सृष्टी रघुनाथा ॥ ४८ ॥ तेंचि नामरूप वेगळें करुनी । विश्व पाहिजे विचारुनी । तऱ्ही तेंचि ब्रह्म निर्वाणीं । नाहीं कहाणी जगाची ॥ ४९ ॥ अगा दुरी कोठें नव जावें । तपादि

१ बागुलबोवा गेला असें सांगणें. २ अतिशय. ३ अनेक वेळां मरणें. ४ खोटा. ५ अढथळा. ६ अज्ञानी. ७ मूळ ठिकाणीं, आत्मरूपीं. ८ स्वतः अनुभवास येणारा. ९ निरास.

नलगे साधावें । येक नामरूप त्यजूनि पाहावें । तरीच पावावें शुद्धब्रह्म ॥ ३५० ॥ नामपंचकाची व्याप्ति । अवघी वर्त्ततसे गा रघुपति । सांगेन आइकें संमति । येकाग्र चित्तीं परिस पां ॥ ५१ ॥

संमति श्रुति । अस्ति भाति प्रियं रूपं नाम चेत्यंशपंचकम् । आद्यत्रयं ब्रह्मरूपं जगद्रूपं ततो द्वयं ॥

सत्ता प्रकाश आणि सुख । हें त्रयात्मक येक ब्रह्म देख । जग तें नामरूपात्मक । होये सम्यक् नामद्वयें ॥ ५२ ॥ यालागीं नामरूपात्मक हें जग । नामरूपात्मकातीत ब्रह्म अव्यंग । हें निश्चियें जाण तूं सांग । नाहीं भाग ब्रह्मासि पैं ॥ ५३ ॥

तथाज्ञस्य पुरागारनगनागादिगोचरा । ईदृशी ईदृगेवास्ति नत्वन्या परमार्थदृक् ॥ १७ ॥

पुरें अगारें वृक्षयाति । पर्वत मानूनि विचित्रास्थिति । येणें विभागेंचि क्षिति । मूळ मानिती अज्ञानें ॥ ५४ ॥ अगा अज्ञाना पुरुषासी । विपरीत दृष्टी परियेसी । वैचित्र्य पृथ्वीयेसी । येकरूपासि देखती ॥ ५५ ॥ हा वृक्ष हा उंच पर्वत । हें गृह हें नगर विस्तृत । नामरूपचि प्रकार अनंत । कल्पिती यथार्थ नेणपणें ॥ ५६ ॥ अगा पृथ्वीयेच्या ठाईं । हे अनेक विकार कल्पिले पाहीं । ते यथार्थ मानूनि सर्वही । भ्रमडोहीं बुडती ॥ ५७ ॥ पृथ्वीतेंचि पृथ्वी न देखती । आणि नानाविकार कल्पिती । नसतेंचि सत्य मानिती । भ्रम वाढविती अज्ञानें ॥ ५८ ॥ जो कोण्ही परमार्थद्रष्टा असे । तो तंव पृथ्वीचि जाणे सर्वांसें । तेथें नेणोनि विपरीत भासे । तें तंव नसे तयाप्रति ॥ ५९ ॥ तैसें ब्रह्मीं नानाकार । विश्व भासे चराचर । तेंचि भ्रमें मानिती साचार । जे अविचारी ज्ञानहीन ॥ ३६० ॥ तया विश्वाच्या उत्पत्तिक्षयीं । दुःखमय त्यासि जगत्रयी । अधिष्ठानज्ञानसुख अक्षयी । जाण अनपायी रघुनाथा ॥ ६१ ॥

अज्ञस्य दुःखौघमयं ज्ञस्यानंदमयं जगत् । अंधं भुवनमंधस्य प्रकाशं च सचक्षुषः ॥ १८ ॥

अगा अज्ञानपुरुषासी । जग हें दुःखमयचि परियेसीं । बाह्यदृष्टि ते कारण दुःखासी । निश्चयेंसि जाण रामा ॥ ६२ ॥ स्वस्वरूपाची अस्फूर्त्ति तें अज्ञान । हें स्वरूपाचें नेणणेपण । तेंचि दुःखाचें कारण । जाण रघूत्तमा ॥ ६३ ॥ अज्ञानकृत जे विपरीतबुद्धि । जे ब्रह्मींच करी विश्वबुद्धि । तेचि दुःखरूप क्षयव्याधि । जाण त्रिशुद्धि रघुपुंगवा ॥ ६४ ॥ स्वशरीर आदिकरुनी । जें कीं विपरीत भासे नयनीं । तें तें दुःखस्वरूप भरंवसेनी । कोदंडपाणी जाण तूं ॥ ६५ ॥ जयासि नाहीं स्वस्वरूपीं अज्ञान । तोचि तो ब्रह्म नित्यानंदघन । तयासि हें विश्व ब्रह्म पूर्ण । दुःखस्वप्न कैंचें भासे ॥ ६६ ॥ जऱ्ही ब्रह्म वेगळें दुजें भासे । तऱ्ही विश्वाकारें दुःख प्रकाशे । तेणें सुखरूप असे । ब्रह्मची भासे ह्मणउनी ॥ ६७ ॥ अगा आपण जो जैसा असे । त्यासि तैसेंचि सर्व

---

१ नाम व रूप या दोन प्रकारांनीं. २ भेदरहित. ३ आत्मस्वरुपाच्या ज्ञानापासून होणारें सुख. ४ बाहेरचे पदार्थ खरे असें मानणें.

प्रकाशे । अंधासि अंधगृह जैसें । न कळे मानसें अंधकूप ॥ ६८ ॥ जरी माडिया गोपुरें धवळारें । वरी चित्रें लिहिलीं मनोहरें । तऱ्ही तें अंधासि गाभारें । जाण निर्धारें अंधकाराचें ॥ ६९ ॥ अंध तो राजभुवनीं बैसविला । तो मानी मी अंधकपीं पडिला । तैसा जो स्वस्वरूपीं आंधळा । विश्व तयाला दुःखस्वरूपचि ॥ ३७० ॥ तोचि राजमंदिर डोळसासी । प्रकाशमंत मनोहर परियेसीं । तैसें विश्व हें ज्ञानियासी । ब्रह्मचि सर्वांशीं सुखरूप ॥ ७१ ॥ यालागीं जो जैसा सर्व आहे । त्यासि सर्वही तद्रुप होये । तृप्तासि विश्व तृप्त पाहें । क्षुधिता होये क्षुधारूप ॥ ७२ ॥ आर्त्तासि भासे पीडित । क्लेशिया क्लेशरूपें निश्चित । धनवंतासि जग धनवंत । कुश्चिता कुश्चित शुद्धासि शुद्ध ॥ ७३ ॥ अगा तूं ऐसें ह्मणसी । शुद्धब्रह्मीं विश्वोत्पत्ति[2] कैसी । अजडीं जडरूपासी । वस्ती कैसी सांगिजे ॥ ७४ ॥ तऱ्ही दृष्टांतेंकरूनियां उत्तर । देइजेल अतिचमत्कार । तें आइक तूं सुंदर । संदेहपार पावसी जेणें ॥ ७५ ॥

यथा विशुद्ध आकाशे सहसैवाभ्रमंडलं । भूत्वा विलीयते तद्वदात्मनि ह्यखिलं जगत् ॥ १९ ॥

अगा अतिविशुद्ध आकाशीं । अकस्मात् अभ्रमंडळें जैसीं । होऊनियां येकसरिसीं । तेचि ते चौपासीं होऊनि ठाती ॥ ७६ ॥ आकाश तऱ्ही निर्मळ अतिशुद्ध । व्यापकपणें अतिवृत्त[3] वृद्ध । अखंड आणि स्तब्ध । अति अगाध उदंडपणें ॥ ७७ ॥ तयाच्या ठाईं जड अभ्रजात । अकस्मात उपजत । तें स्वयेंचि लयो पावत । नभ तटस्थ अभंगपणें ॥ ७८ ॥ अभ्रें आकाश काय मैळलें । किंवा अभ्रेंसि संग पावलें । तें अभ्रचि आलें गेलें । नभ उगलें जैसें तैसें ॥ ७९ ॥ अभ्रें दुजेपण नाहीं आलें । अभ्रें आकाशपण नाहीं गेलें । अभ्रचि स्वयें नाशलें । व्योम उगलें जैसें तैसें ॥ ३८० ॥ तैसा शुद्ध आत्मयाच्या ठायीं । जड विश्व भासतसे पाहीं । आणि पावतसे लयोही । आत्मा अनपायी[4] जैसा तैसा ८१ ॥ येकचि विशुद्ध आत्मरूपीं । अज्ञानें विश्व आरोपी । इतुकेंनि ब्रह्म काये लेपी[5] । लेपें आरोपी नानाविधि ॥ ८२ ॥ उत्पत्ति स्थिति विनाश । ब्रह्मींच होतसे जगास । परी ब्रह्म तें सदा उदास । अति अविनाश नित्यपणें ॥ ८३ ॥ रज्जुच्या ठाईं सर्प भासला । तो तेथेंचि स्थिति नाश पावला । रज्जु जैसा तैसा उगला । क्षयवृद्धीला[7] न पवेचि ॥ ८४ ॥ सर्पत्वें रज्जु नाहीं वेगळी । सर्पत्वें रज्जु नाहीं मैळली । सर्पत्वें विषरूप नाहीं जाली । असे संचली जैसी तैसी ८५ ॥ तैसें जगदाभासें ब्रह्म न मैळे । जगदाभासें नाहीं वेंचलें[8] । ब्रह्म तें अचळत्वें[6] न ढळे । असे निराळें असंगपणें ॥ ८६ ॥ विश्व हें जरी साच असतें । तरी ब्रह्मासि दुजेपण येतें । जग नसतां काये तेथें । जगें विपरीत होईल ॥ ८७ ॥ विश्व ऐसें जें ह्मणणें । तें वाचेचें विडंबणें । वांचूनि दुजें विश्वपणें ।

१ अगदीं मधला भाग. २ जगाचें उत्पन्न होणें. ३ अति वाटोळें. ४ अपाय रहित. ५ दोषी होतें. ६ चळवळी वांचून. ७ नाश होणें अथवा वाढणें. ८ खर्च झालें, संपलें.

देखिजे कोण्हे ब्रह्मेंविण ॥ ८८ ॥ अगा या जगाची गोष्टी । भ्रमावांचूनि नाहीं सृष्टि । यालागीं विश्व हे परीपाटी । समूळ खोटी विचारिता ॥ ८९ ॥ भुललेपणें गा रघुनाथा । सिद्धवस्तूसि करिती अन्यथा । ब्रह्मीं विश्व आरोपितां । अनर्थता सहस्त्रावधि ॥ ३९० ॥ अगा ब्रह्मीं विश्वाचिया लहरी । होत जात ब्रह्मसागरीं । परी न वचे न ढळे तिळही- भरी । अढळ परी ययाची ॥ ९१ ॥ ययालागीं गा रघुनाथा । अखिल विश्व ब्रह्मीं स्फुरतां । स्फुरणपणेंचि हें मिथ्या । नव्हे तत्वता कल्पितपणें ॥ ९२ ॥

आदित्यव्यतिरेकेण रश्मयो येन भाविताः । आदित्य एव ते तस्य निर्विकल्पः स उच्यते ॥ २० ॥

अगा जयावेगळें जें नाहीं । तेंचि वस्तुत्वें तेंचि पाहीं । जैसें रवीविण[१] रश्मि नाहीं । रविच सर्व ही रश्मिरूपें ॥ ९३ ॥ रविउदयें रश्मीचें असणें । रवींचेंचि अस्तें अस्तु पावणें । तरी तें रविरूपाचि जाणणें । वेगळेपणें उरी कैंची ॥ ९४ ॥ ऐसें जाणें जो निश्चयेंकरून । तोचि पुरुषजाणावा सज्ञान । येणें दृष्टांतें ब्रह्मीं दुजेपण । न देखे आन विश्वपणें ॥ ९५ ॥ ब्रह्मावेगळे विश्व न भासे । तऱ्ही येक ब्रह्मचि सर्वत्र असे । अधि- ष्ठानेंविण सर्वथा नसे । जाण सर्वांशें आरोपित ॥ ९६ ॥ यालागीं ब्रह्मीं विश्व दुजेपणें । सर्वथा नाहींच ऐसें जो जाणे । तोचि निर्विकल्प पुरुष सर्वज्ञपणें । जया भोगणें ब्रह्मसुख ॥ ९७ ॥ आणि निर्विकल्पसमाधीची खूण । तियेचें जाण हेंचि लक्षण । विश्व न स्फुरे ब्रह्मेंविण । नित्य चिद्घन[२] तेंचि ते कीं ॥ ९८ ॥ परी मन कोंडूनि निवांत राहणें । अंतरीं ब्रह्मसुख सर्वथा नेणें । ते समाधि नव्हे विटंबणें । वृथा करणें श्रम तोही ॥ ९९ ॥

तंतुमात्रो भवत्येव पटो यद्वद्विचारितः । आत्मतन्मात्रमेवेदं तद्वद्विश्वं विचारितम् ॥ २१ ॥

अगा पटेंचि विचारूनि पाहतां । तंव पटत्व नाहींच मग तवत्तो । पट तो तंतुचि रघु- नाथा । पाहातां अन्यथा भासेना ॥ ४०० ॥ येक तंतुचि सैंघ दिसतां । तेथ पटप्रतीति होये भ्रांता । बरवें विचारूनि पाहतां । होय अन्यथा बुद्धि त्याची ॥ १ ॥ परी विचारमानें येक तंतुचि । तेथें मिथ्या भ्रांति पटत्वाची । तैसें जाण आत्मतन्मात्रचि । विश्ववीचि ब्रह्मा- ब्धीमाजी ॥ २ ॥ विश्व हें विचारूनि पाहतां । येक ब्रह्मचि जाण तत्वतां । विश्वप्रतीति होये भ्रांता । तेचि तत्वतां अढळ जाली ॥ ३ ॥ अज्ञानें विश्व हें देखती । ज्ञानें ब्रह्मा- चीच प्राप्ति । हें तंव न चुके गा सर्वार्थीं । विश्वमूर्ती विश्वंभरा ॥ ४ ॥

विश्ववीचिविलासोयं चित्सुखाब्धेरुदेति च । विलीयते च तत्रैव मध्ये कथमतन्मयः ॥ २२ ॥

अगा चित्सुखाब्धीचिया लहरी । तैसीच विश्वाचिया भरोवरी । होती जाती क्षणाभी- तरी । जाण सर्वांपरी तेथेंचि ॥ ५ ॥ चिच्छब्दें बोलिजे ज्ञान वरिष्ट । सुखशब्दें परमानंद श्रेष्ठ । एतद्रुपें ब्रह्म निघोट । होय स्पष्ट चित्सुखात्मक ॥ ६ ॥ तया ब्रह्माब्धीचा वीचि-

---

१ एकसारखी चाललेली राहाटी. २ सूर्याशिवाय. ३ ज्ञानरूप. ४ वस्त्र. ५ सूतच. ६ ज्ञानानंद रूपी समुद्राच्या. ७ उलटापालट.

विलास । होतां जगद्रूपें उठी उदास । तेथें विलयोही सावकाश । पावे निःशेष रामचंद्रा ॥ ७ ॥ अगा जेथूनि जें उदय पावलें । मागुते तेथेंचि लया गेलें । तऱ्ही तेंचि तें न चूके कांहीं केलें । असे संचलें तेंचि तें ॥ ८ ॥ उदय अस्तीं येकरूपता । तरी मध्येंचि केवीं अतन्मयता । उदयापूर्वींच तत्वतां । मावळतां तोचि येक ॥ ९ ॥ समुद्रीं उंचावे जें पाणी । त्यासि लहरीपणें दुजेपणा आणी । तेंचि सपांटल्या आन कोण्ही । भासे जीवनीं दुजी वस्तु ॥ ४१० ॥ यालागीं आदिअंतीं जें नसे । आणि मध्येंचि जें आभासे । तऱ्ही आन नव्हे तेंचि असे । जाण सर्वांशें रघुनाथा ॥ ११ ॥ ते नामरूपाचीच मिरवणी । वांचूनि सर्वत्र येकाचि पाणी । भ्रमें तया दुजेपण आणी । विपरीत करणी भ्रमाची ॥ १२ ॥ तेंचि अज्ञान निःशेष जाये । तेथेंचि दुजेपण सामाये । मग उदकांवाचूनि आहे काये । विचारूनि पाहे तूं रघुनाथा ॥ १३ ॥ तैसा सर्वत्र येक आत्माचि असे । तेथें दुजेपणें जें जग भासे । तें भ्रमावांचूनि आन नसे । जाण ऐसें रघुवर्या ॥ १४ ॥ मुळीं ब्रह्माचेनि नेणपणें । नामरूपाचेंचि होये भासणें । जगडंबरु हें अपूपपणें । भासे नयनें भ्रमाचेनी ॥ १५ ॥ तेंचि अज्ञानजात खेवों[६] । जगमिथ्यत्वें ब्रह्मभावो । होय हें अपूर्व पहाहो । बोले रावो ज्ञानियांचा ॥ १६ ॥

यथा न तोयतो भिन्नाः फेनोर्मिहिमबुद्बुदाः ॥ आत्मनोपि तथाऽभिन्नं विश्वमात्मविनिर्गतं ॥ २३ ॥

अगा अधिष्ठानीं जें आभासे । अधिष्ठानचि तें होये जैसें । तेणेंसि अभिन्नपणेंचि असे । सर्वथा नसे स्वतंत्रपणें ॥ १७ जैसें फेन ऊर्मि जळाच्या ठायीं । कां हिम बुद्बुद हिमीं पाहीं । भासती ते तेंचि सर्वही । आणीक कांहीं असेचिना ॥ १८ ॥ जे कीं उंचावलें पाणी । त्यासि भ्रमें लहरीपण आणी । कां हिम जैसें हिमकणीं । वेगळेपणीं बोलती ॥ १९ ॥ तैसें ब्रह्मीं हें विश्व भासे । तें ब्रह्मासि तरी भिन्न नसे । विचारूनि पाहतां असे । ब्रह्म सर्वांशें रघुराया ॥ ४० ॥ अगा येकचि दुजें देखणें । हें तंव भ्रमाचें साजणें । ब्रह्मावांचूनि कोण वस्तु दुजेंपणें । वेगळेपणें उरली असे ॥ २१ ॥ ब्रह्मींच विश्व आभासे । आणि स्थितिकाळीं तेथेंचि वसे । लयही पावे सर्वांशें । नाहींच ऐसें तेथेंचि जाण ॥ २२ ॥ तेथें उत्पत्ति स्थिति लय भासती । परी तयावेगळे न दिसती । तरी तेंचि तें जाण विश्वमूर्ती । आन गति भांऊं नये ॥ २३ ॥ यदर्थीं श्लोकत्रयेंकरून । दृष्टांतचतुत्रय जाण । अध्यारोपित तें अधिष्ठान । नव्हे भिन्न हें निरोपूं ॥ २४ ॥

आत्मनोपि तथा विश्वमात्मन्येव लयं व्रजेत् ॥ मृदि कुंभो जले वीचिः कनके कटकं यथा ॥ २४ ॥

मृत्तिके पासून घट उत्पन्न । यालागीं मृत्तिकेशी तो अभिन्न । कीं वीचीकां जळापासून । नसे अभिन्न जळाशी ॥ १ ॥ कनका पासूनि कंकण । यालागीं कनकाशीं तें

१ लाटांचे खेळ. २ त्या रूपानें नसणें. ३ संथ असतांना. ४ कर्तृत्व. ५ जगरूपी घोंटाळा. ६ आलिंगन, अज्ञानाचा संबंध. ७ लाटा. ८ बुडबुडे. ९ इतर. १० कल्पना करूं नये.

अभिन्न। तसें आत्मया पासून । विश्व भिन्न नव्हे ॥ २ ॥ आत्म्यापासून विनिर्गत। विश्वें नव्हे आत्माखंडित। आत्मा अज्ञात विश्व भासत। तैसें येथें निरूपण ॥ ३ ॥

आत्माज्ञानाज्जगद्भाति आत्मज्ञानान्निवर्त्तते ॥ रज्ज्वज्ञानादहिर्भाति स्तद्विज्ञानान्निवर्त्तते ॥ २५ ॥
तस्य दृश्यात्मतत्वस्य विस्मृत्यैव स्थितं जगत् ॥ जगत्स्ययादीश्वराद्राम जगद्रज्जुभुजंगवत् ॥ २६ ॥

अधिष्ठानचि साच असतां। तेथें आणीक भासे जें भ्रांता। तें भ्रांतीवांचूनि तत्वतां। नाहीं अन्यथा वस्तु कोण्ही ॥ २५ ॥ जैसें मृत्तिकेच्या ठायीं। घटादिपात्रें भासती सर्वही। तें तंव अज्ञानेंकरूनि पाहीं। येऱ्हवीं सकलही मृत्तिकाजि ॥ २६ ॥ येक असतां दुजें भासे। तें तंव जाण अज्ञान पिसें। तेथें नाहीं अनारिसें। दृष्टांतें ऐसें बुझें पां ॥ २७ ॥ घटाचे आदिस्थितिअंतीं। एकमृत्तिकाचि विश्वमूर्ती। तरी ते मृत्तिकाचि जाण सर्वार्थीं। घटप्रतीति तो समूळ भ्रम ॥ २८ ॥ आदिअंतीं मृत्तिकाचि असे। घटरूपेंही तेचि वसे। मध्यें पृथुबुध्नोदराकार आभासे। तैणेंचि पिसे घट ह्मणती ॥ २९ ॥ प्रत्यक्ष आधिष्ठान दिसतां। अज्ञानें भासे आनरूपता। ते साचाचि मानिती नेणतां। आश्चर्यता काय बोलों ॥ ४३० ॥ तेथ परिणाम तरी नाहीं जाला। आणि व्यर्थचि भ्रम उपजला। विवर्त्त देखतांही तयाला। अन्यथा जाला बुद्धिभ्रमु ॥ ३१ ॥ परिणाम विवर्त्ताचें लक्षण। तेंही तुजप्रति सांगेन। मग तूं बुझसी संपूर्ण। येथिची खूण विबुधवर्या ॥ ३२ ॥ तरी विवर्त्त तो ऐसा असे। शुक्तिका जैसी तैसी असे। तेथें अन्यथा रूपें जें मिथ्या भासे। विवर्त्त ऐसें तया नाम ॥ ३३ ॥ तैसेंचि मृत्तिकेच्या ठायीं। निःशेष घट तंव नाहीं। मृत्पिंड केलिया तयालाही। घट कोण्हीही न ह्मणती ॥ ३४ ॥ कपाल जरी ह्याचें जालें। तऱ्ही मृत्तिकापणें असे संचलें। पृथुबुध्नाकारें आलें। नामरूप भलें घटपणासी ॥ ३५ ॥ परी तेव्हांही ते मृत्तिका असे। तिसी कालत्रयीं नाश नसे। परी आकारें नाम रूप ठसे। अनारिसें भासे जना ॥ ३६ ॥ यालागीं अधिष्ठान असतचि असे। तेथें भ्रमें जें कां आणीक भासे। तो विवर्त्तु जाणावा विश्वेशें। वेदांत ऐसें बोलत ॥ ३७ ॥ आतां परिणाम तो ऐसा। अधिष्ठान नाशोनि अन्यथा ठसा। होये तो जाण वीरेशा। परिणाम ऐसा बोळख तूं ॥ ३८ ॥ दुग्धस्वरूप स्वयें नाशे। त्याचेंचि आन दधि भासे। पाहिलें अधिष्ठानाचें अनारिसें। अंतीं मध्यें नसे तो परिणामु ॥ ३९ ॥ याचें नाम परिणामवादु। सांगितला तुज विशदु। विवर्त्त अधिष्ठानासि बाधु। नाहीं निर्बाधु आन भासेंही ॥ ४४० ॥ तैसा विवर्त्त भासत असतां। तें साचाचि माने अज्ञानवंता। हेंचि आश्चर्य वाटतसे चित्ता। काये रघुनाथा बोलावें ॥ ४१ ॥ जैसें मृत्तिकेच्या ठायीं घटादिक। कां जळाच्या ठायीं वीचि अनेक। कां कनकीं जैसें साच कटक। दोरी सम्यक् सर्पाकारें ॥ ४२ ॥ अधिष्ठानाचेनि

---

१ वेगळें. २ ही घागर अशी कल्पना. ३ मोठी व बुधल्याच्या आकाराची. ४ हे ज्ञात्यामध्यें श्रेष्ठ. ५ खापरी. ६ अज्ञानी पुरुषाला. ७ लाटा.

अज्ञानें । अधिष्ठानींच अनुमान । तैसें ब्रह्माचेनि अज्ञानें । होये भासणें जगाचें ॥ ४३ ॥ तेंचि आत्मविषयक[१] अज्ञान । ज्ञानें नाशलिया संपूर्ण । विश्वाभास निःशेष जाण । हारपोन जात असे ॥ ४४ ॥ रज्जूंचेनि अज्ञानें अहिभ्रांति[२] । ते रज्जुज्ञानेंचि होये निवृत्ति । तैसी विश्वभ्रांतीसि गा रघुपति । कारण सर्वार्थी अज्ञान ॥ ४५ ॥ अगा आत्मयाचें जें विस्मरण । तेंचि जग भासावयाचें कारण । यदर्थी उपपत्ति नाहीं आन । जाण स्वूण रघुराया ॥ ४६ ॥ अगा ईश्वरापासाव गा रघुपति । यया जगाची वर्ते उत्पत्ति स्थिति । जैसी रज्जुसर्पाची वस्ती । असे वर्त्तती रज्जूपासाव ॥ ४७ ॥ परी सदसद्विलक्षण । जग तें मिथ्याभूत जाण । कैसें तें सार्धश्लोकेंकरून[३] । आइक संपूर्ण सांगों तुज ॥ ४८ ॥

स्वप्ने जाग्रदसद्रूपा स्वप्नो जाग्रत्यसन्मयः । मृतिर्जन्मन्यसद्रूपा मृतौ जन्माप्यसन्मयम् ॥ २७ ॥
एवं न सन्नासदिति भ्रांतिमात्रं विजृंभते । अनुभूयत एवाशु किंचित्सर्वानुभूतितः ॥ २८ ॥

अगा साच तें येकविध असावें । कालत्रयींही न पालटावें । निःशेष न नाशावें । हें तों न संभवे जगासि पैं ॥ ४९ ॥ स्वप्नकाळीं स्वप्न साच दिसे । तें जागृतीसि नाहींच भासे । तेंही जागृतीसि साच नसे । साच सर्वेंचि भ्रंशे सुषुप्तीसी ॥ ४५० ॥ तिहीं अवस्थांचें अनुसंधान । नाहींच प्रकटलिया विज्ञान । असद्रूपें मिथ्या भान । जाय बुडोन सर्वथा ॥ ५१ ॥ तैसा जन्मकाळीं मृत्यु नाहीं । मृत्युकाळीं जन्म नाहीं । एवं सत्य ना असत्य पाहीं । नसे दोन्ही बोलावया ॥ ५२ एवं अवस्थारूपेंही एक रूपता । ना नाहीं जन्मास्थितीकारितां । म्हणऊनि हें असद्रूप सर्वथा । सदसद्विलक्षणता असे यासी ॥ ५३ ॥ सत्य तरी सर्वदा असावें । कालत्रयीं न नासावें । आणि येकविधपणेंचि वसावें । न भ्रंशावें अवस्थांतरीं ॥ ५४ ॥ तैसें तरी नव्हे सत्यता । पूर्वीं बोलिली याची अवस्था । असत्य तरी भासे सर्वथा । साच तत्वतां ऐसें गमे ॥ ५५ ॥ सत्य तरी हें नासत असे । असत्य तरी साचपणें दिसे । यालागीं सदसद्विलक्षण असे । जाण सर्वांशें विश्वजाल हें ॥ ५६ ॥ जें कीं सदसद्विलक्षण । तें तंव मिथ्याभूत जाण । भ्रांतिमात्र विजृंभण । जग संपूर्ण तैसें भासे ॥ ५७ ॥ एवं सकळ निरूपणाचा इत्यर्थ । जग मिथ्या हा फलितार्थ । हा बाणलिया वैराग्यार्थु । बाणे यथार्थ रघुपुंगवा ॥ ५८ ॥ एकेही परी पाहतां । जग साच न घडे गा रघुनाथा । तऱ्ही लटकियासि विमुख होतां । प्रयासता कायिसी ॥ ५९ ॥ ऐसें जग मिथ्या बाणलिया । ते रिती बोधलेंचि गा रघुराया । मग जीवन्मुक्ति आपसया । त्यासि सावया वोळगे ॥ ४६० ॥ येकाग्र करूनियां अंतःकरण । संतश्रोतीं द्यावें अवधान । पुढिलेया प्रकरणींचें व्याख्यान । जें कीं करीन भगवत्कृपा ॥ ६१ ॥ तुमच्या अवधानासाठीं । ग्रंथु सिद्ध होये उठाउठी । आणि वक्तत्वीं बुद्धि लाठी[४] । झोंबे पोटीं

---

१ आत्मा म्हणजे काय या संबंधानें अज्ञान. २ सर्प असा भ्रम. ३ दीड श्लोकानें. ४ खोटें असलेलें.

प्रमेयाच्यां ॥ ६२ ॥ ह्मणवूनि तुमच्या कृपेचा तुषार । पावतांचि वाचावल्लि मनोहर । प्रमेयफल विस्तार । वोडंबर अतिशयेंसि करी ॥ ६३ ॥ सहजीं सहज पूर्ण तेथ । निजानंदें जो डुल्लत । रंगूनिया साधिला अर्थ । कृपे वसिष्ठ रघुनाथें ॥ ६४ ॥

इति श्रीयोगवासिष्ठसारे श्रीवसिष्ठरामसंवादे जगन्मिथ्याप्रकरणं द्वितीयं संपूर्णम् ।

॥ श्रीः ॥

प्रकरण ३ रें.

मनोलयप्रकरण.

श्रीगणेशाय नमः । श्रीसरस्वत्यै नमः श्रीमत्सद्गुरुनिजानंदाय नमः । जयजय जी सद्गुरुराया । नमन करूनि तुझिया पायां । ग्रंथव्याख्यान तरणोपाया । जीवाचिया करीन मी ॥ १ ॥ तरी जड जीवउद्धारकु । तूंचि तूं परिपूर्ण येकु । जयाचा अवलोकनदीपकु । स्वप्रकाशकु करी जगा ॥ २ ॥ तया तुझिया कृपावलोकें । ग्रंथ सिद्धी जाईल कौतुकें । येऱ्हवीं येवढा उन्मेषु विशेषें । बोलाचि फिके सर्वही ॥ ३ ॥ ययालागीं जी कृपासागरा । एके ज्ञानदानिया उदारा । रिघोनि मद्वाचेचिया वोवरां । प्रकाश पुरा करीं स्वामी ॥ ४ ॥ रिघा ह्मणतां परिच्छिन्न । होऊं पाहे तुझें परिमाण । तुजकारितां सर्वा चलन । तूं व्यापक पूर्ण नियंतृत्वें ॥ ५ ॥ आणि वाचादिकरणें तूं होसी । तुजविण स्थिति कैंची जगासी । यालागीं सर्वही तूंचि अनुभविसी । अनुभवासि येतसे ॥ ६ ॥ तरी कासयां स्यां विनवावें । सर्वही तूंचि होसी स्वभावें । वक्ता वदिता श्रोता सद्भावें । होसी अनुभवें सकळ तूंचि ॥ ७ ॥ कर्त्ता करविता श्रीगुरुनाथा । तेथ वर्णनाची काय कथा । गुरुनाथा गुरुशिष्यभेदु दाविता । लीलावंता तूंचि तूं ॥ ८ ॥ माझें मीपण तुजविण । कोठें पावेल अवस्थान । यालागीं तूंचि तूं आनंदघन । मीतूंपण समूळ भ्रांति ॥ ९ ॥ आपुलें ऐश्वर्य बोलावया । ग्रंथमिषेंकरूनि श्रीगुरुराया । बोलविसी ब्रह्मानुभव अभिमाया । उद्धरावया जड जीवां ॥ १० ॥ तेणें माझें विनविणें तुजप्रती । कासयालागीं श्रीगुरुमूर्ती । तथापि परोपकारार्थ विनंति । आनंदमूर्ती करीं तुज ॥ ११ ॥ तरी तेंचि ग्रंथाचें अनुसंधान । संपलें जगन्मिथ्यत्व प्रकरण । तेथें हेंचि केलें निरूपण । जग मिथ्याचि पूर्ण आन नाहीं

---

१ सिद्धान्ताच्या. २ वाणीरूपी वेल. ३ तरावयाचा उपाय. ४ पहाणें हाच दिवा. ५ ज्ञानाचें दान करण्यामध्यें. ६ नियमन (ताब्यांत ठेवणें) करण्यामुळें. ७ अज्ञान.

॥ १२ ॥ हें वैराग्य दृढ बाणावया । सांगितलें प्रकरणीं यथा । प्रपंच मिथ्या दृढ कळलिया । तेंचि रघुराया वैराग्यही ॥ १३ ॥ तया वैराग्याचें कारण । विषयीं दोषदृष्टि संपूर्ण । आणि प्रपंचाचें मिथ्या भान । दोन्ही जाण कारण यासी ॥ १४ ॥ तें वैराग्य दृढतर जालिया । सेवावे सद्गुरूचिया पायां । सद्गुरूनें कृपा केलीया । अभ्यास रघुराया पाहिजे ॥ १५ ॥ अगा निदिध्यासन करितां रघुपती । मन आणि वासना अति पीडिती । ह्मणोनि मनोनाश वासनांची शांति । सीतापती करावी गा ॥ १६ ॥ सद्गुरूनें तत्व उपदेशिलें । तें महावाक्यें दृढतर केलें । तेणें अपरोक्ष बाणलें । तरी जालें कार्य सर्व ॥ १७ ॥ तें न होवोनियां अयोध्यापती । असंभावना विपरीतभावना उठती । तरी श्रवणें मननें निदिध्यासानें शांति । करावी पुढती तयांचि ॥ १८ ॥ असंभावना द्विविध जाण । येकी ते प्रमाणासंभावना । दुसरी प्रमेयासंभावना । पूर्ण जाणा खुणा द्विविधाचि ॥ १९ ॥ येकी ते विपरीतकल्पना । ऐसीया त्रिविधा या असंभावना । यालागी करावें तिन्ही साधनां । श्रवणमनननिदिध्यासा ॥ २० ॥ त्यांहीमाजी जें निदिध्यासन । तेथें येकाग्रता पाहिजे पूर्ण । करावें प्रपंचनिरसन । ब्रह्मानुसंधान अति-नेटें ॥ २१ ॥ तेणें मन आणि वासना । इयें दुष्ट गा रघुनंदना । आड येती स्वरूपानु संधाना । प्रपंचभाना प्रगट करीती ॥ २२ ॥ यालागीं मनोलय वासनाशांति । आधीं करावी गा त्रिदशपती । हाचि अभ्यासु ब्रह्मप्राप्ती । आन करिती तो श्रमुचि केवळ ॥ २३ ॥ अभ्यासांमाजी अभ्यास सार । मनोलय वासनासंहार । केलिया जीवन्मुक्ति-प्रकार । यथोपचार प्राप्त होये ॥ २४ ॥ जीवन्मुक्तीची होआवया प्राप्ति । करावी मनोलय वासनाशांति । तेचि ते आतां रघुपती । सांगेन स्थिती तुजलागीं ॥ २५ ॥ अगा अपरोक्षज्ञानही जालिया । सर्वथा करावें मनोलया । मग नव्हती सुखदुःखें तया । आप आपणिया परिपूर्ण होये ॥ २६ ॥ मनोलयवासनाक्षयेंविण । ज्ञानियास सुखदुःखदर्शन । होतें ह्मणोन अवश्य जाण । दोहींचें पूर्ण भस्म करावें ॥ २७ ॥ तेणें सप्तमी भूमिकापर्यंत । दशा होतसे तया प्राप्त । मग सुखदुःखें नेणें निश्चित । सर्वदा तृप्त ब्रह्मानंदें ॥ २८ ॥ सर्वदा परमानंदें तृप्ति । नाहीं विक्षेप प्रपंचप्रतीति । सर्वदा ब्रह्मानंदें डुलती । कैंची व्यक्ति सुखदुःखाची ॥ २९ ॥ ऐसें बोलतांचि वसिष्ठऋषि । रघुनाथ उल्हासे मानसीं मग ह्मणे सांगा स्वामी मजपासीं । जें बोलिलासी थोर साधन ॥ ३० ॥ तुझिया वचनामृतावांचून । न घडे अस्मादिकाचें सिंचन । तेणेंविण समाधान । नव्हे जाण कल्पांतीं ॥ ३१ ॥ तरी जें आतां पुढारलासी । तेंचि साधन सांग मजपासी । तंव वसिष्ठ ह्मणती परियेसी । सांगेन तुजपासी रघुवर्या ॥ ३२ ॥ सप्तही भूमिकांचे लक्षण ।

---

१ दोषरूप (विषय) आहेत असें पाहणें. २ मनाचा नाश करणें. ३ प्रत्यक्ष. ४ लक्षांत येणें. ५ स्थितिपर्यंत.

तें जीवन्मुक्तप्रकरणीं जाण । सांगिजेल निरूपण । प्रस्तुत साधन परियेसी ॥ ३३ ॥ आधीं मन तें किंलक्षण । त्याचा लयप्रकर तो कोण । हें तंव आधीं सांगेन । दुसरें जाण वासनानाशु ॥ ३४ ॥ प्रस्तुत यियें प्रकरणीं । मनोलय ऐकें कोदंडपाणी । जो जालया ब्रह्मसुख धणी । जनीं वनीं आपणचि ॥ ३५ ॥ तरी आधीं मनचि हें कोण । तें तुज सांगों गा संपूर्ण । मग क्षयोही सांगों नियमून । आयिक साधन श्रीरामचंद्रा ॥ ३६ ॥ आतां जें बोलत श्रीवसिष्ठगुरु । आणि श्रवण करी सर्वेश्वरु । तो आइकतां फावेल पाहुणेरु । अमृतयोगरु श्रोतयांसी ॥ ३७ ॥ तरी मनाची करूनि आराणुक । हा सुखसंवाद भोगा सम्यक् । आजी श्रोतयांच्या भाग्यासि आगळिक । लाभाची देख लागली ॥ ३८ ॥ कां वसिष्ठरामाचा संवादु । प्राप्त जाला बरवी विशदु । तोचि भोगा पां स्वानंदु । अतिअगाधु श्रवणद्वारें ॥ ३९ ॥

व० उ० ॥ एषस्वभावाभिमतं स्वतः संकल्प्य धावति । चेतसा स्वयमम्लानस्तदेव मनआत्मनः ॥ १ ॥

तरी वसिष्ठ ह्मणती गा रघुपती । आयिक या मनाची स्वरूपस्थिति । मनचि कोण हें तुजप्रति । दावूं निगुती फोडूनियां ॥ ४० ॥ अगा आत्मयासि स्वभावाभिमत । जे जे कांहीं पदार्थजाति । मूळ अज्ञानें रमणीय भासत । अति प्रशस्त ग्राह्यबुद्धि ॥ ४१ ॥ मग आपुलिया मनेंकरुनी । स्वतां ग्राह्यत्वें संकल्पानी । स्वयें धांवे ज्यामागें लागोनी । तेंचि निर्वाणि मन जाण ॥ ४२ ॥ आत्मा तरी म्लान नव्हे । आपण जैसा तैसाचि आहे । परी संकल्पोनि धांवताहे । तेंचि तें पाहें मन त्याचें ॥ ४३ ॥ आत्मयाच्या शेजारीं । राहोनि वस्तुमात्राचा संकल्प करी । तेंचि मन जाण सर्वोपरी । रावणारी जाण पां ॥ ४४ ॥

एतस्मात्सर्वगाद्देवात्सर्वशक्तेर्महात्मनः । विभागकल्नाशक्तिर्लहरीवोत्थितांभसः ॥ २ ॥

या सर्वगता देवापासाव । जो कीं सर्वशक्तिमंत स्वयमेव । सर्व ज्ञाता ज्ञानभरींव । आदिदेव सर्वांचा जो ॥ ४५ ॥ त्यापासाव विभाग कल्नाशक्ति । ह्मणिजे भेद कल्पित उठती । हा देहे हीं इंद्रियें कल्पिती । प्राणापानादिव्यक्ति जेणें होती ॥ ४६ ॥ हें देह हें जगड्डाळ । हे घटपटादि पदार्थ सकळ । या विभागांची कल्ना प्रांजळ । करी तें निर्मळ मन जाण ॥ ४७ ॥ आत्मा निर्विकल्प नित्य शुद्ध । सर्वसाक्षी अतिप्रबुद्ध । तेथें नाहीं कल्पना भेद । हें निर्विवाद वोळखावें ॥ ४८ ॥ मग तयापासाव भेदसृष्टि । जे कीं निरंतर दृश्यत्वें उठी । तेंचि मन गा जगजेठी । स्वयें दृष्टी पाहें पां ॥ ४९ ॥ जैसें उदक तळीं निश्चळ । त्याच्याचि ठायीं लहरीं मेळ । उठी तैसा भेदकल्लोळ । आत्मा निर्मळ जैसा तैसा ॥ ५० ॥ जैशा उदकापासाव जगजेठी । लहरी शक्ति कोण्ही उठी । अज्ञान येकत्वाची दृष्टी । विवेक पोटीं नाहीं ह्मणउनी ॥ ५१ ॥ तैसे पूर्ण मनाचें स्वरूप

१ नाशाची रीत. २ हे धनुर्धरा रामा. ३ आवडणारें. ४ प्रत्येक वस्तूचा. ५ आकलन करण्याची शक्ति. ६ ग्रहण, घेणें. ७ अनेक भेद.

जाणावें । तऱ्ही आत्मस्वरूपीं सर्व वोळखावें । तेथ भेदकलनाशक्ति[1] स्वभावें । मन जाणावें जाणतेनी ॥ ५२ ॥ आत्मयाचें स्वरूप न कळे । तरी मन मनपणें जें वेगळे । तें तया कांहींच न कळे । येकत्रमेळें भासे ह्मणऊनी ॥ ५३ ॥ शुभ्रआरक्तादिवस्त्रमेळा[2] । तया हातें पाहतां आंधळा । काय वर्णू व्यक्ति दिसे डोळां । तैसी कळा जाण याची ॥ ५४ ॥ परी हेंचि त्याचें लक्षण । आत्मा निश्चळ निर्विकल्प जाण । जेथें न स्फुरे द्वैतभान । तेंचि चिद्घन आत्मस्वरूपाचें ॥ ५५ ॥ तेथूनि भेदशक्ति कोण्ही उठी । मुळीं अहं हें द्वैत जगजेठी । तेथूनि स्पष्ट होये सकळ सृष्टि । भासवी दृष्टी तेंचि मन ॥ ५६ ॥ मनसंकल्पें विश्व भासे । मनविकल्पेंचि सर्वही नाशे । हें आइकावें विश्वेशें । दृष्टांतविशेषें सांगेन ॥ ५७ ॥

अतः संकल्पसिद्धेयं संकल्पेनैव शाम्यति । येनैव जायते तेन वन्हि ज्वालेव वायुना ॥ ३ ॥

अगा या मनाचे संकल्पेंकरूनी । विश्वाभास[3] भासे नयनीं । संकल्पमात्राची होये उभवणी । संकल्पें विरोनि जाय क्षणें ॥ ५८ ॥ जेणें कल्पिलें द्वैत होय जाये । तेंचि तें मन वोळखोनि राहें । हेंचि जना अपूर्व वाटताहे । येकाची होये प्रतीतिर्द्वय[4] ॥ ५९ ॥ नाहे जेणें भासे विश्वाभास । तेणेंचि तयाचा कैसा नाश । या अभिनवा उत्तरास । सावकाश परिसिजे ॥ ६० ॥ तरी आइका याचें उत्तर । जें कीं सांगिजेल सपरिकर[5] । मनाच्या वृत्ति साचार । दोन्ही प्रकार परियेसीं ॥ ६१ ॥ येकी जाणा मळिनवृत्ति । जे कीं करी द्वैतप्रतीति । विश्वाभासुचिये व्यक्ती । देहादि स्फुरती जियेचेनी ॥ ६२ ॥ ते मळिन वृत्ति उपजतां । द्वैत विश्वाभास भासे तत्वतां । तेचि शुद्धवृत्तिरूप ज्ञान होतां । सर्व भस्मांता जाय द्वैत ॥ ६३ ॥ दुसरी मनाची शुद्धवृत्ति । जे कीं वृत्तिरूपें ज्ञान बोलती । तें उदय पावतांचि करी शांति । विश्वभ्रांति सकळिक ॥ ६४ ॥ ह्मणोनि मनोवृत्तीनेंचि विश्व आभासे । आणि मनोवृत्तीनेंचि सर्व नाशे । ह्मणोनि येक मनचि उल्हासे । जाण सर्वांशें द्वैताद्वैतीं ॥ ६५ ॥ अथवा संकल्पें रची विश्वपरंपरा । तेचि विकल्पें मोडी विश्वंभरा । यालागीं येक मनेंचि विश्वपसारा । भस्मसारा मनेंचि जाय ॥ ६६ ॥ जैसी वायूचेनि वन्हिज्वाळा[7] जाली । आणि वायूचेनि अस्तातें पावली । तमापरी द्वैताद्वैतबोली । मनेंचि जाली परियेसा ॥ ६७ ॥ जैसा फुंकेचि दीपु लागला । आणि तेणेंच फुंके तो मावळला । तसा मनेंचि विश्वाभास भासला । मनेंचि जाला नाहीं ऐसा ॥ ६८ ॥

मनो मुधैवाभ्युदितं मनो देवानवेक्षणात् ॥ स्वप्ने स्वमरणाकारं प्रक्षमाण न विद्यते ॥ ४ ॥

यालागीं मनाचि द्वैताचें मूळ । मनेंचि हा संसार सकळ । ऐसें ही परी तें निर्मूळ । मन केवळ मिथ्या भ्रमु ॥ ६९ ॥ वृथाचि मन ऐसें नाम । वृथा मन हें मुख्य भ्रम ।

---

१ निरनिराळ भेद ओळखण्याचें सामर्थ्य. २ पांढरीं, तांबडीं वगैरे वस्त्रें. ३ जगाचें भान. ४ दोन प्रकारचा अनुभव ५ श्रेयपूर्वक. ६ अनेक पदार्थांच्या रांगा. ७ अग्नीची ज्योत.

स्वस्वरूप अनवेक्षणाचि काम । मन हें नाम वृथाचि भासे ॥ ७० ॥ मन हें वृथाचि उदया आलें । आत्माविस्मरणेंचि प्रगटलें । तेंही जालेपणेंचि नाथिलें । बाळका बोलें बागुल जैसा ॥ ७१ ॥ बागुल साच तरी नाहीं देखिला । ना येतां जातां नाहीं प्रत्यक्ष जाला । परी अर्भकें साच मानूनि तयाला । भयादिमेळा मृत्यूवरी ॥ ७२ ॥ बागुल यया बोलाचिसाठीं । साचपणें भयकंपेंसिच उठी । पळे लपे होय हिंपुटी । मरण शेवटीं पावतु ॥ ७३ ॥ तैसें मनाचि हें वृथा नांव । हें तंव भ्रमाचोंचि सोलींव । स्वस्वरूप नेणतांचि स्वयमेव । मन ऐसा भाव उपजे देहीं ॥ ७४ ॥ स्वप्नामाजी ऐसें स्वमरण । देखे आपुलें आपण । पाहों जातां स्वयें जाण । आप आपण जीतुचि असे ॥ ७५ ॥ स्वप्नांमाजी जैशी स्वमरणावस्था । तेणें मृत्यु पावे तत्वतां । देखे आपुलें दहन करितां । प्रबोधेंतां कांहींच नाहीं ॥ ७६ ॥ तैसें मन भ्रमें करीं मानी । मनें पावे संसारश्रोणी । सुखदुःखादि नानायोनि । पावे अनुदिनीं कल्पकोटी ॥ ७७ ॥ तोंचि मन विचारूनि पाहतां । स्वरूप न कळे ना नये हाता । विचारें आत्मप्राप्तिच तत्वतां । मन हें वृथा कल्पित ॥ ७८ ॥ ऐसें विचारें विचारितां । तंव आत्माचि येतसे हाता । तोचि मनाची येकाग्रता । नाशु तत्वत यया नाम ॥ ७९ ॥ हेंचि मनाचें नाशन । विचारूनि कीजे संपूर्ण । इतर साधनें ते क्लेश जाण । प्राप्तिलक्षण तें न घडे ॥ ८० ॥

असम्यक्दर्शनं यस्मादनात्मन्यात्मभावनम् । यदवस्तुनि वस्तुत्वं तन्मनो विद्धि राघव ॥ ५ ॥

आणीकही आयिक रघुनाथा । या मनाची वोळखी तत्वतां । आयिकतांचि निश्चितता । बाणे सर्वथा परियेसीं ॥ ८१ ॥ अगा सम्यक् दर्शन तें ज्ञान । असम्यक् दर्शन तें अज्ञान । जेणें होये यथार्थ वस्तूचें दर्शन । तोंचि ज्ञान निश्चयेंसी ॥ ८२ ॥ आणि जें यथार्थ प्रकाशी । तें सम्यक् दर्शन परियेसीं । यथार्थानुभव प्रमा ऐसी । बोले नेमेंसि शास्त्रयुक्ति ॥ ८३ ॥ यथार्थ आणि अनुभवेंकरून । जेणें साक्षात् होये तोंचि विज्ञान । होंचि शास्त्रें नेमिलें असे ज्ञान । अनुभवही पूर्ण ऐसाचि आहे ॥ ८४ ॥ अगा यथार्थ शब्देंकरून । अयथार्थाचें केलें निरसन । अयथार्थ म्हणिजे मिथ्याभान । मृगांभ जाण शुक्तिरजतादि ॥ ८५ ॥ ऐसे नानास्वप्नादिभ्रम असती । ते ते अयथार्थ म्हणतिजती । यथार्थें केली सर्वांची व्यावृत्ति । भिन्न गति यथार्थाचि ॥ ८६ ॥ आतां यथार्थ वस्तु तरी होये । परी देशांतरीं आहे । तिचें स्मरण करणें तोचि स्मृति पाहे । अनुभव नोहे सर्वथा ॥ ८७ ॥ अनुभव नामें स्मृतिव्यतिरेकज्ञान । म्हणऊनि अनुभवशब्देंकरून । स्मृतीचें केलें व्यावर्तन । तिहूनि भिन्न ज्ञान तोंचि ॥ ८८ ॥ यथार्थ आणि स्मृतिव्यतिरिक्त । अनुभवसिद्ध प्रत्यक्षभूत । तेंचि ज्ञान ऐसें शास्त्रसिद्धांत । असती गर्जत बाहे उभारुनी ॥ ८९ ॥ आणि अयथार्थाचें रूप

---

१ न पाहणें. २ दुःखी. ३ आपण स्वतः. ४ आपण मेलों अशी स्थित. ५ जागा झाल्यावर. ६ यथार्थ नाहीं असें.

ऐसें । जें कीं अनात्मामात्र असे । त्यातें प्रकाशी तें सर्वांशें । तें असम्यक् ऐसें ज्ञान होये ॥ ९० ॥ तया असम्यक् ज्ञानास्तव । अनात्मा जो प्रपंच सर्व । देहादिक जे सर्वही भाव । जाण ते सर्व अनात्मा ॥ ९१ ॥ तया अनात्मयासि आत्मभावना । कीजे जेणें रघुनंदना । तेंचि मन गा जाण सर्वज्ञा । यथा स्त्रुणा सर्वत्र ॥ ९२ ॥ अगा देहादि अवस्तूच्या ठायीं । वस्तुबुद्धि जेणें होये पाहीं । तेंचि मन जाण पां निश्चयीं । आन कांहीं भासे जेणें ॥ ९३ ॥ यालागीं हें असम्यक् दर्शन । तेंचि तें निश्चयें जाण मन । केवळ भ्रमरूपची पूर्ण । नाहीं आन रघुवर्या ॥ ९४ ॥ जें कीं अवस्तु शुक्ति रजत । माळा भुजंगपणें भासत । किरणीं मृगांभ दिसत । ते वस्तु जें जाणत तेंचि मन ॥ ९५ ॥ मुख्य अनात्मा तो देह जाण । त्यातें आत्मत्वें जाणे तेंचि मन । हेंचि मनाची वोळखण । जाण स्त्रूण सीतारमणा ॥ ९६ ॥ इत्यादि अवस्तुजातीं । वस्तुत्वें निश्चय करिती । तेंचि ते मनाची व्याप्ति । जाण रघुपती निश्चयेंसी ॥ ९७ ॥ आणीकही मनाचें लक्षण । सांगों श्रीरामा तुजलागून । जया युक्तीकरूनियां मन । वोळखसी पूर्ण सीताकांता ॥ ९८ ॥

अयं सोहमिदं तन्म एतावन्मात्रकं मन । तदभावनमात्रेण 'विचारेण विलीयते' ॥ ६ ॥

अगा येकचि आत्मस्वरूप । मिथ्याचि रचिलें विकल्प । नानात्व आणोनि संकल्प । जेवीं सन्निपात जल्पा जल्पतु ॥ ९९ ॥ हा येकु तो येकु ह्मणत । मी येक आणि मज हें दिसत । ऐसें येकचि चतुर्धा विभागित । मन निश्चित एतावन्मात्र ॥ १०० ॥ इत्यादि भेदांतर चित्त । सर्वदा भेदांतेंचि देखत । भेददर्शनें नानात्व जल्पत । जाण निश्चित तेंचि मन ॥ १ ॥ इत्यादि विकारांचें अभावन । करितांचि विचारेंकरून । लय पावे सर्वथा मन । नाहींच जाण ऐसें होये ॥ २ ॥ केवळ अविचारेंचि जयाची स्थिती । विचारें जातसे भस्मांतीं । तेंचि मन गा त्रिदशपति । नाहीं व्यक्ति स्वतंत्र याची ॥ ३ ॥ मन सत्य ह्मणतां विचारें नासे । असत्य ह्मणतां प्रत्यक्ष दिसे । त्याविण जगभ्रम दिसे । कोठे असे विचारें पां ॥ ४ ॥ मन नसतां जग नाहीं । हे सुषुप्तिसमाधीसि प्रतीति पाहीं । मनाचि जगदाभास सर्वही । असत्य तेही मनोलयें ॥ ५ ॥ मन नसतां ज्ञानादिसाधनें । कां प्रवर्त्तलियां असाधारणें । मनोजयासि वेद शास्त्रपुराणें । योगी साधनें योगादि करिती ॥ ६ ॥ घरोंघरीं कपाळ पिटिती । मन निश्चिळ नव्हे ह्मणती । मनोजयासि संन्यास घेती । तेही रडती मनचांचल्यें ॥ ७ ॥ मनें उत्पत्ति मनें स्थिति । मनें संहार मनें व्यवहारगति । ज्ञानाज्ञानाची प्रतीति । सकळही भ्रांति मनेंकरूनी ॥ ८ ॥ यालागीं मन नव्हे असत्य । ना तें घडे सदसत् । सत्य असत्य येकचि पदार्थ । नाहीं घडत सर्वथा ॥ ९ ॥ ना ह्मणावें सदसद्विलक्षण । तरी तेंचि तें अनिर्वाच्य जाण । इदं मिथ्यावचनेंकरून । साच तें मन अनिर्वाच्य ॥ ११० ॥ अनिर्वाच्य नें मिथ्याभूत । हा तंव वेदांतसिद्धांत । आणि

---

१ शोप्या. २ अज्ञानरूपी पदार्थांत. ३ भरून राहणें. ४ कडकडतो. ५ निद्रेंत व समाधींत. वेदांत्याचा सिद्धांत

अनुभवासि हें येत । सर्व निश्चित जाणावें ॥ ११ ॥ अनिर्वाच्य तें विचारें नाशे । ह्मणोनि तें मिथ्या भूत असे । हेंचि मनाचें स्वरूप ऐसें । रघुवंशें जाणावें ॥ १२ ॥

उपादेयानुपतनं हेयैकांतविसर्जनं । यदेतन्मनसो रूपं तद्बाह्यं विद्धि नेतरत् ॥ ७ ॥

अगा आणीकही मनाचें लक्षण । रघुनाथा ऐक सांगेन । जे कीं उपादेय पदार्थ जाण । तेथ पतन जयाचें ॥ १३ ॥ उपादेय जें विषयजात । अतिप्रियत्वें आवडत । तेथ तुटलेंचि जें जाण पडत । अतिउद्यत तेंचि मन ॥ १४ ॥ स्त्रियादिविषय देखे सुंदर । तरी तेणेंचि होये तदाकार । तें त्यावया करी नानाप्रकार । विषयातुर विषयत्वें ॥ १५ ॥ हेयें देखे जें सर्पादिक । तरी पावे भयकंपादि अनेक । कांहीं केलिया न प्रवर्त्ते देख । तेंचि सम्यक् मन जाण ॥ १६ ॥ हेंचि मनाचें स्वरूप जाण । जें अनुकूल विषयपदार्थीं करी निर्वाण । स्वयें जेवें परी न सोडी संपूर्ण । मधुमक्षिका जाण जयापरी ॥ १७ ॥ कां शर्करेलागीं जेवीं मक्षिका । तैशीच जाण पिपीलिका । अर्ध तोडिलिया देखा । न सोडी कणिका शर्करेची ॥ १८ ॥ कां मशक गुंते शेंबुडीं । कांहीं केलिया तो त्यातें न सोडी । तैसें विषयीं देतसे बुडी । अतिगोडी मानुनी ॥ १९ ॥ त्याज्य पदार्थ देखे नयनीं । तरी आणुचि त्यागी धैर्यकरुनी । तेंचि मन गा भरेवसेनी । कोदंडपाणी जाणिजे ॥ १२० ॥ हाचि संसारिकबंध । हाचि सर्व विधीचा बाध । हाचि अनर्थाचा कंद । जगद्बंधू जाण तूं ॥ २१ ॥

मनो हि जगतां कर्तृ मनो हि पुरुषः स्मृतः । मनः कृतं कृतं लोके नशरीरकृतं कृतम् ॥ ८ ॥

अगा जयाचा कर्त्ता हें मन । मनेंचि जग भासे संपूर्ण । मनोनाशें जगभान । नाहींच जाण ऐसें होये ॥ २२ ॥ अगा मनोदयें उदय जगासी । ह्मणोनि जगाचें कर्तृत्व मनासी । आपुलेनि संकल्पें प्रपंचासी । निश्चयेंसि करितसे ॥ २३ ॥ मनें भाविलिया जग भासे । मनें न भाविती कांहींच न दिसे । यालागीं मन कर्त्ता ऐसें । बोलिलें असे जानकीकांता ॥ २४ ॥ मनेंचि होये जगभ्रांति । ऐशी पूर्वी वदलों उपपत्ति । तेचि ते पुढतपुढती । जाण रघुपती निश्चयें ॥ २५ ॥ मनेंचि पुरुष बोलिजे । पुरुषपण मनेंचि आणिजे । येऱ्हवीं पुरुष ना स्त्री सहजें । कांहीं न ह्मणिजे परब्रह्म तें ॥ २६ ॥ आणि मनेंचि पुरुष ह्मणणें । तेंहीं जाण येणेंचि लक्षणें । चित्त देऊनि रघुनंदनें । हें संपूर्ण परिसिजे ॥ २७ ॥ यथा मनामाजी प्रतिबिंबत । जें कीं चैतन्य बिंबभूत । तेणें परस्पराध्यास निश्चित । त्यातें ह्मणिजेत पुरुषनाम ॥ २८ ॥ अंतःकरणीं प्रतिबिंबतां । चैतन्यांशु गा रघुनाथा । तयातें ह्मणिजे प्रमाता । पुरुष शब्दार्थी स्वयें आला ॥ २९ ॥ अथवा पुरुषाचा उपाधि हें मन । ह्मणोनि पुरुष बोलती यालागून । मनेंचि कीजे तेंचि केलें

---

१ त्याच रूपाचें. २ टाकण्यासारखें. ३ मधमाशी. ४ मुंगी. ५ माशी. ६ देवाचा. ७ हे जगाच्या बंधा रामा. ८ कल्पना केली तर. ९ एका पदार्थाच्या ठायीं दुसऱ्याची कल्पना. १० अडथळा.

जाण । येर तें स्वप्न केलें नव्हे ॥ १३० ॥ जैसें जागृतीसि मनें कीजे । तेणें केलेनि पापपुण्य निपजे । तेंचि स्वप्नीं मनेंविण जें निपजे । त्याचिया भुंजे फळासि कोण ॥ ३१ ॥ अगा स्वप्नीं जें घडे दुरित । त्यासि कोठें दिधलें प्रायश्चित्त । अथवा अन्नाशनें कोण तृप्त । जागृती प्राप्त जालया ॥ ३२ ॥ त्यालागीं मनें केलें तेंचि केलें । मन न करी तें नाहीं जालें । केवळ शरीरें जें कर्म उपजलें । तें नव्हे केलें सर्वथा ॥ ३३ ॥ यदर्थीं दृष्टांत सांगेन । मनें केलें तें कृत्य जाण । शरीरें नव्हे केलेपण । सर्वत्र खूण जाणावी ॥ ३४ ॥ मनपूर्वक सत्कर्म कीजे । त्याचिनामें केलें ह्मणिजे । मन नसतां जें जें निपजे । फोल सहजें विबुद्धनाथा ॥ ३५ ॥ केवळ शरिराचें केलें । तें केलें नव्हेचि जाण बोलें । जेणें कांतेतें आलिंगिलें । प्रीतीमेळें सर्वां अवयवीं ॥ ३६ ॥ त्याचि शरीरेंकरुनी । दुहिता आलिंगी प्रीतीकरुनी । तरी तो काय पडेल पतनीं । कोदंडपाणी सांग पां ॥ ३७ ॥ कांता आलिंगनीं जैसें मन । तैसें कन्या आलिंगनीं पतन । शरीर आलिंगनीं समान । परी मन भिन्न दोन्ही ठायीं ॥ ३८ ॥ यालागीं शरीरें जें निपजलें । तें नव्हे कर्म केलें । मनें केलें तेंचि भलें । इहामुत्रफळें मनःकृत ॥ ३९ ॥ मनेंचि अतिशयें पापपुण्य । परदाराभिलाषी जरी मन । तरी तया नरकीं पतन । शरीरें[१]गमन न करितांही ॥१४०॥ तेंचि मन जरी स्वस्वरूपीं लीन । जालया घडे अधर्माचरण । तरी तें शरीरकृत न करी पतन । नाहीं मन ह्मणऊनियां ॥ ४१ ॥ मनें स्वस्वरूप जाणिजे । अथवा सगुणरूप मनेंचि ध्यायिजे । तेणें पुण्यातिशय जो उपजे । तो तो न निपजे शरीरकृत ॥ ४२ ॥ मनें होय स्वरूपप्राप्ति । मनेंचि पाविजे परम शांति । येव्हडी या पुण्याची उन्नति । काय पावती शरीरें ॥ ४३ ॥ तैसेंचि मन देहातें आत्मा मानी । तरी ते देहबुद्धि घाली पतनीं । गेलिया कोटिकल्पांच्या[२] श्रेणी । अधःपतनीं न सुटे ॥ ४४ ॥ मन जिथे कर्मी नसे । केवळ शरीरेंचि वर्तत असे । ते यागादि होतु भलतेसे । नाहीं विशेष फळ त्यांसी ॥४५॥ तीर्थव्रततपोदान । यजन याजन अध्ययन । संध्यास्नान देवतार्चन । सर्व मनेंविण निर्फळ ॥ ४६ ॥ यालागीं मनें कृत तेंचि कृत । शरीरकृत तें नव्हे निश्चित । जीवन्मुक्त देहेंकरीं समस्त । परी अलिप्त अमनस्कें[४] ॥ ४७ ॥

चित्तं कारणमर्थानां तस्मिन्सति जगत्रयं ॥ तस्मिन्सक्षीणे जगत्क्षीणं तच्चिकित्स्यं प्रयत्नतः ॥ ९ ॥

अगा या आठाश्लोकेंकरून । सांगितलें चित्ताचें लक्षण । आतां त्याचा नाशप्रयत्न । तुजलागून निरोपूं ॥ ४८ ॥ यालागीं गा रघुनाथा । चित्तचि कारण सर्वार्थां । जगत्रय भासे चित्त असतां । चित्त नसतां जग कैंचें ॥ ४९ ॥ अगा जगाचें उत्पत्तिमरण । तें चित्ताच्या भावाभावें[५] जाण । चित्तक्षीणें जग क्षीण । नाहीं आन दैत्यदलना ॥ १५० ॥

---

१ अंग स्पर्शामुळें. २ प्रत्यक्ष संग. ३ अनेक युगांचा काळ. ४ मनपणा नसल्यानें. ५ असण्यानें अथवा नसण्यानें.

मनेंचि पदार्थ जात स्फुरती । मनोलयें लय पावती । मनोनाशं सर्व नाशती । मनें उत्पत्ति सर्वांची ॥ ५१ ॥ यालागीं मनाची चिकित्सा । करावी गा त्रैलोक्याधीशा । जैसी रोगाची निर्विशेषा । कीजे चिकित्सा जयापरी ॥ ५२ ॥ विचारऔषधेंकरून । मन आमय निर्दळून । तुवा अतिसहासोन । भरंवसेनि चिकित्सिजे ॥ ५३ ॥ यासि वासना-बाहुल्यें मलिनता । निर्वासनेनें होये शुद्धता । ह्मणोनि वासनाक्षय तत्वतां । करावा सर्वथा रघुपुंगवा ॥ ५४ ॥

राम वासनया बद्धं मुक्तं निर्वासनं मनः ॥ तस्मान्निर्वासनीभावमाहराशु विवेकतः ॥ १० ॥

ऐकें रामा कमलनयना । मेघश्यामा चित्सुखैकघना । परापरम परिपूर्णा । रघुनंदना परियेसीं ॥ ५५ अगा मुख्य वासनेचिकरून । बद्धता पावतसे हें मन । मुक्त जाणावें निर्वासन । हेंचि खूण ययाची ॥ ५६ ॥ नाहीं मनेंचि बद्ध आणि मुक्त । हें तंव भासतसे अयुक्त । जड अप्रकाश तें बद्ध होत । हें अनुचित्त अघटमान ॥ ५७ ॥ तरी येथील अभिप्रावो ऐसा । मनेंसि प्रमाता एकत्र वीरेशा । जाला ह्मणोनि तया आभासा । विचार ऐसा बोलिजे ॥ ५८ ॥ जीवत्व सर्व मनाच्या माथां । मन तोंचि जीव प्रमाता । येणें अभिप्रायें बोलतां । बंध तत्वतां असेचिना ॥ ५९ ॥ हा चैतन्याचा आभास । पड-ला चित्ताच्या ठायीं बहुवस । चित्त स्वच्छ सर्वेंद्रियांपरीस । ह्मणौनि चैतन्यांश बिंबतु ॥ १६० ॥ ह्मणोनि मनाचे बहुतेंकरून । जीवासि होय बंधन । मन मुक्त निर्वासना जाण । तेंचि मुक्तपण जिवाचें ॥ ६१ ॥ अथवा जीवाच्या बंधमोक्षाप्राप्ति । मुख्य मनचि कारण गा रघुपति । मनोबंधेंही जीवासि बंधप्राप्ति । मुक्तत्वें मुक्ति तत्वतां ॥ ६२ ॥ जैसें उदकाचेनि मळिणपणें । प्रतिबिंबही मळिण होणें । शुद्ध जळेंशुद्ध तेणें । सर्वदा असणें प्रतिबिंबें ॥ ६३ ॥ जळाच्या चांचल्यें चंचलता । जळाचेनि स्थैर्यें स्थैर्यता । जळप्रावाहे प्रवाहतां । दिसे वाहतां प्रतिबिंब ॥ ६४ ॥ नाना दर्पणाचेनि दोषें । तितुकें प्रतिबिंबें भासती सावकाशें । राक्षस गुणा माजी कर्कशे । विश्वसदृशें प्रतिबिंब ॥ ६५ ॥ मनुष्य गुणें वर्तुळाकार । मुख दिसे महाथोर । देव गुणीं मनोहर । दिसे साचार जैसें तैसें ॥ ६६ ॥ दर्पणें वक्रपणें वक्रता । मळिणपणें मळिणता । आदर्शभाव विचारितां । दिसती वर्त्ततां प्रतिबिंबीं ॥ ६७ ॥ तेसा चैतन्यांश मनदर्पणीं । प्रतिबिंबला चित्तगुणीं । त्याच्या मळिणजडत्वादिलक्षणीं । स्वयें चित्तगुणीं विराजत ॥ ६८ ॥ मनमळिणें मळि-णता । मनःशुद्धत्वें शुद्धता । जे चित्तगुण तेचि प्रमाता । नाहीं अन्यथा भिन्न भाव ॥६९॥ जो मुख्य बिंबातें जाणे । मुख्य बिंब तें मीच ह्मणे । तव्हां चित्त भासे वेगळेपणें । मुक्त ह्मणणें तयासी ॥ १७० ॥ यालागीं चित्तगुणीं शोभत । चित्तशुद्धें शुद्ध होत । चित्तं-

---

१ वासना नाहींशा झालेले. २ भ्रम. ३ पुष्कळ कालपर्यंत. ४ कर्मेंद्रियें व ज्ञानेंद्रियें यांपेक्षां. ५ संथपणानें. ६ आरशाचा संबंध. ७ मन जर दोषी असेल तर.

मळिणें मळिणयुक्त । ह्मणोन हे मात ऐसी आहे ॥ ७१ ॥ येऱ्हवीं जड अप्रकाशक मन । ययासि न घडे मोक्ष ना बंधन । हें बोलिलेती तें प्रमाण । परी भाव आन तोचि निरूपिला ॥ ७२ ॥ ययालागीं रघुपति । सवासने मना बंधप्राप्ति । निर्वासनेचि निर्मुक्ति । नाहीं विप्रतिपत्ति यया बोला ॥ ७३ ॥ ययालागीं गा त्रैलोक्यनाथा । तत्वविवेक करूनि सर्वथा । निर्वासन करावें गा चित्ता । स्वयें मुक्तता साधावया ॥ ७४ ॥ सद्गुरुवाक्यें विवेकेंकरुनी । मन निर्वासन करीं धनुष्यपाणी । यया साधनांसि विलंब झणी । येकक्षणि होऊं नेदी ॥ ७५ ॥ रघुकुळटिळका हें मन । शीघ्र करावें गा निर्वासन । ययाचें नाम निदिध्यासन । जाण संपूर्ण आनंदमूर्ती ॥ ७६ ॥ अगा मनोवृत्ति विषयाकार । होती तोचि वासनाप्रकार । त्यांचा बाह्यचि होये संचार । परी अंतर नेणती ॥ ७७ ॥ यया इंद्रियांची बाह्य प्रवृत्ति । हे अंतर कदापि नेणती । आणि अंतर्मुखही नव्हेती । ते स्वयें करिजेती बलात्कारें ॥ ७८ ॥ जितुके अनात्मवर्ग असे । तितुका चित्तवृत्ति प्रकाशित असे । तरी वृत्ति नियमूनि मानसें । अंतर्मुख ऐसें करावें ॥ ७९ ॥ जितुके विजातीय अनात्मा । तेथूनि चित्तवृत्ति उपरमा । नेऊनि सजातीय जो आत्मा । तोचि रामा अनुसंधावा ॥ १८० ॥ अगा अनात्मा तो मिथ्या असे । विचारमात्रेंचि नाशत असे । ह्मणोनि वृत्ति अनायासें । निघोनि बैसे आत्मरूपीं ॥ ८१ ॥ येणेंचि होये निर्वासनता । मग चित्तपण कैंचें चित्ता । पावोनियां निजात्मता । होय तत्वतां परिपूर्ण ॥ ८२ ॥ अनात्मवर्ग सत्यत्वें न स्फुरे । चित्तवृत्ति स्वस्वरूपीं मुरे । तेचि मुक्तता निर्धारें । नाहीं दुसरें मेघश्यामा ॥ ८३ ॥

यथाभ्रलेखा शशिनं सुधालेपं मषी यथा ॥ दूषयत्येवमेवांतर्नरमाशापिशाचिका ॥ ११ ॥

अगा हे आशा मुख्य पिशाचिका । शुद्धासिच मैळ करी देखा । जैसी कां अभ्रांची रेखा । चंद्रासि देखा मैळ करी ॥ ८४ ॥ अथवा शुद्ध लेपातें मषि । करी आपणासदृश कालिमा ऐसी । तैसी आशाभूत हे नरासी । करी जैसी अमारजनी ॥ ८५ ॥ नसता अर्थ प्राप्त होण । प्राप्तही अर्थ अधिक करण । इये हांवे जें भरे मन । जाण हें खूण आशेची ॥ ८६ ॥ हेचि मुख्य विषयासक्ति । हेचि हे विक्षेपाची गति । हेचि मनाची मुख्य भ्रांति । आत्मस्थिति भ्रंशे जेणें ॥ ८७ ॥ येणें आत्मप्रकाशु लोपे । अतिशयें अज्ञान उद्दीपे । तेणें गडदचि पडे स्वस्वरूपें । अंतर न गुंपे विवेकासी ॥ ८८ ॥ धवळार मषी माखिलें । शुद्ध वस्त्र कांटे कांटिलें । कां जलदेंकरूनि पांघुरविलें । अंवसेचे भलें निशीथ जैसें ॥ ८९ ॥ किंवा अंधारें सिनीवालीचें । वरी लेप दिजेती काजळाचे । तैसें आशेकरूनि मन साचें । मैळे साचें

---

१ इच्छारहित. २ आत्मा नव्हेत असे पदार्थ. ३ लक्ष्य लावावें. ४ ढगाची. ५ चुनेगच्ची वाडा. ६ कांट्यावर घालून पाडिलें. ७ काळोख. ८ चंद्रयुक्त अमावस्येचे.

परियेसीं ॥ १९० ॥ मन हें स्वयें तरी मिथ्याभूत । जैसा बाळाप्रति यक्ष सत्य । तैसें अंतरीं भेडसावित । वृथा दावित बडिवारुचि ॥ ९१ ॥ पाहतां सकळहीं मन येक । जें जें दिसे मिथ्या अनेक । शास्त्रही बोले सम्यक । श्रुति देख बोलतसे ॥ ९२ ॥ यद्वि-षयीं बृहदारण्यश्रुति । बोलिलीसे अतिनिगुती । विस्तारें तुजप्रति । सांगेन ऐकें ॥ ९३ ॥

संमतिश्रुति ॥ ॥ कामः संकल्पो विचिकित्सा श्रद्धाऽश्रद्धा धृतिरधृतिर्ह्रीर्धीर्भीरित्येतत्सर्वं मन एवेति ॥

तरी सकळही येवढें वोडंबर । विरोनि जाये जेणें सत्वर । तो सांगों तुज प्रकार । मन स्थिर करीं आतां ॥ ९४ ॥

अंतर्मुखतया सर्वं चिद्वह्नौ त्रिजगत्तृणं । जुह्वतोंतर्निवर्त्तंत राम चित्तादिविभ्रमः ॥ १२ ॥

तरी हें मन अंतर्मुख करुनी । सर्व त्रिजगती हवां चिद्वन्हीं । तरी चित्तादि विभ्रम अंतरोनी । जाती निवर्त्तोनि रघुपुंगवा ॥ ९५ ॥ आतां अंतर्मुख मन तें कैसें । तेंही सांगों सावकाशें । आधीं बहिर्मुख तें परियेसें । मग अनायासें जाणसी ॥ ९६ ॥ तरी सर्वदा विषयांचें अभिलाषण । सर्वदा देहादिपदार्थभान । सर्वदा सत्यत्वें दर्शन । हेचि पूर्व बहिर्मुखता ॥ ९७ ॥ जगीं मिथ्यत्वाभिदर्शन । आणि दोषदृष्टिनिवर्त्तन । सर्वदा ब्रह्माकारस्फुरण । अंतर्मुखता जाण मनाची ॥ ९८ ॥ अनात्म तितुका दृश्यजात । हें तत्वतां जाणोनि बाधित । स्वरूपीं निमग्न चित्त । हेचि निश्चित अंतर्मुखता ॥ ९९ ॥ इये अंतर्मुखतेकरुनि । हें सर्व विश्व तृणप्राय भरंवसेनि । तेंही तृण हविजे चिद्वन्हीं । तरी भरंवसेनि चित्त कैंचें ॥ २०० ॥ तया पुरुषाच्या अंतरीं । ज्या ज्या चित्तभ्रमाच्या ल्हरी । त्या त्या निवर्त्तती क्षणाभीतरीं । जाण असुरारी निश्चयेंसीं ॥ १ ॥ अंतरीं चिद्वन्ही जाला प्रदीप्त । येथें चित्तादिभ्रम तृण समस्त । विरूढे कैसें जाण तेथ । होये भस्मांत वन्हिस्पर्शें ॥ २ ॥ अगा तरुकोटरांतरगत । वह्नि असतां प्रदीप्त । तेथें तृण पेरितां अंकुरित । नव्हे निश्चित जयापरी ॥ ३ ॥ कां वडवानल पेटतां वनीं । तेथ अंकुर नुपजे पेरिलिया धान्यीं । तैसा चित्तादिभ्रम ब्रह्मज्ञानीं । जागृतिस्वप्नीं नुदेजे पैं ॥ ४ ॥ आणी-कही उपाय सांगेन । जेणें चित्त होये विभ्रम पूर्ण । चित्तासवेंचि दृश्यभान । विरोनि जाण जातसे ॥ ५ ॥

यदा न भाव्यते किंचिद्धेयोपादेयरूपि यत् । स्थीयते सकलं त्यक्त्वा तदा चित्तं न जायते ॥ १३ ॥

तऱ्ही हेय उपादेय जे पदार्थ । ते कांहीं न भावावे यथार्थ । तेणेंचि विरे नुपजे चित्त । स्वयें उर्वरित सकळ त्यागें ॥ ६ ॥ तेव्हां न स्फुरे द्वैतभान । चित्त पावलें अचित्तपण । आंतां द्वैत कल्पीत कवण । भस्मांत पूर्ण चित्त द्वैत ॥ ७ ॥ जेव्हां विश्व कल्पित तें मुदल जाये । तेव्हां विश्व कल्पितें कवण आहे । तेथें हेय उपादेय कवण काये । जरी होये

१ भिवविती. २ यासर्वधानें. ३ स्पष्टपणानें. ४ पसारा. ५ होमकर. ६ शानाग्नींत. ७ इच्छा. ८ वाहे-रचे पदार्थमात्र पाहणें. ९ दिसणारा प्रत्येक पदार्थ.

रूपवंत ॥ ८ ॥ अगा कारण अज्ञान नाशलें । तत्कार्य मन कैचें उरलें । मनासवें कल्पित गेलें । तेथ नुरे भलें ग्राह्याग्राह्य ॥ ९ ॥ आधीं कल्पितें मुद्दल जरी असे । तरीच अलिप्त विश्व भासे । मग त्यामाजी ग्राह्य त्याज्य ऐसें । घेइजे मानसें शुभाशुभ ॥ २१० ॥ अगा अंतर्मुखत्वेंकरुनी । न भावनचि होय निर्वाणीं । न भावितां जगडवाळ नयनीं । न देखे स्वप्नीं जागृतीसी ॥ ११ ॥ मुख्य चित्तचि मृत जालया । मग जगाचि न फुरे गा रघुराया । मन हें असे अवस्थात्रया । तेव्हां क्षया जाईल ॥ १२ ॥ तरी तेंही सांगों तुजप्रति । येकाग्र ऐकें गा रघुपती । चित्तनिमालिया हे त्रिजगती । विश्वभ्रांति न भासे ॥ १३ ॥

घोरं जाग्रन्मयं चित्तं शांतं स्वप्ने व्यवस्थितं । मूढं सुषुप्तिभावस्थं त्रिभिर्हीनं मृतं भवेत् ॥ १४ ॥

घोररूपेंकरूनि जागृतीसी । चित्त चपळ होये परियेसीं । व्यवहारांत ह्मणोनि तयासि । घोर ऐसी संज्ञा असे ॥ १४ ॥ आणि घोर हा रजोगुण । तद्रूपचि तें जालें मन । ह्मणोनि होतसे विश्व भासन । जागृति जाण ह्मणिजे तिसी ॥ १५ ॥ स्वप्नीं मन शांत सत्वगुणें । तेथें परिणमे स्वप्नपणें । यालागीं शांत ह्मणणें । अतिमूढपणें सुषुप्तीसि ॥ १६ ॥ सुषुप्तीसि तमोगुणेंकरून । जडमूढता पावे हें मन । ययावेंगळे तें मृतपण । जाण खुण रघुराया ॥ १७ ॥ तिन्ही अवस्था जेथ नाहीं । तेंचि स्वरूप तुर्य पाहीं । तिन्ही नसतां मनही । कैचें काय स्फुरेल ॥ १८ ॥ बुद्धीचे जे तिन्ही गुण । सत्व आणि रज तम जाण । त्यांच्या वृत्ति जागृतीसुषुप्तिस्वप्न । जाण खूण विबुद्धनाथा ॥ १९ ॥ मन बुद्धि दोन्ही येकत्रपणें । तया मनचि ऐसें ह्मणणें । वृत्ति नाशालिया मनाचें नाशणें । नाहीं जिणें सर्वथा ॥ २२० ॥ मनाच्या तिन्ही गुणवृत्ति । तयां बोलिजे जागृति स्वप्नसुषुप्ति । वृत्तिरूपें मनाचीच व्यक्ति । हीनवृत्ति मनाचि नसे ॥ २१ ॥ मनोवृत्ति त्याचि मन जाण । वृत्तिहीन तेंचि मृतपण । यालागीं अवस्थात्रयविहीन । केलिया मन मृत होये ॥ २२ ॥ मनाचेनि मृत्यें जग नाहीं । जग न भासे तुर्य पाहीं । तेंचि स्वरूपस्थिति सर्वही । आन नाहीं सीतारमणा ॥ २३ ॥

विलाप्य पंकं कतकं रजोऽप्सु विलयं यथा । यथात्मनि तथा विद्धि विलाप्य विलयं मनः ॥ १५ ॥

अगा डहुळलिया जळा आंत । कतकरज जरी निक्षेपिजेत । तरी तें पंकातें करूनि अधस्त । स्वयें जळगत तळीं राहे ॥ २४ ॥ जेण पंकें शुद्ध जळासि । डहूळ केलें स्वरजेंसी । कतकरजें भस्म पंकासी । आपणासि केलें रामा ॥ २५ ॥ प्रथम पंकरज ग्रासुनी । मग स्वयेंही लय जळस्थानीं । जळ तें स्वस्थ स्वरूपपणीं । असे निर्वाणीं अतिशुद्ध ॥ २६ ॥ तैसें प्रपंचाध्यासें ब्रह्मासी । सद्वितीयत्व आलें परियेसी । ब्रह्मीं निक्षेपिलिया मनासी । तें घेऊनियां जगासि स्वयें शमेल ॥ २७ ॥ जळस्थानीं ब्रह्म

---

१ परिणाम पावतें. २ निद्रेंत. ३ मेलेलें. ४ चवथें. ५ गुणांचे प्रकार. ६ जागेपणा, स्वप्न, व नीज, या तीन अवस्था नाहींत असें.

निर्मळ । तेथें जगदाभास पंक डहूळ । यामाजी मन कतक प्रबळ । घालिती निर्मळ जैसें तैसें ॥ २८ ॥ जग द्वैत मनकल्पित असे । तेणें सद्वितीय ब्रह्म भासे । तें मन जैं स्वरूपीं प्रवेशे । तैंच नासे जग टवाळ ॥ २९ ॥ अगा जगटवाळासरिसें । स्वयें मन स्वरूपीं नाशे । तत्क्षणींच नाहीं ऐसें । अनायासें होये मन ॥ २३० ॥ मन विचारितां सबाह्यभ्यंतरीं । तरी सकळ ब्रह्मचि गा रावणारी । मनोदयें जग भरोवरी । ब्रह्म निर्धारीं नाहींच होये ॥ ३१ ॥ ह्मणऊनि मन तोचि संसार । मन तोचि बंध महाथोर । मनेंचि चंचळ हें शरीर । मनें मनोहर सर्वेंद्रियें ॥ ३२ ॥

चित्तं जानीहि संसारं बंधश्चित्तमुदाहृतं । पादपः पवनेनैव देहश्चित्तेन चाल्यते ॥ १६ ॥

जैसा पवनें करीं पादप चळे । पवनेंकरूनि सर्वदा हाले । पवनेंविण सर्वदा न ढळे । कांहीं न चळे स्थिरपणें ॥ ३३ ॥ तैसा चित्तेंचि हा देह चाळे । चित्तें इंद्रिया चेष्टविलें । चित्तेंचि हें सुखःदुख स्फुरलें । चित्त शमलें स्वरूपस्थिती ॥ ३४ ॥ यालागीं चित्त तेंचि संसार । चित्तचि हा बंध थोर । चित्तलयेंचि सुख अपार । निर्विकार होये स्थिती ॥ ३५ ॥ यालागीं त्रिदशाधिपती । आधीं हें मन जिंकावें सर्वार्थीं । मनोजयें सुखसंपत्ति । ब्रम्हास्थिती सर्वदा ॥ ३६ ॥ मनोजयें स्वाराज्यप्राप्ति । मनोजयें ब्रह्मस्थिती । मनोजयें शमदम होती । साधनसमाप्ति मनोजयें ॥ ३७ ॥ मनोजयें ब्रह्मता सिद्ध । मनोजयें प्रपंचाचा बाध । मनोजयें ब्रह्मावबोध जाये अबोध मनोजयीं ॥ ३८ ॥ मनोजयें सुखकोटी । मनोजयें स्वरूपीं भेटी । मनोजयें फल्गुप्राय सृष्टि । सर द्वैत आटी मनोलयें ॥ ३९ ॥ मनोजयें सुखाचा सुकाळु । मनोजयें दुःखाचा दुकाळु । मनोजयें द्वैतासि काळु । आनंदकल्लोळु मनोजयें ॥ २४० ॥ मनोजयें संसृतिभंग । मनोजयें सदा अभंग । मनोजयें अव्यंग । परमभाग्य मनोजयें ॥ ४१ ॥ ह्मणोनि भलतेन भलते प्रकारें मनोजय करावा अत्यादरें । तीर्थव्रतादिसाधनपुरें । कायसा बारे व्हाहाती ॥ ४२ ॥ तीर्थव्रतादि तप दान । हें तंव संसृतीसिच कारण । चक्र मनोनिग्रह जाण । करिती सज्ञान सुखलब्धीसि ॥ ४३ ॥ प्रतीति स्वानुभव आपणापासीं । करूनि पाहावे अहर्निशीं । साधनें प्रवर्तलीं सुखासी । परी दुःखासि नव्हती हेतु ॥ ४४ ॥ तीर्थाटनादिसाधन करितां । आजन्म श्रमु उपज चित्ता । मनोलय क्षण मात्र करितां । सुखस्वरूपता प्राप्त होये ॥ ४५ ॥ हे दोन्ही आपणा आधीन असती । तेचि करूनि पाहावी संतीं । मन जेणें होये सुखप्राप्ति । तेंचि सर्वार्थीं साधावें ॥ ४६ ॥ जो सद्गुरूचा असेल अनुगृहीतु । तेणें सेवावा येकांतु । तेथें मनोजय यथोचितु । करावा वाक्योक्तु सद्गुरुचिया ॥ ४७ ॥ वायुधारणेंकरूनि मनोजय । करणें तो सर्वथा जाण लय । तेणें सिद्धि

---

१ वायुमुळें. २ ब्रह्माचे ज्ञान. ३ जन्ममृत्यूंस. ४ उपदेश झालेला. ५ मन जिंकून टाकणें. ६ अणिमादि सिद्धि (भागवत एकादश स्कंद पहा.)

होती परब्रह्मोपाय । नव्हे अपाय तो याचिहेतु ॥ ४८ ॥ परी तोहि ब्रह्मप्राप्ति कळेल । मध्यें तंव सिद्धि अंतराया होईल । निःकामें चिरकाळें होय फळ । करतळामळ जैसा स्फुट ॥ ४९ ॥ यालागीं ज्ञानेविचारेंकरुनि । नेतिमुखें द्वैत निरसुनी । मनोलय परब्रह्मस्थानीं । अतिनिर्वाणीं करावा ॥ २५० ॥ अथवा स्वरूपाकारेंचि असणें । हेंचि सन्मुख होय देणें । विजातीय स्फुरे तें मी ह्मणे । विक्षेप मनें जाणाया ॥ ५१ ॥ या मनाचे पंचवीस वृत्ति दोष । ते स्फुरलिया विक्षेप विशेष । त्याचिनामें सविशेष । बोलिजे सोस विक्षेपाचा ॥ ५२ ॥ त्या मनाचे दोष नेणती । आणि वृथाचि मना कोंडिती । कोंडिलिया पडे पुडती । नये व्यक्ति कोंडितियांसी ॥ ५३ ॥ प्रपंचाचा तळवट घेती । तळीं मनातें निक्षेपिती । तेथूनि तें उफळे पुडती । जळीं बुडविती दुधिंया जैसा ॥ ५४ ॥ तो जंव तळीं दडपिती । तंव चळवळित राहे क्षण स्थिती । सोडितां उसाळे सबळगती । जळाही वरता भांव येत ॥ ५५ ॥ ऐसोनि कोटिकल्प जात । परी मनोजय नव्हे निभ्रांत । लौकिकीं मनी येकांत । समाधिस्थ होतों ह्मणती ॥ ५६ ॥ परमार्थ तो लौकिक नव्हे । तो तों स्वहिताचलागीं केला आहे । सांडूनि लौकिक दंभ सोये । धरावे पाय सद्गुरूचे ॥ ५७ ॥ सद्गुरूचे दृढ सेविलिया चरण । सर्वांचाही जय होये जाण । नलगे दारुण आन संधान । ऐसेंचि श्रीकृष्ण बोलती ॥ ५८ ॥ सप्तमस्कंधीं श्रीभागवतीं । पाहा पां सादर हे संमति । कृष्णद्वैपायनाची उक्ति । अतिप्रीती अवधारीं ॥ ५९ ॥

। संमति श्लोक । । असंकल्पज्जयेत्कामं क्रोधं कामविवर्जनात् । आर्थनर्थे क्षयालोभं भयं तत्त्वाभिमर्शनात् ।

आन्वीक्षिक्या शोकमोहौ दंभं महादुपासया । योगांतरान्मौनेन हिंसां कायाद्यतीहया ।

कृपया भूतजं दुःखं दैवं जह्यात्समाधिना । आत्मजं योगवीर्येण निद्रा सत्त्वनिषेवया ।

रजस्तमश्च सत्वेन सत्त्वं चोपशमेन च । एतत्सर्वं गुरोर्भक्त्या पुरुषोह्यंजसा जयेत् ।

यस्य साक्षाद्भगवति ज्ञानदीपप्रदे गुरौ । मर्त्या सद्धीः श्रुतं तस्य सर्वं कुंजरशौचवत् ।

अगा संकल्प न करितां पाहीं । काम जिंकावा गा सर्वही । कामाचेनि जयें क्रोध ही । होय निश्चयीं जिंकिला ॥ २६० ॥ अर्थाचा ठाईं अनर्थदृष्टि । करितां होये अर्थलोभेंसि तुटी । तत्त्वाभिमर्शनें भयकोटी । जाय सृष्टि पळोनियां ॥ ६१ ॥ आन्वीक्षिकीविद्येकरुनी । शोक मोह जिंकीजेती भरंवसेनी । संतांचे सेवेकरुनी । दंभ निर्वाणीं भस्म कीजे ॥ ६२ ॥ लोकांसि लौकिक बोलणें । योगियांसि अंतराय हेंचि जाणणें । तें जिंकावें धरोनि मौनें । अनीहपणें हिंसा जिंकावी ॥ ६३ ॥ भूतापासाव दुःखें होती । कृपेकरूनि जिंकीजेती । दैवसंबंधीं दुःखें भस्मांतीं । सर्वथा जाती समाधीस्तव ॥ ६४ ॥ देहपासाव दुःखें होतीं । तीं योगसामर्थ्यें जिंकीजेती । सत्वसेवनें सर्वदा जागृति । निद्रा भस्मांतीं जाय तेणें ॥ ६५ ॥ रजतमगुण सत्वेंकरुनी । जिंकावे गा भरंवसेनी । सत्वगुणही उपशमउनी । लीन निर्वाणीं करावा ॥ ६६ ॥ परी इतुकेही क्लेश न करितां । येकयेकांचे जयीं न लगतां ।

१ मोगळा. २ व्यासाची. ३ भाषण. ४ तत्वज्ञानानें. ५ गौतमकृत न्यायशास्त्र, ६ विघ्न.

येकचि काळें जय समस्तां । प्रयास नव्हतां होय तें सांगूं ॥ ६७ ॥ तरी भावें धरितां सद्गुरुचरण । भक्तीनें करितां अनन्यभजन । सर्वांचा जय होये संपूर्ण । नाहीं आयुशाये तेथें ॥ ६८ ॥ कांहीं न करितां क्लेशसाधन । अनायासें सर्वांचा जयो जाण । येक सेवितां सद्गुरुचरण । लाभ पूर्ण पूर्णत्वाचा ॥ ६९ ॥ अहो वास्तव तरी विचारितां । भजनीय कोण सद्गुरूपरता । जो कीं ज्ञानदीप प्रकाशिता । जीवा तारिता ब्रह्मपणें ॥ २७० ॥ साक्षात् सद्गुरु ब्रह्ममूर्त्ति । तोचि भजनीय गा सर्वार्थी । तेथें असत्य बुद्धि करूनि मूढमती । अन्य पूजिती अन्योपायें ॥ ७१ ॥ सद्गुरूवेगळें देवतांतर । पूजणें जाणें तो व्याभिचार । स्वपूरुष टाकूनि परनर । भजे गव्हार पुंश्चली जैसी ॥ ७२ ॥ सद्गुरूची कृपा तयासि । फळली नाहीं निश्चयेंसी । ययालागीं तो भक्तीसी । विमुख सर्वांशीं रामचंद्रा ॥ ७३ ॥ तयाचें जें श्रुतजात । तें व्यर्थचि जालें गा समस्त । कुंजरशौच बोलिजेत । धुतला धळ मागुती ॥ ७४ ॥ तैसें जें जें तो पलिन्नला । श्रुत्यध्ययनाचा अभ्यासु केला । महावाक्याचा विचारमेळा । व्यर्थ गमाविला गुरुभजनेंविण ॥ ७५ ॥ यालागीं सद्गुरूसि होऊनि शरण । येकांत भक्ती करावें भजन । तेणें सांगितलें मार्गेंकरून । मन संपूर्ण जिंकावें ॥ ७६ ॥

॥ हस्तं हस्तेन संपीड्य दंतैर्दंतान्विचर्ण्य च । अंगान्यंगैः समाक्रम्य जयेच्चेंद्रियशात्रवम् ॥ १७ ॥

वासिष्ठ ह्मणती गा रघुराया । आधीं जिंकावें गा मना यया । सर्व साधनांचें क्लेश सांडूनियां । करावें उपाया मनोजयाच्या ॥ ७७ ॥ अगा सर्वदा हेंचि करावें । अतिप्रयासें मनातें जिंकावें । स्थिर न राहे तरी दाटावें । येकत्र करावें बलात्कारें ॥ ७८ ॥ अगा हस्तें हस्त दडपोनी । नेटें चुरावे बळेंकरुनी । दंतीं दंत रागें चाऊनी । नेटेंकरुनि जिंकावें ॥ ७९ ॥ क्रोधें दांत खावूनि रघुपती । मनातें जिंकावें सर्वार्थी । जैसा महाशूर रणाप्रति । करी विक्रांति शत्रुजया ॥ २८० ॥ आंगें आंगातें पीडुनी । आसन घाली चरण मोडुनी । परी आधीं जिंकावें भरंवसेनी । मन निर्वाणीं सीताकांता ॥ ८१ ॥ हें मन जिंकिलिया रघुवीरा । मोडे विश्वभ्रांतीचा पसारा । मग बुडोनि राहिजे सुखसागरा । नाहीं दरारा संसृतीचा ॥ ८२ ॥ अगा गुरुसंप्रदायेंविण । करितां मनाचें दमन । तें स्थिर नव्हे अधिकाचि जाण । होये दारुण अतिचांचल्यें ॥ ८३ ॥ अगा या मनाच्या ज्या दोषवृत्ति । त्या निरोधिल्या निवृत्तिक स्थिति । त्या पंचधा बोलों तुजप्रति । जय ह्मणती मनाचा तो ॥ ८४ ॥ त्या वृत्ति जिंकिलिया नसतां । मनोजय केला ऐसें ह्मणतां । लाज मोठी गा रघुनाथा । त्यासि बोलतां कोण वारी ॥ ८५ ॥ मनाच्या वृत्ति वोळखोनी । मग जय करावा वृत्ति त्यजुनी । मग प्रयास न करितां भरंवसोनी । होय निर्वाणीं मनोजय ॥ ८६ ॥ तरी सद्गुरुमुखें वृत्तीचें ज्ञान । करूनि करावें नियमन । वृत्ति निरोधिल्या निवृत्तिक

१ शिनलसी. २ हत्तीचें स्नान. ३ चांवावें. ४ पराक्रम. ५ भीति. ६ जन्ममरणाच्या. ७ दोष असलेले प्रकार.

मन । होत जाय आपसया ॥ ८७ ॥ यया वृत्तींतें नोळखती । आणि मनोजय करूं इच्छिती । तेणें थोर श्रमु गा पावती । मनोजयाची प्राप्ति असेचिना ॥ ८८ ॥ त्या मनोवृत्ति कोणकोण । सांगेन तयांचें लक्षण । आइकें एकाग्र करूनि मन । मनोनियमन महाथोर ॥ ८९ ॥ अगा महाअसुरातें मारितां । तो न मरे नानाउपाय करितां । बुद्धीनें करचरण तोडितां । मग तो सर्वथा निमेचि कीं ॥ २९० ॥ नाना सहस्रकरातें परशुधरु । युद्धीं देखूनि अनिवारु । मग सहस्रभुजा छेदूनि महावीरु । जय थोरु करी त्याचा ॥ ९१ ॥ नाना करचरण मोडिलियावरी । पांगुळ निश्चळ बैसे परवरीं । तो कांहीं केलिया न निघे बाहेरी । तैसी परी मनाची होये ॥ ९२ ॥ तैसे या मनाचे करचरण । त्याचि या पंचवृत्ति जाण । यांतें नेमिलिया आपण । मना स्थिरपण स्वरूपीं ॥९३॥ मग कांहीं केलिया न ढळे । बाहेरी घातलिया न चळे । अर्धींच राहे निश्चळे । नव्हे मेळ बाह्यवृत्ति ॥ ९४ ॥ तया पंचवृत्तिप्रकार । तुज सांगेन गा सविस्तर । तेणे बुझसी सर्वसार । मनोमार जेणें होये ॥ ९५ ॥ तरी प्रमाण विपर्यय विकल्प । हा वृत्तित्रय जाण रूप । निद्रा स्मृति हे संकल्प । पंचविधरूप जाणावें ॥ ९६ आतां येककाचे लक्षण । तेंही तुजप्रति सांगेन । तेणें तूं बुझसी संपूर्ण । आइक चिन्ह सर्वोत्तम ॥ ९७ ॥ प्रमाण तेंही षड्विधप्रकार । तितुकिया मनोवृत्ति साचार । तयांसि वोळखावें सविस्तर । आयिक सादर रघुनाथा ॥ ९८ ॥ प्रत्यक्ष अनुमान उपमान । शाब्द अर्थापत्ति अभाव जाण । हेंचि षड्विध प्रमाण । एक लक्षण ययाचें ॥ ९८ ॥ नेत्रीं घटपटादि भासती । श्रवणें शब्दाची प्रतीति । घ्राणें गंधत्वाची स्पर्शव्यक्ति । रसना रसेंवृत्ति प्रत्यक्षाची ॥ ३०० ॥ जें जें प्रत्यक्ष जाणिजे । तें प्रत्यक्षप्रमाण ह्मणिजे । अनुमानें अनुमान लक्षिजे । तेंहि परिसिजे लक्षण ॥ १ ॥ पर्वतीं धूम देखिला । तेणें अग्नि आहे ऐसा अनुमानिला । येणें न्यायें अनुमान केला । जाण श्यामला मदनमूर्ती ॥ २ ॥ आतां उपमान तें ऐसें । येके वस्तूसि साम्य देइजेत असे । 'गो सदृशो गवयः' ऐसें । हेंचि सर्वांशें उपमान ॥ ३ ॥ हा पुरुष सिंहाचि असे । कां मुख हें चंद्रासारिखें दिसे । येकासि येक उपमिजेतसे । उपमान ऐसें या नाम ॥ ४ ॥ शाब्द तो जाण चौथें प्रमाण । शाब्दें अर्थ प्राप्त होत जाण । महावाक्यें जेसें ब्रह्म पूर्ण । देखिजे स्वूण गुरुमुखें ॥ ५ ॥ लौकिकशब्दें अर्थप्राप्ति । होये हें सर्वांसि प्रतीति । नदीतीरें पंच फलानि संति । होय प्राप्त आप्तवचनें ॥ ६ ॥ आतां अर्थापत्तीचें लक्षण । तें तंव एवंविध जाण । येकु दिवसा न करी भोजन । पुष्टपण सर्वांगा ॥ ७ ॥ तेथें निशिभोजनाची संभावना । कीजे ते अर्थापत्ति जाणा । अभाव तो ऐसा रघुनंदना । राजीवलोचना परियेसीं ॥ ८ ॥ घट नाहीं जिये भूमिकेसी । तोचि तो घटाभाव परि-

१ आपोआप. २ मरतो. ३ कार्तवीर्याला १००० हात होते अशी कथा आहे. ४ मोडी घेणें. ५ गवा हा बैलासारखा असतो.

यसीं । येणें न्यायें सर्वत्र ऐसी । अभावरूपासि जाणिजे ॥ ९ ॥ ऐसें षड्विध प्रमाण ॥ ह्या तंव चित्तवृत्ति जाण । प्रथमवृत्ति ते षड्विध संपूर्ण । दुसरी पूर्ण विपर्ययता ॥ ३१० ॥ तरी शुक्तिकेचा ठाईं रजत । कां रश्मिजाळीं मृगांभ दिसत । रज्जुसर्पादिभ्रम समस्त । जाण निश्चयें विपय तो ॥ ११ ॥ येके साच वस्तूच्या ठायीं । असत्य तें दुजें पाहीं । तोचि विपर्यय जाण सर्वही । मनोवृत्ति तेही रघुनाथा ॥ १२ ॥ विकल्प तो असत्याचें स्मरण । वंध्यापुत्रादि व्योमसुमन । हेचि चित्तवृत्ति संपूर्ण । जाण खूण रघुपुंगवा ॥ १३ ॥ मुख्य विकल्प संशय जाण । हें होय कीं नव्हे संदेह पूर्ण । हेंचि विकल्पाचें लक्षण । जाण खूण रघुनाथा ॥ १४ ॥ चतुर्थ वृत्ति ते जाण निद्रा । वस्तु अवलंबूं न दे राजेंद्रा । स्वरूपस्थितीसि अभद्रा । भवसमुद्रा पाडित असे ॥ १५ ॥ पूर्वी अनुभविला जो अर्थ । त्याचें स्मरण होय यथार्थ । ते स्मृति जाण पां यथातथ्य । हे निश्चित चित्तवृत्ति ॥ १६ ॥ हे पंचविधचित्तवृत्ति । हेचि नियमावी त्यासर्वार्थी । वृत्तिनियमनें अवृत्तिकस्थिति । होये प्राप्ति मनोनिग्रहाची ॥ १७ ॥ जागृतिस्वप्नसुषुप्तीच्या पोटीं । यया पंचवृत्तींची होतसे आटी । अवस्थात्रय टाकितां नेटी । होय भेटी साक्षियासी ॥ १८ ॥ साक्षीस्वरूप जाणतांचि खेवो । होय लयो मनादिदृश्याचा अभावो । यालागीं हाचि मुख्य उपावो । होय लयो मनाचा या ॥ १९ ॥ अगा येणेंचि मार्गेंकरूनी । आधीं मना नियमावें भरंवसेनी । हेचि मुख्य कोदंडपाणी । आन करणी तो सर्वही श्रमु ॥ ३२० ॥ आतां मनोलय करूं न शकति । लौकिकीं दंभु मिरविती । त्यांची श्रीवासिष्ठ निंदा करिती । ते श्लोकसंगति परिसिजे ॥ २१ ॥

चित्तमेकं न शक्नोति जेतुं स्वातंत्र्यवर्जितः । ध्यानवार्तां वदेन्मूढः स किं लोके न लज्जते ॥ १८ ॥

येक चित्ताचि गा रघुनाथा । जे कीं कोंडूं न शकती सर्वथा । तयांची हरली स्वतंत्रता । आसक्तता विषयांचेनी ॥ २२ ॥ विषयासक्तीनें स्वतंत्र आपण । आणि हारतले त्यांचें ज्ञातेपण । मनें बोलती दंभेंकरून । आह्मी करूं ध्यान सर्वदा ॥ २३ ॥ ऐसेही ध्यानवार्ता बोलती । हें तंव आश्चर्य थोर गति । मूर्ख ते बोलतां न लज्जती । ऐसी गति या लोकांची ॥ २४ ॥ हा प्रयत्न तो पुरुषा आधीन । स्वचित्त करावें स्वाधीन । तें नव्हे विषयासक्तीन । वार्ता श्लाघोन ध्यानाची करिती ॥ २५ ॥ नाहो विषयासक्ति कां होय तयांसी । आणि आदरु कां नुपजे अभ्यासी । केलाही अभ्यासु कां तयांसी । नेदी फळासि तें सांगिजे ॥ २६ ॥ तरी अवैराग्यें विषयासक्ति । अनादरें अभ्यासु न करिती । अभ्यासें नव्हे फळप्राप्ति । निरंतर नाहीं प्रीति ह्मणोनियां ॥ २७ ॥ हें न करोनियां रघुपती । दंभेचि ध्यानवार्ता बोलती । आह्मी ध्यानस्थ होतों ह्मणती । परी न करिती

---

१ उलटेपणा. २ वांझेचा पोर, आकाशाचें शिंग वगैरे. ३ पांच प्रकारचें मन. ४ निर्विकार. ५ इतर. ६ ध्यानाची गाष्ट.

प्रयत्न कांहीं ॥ अगा मनोजय करावया । तीन साधनें पाहिजेती गा रघुराया । वैराग्य आदर आणि नैरंतर्या । पाहिजेती साद्य प्रकार तिन्ही ॥ २९ ॥ अगा वैराग्यें विषयासक्ति नव्हे । विषयासक्ति नसतां विक्षेप होये । आदरें अभ्यासी उदासता नये । यालागीं होये मुख्य अभ्यासु ॥ ३३० ॥ आदरें अभ्यासुही करी । परी तो निरंतर न करी । दोनीमांसाआड आदर न धरी । तेणें नव्हे साध्य प्राप्त ॥ ३१ ॥ यालागीं साधनत्रय असावें । अखंड अभ्यासीं मन घालावें । क्षण येक चित्तानुसारिखें वर्तावें । सर्वांचि मोहरावें आत्मा मोहरा ॥ ३२ ॥ जैसा कां खळ अश्वजाति । सर्वथा न धरी मार्गु सुमजाति । अश्वधारकु तयाप्रति । ऐसी युक्तिप्रयुक्ति करी ॥ ३३ ॥ मार्गानुसार ने तयासी । इत्यादि त्याकरवीं अभ्यासी । अडल्या क्षण येक त्याच्या मार्गासी । अनुसरे क्लेशीं तदनुसार ॥ ३४ ॥ सर्वांचि नेमी स्वप्रवृत्तीसी । परी उमासु घेवों नेदी तयासी । ऐसा हळहळू अतिप्रयासीं । स्वांयत्त तयासि करितसे ॥ ३५ ॥ तैसा या मनप्रज्ञावंता । निरंतर अभ्यासींच चालितां । क्षणें तदनुसारही चालतां । सर्वेंची वळितां निज अभ्यासीं ॥ ३६ ॥ ऐसें वैराग्यादि तिन्ही गुणीं । अभ्यासु केला गा अनुदिनीं । तेणें चित्त भरंवसेनी । होय लीन तत्क्षणीं दितिजशत्रो ॥ ३७ ॥

एक एव मनो देवो ज्ञेयः सर्वार्थसिद्धिदः ॥ अन्यत्र विफलः क्लेशः सर्वेषां तज्जयं विना ॥ १९ ॥

सर्वांसही तमारिवंशप्रदीपा । हा मनोजयमार्गु गा सोपा । परी न करिती हें आश्चर्य बापा । थोर पापाचें हें फळ ॥ ३८ ॥ अगा सर्वही क्लेश त्यजुनी । येक मनोजय करावा कार्मुकपाणी । न करावें विफल क्लेशालागुनी । सुखसमाधानीं मनोजय ॥ ३९ ॥ सर्व साधनांचें निराकारण । 'एव' कारें क्लेशाचें परिहरण । करूनि मनोदेवोचि ज्ञेयत्वें जाण । सर्वसंपन्न सिद्धिहेतु ॥ ३४० ॥ नाहीं मनादेवो कां ह्मणितलें । देवत्व यासि कायसेनि आलें । तरी तेंही सांगों येक्या बोलें । जेणें केलें पदार्थही पैं ॥ ४१ ॥ अगा सर्वां जो प्रकाशी तयासी । देवो ह्मणती हृषीकेशी । प्रत्यक् वृत्तीनें परियेसीं । सर्व प्रकाशी अंतरपणें ॥ ४२ ॥ वृत्तिरूप ह्मणती जें ज्ञान । तें प्रकाशत्वें प्रकाशमान । देव ह्मणती यालागून । आणीक चिन्ह परियेसीं ॥ ४३ ॥ सकळ इंद्रियांच्या वृत्ति । मनास साह्य प्रकाश करिती । यालागीं मन हा देवो ह्मणती । लक्ष्मीपती परियेसीं ॥ ४४ ॥ ऐसेंच येकादशीं उद्धवासी । स्वयें सांगे हृषीकेशी । भयंकर देवदेवो ह्मणती मनासी । दुर्जय योगियांसि ह्मणोनियां ॥ ४५ ॥

संमति श्लोक । मनोवशेऽन्ये ह्यभवंस्म देवा मनश्च नान्यस्य वशं समेति ॥
भीष्मो हि देवः सहसः सहीयान् युञ्ज्याद्वशे तं स हि देवदेवः ॥

---

१ उमासा=अभ्यास. २ दोनचार महिने टाकून. ३ किंचित् मार्गें फिरावें. ४ विश्रांति. ५ ताब्यांत आलेला. ६ अकराव्या स्कंधांत.

संमतिश्रुति ॥ ॥ मनसो वशे सर्वमिदं बभूव नान्यस्य वशे मनो वशमन्वेति ॥
भीष्मो हि देवः सहसः सहीयानिति ॥

असो या मनातें ज्ञेय करावें । ज्यासि जाणणें तेंचि नियमावें । नियमनें तोंचि जाणावें । ज्ञेयत्व ह्मणावें हेंचि वर्म ॥ ४६ ॥ तो येक मनोजय केलिया । सर्व सिद्धि होती आपैसया । अन्यत्र साधनें केलिया । जयो न करी तया विफळ क्लेश ॥ ४७ ॥ अगा मनोजयेंविण जाण । सर्व व्यर्थचि होय साधन । येकें मनोजयें सर्व संपूर्ण । समाधान इतुकेनी ॥ ४८ ॥ तया मनोजयाची उपायसंपत्ति । सांगेन तुज जनकजापति । येकाग्र करूनि चित्तवृत्ति । महामती परियेसी ॥ ४९ ॥

अनुद्वेगः श्रियो मूलमनुद्वेगात्प्रवर्त्तते ॥ जंतोर्भनोजयादन्यत्रैलोक्यविजयस्तृणम् ॥ २० ॥

अगा मनाचा जो अनुद्योग[१] । जो कीं व्यवहारशून्यसांग । कामत्यागमात्र निःसंग । तो अनुद्योगभाग जाणावा ॥ ३५० ॥ मनीं संकल्पमात्र नुठी । सर्व कार्यजात जेथें आटी[२] । त्या नाम अनुद्वेग गा जगजेठी । थोर सृष्टी थोर येकु ॥ ३५१ ॥ जग बाधित देखिलया । अनुद्वेग उपजे आपसया । मृगांभाच्या[३] प्राप्ती उपाया । ज्ञाता काय तया प्रवर्ते ॥ ३५२ ॥ तोचि तो मोक्षलक्ष्मीसि मूळ । तेणेंचि मोक्षलक्ष्मी प्रबळ । अनुद्वेगेंचि सकळ । प्राप्त फळ अनुद्वेगाचें ॥ ५३ ॥ सर्व कार्यांचा अनुद्वेग करण । तेणेंचि अनुद्योगाचें होणें । यालागीं अनुद्योगेंचि असणें । उद्वेग टाकणें सर्वथा ॥ ५४ ॥ सवदा अनुद्वेगपणें । तेंचि गा मनातें जिंकणें । मनोजया सर्व साधनें । आत्मा साक्षात् करणें मनातें या ॥ ५५ ॥ यया प्राणियांसि गा रघुनाथा । मनोजयो लाभ सर्वथा । मनोजयावेगळें तत्वतां । त्रैलोक्य ताता तृणप्राय ॥ ५६ ॥ अगा मनोजयापरतें । त्रैलोक्य जिंकिलें तृणासमान तें । यालागीं जिंकणें सर्व सामर्थ्यें । यया मनातें रघुवर्या ॥ ५७ ॥ अगा शरांमाजी तो महाशर । जो येकलें मन जिंकी सत्वर । देहादि करी सर्व संहार । तो अखंड नर शूरपणें ॥ ५८ ॥ अगा मनापुढें शूरनायका । त्रैलोक्याचा कोण लेखा । विश्व तें तृणतुल्य विश्वतोमुखा । नाहीं लेखा मनापुढें ॥ ५९ ॥ अगा अतिशूर जो असेल । तो त्रैलोक्य तत्काळ जिंकील । परी मन जिंकी तो विरळ । न भेटे[४] भूतळ भेदिलिया ॥ ३६० ॥ मन जिंकिल्या त्रैलोक्य जिंकिलें । मन जिंकिल्या सर्वही केलें । मन जिंकिल्या आत्मत्व साधिलें । सुख साधलें ब्रह्मानंदें ॥ ६१ ॥ अगा त्रैलोक्य हें मनाच्या पोटीं । मन जिंकिल्या जयो सृष्टी । सृष्टि जिंकिल्या कोणेंसि भेटी । सांगें जगजेठी पुरुषार्थ काये ॥ ६२ ॥ यालागीं मन जेणें जिंकावें । तया त्रैलोक्य आपैतें[५] स्वभावें । तरी मनोजयाच्या उपायें गौरवें । सांगेन तें राघवें परिसिजे ॥ ६३ ॥

सत्संगो वासनात्यागः स्वात्मविद्याविचारणा । प्राणस्पंदनिरोधाश्चेत्युपायाश्चितसो जये ॥ २१ ॥

अगा चित्तजयोकरणाचा ठाईं । हे उपाय बोलिले पाही । येकें पक्षें जाण पंचकहीं[६] ।

---

१ आपोआप २ रिकामें असणें. ३ मृगजळाच्या. ४ पाड, प्रतिष्ठा ५ हे सर्व व्यापका. ६ आइक.

विचारणा हेही पर कलिया ॥ ६४ ॥ अतिनिकट तत्काल फळते । तेचि उपाय सांगेन तूतें । एकाग्र एकिजे रघुनाथें । चित्त जयांत पावे जेणें ॥ ६५ ॥ तरी प्रथम उपाय महायोग । जो कीं उपायांचें सर्व सार । तो साधुसंग गा उदार । मनोमार जेणें होये ॥ ६६ ॥ अगा सर्व संगाचें अपोहन । होय येर्के साधुसंग करून । मनोजय आपआपण । होय क्षण न लगतां ॥ ६७ ॥ मनाचा अहंकारेंसि संग । मन आवरिल्या असंग । मनें सर्वदा वासनाप्रसंग । मनें अभंग देहबुद्धि ॥ ६८ ॥ मनें पुत्रवित्तादिकांची गोडी । मनें द्रव्यदारांची आसक्ति फुडी । मन पाडी भवआगडीं । संसारबेडी मनेंचि केली ॥ ६९ ॥ देहेंद्रियांचा संगु । मनें वाढे संसाररोगु । तो सत्संगें होय वियोगु । निश्चय अभंग आत्मतत्वीं ॥ ३७० ॥ सत्संगेंकरीं त्रैलोक्यनाथा । सर्व संग नाशती गा तत्वतां । सत्संगें वासनात्यागु सर्वथा । होये निजात्मता सत्संगें ॥ ७१ ॥ अगा सत्संगापरतें कांहीं । या त्रैलोक्यांत बरवें नाहीं । सत्संगें लाभे सर्वही । मनाजेयो कार्यी तयापुढें ॥ ७२ ॥ मनादिप्रपंच भ्रम जेणें होये । तें अज्ञान सत्संगें पळोनि जाये । सत्संगें देहबुद्धि कैंची राहे । सत्संगें होय निजात्मलाभ ॥ ७३ ॥ सत्संगें खळाचें खळपणा मोडे । सत्संगें देहबुद्धि तत्काळ विघडे । सत्संगें सर्व संसार तुटे सत्संगें घडफुडे ब्रह्मज्ञान ॥ ७४ ॥ सत्संगें सत्कर्मादि अनुष्ठान । सत्संगें जपादिसाधन । सत्संगें वाणे वैराग्य पूर्ण । राखे खूण आत्मयाची ॥ ७५ ॥ ह्मणोनि येर्के सत्संगेंकरून । मनाचें होये भस्म पूर्ण । याल्लागीं करावें साधुसेवन । पदरजवंदन साधूचें ॥ ७६ ॥ अगा संताचे चरणींची धुळी । तेणें कारितांचि आंघोळी । नुरे आज्ञानाची काजळी । मन मनमेळीं उरे कैंचें ॥ ७७ ॥ ह्मणोनि साधनांसाजी साधन । सत्संग साधनांशिरोरत्न । याहूनि कोटि न चढे गा जाण । तूंही सज्ञान जाणसी ॥ ७८ ॥ दुसरें साधन वासनात्याग । ज्या ज्या चित्त वृत्ति उठती अभंग । तयाचि वासना हे जाण पां सांग । रूप अव्यंग वासनांचें ॥ ७९ ॥ मना पासाव जे जे वृत्ति उठी । तयाची मूळींच करावी आटी । साक्षियाच्या अंगा नेहटी । दृश्य पोटीं घालूनियां ॥ ३८० ॥ जो जो संकल्प विषयाकार । उठे घेऊनि वासनांकुर । तो तो करावा निर्विकार । पदार्थाकार होऊं नेदी ॥ ८१ ॥ स्वरूपावेगळें अनात्मजात । जें जें दृश्यत्वें स्फुरत । तें स्फुरणाचि चैतन्यार्थ । करीं निश्चित प्रत्यक् वृत्ति ॥ ८२ ॥ यातेंचि जाणावें वासनात्याग । जाण श्रीरामा अव्यंग । नानाभेदें वासजाचि सांग । जाण अभंग रघुराया ॥ ८३ ॥ तिसरें साधन विचारणा । जे कीं आत्मविद्या बोलिजे जाणा । तेणें उरी नुरे मनपणा । भस्म पूर्ण स्वयें होये ॥ ८४॥ अथवा विचारणा ते ऐसी । आत्मानात्म विवेक परियेंसी । तेणें मनोजय निश्चयेंसी । सर्वस्वेंसि होये रामा ॥ ८५ ॥ अगा आत्मविद्या तें ज्ञान । मनादिल्याचें कारण । आत्मज्ञानें सर्व संपन्न । नाहीं न्यून कोण्हेविषईं ॥ ८६ ॥ अथवा

१ मनाचा नाश. २ आग. ३ मोठी. ४ संसाररूप कोंडवाड्यांत. ५ सर्व साधनांहून श्रेष्ठसाधन ६ परिपूर्ण

श्रवण मनन निदिध्यासन । जे कीं आत्मविद्येचे मुख्य साधन । तें करितां मनाचें भस्म होय पूर्ण । जाण ती खूण अनुभविजे ॥ ८७ ॥ आणि प्राणस्पंदाचे निरोधन । हेंही येक मनोजयाचें कारण । जो कीं प्राणायाम निर्वाण । वायुधारण जेणें होये ॥ ८८ ॥ पवननिरोधें मनोजय होये । कां मनोजयें प्राण जयो होताहे । परस्परें हा निश्चय आहे । यालागीं पाहें साधुनी ॥ ८९ ॥ आणि याचा अनुक्रम गा रघुपती । साधुसंगें वासना तुटती । वासनाक्षयें ज्ञानप्राप्ति । विचाराअंतीं जे होये ॥ ३९० ॥ प्राणस्पंदनिरोध करुनी । मनोजय होये भरंवसेनी । ययालागीं याही साधनीं । होये निर्वाणीं मनोजय ॥ ९१ ॥ मनोजय जालिया रघुपति । तेचि पूर्णता गा सर्वार्थीं । पूर्णपणें मोक्षसंपत्ति । होये त्रिजगती सुखरूप ॥ ९२ ॥

पूर्णे मनसि संपूर्णं जगत्सर्वं सुधाद्रवैः । उपानद्गूढपादस्य ननु चर्मास्तृतैव भूः ॥ २२ ॥

ब्रह्मकार होतांचि मन । त्याचें नाम पूर्णपण । पूर्ण मन असतांचि जाण । जग संपूर्ण ब्रह्मत्वें ॥ ९३ ॥ मग ज्ञानामृत गा महावीरा । द्रवों लागे इंद्रियद्वारा । मग मन विषय विश्वपसारा । ब्रह्मेंसि दुसरा भासेना ॥ ९४ ॥ दुसरें न भासे ब्रह्मेंविण । त्याचेंचि नाम परिपूर्ण । मग त्रिजगतीं त्या सुखसंपन्न । आपणाविण न देखे दुजें ॥ ९५ ॥ अगा उपानहें गूढचरण । तया पृथ्वीप्रति चर्मास्तरण । चर्ममयचि धरा जाण । नाहीं वणवण जळजळेची ॥ ९६ ॥ अगा मोक्ष आणि बंधन । हे दोन्ही आपणाचि आधीन । विपरीत संकल्पें बंधन जाण । सुपरीतें विमोचन स्वतःसिद्ध ॥ ९७ ॥ तेंही सांगेन तुजप्रति । आइकें मैथिलेश्वरदुहितापती । वैकुंठाधीशा विश्वतोमूर्ती । सुखसंवित्ति सुखरूप ॥ ९८ ॥

नाहं ब्रह्मेति संकल्पात्सुदृढं बद्ध्यते मनः । सर्वं ब्रह्मेति संकल्पात्सुदृढं मुच्यते मनः ॥ २३ ॥

मी ब्रह्म नव्हे या दृढ संकल्पें । मन बंधन पावे येणेंचि अल्पें । मन उपलक्षणें प्रमातांचि जल्पें । निरूपण सोपें केलें मागें ॥ ९९ ॥ ह्मणोनि मी ब्रह्म नव्हेचि कल्पितां । भवबंधु पावे गा सर्वथा । आणि मीच ब्रह्म सुदृढ जाणतां । स्वयें मुक्तता वरी त्यातें ॥ ४०० ॥ सर्वब्रह्म ऐसे सुदृढज्ञानें । तत्काळ मुक्ति होईजे मनें । ह्मणोनि दृढताचि सर्वज्ञें । साधावी येणें प्रकारेंकरुनी ॥ १ ॥ सर्वशब्दें विश्व बोलिजे । जें जें दृश्याकारें देखिजे । तें सर्वही ब्रह्मचि जाणिजे । श्रुतीनें बोलिजे स्वतःसिद्ध ॥ २ ॥ 'इदं सर्वं यदयमात्मा' ऐसें । 'सर्वं खल्विदं ब्रह्म' ऐसें । प्रत्यक्ष श्रुति बोलतसे । अनुभव वसे ऐसाचि ॥ ३ ॥ जैसें सर्पचि रज्जू ह्मणतां । बाधु काय पावे गा रघुनाथा । वास्तव आदिमध्य असतां । रज्जुचि पाहतां रज्जुपणें ॥ ४ ॥ यश्चोरः सस्थाणुरेव ऐसें । ह्मणतां तो स्थाणुचि असे । चोर भासला ह्मणोनि उच्चारतसे । येऱ्हवीं वसे स्थाणुचि स्थाणु

१ प्राणांचे चलनवलन. २ वायु अडविल्यानें ३ प्राणायाम केल्यानें ४ वाहणा घातलेल्या ५ चामड्याचें आंतरुण. ६ हे सीतापते रामा ७ ज्ञानीपुरुष. ८ 'जो आत्मा तोच हें सर्व होय'.

॥ ५ ॥ तैसें पूर्वीं भ्रमेंकरुनी । विश्व भासलें ब्रह्मस्थानीं । यालागीं बुझावया त्याचे वचनीं । श्रुति परामर्षणीं प्रवर्त्तली ॥ ६ ॥ विश्वाचा परामर्ष करून । इदंकारें विश्व दंऊन । ब्रह्माचि दावी निर्वाण । तेंचि प्रमाण श्रुतिवाक्य ॥ ७ ॥ तोचि अनुभव विपश्चितासी[१] । तेंचि विचारें पाहतां मानसीं । हेंचि कारण बंधमोक्षासी । हृषीकेसी जाण तूं ॥ ८ ॥ यथार्थ जैसें आहे तैसें देखणें । हेंचि मोक्षाचें कारण । विपरित विश्वपणें जाणणें । बंधन मनें तेंचि पाविजे ॥ ९ ॥ अगा आपण तें यथातथ्यें । ब्रह्म जाणणें यथार्थें । तेंचि मुक्ति वरी त्यातें । तयापर तें दुजें नाहीं ॥ ४१० ॥ तोचि देहाद्याकारेंकरुनी । देहादिइंद्रियसमुदाय आपणा मानी । तोचि बंधन तेचि सर्वस्वें हानि । संसारश्रेणि उत्तरोत्तर ॥ ११ ॥ यालागीं अहंब्रह्मेतिसंकल्पें येणें । सर्वदा मुक्तचि गा असणें । 'नाहं ब्रह्मेति'[२] हेंचि बंधन । संसारदैन्य पावावया ॥ १२ ॥ अगा स्वतःसिद्ध स्वयें ब्रह्म असतां । लोक लाजती मी ब्रह्म ह्मणतां । जैसी परपुरुषा स्पर्शतां । होय लज्जिता पतिव्रता जैसी ॥ १३ ॥ पंचभौतिक बहुतांचा । भक्ष्य तरी श्वानसूकरांचा । तो देहचि मी ह्मणती साचा । बोध तयांचा काय सांगों ॥ १४ ॥ श्वान मस्तकावरी पाय देऊन । जेव्हां भक्षितसे या देहालागून । तेव्हां येतां खेदे दुसरा श्वान । तरी गुरगुरून पाठी लागे ॥ १५ ॥ ते आपुला विभाग ह्मणउनी । तें कलेवर आपुलेंचि मानी । स्पर्शों नेदी दुसरियालागुनी । धरी निर्वाळूनि पोटासी ॥ १६ ॥ ऐसीं जे जे भक्षिती तयासी । ते ते आपुलाचि मानिती निश्चयेंसी । शृगालवृकादि[३] यासी । ह्मणती देहासि विभाग आपुला ॥ १७ ॥ तैसेंचि जीतां स्त्रीपुत्रादिक । सुहृद् बंधु मित्र सकळीक । माझा ह्मणती तयासि देख । सांग निष्टंक[४] कोणाचा हा ॥ १८ ॥ ऐसें या देहातें मीच ह्मणे । आणि स्वयें ब्रह्म असोनि ब्रह्म न ह्मणे ऐसें । लोक अतिशहाणे । दुःखें दारुणें पावती ॥ १९ ॥ अगा मी ब्रह्म ह्मणणें याचिसाठीं । होय अपरोक्ष ब्रह्मेंसि भेटी । संसारासि लागे कांटी[५] । पळे उठाउठी अज्ञान ॥ ४२० ॥ हें सकळही मनेंकरुनी । बंध मोक्ष होती कोदंडपाणी । द्वैताद्वैतही स्फुरे मनीं । अनर्थकरणी मनाची या ॥ २१ ॥ तरी ययालागीं हेंचि करावें । यया मनातेंचि समूळ टाकावें । मग आप आपणिया स्वभाव । असिजे गौरवें आपुलेनी ॥ २२ ॥

चित्ते त्यक्ते लयं याति द्वैतमैक्यं च सर्वतः । शिष्यते तु परंब्रह्म शांत नित्यमनामयम् ॥ २४ ॥

चित्ताचे संकल्प टाकितां । ॥ चित्तचि लय पावतसे सर्वथा । चित्तलयें श्रीरघुनाथा । सर्वत्र ताता द्वैत ना ऐक्य ॥ २३ ॥ ॥ अथवा मन आपणाहूनि भिन्न देखणें । मनाचा साक्षी स्वयें होणें । याचि नाम गा मन टाकणें । खूण जाणणें हेचि मुख्य ॥ २४ ॥ मनाच्या येकत्वें जंव हा असे । तंवचि मनासि मनपण वसे । आपणाहूनि भिन्न देखतांचि सर्वांशें । चित्त आपैसें टाकिलें होये ॥ २५ ॥ अगा मनेंचिकरूनी द्वैत स्फुरे । आणि

१ विद्वानास. २ 'मी ब्रह्म नव्हें असें' समजणें. ३ कोल्हे लांडगे वगैरे. ४ खराखरा. ५ नाश होतो. ६ मन पाहणारा.

मनेंचिकरूनि द्वैत थिरे । द्वैताभावें अद्वैत स्फुरे । दोन्ही निर्धारें मनेंचि होतीं ॥ २६ अहो द्वैताद्वैतपण स्फुरणें । ऐक्य स्फुरे द्वैताचि स्मरणें । यें दोन्ही ही अनुसंधानें । करिजे मनें सर्वथा ॥ २७ ॥ यालागीं मनाचा त्याग केलिया । मन द्वैत ना ऐक्य रघुराया । येक नहोनि येकलिया । उरणें अद्वया ब्रह्मासी ॥ २८ ॥ अगा येकु ह्मणतांचि विश्वमूर्ती । गणितेनेंसी दोन्ही होती । यालागीं द्वैत ना ऐक्य भासती । मनशांति जालिया ॥ २९ ॥ यालागीं संकल्प त्यागें लयो मनाचा । मनोलयें उपरमु द्वैताचा । मग ब्रह्मचि उरे जेथ सर्वांचा होय साचा उपरमु ॥ ४३० ॥ अगा येकाचि ब्रह्माचा ठाईं । मनेंचि द्वैतजाळ कल्पिलें पाहीं । ऐसेंचि ऐक्य येणें न्यायेंहीं । मनें सर्वही कल्पिलें ॥ ३१ ॥ टवळे वातीच्या उपाधीकरून । येक अग्नीसिच भेद दाऊन । मन हे दीप मानी भिन्न भिन्न । तैसें हें जाण ऐक्यही ॥ ३२ ॥ दोन्हीही दीपांसि ऐक्य मानित । येऱ्हवीं येकुचि अग्नि संतत । तैसें ब्रह्मीं विश्व कल्पित । मनेंचि द्वैत कल्पिलें ॥ ३३ ॥ कां जळासिचि बुब्दुद वीचि । भेदकल्पना तेथ मनाची । तेंचि स्फांटलिया प्रतीति ऐक्याची । येऱ्हवीं जळचि उपरमु ॥ ३४ ॥ तें कल्पिलें मुदल मन जाये । मग द्वैत ना ऐक्य दोन्हीं नोहे । येकलें येक सर्वत्र आहे । ब्रह्मचि पाहे सदोदित ॥ ३५ ॥ नातरी आकाश सर्वत्र येकु असे घटमठादि उपाधीनें भिन्न भासे । घट मठ भंगल्या ऐक्य दिसे । पाहतां मानसें द्वैत ना ऐक्य ॥ ३६ ॥ तैसे सर्वांहूनियां जें कीं पर । तेंचि परब्रह्म गा साचार । शांतशब्दें निर्विकार । नाहीं विकार उपाधीचा ॥ ३७ ॥ अगा उत्पत्तिमरणादिरोग । तेचि ते आमय-शब्दें सांग । मुख्य अज्ञान तोचि रोगयोग । होये भंग ययाचा जेथें ॥ ३८ ॥ अथवा आमयशब्दें उपाधि । तो सर्व नाशे जेथें निरवधि । तेंचि निरामयपद गा सुबुद्धि । ब्रह्म त्रिशुद्धी जाणिजे ॥ ३९ ॥ तेंचि निर्विकार निरंजन । शांत परब्रह्म निर्गुण । तेंचि उरे येर होये क्षीण । विश्वभान कल्पित जें ॥ ४४० ॥ अगा कल्पित जाऊनि रघुनाथा उरे परब्रह्मचि तत्वतां । तेंचि तें जाण सर्वथा । सांगेन आतां तें आयिकें ॥ ४१ ॥

चिन्मात्रत्वं प्रयातस्य तीर्णमृत्योश्चेतसः । भवत्येव परमानंदः केनासावुपमीयते ॥ २५ ॥

अगा ऐसेनि उपायेंकरुनी । चिन्मात्र जो पावला निर्वाणीं । तो मृत्यु तरला भरंवसेनी । चित्त निश्चयेंनि प्रत्यङ्मुखें ॥ ४२ ॥ अगा प्रत्यङ्मुख तें मन कैसें । तेंही सांगों तुज सावकाशें ॥ आयिक येकाग्र मानसें । अपूर्व असे अर्थ याचा ॥ ४३ ॥ आधी प्रत्यक्‌शब्दें काय बोलिजे । तेंचि तंव आधीं वोळखिजे । मग प्रत्यङ्मुख मन कीजे । सांगों सहज रमाकांता ॥ ४४ ॥ देहेंद्रियसमुदाय भरंवसेनी । त्याच्या प्रतिकूळें जैसा तरणि । प्रकाशतु स्वतां ज्ञानी । जागृतीं स्वप्नीं सुषुप्तीसीं ॥ ४५ ॥ देहेंद्रियांचा प्रकाशकु । देहेंद्रियांचा जो

१ नसल्यामुळें. २ हिशोब पहिल्यास. ३ नाहींशी झाल्यावर. ४ आमय (रोग) या शब्दानें. ५ प्रारब्ध-रहित. ६ आत्मज्ञान झाल्यानें. ७ सूर्य.

चाळकु । तोचि प्रत्यक्शब्दें ज्ञानदीपकु । येकायेकु परमात्मा ॥ ४६ ॥ ऐसें प्रत्यक्चैतन्य जें निर्वाण । साक्षित्वें परब्रह्म निर्गुण । तत्सन्मुख करावें मन । वृत्तिशून्य करोनियां ॥ ४७ ॥ सर्व दृश्यासि पाठमोरें । करूनि प्रत्यक् मुख मोहरें । केलिया मन निर्धारें । पावे खरें प्रत्यङ्मुखता ॥ ४८ ॥ ऐसें प्रत्यङ्मुख करितां मन । चिन्मात्रत्वें होय संपन्न । तें परब्रह्मचि होय संपूर्ण । तेथ जाण मृत्यु कैंचा ॥ ४९ ॥ तो मृत्यु तरला रघुपति । जयासि जाली परमानंदप्राप्ति । स्वयें तोचि परमानंदमूर्ति । मृत्यूत्पत्ति कैंची तया ॥ ४५० ॥ तयासि कैचें उपमावें । तयासि तोचि जाणें स्वभावें । उपमिजे ऐसें असावें । जरी मानावें तया समान ॥ ५१ ॥ हें सर्वही मनोनाशें घडे । मनोनाशें संसार उबेडे । यालागीं मनोनाश वोडे कोडें । कीजे फुडें उपायबळें ॥ ५२ ॥ तेही उपाय गा कैवल्यपती । सांगितले पुनः पुनः सांगिजेती । जेहीं उपायीं ब्रह्मप्राप्ति । बाणे स्थिति चित्तनाशें ॥ ५३ ॥

संमति श्लोक । द्वाविमौ चित्तनाशाय योगो ज्ञानं च राघव । योग श्चित्तनिरोधो हि ज्ञानं सम्यगवेक्षणम्

अगा उपायामाजी उपाय थोर । जो कीं सकळ गुह्यांचें सार । चोरूनि ठेविलें जें साचार । चितें गुह्यतर सांगेन ॥ ५४ ॥ अगा सर्व साधनां मुगुटमणि । तेंहि साधन जाण कोदंडपाणी । तेंचि सांगेन तुजलागुनी । चित्त देऊनि परियेसीं ॥ ५५ ॥ तरी चित्त नाशावया गा रघुनाथा । हे दोन्ही क्रम जाण तत्वतां । इतर साधनें सांडूनि आतां । करीं सर्वथा हेचि दोन्हीं ॥ ५६ ॥ इतरें साधनें बोलिजती । परी तें करणें चित्तशुद्धि प्रति चित्तशुद्धी जालिया परमार्थगति । ब्रह्मप्राप्ति चित्तनाशें ॥ ५७ ॥ तरी महता प्रबंध गा रघुनाथा । चित्त नाशावयाचा उपाय तत्वतां । तुजप्रति सांगेन आतां । सांडीं कथा इतरांची ॥ ५८ ॥ ते उपाय परिसतां श्रवणीं । जेणें सुख न माये त्रिभुवनीं । तेंचि एकाग्र आइकें मनीं । पुरे धणी जेणें तुझी ॥ ५९ ॥ तरी गा योग एक ज्ञान । हेंचि चित्त नाशाप्रति कारण । यांचेंही सांगेन लक्षण । सावधान परियेसीं ॥ ४६० ॥ आतां योगाचें कैसें लक्षण । आणीक ज्ञान हीं किं लक्षण । तेंही सांगों विशद करून । आयिक चिन्ह असुरांतका ॥ ६१ ॥ तरी योगाचें परिस लक्षण । तें एवंविध गा जाण । करावें चित्तनिरोधन । अष्टांग पूर्ण अंगें त्याचीं ॥ ६२ ॥ तेचि अष्टागें कोणकोणें । सांगेन ऐकें एकाग्रमनें । यम नियम आसन जाणणें । प्राणायाम म्हूण चतुर्थ हे पैं ॥ ६३ ॥ पांचवें अंग प्रत्याहार । साहावा तो ध्यानप्रकार । सातवा धारणा महाथोर । समाधिसार आठवें अंग ॥ ६४ ॥ आतां यांचीं वेगळालीं लक्षणें । सांगेन आयिकें येकाग्रमनें । तऱ्ही यम तो ऐसा जाणणें । द्वादश लक्षणें उभयांचीं ॥ ६५ ॥

संमति श्लोक ॥ ॥ अहिंसा सत्यमस्तेयमसंगो ह्रीरसंचयः ॥ आस्तिक्यं ब्रह्मचर्यं च मौनं स्थैर्यं क्षमा भयम् ॥
शौचं जप स्तपो होमः श्रद्धातिथ्यमदर्चनम् ॥ तीर्थाटनं परार्थेहा तुष्टिराचार्यसेवनम् ॥
॥ एते यमाः सनियमा उभयोर्द्वादश स्मृताः ॥

---

१ मृत्यु उत्पन्न होणें. २ नाश पावतो. ३ मोठ्या आवडीनें. ४ अतिशय गुप्त. ५ इच्छा. ६ कोणत्या प्रकारचें

प्राणिमात्राची हिंसा न करणें । शब्दादिकींही दुःख न देणें । तेंचि अहिंसा जाणणें । साधारणें सांगितलें ॥ ६६ ॥ अहिंसा शब्दें बहुतां परी । निरूपिली असे ग्रंथांतरीं । ते बोलतां ग्रंथविस्तारीं । जाईल यापरी जाणिजे ॥ ६७ ॥ आणि सर्वदा सत्यचि बोलणें । तृणादि-चौर्य सर्वथा न करणें । हें लक्षण तिसरें जाणणें । चौथें न करणें संग कोणासी ॥ ६८ ॥ सर्वदा असंगवृत्ति । असावें गा सीतापती । अकरणीं लज्जा सर्वार्थी । पांचवी वृत्ति लक्षणाची ॥ ६९ ॥ स्वयें आपण ब्रह्म असतां । देहरूप पावलों तत्वतां । आत्मघात ययापरता । विचारितां आन नाहीं ॥ ७० ॥ याची लज्जा सर्वदा वाहणें । गुरुनिगमीं संशयो न धरणें । आस्थिक्यबुद्धि असों देणें । सातवें जाणणें लक्षण हें ॥ ७१ ॥ असंचयें असणें आठवें लक्षणें । वित्तादिसंचय न करणें । संचयें होये दुःखदारुण । ह्मणोनि सज्ञान न करिती ॥ ७२ ॥ संन्यासी आणि ब्रह्मचारी । तऱ्ही उभयतां नैष्ठिकब्रह्मचारी । अष्टमैथुनांची परी । वर्जनि ब्रह्मचर्याचारीं असावें ॥ ७३ ॥

संमतिश्लोक ॥ दर्शनं स्पर्शनं केलिः कीर्त्तनं गुह्यभाषणम् । संकल्पोऽध्यवसायश्च क्रियानिर्वृत्तिरेव च ॥
एतन्मैथुन मष्टांगं प्रवदंति मनीषिणः । विपरीतं ब्रह्मचर्यमेतदेवाष्टलक्षणम् ॥

ग्राम्यवार्त्तांचें उपलक्षण । तेंचि जाणावें सर्वदा मौन । गुरुवचनीं धर्मी स्थैर्यपण । दहावें लक्षण हें ऐसें ॥ ७४ ॥ शीतोष्णादिद्वंद्वसहन । करणें तेंचि क्षमा जाण । अभय तें एवंविध लक्षण । आयिक सांगेन रघुनाथा ॥ ७५ ॥ साधितां सिद्धि होईल कीं नव्हे । अंतरायासि सर्वदा बिहे । होय नव्हे संशयो आहे । इत्यादि जाय भय त्याचें ॥ ७६ ॥ इयें यमाचीं लक्षणें बारा । सांगितलीं तुज महावीरा । आतां नियमलक्षणेंही श्यामसुंदरा । सांगेन साचारा ते आयिकें ॥ ७७ ॥ तरी प्रथम शौच तो जाणावा । तोही अंतरबाह्य द्विविध गा राघवा । अंतर मनबुद्धीचा आघवा । सर्व सांडावा दुःखसंकल्प ॥ ७८ ॥ हा अंतःशाच तो ऐसा । बाह्य मृत्तिकाजळें होतु कैसा । जपु करावा वीरेशा । मंत्र जैसा असेल त्याचा ॥ ७९ ॥ कृच्छ्रादिकें तपें आचरावीं । अग्निहोत्रादिकें करावीं । आणि श्रद्धा असोंद्यावी । सर्व भावीं कर्माच्या ॥ ४८० ॥ अग्नी अतिथिचे पूजनें । सर्वदा सर्वोत्तमाचीं अर्चनें । चित्तशुद्धीलागीं तीर्थाटणें । परोपकार करणें परहितालागीं ॥ ८१ ॥ सर्वदा संतुष्टचि असावें । यथालाभें सुख मानावें । येकाग्र गुरुभजन करावें । संतोषवावें सद्गुरुराया ॥ ८२ ॥ इत्यादि बारा नियम पूर्ण । संक्षेपें केलें यांचें कथन । अष्टांगयोगाचें हें जाण । समसमान भूमिका हे ॥ ८३ ॥ तिसरें योगाचें अंग आसन । उंचनिंच वर्जूनि समसमान । जेणें चित्त पावे समाधान । वीरें पद्मासन अथवा व्रज स्वस्तिक ॥ ८४ ॥ तियें आसनीं बैसोनि । प्राणायाम करावा प्रणव जपोनि । रेचक पूरक कुंभक करुनी । यथाधारणीं अभ्यासबळें ॥ ८५ ॥ चंद्रें पूरिलिया सूर्यें रेचावें । किंवा सूर्यें पूरिलिया

---

१ इतर ग्रंथांत. २ गवताची काडी सुद्धां न चोरणें. ३ न करण्यांत. ४ गुरु व वेद ह्यांच्या भाषणांत ५ सुख, दुःख, इत्यादि सोसणें. ६ कृच्छ्र चांद्रायणादि प्रायश्चित्तें. ७ निराळ्या आसनांचीं नांवें. ८ ॐकार.

चंद्रें टाकावें । अथवा समसमान धरावें । मुख्य कुंभावें हेंचि थोर ॥ ८६ ॥ ऐसा प्राणायाम केलियावरी । प्रत्याहार करावा बरवियापरी । विषयाकार वृत्ति होतांचि धरीं । रोवीं परवरीं हृदयास्या ॥ ८७ ॥ जे जे वृत्ति मनींहूनि उठी । तेणें वळावी परतल्या दृष्टि । नेऊनि घालीं मनाच्या पोटीं । मनही नेदटीं साक्षियासी ॥ ८८ ॥ हें प्रत्याहाराचें लक्षण । वृत्तीचें विषयापासाव निवर्त्तन । वृत्ति चित्ताच्या पोटीं जिरऊन । मनें पूर्ण अभ्यासु कीजे ॥ ८९ ॥ वृत्तींचा मोकळ होउनी । उपजों नेदाव्या मुळींहुनी । उपजल्या काढाव्या विषयांवरुनी । सांठवण मनीं करावी ॥ ४९० ॥ हें प्रत्याहाराचें लक्षण । संक्षेपें केल कथन । ग्रंथ विस्तारेल ह्मणऊनि । अल्प निरूपण केलें असे ॥ ९१ ॥ परी निरूपणाचें जें सार । तो इतुकिया केला प्रकार । जैसा बीजापोटीं तरुवर । असे फार निर्धारेंसी ॥ ९२ ॥ ययावरी ध्यानाचा योग । तोही करावा अव्यंग । ध्यानलक्षणाचेंही अंग । सांगों सांग परियेसीं ॥ ९३ ॥ मनोवृत्तीचा पंचप्रकार । तो मागां सांगितला सविस्तर प्रमाण विपर्यय विकल्प सार । चतुर्थप्रकार निद्रेचा ॥ ९४ ॥ पांचवी जाण अनुभूतिस्मृति । यया पांचही जाण मनोवृत्ति । निरोधनियां प्रत्यगावृत्ति । लक्ष चित्तीं धरूनिया ॥ ९५ ॥ स्वरूप सगुण अथवा निर्गुण । तें ध्येय ध्यावें चित्तेंकरून । विक्षेपें जालिया विषयांवरून । ध्येयीं नेऊनि लावावें ॥ ९६ ॥ ध्येय सांडूनियां जाण । चित्त जरी जाये तेथून सावधान । होऊनि लावावें मागुतेन । ध्यान ह्मणणें ययालागीं ॥ ९७ ॥ दृढ ध्येयीं चित्त ठेऊन । मागुतें उठों नेदावें तेथून । धैर्य धरावें गा दाटून । धारणा जाण साहावी हे ॥ ९८ ॥ अथवा धैर्यंकरूनि हें मन । स्वरूपा धरिजे दाटून । नांव धारणा हें साहावें लक्षण । सातवें ध्यान तें परियेसीं ॥ ९९ ॥ स्वस्वरूपाकार मन करणें । अन्यार्थ कांहीं स्मरों नेदणें । ययाचें नाम ध्यान ह्मणणें । समाधिलक्षण तें ऐसें ॥ ५०० ॥ सर्व मनोवृत्ति मनीं लयो पावती । मन मनपणें पावे निवृत्ति । स्वरूपींच समाधानास्थिती । समाधि बोलती तिये नाम ॥ १ ॥ ऐसीं अष्ट आंगें सांगोपांग । अष्टांग बोलिजे हा योग । चित्तवृत्ति निरोध जो सांग । तोचि योग अत्युत्कट[१] ॥ २ । योगबळेंकरूनियां मन । स्वस्वरूपीं जालिया निमग्न । तेंचि प्रपंचाचें अदर्शन । विश्वभानभ्रांति[३] कैंची ॥ ३ ॥ चित्तादिप्रपंचाचें अदर्शन । तोचि मनोनाश ऐसें जाण । हे योगमार्गींची खूण । जाण पां पूर्ण रघुराया ॥ ४ ॥ चित्तवृत्तिनिरोध[४] योग ऐसें । सकळां शास्त्रीं निर्णिलेंचि असे । वृत्तीच्या निरोधें मन नाशे । उपाय विश्वेशें जाणावा ॥ ५ ॥ दुसरा उपाय मनोनाशासी । तें एक ज्ञान जाण हृषीकेसी । त्या ज्ञानाचीहीखूण ऐसी । सांगों परियेसीं सावकाश ॥ ६ ॥ तरी ज्ञान तें गा सम्यंगवेक्षण[५] । हेचि ज्ञानाची मुख्य खूण । येणें मनोनाश होये संपूर्ण । जें विश्वभान बाधितें

---

१ मागें फिरल्यास. २ अतिकठिण. ३ जगाच्या प्रत्ययाविषयीं संशय. ४ मनाचे विकार ताब्यांत ठेवणें. ५ लक्षपूर्वक पहाणें.

॥७॥ अगा सम्यक् पाहणें तें ऐसें । सांगेन श्रीरामा सावकाशें । सद्गुरुमहावाक्यसमरसें अतिउल्हासें ज्ञानपणें ॥ ८ ॥ सकळ जितुकें दृश्यजात । जो की सत्यत्वें प्रपंच भासत । तितुका जड परप्रकाश निश्चित । मिथ्याभूत जाण तितुकें ॥ ९ ॥ अगा जें जितुकें परिच्छिन्न । तितुकें जड दृश्यमान । दृश्य तें अनात्म संपूर्ण । असत्य जाण काळत्रयीं ॥५१०॥ याहूनि व्यतिरिक्त प्रकाश । जो कीं साक्षित्वें बोलिजे परेश । तयासि भासे जो जो भास । तोचि सावकाश दृश्यजात ॥ ११ ॥ अहंकारमनबुद्ध्यादिक । जें जें सत्यत्वें भासे सम्यक् । तें तें दृश्य जाण परी निष्टंक । साक्षी येक सत्य असे ॥ १२ ॥ तयासि यथातथ्य जाणणें । तेथेंचि आरोपित विश्व देखणें । साक्षी ब्रह्मेंसि येक पाहणें । तद्रूपें राहणें आपण स्वयें ॥ १३ ॥ निरंतरस्वस्वरूपें राहतां । विश्व बाधित होये तत्वतां । विश्वांतः पाति सर्वथा । मन अधकता पावेचि कीं ॥ १४ ॥ जैसें रज्जुचां ठाईं सर्पादिक । कीं शुक्तिकेसी रजत सम्यक । वस्तुज्ञानें बाधे सकळीक । वस्तु देव वस्तुत्वें प्रकाशे ॥ १५ ॥ ऐसें लक्षणीं अलंकृत । तेंचि ज्ञान गा निश्चित । सम्यगवेक्षण तें इत्थंभूत । जाण निभ्रांत रघुराया ॥ १६ ॥ जो अनात्मा अविवेक । दोन्ही सत्यत्वें भासे येक । तेंचि अज्ञान जाण सम्यक । याचा विवेक तेंचि ज्ञान ॥ १७ ॥ अगा या ज्ञानाचा ठाईं । चिदाभास बिंबला पाहीं । तोचि प्रमाता जीव इहीं । शब्दीं सर्वही जाणिजे ॥ १८ ॥ त्या चिदाभासें मनपण आलें चिदाभासें प्रकाशमंत जालें । चिदाभासेंचि भासविलें । आपण गोविलें चिदैक्यकरीं ॥ १९ ॥ आत्मा अजड स्वप्रकाश । मन अनात्मा अचित्तांश । ययाचा विवेक जो सावकाश । ज्ञान तयासि ह्मणताती ॥ ५२० ॥ जैसी देहाच्या ठाईं आत्मबुद्धि । अतिसदृढ बैसली अनादि । उपाय करितां सहस्रावधि । न सडी कधीं कांहीं केलिया ॥ २१ ॥ ते स्मरतां न स्मरतां लागली असे । कांहीं केलियाही न नासे । तैसीच आत्मबुद्धि स्वरूपीं दृढ बैसे । तेंचि सर्वांशें ज्ञान जाण ॥ २२ ॥ तो जऱ्ही इच्छीना मुक्तता । तऱ्ही तो मुक्तचि जाण तत्वतां । जयाची आत्मत्वीं आत्मत्व ताता । बुद्धि तत्वतां पाहे जरी ॥ २३ ॥

॥ संमति श्लोक ॥ देहात्मज्ञानवज्ज्ञानं देहात्मज्ञानबाधकम् । आत्मन्येव भवेद्यस्य सनेच्छन्नपि मुच्यते

अगा देहीं मीच आत्मत्वें जें ज्ञान । दृढ बैसलेंसे पुरातन । तैसेंचि आत्मयाचा ठाईं पूर्ण । दृढ जाण बैसिजे ॥ २४ ॥ देहात्मयाचा ठाईं अनात्मपण । दृढ बाणतांचि गा पूर्ण । देहात्मज्ञान बाधे जाण । न इच्छितां ऱ्हूण पावे मोक्षु ॥ २५ ॥ ऐसें जें कां आत्मज्ञान । याचें नाम सम्यग्वीक्षण । येणें होये मनोनाशन । भस्म पूर्ण संसाराचें ॥ २६ ॥ परी जैसें होये मनोनाशन । तैसें नव्हे योगेंकरून । जोवरीं वृत्तीचें कीजे निरोधन । तोंवरी मन मूर्छित होये ॥ २७ ॥ जेव्हां चित्तवृत्तीनिरोध नाहीं । तेव्हां जैसें तैसेंचि मन पाहीं । मन सावध असतां जगही । आहे सर्वही जैसें तैसें ॥ २८ ॥ आणि सुखदुःखादि जे भोग । जे तया होणार सांग । ते तंव होती अव्यंग । प्रारब्ध अभंग

१ मर्यादित. २ विश्वामध्यें फिरणारें. ३ देहरूप आत्मा. ४ उत्तमप्रकारें पहाणें. ५ नाश न होणारे.

ह्मणोनियां ॥ २९ ॥ तेव्हां फळ द्यावया उन्नत । पूर्णकर्म होये प्राप्त । तेव्हां समाधीसि व्युत्थान होत । मन भोगित सुखदुःखें ॥ ५३० ॥ अगा ईषत्तही जें सुखसुःख । सुषुप्ति आदिकरूनि देख । तें पूर्व कर्म होय सकळीक । थोर कौतुक प्रारब्धाचें ॥ ३१ ॥ यालागीं बाधु सर्व प्रपंचाचा । ज्ञानेंकरूनियां जाला जयाचा । तया भोगही सुखदुःखाचा । बाध जाला साचा निर्धारें ॥ ३२ ॥ जया देहादिप्रपंच बाधला । तया सुखदुःखादिभोग सत्यत्वें उरला । नाहीं कोठेंही देखिला । मिथ्या जाला बोधलेंपणें ॥ ३३ ॥ हा उपाय मनोनाशाप्रति । सर्वथा करावा गा महामती । प्रज्ञामांद्य असिलिया सर्वार्थी । निरोधाचित्तवृत्ति करावा ॥ ३४ ॥ अगा बुद्धीचे मांद्यपण असतां । ज्ञान प्रतिबिंबेना सर्वथा । महावाक्याचि या अर्था । अशुद्धा चित्ता प्रवेश नाहीं ॥ ३५ ॥ पदार्थज्ञानपूर्वक । वाक्यार्थ जाण सम्यक् । यासि तीक्ष्ण बुद्धि अधिक । पाहिजे देख रघुराया ॥ ३६ ॥ अगा प्रज्ञा अतितीक्ष्ण असतां । वाक्यार्थ प्रतिबिंबे गा सर्वथा । गुरुमुखेंहूनि उदेजतां । प्राप्त्यर्था पाविजे कीं ॥ ३७ ॥ तेंचि प्रज्ञेसि मंदपण असतां । वाक्य न प्रतिबिंबे गा सर्वथा । तेणें योग करावा ताता । वृत्तिरोधता मनाची ॥ ३८ ॥ ज्ञानें चित्तवृत्तिनिरोध करणें । हेंचि निदिध्यासन जाणणें । येणें विपरीतभावना तत्क्षणें । नांशे सत्राणें रघुपुंगवा ॥ ३९ ॥ योगेंउपरी वाक्यार्थु बोधितां । गुरुप्रयास न लगती सर्वथा । निदिध्यासनही न करितां । प्राप्ति तत्वतां परब्रह्माची ॥ ५४० ॥ जरी पूर्वींच जालें आहे ज्ञान । परी वासना उद्भवती पूर्वसंस्कारेंकरून । त्यालागीं योगसाधन । करावें जाण सीताकांता ॥ ४१ ॥ तेणें मनोनाश वासनाक्षय । जालिया सुख अप्रमेय । प्राप्त होये दुःख जाय । यालागीं उपाय दोन्ही करावे ॥ ४२ ॥ यामध्यें तुज जो आवडेल । तोचि उपाय करिजे प्रांजळ । तेणेंचि मनोनाश होईल । सुख पावसील निरतिशय ॥ ४३ ॥ यया दोन्ही उपायेंकरुनी । मनोनाश करावा कोदंडपाणी । मनोनाशें सुख त्रिभुवनीं । नाहीं निर्वाणीं दुजें कांहीं ॥ ४४ ॥ जेथें जन विजन नाहीं दोन्ही । सुखाचि सुखत्वें राहे कोदंडपाणी । सुखावाचूनि त्रिभुवनीं । नाहीं निर्वाणीं दुजें कांहीं ॥ ४५ ॥ सहजीं सहज पूर्णानंदु । सर्वभावें सेवोनि येकांतु । निजानंदें रंगूनि स्वार्थु । निरालसपणें जोडिला ॥ ४६ ॥ (सद्गुरूचा ह्मणे रंगनाथु । सर्वभावें सेवूनि एकांतु । मनोनाश करावा हा कलितार्थु । साधावा स्वार्थु आलस्यत्यागें ।) पुढें वासनाक्षय प्रकरण । श्रोतीं आइकावें सावधान । सद्गुरु करिती निरूपण । निमित्त जाण मज करुनी ॥ ४७ ॥ हें मनोनाशप्रकरण । येथें जालें असे संपूर्ण ।ययाचा अर्थ मनन करून । हेंचि साधन साधावें ॥ ४८ ॥ सद्गुरुचरणयुगल । तेथें सुखपराग अतिनिर्मळ । निजानंदें रंगोनि अलिकुल । सुखकल्लोळ भोगितु ॥ ४९ ॥

इति श्रीयोगवासिष्ठसारे श्रीवसिष्ठरामसंवादे मनोलयप्रकरणं तृतीयं संपूर्णम्

१ तयार. २ थोडेंसें. ३ बुद्धीची मंदता. ४ गुरूनें उपदेशिलें असतां. ५ जलद. ६ 'अंगवेल' असा पाठ. आहे. ७ जनींवनीं कोंदलसे असा पाठ. ८ भ्रमरांचा समूह. 'सेवी रंगनाथ होऊनि अळिउल' असा पाठ आहे

॥ श्रीः ॥

प्रकरण ४ थें.

वासनोपशमप्रकरण.

श्रीगणेशायनमः । श्रीसरस्वत्यैनमः । श्रीमत्सद्गुरुनिजानंदायनमः । जयजयाजी श्रीसद्गुरुमूर्त्ती । अव्यक्तचि मत्कृपा आलासि व्यक्ती । हेंही ह्मणणें माझी भ्रांति । आनंदार्त्ती अविकार तूं ॥ १ ॥ अहो पुत्राचेनि जालेपणें । मातेसि जैसें माता होणें । तैसेंचि माझे जालेपणें । जननींपणें शोभसी तूं ॥ २ ॥ परी तूं जननी येकुलती । मज येक अपत्यातें प्रसवती । स्नेहें येका वरद जालीसि मूर्त्ति । ह्मणोनि येकुलती येकपणें ॥ ३ ॥ अनेक शिष्यपणें बहु जनिता । परी सकळ कृपेची ऐक्यता । मज समरसली ह्मणोनि तूं माता । होसी तत्वतां येकुलती ॥ ४ ॥ ह्मणोनि येकुलती माउली । संसारश्रांतासि साउली । तुझी कृपा जी मज प्रसवली । माउली जाली अतिस्नेहें ॥ ५ ॥ परी तुवां येक नवल केलें । विवेकशस्त्रें वासनानाळ खंडिलें । उपजोनि पोटींच सामाविलें । वाढविलें उदरामाजी ॥ ६ ॥ परी इतरां माउलियांसारिखें । बाहेरी घालूनियां बाळकें । वेगळेपणें पाळिती हरिखें । द्वैतसुखें अतिदुस्तर ॥ ७ ॥ जगदुदर तुझें विशाल । सांठविसी अनेक शिष्यावाल । परी मजवरी अतिस्नेहकल्लोळ । तेणें वेल्हाळ तूं येकुलती ॥ ८ ॥ कृपाळूपणें तूं जननी । मजलागीं उदरीं समाउनी । वाढविसी अतिस्नेहेंकरुनी । वाक्यस्तनीं लाऊनियां ॥ ९ ॥ तोंचि तुझें गोड स्तनामृत । पिऊनियां मी धालों बोधित । तेणें बोधेंचि असें डुल्लत । आनंद न समात त्रिभुवनीं ॥ १० ॥ बाळसें बाणलें ब्रह्मत्वाचें । तेणें मी पढियेंते संतसज्जनांचें । लडिवाळ बोलकें तुझे प्रीतीचें । ह्मणोनि संतांचें मन निघे ॥ ११ ॥ जैसें समर्थाचें आणि लडिवाळ । सुंदर बोलिकें वेल्हाळ । तें सकळां जनां होये प्रेमळ । वेधी सकळ गुणीलोकां ॥ १२ ॥ तैसा मीही तुझा लडेवाळ । आणि स्नेहाचें येक वेळाउळ । अपरोक्षज्ञानें सुंदर सफळ । अतिवेल्हाळ बाळसेनी ॥ १३ ॥ ब्रह्मपणाचेनि बाळसें । सर्वांगीं सुंदर बाणलेंसे । परी बोधाचि प्रभा फुटली बहुवसे । अतिलाडसें अतिवाळ ॥ १४ ॥ ब्रह्मवर्चसाचें गोरेपण । आंगीं बाणलें सुंदर जाण । अमानित्वादिज्ञानलक्षण । अलंकारभूषणभूषित ॥ १५ ॥ याहीवरी ज्ञानशब्दें शब्दित । तुवां बोलविलें बोलत । तेणें संतांचें मन रिझत । प्रेमयुक्त डोलती ॥ १६ ॥ त्यावरी त्रिभुवनीं तूं समर्थ थोर । जगाचा नियंती सर्वेश्वर । त्या तुझे बाळक सकुमार । अतिधीर ते लाडविती ॥ १७ ॥ सकळ स्नेहाचा येकवळा । करुनि लाडविती वेल्हाळा । वांकु-

---

१ भ्रांतासि असापाठ. २ महावाक्याचा उपदेश. ३ मावत नाहीं. ४ आवडतें. ५ घर. ६ अविकृत असा पाठ.

ज्याही बोबड्या बोला । आनंद संतांला सर्वांपरी ॥ १८ ॥ असो तुझेनि बाळपणें मज । प्राप्त जालें तुझे गुह्य गूज । यालागीं जें जें बोलणें तें तत्व सहज । फावे निजगूज ब्रह्मानंदु ॥ १९ ॥ असो तुझें अपत्य मी येणें गुणें । कांहीं मज नव्हेचि उणे । सर्वत्र वर्त्ते संपूर्णपणें । तुझेनि गुणें गुणवंतु ॥ २० ॥ जैसें पितयाचें गुप्त धन । तें औरस जैसा पावे आपण । तैसें तुझें गौप्य धन जें ज्ञान । प्राप्त मी संपूर्ण तुझेनी ॥ २१ ॥ आतां येकी विनंती माहेरा । रिघोनी मद्वाक्याचे वोवरा । प्रवर्तवीं ग्रंथ विस्तारा । आनंदसागरामाजी पोहवीं ॥ २२ ॥ तुझेंनि वैभव बोलावया । वाणी विस्तारीं सद्गुरुराया । ग्रंथनिर्माणीं चातुर्या । वासनाक्षया वदवीं मज ॥ २३ ॥ ऐसी ऐकोनि विनवणी । प्रसन्न जाली सद्गुरुजननी । मस्तकीं अभयकर ठेउनी । ह्मणे ग्रंथनिर्माणीं प्रवर्त्त आतां ॥ २४ ॥ ऐसें आज्ञालक्षणवचनामृत । परमभाग्यें जालें प्राप्त तेणें आनंदें टीका करित । जें कीं श्लोकार्थ यथामती ॥ २५ ॥ तया ग्रंथाचें अनुसंधान । आयिकोत श्रोते सावधान । मनोनाशावरी प्रकरण । उठिलें कोण तें सांगों ॥ २६ ॥ मनोनाश वासनोपशमन । ज्याचेनि होये तो जीवन्मुक्त जाण । हेंचि करावया निरूपण । मनोनाशक सांगितलें ॥ २७ ॥ आतां वाससेचा क्षय पूर्ण । होआवया वासनाक्षयप्रकरण । प्रारंभिलें अतिगहन । श्रोतीं सावधान परिसिजे ॥ २८ ॥ तेंचि निरूपण पैं आतां । करिजेल अतिसावधानता । सद्गुरुचरण स्मरतां । ग्रंथ ऐकतां सिद्ध हा ॥ २९ ॥ तरी आत्मानात्माविचारा वेगळें । कोण्हीच साधन फळीं न फळे । यालागीं आमत्मस्वरूप निराळें । अनात्म्यावेगळे निवडीजे ॥ ३० ॥ तरी सर्वदा करितां आत्मविचार । आत्मत्वीं होय दृढ निर्धार । मग अनात्मवर्गु तितुका निःसार । होय प्रकार फल्गुऐसा ॥ ३१ ॥ यालागीं वसिष्ठ ज्ञानियांचा रावो । आधीं आत्मविचाराचा भावो । श्रोता ऐके देवादिदेवो । अयोध्येचा रावो श्रीराम ॥ ३२ ॥

राम स्वात्मविचारोयं कोहं स्यामिति रूपकः । चित्तदुर्द्रुमबीजस्य दहने दहनः स्मृतः ॥ १ ॥

तरी आइकें गा रघुकुळटिळका । चित्सदानंद परब्रह्म व्यापका । निर्गुणा निर्विकारा विश्वात्मका । निर्विशेषा निरंजना ॥ ३३ ॥ जें कीं व्यापकचैतन्यनिरंजन । तो तं ह्मणविसी दशरथनंदन । करिसी प्रपंचाचें विडंबन । भक्तजन तारावया ॥ ३४ ॥ तयांलागीं हें प्रश्नांतरें । करूनि करिसी जगदुद्धार । तरी आइकें आधीं आत्मविचार । वासनासंहार जेणें होये ॥ ३५ ॥ तरी मुख्य आत्मविचारु तो कैसा । तऱ्ही देहीं आपण कोण ऐसा । स्थूळलिंगकारण देहाचा ठसा । तो सहसा मी नव्हे ॥ ३६ ॥ तैसेंचि अस्थि मज्जा मांस सप्तधातु । त्या मी नव्हे सर्वातीतु । सकळ मज दृश्य मी सर्वा आंतु । व्यतिरिक्त अवस्थात्रयीं ॥ ३७ ॥ इंद्रियें नव्हे मी इंद्रियां चाळकु । बुध्यादि अहंकाराचा प्रकाशकु । तो मी कोण ऐसा विवेकु । तोचि येकु आत्मविचार ॥ ३८ ॥ हाचि विचार जो कीं एवंभूत ।

१ आळशी. २ ,मद्वाचेचा' असा पाठ. ३ तुच्छ, निःसत्व. ४ प्रश्नोत्तर असा पाठ.

तो चित्तदुर्द्रुमबीजाचा[1] अंत । द्रष्टा चित्तदुर्द्रुमाचें बीजभूत । तें अज्ञान निश्चित मेघश्यामा ॥ ३९ ॥ तया अज्ञानाचा दहनकर्ता । अग्निरूप हा विचार ताता । जाळूनी नेतसे भस्मता । तेथें वासना चित्ता कैंचा ठावो ॥ ४० ॥ (तया अज्ञानाचा दहनकर्ता । अत्मानात्म विचार गा ताता । जाळूनि नेतसे भस्मांता । तेथें अविद्यात्मकासि कैंचा ठावो ।) मूळ छेदिलिया कैंचातरु । कारण नाशलिया कार्यविचारु । सूर्यास्तवें मृगजळपूरु । प्रतिबिंबाकारु बिंबनाशें ॥ ४१ ॥ यालागीं मनवासनादि यांचें । मूळ अज्ञानचि जाण गा सार्चे । सर्व देहादिप्रपंचाचें । अज्ञान यांचे मूळभूत ॥ ४२ ॥ तेंचि मूळ छेदिल्या आत्मविचारें । कैंची वासनादिसंसार थारे । मन मूळसहित विरे । आनंदें भरे ब्रह्मांड हें ॥ ४३ ॥

॥ विचारदर्पणे लग्नां धियं धैर्यधुरं गताम् । आधयो न विलुंपंति वातश्चित्रलतामिव ॥ २ ॥

अगा विचारदर्पणाचा ठाईं । धैर्येंसि बुद्धि जडली पाहीं । अतिसदृढतर जैसी कांहीं । अढळ तेही सर्वस्वें ॥ ४४ ॥ धैर्यसाह्यादिकांची समृद्धि । विचारें स्थिरता पावल्या बुद्धि । येथें उठिलियाही थोरा आधि । न लोटे बुद्धि तयांचेनी ॥ ४५ ॥ दर्पणीं जें रूप बिंबलें[2] । तें दर्पणेंसिच जडलें । तें हस्तें काढितांही बळें । परी तें न ढळे सर्वथा ॥ ४६ ॥ तैसीच विचारदर्पणीं । बुद्धि जडलिया गा कोदंडपाणी । न काढवे आधींचेनी । हे खुण मनीं जाण तूं ॥ ४७ ॥ आधि ह्मणिजे ज्या ज्या मानसिक व्यथा । चिंतारूपें ज्या परिणमता । त्यासि वासना जाण तत्वतां । पर्यायकथा[3] इत्यादिक ॥ ४८ ॥ नानासंकल्प जे मनोरथ । चित्त करी सर्वदा विषयार्थ । करीतांहीं नव्हे तृप्त । वणवणपणें ॥ ४९ ॥ स्वस्वरूपावेगळें राहतां । मन स्थिर नव्हे गा सर्वथा । विषयार्थ वणवण करी विषयार्था । त्यासि तत्वतां आधि जाण ॥ ५० ॥ त्याचि आधि उठतां चित्तस्वभावें । परी विचारस्थ बुद्धि न अभिभवे । विचारचित्रीं लिहिलें तें न काढवे । कांहीं न करवे तियेचें[4] ॥ ५१ ॥ ते ज्ञानरूप होऊनि दृढावली । तियेसि आधिवायो लागतां महाबळी । परी ईषत् न ढळे प्रयत्न मेळीं । जैसी चित्रवल्लि वातोर्मियां[5] ॥ ५२ ॥ वातोर्मि उठिलिया अनेका । तऱ्ही चित्रींची न ढळे वल्लिका । तैसी बुद्धि आरोपिलि विवेका । आधिवातझुलुका[6] न लोटे कीं ॥ ५३ ॥ नाना पाषाण कोरूनि अक्षरें । लिहिलीं तीं पुसिजेती नीरें । तरी आधीकरूनि निर्धारें । बुद्धि विरे विचारस्थु ॥ ५४ ॥ यालागीं सर्वथा ऐसेंचि करावें । विचारसमुद्रीं बुद्धीसि बुडवावें । ते कदापि आधींनें न अभिभवे । सुखें सुखाचे ब्रह्मानंदें ॥ ५५ ॥ अगा नाना विचारवन्हीचा ठाईं । आधितृण नुगवेचि पाहीं । विचाराग्नि भस्म उरी उगवल्याही । आलाटे ठायीं धिषणा[7] असे ॥ ५६ ॥

॥ विचारोऽध्यात्मविद्यानां ज्ञानं तत्वविदो विदुः । ज्ञेयं तस्यांतरेवास्ति माधुर्यं पयसो यथा ॥ ३ ॥

अगा अध्यात्मविद्यांचा रावो । हा आत्मविचार जाण महाबाहो । अध्यात्मविद्येचा

---

१ चित्तरूपी वाईट वृक्षांच्या बियांचा. २ 'बिंबलां'. असा पाठ. ३ निराळीं नावें ४ नाहींशीं होत नाहीं. ५ वायूच्या लाटेनें. ६ हा शब्द कांहीं प्रतीत नाहीं. ७ बुद्धि.

अभिप्रावो । ह्राचि निर्वाहो नानाविद्या ॥ ५७ ॥ आत्मयातें अधिकारूनि वर्तती । जे कीं जाणणयाची संपत्ति । जें जें ज्ञान ते विद्या सर्वार्थी । शास्त्रव्युत्पत्ति वेदाध्ययनें ॥ ५८ ॥ ज्या ज्या विद्या अतिकुशला । जेहीं आणिजे पदार्थमेळा । ज्ञान जितुकें तितुकें चित्कला । विद्या या रूप जालें ॥ ५९ ॥ त्या सर्वां विद्यांचा मुगुटमणि । हा आत्मविचारु जाण कोदंडपाणी । हें मुख्य ज्ञान या भरंवसेनी । जाणती ज्ञानी जे तत्वेत्ते ॥ ६० ॥ अथवा आत्मविद्याविचार । करणें जो तात्पर्य निर्धार । त्यातें ज्ञान ह्मणती चतुर । अतिधीर ब्रह्मवेत्ते जे ॥ ६१ ॥ तया ज्ञानाच्या जाण पोटीं । ज्ञेय सांपडे गा उठाउठी । जेथ ज्ञान तेथ ज्ञेयभेटी । ज्ञानाच्या पोटीं ज्ञेय वसे ॥ ६२ ॥ ज्ञेयशब्दें ब्रह्म केवळ । जेथें नाहीं विशिष्टादिमळ । चिदानंद निष्फळ निर्मळ । अचळ अढळ परिपूर्ण जें ॥ ६३ ॥ ऐसें हें जें ज्ञेय जाण । तें ज्ञानाच्या पोटीं वसे संपूर्ण । जैसें रसीं मौल्यपण । माधुर्य जाण मधुसीं ॥ ६४ ॥ किंवा गुळाठायीं गोडी । लवणीं क्षारता असे फुंडी । शब्दाच्या पोटीं अर्थपरवडी । अनुभव आवडी गुरुवचनें ॥ ६५ ॥ जैसा काष्ठाच्या पोटीं । वन्हि सर्वत्र गा जगजेठी । पटु तंतूच्या पोटीं । मृत्तिका घटीं सगर्भ जैसी ॥ ६६ ॥ तैसें जें कीं आत्मज्ञान । तदंतर्वर्त्ती ज्ञेय जाण । ऐसें अनुभवासिद्ध आणि सज्ञान । विचारें पूर्ण बोलती ॥ ६७ ॥

विचारेण परिज्ञातस्वभावस्योदितात्मनः । अनुकंप्या भवंतीह ब्रह्मविष्णुशिवादयः ॥ ४ ॥

ऐसिया आत्मविचारेंकरून । ज्ञेयाचि फावे सर्वस्वें जाण । तेथ कैंचें वासनाशमन । न करितां क्षीण सर्वस्वें होती ॥ ६८ ॥ यालागीं हाचि विचार दृढ करून । साक्षात केलें स्वरूप पूर्ण । जें कीं स्वप्रकाश चैत्तन्यघन । उदित पूर्ण पूर्णत्वें ॥ ६९ ॥ जाण ऐसिया पुरुषासी । अनुकंप्य[3] सकळ जीवरासि । किंबहुना ब्रह्मादिकांसि । विष्णुशंकरांसि अनुकंपावें ॥ ७० ॥ ब्रह्मादिकांसि तेणें पुरुषें । अनुग्रह करावा गा विश्वेशें । तो परब्रह्माचि सगुण वेशें । निर्विशेषें नांदत ॥ ७१ ॥ हें तंव प्रसिद्धाचि असे । निर्गुण ब्रह्मादिकांतें अनुग्रहिजेतसे । तेणें सृष्ट्यादिकार्यविशेषें । सामर्थ्य वसे त्याच्या ठायीं ॥ ७२ ॥ नाहो विचारकरुनी । ब्रह्म जाला निर्वाणीं । विश्व सत्य भासतां कहाणी । प्राप्ति कैसेनि ब्रह्मत्वाची ॥ ७३ ॥ तरी ऐका याचें उत्तर । जें कीं सांगिजैल परिकर । ज्ञानाचें सामर्थ्य महाथोर । यथा प्रकार तोचि भासवी ॥ ७४ ॥ विश्व आरोपितपणें बाधित होयें । तें भासतांही मृगजळ तुल्य पाहें । येऱ्हवीं वास्तव पाहतां कैंचें काये । विश्वाची सोये तेही नाहीं ॥ ७५ ॥ अगा हें अज्ञान जंववरी असे । तंवचि विश्वासाचासारिखें दिसे । तें अज्ञान अपरोक्षज्ञानें नाशे । मग सत्य तेंचि असे परब्रह्म जें कां ॥ ७६ ॥ यालागीं सत्य तेंचिसत्य भासे । नाथिलों[5] विश्वाभास तो भ्रंशे । मग ब्रह्म साक्षात्काराचि असे । विचारलेशेंकरूनियां ॥ ७७ ॥ ह्मणोनि तो असे परब्रह्म जाला । तेणें अनुग्रहही सकळा केला ।

१ फार. २ निरानिराळे अर्थ. ३ दयाकरण्यास योग्य. ४ विशेषें असा पाठ. ५ नसलेला.

ऐसीयासि कैंचा वासनामेळा । तो असे निराळा सर्वातीत ॥ ७८ ॥ अगा हें विश्व साच भासावें । तरीच वासनेनें उद्भवावें । तरी विश्व हें आत्मविचारें आघवें । बोधे स्वभावें रघुपुंगवा ॥ ७९ ॥ मग लटकियाच्या ठायीं । वासना उपजोनि करिती कायी । उपजल्याही नाशती सर्वही । निर्धनाचे पाहीं मनोरथ जैसे ॥ ८० ॥ किंवा बालकाचे वेवसाव[1] । गंधर्व नगरींचे हुडे[2] सावेव । कीं इंद्रजाळाचें गौरव । नाशे सर्व उपजलेंही ॥ ८१ ॥ तैसें बोधिताच्या ठायीं । वासना नुपजती जाण कांहीं । उपजलेंही त्या अनपायी । नाशु सर्वही पावती ॥ ८२ ॥ यालागीं गा रघुपती । आत्मविचारु करावा सर्वार्थी । विचारें न भासे विश्वभ्रांति । तद्भावें शांति वासनेची ॥ ८३ ॥ तोचि आत्मविचारु कैसा । तऱ्ही पूर्वीच सांगितला गा वीरेशा । प्रस्तुत मागुताही परियेसा । विश्वविलासा विश्वंभरा ॥ ८४ ॥

किमिदं विश्वमखिलं किमस्याहमिति ऽऽयम् । विचारनिरतस्यैतदसदेव भवेज्जगत् ॥ ५ ॥

तरी तोचि विचार गा येथ । ह्मणे हें चराचर कोणाचें प्रस्तुत । याचें स्वरूप काय यथार्थ । यातें देखत तो मी कोण ॥ ८५ ॥ यया सकळ विश्वातें जाणत । तें माझें स्वरूप काय यथार्थ । हें विचारें पाहतां जें सत्यभूत । तेंचि यथार्थ आत्मस्वरूप ॥ ८६ ॥ ह्मणे जो पंचमहाभूतांचा पसारा । तो मी माझें स्वरूपें नव्हे खरा । विचारिताही विवेकवरा । न राहे पुरा कोण्ही अथ ॥ ८७ ॥ इंद्रियें ह्मणों मनादिक । तरी ते प्रत्यक्ष भासती सकळीक । जें जें दृश्य तें मिथ्या सम्यक् । भासे पराक् ह्मणउनी ॥ ८८ ॥ जे जे बाह्य पदार्थ भासती । ते ते पराक् जाणिजेती । पराग् ते नश्वर सर्वार्थी । दिसे व्यक्ति स्थूळ ह्मणोनि ॥ ८९ ॥ तैसेचि अहंकारादिपदार्थ । ते ते आपणासि पराक् भासत । जें भासे तें तें दृश्यजात । मिथ्याभूत जाण तूं ॥ ९० ॥ आतां यथार्थ सर्वावेगळें[3] । आपण येथें कोण पां निराळें । ऐसें विचारितांही न कळे । सद्गुरू मिळे तोंवरी ॥ ९१ ॥ सद्गुरूचे कृपाप्रकाशभरें । नाशोनि जाय संशयआंधारें । आपण आपणा सर्व प्रकारें । भेटे निर्धारें तत्काळ ॥ ९२ ॥ त्याही विचाराचें कारण । तुजप्रती कांहीं पुसेन । तें सांगताचि जाणसी आपण । हेचि खूण ऐक पां ॥ ९३ ॥ तरी जो देहेंद्रियसमुदाय असे । तयातें पुरुष ऐसें बोलिजतसे । जो कोणाचे तेजें वर्तत असे । जाण कैसें कोणेकरूनि ॥ ९४ ॥ सर्व कर्में करी कर्तव्य जें जें । तें तें सांग पां कोणाचेनि तेजें । सर्वेंद्रियीं व्यापारु निपजे । कवणा सुझे विचारु सर्व ॥ ९५ ॥ येरु ह्मणे मी सांगेन । सर्व प्रकाशे सूर्यकरून । आयिका येकाग्र करूनि मन । सूक्ष्म गहन हा विचारू असे ॥ ९६ ॥ ईयेविचारीं[6] जयाचें मन । प्रवर्त्तेल सावधान अतितीक्ष्ण । तयासि होय आत्मदर्शन । भेटे आपण आपणा पैं ॥ ९७ ॥ तरी एक हें बोलिलासी यथार्थ । सूर्यतेजें प्रकाशे समस्त । मग पुरुष सर्व कर्मी

१ व्यवसाय असा पाठ. २ किल्यांचे बुरूज. ३ वेगळें ४ 'पृथक्' असा पाठ. ५ संसार असा पाठ. ६ 'ज्ञेयविचारी'

वर्त्तत । हे प्रतीत सर्वांसी ॥ ९८ ॥ परी सूर्य अस्तवलियावरी । पुरुष वर्ते हा कवणेपरी । येरु ह्मणे चंद्रप्रकाशें करी । राहाटी पुरी सर्वेंद्रियांची ॥ ९९ ॥ हें होय यथार्थ वचन । परी चंद्रास्तें प्रकाशी कवण । उडुगण[1] सौदामिनी जाण । करिती भान सर्व कर्मीं ॥ १०० ॥ हेंही नसतां कवण प्रकाशी । कोण पुरुष प्रवर्ते कर्मासी । येरु ह्मणे अनलें सर्वांसी । पदार्थ जातासि प्रकाशिजे ॥ १ ॥ दीप दिविया इत्यादि प्रकारें । हव्यवाट्तेजें आविष्करे । तेणें प्रकाशें प्रचुरें । पुरुष व्यवहारे सर्व कर्मीं ॥ २ ॥ तोही नसतां कोणें जाणिजे । हें आतां निश्चयेंसि बोलिजे । येरु ह्मणे शब्दें प्रकाशिजे । आंधारीं सुझे शब्दें सकळ ॥ ३ ॥ शब्दही नसतां कवण प्रकाशी । हेंही सांगपां गुणराशी । येरु ह्मणे मन सर्वांसि प्रकाशी । जाणणें त्यासि सर्व प्रपंचजात ॥ ४ ॥ मनें स्थूळसूक्ष्म जाणिजे । मनेंचि सर्वही कल्पिजे । मनेंचि व्यवहारें घेपेदि । मनेंचि बुझे अंतर्बाह्य ॥ ५ ॥ तरी तेंही मन स्वप्नाकार । परिणमलें जेव्हां सविस्तर । तेव्हां देखे स्वप्नव्यवहार । सांग साचार कोण्हे तेजें ॥ ६ ॥ मन आणि बुद्धि स्वप्नाकारें । पदार्थरूपें आविष्करे । तेथ देखावया मनही नुरे । सांग पा खरें प्रकाशका ॥ ७ ॥ जीं जीं जाणावयाचीं कारणें । ते सर्वही स्वप्नीं जाली लीनें । तरी कोण्हें स्वप्न प्रकाशणें । सांग हे खूणे विचारुनी ॥ ८ ॥ ना प्रमता स्वप्न देखतु । हें बोलतांचि होय अनर्थु । मनोपाधि तो असे बिंबतु । मनात वर्ततु आभासोनी ॥ ९ ॥ उपाधि गेलिया प्रतिबिंब कैंचें । घटीं जळ नाशल्या सूर्यादिकांचें । प्रतिबिंब नुमटे कोणाचें । उपाधि साचें असेचिना । ११० ॥ जंववरी घटीं जळ असे । तंवचि प्रतिबिंब प्रकाशे । जळनाशें तेंही नाशे । प्रत्यक्ष असे सर्वां जनां ॥ ११ ॥ अगा आदर्श परौता नेलिया । ठाव कैचा प्रतिबिंब दिसावया । उपाधिनाशें नाशु तया । जनां यया प्रत्यक्षसिद्ध ॥ १२ ॥ तैसें अंतःकरण उपाधीसी । बिंब जो चैतन्यांश तयासि । बिबलेपणें निश्चयेंसी । प्रमाता ऐसी संज्ञा जाली ॥ १३ ॥ तो अंतःकरण उपाधि वेचला । स्वप्नपदार्थाकारें परिणमला । तया आंतु जो भासला । तो ही गेला उपाधिनाशें ॥ १४ ॥ तऱ्ही स्वप्न कोण्ही प्रकाशिलें । पदार्थ सत्यत्वें कोण्हीं देखिलें । हें सांग पां येक्या बोल । जैसें कळलें असेल तुज ॥ १५ ॥ इंद्रियवर्ग लयातें पावला । मनाचा परिणाम स्वप्न जाला । प्रमातादि तेथें नाशला कोणें देखिला स्वप्नसंभ्रमु ॥ १६ ॥ अगा प्रमातयाचें देखणें । जंववरी असतां बाह्यकरणें । तयावेगळें स्वतंत्रपणें । जीवा नेणणें असेचि कीं ॥ १७ ॥ येथें न चले कोण्ही युक्ति । तटस्थ राहिला मौनस्थिति । जाणतु नेणें स्वयें भ्रांति । न वदे भारती कांहीं त्याची ॥ १८ ॥ मग गुरु ह्मणती ऐक आतां । निर्धारु सांगेन तुज तत्वतां । जेणें बुझसी सर्वार्था । तोचि आतां जाण तूं ॥ १९ ॥ तुझें स्वरूप तें साक्षी जाण । जो करितसे सर्वांचें भान । जालियाही इंद्रियें लीन । स्वयें आपण जो प्रकाशी ॥ १२० ॥ अगासकळ सामग्रीविण । अंतराचें करी जो प्रकाशन । तोचि तो सर्वथा साक्षी जाण । नाहीं भिन्न आपणेंसी

१ नक्षत्रसमुदाय. २ वीज. ३ विस्तवानें. ४ धेणें. ५ प्रगट होतें.

आपणेंसी ॥ २१ ॥ आणि बाह्यार्थाचें प्रकाशन। तेंही साक्षीच करी जाण। इंद्रियें बाह्यत्वें स्थूळभान। करी आपण स्वप्रकाशें ॥ २२ ॥ जो रूपवंत असे पदार्थ। तोचि इंद्रियां होय प्रत्यक्षभूत। रूपवंत नव्हे तेणें प्रकाशवंत। तेंही जाणत साक्षीच येकु ॥२३॥ शुक्तिरजत। बाह्यपदार्थ। परी तो नव्हे रूपवंत। यालागींच इंद्रियें न प्रकाशीत। साक्षी जाणत चक्षुद्वारा ॥ २४ ॥ तैसीं अंतरींचीं सुखदुःखें। तीं इंद्रियेंविण साक्षीच जाणे असेंकें। तें अरूपवंत इंद्रियां नटके। प्रकाशी निकें साक्षीच येकु ॥२५॥ तैसाचि कीं स्वप्नपदार्थ। तो भासमात्र परी नव्हे रूपवंत। ह्मणोनि तेंही साक्षीच प्रकाशित। नव्हे अन्यार्थ रघुराया ॥ २६ ॥ तो जो साक्षी तेंचि स्वरूप आपुलें। वास्तव अनुभवें जाणावें भलें। तें विचारेंचि होय साधिलें। तेंचि तें निराळें सुषुप्तीसी ॥ २७ ॥ तें स्वप्नडिंबही मावळलिया। तो साक्षीच उरे आपणया। साक्षस्वप्नादि गेलिया। साक्षित्व तया तेंही नाहीं ॥ २८ ॥ साक्ष अपेक्षा ससाक्षित्व। ते साक्ष गेलिया उरे येकत्व। साक्षीपणाचेंही तत्व। राहे निवांत स्वस्वरूपीं ॥ २९ ॥ तेव्हां सच्चिदानंद सुखपणें। असे आपणया आपणें। सुखरूप नसे तरी कैसा जाणे। प्रबोधीं कोणें प्रकाशिजे ॥ १३० ॥ 'सुखमहस्वाप्सं' ऐसें। प्रबोधीं स्वयें जाणताचि असे। यालागीं मी केवळ सुषुप्तीं वसें। दुजें नसे तेथ कांहीं ॥ ३१ ॥ ऐसें हें विचारें विचारितां। स्वतःसिद्ध आपणचि आयता। सर्वातीत ब्रह्मसत्ता। तोचि तूं तत्वता रघुराया ॥ ३२ ॥ अहो सुषुप्तीसि कांहींच नेणें। प्रपंचमात्रातें जाणणें। सुखदुःखादि नाहीं भोगणें। मी अमुका नेणें कांहींच तेथें ॥ ३३ ॥ जाति वर्णाश्रम गुण। कांहींच नेणे अनुसंधान। अमक्याचा पिता पुत्र इत्यादि खूण। नेणें संपूर्ण कांहींच तो ॥ ३४ ॥ केवळ चैतन्यसुखावबोधें। राहे सुषुप्तीसि अगाधें। तें आपणाचि जें ऐसें बोधें। तेंचि स्वानंदें जाणिजे ॥ ३५ ॥ मी कोण ऐसें जाणणें। तें जाणावें यिये खुणें। विश्व नश्वर दृश्यपणें। नाहींच होणें वास्तव कदा ॥ ३६ ॥ जग स्वप्नसुषुप्तीसि बांधलें। ह्मणोनि नश्वरत्व पावलें। तें आभासमात्र संचलें। विचारा भलें समर्थ नव्हे ॥ ३७ ॥ विचारक्षेम नव्हे जे वस्तु। तैचि ते आभासमात्र जाण तूं। जैसा कां अहि रज्जुगतु। शुक्तिकांतर्भूतु रजाताभासु जाण ॥ ३८ ॥ कां रोहिणीजळाचा पूर। कीं गंधर्वनगरींचे गोपुर। इंद्रजाळाचें सपूर। अतिसुंदर लाघव तें ॥ ३९ ॥ वोडंबरींचे अलंकार। कां चित्रींचीं वनिता सुंदर। कां स्वप्नींचें वैभव परिकर। मनोद्वार राज्य भोग ॥ १४० ॥ सायिखडियाच्या गजघंटा। छायामंडपींच्या सुरश्रेष्ठा। युद्धाच्या होती खटपटा। दिकुं गोमटा गोलांगुळाचा ॥ ४१ ॥ तैसें हें विश्व जालें सकळ। पाहतां आभासमात्र टवाळ। विचारतां निर्मूळ। फोल सकळ रघुराया ॥ ४२ ॥ अगा हें सत्यवस्तुचा ठाईं। भासे

---

१ स्पष्टपणें; येथें 'असिकें' असा पाठ आहे. २ मी सुखानें निजलों होतों. ३ जागा झाल्यावर. ४ विचारास योग्य. ५ जादूगाराचे. ६ कळसूत्री बाहुल्याच्या. ७ चमत्कार; 'टिक' असा पाठ.

ह्मणोनि सत्याभास पाहीं । विचारितां असत्य सर्वही । भ्रमेंविण पाहीं आन न देखे ॥ ४३ ॥ अगा येणें विचारेंकरून । विश्व हें असत्यचि बाधून । सत्य आपणयातें निवडून । राहणें परिपूर्ण जाणुनि ॥ ४४ ॥ तोचि आपण अकळ अढळ । प्रांजळ सत्यसेतु निर्मळ । अखंड स्वप्रकाश अचळ । सुखकल्लोळ सुखत्वें ॥ ४५ ॥ स्वसंवेद्य निरंजन । अप्रमेय निष्कळ निर्गुण । साक्षी निरंतर चैतन्यघन । स्वार्थपूर्ण पूर्णत्वें ॥ ४६ ॥ एवंविध पैं आपण असे । देहादिप्रपंचाचें रूप तें ऐसें । चंचल दृश्य परिच्छिन्न भासे । अनित्य दिसे मळिनपणें ॥ ४७ ॥ अखंड अप्रकाश क्षणभंगुर । दुःखरूप दुःखोदर्क[1] निरंतर । परसंवेद्य जड अस्थिर । जाणिजे सपूर दृश्यपणें ॥ ४८ ॥ अज्ञानांध कलंकयुक्त । अतिस्थूळ बाह्य नियुक्त । साक्ष क्षणिक जड प्राकृत । पदार्थप्रतीत सर्वेंद्रियां ॥ ४९ ॥ एवंगुणीं जाण अलंकृत । हें विश्व मिथ्याचि भासत । जें जें इंद्रियीं जाणजेत । तें तें मिथ्याभूत जाण तूं ॥ १५० ॥ ऐसिया विचारेंकरुनी । सर्वदा पाहतां कोदंडपाणी । असंताचि जग नयनीं । जैसें स्वप्नीं तैसें भासे ॥ ५१ ॥ मिथ्या भासलिया विश्वजन । वासना नुपजती गा जाण । अज्ञान नाशलिया विश्वभान । मिथ्या पूर्ण भासत ॥ ५२ ॥ तेवीं साधन तुजप्रति । सांग सांगेन गा रघुपति । जेथें वासनाचि नुदेजती[2] । तेंचि विश्वमूर्ती परियेसीं ॥ ५३ ॥

यस्य मौर्ख्यं क्षयं यातं सर्वं ब्रह्मेति भावनात् । नोदेति वासना तस्य प्राज्ञस्यांबुमतिर्मरौ ॥ २ ॥

अगा सत्य वस्तूचे ठायीं । असत्य विश्व भासे सर्वही । यासि कारण अज्ञानावांचूनि नाहीं । सत्य पाहीं रघुवर्या ॥ ५४ ॥ परम मौर्ख्य तें अज्ञान । ह्मणोनि मौर्ख्य हें अभिधान । वस्तुविस्मरण भासवी आन । ह्मणोनि जाण मूर्खपण तया ॥ ५५ ॥ अनादि जेणें नाहींसें केलें । तें मौर्ख्य ज्याचें क्षया गेलें । त्यासिच ब्रह्मत्व हाता आलें । स्वयेंचि जालें ब्रह्म पूर्ण ॥ ५६ ॥ अगा 'सर्वब्रह्मोति' भावना । तेणें निःशेष नाश होय अज्ञाना । कार्य तें विश्वभास जाणा । तें कार्य कोणा आश्रयें राहे ॥५७॥ कारण तें अज्ञान जाण । कार्य तें विश्वभास पूर्ण । कारणनाशें विश्वभासस्वप्न । न भासे संपूर्ण रघुवर्या ॥ ५८ ॥ ज्ञान जालें नसतांही गा रघुपती । सर्वब्रह्म ऐसी करितां क्षण वृत्ति । ते भावनाचि फळे सर्वार्थी । त्रिजगतीं ब्रह्मचि भासे ॥ ५९ ॥ सर्वदा करितां ब्रह्मभावना । अज्ञान नाशे गा रघुनंदना । तेथें विश्वभासरचना । नाहींच क्षणामाजी होये ॥ १६० ॥ ऐसा हा साधनप्रकार । येणेंचि मौर्ख्याचा होय संहार । मौर्ख्यनाशें वासनांकुर । नुगवे साचार सर्वथा ॥ ६१ ॥ अगा वासनावल्लीचें बीजभूत । ते हें अज्ञानचि जालिया भंजित[3] । पुनरपि तें वासनांकुरित । नव्हे संचित जऱ्ही जालें ॥ ६२ ॥ जैसें मरुस्थळाचा ठाईं । ज्ञातया अंबुबुद्धि नव्हे पाहीं । रज्जु हस्तगत तयाही । न भासे अहि[4] सर्वथा

---

१ परिणामीं दुःख देणारें. २ उत्पन्न होत नाहीं. ३ भाजलेलें. ४ सर्प.

॥ ६३ ॥ यालागीं मुळाचें छेदन करावें । येणेंचि वासनाजय संभवे । अन्यथा तेंचि अभिभवे । वर्म जाणावें निश्चयेंसी ॥ ६४ ॥ ह्मणोनि वासनेची शांति । अज्ञाननाशें गा महामती । करावी हे तुजप्रति । साधनसंपत्ति बोलिलों ॥ ६५ ॥ आतां चित्ताचेंही जेणें अचित्तपण । रघुनाथा येतसे गा जाणा । जेणें चित्तपण होये क्षीण । तेंही लक्षण सांगों आतां ॥ ६६ ॥ आणि वासनाक्षयाचे प्रकार । तेही सांगों सविस्तर । तऱ्ही मन करूनि येकाग्र । उपायसार परियेसीं ॥ ६७ ॥

वासना संपरित्यागाच्चित्तं गच्छत्यचित्तताम् ॥ प्राणस्पंदनिरोधाच्च यथेच्छसि तथा कुरु ॥ ७ ॥

अगा वासनाशब्दें पूर्वसंस्कार । जे कां धर्माधर्म मनोहर । सूक्ष्म अदृष्ट गोचर । व्यक्त साचार नव्हे पैं ॥ ६८ ॥ ते फळोद्भवें व्यक्तीसि येती । येऱ्हवीं अव्यक्तपणेंचि असती । तद्रुपेंचि अंकूर निघती । पुण्य अघें होती तेणेंचि पैं ॥ ६९ ॥ आणि वासनांची स्वरूपस्थिति । पूर्वींही सांगितली तुजप्रति । त्याची वासना जाणिजेती । आयिकें गति तयांची ॥ १७० ॥ तया वासना संगसंपत्ति । जालिया चित्तासी चित्तत्वस्थिती । वासनाक्षयें अचित्तगति । शुद्धस्थिती सर्वदा ॥ ७१ ॥ विषयापेक्षा त्याचि गा वासना । तेणें चित्त पावे चित्तपणा । वासना जालिया सर्व लीना । तेणें चित्तपणा मुकलें ॥ ७२ ॥ नाहो पूर्वसंस्कारें वासना होती । त्या तंव प्रारब्धरूपें ठसावती । प्रारब्धाची अलोटगति । नव्हे सर्वथा कोटिउपायें ॥ ७३ ॥ ज्ञान जालियानंतरें । संचितक्रियमाण तत्काळ सरे । परी प्रारब्ध तें भोगार्थ उरे । सर्वथा न सरे ज्ञानेंहीकरीं ॥ ७४ ॥ तेथें वासनाक्षय कोणें होये । कैसें चित्ताचें चित्तपण जाये । हें तंव अभिनवचि आहे । कोण उपाय त्या बोला ॥ ७५ ॥ हें तंव बोलिलें तें यथार्थ । संस्कारप्रारब्धरूपें भोगार्थ । जालें तें अचळ निश्चितार्थ । नाहीं ढळत ज्ञानेंकरूनी ॥ ७६ ॥ ज्ञानाच्याहीपेक्षां थोर । प्रारब्धाचें फल गंभीर । तयाहीपरी सबळ फार । महाथोर योगाचें ॥ ७७ ॥ परि ज्ञानें विश्व बाधित होये । विषयजात तें मिथ्यारूप पाहें । मिथ्यत्वावरी वासना जाईल काये । गेलीही होताहे बाधित ॥ ७८ ॥ यालागीं ज्ञानेंही वासना नाशती । प्रारब्धभोग तेही बाधिजेती । जालेही ज्ञानी न मानिती । मिथ्या देखती सुखदुःखें ॥ ७९ ॥ दुःखें दुखवोनी जे दुःखी होती । उद्भेगें देहाकारप्रतीति । तयांसिच दुःखें दुःख देती । ज्ञानियांप्रति तें तंव नाहीं ॥ १८० ॥ तैसेंचि सुखें जे सुखावती । सुखभोगें धन्य ऐसें मानिती । आणिकाची अपेक्षा करिती । तेचि बुडती तेणें सुखें ॥ ८१ ॥ तैसे नव्हती ते ज्ञानीजन । ते सुखदुःख देखती समान । दोहींचें जाणती नश्वरपण । नव्हती उद्विग्न कां सुखरूप ॥ ८२ ॥ हें सुखु हें दुःख निवाडाही जाणती । परी दुःखेंकरूनि तळमळ न करिती । बाधित सर्वही देखती । स्पृहा

१ नाश पावतें. २ स्पष्टपणास. ३ विषयांच्या इच्छा. ४ ज्ञानाच्याही ह्यातून. 'ज्ञानेंही कांहीं' असा पाठ ५ इच्छा.

न कारिती सुखाची ॥ ८३ ॥ दोहींहि मिथ्याभूत ते नश्वर । क्षणयेकही नव्हती स्थिर । सुखीं राग दुःखीं इतर । नाहीं साचार ज्ञानबळें ॥ ८४ ॥ यदर्थीं शारंगधरें । बोलिलें गीतेसि निर्धारें । तेंचि परिसिजे येकाकारें । जेणें स्फुरे अर्थ सकळ ॥ ८५ ॥

संमातश्लोक । दुःखेष्वनुद्विग्नमनाः सुखेषु विगतस्पृहः । वीतरागभयक्रोधः स्थितधीर्मुनिरुच्यते ॥

ययाचा अभिप्रायार्थ । पूर्वींच बोलिला निश्चित । तोचि भाव जाणिजे यथार्थ । नाहीं अन्यार्थ सर्वथा ॥ ८६ ॥ ज्ञानेंही वासना नाशती । इत्यादि ख्यूण जाण उपपत्ति । तें प्रारब्धघातेंही न गणिती । मिथ्या देखती देहादिसर्व ॥ ८७ ॥ आणि योगें प्रारब्धभोग नाशे । तें सर्वही शास्त्री बोलिलें असे । तें तंव नव्हे अनारिसें । अनुभवें असे तैसेंचि ॥ ८८ ॥ योगाभ्यासें सम्यक् समाधि । लागलीया चिरकालावधि[1] । प्रारब्धभोग काय तया बाधी । सुखदुःखबुद्धि स्थिरेना[2] ॥ ८९ ॥ ऐसें अनुभवसिद्धही असे । यालागीं योगें प्रारब्ध नाशे । ह्मणोनियां योगाभ्यासें । नाशु असे वासनेसी ॥ १९० ॥ ह्मणोनि वासनेच्या क्षयासी । योगाभ्यास सांगे हृषीकेशी । प्राणनिरोधें वासनांसी । क्षयो सर्वांसि निर्धारें ॥ ९१ ॥ ह्मणोनि आसनपूर्वक प्राण । रोधिल्या वासनाक्षय संपूर्ण । वासनाक्षयें जाण चित्तपण । अचित्तपण सर्वदा ॥ ९२ ॥ अगा अचित्त तेंचि ब्रह्म पूर्ण । अचित्त तेंचि चैतन्यघन । अचित्तपणें विश्वअभान । अचित्त पूर्ण पूर्णत्वें ॥ ९३ ॥ वासनायोगें चित्तपण । वासनाक्षयें अचित्त जाण । चित्तें संसार होये दारुण । अचित्तें पूर्ण ब्रह्मत्व ॥ ९४ ॥ वासनाक्षयाचा उपावो । तो सांगितला तुज निर्वाहो । आतां जैसी इच्छा तैसा रघुरावो । करूनि भावो माने तैसा ॥ ९५ ॥ आतां आणीकही उपायप्रकार । सांगेन तुज महाथोर । जेणें ज्ञानप्राप्ति होये सत्वर । आणि निर्धार अज्ञानाचा ॥ ९६ ॥ तें अज्ञान गा नाशे तत्क्षणीं । सर्वा वासनांची होय धुणी[4] । तें वर्म कोदंडपाणी । सांगों वचनीं आइका पां ॥ ९७ ॥ सर्व उपाय अलंकाराचे । शिरोमणि जे कीं मुगुटींचे । जे साजे साधिलिया उपायांचे । उदीम साचे खांचती ॥ ९८ ॥ सर्वांही उपायांचा राजा । तो तूं ऐकें गा सौमित्राग्रजा । जो करितां संसृतिसमाजा[5] । मुक्त वोजा होइजे कीं ॥ ९९ ॥

साधुसंगमसच्छास्त्रपरो भवसि सन्मते[6] । तद्दिनेनैव नो मासैः प्राप्नोसि[7] परमां गतिम् ॥ ८ ॥

साधुसंगमसच्छास्त्र । येथें होसी जैं तत्पर । तरी तद्दिनींच[8] असे बुद्धि थोर । पावसी निर्धार विबुधपती ॥ २०० ॥ सत्समागमाहूनि सार । समाधान नाहीं महाथोर । तैसेंचि जाण सच्छास्त्र । जेणें दुस्तर निस्तरिजे ॥ १ ॥ परी नानासाधनें करितां । तैसी सद्बुद्धि नव्हे गा रघुनाथा । जिये बुद्धीस्तव भवव्यथा । जाय भस्मता क्षणमात्रें ॥ २ ॥ बुद्धिशब्दें जाण । जेणें निःशेष तुटे अज्ञान । अज्ञाननाशें ब्रह्म पूर्ण । प्राप्त जाण सर्वथा

---

१ पुष्कळ वेळपर्यंत. २ 'थारेना' (स्थिर होत नाहीं) असाही पाठ. ३ 'प्रवण' असा पाठ. ४ निःशेष नाश. ५ अनेक संसारापासून. ६ 'राम चेत् ' असा पाठ. ७ ' प्राप्तोषि ' असा पाठ. ८ त्याच दिवशीं.

॥ ३ ॥ अगा तैसी बुद्धि सद्गुरूकरून । साधुशब्दें तोचि तो जाण । तयाच्या मुखें सच्छास्त्रश्रवण । तेणें पूर्ण ज्ञान होये ॥ ४ ॥ साधुसंग आणि सच्छास्त्रश्रवण । जे दिवशीं पुरुषासि होये जाण । तेचि क्षणीं ज्ञान होये संपूर्ण । तेथ विलंब असेचिना ॥ ५ ॥ अगा महाभाग्येंकरून । सत्समागम आणि सच्छास्त्रश्रवण । होतां तेचि क्षणीं जाण । सुखसंपन्न तो होये ॥ ६ ॥ तेथ नलगे येक मासभरी । तेथें वर्षाची काय कुसरी । तेचि क्षणीं दशग्रीवारी । सद्बुद्धि वरी तयातें ॥ ७ ॥ परम बुद्धि ययास्तव बोलिजे । जियेहूनि थोर बुद्धि न देखिजे । सर्वां वरिष्ठ तें ज्ञान सहजें । नाहीं दुजें तत्समान ॥ ८ ॥ तो ज्ञानोदयो होतांचि क्षणीं । अज्ञानाची होये धुणी । स्वतःसिद्ध ब्रह्मत्व आणि । बुद्धि निर्वाणीं तेचि ते ॥ ९ ॥ तेचि बुद्धि पाहिजे सत्संगेंकरीं । दुसरीं सच्छास्त्रभरोवरी । तेचि दिवसीं सद्बुद्धि वरी । नलगे दुसरी मासमर्यादा ॥ २१० ॥ सच्छास्त्रशब्दें निगमशिर । ज्या कीं उपनिषदा महा उदार । तदर्थ तें वेदांत महाथोर । तेंचि सच्छास्त्र बोलिजे ॥ ११ ॥ संत तोचि सद्गुरुरावो । त्याचेनि वेदांतश्रावो । जालिया तोचि नाशी ठावो । आन भावो असेचिना ॥ १२ ॥ अगा होतांचि सद्गुरुचरणीं मिळणी । तन्मुखें वेदान्त पडे श्रवणीं । ब्रह्मज्ञान होय तत्क्षणीं । हातधरणी ब्रह्म भेटे ॥ १३ ॥ ब्रह्म स्वतःसिद्ध स्वयेंचि असे । परी तें अज्ञानें व्यवधानिलें असे । अज्ञाननाशें भेटलें ऐसें । जाणतसें तयापरी ॥ १४ ॥ जेसें कंठगत चामीकर । भ्रमें जाला त्याचा विसर । भ्रमनाशें आनंद थोर । प्राप्त प्रकार मानूनियां ॥ १५ ॥ अथवा सच्छास्त्रवेदांतादिक । अध्यात्मशास्त्रेंही सम्यक् । तें आणि संत ज्या सद्गुरूसि तुक । देचि देख संतशब्दें ॥ १६ ॥ येथेंही जालिया तत्पर । ज्ञान होयेचि हा निर्धार । उभय अर्थाचें अर्थांतर । सर्वसार शास्त्रसंत ॥ १७ ॥ ऐसिया जे दिवसीं गा रघुनाथा । सच्छास्त्र आणि संतीं प्रीति उपजतां । तेचि क्षणीं पावे ब्रह्मता । विलंबू सर्वथा असेचिना ॥ १८ ॥ तेथें वासनेची कैंची गोठी । सर्व ब्रह्ममय जाली सृष्टि । वासना कासयाची कोणासि उठी । जाण जगजेठी विबुधनाथा ॥ १९ ॥ आणीकही येक उपाय थोर । जेणें तुटतां वासनासंभार । तोचि सांगिजेल प्रकार । आयिक येकाग्र करूनि मन ॥ २२० ॥ परी तेही उपाय जानकीपती । सत्संगानंतरेंचि होती । परी पूर्वीं कारितां न साधती । अंतरें असती म्हणऊनियां ॥ २१ ॥ तऱ्ही तेंही सांगों प्रकारत्रय । जेणें नव्हती वासनोद्भव । त्या येकयेकीं सामर्थ्य गौरव । सांगेन भाव तो आयिका ॥ २२ ॥

असंगव्यवहारित्वाद्भवभावनवर्जनात् । शरीरनाशदर्शित्वाद्वासना न प्रवर्त्तते ॥ ९ ॥

आतां प्रथम साधन तें ऐसें । असंगपणीं व्यवहार दिसे । तेणें वासना निःशेष नासे । पुढें न प्रवेशे हृदयाकाशीं ॥ २३ ॥ तेंचि तें असंगत्व कैसें । तेंही सांगों गा सावकाशें ।

---

१ मोठेपणा. २ 'शास्त्र' असा पाठ. ३ वेदांचे मस्तक. ४ वेदांत ऐकणें. ५ 'सर्वशिर' असा पाठ.

तरी सकळांव्यतिरिक्त स्वयें असे । बुझला असे गुरुमुखें जो ॥ २४ ॥ देहादि इंद्रियें आणि अहंकार । हा मिथ्याभूत सर्व संभार । तैसेंचि विश्व कल्पित चराचर । निर्विकार तद्भिन्न ॥ २५ ॥ जें जें आपणासि दृश्य । तें तें जाण मिथ्या आभास । आत्मप्रकाशकु स्वप्रकाश । असंग उदात्त नित्यपणें ॥ २६ ॥ हें सद्गुरुमुखें बरवे प्रकारीं । जो बोधला असेल पौलस्त्यारी । तेणें अनुसंधानें असंगपरी । जाणें कुसरी अकर्तेपणें ॥ २७ ॥ आपण निःसंग उदास । अकर्त्ता अभोक्ता परेश । कार्यकर्तृत्वादि नाहीं क्लेश । जैसें आकाश अलिप्तपणें ॥ २८ ॥ येऱ्हवीं तरी रघुनाथा । परबांहिरी चाले कर्मव्यवस्था । तें बलात्कारें घे आपुले माथां । भवपंथा पाडावया ॥ २९ ॥ ऐशी संमति असे थोर । जे बोलिला श्रीकृष्ण उदार । तेंचि सांगों एक उत्तर । श्रोते चतुर परिसोत ॥ २३० ॥ अगा शरीरवाचामानसें । जें जें कर्म निपजत असे । तें अधिष्ठानपंचक आवेशें । होताचि असे शुभाशुभ ॥ ३१ ॥

संमति श्लोक । पंचैतानि महाबाहो कारणानि निबोध मे । सांख्ये कृतांते प्रोक्तानि सिद्धये सर्वकर्मणाम् ।
अधिष्ठानं तथा कर्ता करणं च पृथग्विधम् । विविधाश्च पृथक्चेष्टा दैवं चैवात्र पंचमम् ।
शरीरवाङ्मनोभिर्यत्कर्म प्रारभते नरः । न्याय्यं वा विपरीतं वा पंचैते तस्य हेतवः ।
तत्रैवं सतिकर्त्तारमात्मनं केवलं तु यः । पश्यत्यकृतबुद्धित्वान्न स पश्यति दुर्मतिः ॥

श्यामसुंदर राजीवलोचना । देवादिदेव विराजमाना । करीं प्रपंचाचें विडंबना । दीनोद्धारण करावया ॥ ३२ ॥ श्रीकृष्ण ह्मणे गा अर्जुना । सांगेन याची विवंचना । कर्मसिद्धीचिया प्रयोजना । सांख्यीं जाणा निवाड केला ॥ ३३ ॥ सर्व कर्म जेंहीं निपजे । तें न्याय्य अथवा अनाय्य जें । त्यांचीं पांच कारणें जाणिजे । सांगों व्याजें येणेंचि ॥ ३४ ॥ तरी सकळांचें जें अधिष्ठान । तें प्रथम हें शरीर जाण । तैसाचि अहंकार कर्त्ता पूर्ण । जयालागून प्रमाता ह्मणती ॥ ३५ ॥ तिसरा समुदाय इंद्रियांचा । परि वेगळा व्यवहार त्यांचा । तैसाचि विकारु यया प्राणांचा । विविधा पांचा प्राणशक्ति ॥ ३६ ॥ पांचवें दैव पूर्वसंस्कार । तेणेंचि सर्वांसि चेष्टा विकार । अदृष्ट होय कर्माचार । हा निर्धार रघुनाथा ॥ ३७ ॥ अथवा दैवशब्दें जाण । अधिष्ठात्री देवता ह्मणती सज्ञान । येही पांचा कारणीं करून । क्रिया निर्माण होय सर्व ॥ ३८ ॥ येहीं पांचा कारणींकरुनी । सर्व कर्म निपजे कोदंडपाणी । आत्मा निर्विकार अकर्त्तेपणीं । राहे निर्वाणीं साक्षित्वें ॥ ३९ ॥ तोचि साक्षीययाचा प्रकाशकु । अकर्त्ता अभोक्ता सर्वात्मकु । ऐसें असोनिही अविवेकु । करी कुतर्कु कर्त्तेपणाचा ॥ २४० ॥ अगा देहात्मबुद्धिकरुनी । कर्त्ता भोक्ता आपणातें मानी । ते देहात्मबुद्धि भरंवसेनी । सद्गुरुकृपेनी ज्याची गेली ॥ ४१ ॥ त्यासी असंगपणें कर्मे

---

१ समूह; 'संसार' असा पाठ. २ परभारी; 'परी बाहेर' असा पाठ. ३ रहाण्याची जागा.
४ 'असोनि अविवेकु' असा पाठ.

करितां । सर्व शरीरव्यवहारकर्त्तव्यता । क्लेश नाहींत श्रीरघुनाथा । कूटस्थ आइता कर्माध्यक्षु ॥ ४२ ॥ ऐसा असंगत्वें व्यवहार करितां । वासना नुपजती गा सर्वथा । हा उपाय येकु रघुनाथा । दुजा महंता परियेसी ॥ ४३ ॥ तरी भवभाववर्जनकरीं । वासना नुठती[१] गा धनदानुजारी । तेही आइक पां कुसरी । सांगों विस्तारीं जैसी असे ॥ ४४ ॥ भव शब्दें संसारजात । त्यासि ब्रह्माच्या ठायीं भावना भावित । हेचि विपरीतभावना निश्चित । विश्वाचे तथ्य नेणोनियां ॥ ४५ ॥ जैसा स्वप्नाभास स्वप्नीं भासे । तो अवस्थांतरीं न दिसे । ऐसें जाणोनिही घेऊन बैसे । यथार्थ ऐसें मानुनी ॥ ४६ ॥ मिथ्याभूत ऐसी होय प्रतीति । तरी भ्रमें यथार्थ मानिती । हे नवल भ्रमाची स्थिती । काय रघुपति बोलावें ॥ ४७ ॥ तें जैसें आहे तैसेंचि मानावें । इतुक तया न करवे । विपरीतचि आवडे । जें न करावें तेंचि करिती ॥ ४८ ॥ जैसें आहे तैसेंचि देखतां । तयाचें कांहीं न वेचे गा सर्वथा । यालागीं सत्य बुद्धि गा तत्वतां । प्रपंचीं रघुनाथा न करावी ॥ ४९ ॥ यथार्थाचें अयथार्थ देखणें । येकाचे ठायीं अनेक भावणें । नसतें तेथ कल्पणें । भावना येणें कारण होये ॥ २५० ॥ पाषाणीं जैसी देवबुद्धि । अश्वत्थप्रमुखादिकीं तेचि बुद्धि । येक दिसतां येक प्रतिपादी । भावना सुबुद्धि इये नाम ॥ ५१ ॥ कां आकाशीं जैसी निळिमा । कीं मेत्रीं गंधर्वपूरसीमा । रश्मीसि मृगांभमहिमा । भुजंगप्रतिमा दोरीसि भासे ॥ ५२ ॥ दर्भमुष्टीचा यजमान । सोमवल्लीनाम अमृतपान । परी तें शास्त्रदृष्टिप्रमाण । भिन्न तें प्रमाण सत्य ह्मणतु ॥ ५३ ॥ तैसें सत्य ब्रह्माचा ठायीं । असत्य विश्वाची भावना पाहीं । हे त्यजिलिया वासना कांहीं[५] । नुठिजे कांहीं बोलावें नलगे ॥ ५४ ॥ अगा जो जो पदार्थ साच दिसे । तेथेंचि वासना हे प्रवेशे । तोचि असत्य ऐसें जऱ्ही भासे । तऱ्ही वासना नासे उपजलीही ॥ ५५ ॥ अगा असत्य मृगांभभासलें । त्याचें स्वरूप यथार्थ कळलें । तेथ मन काय प्रवर्त्तलें । तृषाही पीडलें जऱ्ही असे ॥ ५६ ॥ कां बोडंबरीचे[६] अलंकार । देखिले अतिमनोहर । कां दर्पणीचा अपूर्व हार । देखिल्या सत्वर बुद्धि नोहे ॥ ५७ ॥ तैसें विश्व हें मिथ्या देखिलें । तेथें वासनेचे आधींच उपडलें । प्रवर्त्तलियाही बोलें । कोणें काळें प्रवर्त्तेना ॥ ५८ ॥ तैसें असत्य कळलियावरी । वासना न धरी तयावरी । मग आपआप दनुजारी । वासना पुरी भस्म होय ॥ ५९ ॥ हें दुसरें साधन गा रघुराया । सांगितलें वासनाक्षया । तिसरेंही चित्त देऊनियां । परिस तनया कौसल्येच्या ॥२६०॥ जऱ्ही विश्व असत्य देखिलें । तेणें वासनाढिबळ विरालें । परी शरीर असे साच भाविलें । त्यालागीं मेलें विषयांध ॥ ६१ ॥ जोंवरी हें शरीर साचाचि भासे । तंव उत्तम यासि पाहिजेत असे । त्या विषयांलागीं अनायासें । वासना प्रवेशे पदार्थजातीं ॥ ६२ ॥

---

१ हे कुबेराच्या बंधूच्या (रावणाच्या) शत्रो ! २ जसें नाहीं तसें (खोटें). ३ बोलतो. ४ किरणांस. ५ 'कांहीं' असा पाठ. ६ 'टवाळ' (लटकेपणा) असा पाठ.

त्यालागीं तिसरें साधन गा रघुपती । तेंही सांगेन तुजप्रति । शरीरनाश क्षणक्षणाप्रति । देखावा सुमती विवेकेंही ॥ ६३ ॥ जें हें शरीर दृश्य असे । तें तंव आपणा देखतांचि नाशे । पितादिपरंपरा कोठें असे। शरीर न भासे त्यांचें कांहीं ॥ ६४ ॥ तैसेंच आपुलेंही शरीर । नाशिवंत परिणामी थोर । बाळयुवादिकप्रकार । वृद्ध तरुण साचार तेंचि जालें ॥ ६५ ॥ ऐसा क्षणक्षणाप्रति नाश । देहाचा देखावा सावकाश । आत्मदृष्टी लक्षितां परेश । होय दास शरीरभावीं ॥ ६६ ॥ देह हें अध्यस्त स्वरूपीं असे । स्वरूपप्रकाशें शरीर न भासे । न भासतां नाशलेंचि दिसे। जाण ऐसें दितिजारी ॥ ६७ ॥ सर्वदा स्वरूपस्थिति असतां । शरीर न भासे जगन्नाथा । आणि शरीरनाश सर्वदा देखतां । नुधवितीं माथा वासना इया ॥ ६८ ॥ कां अतिवैराग्य तीव्रपणें । आणि आत्मानात्मविवेकें निपुणें । शरीरनाश सर्वदा देखणें । वासना तेणें भस्म होती ॥ ६९ ॥ एवं या साधनत्रयें करून । होय वासनाक्षय संपूर्ण । मागुता वासनांकुर कोठून। उगवेल जाण अनाथबंधो ॥ २७० ॥ अगा जेणें भावें जो असे । तयासि तैसेंच फळ होतसे । मूढेंही भावितां होय विशेषें । सज्ञानियासि काय अपूर्व ॥ ७१ ॥ मूढें देहचि होतु । जैसा भृंगकीटकाचा वृत्तांतु । दुःखें दुःखरूपाचि होतु। सुखीं सुखावतु सुखरूपें ॥७२॥ ब्रह्म भावितां ब्रह्मचि होये। संसार कल्पितां तेंचि आहे । यालागीं जें भावी तेंचि होये । नवल पाहें भावनेचें ॥७३॥ तेंचि आतां आयिकें रघुपति । सांगेन भावनेची ख्याति। तेणें तुज चमत्कार चित्तीं । होय सिद्धार्थी[1] सीताकांता ॥ ७४ ॥

दृढभावानुसंधानाद्विमूढा अपि राघव । विषं नयंत्यमृतताममृतं विषतामपि ॥ १० ॥

अगा भावशब्दें पदार्थ जाण । तें दृढभावें करितां अनुसंधान । मूर्खही पावे तदाकारपण । भावी तें पूर्ण तेंचि होये ॥ ७५ ॥ विषाचा ठाईं अमृताध्यासु । करितां तोचि होय शुद्धांशु । अमृतीं करितां विषाध्यासु । अमृतलेशु विषाचि होये ॥ ७६ ॥ कोण्ही एका भुजंगें दंशिलें । तयातें कृपेन अपरें वंचिलें । कैंच्या वृश्चिकें खादलें । मरणभय गेलें इतुकेनि निश्चित ॥ ७७ ॥ वृश्चिकाचेनि जीविताध्यासें । सर्पकृतभय गेलें कैसें। विषचि अमृत जालें आपैसें । मरणपिसें ढळे त्याचें ॥ ७८ ॥ तोचि येकु वृश्चिकें दंशिला प्राणी । तयासि सर्पभय लावी कोणी । तो सर्पाध्यासेंचि तत्क्षणीं । मरण जीवनीं पावतु ॥ ७९ ॥ वेताळभयाध्यास बाळकासी । नसता मृत्यु होये निश्चयेंसी । गेला ह्मणतां सुखाध्यासीं । जीवितासि पावत ॥ २८० ॥ जड कीटकीं भृंगी होत । हें दृढाध्यासाचें जाण सामर्थ्य । किंबहुना भावी जो जो अर्थ । पुरुष भावार्थ तैसाचि पावे ॥ ८१ ॥ अथवा विषरूप जें दुष्टकर्म । तेंचि उत्तम या ध्यासें करी अमृतोपम । कां अमृतासारिखा जो स्वाचारधर्म । तो विषम अध्यासें मानी ॥ ८२ ॥

---

१ वर करित नाहींत. २ 'सर्वार्थी' असा पाठ. ३ अमृताचा भ्रम. ४ 'ह्मणे भुजंग कैंचा वृश्चिकें खादलें' असा पाठ.

सत्यभावेन दृष्टोयं देहो देहो भवत्ययम् । दृष्टस्त्वसत्यभावेन व्योमतां याति देहकः ॥ ११ ॥

अगा प्रत्यक्ष पाहें रघुपती । सत्यत्वें भाविल्या देहमूर्ति । सत्याचि भासे ययाची व्यक्ति । अचळ कल्पांतीं चळेना ॥ ८३ ॥ देह भावितां देहचि होत । तो सर्वदा सत्यत्वेंचि स्फुरत । लोटल्याही कल्पांचा अंत । असत्यभूत कदा नव्हे ॥ ८४ ॥ अदेह जों कीं आत्मा जाण । तो देह भावितांची पावे देवपण । तोचि देखतां असत्यभावें करून । देह असून पूर्णत्व पावे ॥ ८५ ॥ तो देखतांचि असत्यबुद्धि । व्योमता पावे त्रिशुद्धी । असत्यपणें बाणें बुद्धी । नव्हे आधीसी तो हेतु ॥ ८६ ॥ तो सत्य भावितां सत्यचि जाला । असत्य भावितां नाहींच केला । रज्वादि सर्प भावितां स्फुरला । तोचि मोडला रज्जुदर्शी ॥ ८७ ॥ तोचि विचारें जैं सर्पु देखिजे । तऱ्ही तो असंतपणेंचि नाहीं सहजें । भयादि सर्वथा नुदैजे । सुखें असिजे सुखपणें ॥ ८८ ॥ हेंचि तुज दृष्टांतें सांगेन । तें एकाग्र आयिकें गा रघुनंदन । जेणें संदेह होऊनि भस्म पूर्ण । पाव खूण निश्चयाची ॥ ८९ ॥

सुखतल्पगतो येन स्वप्नदेहेन दिक्‌टात् । परिभ्रमासि हे राम संदेहस्ते क सांप्रतम् ॥ १२ ॥

अगा सुखरूप पर्यंक सुपतीवरी । निद्रा केलिया सुख शेजारीं । तोचि अन्यदेहीं स्वप्नाभीतरी । दिशा चाऱ्ही हिंडतु ॥ २९० ॥ तरी स्वयें तूंचि पाहें रघुराया । सुखसेजारीं निद्रा करूनियां । नसता अन्यदेह धरूनियां । स्वप्नव्याहाळिया[2] खेळसी ॥ ९१ ॥ तोचि जेणें स्वप्नदेहेंकरूनी । सुखसंपत्ति भोगिली स्वप्नीं । तोचि देह जागृतीसि कोदंडपाणी । जना नयनीं न दिसे ॥ ९२ ॥ अथवा सुषुप्तीसि ही भेटता । तरी तो साच मानिजेता । कोठेंही उपलब्धि पावतां । न दिसे ताता क्षणहीभरी ॥ ९३ ॥ तैसाचि देह मंगळमतीं । जागृतीसि भासे सत्यत्वें व्यक्ति । तोचि पाहतां स्वप्नसुषुप्तीं । येही अर्थी भासेना ॥ ९४ ॥ अगा जे कीं सत्य वस्तु असे । ते काळत्रयीं साचचि दिसे । जें कोण्हे काळें बाधलें नसे । तेंचि वसे सर्वदा ॥ ९५ ॥ देह तरी येकेचि काळें भासे । स्वप्नीं तो आनांचि आभासे । सषुप्तीसि तऱ्ही कांहींच नसे । तरी तें सत्य कैसें सांगपां ॥ ९६ ॥ जैसाचि स्वप्नदेह भ्रमें भासे । तो जागृतीसि कोठेंचि न दिसे । जागृतीसि तैसाचि देहही असे । परी भ्रंशे मिथ्यापणें ॥ ९७ ॥ हा अध्यस्त[4] असे स्वस्वरूपीं । ह्मणोनी आत्मत्वें भलताचि आरोपी । अविचारितां सिद्धि जीवस्वरूपीं । विचारें भ्रमरूपीं । असत्यचि हा ॥ ९८ ॥ अगा असत्येंसि असत्यपणें । देखतां काये होये उणें । असत्याचेनी नाहींपणें । हानि कोणें गुणें होये ॥ ९९ ॥ देह हा असत्यपणें देखतां । वासनामात्र नुपजती गा रघुनाथा । देहाचेनि नाशें जगनाशता । होय तत्वता रामचंद्रा ॥ ३०० ॥ अगा विश्व हें असत्य भासतां । स्वतःसिद्ध ब्रह्म ये हाता । स्वयेंचि बाणें पूर्णता । नलगे कथा

१ 'चि बोधे बोधीं' असा पाठ. २ स्वप्नरूप खेळांत. ३ निराळाच. ४ अध्यास—एका वस्तूवर दुसऱ्या वस्तूचा आरोप.

साधनाची ॥ १ ॥ अगा मुख्य स्वस्वरूपा आड । देहादिप्रपंचाचें पडलें कवाड । तेंचि नाहीं जालिया उघड । सुख उदंड सच्चिदानंद ॥ २ ॥ यालागीं श्रीरघुपती । देहबुद्धि खोटी हे सर्वार्थी । हे आहे तों स्वस्वरूपप्राप्ति । कदाकल्पांतीं घडेना ॥ ३ ॥ तयालागीं इतुकेंचि करावें । आह्मीं सांगों तें दृढ धरावें । धरिल्या इतकेंचि स्वभावें । स्वसुख आनंदें पावशील ॥ ४ ॥

देहोऽहमिति धीस्त्याज्या सर्वनाशेप्युपस्थिते । स्प्रष्टव्या सा न भव्येन श्वमांसेनेव पुल्कसी ॥ २ ॥

ह्मणोनि देह मीच ऐसी बुद्धि । आत्मयासि लागली क्षयव्याधी । ते सर्वथा त्यजावी गा त्रिशुद्धी । निरंतर आधि हे खोटी ॥ ५ ॥ अगा जिये देहात्मबुद्धीकरून । अनर्थकोटि अतिदारुण । होती तियेतें संग्रेहून । कार्य कोण रघुवर्या ॥ ६ ॥ अगा ब्रह्मकल्पांचिया कोटी । पडावें जन्ममृत्यूचिया वाटीं । ते देहबुद्धि सर्वथा खोटी । त्यजीं जगजेठी मुळींहुनी ॥ ७ ॥ नाहो देहबुद्धी सर्व संसार । देहबुद्धीनें होय सर्वसार । देहबुद्धीनें पुत्र वित्त गृह दार । सुखसंभार देहबुद्ध्या ॥ ८ ॥ देहबुद्धीनें जप तप अनुष्ठान । देहबुद्धीनें यज्ञदानादिसाधन । देहबुद्धीनें देव देवतार्चन । परलोकगमन देहबुद्ध्या ॥ ९ ॥ ते देहात्मबुद्धि टाकितां । इत्यादिक सर्व सर्वथा । तरी त्यजावी कसी जी अहंममता । सांग ताता कृपा करुनी ॥ ३१० ॥ तंव वसिष्ठ ह्मणती गा श्रीरघुपती । जऱ्ही सर्व नाशाची जाली उपस्थिति । तऱ्ही हे गा त्यजावी सर्वार्थी । नको सुमती थारा देवों ॥ ११ ॥ अगा निरातिशय लाभाकारणें । अल्प लाभु लागे टाकणें । इत्यादि लाभ नव्हती मूर्खपणें । व्यर्थ करणे काळक्षेपु ॥ १२ ॥ तो काळक्षेपु ऐसा जाण । स्वसुखा सांडोनियां संपूर्ण । बाह्यार्थी करी कर्माचरण । काळक्षेपण याचें नाम ॥ १३ ॥ यातेंही वासनाचि ह्मणिजती । येहीं होये पुनरावृत्ति । अज्ञानियांसि परम प्रीति । ज्ञानी मानिती अंतरायभूत ॥ १४ ॥ तेंही सांगों रघुनाथा । या वासनेचि समूळ कथा । येकी शुद्ध येकी मळिण ताता । तेचि आतां सांगेन ॥ १५ ॥ मळिण त्या संसारभावना । सर्वदा ज्या विघ्नवासना । विषयीं प्रीति रे रघुनंदना । मळिना वासना जाणाव्या ॥ १६ ॥ शुद्ध याही द्विप्रकार । सांगेन त्यांचा विचार । येकी मळिना येकी शुद्धतर । भेदांतर परियेसीं ॥ १७ ॥ संध्या स्नान देवतार्चन । जप तप यज्ञ अध्ययन । तीर्थाटण अतीथिपूजन । इच्छा पूर्ण करावया ॥ १८ ॥ इत्यादिकी त्या शुद्ध वासना । परी शुद्धामध्यें ही या मळिना । शुद्धतर ते रघुनंदना । जे विचारणा महावाक्याची ॥ १९ ॥ करावें वेदांतश्रवण । गुरुमुखें महावाक्य परिशीलन । समाधिसुखें सुख करून । अनीह पूर्ण बैसावें ॥ ३२० ॥ हे शुद्धतर वासना । लक्षण जाण गा रघुनंदना । स्वसुखें रहावें

---

१ दरवाजा; पडदा. २ संग्रहीं ठेवून. ३ 'व्यवहार' असा पाठ. ४ प्राप्ती. ५ पुनर्जन्म. ६ विघ्नरूप. ७ अतिशय शुद्ध. ८ निरिच्छ.

आनंदघना । सर्व वासना टाकूनियां ॥ २१ ॥ बृहद्वासिष्ठसंमति । सांगों आयिकें कल्याण-मूर्ती । तेचि धरूनियां चित्तीं । स्वरूपस्थिती असावें गा ॥ २२ ॥

संमतिश्लोक॥कालं यज्ञतपोदानतीर्थदेवार्चनभ्रमैः । चिरमाधिशतोपेताः शपयंति मृगा इव ।
तस्मोश्चैतां परित्यज्य दुर्दृष्टिं रघुनंदन । शुद्धां संविदमाश्रित्य वीतरागः स्थिरो भव ।

अगा मानसिक दुःखें अपरामित । तेणें आहळे ज्यांचें चित्त । हें यज्ञदानादि आचरत आपणा मानीत सदाचारी ॥ २३ ॥ जैसीं मृगें वनामाझारी । काळक्षेप करिती नाना-परी । तैसें हे इत्यादि धर्माचारी । करिती संसारी काळक्षेपु ॥ २४ ॥ येणें पुनरपि प्राप्त संसृति । परी अखंडैक आनंद नेणती । वृथाचि धर्मपरायणें श्लाघती । चत्री नेणती ब्रह्मानंदाची ॥ २५ ॥ तूं हे दुर्दृष्टि टाकूनि । निमग्न होयें ब्रह्मानंदस्थानीं । नलगे आचार सोसणी । सुखें सुखघणीं असावें ॥ २६ ॥

संमतिश्लोक ॥ यत्सुखं साधनाधीनं दुःखमेव तदुच्यते । अनन्यसाधनं तस्मात्स्वात्मस्थं परमं सुखम् ।

साध्यसुख तें सुखाभासता । परी तें सुख नव्हे गा सर्वथा । हें वासनाकृत्यचि गा रघुनाथा । निर्वासना ते दुर्लभ ॥ २७ ॥ हें सर्व देहबुद्धीस्तव घडे । देहबुद्धीनें संसार जोडे । सत्कर्मादिककोडें । होय धडफुडें देहबुद्ध्या ॥ २८ ॥ ह्मणोनि जऱ्ही सर्व नाशु जाला । तऱ्ही इयेचा त्यागु पाहिजे केला । मीच देह ह्मणतां घातु संचला । आपला केला आपणेंचि ॥ २९ ॥ ऐसें कल्प कोटि जऱ्ही जाती । तऱ्ही जन्ममरण न सरे संसृति । तितुकिया ही आत्महत्या होती । ऐसी निष्कृति कैंची रामा ॥ ३० ॥ असंख्य गोवधांचें वृजिनें । तैसेंच आत्महत्येचें दारुण । होय तयासि गा संपूर्ण । 'देहोहं' जाण बुद्धि जयाची ॥ ३१ ॥ यालागीं भव्य जो सज्ञान । तेणें देहात्मबुद्धि हे परम हीन । न पोसावी त्यजावी जाण । दृष्टांतें सांगेन परियेसीं ॥ ३२ ॥ श्वानाचेनि मांसें अत्या-दरें । पुल्कसी पोसिजे जैसी भ्रतारें । तैसी देहबुद्धि अहंकारें । वासनांतरें पुष्ट कीजे ॥ ३३ ॥ अगा चांडाळामध्यें नीच याति । तियेतें पुल्कसी ह्मणती । तियेतें श्वानमांस सडलें निरूपिती । काय जिवती तेणेंकरुनी ॥ ३४ ॥ पुल्कसी चांडाळी निर्दय सर्वार्थी । दर्शनें सचेल स्नान सर्वही करिती । तियेतें आलिंगूनी पाहियंती । कोणें अर्थी शुद्धता दडळ ॥ ३५ ॥ यालागीं देहात्मबुद्धि गा रघुनाथा । दुरी त्यजावी सर्वथा । इतुकेनि कार्यार्थ हाता । आला तत्वतां भरताग्रजा ॥ ३६ ॥ यालागीं देहबुद्धि सर्वथा खोटि । देहबुद्धीनें वासना लाठी । देहबुद्धीनें संसार लागे पाठीं । यातना मोठी देहबुद्ध्या ॥ ३७ ॥ देहबुद्धि ज्ञानाचें पिधान । देहबुद्धि मुख्य तेंचि अज्ञान । देहबुद्धीनें संसार दारुण । नरक पूर्ण देहबुद्ध्या ॥ ३८ ॥ देहबुद्धि स्वरूपाच्छादक । देहबुद्धि अज्ञानाची द्योतक ।

१ 'तस्मादेतां' असा पाठ. २ 'पाप' असा पाठ. ३ जलद. ४ पाप. ५ मी देह आहें. ६ नागीण. ७ 'सडलेंन पोशती' असा पाठ. ८ झांकण.

देहबुद्धि तोचि नरक । तुच्छ देख देहेबुद्धि ॥ ३९ ॥ किंबहुना गा धनुर्धरा । देहबुद्धीनें संसारपरंपरा । देहबुद्धि हिंडवी योनिद्वारा । अनर्थपसारा देहबुद्धि ॥ ३४० ॥ ह्मणोनि देहबुद्धि हे विबुधपती । सर्वथा टाकावी गा सर्वार्थी । देहबुद्धित्यागें सुखसंपत्ति । सीतापती पाविजे ॥ ४१ ॥ तंव राम ह्मणती जी श्रीगुरुराया । देहात्मबुद्धीतें टाकूनियां । मग काय करावें जी बैसोनियां । सांगावें स्वामिया कृपानिधी ॥ ४२ ॥ तंव वसिष्ठ ह्मणती आनंदमूर्ती । सांगेन कर्तव्य तें तुजप्रति । देहबुद्धिवियोगें सुमती । जिये स्थिती असावें ॥४३॥

ब्रह्मैकं भावयन्साधुः शांतस्तिष्ठेद्गतव्यथः । ततस्तेऽसावहंभावः स्वयमेव विनश्यति ॥ १४ ॥

तरी आइकें रघुकुळटिळका । सांगेन कर्तव्यतेचा उपाय निका । तरी येक ब्रह्मभावनेंचि देखा । नेणे आणिकां प्रपंचासि ॥ ४४ ॥ अगा शास्त्रदृष्टीकरून । कळलें प्रपंचाचें मिथ्यापण । सर्वत्र येक ब्रह्म पूर्ण । तेचि खूण जाणावी ॥ ४५ ॥ तेणें सर्वदा सर्वत्र ब्रह्म येक । हेचि भावना करावी देख । न व्हावें कदा प्रपंचोन्मुख । अनेकीं[2] येक परब्रह्म ॥४६॥ आणि भावनाशब्दें तद्रूपता । साधावी गा श्रीरघुनाथा । सर्वब्रह्मभावेंचि तत्वतां । सीताकांता असावें गा ॥ ४७ ॥ ऐसी निरंतर करावी ब्रह्मभावना । तेणें कामक्रोध नाशती तत्क्षणा । बुद्धीसि शांति उपजे सहस्रगुणा । विपरीत भावना नाशती ॥ ४८ ॥ देहादिप्रपंचाचें सत्यत्वभान । नव्हे तेंचि शांतीचें लक्षण । ब्रह्मदृष्टि प्रपंचाचें अभान । न देखे स्वप्न विश्वभ्रमाचें ॥ ४९ ॥ आणि जेव्हांचि प्रपंचभान गेलें । कामक्रोधही मावळले । तेव्हांचि सकळ वृथा उवडलें[3] । दुःखादि गेले भोग त्याचे ३५० ॥ अगा प्रपंचाचें भान नसतां । मग सुखदुःखाचि केंची व्यथा । ह्मणोनि गतव्यथ[4] तो सर्वथा । नाहीं तत्वतां व्यथालेशु ॥ ५१ ॥ रागद्वेष जेथ मावळले । जगाचें सत्यत्व जेथें गेलें । तेथें सुखदुःखव्यथा कोणें बोलें । बाधित जालें सर्व जन ॥ ५२ ॥ अधिभूत आधिदैव आध्यात्मिक । त्रिविध जाण हें सुखदुःख । तेंही सांगोंपां सम्यक । येकाग्र आयिक रघुनाथा ॥ ५३ ॥ तरी भूतांपासूनि जें उपजे । तेंचि आधिभूत दुःख जाणिजे । देवीं जो जो उपद्रव कीजे । अधिदैवत सहजे त्याचें नाम ॥ ५४ ॥ देहीं ज्वरादिक उपद्रवमेळा । आध्यात्मिकदुःखगा वेल्हाळा । हा त्रिविधदुःखाचा येकवळा । नव्हे कोण्हे काळा तयासी ॥ ५५ ॥ कां जें जेहीं सुखदुःख द्यावें । अथवा जेणेंकरूनि भोगावें । तें बाधित जालें आघवें । दुःख मानावें कोणकोणाचें ॥ ५६ ॥ यालागीं तो गतव्यथ जाला । तेथें अहंभाव स्वयेंचि नाशला । सर्वब्रह्मभावेंचि बाणला । अहंभाव गेला गळोनी ॥ ५७ ॥ जया सर्वत्र ब्रह्मभावचि होये । त्याचा अहंकार समूळ जाये । सूर्यासवेंचि मावळताहे । प्रकाशु पाहें क्षणमात्रें ॥ ५८ ॥ जेव्हां देहानुसंधान[5] ब्रह्मभावें । तुटोनि गेलें पैं आघवें । तेव्हांचि अहंभाव न समावे । स्वयेंचि पावे नाश समुळीं ॥ ५९ ॥

---

१ खरा. २ 'अनेका' असा पाठ. ३ नाहींसें झालें. ४ दुःखरहित. ५ देहासंबंधाची कल्पना.

॥ सर्वत्रैक्यावबोधेन स्वस्थांत:शीतल: सदा । निरहंकृतिराकाशो विशदस्तेन संस्थित: ॥ १५ ॥

ऐसा सर्वत्रैक्यावबोधेंकरुनी । सर्वदा अंतरीं शीतळ मनीं । स्वस्वरूपें स्थिरावोनी । राहे निर्वाणीं ब्रह्मसुखें ॥ ३६० ॥ तेणेंचि सुखें अंतरीं शीतळ । नेणें द्वैत सुखाचि तळमळ । बोधलियाचें सार्थक फळ । जो कीं प्रांजळ ऐक्यावबोधु ॥ ६१ ॥ देहादि जें कां प्रपंचजात । हें जयाचें ठाईं सर्व अध्यस्त । तें तेंचि जाणावें समस्त । नाहीं व्यतिरिक्त तयाविण ॥ ६२ ॥ अगा ज्याचे ठाईं असे अध्यस्त । तें तें जाणावें इत्थंभत । जैसें कां आपुले ठायीं स्वप्न भासत । नव्हे व्यतिरिक्त आपलेंसे ॥ ६३ ॥ आपणेंविण तऱ्हीं न भासे । प्रबोधलियां कोठेंचि न दिसे । तऱ्ही सर्वही आपणचि असे । दुजें नसे । तें ऐक्य जाण ॥ ६४ ॥ शुक्तीचा ठाईं रजत भासे । रजत तें शुक्तीकाचि असे । परस्परें भेदु न दिसे । ऐक्य तैसें जाणावें ॥ ६५ ॥ तैसें आपणासहित ब्रह्मेसीं । ऐक्य बोधलें गा जयासी । न विस्फुरे भेदु तयासि । ऐक्यता ऐसी रघुपुंगवा ॥ ६६ ॥ रज्जुचि स्वयें व्यालरूपें जाली । परी रज्जु ते रज्जुचि भली । सर्पबुद्धि वाव जाली । ऐक्यीं बोली तेचि असे ॥ ६७ ॥ ऐसा ऐक्यबोधें जो बोधला । तोचि अंतर शीतळ भला । निरहंकृती आतला । कूटस्थ संचला आकाश जैसें ॥ ६८ ॥ तोचि तो ऐक्यावबोध जाण । जेणें जाला होय परिपूर्ण । जैसें कूटस्थ निरीहं गगन । तैसा पूर्ण पूर्णत्वें ॥ ६९ ॥ तया सर्व ब्रह्म येकाचि जालें । दुसरे न भासे कांहीं केलें । स्वयें ब्रह्म ह्मणोनि आतळलें । ब्रह्म संचलें तया येकें ॥ ३७० ॥ स्वयें ब्रह्म तोचि विश्वमूर्ती । आनंद जाला तया त्रिजगतीं । द्वैत देखे त्या द्वैत दुःखस्थिति । आपणा देखती सुख दुःखरूप ॥ ७१ ॥ अगा जो जैसा अंतरीं असे । तैसेंचि तथा बाह्यही भासे । हें निश्चित जाणावें रघुवंशें । सावकाशें सांगेन ॥ ७२ ॥

अंत:शीतलतां यादि लब्धायां शीतलं जगत् । अंतस्तृष्णोपतप्तानां दावदाहमयं जगत् ॥ १६ ॥

अगा ऐक्यावबोधेंकरून । शीतल अंतर जयाचें जाण । तया जग शीतल परिपूर्ण । ब्रह्मत्वें जाण सुखरूप ॥ ७३ ॥ सकळ वासनांचे उपरमें । अंतरीं कोंदलें परब्रह्में । तया सकळ ब्रह्मचि संभ्रमें । गेलेनि भ्रमें ऐसें होये ॥ ७४ ॥ आणि अंतरीं तृष्णाग्नीकरुनी । तापला जैसा वडवाग्नी । तया दावदाहरूप जगनयनीं । त्रिकाळक्षणीं भासत ॥ ७५ ॥ यालागीं सर्व संसार रघुनाथा । असे जाण वासनेच्या माथां । वासनाक्षयीं जीवन्मुक्तता । बाणे तत्वतां जाण तूं ॥ ७६ ॥ येथें संपलें हें प्रकरण । ते कीं बोलिलें वासनोपशमन । तयाचें यथामती टिपण । केलें दीपन सद्गुरुकृप ॥ ७७ ॥ सद्गुरूचिया कृपादृष्टी । निजानंदें रंगनि बोलिली हे गोठी । जेणें होती संतसंतुष्टि । स्वानंदपुष्टि पातलों ॥ ७८

---

१ सर्वत्र हा एकच आहे अशा बोधानें. २ आरोपित. ३ ज्ञान झाल्यास. ४ सर्पासारखी. ५ इच्छारहित ६ 'ब्रह्मही असा पाठ. ७' रंगनाथें बोलिली हे ब्रह्मगोष्टी ' असा पाठ.

सद्गुरुचरणकमलयुगुळ । निजानंदें रंगूनि अलिकुल । पुढील प्रकरण अतिरसाळ । श्रोतीं सकळ परिसिजे ॥ ३७९ ॥ श्रीगुरुचा रंगनाथू । श्रोतां विनवीत विनीतस्थितु । पुढें आत्मोपास्ति विख्यातु । प्रकरण असे ॥ ३८० ॥ ते कथा असे अतिरम्य । श्रोतां ऐकिजे अनुपम्य । वसिष्ठराघवसंवाद गहन । अद्वैत आनंद जो ॥ ३८१ ॥

इति श्रीयोगवासिष्ठसारे श्रीवसिष्ठरामसंवादे वासनोपशमप्रकरणं चतुर्थं संपूर्णम्

॥ श्रीः ॥

प्रकरण ५ वें.

आत्ममननप्रकरण.

॥ श्रीगणेशायनमः ॥ जय जय श्रीसद्गुरुमूर्ति । तूं अव्यक्ताचि आलासि व्यक्ती । तूंचि कृपाळू त्रिजगतीं । माझी भ्रांति फेडावया ॥ १ ॥ तुझिया चरणदर्शनें । उठिलें अविद्येचें धरणें । परमानंद सर्वदा भोगणें । तो बोलावा कोणें स्वसंवेद्य ॥ २ ॥ तो तूं सच्चिदानंदमूर्ति । सन्मुख जालासि सदयस्थिती । स्वस्वरूप वर्णावया भारती । ग्रंथव्यक्ति वदविली ॥ ३ ॥ नातरी कोण्ही ऐसें ह्मणती । प्रथमारंभीं मंगलमूर्ति । वंदावा मंगलार्थ गणपति । ग्रंथसमाप्ति अविघ्न तेणें ॥ ४ ॥ त्या नंतरें वाग्देवता । जे कीं बोलिजे जगन्माता । कार्यसिद्धि तियेसी वंदितां । परंपरा ऐसी असे ॥ ५ ॥ ह्मणोनि प्रथम मंगलाचरणीं । वंदावी हे विघ्नेशभवानी । हें यथार्थाचि परी माझ्या मनीं । अनुदिनीं आनचि असे ॥ ६ ॥ पाहतां गणेशाची मूर्ति । सर्वस्वें तूंचि येताहेसि व्यक्ति । तैसी शारदा मंगळमूर्ति । तूंचि सर्वार्थी भाससी ॥ ७ ॥ तुजव्यतिरिक्त देवतांतर । न भासे हें आश्चर्य थोर । तूंचि तूं सर्वत्र निरंतर । भेदांतर तेथ कैंचे ॥ ८ ॥ हे सद्युक्ति वाचाबळें । जरी मी उपचारपणें बोलें । यदर्थीं देवा तुझींच पाउलें । जिव्हा गळे जरी उच्चार करीं ॥ ९ ॥ यालागीं सर्वदा सर्वत्र पाहें । तंव अंतर्बाह्य तूंचि तूं आहे । तुजविण ना देख त्रलोक्य हें । साच पाहें कोठेंही ॥ १० ॥ स्वामी मृगजळाचियेपरी । विश्वाभासु होये मृगजललहरि । ब्रह्मादि मुख्य सुरवरीं । तरंग लहरि होईजे ॥ ११ ॥ साचपणें तूंचि येक । सर्व तुजवांचोनि अवलोक । येकपणें तूंचि अनेक । येकायेक न भासे मज ॥ १२ ॥ अवस्थात्रयीं सर्वदा । तूंचि भोगिजसी परमानंदा । भोग भोगणें या आस्वादा । टाकोनि

१ 'वरी भ्रमे गनाथ अलिउळ' असा पाठ. २ 'स्वसंवेद्य' (आपणच जावयास योग्य) असा पाठ. ३ सरस्वती. ४ गोडीला.

मर्यादा अमर्याद तूं ॥ १३ ॥ भोक्ता भोग्य भोगणें । या तिहींचें जेथें विसावणें । तें तूंचि सच्चिदानंदपणें । सर्वदा भोगणें मिथ्या स्वामी ॥ १४ ॥ तेथें दुजयाची कैंची मातु । दुजें बांधूनि तूंचि भासतु । तुजविण न पुरे उसंतु । सर्वत्र तूंचि तूं मजलागीं ॥ १५ ॥ दुजेपणें जें दृश्यजात । भासतां तत्काळ बाधित । भेटि वास्तवरूपा निश्चित । होय निभ्रांत तुजसींचि ॥ १६ ॥ सत्कार्मादिधर्म आचरितां । जपयज्ञदानतपतीर्थव्रतां । संध्यास्नानादिकर्म करितां । तूंचि सर्वथा भाससी ॥ १७ ॥ आणिकही धर्म मानती चित्ता । अर्चा पूजा भावादिदेवता । अथवा अश्वत्थादि स्थावरांता । गोस्पर्शता इत्यादि ॥ १८ ॥ तेथें तुजवांचोनिया दुसरें । मज न भासे गा निर्धारें । तुझेया स्वरूपाचेनि विसरें । होय पुरें ह्मणोनि वेसें ॥ १९ ॥ तंव तो विसरुनि उफराटा । स्मारकुचि होये मोठा । हें लाघव भोगितां ब्रह्मनिष्ठा । दृश्यवाटा मोडती ॥ २० ॥ किंबहुना माझें मीपण । भासतांही देहभान । मिथ्यत्वें प्रतीयमान । फावे पूर्ण सत्यत्वें तूंचि ॥ २१ ॥ ऐसें काय नेणों मज केलें । तुवांचि ये दशेसि आणिलें । पाहों वैसें तों आंतलें । तुवां कोंदलें ब्रह्मांड हें ॥ २२ ॥ ऐसे सकळ इंद्रियाचे व्यापार । श्रवणदर्शनादि व्यवहार । करणें ग्राह्य पदार्थप्रकार । तूंचि सर्वत्र भाससी ॥ २३ ॥ ऐसियासि मी काय करूं । न भासे आणीक प्रकारु । तूंचि येक सर्वेश्वरु । बाह्य अंतर व्यापिसी ॥ २४ ॥ यालागीं दुसरें देवतांतर । न भासे सर्वथा साचार । आणि मनोवृत्ति तदाकार । नानाकार नव्हेती ॥ २५ ॥ मन लांचावलें तुझिया पाईं । आणीक गोडी नेणे कांहीं । ह्मणोनि तूंचि वंदनीं पाहीं । मंगळार्थ कांहीं प्रवर्त्ते ॥ २६ ॥ इतरां देवांचे स्वरूपीं । बळेंचि मनातें आरोपीं । पाहे तों केधवां तुझा स्वरूपीं । आपणा निक्षेपीं लांचावलेनी ॥ २७ ॥ यालागीं जो जो चिंतीं उपावो । तो तुझ्याचि स्वरूपीं करी सद्भावो । ह्मणोनि सकळ इंद्रियीं निर्वाहो । केला ठावो विश्रांतीसि ॥ २८ ॥ मनें जें जें चिंतितु जाये । तें तूंचि येक वास्तव आहे । चक्षुरिंद्रियें जें जें पाहे । तें देखतु जाये तुज येकांतें ॥ २९ ॥ तुजाचि घेऊनियां उठिती । ऐसेया सर्वेंद्रियांच्या वृत्ति । तुजवांचूनि नाहीं प्रवृत्ति । कोण्हे अर्थीं अगाधरूपा ॥ ३० ॥ तुजचिपासाव इंद्रियप्रवृत्ति । तुजचि आलिंगूनि उठिती । तुजवेगळी अकिंचित् गति । सर्वही अर्थीं सर्वांची ॥ ३१ ॥ आणि अर्थु ऐसा शास्त्रसिद्धांतीं । आत्मानालिंगनीं इंद्रियप्रवृत्ति । न करिती पदार्थीं प्रवृत्ति । महामती सांगेन ॥ ३२ ॥ वदथीं श्रीरामा सुरेश्वर । आचार्यांमाजी आचार्य थोर । बोलिला तो अर्थविचार । असे साचार ऐसाचि ॥ ३३ ॥

संमति श्लोक वार्तिक । प्रत्यगर्थमनालिंग्य न पराग्वर्ति कीं च न । विज्ञानं जायते यस्मादात्मोपास्तिः सदा ततः

---

१ गाईला स्पर्श करणें वगैरे. २ भासणारें. ३ लुब्ध झालें. ४ केवळ डोळ्यांनींच. ५ सर्व इंद्रियांचे व्यवहार ६ आत्मज्ञान न झाल्यास.

इंद्रियांच्या ज्या ज्या वृत्ती । त्या त्या स्वरूपापासाव उठती । आत्मयाविण जडस्थिति । कांहींच न चलती करणें हें ।। ३४ जें जें होय पदार्थी स्फुरण । ते स्फूर्ति उठे आत्मयातें आलिंगून । कोण्हीच अर्थ न घडे त्यावांचून । ह्मणोन भजन सर्वदा घडे ।। ३५ ।। आत्मयाचिपासाव विज्ञान होये । ह्मणोनि आत्मोपास्ति सदा आहे । परी नेणोनियां येर्‍ह्वें हें ।। अज्ञानी वायें धांडिती ।। ३६ ।। तैसें नव्हे स्वामी तुझेनि बोलें । स्मृतिरूपची मज तुवां केलें । तेथें तूतें विसरें कोणा बोलें । येर तें न कळे तुजविण ।। ३७ आतां श्लोकाचा प्रगटार्थ । सांगेन जैसा असे यथार्थ । प्रत्यक्शब्दाचा फलितार्थ । इत्थंभत असे ऐसा ।। ३८ ।। देहेंद्रियेंसी विलक्षण । देहेंद्रियांच्या निरासे जाण । स्वयें प्रकाशे प्रकाशमान । प्रत्यक् पूर्ण तेंचि होये ।। ३९ ।। तयांतोंचि नव्हे स्फुर्ति । तयाहूनि स्थिति तें स्थिति । ऐसी जे वस्तूची प्राप्ति । ते या जगाप्रति दुर्लभ ।। ४० ।। आधीं ब्रह्माकारवृत्ति होये । बाह्यपदार्थ कवटाळित जाये । प्रथम ब्रह्मस्फुरण उठणें आहे । उपास्ति होये तेचि वरिष्ठा ।। ४१ ।। ह्मणोनि बाह्यसेवा ते गौण । मुख्य सेवा तें आत्मानुसंधान । ते होतसे वृत्त्युत्पत्तीन । हेचि खूण ज्ञातयां ।। ४५ ।। ह्मणोनि संकल्पइंद्रियवृत्ति । आणि इंद्रियें जे जे पदार्थ घेती । ते ते जाण तुझी उपास्ति । आनंदमूर्ती श्रीगुरूराया ।। ४६ ।। माझीं सकळ इंद्रियें जाण । न स्पर्शती तुजवांचन । यालागीं तूंची तूं सेव्य पूर्ण । नाहीं आन गुरुवर्या ।। ४४ ।। जैसें पतिव्रतेचें अंतर । कहींच नेणे पुरुषांतर । स्वपतीविण इंद्रिय व्यापार । कोण्ही प्रकार न निपजे ।। ४५ ।। तैसीं लाजावोनि इंद्रियें माझीं । उपास्ति कारिती सर्वदा तुझी । अन्य स्पर्शतां व्यभिचारवोझीं । बुडे समाजीं वृजिनांच्या ।। ४६ ।। आणीकही येक कारण । देवतांतरें बाह्याचे जाण । तें करिती विघ्नादिविदारण । परी प्रेरण अंतरीं न करवे ।। ४७ ।। जो कीं साक्षी सर्वांतर । तोचि तो बुद्धीचा प्रेरणार ।। तयावेगळा बाह्यप्रकार । होय नश्वर दृश्यपणें ।। ४८ ।। यालागीं आधीं बुद्धीसि प्रेरिता । होय तरीच स्फुरणकरितां । कवित्व नसतां निर्विघ्नता । वरी तत्वतां कोणाची ।। ४९ ।। मुख्य मुळीं कवित्व स्फुरावें । तरी गणेशें निर्विघ्न करावें । तें नसतां कांहीं न संभवे । ह्मणोनि बोलावें पडिलें हें ।। ५० ।। ह्मणोनि साक्षी तं सर्वांतर । धिषणाप्रेरकु निर्विकार । यालागीं तुज निरंतर । वंदीं साचार सर्वी तूंचि ।। ५१ ।। वेदांत वदविता सद्गुरुराया । तूंचि येकु सर्व स्वामिया । ह्मणोनि ग्रंथारंभीं मियां । वंदन पायां तुझ्याचि केलें ।। ५२ ।। आणि बाह्यही निर्विघ्नकर्ता । गणेशशारदारूप धरिता । ह्मणोनि उभयरूप तूंचि तत्वतां । येकु अनंता अनेक होसी ।। ५३ ।। ह्मणोनि तोचि तूं गणाधिपति । शारदारूपेंही त्रिजगतीं । निर्विघ्नकर्ता मंगळमूर्ति । तूंचि तूं सर्वार्थी वंद्य मज ।। ५४ ।।

---

१ आत्मस्वरूपाचे मनन. २ ' तयातें नालिंगूनि इंद्रियवृत्ति । सर्वदा विषयाकार नव्हती । विषयज्ञानाची नव्हे स्फूर्ति । तयावीण स्थिति नव्हे तेही ।। ४० ।। ' अशी सर्व ओवी वेगळी आहे. ३ पापाच्या.

यालागीं सर्वदा सर्व कार्यांतरीं । तुजाचि वंदीं मी सर्वांपरीं । माझे अंतर्बाह्य श्रीहरी । पूर्ण करीं पूर्णत्वें ॥ ५५ ॥ यालागीं मी तुजवेगळें । नेणे वस्तुता निराळें । तुझेनि पूर्णानंद-कल्लोळें । जाकळिला न कळे आन कांहीं ॥ ५६ ॥ ऐसें बोलतांचि प्रेमेंकरीं । प्रकटला सद्गुरु अंतरीं । ह्मणे ग्रंथ वदें झडकरी । ते आज्ञा शिरीं वंदिली मियां ॥ ५७ ॥ तो घेऊनियां महाप्रसाद जाण । आतां ग्रंथ बोलेन । जें कां नित्य अगाध ज्ञान । ऋषिसिद्ध बोलिले ॥ ५८ ॥ तेंचि कारणानुसंधान । अर्थ बोलिजेत अतिगहन । पूर्वीं जालिया वासनोपशमन । तेंही कारण ऐसें असे ॥ ५९ ॥ सद्गुरुदर्शन जालियावरी । गुरु महावाक्य उपदेश करी । तेणेंचि साक्षात्कार जाला जरी । सिद्धि तरी सावली ॥ ६० ॥ जरी चित्तमालिन्यें असंभावना । आणि उठति विपरीतभावना । तरी करावें श्रवणमनना । निदिध्यासना निरंतर ॥ ६१ ॥ अगा मनावासनेकरितां । असंभावना उठती अनंता । ययालागीं वासनेसिं चित्ता । नाशु सर्वथा करावा ॥ ६२ ॥ तो नाशु करितां मनावासनेसी । सर्वथा नव्हे अतिप्रयासीं । वेदां गुरुचां ठांई तयासी । असे मानसीं अविश्वासु ॥ ६३ ॥ वेदें गुरूनें जें उपदेशिलें । विश्व मिथ्या ब्रह्म सत्य जें बोलिलें । तेंचि तुझें स्वरूप असे संचलें । मनी बोलें तयांचेनी ॥ ६४ ॥ पूर्वाभ्यासेंकरुनी । आपण संसारीं जीव मानी । विश्व सत्यत्वें देखे नयनीं । हेचि करणी मनावासनेची ॥ ६५ ॥ त्या मनावासनेची शांति । करितां नव्हे साधनसंपत्ती । येकें श्रवणेंवांचूनि त्रिजगतीं । न देखिजेती कोठेंही ॥ ६६ ॥ श्रवणावेगळाही अभ्यासु करिती । मनावासनेतें कोंडिती । परी ते साधनेंचि क्लेशी होती । नव्हे प्राप्ति साधनाची त्यां ॥ ६७ ॥ सर्वही शास्त्रांचें तात्पर्य । येका ब्रह्माचां ठाईं अन्वय । वेदगुरु प्रमाणें आणि मिथ्यामय । जग सर्व श्रवणें माने ॥ ६८ ॥ श्रवणें ब्रह्मरूपनिर्धार । वेदवाक्यचि प्रमाण थोर । विश्व असत्य मृगांभपूर । माने साचार इत्थंभूत ॥ ६९ ॥ अगा प्रपंच मिथ्या तरी बाणला । तोचि मनाचा नाशु संचला । मिथ्याभूतासि कोणाला । वासनामेळा उपजले ॥ ७० ॥ यालागीं येक श्रवणेंकरुनी । मनोनाश वासनाक्षय भरंवसेनी । होती निश्चयें ह्मणोनी । श्रवण अनुदिनीं करावें ॥ ७१ ॥ श्रीरामा तोचि उपाय श्रवणाचा । मागां निवेदिला साचा । मनोनाशवासनाक्षयाचा । उपाय याचा जो बोलिला ॥ ७२ ॥ मनोनाशवासना-क्षयप्रकरणीं । श्रवण सुचिलें अनुदिनीं । गुरुवाक्यें विस्वासुनी । 'ब्रह्मोस्मि'[1] ब्रह्मपणीं नित्य असें ॥ ७३ ॥ गुरुवाक्य आणि शास्त्रप्रतीति । श्रवणें दोन्ही सिद्धी पावती । तेंचि निरूपिलें पूर्वग्रंथीं । वासनोपशांति मनोनाशें ॥ ७४ ॥ वेदांतश्रवणें ऐसें होये । प्रमाणा-संभावना[2] तात्काळ जाये । वेदें आणि गुरुप्रामाण्य निश्चयें । विश्वासें पैं हें होय तेथें ॥ ७५ ॥ तया वेदवाक्याचा ठाईं । दृढ विश्वासु बाणे अनपायी[3] । तेणें शास्त्रान्वय जो

१ मी ब्रह्म आहें. २ प्रमाणांविषयीं विपरीत कल्पना. ३ नाश न होणारा.

ब्रह्मीं पाहीं । होय निश्चयी बुद्धि तेथें ॥ ७६ ॥ तेणें सर्वब्रह्म ऐसें कळलें । प्रपंच मिथ्याभूत प्रत्यया आलें । तरी तें शास्त्राचार्यांच्या बोलें । परी अनुभविलें नाहीं स्वयें ॥ ७७ ॥ शास्त्राचार्यविश्वासु जाला । तेणेंचि प्रपंच मिथ्या मानिला । आपण ब्रह्म हा विश्वासु केला । परी स्वप्रतीतीला नयेचि ॥ ७८ ॥ तेंचि आत्मप्रतीतीसि पाहिजे आलें । आणि आपण ब्रह्म ऐसें जें गुरूनें बोलिलें । तें मानिलें तेथें उपजलें । संशय भले प्रमेयासी ॥ ७९ ॥ तेचि प्रमेयासंभावना । मीच ब्रह्म कैसें हा संदेह जाणा । उपजला त्यालागीं साधना । आत्ममनना प्रवर्त्तला ॥ ८० ॥ आपणाचि ब्रह्म ऐसें व्यक्ति । आपणासि आलें पाहिजे प्रतीती । त्यालागीं आत्ममननाची प्रवृत्ति । जाली वदती वसिष्ठवाणी ॥ ८१ ॥ युक्तिकरुनि जें अनुचिंतन । आत्मयाचें करणें जाण । त्याचेंचि नाम आत्ममनन । केलिया पूर्ण प्रतीतीसि ये ॥ ८२ ॥ तिया शास्त्रयुक्तीकरून । निश्चय कीजे मी ब्रह्म ह्मणऊन । तयाचें नाम आत्ममनन । वसिष्ठ आपण सांगती ॥ ८३ ॥ तेंचि तें आत्ममननप्रकरण । प्रवर्त्तलें येथ संपूर्ण । तेंचि ऐका श्रोतेजन । येकाग्रमन करूनियां ॥ ८४ ॥ आतां येणें प्रकरणेंकरून । निरूपिजेल आत्ममनन । तयापुढें निदिध्यासन । अनुक्रमें पूर्ण निरूपिजेल ॥ ८५ ॥ एवंभूत आत्मा आपण । ऐसें अनुभवासि येतसे पूर्ण । तया नाम आत्ममनन । तेंचि निरूपण येथें कीजेल ॥ ८६ ॥ अहो आत्मानुभवा आड । असे मनाचें तें कवाड । तें श्रवणें केलिया उघड । अनुभव अखंड मानतु ॥ ८७ ॥ परी दृढ निश्चय युक्तीकरून । जाला पाहिजे गा संपूर्ण । यालागीं करावें आत्ममनन । तेंचि निरूपण परियेसा ॥ ८८ ॥ युक्तीकरूनियां निर्धारीं । निश्चय कैसा होय अंतरीं । प्रमेयासंभावना जाय दुरी । निश्चय अंतरीं ऐसा होये ॥ ८९ ॥ तेंचि वसिष्ठ श्रीरामाप्रति । आत्ममनन अनुवादती । तेचि आयिका श्लोकसंगति । कृपा संतीं करोनि ॥ ९० ॥

॥ शुद्धो निरंजनोऽनंतो बोधोहं प्रकृतेः परः । चेष्टमानमिमं देहं पश्याम्यन्यशरीरवत् ॥ १ ॥

जो पूर्वीं मनावासनेकरितां । मी देहचि ऐसें ह्मणत होता । तोचि मनोनाशें उद्धोधतां । आत्मा तत्वतां ऐसाचि बोधु ॥ ९१ ॥ अगा नानायुक्तींकरून । नित्य करितां आत्मानुचिंतन । तेणें बाणे मीची आत्मा पूर्ण । ब्रह्म निर्वाण स्वयंवेद्य ॥ ९२ ॥ ह्मणोनि ज्ञानस्वरूप स्वयंवेद्य । नित्य ज्ञानेंकरूनि अगाध । स्वप्रकाश शुद्धबुद्ध । नित्यानंद गुणातीत ९३ ॥ शुद्धशब्दें स्वप्रकाश । सर्वथा नव्हे परप्रकाश । परप्रकाशा होय नाश । मी अविनाश शुद्धपणें ॥ ९४ ॥ तैसा मी जाण निजबोध । स्वप्रकाश अगाध । सर्वप्रकाशकु नित्य शुद्ध । निर्विवाद अखंड ॥ ९५ ॥ सूर्य हा प्रकाशवंत असे । परी अभ्रादिउपाधि तेथें वसे । तैसा नव्हे मी निरूपाधि असें । जाण सर्वांशें सर्वांपरी ॥ ९६ ॥ यालागीं मी निरंजन । अंजनशब्दें उपाधि जाण । तैसेंचि जनरहित करितां

---

१ स्पष्टपणें. २ सुरु झालें ३ ही ओवी कांहीं प्रतींत पुढील ओवी नंतर आहे. ४ उमजतेपणा.

व्याख्यान । निरुपाधि पूर्ण घडतसे ॥ ९७ ॥ जनशब्दें प्रपंचजात । जें जें कीं इंद्रियें-गृहीत । किंबहुना दृश्यजात । दृष्टश्रुतार्थ सर्वही ॥ ९८ ॥ तें निःशेष जेथें नसे । तया निरंजन बोलिजेत असे । तो मी निरूपाधिक सर्वांशें । सावकाशें जाणवें ॥ ९९ निरु-पाधिक जऱ्ही जालें । तऱ्ही परिच्छेद असेल पावलें । ह्मणोनि अनंतपद घेतलें । तेंचि भलें परियसा ॥ १०० ॥ अनंतशब्दें नाश त्रिविध । नाहीं तया सर्वथा बाध । तेंचि अनंतशब्दें नाश अगाध । नित्य सिद्ध ब्रह्म मी ॥ १ ॥ तोचि त्रिविधपरिच्छेद कैसा । सांगो आयिक बोधे तैसा । काळदेशवस्तूचा ऐसा । हाचि ठसा सर्वत्र ॥ २ ॥ त्रिविध-परिच्छेदा विरहित । तुर्य परिच्छेद नाहीं निश्चित । तऱ्ही छेदत्रय नाहीं निभ्रांत । अबा-धित स्वरूप माझें ॥ ३ ॥ ते[4] परिच्छेद कोण कोण । तें हीं आतां सांगेन । येकु काळ-परीच्छेद जाण । वर्ते पूर्ण घटाटोदकीं ॥ ४ ॥ घट तो येके काळें असे । सवेंचि दुसरे काळें विनाशे । घट तो सर्वथा सत्य नसे । काळें भ्रंशे ह्मणोनियां ॥ ५ ॥ जें जें देशकाळवस्तू-करून । परिच्छेद वस्तु पावे जाण । तें तें नश्वर असे पूर्ण । जाण खूण रघुनाथा ॥ ६ ॥ आतां देशपरिच्छेद तो सांगतसें । नैय्यायिकाचें मत ऐसें असे । परमाणु आकाश नित्य वसे । नाश नसे कोण्हे काळें ॥ ७ ॥ महाप्रळयीं पृथ्व्यादिनाशती । परी यांचे परमाणु असती । ते सर्वदा नित्य वर्त्तती । नाशप्राप्ति असेचिना ॥ ८ ॥ मागुती ईश्वर-इच्छेकरून । सृष्टि होय जें निर्माण । तें परमाणु येकत्र करून । पृथ्व्यादि आपण स्वयें करी ॥ ९ ॥ हेंही यथार्थचि होये । परी परमाणुसि देशपरिच्छेद आहे । सूक्ष्मरूपें येके देशीं राहे । व्यापक नव्हे परमाणु तो ॥ ११० ॥ सूक्ष्मरूप याचें असे अंतीं । तेथें दुसरे स्थळीं कैंची व्याप्ति । ह्मणोनि देशें परिच्छेदती । नाहीं व्याप्ति सर्वत्र ॥ ११ ॥ ह्मणोनि तैसा मी नव्हे सर्वथा । मज देशकाळें नाहीं परिच्छेदता । आतां आकाश नित्य व्याप-कता । परिपूर्णता सर्वदेशीं ॥ १२ ॥ हेंही यथार्थचि असे । आकाश नित्य व्यापक भासे । परी त्या वस्तुपरिच्छेद असे । दुसरें वसे वस्त्वंतर ॥ १३ ॥ पृथ्व्यादिकें पंचमहाभूतें । तैसीं घटपटादि अनंतें । तेणें परिच्छेदलें जाण निरुतें । येकचि तें ऐसें नाहीं ॥ १४ ॥ माझें स्वरूप तैसें नव्हे । येकचि व्यापक सर्वत्र आहे । दुजेपणाचि मातु न साहे । परिपूर्ण आहे पूर्णत्वें ॥ १५ ॥ येथेंही विश्वप्रतीति । होतसे दुजेपणाचि व्यक्ति । तरी वस्तुपरिच्छेद सर्वार्थीं । होतसे अंतीं येथेंही ॥ १६ ॥ तरी जे कीं भासे विश्वप्रतीति । ते सर्वही जाणावी भ्रांति । विश्व नाहींच हें अनेका युक्ति । अनुभवास्थिती ठाईं ठेविलें ॥ १७ ॥ विश्वाची अविचारित सिद्धि । विचारें होये मिथ्या बुद्धि । जैसी शुक्तीचा ठाईं रजतसद्बुद्धि । अविचारें प्रसिद्धि होतसे ॥ १८ ॥ तेंचि विचारूनि पाहिजे । तंव

---

१ पाहिलेलें ऐकिलेलें. २ मर्यादा ३ 'तऱ्हीं' असा पाठ. ४ 'ऐसा अथे' असा पाठ. ५ निराळी वस्तु. ६ 'सर्व होये असा पाठ.

रजताची मातुही नेणिजे । शुक्ति ते शुक्तिचि सहजें । विचारें कीजे वस्तुभेटी ॥ १९ ॥ जैसें कां रज्जूचा ठाई । सर्पधारामाळादि पाहीं । अविचारें भ्रमाचि संख्या नाहीं । विचारे पाहीं रज्जुचि कीं ॥ १२० ॥ रश्मीचा ठाई जैसें मृगजळ । तें भ्रमें दिसे अळुमाळ । विचारें आघवेंचि होये फोल । असे केवळ राश्मिचि कीं ॥ २१ ॥ आणि विश्व हें ब्रह्मात्मक । विश्व तें ब्रह्मचि देख । सुवर्ण जैसें कंटक । दुजे लेख तेथें कैंचें ॥ २२ ॥ ऐसिया उपपत्ति सांगों किती । विश्वकारें हे सकळ भ्रांति । अतिविचारें सत्य भासती । विचारें भस्मांतीं जाये सकळ ॥ २३ ॥ यालागीं वस्तूसि नाहीं दुसरें । येकलें येक ब्रह्म खरें । तेथें परिच्छेदत्रय हें न स्थिरे । कोंदलें पुरें पूर्णत्वें ॥ २४ ॥ ह्मणोनि परिच्छेदत्रयाविरहित । सच्चिदानंद मी अनंत । ऐसिया नांवें उन्नत । नाहीं देखत आपणा न्यून ॥ २५ ॥ नाहो प्रकृत्यंतर्वर्ती जें जालें । तें तंव परिच्छेदातें पावलें । दृश्य सर्वही जें देखिलें । तें परिच्छेदलें तेणें न्यायें ॥ २६ ॥ यालागीं प्रकृतीपर वसें । ह्मणोनि ऐसें बोलिलेंसे । मी प्रकृतीचा नियंता असे । दुरी वसें तियेहूनी ॥ २७ ॥ ते जड अप्रकाश परतंत्र । मी बोधरूप स्वप्रकाश स्वतंत्र । नियंता चाळक अगोत्र । नामरूपमात्र असेचिना ॥ २८ ॥ एवंभूत व्यापक मी असें । ऐसा बोधही उल्हासे । आपुले पूर्णत्व न दिसे । दुजें ऐसें सर्वत्र ॥ २९ ॥ ऐसाचि मी अगाध बोध । नित्यानंद स्वसंवेद्य । नाहीं देहादिकासि संबंध । शुद्धबुद्ध निर्विकार ॥ १३० ॥ आतां चेष्टमान जरी हें शरीर । संस्कारें करी सर्व व्यापार । तथापि साक्षी मी निर्विकार । देहाकार नव्हें कदा ॥ ३१ ॥ जन्हीं पूर्वसंस्कारें करून । देह हें कर्मकरुनि चेष्टमान । तरी अन्य देहाचेपरी मी आन । मजसीं भिन्न देखतसे ॥ ३२ इतराचे दृश्यत्व करुनी । देह देखे जैसें मी नयनीं । तैसा माझाही देह जागृतिस्वप्नीं । परकीय स्थानीं देखतु असें ॥ ३३ ॥ वस्तुता तरी देह भिन्नचि असे । भिन्न तें दृश्य जाण ऐसें । दृश्य तें मिथ्या सर्वांशें । नश्वर वसे काळत्रयीं ॥ ३४ ॥ 'इमं देहं' हें मूळीं बोलिलें । इमंकारें भिन्नचि देखिलें । भिन्न तंव आपणा न मिळे । होय निराळें निश्चयें ॥ ३५ ॥ इमंकार आणि इदंकार । हें दृश्याचें वाचक सर्वत्र । भिन्न तें भिन्नपणेंचि निरंतर । देखें पर परकीयत्वें ॥ ३६ ॥ स्वतःसिद्ध तरी भिन्नचि असें । आपणा तया सादृश्यही नसे । असोनि ही लोक पिसे । मीच देह ह्मणताती ॥ ३७ ॥ मी तंव स्वयंबोधें बोधलेपणें । देहातें मी ऐसें न ह्मणें । देह तें दृश्य वेगळेपणें । परातें देखणें तैसें देखे ॥ ३८ ॥ अगा परत्वें देखतां । देहीं साक्षित्वचि वर्त्ततां । न मिळे देहाच्या कर्त्तव्यता । व पवें उसंता सुखदुःखभोगीं ॥ ३९ ॥ ऐसा नानायुक्तीकरूनि । एवं विश्व ऐसा आपणा मानी । हेंचि मनन गा कोदंडपाणी । जाणें निर्वाणीं आपणा ऐसें ॥ १४० ॥ इतुकेंचि विस्तारें सांगितलें । तें तंव युक्तीचे रूप केलें । येही युक्तिकरूनियां

१ ब्रह्मरूपंच. २ 'बोधें' असा पाठ. ३ प्रकृतीमध्यें असणारें. ४ 'इमं' या शब्दानें. ५ विश्रांती.

भलें । जाण निराळें आत्मरूप ॥ ४१ ॥ आतां एवंभूत ज-ही आपण असे । त-ही । देहादि प्रपंचु कां भासे । तेंही सांगों सावकाशें । येकाग्रमानसें परिसिजे ॥ ४२ ॥

एते तु चिद्विलासांता मनोबुद्धींद्रियादयः । असंतः सर्व एवाइ व्यवधानं विना स्थितः ॥ २ ॥

तरी हें सकळ पदार्थजात । मन बुद्धि इंद्रियादिसमस्त । हें चिद्विलास जाण[1] सकळ भासत । सर्वदा असंत सर्वही ॥ ४३ ॥ चित्शब्दें शुद्ध ज्ञान । ब्रह्म जें प्रकाश चिद्घन । त्याचाच विलास पंचे[2] जाण । विलासे पूर्ण सर्वदा ॥ ४४ ॥ विलास मात्र विश्वरूप याचें । मन बुद्धि दृश्यजाताचें । जें ज्याचा विलास तें स्वरूप त्यांचें । वास्तव साचें वि-चारितां ॥ ४५ ॥ वास्तव त-ही अधिष्टानसत्य । तेथ विपरित भासते असत्य । स्वप्न संभ्रमें अधिष्टानि भासत । मिथ्याभूत तो सर्वथा ॥ ४६ ॥ जैसा आपणा जो अधि-ष्टान । त्याचा विलास संभ्रमस्वप्न । वास्तव अर्थें सत्य आपण । मिथ्या पूर्ण वि-लासत ॥ ४७ ॥ कां शुक्तिकाविलासें रजत । वास्तव शुक्त्यात्मक निश्चित । पाहतां शुक्तिव्यतिरिक्त । मिथ्याभूत भ्रममात्र ॥ ४८ ॥ जें ज्याचा ठाईं विपरित भासे । तें तंव तदात्मकचि असे । जैसें स्थाणूचांठाईं[3] चोर दिसे । दुजा नसे तो तदात्मक ॥ ४९ ॥ रज्जुचा ठाईं सर्पादि भासती । ते तंव रज्वात्मकप्रतीति । रज्जुव्यतिरिक्त सर्व भ्रांति । नाहीं स्थिति रज्जुविण ॥ १५० ॥ तैसे हे देहादिदृश्यजाळ । तो तंव चिद्विलासु सकळ । वि-चारें अधिष्टानकेवळ । वृथा फोल विलासमात्र ॥ ५१ ॥ सकळही ब्रह्मात्मक पाहीं । ब्रह्मा व्यतिरिक्त दुजें नाहीं । भासे तें तरी मिथ्या सर्वही । सत्यत्वें कांहीं असेचिना ॥ ५२ ॥ हें तंव काळत्रयीं असंत । ज्ञानमात्रेंचि होय बाधित । नाहो स्थिति याची दे-खिजेत । असे भासत दीर्घ काळ ॥ ५३ ॥ ऐसा आक्षेप बोलिलेति । जे दीर्घकाळ भासे याची स्थिति । त-ही ते तोंचिपर्यंत राहाति । व्यवधानप्राप्ति जो नाहीं ॥ ५४ ॥ विशेषें करूनी जें अवधान । त्यातेंचि बोलिजे व्यवधान । व्यवधानशब्दें अपरोक्ष ज्ञान[4] अनवधान अज्ञान तें ॥ ५५ ॥ जागृति प्राप्त होतांचि अपरोक्ष ज्ञान । जेणें बोधें ब्रह्म तें आपण । ऐसें बोधिताचि दृश्यमान । नाशे स्वप्न जागृति जैसें ॥ ५६ ॥ जागृति प्राप्त होतां जे क्षणीं । स्वप्नाभास न दिसे नयनीं । अपरोक्षानुभवें दृश्यकाहाणी । मनीं नयनीं न देखिजे ॥ ५७ ॥ अहं विशिष्ट स्वयें जीव । यासि होतांचि अपरोक्षानुभव । तोचि जागृतीचा उद्भव । होतांचि सर्व स्वप्न नासे ॥ ५८ ॥ अहो अपरोक्षभ्रम ज-ही जाला । तो अपरोक्षज्ञानेंचि जाईल भला । ये-हवीं जैसा तैसा संचला । न ढळे कळिकाळा लो-टितांही ॥ ५९ ॥ यालागीं व्यवधान ऐसें बोलिलें । तेणेंचि दृश्यजात नाशलें । ज्ञान नसतांचि संचलें । असे भरले जैसें तैसें ॥ १६० ॥ यालागीं ज्ञान नसतां याची स्थिति । कोटिकल्प राहे प्रतीति । ज्ञात होतांचि भस्मांतीं । क्षणाप्रति जातसे ॥ ६१ ॥

---

१ ' जाण समस्त ' असा पाठ. २ पंचमहाभूतें. ३ ठोंब्याचे ठिकाणीं, ४ प्रत्यक्ष ज्ञान.

जागृति जंववरी नये हाता। तंववरी चिरकाळ स्वप्नावस्था। मग न दिसे दशदिशा पाहतां। जागृति होतां तत्क्षणीं ॥ ६२ ॥ ह्मणोनि अज्ञान असतां याची स्थिति। कोटिकल्प पाहे प्रतीति। ज्ञान होतांचि भस्मांति। क्षणाप्रती जातसे ॥ ६३ ॥ ह्मणोनि अज्ञानेंचि विश्व सिद्ध। देहेंद्रियादि दृश्य प्रसिद्ध। ते ज्ञान होताचि पावे बाध। निर्विवाद निश्चय ॥ ६४ ॥ ह्मणोनि देहेंद्रियादि करूनी। मी देहवंत ऐसें मानुनी। मी देह हें बुद्धि झकोनी। नेणपणीं झणीं लागा ॥ ६५ ॥ यालागीं देहेंद्रियां विरहित। मी आत्मा निर्गुण नित्यानंद भरित। ऐसा युक्तीकरूनि होय निश्चितार्थ। तें निश्चित आत्ममनन ॥ ६६ ॥ आणिकही बोध कैसियापरी। मनन बाण गा पौलस्त्यारी। तेंही सांगों तुज अवधारीं। तूंही करीं नित्य हेंचि ॥ ६७ ॥

आपद्यचलचित्तोऽस्मि जगन्मित्रं च संपदि। भावा भावविहीनोस्मि तेन जीवाम्यनामयः ॥ ३ ॥

नानापति आलिया प्राप्त। मी अचळचित्त असें स्वरूपस्थ। आपत्ति देहवंतासि होत। मी तद्व्यतिरिक्त देहेंद्रियां ॥ ६८ ॥ विश्वासि संपत्तिविपत्ति होती। मी तंव विश्व नव्हे स्वयंज्योति। विश्वप्रकाशकु अनंतमूर्ति। संपात्ति विपत्ति कैंची मज ॥ ६९ ॥ ह्मणौनि विपात्ति जालिया मी अचळु कैसा। वांतोमीं झडपिला मेरु जैसा। कां ग्रीष्म वर्षाकाळीं सरिसा। सिंधु तैसा अगाधपणें ॥ १७० ॥ संपत्तीचीही जालिया प्राप्ति। जगन्मिथ्यात्वें होये प्रतीति। सर्व विश्व आत्मास्थिति। नाहीं व्यक्ति दुजेपणाची ॥ ७१ ॥ संपात्ति जालिया नुचंबळे। क्षीराब्धि जैसा वर्षाकाळें। संपत्ति विपात्ति यथानुकूळें। देहमेळें होये जगा ॥ ७२ ॥ मी तंव भावाभाव विहीन। भावशब्दें देह जाण। अभाव तोचि अभाव पूर्ण। असें विलक्षण दोहींसि मी ॥७३॥ तैसेंचि देहसंबंधें नानारोग। आवि मानसिकधर्म सांग। मी तंव देहेंद्रियांसि असंग। कैंचा भवरोग मजलागीं ॥ ७४ ॥ तेणेंचि साक्षित्वें सर्वदा असें। जीव तें जीवन हेंचि वसे। येणेंचि सुखें सुख उल्हासें। नेणें मानसें विपरीत कांहीं ॥ ७५ ॥ ऐसिया मननें श्रीरघुनाथा। आपणातें जाणावें गा तत्वतां। येणेंचि निश्चयों ये हाता। भवव्यथा नेणें कांहीं ॥ ७६ ॥ आणीकही तया बोधु कैसा। मनन उपजे गा वीरेशा। तोही सांगों वैकुंठनिवासा। रामविलासा विश्वंभरा ॥ ७७ ॥

निरीहोस्मि निराशोस्मि स्वस्थस्वस्थोस्मि निस्पृहः। शांतोस्म्यहमरूपोस्मि चिरायुरचलं स्थितः ॥ ४ ॥

देहेंद्रियें चालतां कर्मगति। मी तंव निरीह अचळस्थिति। प्रवर्तवीं सर्वांची गती। कूटस्थ स्थिति दीपु जैसा ॥ ७८ ॥ दीपाधारें सर्व वर्तती। दीपाधारें कर्माची निष्पत्ती। होय परी अचल स्थिति। असे सर्वार्थी निरीह सदा ॥ ७९ ॥ आशा जरी असावी पोटीं। तरीच कर्तव्याची आटाआटी। आशा न भासे माझिया दृष्टी। देखें सृष्टी नश्वरपणें ॥ ८० ॥ मिथ्याभूत पदार्थ जो नश्वर। देखोनि वासना नव्हे तयासमोर। मृगजळीं

---

१ ही ओवी कित्येक प्रतींत मुळींच नाहीं. २ टाकून. ३ अनेक संकटें. ४ त्याहून निराळा. ५ वायूच्या वेगावें. ६ खटाटोप.

त्याची कर्ता व्यक्ति । दुसरें नाहीं तेथ अनुगति । आणि व्यावृत्ति असेचिना ॥ २०० ॥ म्हणोनि सर्वत्र ब्रह्मचि असे । त्यातेंचि सर्वगत बोलिजे ऐसें । गगनाचेपरी स्थिर असे । विश्व हें भासे त्याचा ठाईं ॥२०१॥ म्हणोनि जें जें दृष्ट श्रुत विश्वभाव । तें तें मीच ब्रह्मत्वें पूर्ण । मद्व्यतिरिक्त नाहीं आन । आनंदघन सर्वार्थी मी ॥ २ ॥ त्याहीवेगळें बोलावया । बोलों न शकिजे जगीं राया । आणि मजव्यतिरिक्त भासावया । लोकां ययां कारण नाहीं ॥ ३ ॥ यालागीं सर्वातीत सर्व व्यापक । स्थिर जैसें गगन येक । जें विश्वरूपें भासतें देख । तें येकायेक मीचि असें ॥ ४ ॥ ऐसें मनन करूनियां तया भासें । सर्वत्र आपणचि सर्वदा असे । सर्व जीवसमूह मजमाजी वसे । जीवित्वें उल्हासे माझा ठाईं ॥ ५ ॥

मय्यनंतचिदंभोधावाश्चर्यं जीववीचयः । समुल्लसंति खेलंति प्रविशंति स्वभावतः ॥ ७ ॥

म्हणे मी जो कीं चिदंबोधी । अनंत अगाध निरवधि । परिच्छेद त्रयातीत ज्ञानाब्धि । पूर्ण त्रिशुद्धि पूर्णत्वें ॥ ६ ॥ तया माझा ठाईं उल्हासती । जीववीचि अनंता भासती । उत्पत्ति आणि स्थिती पावती । लया जाती माझ्याचि ठाईं ॥ ७ ॥ अहो हें स्वभावेंचि करुनी । मज चिदब्धीसि प्रतीदिनीं । विश्वलहरी परी मानीं । उल्हासे नयनीं जगाचिये ॥ ८ ॥ क्षीराब्धीचे विचित्र विलास । ते सर्व क्षीराब्धी सावकाश । अज्ञाना भासती इतरांश । तऱ्ही क्षीराब्धीसि आन काय ॥ ९ ॥ नाना पृथ्वीचे परमाणु पृथ्वीवरी । विकासतांही पृथ्वीच खरी । तैसा सर्वत्र मी सर्वांपरी । नाहीं दुसरी मातु तेथें ॥ २१० ॥ ऐसा बोधु होय तयासी । मनन जाण आपणांसी । निश्चयें करी प्रमेयासी । आणीकही कैसी प्रतीति ॥ ११ ॥

मय्यनंतसुखांभोधौ विश्ववीच्यादिकल्पना । उदेतु वास्तमायातु न मे वृद्धिर्न च क्षयः ॥ ८ ॥

म्हणोनि सुखाचा समुद्र परिपूर्ण । देशकालवस्तुपरिच्छेदविहिन । त्या माझ्या ठाईं विश्ववीचिकल्पन । भासे आन अज्ञानेंसि ॥ १२ ॥ त्या विश्ववीचि उदय पावतां । मज वृद्धि नाहीं सर्वथा । विश्ववीचि अस्तमय होतां । क्षय तत्वतां असेचिना ॥ १३ ॥ हें तंव प्रत्यक्ष सिद्धचि असे । महार्णवीं वीचिविलास भासे । इतुकेनि काय वृद्धि होतसे । सपाटल्या नसे क्षय त्यासि ॥ १४ ॥ तैसें विश्वलहरी माझ्या ठाईं । उदय अस्त होतां वृद्धि क्षय नाहीं । मी तंव जैसा तैसा अक्षयी । अनपायी स्वतंत्र ॥ १५ ॥ हें विश्व असत्य तरी कां भासे । तुम्ही मानाल जरी ऐसें । तऱ्ही तेंही सांगों सावकाशें । येकाग्रमानसें परिसिजे ॥ १६ ॥

मदज्ञानोदितं विश्वं मय्येव लयमागतम् । अपरोक्षचिदानंदसाम्राज्यमधुनास्म्यहम् ॥ ९ ॥

तरी हें सर्व विश्वजात । माझेनिचि अज्ञानें उदय पावत । शेवटीं माझेचि ठाईं लयस्थ । ज्ञान होतां अनुभवसिद्ध ॥ १७॥ जऱ्ही हें भासे माझा ठाईं । अथवा लय पावतसे सर्वही ।

---

१ 'असावया' असा पाठ. २ ज्ञानरूप समुद्र. ३ जीवरूपी लाटा. ४ लाटांचा खेळ.

तरी मी आतां तैसा पाहीं । मी[1] सर्वही सर्वज्ञ ॥ १८ ॥ मी तंव अपरोक्ष चिदानंदैकसाम्राज्यबोध । दुसरेंविण परापर अगाध । नित्य सिद्ध तें मी साम्राज्य ॥ १९ ॥ एवंरूप मी सच्चिदानंदघन । तो हर्षें करी आपणा नमन । परमानंद उचंबळोन । बोले वचन मनांत ॥ २२० ॥

सर्वभूतांतरस्थाय नित्यमुक्तचिदात्मने । प्रत्यक्चैतन्यरूपाय मह्यमेव नमो नमः ॥ १० ॥

जो जो मी सर्व भूतांचा अंतरस्थ । अंतर्यामी जो सर्वगत । ऐसिया मज मी नमन करित । पुनरुक्त[2] अत्यादरें ॥ २१ ॥ आणि माझ्या स्वरूपीं जें स्फुरत । तेंचि तें मजहूनि व्यतिरिक्त । तें मिथ्यापणें मीचि सत्य । होय निश्चित चिदात्मा मी ॥ २२ ॥ तया मजकारणें नमन । चिदात्मा चैतन्यघन । प्रत्यक्‌रूप जो आनंदघन । करीं नमन तयासी ॥ २३ ॥ देहेंद्रियांच्या प्रातिकूल्यें । जें स्वयंप्रकाशे सर्वकाळें । तें मी प्रत्यग्रूप निराळें । प्रपंचानुमेळें स्वप्रकाशें ॥ २४ ॥ तया मी आपणाकारणें । पुनः पुनः करीं नमनें । आनंदाचेनि उचंबळलेपणें । आपणा आपण वंदिजे ॥ २५ ॥ मज वेगळें कांहीं दुसरें । न दिसेचि कोण्हे प्रकारें । यालागीं नमनपुरःसरें[3] । नमीं आदरें आपणया ॥ २६ ॥ अगा शांत जालिया वासना मन । ऐसें बाणे आत्ममनन । ऐसें सांगितलें तुज संपूर्ण । जाण स्वूण रघुवर्या ॥२७॥ आपुलें ब्रह्मत्व न बाणावया । अंतराय मन आणि वासना यया । शुद्ध ते दोन्ही उपशमलिया । जाणे आपणयां आपण ॥ २८ ॥ मना वासनेची जे तीव्रता । तेचि जाण निश्चयें मलिनता । मळिण असतां तत्वतां । न बाणे सर्वथा आत्मतत्व ॥ २९ ॥ हे नसतां कोटियत्न । केलिया न बाणे आत्मपण । हा मळ गेलिया ब्रह्मचि जाण । स्वतःसिद्ध पूर्ण स्वयें लाभे ॥ २३० ॥ आपण ब्रह्म हें स्वतःसिद्ध असे । परी वासनेनें व्यवधानीं मन प्रवेशे । तेणें आपणा आपण न प्रकाशे । तेणेंचि भ्रंशे स्वरूपींहुनी ॥ ३१ ॥ हें वर्म जाण श्रीरघुनाथा । म्हणोनि आत्ममननींच तत्वतां । असों द्यावें नित्य चित्ता । हेचि मुक्तता मुक्ताची ॥ ३२ ॥ ऐसी बोलतांचि गोष्टि । रघुनाथा आनंद पोटीं । परमानंदें हेलावे पुष्टि[5] । पडे मिठी निरूपणीं ॥ ३३ ॥ निजानंदें[6] रंगूनिया । निरूपण केलें ग्रंथान्वया । हेंचि मनन मुक्ताभिप्राया । बोलिला हा येणें अर्थें ॥ ३४ ॥ येथ मनोनाश वासनाक्षयासी । उपाय मनन हें निश्चयेसी । युक्ति करूनि अहर्निशीं । करावें परियेसीं श्रोते हो ॥ ३५ ॥ येथ संपलें आत्ममनन । पुढें बोलिजेल शुद्धनिरूपण । तेंही जाण निदिध्यासन । श्रोतीं सावधान परिसिजे ॥ ३६ ॥

इति योगवासिष्ठसारे श्रीवसिष्ठरामसंवादे आत्ममनन प्रकरणं पंचमं संपूर्ण

---

१ 'ऐका' असा पाठ. २ पुनः पुनः. ३ प्रथम नमन करून ४ उचंबळतो. ५ 'सृष्टि' असा पाठ. ६ 'निजरूपीं' असा पाठ. ७ 'रंगनाथ ह्मणे श्रीसद्गुरुरायें' असा पाठ.

॥ श्रीः ॥

प्रकरण ६ वें.

शुद्धनिरूपण.

श्रीगणेशायनमः । जयजय श्रीगुरुराया । परमानंद जी आत्मया । मजवरी कृपा करूनि स्वामिया । ग्रंथा यया संपूर्ण करीं ॥ १ ॥ तूं तंव निर्विघ्नकर्त्ता गणेशु । तूंचि विद्याविद्यांचा ईशु । मंगळमूर्त्ति तं तुंडेशु । निघ्नानाशु करावया ॥ २ ॥ प्रारंभिला ग्रंथसिद्धी । तुझ्या कृपाकटाक्षें कृपानिधी । जातसे अतिवृद्धि । त्या तुज नमूं बुद्धिप्रे-काशका ॥ ३ ॥ ऐसें येकेकपरी स्तवन । किती करावें यया वाचेकरून । तूं वाचादिकां अप्राप्त जाण । तुझी खूण न बोलतां ॥ ४ ॥ ह्मणोनि न बोलतां वाणी । नमन कीजे तुझ्या चरणीं । कांहीं न करणें जें सर्वपणीं । पूजा निर्वाणीं तेचि तुझी ॥ ५ ॥ ऐसिया सर्वगता तुज नमन । करितांचि ग्रंथसिद्धी जाण । तेंचि परियसा निरूपण । करीन कथन तुझिया कृपा ॥ ६ ॥ ऐसिये विनवणीसाठीं । श्रीगुरु पाहाती कृपादृष्टी । ह्मणती ग्रंथेंसिचि तं उठीं । जेणें संतुष्टि आह्मा होय ॥ ७ ॥ आमुचें ऐश्वर्य ग्रंथव्याजें । जें कीं सर्वदा तुवां बोलिजे । मनन निदिध्यासन सहजें । तुवां कीजे हेंचि नित्य ॥ ८ ॥ तरी हाचि मनोभाव तुझा फळो । ब्रह्मानंदें तुझी वृत्ति रुळो । वृत्तीचें वृत्तीपण मावळो । स्वसुख आकळो स्वसुखेंसी ॥ ९ ॥ आमुचें ऐश्वर्य बोलणें । हेंचि तुझें मनन निदिध्या-सणें । तरी होंचि फळो साक्षात्कारणें । सर्वदा भोगणें ब्रह्मानंदु ॥ १० ॥ आमुच्या स्वरूपाचें निरीक्षण । तोचि तुज समाधि जाण । तरी फळो गा निर्वाण । सुखसमाधान तेंचि तुज हो ॥ ११ ॥ सर्वदा करितां कर्माचरण । तेंचि तूं मानिसी आमुचें भजन । तरी तेंचि फळो गा तुजलागन । अनन्यपण हो तुज ॥ १२ ॥ श्रवणदर्शनादिक्रिया । गमनवक्तृत्व शिष्यराया । तें तूं मानिसी मद्भजनीं यया । त्या फळो तुझिया तदर्थेंचि ॥ १३ ॥ आणि आमुच्या नामउच्चारणीं । महामंत्रजप गुह्यस्थानीं । तऱ्ही तेंचि फळो गा निर्वाणीं । सुखस्वरूपें दोन्ही होतु कां ॥ १४ ॥ ऐसा महाप्रसाद लाधला । तेणें ब्रह्मानंद उचंबळला । तो न समाय कांहीं केल्या । वोसंडला नित्यानंदु ॥ १५ ॥ आतां या ग्रंथाचें व्याख्यान । यथार्थत्वें मी करीन । सद्गुरुकृपा दिव्यांजन । वरप्रदान लाधलों मी ॥ १६ ॥ अहो सद्गुरुकृपेचीयेसाठीं । कीजे ब्रह्मादि पदांची पाउटी । स्वयें ब्रह्मत्व ये भेटी । येरींची गोष्टि काय तथ ॥ १७ ॥ सद्गुरुकृपेनें अमरस्थान । सद्गुरुकृपेनें ब्रह्मलोकीं वसन ।

---

१ ' प्रवर्त्तक ' असा पाठ. २ ' नानापरी ' असा पाठ. ३ ' समाधान तेंचि ' असा पाठ. ४ ' मननादिकों ' असा पाठ. ५ मावत नाहीं. ६ इच्छा ' पदाचिया उठी ' असा पाठ.

सद्गुरुकृपेनें स्वयें ब्रह्म पूर्ण । शब्दब्रह्मरूप तेणेंचि ॥ १८ ॥ जो जो कीं अभिलाषितां अर्थु । तो सद्गुरूकृपा पूर्ण होतु । सद्गुरुकृपा कल्पनातीतु । ब्रह्म सदोदीतु स्वयें होये ॥ १९ ॥ येव्हडें ज्याचें कृपावलोकन । तेथ किती ग्रंथाचें व्याख्यान । त्याहीवरी प्रसाद अतिगहन । पूर्णकृपेनें दिधला मज ॥ २० ॥ अतिदुर्लभ सद्गुरुदर्शन । तेथें स्पर्शन तें मूर्तिमंत पुण्य[1] । जन्मकोटिपुण्यफळें अवलोकन । प्रसाद पूर्ण तो बोलवेना ॥ २१ ॥ तेथें तोंडभरुनियां बोलणें । तें पुण्य प्रशंसावें कवणें । त्याहीवरी प्रसाद लाधणें । कृपेनें बोलणें अतिदुर्लभ ॥ २२ ॥ हें किती कोण्या पुण्याचें फळ । तें तंव कांहीं न निवडे प्रबळ । अनंत जन्मीं करितां पुण्यकल्लोळ । दर्शन केवल सद्गुरुचें ॥ २३ ॥ दर्शनासि सामग्री पाहिजे हे । तेथें प्रसादीं काय पुण्य आहे । तें तंव न बोलवे काये । भाग्य पाहें अत्यु-त्कट ॥ २४ ॥ तया भाग्याची गणना । न करवे गा श्रुतिशास्त्रां पुराणां । तो कृपाळू समर्थ दीनां । कळवळोनि जाणा कृपा करी ॥ २५ ॥ तो दीनदयाळ ईश्वर । दीनांकारणें दयासागर । पाहतां आपुली सामग्री अपूर । कोटिसाधनसंभार[2] जऱ्ही जाले ॥ २६ ॥ असो आतां बोलणें किती । नाहीं पुण्यलेखा प्रसादाप्रति । केवळ कृपाचि दीनावरी अति । प्रकारीं बहुतीं हेंचि घडे ॥ २७ ॥ अहो देखो-नियां मज दीनासी । कृपा आली तया सद्गुरूसी । तेणें कृपें लाधलों प्रसादासी । धरीन मानसीं ते सिद्धि ॥ २८ ॥ येऱ्हवीं पाहतां काय सामग्री मज । केलें नाहीं सत्कर्म निज । अथवा जपलों नाहीं मंत्रगुज । प्रसाद सहज लाधलों मी ॥ २९ ॥ असे त्याचें तो सर्व कर्ता । मी तरी साइँखडियाचा[3] वक्ता । सूत्रधाराची कर्त्तव्यता । आपुल्या माथां कासया घ्यावी ॥ ३० ॥ यालागीं जैसें करित असों तैसें । माझें मीपण दवडानि देशें । जेथें मीपणासिचि ठाव नसे । तेथें कायसें करणें न करणें ॥ ३१ ॥ असो सद्गुरुरायें बोलाविलनि-पणें । ग्रंथाचें तों व्याख्यान करणें । तेंचि अनुसंधान अंतःकरणें । सावधान परिसिजो ॥ ३२ पूर्वग्रंथीं[4] ऐसें निरूपण । मनन केलिया युक्तीकरून । आपुलें आत्मत्व बाणे पर्णे । दृश्यही जाण तदात्मक ॥ ३३ ॥ देहादिविश्व दुसरेपणें । साच नाहीं कोण्ही गुणें । आपण पूर्ण सच्चिदानंदपणें । जाण खुणे अनुभवाचे ॥ ३४ ॥ ऐसें युक्तीकरू-नियां कळलें । परी तैसेंचि अनुभवा पाहिजे आलें । आणि विश्व भासतें निराळें । ह्मणोनि न मिळे स्वस्थितीसी ॥ ३५ ॥ प्रमेय जें कीं ब्रह्मस्वरूप । तेथ संशय होतां जो विक्षप । तो मननें नासला अमूप । शुद्धस्वरूप ऐसें कळलें ॥ ३६ ॥ ब्रह्म मी तें होय कीं नोहे । ऐसा संदेह होता जो पाहें । तो मननें नासला सर्व होये । सर्वत्र आहे मीचि ह्मणे ॥ ३७ ॥ निश्चयोवरी ब्रह्म मी ऐसें बाणलें । तरी देहादि प्रपंचाचें टवाळें[5] ।

---

१ 'स्पर्शनादिक तें मूर्तिमंत अर्चन' असा पाठ. २ कोट्यावधी साधनें. ३ कळसूत्री बाहुल्यांच्या खेळांतील. ४ 'पूर्व प्रकरणीं' असा पाठ. ५ खोटेपणा.

सत्यत्वें भासती तेणें चळे । स्थिति ढळे स्वरूपींहुनी ॥ ३८ ॥ जंव देहादिक दृश्यजात । तें सत्यपणेंचि असे स्फुरत । तंववरी नाहीं आत्मप्रतीत । वस्तुगत कदा नव्हे ॥ ३९ ॥ आणि ये स्वरुपस्थितीचे आड । असे या दृश्याचें कवाड । जंव जंव भासे तंव तंव नव्हे उघड । ब्रह्म अखंड आत्मत्वें ॥ ४० ॥ यालागीं करावें निदिध्यासन । तेणें निःशेष बाधे प्रपंचभान । उरे स्वस्वरूप चिदानंदघन । अखंडपण ब्रह्मात्मैक्य ॥ ४१ ॥ तेंचि निदिध्यासन कैस । सांगावया सावकाशें । शुद्धनिरूपणप्रकरणमिसें । आरंभिलें असे तें परिसिजे ॥ ४२ ॥ जेथें प्रपंचाचें होय निरसन । उपाधीचा क्षय संपूर्ण । ह्मणोनि बोलिजे शुद्धनिरूपण । ब्रह्म परिपूर्ण उरे केवळ ॥ ४३ ॥ तेंचि आतां कैसिया रीती । श्रीगुरुवसिष्ठ अनुवादती । तें येकाग्र आइकें त्रैलोक्याधिपति । तेंचि श्रोतीं परिसिजे ॥ ४४ ॥ त्याहीमध्यें श्लोकत्रयेंकरून । ऐसें कीजेल निरूपण । मननें आत्मत्व बाणल्या पर्ण । कैसें अनुसंधान तयाचें ॥ ४५ तो विचरे कैसा लोकांत । आणि अंतरीं कैसा निश्चित । तेंचि पुसता जाला रघुनाथा । वक्ता सर्वार्थे वसिष्ठगुरु ॥ ४६ ॥ ह्मणे आयिक सांगों गा रघुपती । मनन जालिया कैसी स्थिति । तो वर्त्ते कैसा जगाप्रति । अंतरगति तेही सांगों ॥ ४७ ॥ अगा शुभेच्छा जालियानंतरें । तुटे संसाराचें भेउरें[१] । मा मनन जालिया कैंच उरे । निःसंग विचरे सर्व कर्मीं ॥ ४८ ॥ तोचि निःसंगता पैं कैसी । आणि अंतरीं प्रतीति जे मानसीं । तेही सांगेन परियेसीं । तूंही तैसी स्थिति साधीं ॥ ४९ ॥ यावरी निदिध्यासनप्रकार । तोही सांगों सविस्तर । तरी तूं मन करुनि येकाग्र । आइक समग्र रघुपुंगवा ॥ ५० ॥

बहिः कृत्रिमसंरंभो हृदि संरंभवर्जितः । कर्त्ता बहिरकर्त्तान्तर्लोके विहर राघव ॥ १ ॥

तरी रघुनाथा ऐक सांगेन । लौकिकीं कैसें करावें वर्त्तन । तरी अंतरींचें टाकोनि कर्त्तेपण । संरंभ पूर्ण कर्मांचा ॥ ५१ ॥ संरंभशब्दें[२] अंतरींचा । जो कांहीं हव्यास मनाचा । अभिलाषोनि विषयाचा । चळे तो मनाचा संरंभु ॥ ५२ ॥ बाह्य कर्त्तव्यतेच्ची चरफड । कर्म संपादावें अतिउद्दंड । जेणें विषयसुख अतिगोड । होय उघड आचरतां ॥ ५३ ॥ तेथें आपपर न विचारी । युक्तायुक्त मनीं न धरी । कर्म करितां हो विश्व-बोहरी[३] । परी तें करी विषयांलागीं ॥ ५४ ॥ यया नाम संरंभ जाण । अंतर्बाह्य वोळखें याची खूण । तो अंतरींचा संरंभ टाकून । बाह्य वर्त्तन सुखें करीं ॥ ५५ ॥ तो संरंभ अंतरींहुनी । सर्वथा नसे तया निपटुनी । बाह्य संरंभ अतिनिर्वाणीं । दाखवी जनीं कृत्रिम ॥ ५६ ॥ नाहो अंतरीं नसतां बाह्य कैसें करी । हें तंव न घडे कोण्हे प्रकारीं । आधीं मनीं जऱ्ही इच्छा धरी । तरीच करी बाह्य कर्म ॥ ५७ ॥ ' यन्मनसा[४] ध्यायति

१ भीति. २ ' चळवळेचा जो समारंभु ' असा पाठ. ३ राखरांगोळी. ४ जें मनांत आणितो, तें वाचेनें बोलतो.

तद्वाचा वदति' । ऐसें बोलतसे स्वयें श्रुति । आधीं मनें जे पदार्थ ध्याइजेती । तेंचि करिती करणें सकळ ॥ ५८ ॥ वाचा हें उपलक्षण । वाचाशब्दें सर्वही इंद्रियगण । अर्थ मनीं धरिलियाविण । इंद्रियें जाण न प्रवर्त्तती ॥ ५९ ॥ मनाच्या अभिलाषाविण । बाह्यसंरंभु न घडे जाण । आधीं इच्छा जरी करी मन । तरीच वर्त्तन इंद्रियांसी ॥ ६० ॥ तऱ्ही सर्वही याची विवंचना । मानेल जैसी सज्ञाना । सांगेन तैसी द्या अवधाना । येकाग्र मना करूनियां ॥ ६१ तरी जितकें विपरीत कल्पन । तितुकें ज्ञानियांसी मिथ्या भान । तेथें संकल्पविकल्प मनन । करी कोण कोण्या अर्था ॥ ६२ ॥ अपूर्णकाम जो पुरुष असे । तो कामना करी स्वेच्छासोसें । आणि सर्वांहूनि उत्तमते जो असे । स्वयेंचि वसे सर्वा वरिष्ठ ॥ ६३ ॥ तो आपणांहूनि दुजें थोर । देखेल तरी कामना प्रकार । मनें करी अतिसत्वर । येऱ्हवीं सपूर परमानंद ॥ ६४ ॥ सकळ दुःखांची अप्राप्ति । आणि होआवी सकळ सुखांची विश्रांति । इतुकें सर्वजण इच्छिती । पशूपक्षी याति आदिकरुनी ॥ ६५ ॥ द्रव्यदारादि देहसौख्य । इंद्रादिकीं पदें असंख्य । इच्छिती परम सौख्य । हेंचि मुख्य जीवमात्रां ॥ ६६ ॥ भूतभविष्य दुःख आपणासी । न व्हावें येके घटिकेसी । निरंतर सुखसंयोगासी । असावें मानसीं हेंचि वर्ते ॥ ६७ ॥ तऱ्ही दुःखानाश आणि सुखोन्नती । व्हावी निरतिशयसुखाची प्राप्ति । ते आत्मसुखावेगळी गा रघुपती । नाहीं सर्वार्थी सत्यलोकींही ॥ ६८ ॥ जऱ्ही साम्राज्य भौज्य स्वाराज्य । वैराज्य पारमेष्ठ्य महाराज्य । सातवें तें आधिपत्य राज्य । आठवें सायुज्य ब्रह्मानंदें ॥ ६९ ॥ आतां या सप्तराज्यांचें विवरण । तुज सांगों देइजे अवधान । इत्यादिक राज्याभिधान । काय कोण कोण ह्मणिजेत ॥७०॥ भुवादिक जे सप्तही लोक । भूर्लोक भुवर्लोक । महर्लोक जनोलोक तपोलोक । सातवें सम्यक ब्रह्मभुवन ॥७१॥ अनुक्रमेंचि सप्तलोकांचें । साम्राज्यादिराज्य गा साचें । तुलना नै पवती ब्रह्मसुखाचे । तेथें विषयांचें कोण सुख ॥ ७२ ॥ आणीक अर्थेंही सांगेन । सप्तराज्यांचें विवरण । आपस्तंबशाखेसि वचन । उपनिषदें आपण गर्जती ॥ ७३ ॥ मनुष्यानंदापासुनी । शतगुण आनंद वरिल्यास्थानीं । ऐसें सत्यलोकपर्यंत वाखाणी । कोडिसवाणी स्वयें श्रुति ॥ ७४ ॥ आणीकही अर्थांतर ऐसें । स्वयें बोलिलें वेदव्यासें । तेंचि शुकें भागवतामिसें । निरूपिलें असे परीक्षितीप्रति ॥ ७५ ॥ तरी साम्राज्य ह्मणिजे सार्वभौमता । ते तंव ब्रह्मसुखेंसि नये समता । भौज्य तें एकाधिपत्यता । असे क्षुल्लकता तियेसी ॥ ७६ ॥ स्वाराज्य ह्मणिजे इंद्रपद । तेंही सुख तेथें अतिमंद । आणि अंतरायही अगाध । अंतीं बाध पतनाचा ॥ ७७ ॥ तेंही ब्रह्मसुखेंसी सरी । न पवे एक निमिषभरी । वैराग्यविराटसुखाची थोरी । न पवे सरी ब्रह्मसुखेंसी ॥ ७८ ॥ जेव्हां महाप्रळयो असे होत । तेव्हां विराट होये अभिमानगलित ।

---

१ इंद्रियें. २ 'तेज भाखे' असा पाठ. ३ 'न येती असा पाठ. ४ लज्जित.

ब्रह्मांड सर्वही लय पावत । राज्य करीत तेथें कोण ॥ ७९ ॥ सार्वभौम आणि इंद्रसुख । दोन्हीं एकत्र केलिया देख । सत्यलोकींचें परम सुख । न पवे लेखे ब्रह्मसुखाचा ॥ ८० ॥ पारमेष्ठ्यराज्य तें ब्रह्मपद । चिरस्थाई अतिअगाध । तें सुख निरूपितां विशद । निरूपणवाध विस्ताराचा ॥ ८१ ॥ जेथ शुद्ध पेरोजांची उभवणी । घरोघरीं कामधेनुचिंतामणि । दैन्यदुःख न देखती स्वप्नीं । नायकती काहाणी मरणाची ॥ ८२ ॥ जन्ममृत्यु नाहीं कोणासी । तेथें रोगाची गोठि कायसी । अमृतपान सर्व जनांसी । नाहीं सुखासी मर्यादा ॥ ८३ ॥ असत्य न बोलती कोणी । ब्रह्मविचारुचि सर्वदा वदनीं । प्रपंच दुःखें न देखती नयनीं । न भीति कोण्हीं कळिकाळा ॥ ८४ ॥ ऐसिया लोकांचा जो अधिपति । चतुरानन मंगलमूर्ति । निजासनीं सहजस्थिती । बैसोनि उत्पत्ति जगाची करी ॥ ८५ ॥ तेहतीस कोटि देव सकळ । गण गंधर्व नागकुळ । अप्सरागण विद्याधर प्रबळ । करिती सकळ उपास्ति ज्याची ॥ ८६ ॥ चंद्रार्क दोन्ही दीपधारी । पवन सारिखा विंजणा वारी । इंद्र स्वयें छत्र धरी । भेटेंकरी अष्टौदिक्पाल ॥ ८७ ॥ सकळ ऋषीश्वरांची मांदी । नमन करिती ये ब्रह्मपदीं । वेदघोष पदोपदीं । करिती शब्दीं सामगायन ॥ ८८ ॥ सकळ देवांचा मुगुटकोटी । नमस्कारीं होतसे दाटी । टणत्कारु निजासनपीठीं । होतसे पैठी रत्नांची ॥ ८९ ॥ ऐसी दाटणी दास्य करितां । अवसरु न लभे इंद्रादि समस्तां । तेथ असुरकिन्नरपुरुषांच्या कथा । कोण मांता होतील ॥ ९० ॥ आश्विनौदेव विंजणे जाणविती । मूर्तिमंत देव चाऱ्ही तिष्ठती । दोन्ही पार्श्वभागीं चाऱ्ही मूर्ति । स्वयें बोलती उपनिपदार्थ ॥ ९१ ॥ कामक्रोध आणि रागद्वेष । नाहीं जेथें सर्वजनांस । तेथें स्वयें त्या सत्यलोकनाथास । काय देखावयास संकल्पावें ॥ ९२ ॥ असो आतां किती बोलावें । सुख सहस्रां वदनीं न वर्णवे । ऐसेंहीपरी सरी न पवे । न उपमानवे ब्रह्मसुखेंसी ॥ ९३ ॥ महाराज्यतेंही ऐसें । महत्तत्व जया ह्मणिजतसे । ईश्वरुचि प्रपंचउद्देशें । इच्छी सोसें सृष्टि करूं ॥ ९४ ॥ तेथ प्रपंचाकाराचित्तवृत्ति । प्रपंच रचावया हे आर्ति । ह्मणऊनि ब्रह्मसुखासनीं न पवती । व्यवहारास्थिति ह्मणोनियां ॥ ९५ ॥ आधिपत्य तें नियंतृत्व । षड्गुणैश्वर्य ईश्वरयुक्त । तेंही सुख न्यून ह्मणिजेत । विकारवंत ह्मणोनियां ॥ ९६ ॥ इत्यादिसुखें जेथें न सरती । त्या ब्रह्मसुखाची जयांसि प्राप्ति । तेही विषय फल्गु इच्छिती । समूळ भ्रांति भावितयांची ॥ ९७ ॥ जो निरंतर परमामृत सेवी । तो कांजी कासया आठवी । जो नित्य दिव्यान्नें जेवी । तो कां सेवी रुक्षशाका ॥ ९८ ॥ इंद्रपदीं जो कां बैसला असे । सूकराचे भोग त्याचेनि मानसें । स्वप्नींही परी न स्पर्शे । भोगवशें विटंबला जऱ्ही-

१ 'तेंचि विराटसुख' असा पाठ. २ तुलना. ३ (?) 'पेरो ज्याची असा पाठ. ४ उपासना. ५ लद्दार; 'भेकरी' असा पाठ. ६ आसन. ७ 'नित्यतृप्त' असा पाठ. ८ तुच्छ. ९ मानणारांची.

॥ ९९ ॥ तैसा स्वयें जो ब्रह्म जाला । नित्य ब्रह्मसुखेंचि धाला । त्याचें मन विषय भोगाला । कोण्हेही वेळा इच्छीना ॥ १०० ॥ ऐसें इच्छेवांचून । कर्म करी जें हेतूविण । कर्मी आसक्ति नाहीं इच्छेकरून । अहं पूर्ण गेला ह्मणउनी ॥ १ ॥ जेथ अहंकारआसक्ति नाहीं । तेथ कामसंकल्प कैंचा कायी । कामसंकल्पशून्य जें कर्म सर्वही । तेंचि पाहीं संरंभुहीन ॥ २ ॥ ऐसया अंतरसंरंभेंविण । बाह्यसंरंभें शिथिल जाण । यदर्थी पार्थाप्रति श्रीभगवान । स्वयें श्रीकृष्ण बोलिले ॥ ३ ॥

संमति श्लोक ॥ यस्य सर्वे समारंभाः कामसंकल्पवर्जिताः । ज्ञानाग्निदग्धकर्माणं तमाहुः पंडितं बुधाः ॥
यस्य नाहंकृतो भावो बुद्धिर्यस्य न लिप्यते । हत्वापि स इमाँल्लोकान्न हंति न निबध्यते ॥

अगा पूर्व संस्कारेंकरुनी । बाह्यसंरंभ होती भवसेनी । परी तो तेथिंचा नव्हे निर्वाणीं । न लिंपे कोण्ही कर्मविषयीं ॥ ४ ॥ अथवा बाह्यसंरंभही करी । परी अहंविरहित असे अंतरीं । तैसा तूंही होयें रावणारी । लोकांभीतरी सुखें वर्ते ॥ ५ ॥ अगा हृदयीं संरंभ नसतां । बाह्य करिजे ते कृत्रिमता । तो तेथिंचा गा नव्हे कर्ता । सर्वथा अकर्ता प्रतीतिबळें ॥ ६ ॥ बाह्य सकळ कर्माचियेपरी । सर्व संरंभ सर्वदा करी । कर्त्ता दिसे जनांसी निर्धारीं । परी अकर्ता अंतरीं ब्रह्मत्वें ॥ ७ ॥ तयाचें साक्षीपण न मैळे । यालागीं कर्तृत्व तया नातळे । अकर्ता अंतरीं बाह्य कळे । संरंभमेळे इतर दृष्टीं ॥ ८ ॥ तरी रघुनाथा गा ऐसिया स्थिती । सर्वदा वर्त्तावें जनांप्रति । तुज वर्ततांही न बाधती । कर्माकर्मगति स्पर्शेना ॥ ९ ॥ आणीकही राहाटीपरी । येकाग्र आयिकें गा रावणारी । तसेंचि वर्ततां काळांतरीं । बाधु अंतरीं न पाविजे ॥ ११० ॥

अंतः संत्यक्तसर्वाशो वीतरागो विवासनः । बहिः सर्वसमाचारो लोके विहर राघव ॥ २ ॥

अगा रागशब्दें विषयप्रीति । हेंचि कारण सर्वां अनर्थांप्रति । आशापाश येणेंचि पडती । ह्मणोनि सर्वार्थी टाकावा हा ॥ ११ ॥ अंतरींचा राग जऱ्हीं गेला । सर्व आशेचा थारा मोडला । अप्राप्तीचा अभिलाष भला । तोचि संचरला आशासमूह ॥ १२ ॥ जेथ विषयराग समूळ गेला । तेथ अभिलाष सहजेंचि मावळला । प्राप्त विषयही भोगाला । नव्हे त्या वेगळा उद्यतु ॥ १३ ॥ ते आशा आणि विषयप्रीती । अंतरींहूनि जयाच्या जाती । तोचि जाण वैराग्यमूर्ति । राग चित्तीं जया नाहीं ॥ १४ ॥ तेंचि विवासनेचें रूप । नाहीं भोगेच्छा नाभयकंप । अंतरसुखें असे अमूप । आत्मस्वरूप होऊनि ठेला ॥ १५ ॥ अथवा आशाशब्दें ऐसें व्याख्यान । अप्राप्तविषयीं इच्छा पूर्ण । तें होआवें मजलागून । ऐसें जें जाण अभिलाषावें ॥ १६ ॥ प्राप्तविषयांचा ठांई अतिप्रीति । जे कीं द्रव्यपुत्रदारादिसंपत्ति । ते न्यून न व्हावी सर्वदा चित्तिं । वियोगें अति मरण मानी ॥ १७ ॥ तो राग नाहीं जेथें विषेशें जाण । तेंचि वितरागाचें लक्षण ।

---

१ इच्छा व विचार यांशिवाय. २ 'जनांचिये परी' असा पाठ. ३ विषयांवरील प्रेम. ४ 'आपण' असा पाठ.

विषयीं अप्रीति स्वानंदें करून । लोलुपता जाण तेथें कैची ॥ १८ ॥ वासनाशब्दें पूर्वीं अनुभविलें । जें विषय गोडपणें मानलें । तेंचि चित्तीं दृढ बैसलें । तें स्मरे भलें वेळोवेळां ॥ १९ ॥ हेंही सर्व जयाचें तुटलें । बाह्यत्वें आचार असती उरले । ऐसें विचरतां लौकिकीं भलें । बाधमेळें न लिंपे जो ॥ १२० ॥ ऐसा असोनियां अंतरीं बाह्य बरवा आचार करी । लोकसंग्रहार्थ कां संस्कार करी । लोकांभीतरी रघुराया ॥ २१ ॥ जैसा रागेंकरीं अज्ञानी जन । करिती सवासनाकर्माचरण । तैसें बाह्य जनांचें वर्त्तन । अंतरींहीन रागद्वेषीं ॥ २२ ॥ ऐसा होऊनि लोकांमाझारीं । सुखें वर्त्तें गा पौलस्त्यारी । लोकव्याख्या द्विप्रकारीं । सांगेन कुसरी परियसा ॥ २३ ॥ लोकशब्दें सर्वजन । हें तंव प्रसिद्धचि असे जाण । दुसरें लोकशब्दें देह पूर्ण । असे व्याख्यान सर्वशास्त्रीं ॥ २४ ॥ ऐसा अंतरीं असोन । देहीं असे बाह्यसंरंभेंकरून । बाधु न पवे सर्वथा जाण । विदेही आपण ह्मणोनियां ॥ २५ ॥ जेधवांची सकळांहूनि व्यतिरिक्त । आपणातें जाणे सुनिश्चित । तेधवांचि तो देहातीत । नाहीं लिंपत देहसंगें ॥ २६ ॥ तैसा देहीं असोनि । कर्म करी देह आश्रयूनि । परी तेथिंचा नव्हे भवसेनी । देहीं जनीं वर्त्ते जैसा ॥ २७ ॥ मनना उपरी वर्त्तणुक । एवंविध वर्त्तावें देख । सांगों आणीकही कौतुक । वर्त्तणक अंतर्बाह्य ॥ २८ ॥ आणीकही वर्ततिपरी । सांगेन तुज भवगजकेसरी । तैसा होउनियां अंतरीं । जनांभीतरीं वर्त्तें सुखें ॥ २९ ॥ अंतरीं वरूनि निदिध्यासन । तेणेंचि अनुसंधानेंकरून । जनीं वर्त्तावें ऐसें जाण । सांगेन खूण विबुधवर्या ॥ १३० ॥

पूर्णां दृष्टिमवष्टभ्य ध्येयत्यागविलासिनीम् । जीवन्मुक्ततया स्वस्थो लोके विहर राघव ॥ २ ॥

अगा ध्येयत्यागें विलासती । ते पूर्ण दृष्टि गा सीतापती । ध्येय स्फुरे जेथें अपूर्णगती । द्वैत स्थिति ह्मणोनियां ॥ ३१ ॥ एक ध्येय आपण ध्याता । ऐसें स्फुरे जेथें जानकीकांता । तेचि अपूर्णदृष्टि गा द्वैतता । येकरूपता नाहीं तेथ ॥ ३२ ॥ ध्येय आपणावेगळें । स्फुरे गा जेथें निराळें । ते अपूर्णदृष्टि द्वैतमेळें । तेथें खेळे अज्ञानें ॥ ३३ ॥ ब्रह्मात्मैक्यबोध ह्मणीजत । ध्येय ध्याता ध्यान न स्फुरे जेथ । तेचि पूर्ण दृष्टि गा निश्चित । विपश्चित ह्मणताती ॥ ३४ ॥ ऐसी पूर्णदृष्टि अवलंबुनी । आपण ध्याता एक त्यजुनी । राहें जिवन्मुक्तीकरूनी । स्वस्थ जनीं विहरावें ॥ ३५ ॥ स्वस्वरूपीं राहणें तें स्वस्थपण । तैसा राहें मुक्त होऊन । आतां दुसरें आइकें व्याख्यान । समाधान समाधींचें ॥ ३६ ॥ अगा पूर्ण दृष्टी करून । स्वस्वरूपस्थ राहें दृश्य त्यजून । लोकांत वर्त्ते धरून खूण । बाधू जाण न पावसी ॥ ३७ ॥ अथवा अहंममतेकरून । मी देहविशिष्ट जाणें आपण । ममकारें पुत्रदारादिस्वधन । इष्टबंधुजन मानीं नूं ॥ ३८ ॥ तैसियाचि सारिखें वर्त्तन । भरण पोषणादिक चिंतन । तें तें सर्वही ध्येय जाण । तत्त्यागें

---

१ प्रेमासाठीं. २ वासनायुक्त कर्में करणें. ३ संसाररूप शत्रूचा नाश करणाऱ्या सिंहा. ४ विद्वान्.

विषयीं अप्रीति स्वानंदें करून । लोलुपता जाण तेथें कैची ॥ १८ ॥ वासनाशब्दें पूर्वीं अनुभविलें । जें विषय गोडपणें मानलें । तेंचि चित्तीं दृढ बैसलें । तें स्मरे भलें वेळोवेळां ॥ १९ ॥ हेंही सर्व जयाचें तुटलें । बाह्यत्वें आचार असती उरले । ऐसें विचरतां लौकिकीं भलें । बाधमेळें न लिंपे जो ॥ १२० ॥ ऐसा असोनियां अंतरीं बाह्य बरवा आचार करी । लोकसंग्रहार्थ कां संस्कार करी । लोकांभीतरी रघुराया ॥ २१ ॥ जैसा रागेंकरीं अज्ञानी जन । करिती सवासनाकर्माचरण । तैसें बाह्य जनांचें वर्त्तन । अंतरींहीन रागद्वेषीं ॥ २२ ॥ ऐसा होऊनि लोकांमाझारी । सुखें वर्त्ते गा पौलस्त्यारी । लोकव्याख्या द्विप्रकारीं । सांगेन कुसरी परियसा ॥ २३ ॥ लोकशब्दें सर्वजन । हें तंव प्रसिद्धचि असे जाण । दुसरें लोकशब्दें देह पूर्ण । असे व्याख्यान सर्वशास्त्रीं ॥ २४ ॥ ऐसा अंतरीं असोन । देहीं असे बाह्यसंरंभेंकरून । बाधु न पवे सर्वथा जाण । विदेही आपण ह्मणोनियां ॥ २५ ॥ जेधवांची सकळांहूनि व्यतिरिक्त । आपणातें जाणे सुनिश्चित । तेधवांचि तो देहातीत । नाहीं लिंपत देहसंगें ॥ २६ ॥ तैसा देहीं असोनि । कर्म करी देह आश्रयूनि । परी तेथिंचा नव्हे भवसेनी । देहीं जनीं वर्त्ते जैसा ॥ २७ ॥ मनना उपरी वर्त्तणुक । एवंविध वर्त्तावें देख । सांगों आणीकही कौतुक । वर्त्तणक अंतर्बाह्य ॥ २८ ॥ आणीकही वर्ततिपरी । सांगेन तुज भवगजकेसरी । तैसा होउनियां अंतरीं । जनांभीतरीं वर्त्ते सुखें ॥ २९ ॥ अंतरीं करूनि निदिध्यासन । तेणेंचि अनुसंधानेंकरून । जनीं वर्त्तावें ऐसें जाण । सांगेन खूण विबुधवर्या ॥ १३० ॥

पूर्णां दृष्टिमवष्टभ्य ध्येयत्यागविलासिनीम् । जीवन्मुक्ततया स्वस्थो लोके विहर राघव ॥ ३ ॥

अगा ध्येयत्यागें विलासली । ते पूर्ण दृष्टि गा सीतापती । ध्येय स्फुरे जेथें अपूर्णगती । द्वैत स्थिति ह्मणोनियां ॥ ३१ ॥ एक ध्येय आपण ध्याता । ऐसें स्फुरे जेथें जानकीकांता । तेचि अपूर्णदृष्टि गा द्वैतता । येकरूपता नाहीं तेथ ॥ ३२ ॥ ध्येय आपणावेगळें । स्फुरे गा जेथें निराळें । ते अपूर्णदृष्टि द्वैतभलें । तेथें खेळे अज्ञानें ॥ ३३ ॥ ब्रह्मात्मैक्यबोध ह्मणीजत । ध्येय ध्याता ध्यान न स्फुरे जेथ । तेचि पूर्ण दृष्टि गा निश्चित । विपश्चित ह्मणताती ॥ ३४ ॥ ऐसी पूर्णदृष्टि अवलंबुनी । आपण ध्याता एक त्यजुनी । राहें जिवन्मुक्तीकरूनी । स्वस्थ जनीं विहरावें ॥ ३५ ॥ स्वस्वरूपीं राहणें तें स्वस्थपण । तैसा राहें मुक्त होऊन । आतां दुसरें आइकें व्याख्यान । समाधान समाधीचें ॥ ३६ ॥ अगा पूर्ण दृष्टी करून । स्वस्वरूपस्थ राहें दृश्य त्यजून । लोकांत वर्त्ते धरून खूण । बाधू जाण न पावसी ॥ ३७ ॥ अथवा अहंममतेकरून । मी देहविशिष्ट जाणें आपण । ममकारें पुत्रदारादिस्वधन । इष्टबंधुजन मानीं नूं ॥ ३८ ॥ तैसियाचि सारिखें वर्त्तन । भरण पोषणादिक चिंतन । तें तें सर्वही ध्येय जाण । तत्यागें

१ प्रेमासाठीं. २ वासनायुक्त कर्में करणें. ३ संसाररूप शत्रूचा नाश करणाऱ्या सिंहा. ४ विद्वान्.

पूर्ण राहिजे सुखें ॥ ३९ ॥ अहंकारममकारविरहित । जीवन्मुक्त सर्वत्र वर्तत । ते तेणें कर्तव्याचा ईषतें । बाधु निश्चित कदा नव्हे ॥ १४० ॥ ऐसा वर्ततो लोकाचारीं । तेचि जिवन्मुक्तता गा रावणारी । ऐसें मनन जालियावरी । लोकांभीतरी असावें ॥ ४१ ॥ तीं श्लोकीं करूनि वर्तणें । सर्वदा सर्वत्र इये खुणे । सांगितलें परि स्थिती न बाणे । यालागीं साधनें करावीं ॥ ४२ ॥ तऱ्हीं देहादिप्रपंचाचें सत्यत्वभान । होय तेंचि विपरतिभावन । तेंचि समाधीसि परम विघ्न । स्वरूप पूर्ण न प्रकाशे ॥ ४३ ॥ असंभावना विपरित भावना । साक्षात्कारासि हें विघ्न जाणा । यालागीं श्रवणमननिदिध्यासना । तिन्हीं साधनां साधावें ॥ ४४ ॥ त्यांमाजी श्रवणमनन दोन्हीं । सांगितलीं गा कार्मुक पाणी । आतां विपरितभावने लागुनी । निदिध्यासनीं प्रवर्तावें ॥ ४५ ॥ ब्रह्मावेगळें जितुकें द्वैत स्फुरे । तेंचि प्रपंचकारें द्वैत खरें । तेंचि निरसावया साधन वरें । जाण निर्धारें निदिध्यासन ॥ ४७ ॥ तऱ्हीं सर्वदा एकांतीं बैसोनि । द्वैत निरसावें गा धनुष्य पाणी । तेणें साक्षात्कार तत्क्षणीं । होय निर्वाणीं अनाथबंधो ॥ ४७ ॥ आपणाहून जें जें विजाति । तें तें स्फुरों नेदावें गा आनंदमूर्ती । राहावें आपुले सहजस्थिति । तेचि गती प्राप्तीची ॥ ४८ ॥ ऐसेनि चित्तमालिन्यें करून । विजातीय स्फुरे संस्कारें जाण । अथवा विषयप्रीतिकरून पूर्ण । देहादि स्फुरण जऱ्ही जालें ॥ ४९ ॥ तरी तें द्वैत तिरस्कारून । विजाति ऐसें वोळखोन । सजातिप्रवाहेंकरून । धैर्य पूर्ण करावें गा ॥ १५० ॥ सजातीय स्वरूप आपुलें । ब्रह्मेंसि ऐक्य जेथें बाणलें । तेंहि गुरुमुखें वोळखिलें । सच्चिदानंद भलें तेंचि जाण ॥ ५१ ॥ तद्रूपें करूनिज राहणें । तयातेंचि साक्षात्कार ऐसें ह्मणणें । तो होय तोंवरी वळणें । वृत्ति खुणे स्वरूपाचिये ॥ ५२ ॥ तरी तेंचि निदिध्यासन कैसें । सांगों आइकिजे रघुवंशें । जेणें साक्षात्कारु होतसे । सुखे उल्हासे परमानंदु ॥ ५३ ॥

एको विशुद्धबोधोऽहमिति निश्चयवह्निना । प्रज्वाल्य द्वैतगहनमेक एव सुखी भव ॥ ४ ॥

अगा अद्वैतबोधाग्नीपुढें । द्वैत तृणराशी बापुडें । भस्मांत होय धडफुडें । ह्मणोनि रोकडें हेंचि करीं ॥ ५४ ॥ तोचि अद्वैतबोधाग्नि गा कैसा । तोही सांगोंया वीरेशा । तरी सजातीय विजातीय ऐशा । स्वगतभेदलेशा भेदेना कीं ॥ ५५ ॥ भेदत्रयाहूनि विहीन । ऐसा सर्व येक अपरिच्छिन्न । स्वप्रकाश शुद्धनिर्वाण । नित्य ज्ञानस्वरूप मी ॥ ५६ ॥ ऐसा अखंड ऐक्याववोधदहन । तेणें प्रज्वळूनि द्वैत कानन । येकुला येकाचि होऊन । सुखसंपन्न सुखें राहे ॥ ५७ ॥ अगा ऐसया बोधें करूनि राहतां । द्वैत बाधं न शके सर्वथा । ह्मणोनि येणें बोधें सीताकांता । अपरोक्षता स्वयें होये ॥ ५८ ॥ अगा मुख्य द्वैत तें देहस्फुरण

१ 'कर्तव्यतेचा' असा पाठ. २ थोडासा. ३ मन मलिन झाल्यामुळें. ४ 'धेय' असा पाठ. ५ अद्वैताचें ज्ञान या अग्नीच्या समोर. ६ अमर्याद.

स्वस्वरूपीं होतसे देहभान । हेंचि द्वैत गा अतिगहन । पाश पूर्ण बद्धरूपें ॥ ५९ ॥ तोही तोडावयाचें साधन । आणीक निर्वाण तुज सांगेन । तेथें एकाग्र करूनियां मन । आयिक पूर्ण पूर्णानंदा ॥ १६० ॥ अगा देहादि द्वैत जंव स्फुरत असे । तंव तंव स्वरूप कैसें प्रकाशे । ह्मणोनि द्वैत जेणें करूनियां नाशे । तें साधन ऐसें जाण राघा ॥ ६१ ॥

देहोहंमानपाशेन दृढं बद्धोसि सर्वतः । बोधोहंज्ञानखड्गेन तन्निष्कृत्य सुखी भव ॥ ५ ॥

अगा देहोहंमानपाशेंकरून । सर्वत्र दृढ बांधला असे जाण । मान शब्दें बोलिजे ज्ञान । देहबुद्धि पूर्ण तेचि ह्मणिजे ॥ ६२ ॥ अगा देह मी जाणणें याचिया साठीं । देह पाशासि पडे वज्रमिठी । मग सोडितां न सुटे ही गांठी । जगजेठी परीस तूं ॥ ६३ ॥ अथवा देह मी ऐसा जो मान । प्रसिद्ध जो कीं देहाभिमान । तेंचि पाशाचें लक्षण । दुसरें व्याख्यान एवंरूप ॥ ६४ ॥ या देहाभिमान पाशें करून । सर्वत्र बांधिजे कळासंपन्न । तोचि मी बोधरूपें हें ज्ञान—। खड्ग तीक्ष्ण छेदावया ॥ ६५ ॥ मी देह नव्हें इंद्रियवर्ग । विश्व नव्हें मी असंग । ज्ञानस्वरूप मी अव्यंग । नाहीं भंग जयासी ॥ ६६ ॥ ऐसिया ज्ञानखड्गें करून । देहोहंमानपाशनिकृंतनें । सुखी राहें सुखरूप होऊन । हेचि खूण निदिध्यासनाची ॥ ६७ ॥ आणि ऐसिया स्थिती राहतां । ह्मणऊनि बाह्यसंरंभें न पवे बाधकता । तो अंतरीं असोनि अकर्ता । बाह्य कर्ता ऐसें भासे ॥ ६८ ॥ असो निदिध्यासनाचे परी । आणीक तुज सांगेन असुरारी । अनुष्ठितांचि सरे द्वैतवारी । साक्षात्कारीं आपणा भेटी ॥ ६९ ॥

अनात्मनि रतिं त्यक्त्वा निर्विभागो जगत्स्थितौ । एकनिष्ठतया स्वस्थः सच्चिन्मात्रपरो भव ॥ ६ ॥

तऱ्ही अनात्मा जो देहमति । तेथ टाकूनियां अतिप्रीति । असतां जगाची स्थिति । निर्विभागगती असावें ॥ १७० ॥ तऱ्ही भासतां ही जगडंबर । स्थिति भासे नानाकार । तेथें चित्त पावे जो विकार । भागप्रकार यया नाम ॥ ७१ ॥ आतां जगस्थिति तें कायें । तेथें निर्विभाग काय आहे । हेंही विवंचूनि सर्व पाहें । आयिक अर्थ हे विबुधपती ॥ ७२ ॥ हा गजपति हा अश्वयाति । मनुष्य पशु इत्यादि प्रतीति । सत्य भासे तें जानकी पति । विभाग स्थिति या नाम ॥ ७३ ॥ हें सर्वही आकृतिजात । देखतांही न मने ज्या यथार्थ । अधिष्ठानत्वें वस्तु जाणत । तोचि अर्थ निर्विकार ॥ ७४ ॥ जग जगत्वें प्रतीति भासे । व्यक्तीही जैसी तैसी दिसे । परी सर्वथा बाधित ज्या असे । मिथ्या भासे जैसें मृगांभ ॥ ७५ ॥ ज्ञान तयाही लागीं जैसें । शुक्तीचां ठाईं रजत भासे । परी तो रजतत्वें न घेतसे । जाणत असे अधिष्ठान पूर्ण ॥ ७६ ॥ अधिष्ठान तयासि पूर्ण कळलें । अपरोक्ष बरवें असें बाणलें । तया तेथें आन जऱ्ही भासलें । तऱ्ही

---

१ देहाच्या ठिकाणीं आत्मत्व कल्पिणें या फांसानें. २ 'टाकिजे' असा पाठ. ३ जखडून. ४ कापणें. ५ 'ऐसें भासवी' असा पाठ. ६ 'हा गज हा पक्षि' असा पाठ.

साचेंमेळें न घेपे तो ॥ ७७ ॥ त्याची इतराभासीं दृष्टि नसे । अनिष्ठानचीं शुद्ध जाणतसे । तया प्रतिभासिक भासे । परी साच दिसे अधिष्ठान ॥ ७८ ॥ हें निर्विभागाचें लक्षण । जग भासतां नेघे सत्यपण । पूर्ण जाणे अधिष्ठान । आकार शून्यदेखतु ॥ ७९ ॥ जेव्हां जगस्थिति प्रतिभासक । वाणली जाण सम्यक । तेथें आतां उपजे तया देख । मिथ्यत्वें सुख कैंचें उपजे ॥ १८० ॥ अगा वोडंबरीचे अळंकार । देखिजेती जरी अतिसुंदर । तरी मिथ्या कळलिया प्रीति थोर । न करी धीर जयापरी ॥ ८१ ॥ नातरी स्वप्नींची सुंदर वनिता । देखोनि नाभिलाषी जागृत होतां । हार देखिला दर्पणीं पाहतां । घ्यावया चित्ता चळ नव्हे ॥ ८२ ॥ तैसें असत्य कळलियावरी । प्रीति नुपजे सर्व प्रकारी । ह्मणोनि उपेक्षुनि बहुतांपरी । असे अंतरीं एकानिष्ठ ॥ ८३ ॥ ऐसें मिथ्या वाणलिया जगड्वाळ । तेथें प्रीति नुपजे काय नवल । यालागीं रति टाकूनि केवळ । येक निर्मळ अंतरस्थ होई ॥ ८४ ॥ अगा एकानिष्ठते करूनियां । अंतर्मुख व्हावें रघुराया । सच्चिन्मात्रपर होऊनियां । गूढार्था यया स्वरूप करूं ॥ ८५ ॥ एकशब्दें परब्रह्म जाण । तन्निष्ठता होणें तें एकनिष्ठता पूर्ण । निष्ठेचेंही स्वरूपलक्षण । सांगों खूण निर्जरपती ॥ ८६ ॥ तऱ्ही ते एकानिष्ठता ऐसी । न स्पर्शे दुजया पदार्थासी । ब्रह्मव्यतिरिक्त आणिकासी । दृश्यजातासि स्पर्शेना ॥ ८७ ॥ जें जें दृश्य ते बाह्य जाण । सर्वांचें अंतरस्थ तें ब्रह्म पूर्ण । तेंचि तें सच्चिदानंदघन । तत्पर जाण होइजे ॥ ८८ ॥ बाह्य न स्पर्शे दृश्यासी । तोचि अंतरीं पावे विश्रांतीसी । अंतरशब्दें ब्रह्म परीयेसीं । तेथें आपणासि विश्रांति कीजे ॥ ८९ ॥ तया नाम अंतस्थपण । हें जाण रामा येथिंची खूण । तत्पर होआवें संपूर्ण । कांहीं आन न स्पर्शावें ॥ १९० ॥ तन्मात्रशब्दें आन्यव्यावृत्ति । केली येणें पदार्थी । ब्रह्मा वेगळी दृश्याकारवृत्ति । सीतापती होऊं नेदीं ॥ ९१ ॥ दुसरें तरी वास्तव नसे । परी भ्रमास्तव जें मिथ्या भासे । तें मनदृष्टीनेंही न स्पर्शे । सर्वदा असे तत्परचि ॥ ९२ ॥ ऐसिया निदिध्यासनें रमाकांता । साक्षात्कार होतसे गा सर्वथा । तरी निरंतर करावें त्रैलोक्यनाथा । विपरीतार्था मुकिजे जेणें ॥ ९३ ॥ आतां सच्चिन्मात्रपर । होई ऐसें बोलिले सुरेश्वर । तऱ्ही याचेंही व्याख्यान सविस्तर । सांगेन सार परियेसा ॥ ९४ ॥ तऱ्ही तेंचि ब्रह्म कैसें आहे । जें सच्चिच्छब्दें बोलिलें पाहे । तें वाचा तरी बोलिलें न जाये । परी विशिष्ट होये बोलावया ॥ ९५ ॥ अगा जें जें वाचा बोलिजे । तें तें विशिष्टचि जाणिजे । त्याचींही लक्षण जऱ्ही कीजे । तरी केवळ सहजें लक्षिजेत ॥ ९६ ॥ आतां विशिष्ट तें काय कैसें । लक्षण तें किंमू लक्षण असे । लक्षण केलिया काय उरतसे । बाधा प्रवेशे तें स्थान कोण ॥ ९७ ॥ हेंही सांगों तुह्मांप्रती । जेणें केवळ याची स्थिति । तें सर्व परिसोनि

१ खऱ्याप्रमाणें. २ जादुगिरीचे. ३ स्पष्ट. ४ 'अन्न' असा पाठ. ५ 'ऋषीश्वर' असा पाठ. ६ वाणीनें.

चित्तीं । दृढ श्रोतीं धरावें ॥ ९८ ॥ तेंचि वसिष्ठ रघुनाथाप्रति । सांगती ब्रह्मस्वरूप स्थिति । ब्रह्म तेंचि परिसोनियां चित्तीं । विश्वमूर्त्ती धरावें गा ॥ ९९ ॥ वास्तव नित्य शुद्ध केवल । त्यासि मिळे कल्पितमेळ । तऱ्ही तेंचि विशिष्ट सकळ । जडेंसि केवळ येक जें भासे ॥ २०० ॥ शुद्ध तें सर्वांसि मिळत । तर्थोचि जड सर्व अध्यस्थ । उभयतां एकचि भासत । त्यासि ह्मणिजेत विशिष्ट ऐसें ॥ १ ॥ जैसें शुद्ध स्फटिकाचेठाईं जड नानावर्ण भासती पाहीं । तें येक भासलिया जाण सर्वही । भाविती तोही तोचि वर्ण ॥ २ ॥ तो आरक्तसंगें आरक्त भासे । जैसा वर्ण तैसा दिसे । तयासिचि विशिष्ट ऐसें । संत सर्वांशें ह्मणताती ॥ ३ ॥ त्याची तेथील लक्षणा कीजे । आरक्तासि गुण टाकिजे । मग उर्वरित शुद्ध निर्मळ उरे जें । तेंचि सहजें उपाधिहीन ॥ ४ ॥ तैसें ब्रह्म अतिशुद्ध निर्मळ । स्वप्रकाश व्यापक प्रांजळ । तयासि कल्पित मिळे समैळ । प्रपंचजाळ उपाधि हा ॥ ५ ॥ तें शुद्ध व्यापक सर्वांचा ठाईं । विश्वासि व्यापुनि राहिलें पाहीं । उपाधीचे धर्म शुद्धाचा ठाईं तेही । भासती सर्वही अधिष्ठानपणें ॥ ६ ॥ तियें उपाधी-योगें करून । दोन्ही येकत्र भासती ते विशिष्ट गुण । तें निवडावया लक्षण पूर्ण । कीजे सज्ञान तें ऐसेंचि ॥ ७ ॥ अगा लक्षणें त्रिविधप्रकार । तेंही सांगेन तुज थोर । संक्षेपें कीजेल विचार । मन येकाग्र करुनि आईकें ॥ ८ ॥ तरी जहल्लक्षणा । अजहल्लक्षणा । तिसरी ते जहदजल्लक्षणा । त्यांचीही सांगों विवेचना । आइक सज्ञाना रघुवर्या ॥ ९ ॥ अगा जेणेंकरुनि विशिष्ट बोलिजे । त्याचाचि समुळीं त्यागु कीजे । उपाधी वरून लक्षिजे । तेंचि जाणिजे जहलक्षण ॥ २१० ॥ 'गंगायां घोषः प्रतिवसति' । अगा मित्र सांगे मित्राप्रति । गंगामाजी गांवाची वसती । ग्रामप्राप्ति युक्ती तेथें गेलिया होये ॥ ११ ॥ तेथ गंगाचि उपाधि ग्रामासि । तो गंगेचेनि विशिष्ट परियेसीं । तेथ जहल्लक्षणा कीजे ऐसी । त्यागु गंगेसि करावा ॥ १२ । गंगेमध्यें न घडे ग्रामवस्ति । ह्मणोनि जहल्लक्षणा करिती । समूळ गंगाचि टाकिजेति । तीर लक्षिती ज्ञातेजन ॥ १३ ॥ समळ गंगेचा त्यागु केला । तीरीं ग्राम जरी लक्षिला । जहल्लक्षणा यया बोला । होये भपाळा श्रीराम-चंद्रा ॥ १४ ॥ आतां अजहल्लक्षणा ऐसी । त्यागु नाहीं उपाधीसी । तद्युक्तचि पदार्थासि । घेइजे त्यासी अजहल्लक्षणा ॥ १५ ॥ 'शोणो धावति' ऐसें । विशिष्ट येथें बोलिलें असे । ह्मणिजे आरक्त अश्व धांवतसे । त्यागु नसे उपाधीसी ॥ १६ ॥ आरक्तगुणेंसि अश्वयाति । लक्षिजे जेथें महामति । तेचि अजहल्लक्षणा सर्वार्थी । स्वयें बोलती ज्ञातेजन ॥ १७ ॥ आतां सांगों जहदजहल्लक्षण । तेथ त्यागात्याग-विवेचन । वाच्यांशु टाकुनि लक्षांशु जाण । घेइजे खुणययाचिपरी ॥ १८ ॥ येथ शंबलांशु तितका टाकिजे । शुद्ध शुद्धांशुचि घेइजे । हें मुख्य लक्षण जाणिजे । विशिष्ट

---

१ भ्रमरूप. २मलयुक्त. ३ गंगेवर गौळवाडा आहे. ४ तांबडा (घोडा) धांवतो. ५ अशुद्ध असलेला भाग.

कीजे शुद्धालागीं ॥ १९ ॥ 'सोयंऽदेवदत्तः' ऐसें। त्रिपदीं लक्षण ऐसें असे ।' सः अयं देवदत्तः ' या पदत्रयांशें । लक्षणमिसें शुद्ध घेइजे ॥ २२० ॥ तो ह्मणतां तत्कालदेश विशिष्ट । 'अयं' पदें एतत्कालदेश वरिष्ठ । उभयतां देश काळ दोन्ही स्पष्ट । त्यागु उत्कट करावा ॥ २१ ॥ अन्य देशीं काळीं देवदत्त देखिला । वर्त्तमान देशीं काळीं तोचि भासला । उभयतां देशकाळचि उपेक्षिला । देवदत्त उरला शुद्ध एक ॥ २२ ॥ अगा शुद्धाचि एका देवदत्तासी । उपाधि देशकाळ परियेसीं । तेथें उभयतां देशकाळासी । त्यजूनि शुद्धासि घेइजे ॥ २३ ॥ तैसेंचि सत् चित आनंद । हें ब्रह्मवाचक पदत्रय शुद्ध । हें विशिष्ट जाण निर्विवाद । सांगों भेद ययाचाही ॥ २४ ॥ यियें विशिष्ट पदें तिन्ही । ह्मणोनि उच्चारणा आली वाणी । शुद्ध केवळ न बोले कोण्ही । भरंवसेनी जाण रामा ॥ २५ ॥ येथ दृश्य जे कीं मिथ्याभूत । शुद्ध केवळासि तेंचि मिळत । तेणें मिश्रित जालिया वाचा बोलत । तया ह्मणिजेत विशिष्ट ऐसें ॥ २६ ॥ यामाजी दृश्य मिथ्या तें कोण । आणि शुद्ध केवळ तें किंलक्षण । आणि तेथें करावी जे कीं लक्षणा पूर्ण । शुद्ध सज्ञान निवडावें ॥ २७ ॥ हें सर्व ही तुजप्रति । वरवें सांगों गा जानकीपती । तरी सत्शब्दें सत्ता ह्मणिजेती । तैसीचि ह्मणती आकाश सत्य ॥ २८ ॥ गगनाची मिथ्याभूत सत्ता । आणि ब्रह्माचि जे वास्तव सत्ता । येकत्र जालिया तत्वतां । विशिष्ट रघुनाथा त्या नाम ॥ २९ ॥ ब्रह्म सत्ता तरी सर्वत्र असे । आणि लौकिकीं आकाशसत्ताही भासे । महाप्रळयीं गगन वसे । तें साच एसें माने जनां ॥ २३० ॥ आकाशसत्ता ते शबल जाण । वाच्या जाली असे तें मळिण । ते टाकिलीया उरे चैतन्य । शुद्ध पूर्ण सत्तारूपें ॥ ३१ ॥ तैसें चित्शब्दें बोलिजे ज्ञान । ज्ञान तें शुद्ध चैतन्य । दुसरें तें वृत्तिरूपज्ञान जाण । दृश्य मिथ्यापण तयासि असे ॥ ३२ ॥ येणें वृत्तिरूपेंकरून । विशिष्ट वाच्यांश जालें शुद्ध ज्ञान । ययाची करूनि लक्षणा पूर्ण । शुद्ध ज्ञान निवडावें ॥ ३३ ॥ तैसें सुखरूपचि ब्रह्म असे । दुसरें चित्तवृत्तींनें जें ज्ञान प्रकाशे । तेंही तुज सांगेन कैसें । तेंचि विश्वेशें परिसावें ॥ ३४ ॥ अगा अंतःकरणवृत्तीचां ठाईं । स्वतःसिद्ध चैतन्य असे पाहीं । तैसेंचि सकळांही विषयीं । चैतन्य सर्वही व्यापलें असे ॥ ३५ ॥ ते वृत्तीसि आणि विषयांसी । सन्निकर्ष होतांचि परियेसीं । तद्विषयिक अज्ञानासी । नाशु त्या लक्षणासि तत्काळ होये ॥ ३६ ॥ हें उभयतां चैतन्य एक जालिया । सुखोद्भव होये आपसैंया । हें चैतन्यसुख परी विषया यया । केलें साचिया परिछिन्न ॥ ३७ ॥ हें क्षणिकसुख आणि चैतन्यसुख । दोन्ही येकत्र भासती देख । येक लक्षणा करुनि निर्विशेख । आत्मसुख तेंचि घेइजे ॥ ३८ ॥ ह्मणऊनि सत् चित् आणि आनंद ।

---

१ तो हा देवदत्त. २ 'उपाधि झाला' असा पाठ. ३ अस्तित्व. ४ 'जगा' असा पाठ. ५ एकत्र होणे. ६ त्यासंबंधीं. ७ आपोआप.

तीहीं पदीं एक ब्रह्मचि शुद्ध । एकेंविण एक जड उपेक्ष्य मंद । प्रतिष्ठितां बाध बहुत असे ॥ ३९ ॥ तथापि वेगळें करितां ऐसा असे । सत्ता ज्ञानाहूनि वेगळी नसे । वेगळी करितां दृश्य होतसे । ज्ञानहीन ऐसें जड जाण ॥ २४० ॥ अगा जितुकें अनात्मक दृश्य जाण । दृश्य तें मिथ्याभूत संपूर्ण । यालागीं सत्ता ज्ञानेंसि भिन्न । न घडे जाण रघुवर्या ॥ ४१ ॥ ज्ञान सत्तेहूनि वेगळें बोलतां । तऱ्ही सत्तेविण कल्पित तत्वतां । जैसी स्वप्नींची स्वप्नावस्था । समूळ सर्वथा मिथ्या कल्पित ॥ ४२ ॥ स्वप्नाचा आश्रय आपण होये । परी भ्रमास्तव भासे पाहे । भ्रम गेलिया तोही जाये । ह्मणोनि नव्हे सत्य कहीं ॥ ४३ ॥ ह्मणोनि ज्ञान सत्तेहूनि वेगळें । करितां कल्पितपण तया आलें । ह्मणोनि एकचि ज्ञान सर्वमेळें । नव्हे वेगळें कालत्रयीं ॥ ४४ ॥ ज्ञान आनंदेंसि बोलतां भिन्न । तऱ्ही तें उपेक्षणीय जालें ज्ञान । सुखावेगळें प्रवर्ते कोठें कोण । सर्वत्र लक्षण जाण रामा ॥ ४५ ॥ या जनाची प्रवृत्ति ऐसी । सुखालागीं गोडी सर्वांसी । आत्मसुख नेणोनि तरि त्यासी । विषयसुखासी धांवणें ॥ ४६ ॥ सुखावेगळे प्रवर्ते कोण्ही । ह्मणऊनि ज्ञान आनंदेंसी भिन्न न मानीं । येकचि जाण सर्वथा तिन्ही । लक्षणा करोनि पाहें पां ॥ ४७ ॥ आतां ज्ञानाहूनि आनंद भिन्न । तरी ज्ञानेंविण आनंद मंद जाण । मंद तेंचि अप्रकाश हीन । ह्मणऊनि अभिन्न येकरूप ॥ ४८ ॥ आनंदाहूनि सत्ता भिन्न ह्मणतां । आनंद नाहीं उपेक्ष्य सर्वथा । सुखेंविण प्रवृत्ति ताता । पश्वादिसमस्तां न देखिजे ॥ ४९ ॥ सत्तेवेगळा आनंद करिजेत । तरी तोचि विषयानंदु परिकल्पित । विषय मिथ्या तेथें तज्जनित । सुख सत्य केवीं होये ॥ २५० ॥ अगा विषयासि जऱ्ही सत्ता असती । तऱ्ही तें नित्य सुख असतें रघुपति । यालागीं त्याची कल्पित स्फूर्ति । जैसि स्त्रियेसि रति स्वप्नीं होये ॥ ५१ ॥ यालागीं तिहीं पदाचें वाच्य भिन्न । परी शुद्ध तें येकचि अभिन्न । लक्षणा केलिया केवळ जाण । ब्रह्म निर्वाण रघुराया ॥ ५२ ॥ आतां केवळ तें कैसें बोलावें । वाचा बोलतां बोली न फावे । वाचाविशिष्टतेंचि अनुवादावें । शुद्ध न वदावें निरंश ह्मणउनि ॥ ५३ ॥ अगा वाचेचें बोलणें किती । तेंही परिसें जानकीपती । जाति गुण क्रिया संबंध असती । तेचि वदति गिरा स्वयें ॥ ५४ ॥ अगा ब्राह्मणक्षत्रियादि वैश्य जाति । गोअश्वादिमृगहस्ती । तेथेंचि जाण वाचेची प्रवृत्ति । अयोध्यापति ऐसें जाण ॥ ५५ ॥ तैसेंचि नीलकृष्ण आरक्तादि गुण । शुभ्र पीत ऐसे नानावर्ण । तेथें वाचा करी प्रवेशन । जाण खूण ब्रह्ममूर्ती ॥ ५६ ॥ तैसीच क्रिया जेथ असे । वाचक पाठक लेखक ऐसें । गमनचळण व्यापारोद्देशें । तेथें प्रवेशे वाचा जाण ॥ ५७ ॥ तैसिच संबधु जानकीपती । जेथें जेथें असंती दिसती । तेथेंचि

---

१ उपेक्षा करण्यास योग्य. २ त्यापासून उत्पन्न झालेलें. ३ ' बोलावें ' असा पाठ. ४ वाचा. ५ ' असत्या ' असा पाठ.

वाचेची प्रवृत्ती । केवळीं गती असेचिना ।। ५८ ।। धनी गोमान् इत्यादि संबंध । देखसी जेथ जेथ प्रसिद्ध । तेथचि वाचेचा अनुवाद । नित्य संबंध प्रवेशोनि ।। ५९ ।। या चहूंकरूनि संकेतीं । डित्थडफित्थादिनामव्यक्ति । केवळ अमुका ऐसी नामकीर्ती । तेथेंही वस्ती वाचेची असे ।। २६० ।। तथापि येथें देहसंबंध असे । तरीच वाचा संकेतीं प्रवेशे । केवळीं प्रवेशु कैसेनि असे । वाचा प्रवेशे विशिष्टीं ।। ६१ ।। यया चौं-वेगळें गा रघुनाथा । वाचा न प्रवर्ते सर्वथा । ब्रह्मीं तंव जातिगुणादिकी वार्ता । नाहीं कथा संबंधक्रियेची ।। ६२ ।। अथवा नाहीं नामसंकेत । वाचा कैसी प्रवेशेल तेथ । तें निर्गुण नित्यानंदभरित । स्वयें प्रकाशत स्वप्रकाशें ।। ६३ ।। ऐसें जें सच्चिन्मात्र जाण । दोन पदें बोलतां आनंद पूर्ण । न बोलतांही असे जाण । न संडी येकपण ह्मणोनियां ।। ६४ ।। अगा सत्ता तेथ ज्ञान असे । ज्ञान तेथ आनंद भासे । आनंद तेथ सत्ता ज्ञान वसे । सामरस्यें तिन्हींपदें ।। ६५ ।। यालागीं सच्चिन्मात्र जें ब्रह्म केवळ । तत्पर असतां सर्वकाळ । सर्वथा न बाधी भवजाळ । नित्य निर्मळ स्वयेंचि ।। ६६ ।। अगा सच्चित् पदें कळावया । हें व्याख्यान केलें रघुराया । यालागीं ब्रह्मपर होऊनियां । राहावें त्या नित्यानंदें ।। ६७ ।। ग्रंथाचें हृदय न काढितां । वरी वरी कीजे व्याख्यानकथा । ते काळक्रमणूक परी सज्ञान श्रोतां । विश्रांति तत्वतां न पाविजे ।। ६८ ।। आबाल गोपाळ समजती । परी श्रोतयांची धाय मती । तैसें व्याख्यान केलिया संतीं । निवती चित्तीं साधु श्रोते ।। ६९ ।। आणि आपण तों हेंचि करावें । साधुंचें हृदय तोषवावें । ते साधु संतोषलिया स्वभावें । पूर्णत्व फावे आपणासी ।। २७० ।। अगा साधु सन्मुख जालिया । कार्यसिद्धि होये आपणयां । साधु विमुख ते जाय वायां । कष्ट केलिया कल्पकोटी ।। ७१ ।। ह्मणोनि म्यां हेंचि केलें । संतांसि माने तेचि वाखाणिलें । यांसि वाखाणितां माने भलें । येरां न कळे ह्मणोनि उर्वगु ।। ७२ ।। ते ययातें पालहाळ ह्मणती । स्वयें तऱ्ही न कळे ग्रंथोक्ति । हें असो साधुजन निवती । हे ग्रंथव्यक्ति तयांचि लागीं ।। ७३ ।। परी इतरांसिही करूं नमन । यथामति कीजेल व्याख्यान । श्रोतां देऊनि अवधान । ग्रंथानुसंधान परिसावें ।। ७४ ।। वसिष्ठ ह्मणती गा रघुनाथा । पुनरपि निदिध्यासनाची कथा । उपाय दुसरा याही परता । सांगों तत्वतां तो आयिक ।। ७५ ।।

अजाग्रत्स्वप्ननिद्रस्य यत्ते रूपं सनातनम् । सचेतनं विशुद्धं च तन्मयः सर्वदा भव ।। ७ ।।

अगा ब्रह्मचि येक दुजें नसे । त्यालागीं नाना करूनि साहासें । जाणावें मानसीं ऐसें । तऱ्ही नव्हे तैसें रघुराया ।। ७६ ।। अगा ब्रह्म तें स्वतः तूंचि असससी । त्या

---

१ खुणेकरितां ठेवलेलें नांवें. २ ' परी चतुर श्रोतयाची न धाय मती ' असा पाठ. ३ ' फुकटचि ' असा पाठ. ४ श्रम.

आपणा पावावेया आनंदराशी । साहास कासया करिसी । सिद्ध असमी तुझा तूंचि ॥ ७७ ॥ तरी तेंचि स्वरूप कैसें । ऐकें रघुनाथा सावकाशें । तरी जागृतीस्वप्नसुषुप्तीं न नासे । तेंचि असे स्वरूप तुझें ॥ ७८ ॥ तूं अवस्थात्रयाहूनि वेगळ । तेंचि अवस्थात्रयाचा साक्षी केवळ । तूंचि तुझें स्वरूप निर्मळ । नित्य निखिल सनातन ॥ ७९ ॥ नाहो अवस्थात्रयांतें जाणते । तिन्ही अभिमानी आहेति आइतें । विश्वतैजसप्राज्ञ ययांतें । अभिमानियांतें जाण असेत ॥ २८० ॥ हें तरी यथाय बोलिलेती । अवस्थांतें अभिमानी जाणती । परी ते येकीतेंचि प्रकाशती । दुजी नेणती सर्वज्ञपणें ॥ ८१ ॥ अहो स्वप्नावस्थेचें ज्ञान । सर्वथा विश्व नेणें जाण । ते जसें जागृतीचें अभान । नेणे अनुसंधान सुषुप्तीचें ॥ ८२ ॥ प्राज्ञ नेणें जागृति । विश्व नेणें स्वप्नसुषुप्ति । तैजसु नेणे जागरसुषुप्तीप्रति । परस्परें नेणती अवस्थांतरें ॥ ८३ ॥ जो जे वस्तुअवस्थेचा अभिमानी । तो तीतेंचि प्रकाशी भर्वसेनी । दुसरीच ज्ञान तयाचेनि । कोदंड पाणी न करवे ॥ ८४ ॥ हा जन्ही येकीतेंचि प्रकाशी । परी आपणा तैसें नणे परीयेसीं । ना इतरांही अवस्थांसी । निश्चयेंसी नेणतु ॥ ८५ ॥ साक्षी अवस्था तिहींचें ज्ञान । येकला येक जाणे आपण । येक समयींच अनुसंधान । स्वयेंचि पर्ण करितु असे ॥ ८६ ॥ भलता येकादा पदार्थ । पूर्वी जाणत नव्हतो ह्मणत । आतां जाणतों ह्मणतां तेथ । दोन्ही भासत परियेसीं ॥ ८७ ॥ पदार्थ आणि पदार्थातें जाणता । दोहींतें आपण प्रकाशिता । म्यां देखिलें ऐसें ह्मणतां । प्रकाशें देखतां आपणाचि ॥ ८८ ॥ अभिमानी आणि प्रमाता । यांतेंही साक्षीच प्रकाशिता । ह्मणोनि साक्षी तो तूं रघुनाथा । नित्य अनंता चिद्रूप तूं ॥ ८९ ॥ नित्य निरंतर सनातन । श्रीराम स्वप्रकाश चैतन्यघन । तन्मयाचि होय तूं आपण । सर्वदा पूर्ण रघुनाथा ॥ २९० ॥ जैसा तं वास्तव आहेसी । तैसाचि असें अहर्निशीं । इतुकेनि स्वस्वरूपाचि अससी । त्या सांगों वर्मासि आणिकही ॥ ९१ ॥

मा भव ग्राह्यभावात्मा ग्राहकात्मा च मा भव । भावानामखिलां त्यक्त्वा यन्मस्तन्मयो भव ॥ ८ ॥

ग्राह्य जो कीं घटपटपदार्थ । जें जें आपणासि दृश्यत्वें भासत । तद्रूप होऊं नको अकस्मात । आपणा व्यतिरिक्त ह्मणोनियां ॥ ९२ ॥ देहादिदृश्याकार नव्हें ताता । ग्राहक अहंकारविशिष्टप्रमाता । तद्रूपही न होऊनियां तत्वतां । सांडीं कथा ग्राह्यग्राहकांची ॥ ९३ ॥ ययावेगळा तूं होऊन । अखिलही भावना टाकन । स्वस्वरूपीं तन्मय राहोन । सुखसंपन्न सर्वदा असें ॥ ९४ ॥ हचि निदिध्यासनाचें वर्म । विजातीयत्यागें केवळ ब्रह्म । आश्रयनि राहावें निःसीम । प्रपंचउपरम करूनियां ॥ ९५ ॥ तूं जन्ही ह्मणसी मन आणि मनाचे संकल्प । निरंतर हें असतां अमप । तें सांडूनियां कैसें होऊं चिद्रूप । आपेंआप असावें

---

१ 'जाणावया' असा पाट. २ प्रगट करितात, जाणतात. ३ 'लागे प्रकाशिता' असा पाठ. ४ 'भावनाजाल' असा पाठ. ५ संसार टाकून.

॥ ९६ ॥ तरी येविषयीं गा रघुनाथा । साहस कासया तुह्मी मानितां । अतिसुखकर हा उपाय करितां । प्रयासकथा कायसी ॥ ९७ ॥ तोही उपाय आतां सांगेन । एक एकाग्र करूनियां मन । अतिशयेंसि सुगम सोपान । आयिक ख्रूण रघुनाथा ॥ ९८ ॥

संकल्पेनैव संकल्पं मनसैव मनो मुने । छित्वा स्वात्मनि तिष्ठ त्वं किमेतावति दुष्करम् ॥ ९ ॥

अगा ऐसा संदेह तुझा चित्तीं । स्वस्थ राहतां ब्रह्मकारस्थिती । तेथ संकल्प अनंत उठती । ते करिती प्रपंचाकारें ॥ ९९ ॥ हा अंतरींच स्वस्थ राहों पाहे । तंव संकल्प हा उगा न राहे । बाहेरि घालोनि लवलाहें । करीं पाहे विषयाकार ॥ ३०० ॥ जरी सावध होऊनि आपण । कीजे संकल्पाचें छेदन । तंव अंतरीं मूळ असे त्याचें मन । संकल्प तेणें कोटि करी ॥ १ ॥ ह्मणोनि निदिध्यासनीं निश्चित । मन आणि संकल्प अंतराय-भूत । हें असतां नव्हे स्वरूपस्थ । ऐसें चित्त तुझें मानीं ॥ २ ॥ तरी ययाचा उपाय गा रघुपती । अपूर्व सांगेन तुजप्रती । तेंचि दृढ धरूनियां चित्तीं । करीं सुमती उपाय हा ॥ ३ ॥ तरी असंत संकल्प हा देहाकार । त्यासि ब्रह्माहमस्मिसंकल्पेंकरूनि मार । आणीक नाहीं उपायांतर । संकल्पसंहार जेणें होये ॥ ४ ॥ देहादिविश्वाकारें संकल्प उठी । तयातें कोण बळियों वळें लोटी । साधनांतर आटाटी । ब्रह्मास्मि जगजेठी वांचूनियां ॥ ५ ॥ विपरीत संकल्पें संकल्प सर्वथा । ब्रह्मास्मि संकल्पेंविण नाहीं तत्त्वतां । यालागीं संकल्पें संकल्पार्था । पावती धाता श्रीरामचंद्रा ॥ ६ ॥ नाहो संकल्प सरलियावरी । परी मन तों असे अंतरीं । तरी त्याचीही सांगों परी । ऐक निर्धारीं रघुपुंगवा ॥ ७ ॥ अगा संकल्पविकल्पात्मक मन । जें कीं करी प्रपंचानुसंधान । देहादिप्रपंच-भावन । करी जाण तें अशुद्ध ॥ ८ ॥ तयासि शुद्धें मनेंकरूनी । जें ब्रह्माकार होये इतर निरसनीं । दोष दृष्टि परतवी विषयांपासुनी । तेंचि भर्वसेनि शुद्ध मन ॥ ९ ॥ तेणें मनेंकरूनी रघुनाथा । अशुद्ध मन छेदावें गा सर्वथा । निरंतर करावी ब्रह्मकारता । हेचि छेदकता तयाची ॥ ३१० ॥ याही दोहीं शुद्धीकरुनी । मन संकल्प दोन्ही छेदुनी । स्वस्वरूपीं राहे निर्वाणीं । कोदंडपाणी परमानंद ॥ ११ ॥ जैसें तप्त लोह शीतळ लोहें । कुठारेंकरूनी छेदिजेत आहे । तैसें शुद्ध संकल्प मनेंकरीं पाहें । दहन होये अशुद्धाचें ॥ १२ ॥ तैसें रागद्वेषादिकीं तापलें । तें मन शुद्ध मनें पाहिजे छेदिलें । जें रागद्वेषत्यागें निवालें । सन्मुख जालें आत्मयासी ॥ १३ ॥ अगा इतुकें साधन करावया । दुष्कर काय गा रघुराया । स्वस्वरूपीं नित्य असावया । क्लेश तया काय होती ॥ १४ ॥ अगा जेथ परमानंद निरंतर । नाहीं दुःखाचा लेश कीर । तोंचि आत्मस्वरूप निर्विकार । तदाकार होऊनि राहीं ॥ १५ ॥ तेथें राहतां कोण दुःख असे । ऐसें विचारूनि सांग

---

१ जिना. २ विघ्नरूप. ३ मीच ब्रह्म आहें ह्या निश्चयानें. ४ दांडगा. ५ 'विकल्प करूनियां' असा पाट. ६ निश्चयेंकरून,

मानसें । हें सांडूनि देहाच्या अध्यासें । लोक पिसे राहताती ॥ १६ ॥ शेवटीं देह तरी हा पुरुष नव्हे । देहासि यासि काय संबंधु आहे । आश्चर्य करूनि निंदितो पाहे । कैसा होये हा देह ॥ १७ ॥ श्लोकपंचकेंकरूनी हें निरूपण । वसिष्ठ करिती देहनिंदन । त्यामाजी श्लोकद्वयें देहव्याख्यान । भिन्नपण देहचैतन्या ॥ १८ ॥ श्लोकत्रयें जनाची निंदा करीं । आश्चर्य करितां न माये अंतरीं । वास्तव स्वरूप त्यजनि स्वीकारी । देहधारी मीचि ह्मणोनि ॥ १९ ॥ ऐसें पांचा श्लोकीं निरूपण स्वयें । करी वसिष्ठ आपण । यांमाजी श्लोकद्वयें देहलक्षण । श्रोतीं सावमान परिसिजे ॥ ३२० ॥ हें निरूपण आयिकिल्याचिसाठीं । सुटे देह आत्मयाची गांठी । देहनिरसनें उठाउठी । होय भेटि स्वस्वरूपा ॥ २१ ॥ तेंचि निरूपण आतां । एकाग्र परिसावें श्रोतां । जें कीं वसिष्ठ श्रीरघुनाथा । लोभें तत्वतां बोलिजे ॥ २२ ॥

कस्तवायं जडो मूको देहो भवति राघव । यदर्थं सुखदुःखाभ्यामवशः परिभूयसे ॥ १० ॥

अगा कोण गा तुजकारणें । देह जाला गा देहपणें । त्या देहाचीं सांगेन लक्षणें । मग जाण खूण आपैसी ॥ २३ ॥ अगा देह तरी जड अति । अप्रकाश पाषाणस्थिति । जड तें अमुक्त सर्वार्थी । सीतापती जाण तूं ॥ २४ ॥ जें अजड आणि स्वप्रकाश असे । तेंचि मुक्त जाण सर्वांशें । जड तें अमुक्त जाण ऐसें । हें वर्म विशेषें जाणावें ॥ २५ ॥ आणि या देहाची परिस गति । प्रारब्धाधीन वर्त्ते सर्वार्थी । जैसी खांबसूत्राची मूर्त्ति । सूत्रें वर्त्तवी तदधीनपणें ॥ २६ ॥ सूत्रधाराचिया जाण सूत्रें । वर्त्तती खांबसूत्रीयंत्रें । तैसीं देह सुखदुःखें विचित्रें । भोगी परतंत्रें प्रारब्धें करुनी ॥ २७ ॥ ऐसा हा देह कुश्चित जाण । तोचि आपण ह्मणवील कोण । जड मूढ सुखदुःखाचें भाजन । परिणामीं पूर्ण विकारवंत ॥ २८ ॥ आणीकही अपोंड तुज आणि देहासी । तेंही सांगों गा हृशीकेसी । येकही साम्य तुज देहासी । येकेचि अंशीं असेचिना ॥ २९ ॥ देह जाणतां आपणासि भिन्न । आत्मत्वें नेघें ययातें जाण । मग करितां निदिध्यासन । अतिसोपान रघुराया ॥ ३३० ॥ ह्मणोनि ऐकें देहाचें लक्षण । हा तंव आत्मस्वरूपोंसि विलक्षण । जाणतांचि पाविजे आपण । तेंचि निरूपण परियेसीं ॥ ३१ ॥

क्व मांसरुधिरादीनि क्व त्वं चैतन्यविग्रहः । विजानन्नपि देहेऽस्मिन्नात्मबुद्धिं जहासि किम् ॥ ११ ॥

देह तें जाण एवंभूत । मांसरुधिरादिकीं कुत्सित । अस्थि चर्म मज्जा विष्ठा मूत्र । लाळेंयुक्त पूयपंकु ॥ ३२ ॥ सर्वदा दुर्गंधीचें बिऱ्हाड । अंतरीं कृमि जंतु निरंतर । स्रवताती नवही द्वारें । लुती सपूर सर्वांगीं गळे ॥ ३३ ॥ याची लक्षणेंही तुजप्रति । तें मागां सांगितलीं गा रघुपती । आतां निरूपितां पुनरुक्ती । विस्तार अति ययासि ॥ ३४ ॥ आणि षडूर्मिही महादारुण । इये देहीं वर्त्तती श्रीरामा जाण । क्षुधा तृषा शोक

---

१ स्वस्वरूप' असा पाठ. २ कळसूत्राची. ३ पात्र. ४ भिन्नपणा. ५ 'रजत' असा पाठ. ६ सहा प्रकारच्या लाटा.

मोह तीक्ष्ण । जरा मृत्यु जाण अतिदुस्तर ॥ ३५ ॥ हें येकयेक बोलतां गा रघुपती । चिळसीस पात्र सर्वार्थीं । परिणामीं निर्धन नश्वर गति । कुत्सित स्थिति सर्वांपरी ॥ ३६ ॥ तरी ऐसा हा देह कोणीकडे । आणि अविचारी चैतन्य हे तुझें नांव घडे । दोहींसि विचारितां साम्य न घडे । पाहतां अपाडें क्षराक्षरत्वें ॥ ३७ ॥ तूं आत्मा अक्षर अविनाशी । ज्ञानस्वरूप आनंदराशि । ऐसें असोनियां देहासी । आत्मत्वें कैसी धरिसी बुद्धि ॥ ३८ ॥ अगा दोहींसि अपाड सर्वांपरी । ऐसें जाणतां गा रावणारी । देहीं आत्मबुद्धि झडकरी । लोक हे दुरी टाकितीना ॥ ३९ ॥ तुजही टाकितां कोण सांकडें । तूं तंव दोहींतें जाणसा गा अपाडें । तूं अक्षर निर्विकार धडफुडें । त्यासि पडिपाडें देह कैसा ॥२४०॥ देह तो परिणामी अमंगळ क्षर । जड विकारी आणि नश्वर । ऐसियासि आत्मा येकाकार । सविकार केवीं होये ॥ ४१ ॥ अगा ऐसी देहाच्या ठाईं । आत्मबुद्धि टाकूनि पाहीं । सुखें राहावें आपुलां ठाईं । सर्वदाहीं स्वस्वरूपीं ॥ ४२ ॥

एतावतैव देवेश परमात्मावगम्यते । काष्ठलोष्ठसमत्वेन देहोऽयमवगम्यते ॥ १२ ॥

अगा इतुकियाचि वर्मेंकरुनी । देवाचा देव पाविजे निर्वाणीं । तेंही वर्म तुजलागुनी । कार्मुकपाणी सांगेन ॥ ४३ ॥ जो सर्वांसि स्वप्रकाशें प्रकाशी । त्यातेंचि देव ह्मणिजे गा आनंदराशी । ईशशब्दें प्रकाशाही प्रकाशी । सर्वस्वेंसि सत्तारूपें ॥ ४४ ॥ त्या देवेशा ब्रह्मातें पाविजे । कीं तेंचि होऊनि स्वयें आसिजे । जरी देह हा काष्ठतुल्य देखिजे । ममता नेणिजे ययाचां ठाईं ॥ ४५ ॥ अथवा कीट लोष्टादिमेळ । तद्वत् देखिजे हा समळ । त्याचा ठाईं अनासक्त केवळ । नाहीं मोहजाळ जयापरी ॥ ४६ ॥ तैसा ये देहीं सर्वदा उदास । परकीयत्वें देखे मिथ्याभास । तरीच ब्रह्मेंसि वास । सावकाश स्थिति होये ॥ ४७ ॥ देहीं दृढ ममता धरितां । आत्मत्वेंचि देहासि मानितां । कदा न घडे गा आत्मता । जाण सर्वथा ब्रह्मपणें ॥ ४८ ॥ देह परकीयत्वें अन्य देखणें । हें मिथ्याभूत मनें जाणणें । तरी ब्रह्मसुख पावण । जाण खुणे रघुनाथा ॥ ४९ ॥

अहो नु चित्रं यत्सत्यं ब्रह्म तद्विस्मृतं नृणाम् । यन्ममेदमविद्याख्यं तत्पुरः परिवल्गति ॥ १३ ॥

ह्मणे अहा कटकटा वोखटें । या जगाचें कृत्य उफराटें । जें सत्य ब्रह्म कदा न वाटे । दिसे प्रकट सर्वांसिही ॥ ॥ ३५० काळत्रयीं जें अबाधित । तेंचि तें नित्यानंद-भरित । तेंचि वस्तु जाण पैं त्रिसत्य । ब्रह्म सदोदित अपरोक्ष जें ॥ ५१ ॥ अहो तयाचें विसरोनियां नर । विस्मरणेंचि वर्त्तती निरंतर । आणि परोक्ष असत्य जें नश्वर । हें शरीर अविद्याख्य जें ॥ ५२ ॥ शीर्यते तें शरीर ऐसें । ययाचें व्याख्यान पैं असे ।

---

१ 'निंद्य' असा पाठ. २ 'टाकितां कठिण कायी । यालागीं देहात्मबुद्धि टाकूनि पाहीं । सर्वदा राहीं' असा पाठ. ३ 'मरणाची वार्ता निरंतर । आणि असत्य परोक्ष नश्वर । अहो तयातें विसरोनि नर. ४ गळतें.

अवयव गळती पैं आपैसें । स्वयेंचि नाशे विशीर्ण होउनि ॥ ५३ ॥ नूतन पट जैसा दृढ अति । स्वयेंचि त्याचे तंतु विशीर्ण होती । तंतु विशीर्णें पटाची शांति । न फाडिती तऱ्ही फाटे ॥ ५४ ॥ नातरी वृक्षफळ जैसें । तारुण्य जरी अति दृढ असे । तें स्वयेंचि परिपक्व होऊनि नाशे । कोण्ही न स्पर्शे दुर्गंधीनें ॥ ५५ ॥ तैसें स्वयेंचि जें विशीर्ण होत । कृमिगंधीकरूनि जें युक्त । मग स्वयेंचि असे नाशत । उपचारित सहस्र जरी ॥ ५६ ॥ तयातें शरीर ऐसें ह्मणती । आतां देहशब्दाची आइक व्युत्पत्ति । 'दह्यते त्रिविधतापैस्तद्देह' इति । ऐसे बोलती शास्त्रज्ञ जे ॥ ५७ ॥ आधिभूत आधिदैवत आध्यात्मिक । ऐसे त्रिविध ताप देख । येहींकरूनि जाळी सम्यक् । तयासि निष्टंक देह ह्मणती ॥ ५८ ॥ आणि ज्यातें अविद्या ह्मणिजे । जेणें विद्यमान नव्हिजे सहजें । अविद्येपासात्र उत्पत्ति पाविजे । अविद्या जाणिजे मूर्तिमंत हेचि ॥ ५९ ॥ ऐसे मिथ्याभूत कुश्चित शरीर । त्यातें मीचि ह्मणोनि वल्गती[1] नर । त्याचें भरण पोषण उपचार । निरंतर करिती भ्रमें ॥ ३६० ॥ अगा हें तों विचित्र सर्वांमाझारी । सत्य सुखरूप वस्तूतें करिती दुरी । अपरोक्षश्लाघ्य सर्वांपरी । आनंदलहरि स्वप्रकाशे ॥ ६१ ॥ ऐसें आत्मसुख टाकुनी । कुत्सित परिणामीं देह मी ह्मणोनि । विष्ठेचा राशी कवटाळूनी । सुख मानी अभिमानी जन ॥ ६२ ॥ अगा देह केवळ हाडाची मोळी । रक्तमांसमज्जादिकांची पोटळी । अतिमोहाची मोहकाजळी । दुर्गंधी भली गोठली जे ॥ ६३ ॥ तें आपणा देखतांचि नाशत । नवहीं द्वारीं लुती निरपत । ऐसा देह देखत देखत । मी ह्मणत अभाग्यपणें ॥ ६४ ॥ धन्य त्याची मातापिता । धन्य त्याचा विचार रघुनाथा । ऐसें देखोनि देह मी ऐसें ह्मणतां । लाज सर्वथा असेचिना ॥ ६५ ॥ अहो स्वतःसिद्ध आपणाचि ब्रह्म असतां । आणि लौकिकीं लाजे मी ब्रह्म ह्मणतां । मज जिव्हा आहे कीं ऐसें पुसों जातां । न लाजे सर्वथा लोकांमाजी ॥ ६६ ॥ अहो जेणें पुसे तेंचि न कळे । हातीं वस्तु आणि वरते डोळे । पाहे संभवतें वेडावलें । भ्रमेंण केलें सवथा[2] ॥ ६७ ॥ तैसें मी ब्रह्म होये कीं नव्हे । ऐसें जेणेंकरीं जना पुसावे । ताचि प्रकाशितें तया नेणवे । काय बोलावें नवल त्याचें ॥ ६८ ॥ अगा मुख्य विचारींचि कुष्ठ[3] लागला । तेणें मी ब्रह्म ह्मणतां लाजे लोकांला । तो लोकीं ह्मणतांही वेडावला । लाज त्यावेगळा पावतु ॥ ६९ ॥

॥ संमतिवाक्य ॥ उपस्थकुष्ठिनी वेश्या विलासेषु विलज्जति ॥

उपस्थीं कुष्ठ जाला जियेसी । ते वेश्या वेश्यपणा लाजे जैसी । विलास करितां मरणांत तियेसी । तैसें यासि जालें असे ॥ ३७० ॥ मुख्य गुह्य तो आत्मविचार । तेथ संदेहाचा कुष्ठ थोर । जाला ह्मणोनि तो गवार । लाजे फार मी ब्रह्म ह्मणतां ॥ ७१ ॥ ऐसें हें विचित्र भारी । सत्य स्वप्रकाश वस्तु करी दुरी । असत्यीं बांधतां ममतापुरी ।

१ बडबडतात. २ 'भ्रमें नकळे' असा पाठ. ३ कोड.

देह मी भिकारी आपण ह्मणे ॥ ७२ ॥ असो आणीकही सांगों किती । इया जनांची विपरीत गति । तेंचि आश्चर्य परम जानकीपती । तुजप्रति सांगेन ॥ ७३ ॥

अन्यच्चित्रं यत्परमं ब्रह्म तद्विस्मृतं नृणाम् । यन्ममेदमविद्याख्यं तत्पुरः प्रबलायते ॥ १४ ॥

अगा मोठें हें आश्चर्य रमाकांता । तें एकाग्र आइकें श्रीरघुनाथा । जें परम सर्वांचें वास्तव ताता । तें ब्रह्म अनंता विस्तारलें ॥ ७४ ॥ अगा सकळांचें कारणभूत । वास्तव आणि निजानंदभरित । तयातेंचि जन हें विसरत । कोटिकल्पांत उपजोनिया ॥ ७५ ॥ ऐसें विसरूनि गा रघुपती । नश्वर देहातेंचि मी ऐसें ह्मणती । आपण वास्तव आहे तें टाकिती । नव्हे तें धरिती कुत्सित देह ॥ ७६ ॥ आणि देहसंबंधिये जे असती । त्यांतेंचि ममकारें आत्मा मानिती । परी सकळ अविद्याख्यस्थिति । प्रबळ होती विस्मरणें ॥ ७७ ॥ अगा जों जों आपणातें विसरिजे । तों तों देहादिकीं सबळ होईजे । हेंचि खूण सर्वत्र जाणिजे । जाणे तो बुझे येरु नेणें ॥ ७८ ॥ययालागीं गा त्रैलोक्यनाथा । अविद्यक टाकावें सर्वथा । आपुली साधूनि ब्रह्मता । राहीं आतां ब्रह्मानंदें ॥ ७९ ॥

सर्वं ब्रह्मेति यस्यांतर्भावना सा विमुक्तिदा । भेदबुद्धिरविद्येयं सर्वथा तां परित्यज ॥ १५ ॥

अगा जयाजी अंतर्भावना । सर्वही ब्रह्म जाणे रघुनंदना । तेचि मुक्तिदाती तुह्मी जाणा । आन भावना बंधरूप ॥ ३८० ॥ देहादिइंद्रियांसहित । जें जें दृश्य प्रपंचजात । तें सर्वही ब्रह्म सदोदित । जाण निश्चित अंतर्बाह्य ॥ ८१ ॥ आणि ब्रह्मावेगळें जें किंचित । सर्वथा नेणें वस्तुजात । दुजेपणें जें भासत । जाण व्यर्थ मृगजळ ॥ ८२ ॥ ऐसिया निश्चयें अंतर्भावना । सर्वत्र जयाची गा रघुनंदना । तोचि मुक्तीसि कारणा । नाहीं आन रघुवर्या ॥ ८३ ॥ आणि जे कीं भेदबुद्धि । नानात्वें देखिजे त्रिशुद्धि । तेचि अविद्या जाण सुबुद्धी । मूर्ख कुबुद्धि जनासि हे ॥ ८४ ॥ हेचि संसारासि दायक । निरयपात[३] करी सम्यक् । ह्मणोनि त्यजावी सकळिक । कांहीं शेष उरों नेदीं ॥ ८५ ॥ ययालागीं सर्वदा रघुपती । हे भेदभावना त्यजावी सर्वार्थी । जे आकल्पांत देतसे संसृति[४] । निंद्य भूपति सर्वदा ॥ ८६ ॥ हे प्रत्यक्ष विद्या जाण । जे कीं भेदबुद्धिनानात्वदर्शन । हेंचि मुख्य जाण पां भवबंधन । नियरपतन हेंचि असे ॥ ८७ ॥ ह्मणऊनि याचा त्याग कीजे । सर्वत्र ब्रह्मबुद्ध्याचि असिजे । सर्वत्र ब्रह्मेतिबोधव्याजें । आनंदें भुंजे[५] सर्वथा ॥ ८८ ॥ ज्यासि सर्व ब्रह्म प्रत्यया आलें । स्वयें ब्रह्मत्वाचि जया वाणलें । तयासिचि जगीं पाहिलें । धन्य ऐसें बोलें तयासि मी ॥ ८९ ॥ ह्मणोनि रघुनाथा ऐसें करीं । सर्वदा ब्रह्मभावना अंतरीं । सर्वत्र असों दे रावणारी । तेणें शरीरी नव्हेसी तूं ३९० ॥ हेंचि सजातीय प्रवाहीकरण । याचें नाम बोलिजे निदिध्यासन ।

---

१ जन्मास येण्यासाठीं. २ 'परित्यजेत्' असा पाठ. ३ नरकपात. 'निरर्थक पातक' असा पाठ. ४ जन्ममरण. ५ उपभोग घतो.

येणेंचि सुटे विपरीत भावन । होये अवसान परब्रह्मीं ॥ ९१ ॥ आणि ब्रह्मावेगळी जे कल्पना । जियेतें भेदबुद्धि ह्मणती सज्ञाना । ह्मणी ते उपजों देसी मना । विपरीत भावना हेचि होये ॥ ९२ ॥ इयेतें सांडूनि सर्वदा पाहीं । ब्रह्मावबोधें सर्वत्र राहीं । नको चिंतूं आन कांहीं । मग देहीं विदेहीं तूंचि ब्रह्म ॥ ९३ ॥ ऐसें सांगतां वसिष्ठ-ऋषि । श्रीराम आनंदले मानसीं । पुढें कथा जाली कैसी । सांगें श्रोतयांसि गुरुकृपें ॥ ९४ ॥ निजानंदे रंगूनि चरणीं । सहज रुळत अनुदिनीं । पूर्ण बोध लाधला मनीं । कृपावलोकें सद्गुरूच्या ॥ ९५ ॥ ह्मणोनि सद्गुरूचा केला । पूर्ण बोध सुखावला । निजानंदें जो रंगला । अनिर्वाच्य सुखरूप ॥ ९६ ॥ येथें प्रकरण हें संपलें । जें कीं शुद्धनिरूपण केलें । आयिकोनि संत निवाले । ह्मणोनि बोलें ग्रंथार्थु ॥ ९७ ॥ माझी विनवणी श्रोतियांप्रति । जे प्रीति धरोनियां ग्रंथीं । श्रवण मनन पुढतपुढती । याचेंचि सर्वार्थीं करावें ॥ ९८ ॥ इतुकेनिची कृतकृत्यता । स्वभावें वरितसे चित्ता । न करूनि इतरा उपायार्था । स्वयें ब्रह्मता ब्रह्मपणें ॥ ९९ ॥ नाहो थोडेनि बहुताची प्राप्ति । तरी बहु क्लेश कासया करिजेती । गृहींचेचि तरु कल्पवृक्ष होती । तरी कां इच्छिती स्वर्गींचे ते ॥ ४०० ॥ अहो लोकांची हेचि विपरीतता । अल्पेंचि कार्यसिद्धि असतां । तरी कां कठिण मानूनियां चित्ता । नाना अर्थ कां प्रवर्त्तती ॥ १ ॥ ऐसें ते अभाग्य सर्वांपरी । तयांचि आत्मप्राप्ति दुरिच्या दुरी । ते निमज्जती संसारसागरीं । भवभय भारी सर्वत्र ॥ २ ॥ असो तयांचें किती बोलावें । संत ते तरताती स्वभावें । ग्रंथाचेचि अनुभवें । सर्वीं राहावें हेंचि सार ॥ ३ ॥ अहो या ग्रंथाचेनि श्रवणें । ब्रह्मज्ञान घेतसे धरणें । सिद्धचि ब्रह्मत्व पावणें । पावले खुणे आपुलिये ॥ ४०४ ॥

इति श्रीयोगवासिष्ठसारे श्रीवसिष्ठरामसंवादे शुद्धनिरूपणप्रकरणं षष्ठं संपूर्णम् ।

॥ श्रीः ॥

प्रकरण ७ वें.

आत्मार्चनप्रकरण.

जय जय जी श्रीगुरुराया । नमन करूं तुझिया पाया । ग्रंथव्याख्यान तरणोपाया । जीवाचिया करीन मी ॥ १ ॥ तरी जड जीवांचा उद्धारकु । तंचि तं परिपूर्ण येकु ।

---

१ 'बोधरंगें रंगोनि श्रीचरणीं । रंगें रुळतां अनुदिनीं । रंगनाथु नामाभिधानीं । पावे चरणीं सद्गुरूच्या ॥ ९४ ॥' असा पाठ. २ ह्मणोनि० । रंगनाथ ऐसें नाम पावला । श्रीमत्कृष्णानंद बोधविला । तेणें बोलिला ग्रंथवाचा ॥ १६ ॥' असा पाठ.

जयाचा अवलोकेंदीपकु । स्वप्रकाशकु करी जगा ॥ २ ॥ तरी तुझिया कृपावलोकें । ग्रंथ सिद्धी जाईल कौतुकें । येऱ्हवीं येवढा उन्मेष अशेखें । बोलची फिके सर्वही ॥ ३ ॥ ययालागीं जी कृपासागरा । आईकें ज्ञानदानिया उदारा । रिघोनि मद्वाचेच्या वोवरां । प्रकाश पुरा करीं स्वामी ॥ ४ ॥ रिघे ह्मणतांचि परिच्छिन्न । हों पाहे तुझें परिणाम । तुजकरित्तां सर्वांचें चळण । व्यापक पूर्ण नियंतृत्वें ॥ ५ ॥ आणि वाचदिकेरणें तूं होसी । तुजविण स्थिति कें या जगासी । यालागीं तूंचि अनुभवासी । निश्चयेंसि येतसे ॥६॥ तऱ्ही ऱ्या कासयालागीं विनवावें । सर्वही तूंचि होसी गा स्वभावें । वक्ता वदविता श्रोता गौरवें । होसी अनुभवें सकळ तूंचि ॥ ७ ॥ कर्त्ता करविता सद्गुरुनाथा । तेथ वर्णनाचि कायसी कथा । गुरुशिष्यभेद दाविता । लीलावतार विडंबक ॥८॥ तरी माझें मीपण तुजाविण । कोठें पावेल अवस्थान । यालागीं तूंचि येकु आनंदघन । मीतूंपण मूळभ्रांति ॥ ९ ॥ आपुलेंचि ऐश्वर्य बोलावया । ग्रंथमिष करूनि सद्गुरुराया । बोलवीं जी ब्रह्मानंद-अभिप्राया । उद्धरावया सर्व जना ॥ १० ॥ येथ माझें विनवणें तुजप्रति । कासयालागीं सद्गुरुमूर्त्ती । तथापि परोपकारार्थ विनंती । आनंदमूर्त्ती केली तुज ॥११॥ आतां आईकें ग्रंथव्याख्यान । मागें संपलें शुद्धनिरूपण । शुद्ध तें असिल्या आत्मार्चन । सर्वदा पूर्ण होतसे ॥ १२ ॥ स्वरूप जाणोनि राहणें । तेंचि मी आत्मार्चन ऐसें ह्मणें । तें वसिष्ठ रघुनाथाकारणें । सांगती खुणे आधिका ॥ १३ ॥ तेंचि महाराष्ट्रभाषेकरून । यथामती करिजेल व्याख्यान । तें श्रोतां परीसावें सावधान । करूनि मन येकाग्र ॥ १४ ॥ तरी पूर्वकरणीं निरूपण । संपतां श्लोकीं बोलिलें जाण । सर्वब्रह्म हें अंतर्भावन । मुक्तपण होतसे ॥ १५ ॥ आणि भेदबुद्धि तेचि अविद्या । सर्वथा त्यजावी गा सुविद्या । तरी भेदबुद्धि तेचि देहाद्या । होय अविद्या तेचि जाण ॥ १६ ॥ तेचि देहबुद्धि टाकिलिया । स्वयें लाभे आपआपणया । हेंचि ऋषि सांगती श्रीरघुराया । त्या प्रकरणा यया परिसावें ॥ १७ ॥ हेंही होय निदिध्यासन । आणि स्वस्वरूपाचें वोळखण । तेंचि सांगे ऋषि आपण । ते निर्वाणखुण परियसा ॥ १८ ॥ तेथें विजातीयाचा तिरस्कार । करोनि स्वस्वरूपाचा निर्धार । ब्रह्मींच राहणें तदाकार । साक्षात्कार तोचि होये ॥ १९ ॥ तेंचि निरूपण इये प्रकरणीं । रघुनाथा सांगे वसिष्ठमुनि । या नाम आत्मार्चन ऐसे जनीं । अभिधानीं बोलती यासी ॥ २० ॥ अगा मुख्य जें कां आतमनुसंधान । तेंचि तें जाण आत्मार्चन । उपचारें बाह्यभजन । तें जाण गौण मंदाप्रति ॥ २१ ॥ शुद्धांतःकरणीं जो गुरुअनुगृहीत । तेणें सर्वदा सेवावा एकांत । तेथें निदिध्यासन यथोचित । करावें निश्चित दृश्यत्यागें ॥ २२ ॥ देहादिदृश्याच्या तिरस्कारें । आत्मस्वरूप आविष्करे । तद्रुप राहणें

१ पहाण्याचा प्रकाश. २ वाणी वगैरे कर्मे करण्याची साधनें. ३ परब्रह्माची ओळख धरून रहाणें. ४ देहाला कारण. ५ गुरूनें उपदेश दिलेला.

जें एकाकारें । जाण निर्धारें आत्मार्चन तें ॥ २३ ॥ तेंचि आत्मार्चन पैं कैसें । ऋषिरायें बोलिलें असे । तेंचि मी संतकृपाविशेषें । सावकाशें सांगेन ॥ २४ ॥ तेंचि कृपा करूनियां संतीं । येकाग्र आइकावें चित्तीं । आइकिल्याची स्वरूपप्राप्ति । होय सर्वार्थीं भाविका ॥ २५ ॥

यदि देहं तिरस्कृत्य चिति विश्राम्य तिष्ठसि । तदा तृणाकृताशेषः स्वयमेको भविष्यसि ॥ १ ॥

जरी या स्थूळलिंगदेहातें तिरस्कारूनी । राहासील गा कार्मुकपाणी । स्वस्वरूपीं विश्रांमोनी । स्वरूपज्ञानीं अखंड ॥ २६ ॥ तरी तिरस्कार तोही ऐसा । देह तो मी होयें येकाचाचि ठसा । बाणला तोचि वीरविलासा । सांडीं सहसा देहात्मबुद्धि ॥ २७ ॥ देहद्वय तें जड समूळ । याचा द्रष्टा तो आपण निर्मळ । द्रष्टा तो दृश्यासि वेगळ । जो कीं सोज्वळ ज्ञानस्वरूप ॥ २८ ॥ यया देहद्वयाचें जें जाणतें । तें मी निखिल ज्ञान येथें । तेथें विश्रामोनि देहद्वयातें । सांडीं सर्वार्थें देहात्मबुद्धि ॥ २९ ॥ तैं अशेषही प्रपंचजात । तृणतुल्य होईल निश्चित । सत्य न भासे कदाचित् । अनिश्चित प्रतिभासकल्पें ॥ ३० ॥ तेणें काळें मग येकला यकु । तूंचि स्वयें असती बोधार्कु विश्व न होसि विश्वात्मकु । अवितर्कु प्रकाशें ॥ ३१ ॥ देह तिरस्कारावयाचें लक्षण । तें वर्म तुज अपूर्व सांगेन । करूनियां येकाग्र मन । सावधान परियेसीं ॥ ३२ ॥

येनेदं वेत्सि तज्ज्ञात्वा कुरु प्रत्यङ्मुखं मनः । ततः प्रकाशरूपत्वं द्रक्ष्यसि स्फुटमात्मनः ॥ २ ॥

तऱ्ही हें सकळही दृश्यजात । जें जें इंद्रियग्राह्य समस्त । तें तें सर्वही जाण मिथ्याभूत । स्थूळ भासत जगडंबाळ ॥ ३३ ॥ तें दृश्य जेणेंकरूनि जाणसी । तें मग वोळखोनियां हृषीकेसी । तेंचि मन नेहटावें आत्मयासी । सांगेन तैसीं शुद्धि करीं ॥ ३४ ॥ अगा इंद्रियांदिकां सर्वां प्रकाशी । प्रत्यक् जाण पां हृषीकेसी । त्या प्रत्यङ्मुख करीं मनासी । तेणें देखसी आपणयां ॥ ३५ ॥ प्रत्यक् तोचि साक्षीचैतन्य । तद्रूप करावें अंतःकरण । आत्मोन्मुख करितांचि मन । चिद्गगन देखसी तूं ॥ ३६ ॥ गगन जैसें कूटस्थ स्थिति । व्यापक निःसंग अतर्क्यगाति । तें तैसीच तुझी मूर्ति । येईल प्रतीति तुझी तुज ॥ ३७ ॥ येक मन प्रत्यङ्मुख करितां । आपुली आपणा लाभे ब्रह्मता । चढे सर्व सुखाचे माथां । हें न करितां अनर्थ कोटि ॥ ३८ ॥ अथवा जेणें हें सर्व जाणिजे । तें ज्ञानचि स्वस्वरूपें सहजें । तें जाणूनि तदाकार कीजे । मन रघुराजें सर्वदा ॥ ३९ ॥ अहो आपुलें स्वरूप प्रत्यक्ष असे । परी तें भ्रमें व्यवधानिलें असे । मन प्रत्यङ्मुख केलिया आपैसें । ब्रह्म सर्वांशें आपणाचि पैं ॥ ४० ॥ तऱ्ही तेंचि आत्मस्वरूप कैसें । जया साक्षी चैतन्य ह्मणिजेतसे । तेंही पुससी तऱ्हीं सावकाशें । सांगों विन्यासें रघुराया ॥ ४१ ॥ तया साक्षीस्वरूपाकार । मन करावें गा निरंतर । त्या साक्षी स्वरूपाचा निर्धार । सविस्तर सांगन ॥ ४२ ॥

---

१ विश्रांति घेत. २ ज्ञानरूपी सूर्य. ३ इंद्रियांनीं घेतां येण्याजोगें. ४ अति मोठें. ५ पलीकडचें पाहणारें. ६ चिदाकाश; विचार रहित स्थिति.

येन शब्दं रसं रूपं गंधं जानासि राघव । सोयमात्मा परं ब्रह्म सर्वमापूर्य संस्थित:

तरी आइकें गा रघुपती । सांगेन ब्रह्मस्वरूप तुजप्रति । जे कीं आयिकतांचि येतसे प्रतीति । एकाग्रमती घेइजे जरी ॥ ४३ ॥ जेणें हा पैं शब्द चळे । जेथूनि उठती शब्द-उमाळे । उठिल्या शब्द जेणें कळे । जाण निराळें परब्रह्म तें ॥ ४४ ॥ इंद्रियें इंद्रियवृत्ति विषय जाण । यांतें जाणतें जें चतुर्थ मन । या समस्तां येक समयीं जें करी प्रकाशन । हे सर्वत्र खूण साक्षि याची ॥ ४५ ॥ तैसेंचि रसीं राहोनियां रसगोडी । जे कीं स्वसाक्षित्वें निवाडी । गोडीसहित रस निवडी । जाण परवडी तेचि येकी ॥ ४६ ॥ तैसेंचि स्वरूपातें प्रकाशिता । चक्षु दिसे बाह्य पाहतां । परी चक्षुसहित रूपाचा ज्ञाता । मनादि तत्वतां प्रकाशे जेणें ॥ ४७ ॥ तैसेंचि घाणेंद्रियें गंधप्रतीति । जेणें स्पष्ट येतसे व्यक्ती । तेंचि परब्रह्म गा विश्वमूर्ती । जाण निश्चिती हेचि खूण ॥ ४८ ॥ इंद्रियचतुष्टयाचे विषय । मुळीं बोलिले जे उपाय । तें उपलक्षण अनुमेय[१] । परी सर्वेंद्रियमेळे सूचिलें ॥ ४९ ॥ ह्मणोनि सर्व इंद्रियांच्या राहाटी । तुज सांगों गा जगजेठी । चित्त देईं माझिये गोष्टी । श्रवणें भेटि निजात्मया ॥ ५० ॥ तरी त्वगिंद्रियाचें स्पर्शन । स्पर्शनीय ज्ञातृत्व जाण । यातें जाणे तो चिदानंदघन । परिपूर्ण परमात्मा ॥ ५१ ॥ आणि वाचा वदे जे जे अर्थ । अर्थेंसि । जेणें वाचा प्रकाशत । त्या वागिंद्रियानें[२] जे जाणत । त्यातें निश्चित जें प्रकाशी ॥ ५२ ॥ तैसेंचि हातांचें क्रियाजाळ । घेणें देणें इत्यादि सकळ । ययातें जें प्रकाशी निर्मळ । जाण अढळ परमात्मा ॥ ५३ ॥ आणि गुह्याचें जें गुह्यपण । गुदउत्सर्गकर्माचरण । जेणें जाणसी तें चैतन्य । आनंदघन परमात्मा ॥ ५४ ॥ चरणाची जे चरणगति । चरण जेणें करूनि रुळती । चरणादि प्रकाशी सर्वार्थी । तोचि निश्चित परमात्मा ॥ ५५ ॥ शिश्नक्रियारतिविलास । रतिसुख जें सविलास । जेणें होती इत्यादि प्रकाश । तोचि परेश परमात्मा ॥ ५६ ॥ मनाचें जें मंतव्यपणं[३] । संकल्पविकल्पात्मक जाण । हें जेणें जाणिजे अनुसंधान । तेंचि चैतन्य निश्चयेंसी ॥ ५७ ॥ तरी इतुक्याही इंद्रियव्यापारीं । येक मनचि होय साहाकारी[४] । मनेंसहित सर्वांचा प्रकाश करी । जाण निर्धारीं परमात्मा ॥ ५८ ॥ ऐसें सर्वेंद्रियवृत्तीं-करूनी । जो जो पदार्थ घेइजे जनीं । त्यासि मन भरंवसेनी । ऐसें नेणोनि ज्ञाता ह्मणिजे ॥ ५९ ॥ परंतु परस्पराध्यासें । मनचि ध्यासे ऐसें दिसे । परी याचाही प्रकाश करितसे । नेणती भ्रमांशें कोण्ही जन ॥ ६० ॥ अगा तें स्थूळ दृष्टीनेंचि पाहाती । ह्मणोनि सूक्ष्मद्रष्टासाक्षी नेणती । त्या नेणण्यासाठीं संसृती पावती । कोटिकल्पांतीं सुटेचिना[५] ॥ ६१ ॥ तोचि साक्षियातें अपरोक्ष जाणतां । स्वप्नींही नायकीजे संसारवार्ता ।

१ अनुमान करण्यास योग्य. २ वाणीनें. ३ जाणतेपणाचा धर्म. ४ मदत करणारें. ५ अज्ञानामुळें जन्ममृत्यूंच्या फेऱ्यांत पडणें.

परमानंदीं निमग्नता । ते न येती द्वैता स्वप्नीं कदा ॥ ६२ ॥ यालागीं तुवां तैसें न करावें । मी सांगेन तैसा पाहावें । तेणेंचि आपण स्वभावें । पावसी गौरवें निश्चयेंसि ॥ ६३ ॥ तऱ्ही जें जें इंद्रियें प्रकाशिती । तेथेंचि साहाय होय चित्तवृत्ति । बुद्धि निश्चयातें असें करिती । प्रगट होती विषयपदार्थ ॥६४॥ इतुकियांचें अनुसंधान करितां । जाणे जो जीवशब्दप्रमाता । तयासहितही प्रकाशी समस्ता । जाण तत्वतां तोचि साक्षी ॥ ६५ ॥ इंद्रियें आणि पदार्थजाता । मन बुद्धि प्रमाता निश्चिता । यांतें जाणे तो साक्षी तत्वतां । जाण रघुनाथ परमात्मा ॥ ६६ ॥ तोचि साक्षि निजानंदघन । तोचि आत्मा ब्रह्म परिपूर्ण । तोचि परमेश्वर निर्गुण । जाण खूण रघुवर्या ॥ ६७ ॥ इतुकिया विशेषणांचें व्याख्यान । आइक एवंभूत लक्षण । यांचें कीजेल निरूपण । तेंचि विवरण परियेसीं ॥ ६८ ॥

॥ संमतिस्मृति ॥ यच्चाप्नोति यदादत्ते यच्चात्ति विषयानिह । यच्चास्य संततो भावस्तस्मादात्मेति कथ्यते ॥

जो कीं सर्वदेशीं काळीं । सर्वही पावला सर्वमेळीं । त्या व्यतिरिक्त पावण्याची शैली । कोण्हे काळीं असेचिना ॥ ६९ ॥ जों जों जेथें अर्पूं बैसे । तंव तें जेणें पावविलेंचि असे । आपण अर्पावें हें नसे । पूर्वींच असे प्राप्त तया ॥ ७० ॥ गगन हें घटीं पाहिजे । तंव तेथें आंथीचि असिजे । ज्या ज्या पदार्थासि मेळविजे । तंव तें सहजे असे तेथें ॥ ७१ ॥ तैसें जें जें तया अर्पूं जाइजे । तंव अर्पितेचि त्यामाजी सहजें । यालागीं सर्वत्र तेणेंचि पाविजे । आत्मा जाणिजे येणें न्यायें ॥ ७२ ॥ आणि सर्वत्र जें कीं वर्ते । ज्याविण घ्यावया नाहीं रितें । तोचि आत्मा जाण निरुतें । आणि भोक्ते सर्वत्र जें ॥ ७३ ॥ सर्वत्र देशीं काळीं वस्त्वंतरीं । विषय भोगी सर्व प्रकारीं । भोक्ता ऐसी जो दुजी सरी । नसे पृथ्वीवरी आत्म्येंविण ॥ ७४ ॥ ह्मणोनि सर्वत्र भोगी विषयांतें । रसरूपादिक निश्चितें । आत्मा ह्मणणें जाण तयातें । भोगी विषयांतें ह्मणोनियां ॥ ७५ ॥ आणि ज्याचें कीं अस्तित्व संतत । कोण्हे देशीं काळीं नव्हे उपहत । सर्वत्र जें असे विस्तृत । तेंचि निश्चित आत्मरूप ॥ ७६ ॥ यालागीं यासि आत्मा ह्मणिजे । जयाविण कांहीं नेणिजे दुजें । सर्वत्र परिपूर्ण जाण सहजें । तस्मात् बोलिजे आत्मा यासी ॥ ७७ ॥ आणीक दुसरें व्याख्यान । तेंही तुजप्रति सांगेन । तऱ्ही सुषुप्तीचा ठाईं सर्वही जाण । उपसंहारण जेथें असे ॥ ७८ ॥ सर्वही इंद्रियें आणि विषयजात । दृश्यमात्र जें जें विश्व समस्त । जयाचा ठाईं लयो पावत । जाण निश्चित तोचि आत्मा ॥ ७९ ॥ यालागीं सर्वही तेणें पावलें । सुषुप्तिप्रलयीं जें लया गेलें । जेथें सकळही सामावलें । जाण निराळें आत्मरूप तें ॥ ८० ॥ तैसेंचि स्वप्नावस्थेच्या ठायीं । जागृतीसि जे पदार्थ भोगिले पाहीं । ते वासनाद्वारा सर्वही । अंगिकारु पाहीं करितसे ॥ ८१ ॥ जागृतीचे जे जे पदार्थ । ते स्वप्नीं वासनेकरूनि घेत । ह्मणोनि आत्मा ऐसें

१ याप्रकारचें. २ प्राप्त झाला; पोंचला. ३ असलेलेंच. ४ निश्चयेंकरून.

बोलिजेत । जाण निश्चित रघुराया ॥ ८२ ॥ तोचि आत्मा जागृतीसी । इंद्रियद्वारा विषयांसी । भोगितसे समस्तांसी । ह्मणोनि साक्षि आत्मा ह्मणती ॥ ८३ ॥ तेचि तुर्यावस्थेच्या ठायीं । अनुस्यूत भाव तयाचा सर्वही । तेवांचूनि दुजें नाहीं । अवस्थातिहींमाजी अखंड ॥ ८४ ॥ एवं सर्वत्र सर्व तेणें पाविजेलें । सर्वत्र सर्व तेणें घेतलें । सर्वत्र विषय भोगिले । आणि निराळें सर्वत्रपणें ॥ ८५ ॥ एस आत्माशब्दाचें निरूपण । सांगितलें तुजलागून । आतां परशब्दाचें निरूपण । सावधान परियेसीं ॥ ८६ ॥ तरी निरतिशय जयाच्या ठायीं । ज्याहूनि अतिशय कोठेंचि नाहीं । सर्वांचें जें अधिष्ठान पाहीं । ब्रह्मादिकांही श्रेष्ठ तें पर ॥ ८७ ॥ बृहत् ब्रह्म ह्मणिजे । बृहत्शब्दें थोर जाणिजे । त्याहूनि थोर नाहीं दुजें । यालागीं ह्मणिजे परब्रह्म ॥ ८८ ॥ ब्रह्मपदाचें दुसरें व्याख्यान । तेंही सांगों तुजलागून । जेणें बुझसी संपूर्ण । ब्रह्म परिपूर्ण पर्णत्वें ॥ ८९ ॥

॥ संमति श्रुति ॥ अव्यावृत्ताननुगतं वस्तु ब्रह्मेति भण्यते ॥

कोण्हापासाव नाहीं परतलें । सर्वत्र तेंचि असे संचलें । दुसरें नाहीं तयावेगळें । कोठूनि व्यावर्त्तलें ह्मणाल ॥ ९० ॥ आणि पदार्थ जेथ साच नाहीं । तेथ तें परतेल कोठोनि कायी । ह्मणोनि सर्वत्र तेंचि पाहीं । अनपायी परब्रह्म ॥ ९१ ॥ आणि जें कोठें नाहीं अनुगत । तेंचि तें बोलें अननुगत । येक वस्तु जरी भासत । तदंतर्गत तें अनुगतार्थ ॥ ९२ ॥ घटमठादि साच असती । तरीच तेथें गगनाची अनुगति । घटमठादि अननुगति । तेंचि तें सर्वार्थी येक जाण ॥ ९३ ॥ रज्जु जैसा सर्पी अनुगत । ऐसें ह्मणतांचि अनर्थ होत । सर्प नाहीं साच दिसत । तेथ अनुगत कोणामाजी ॥ ९४ ॥ नातरी शुक्ति रजतीं अनुगत ह्मणतां । हेंही असंबद्धचि सर्वथा । रूपें विचारें विचारितां । नये हाता प्रवर्त्तेंही ॥ ९५ ॥ तैसें विश्वीं ब्रह्म अनुगत । ह्मणणें हें परम अनुचित । विश्व विवर्तरूपें असे भासत । नाहीं यथार्थ ब्रह्मेंविण ॥ ९६ ॥ यालागीं ब्रह्मेंवांचूनी दुसरें । न देखिजे साचोकारें । अव्यावृत अननुगत हें खरें । यालागीं निर्धारें ब्रह्म जाण ॥ ९७ ॥ आणि परब्रह्म यातेंचि ह्मणिजे । थोराचा थोर नियंता जाणिजे । ब्रह्मादिनियंता ज्यातें नेणिजे । तोचि सहजें परमेश्वर ॥ ९८ ॥ इत्यादि विशेषणीं इहीं । परब्रह्म बोलिजे पाहीं । तेंचि जाणतें सर्वांही । जाण निःसंदेहीं रघुनाथा ॥ ९९ ॥ येणेंचि गा सर्वही जाणिजे । अंतर्बाह्य येणेंचि सुझे । साक्षीचतन्य तेंचि सहजें । जाणोनि राहिजे सर्वथा ॥ १०० ॥ बाह्य सांडोनियां मनोवृत्ति । करावी सर्वदा प्रत्यक्स्थिती । प्रत्यक् तेंचि सर्वार्थी । करीं वृत्ति एतद्रूप ॥ १ ॥ हे सांगितली ब्रह्मखूण । हेचि ओळखूनि राहें पूर्ण । सर्वदा येथेंचि ठेवनि मन । बाह्यस्फुरण टाकावें ॥ २ ॥ हेचि प्रत्यङ्मुखस्थिति । अभ्यासावी गा श्रीरघपती । तेथ राहणें ते जीवन्मुक्ति । नाहीं विमतिपात्ती रघुराया ।

---

१ समजशील. २ प्राप्ति; जाण. ३ मागाहून मेळले, प्रविष्ट, झालेलें. ४ समजतें. ५ या रूपाची.

॥ ३ ॥ हेंचि जाणपां आत्मार्चन । जें करी निरंतर आत्मानुसंधान । स्वस्वरूपीं अवस्थान । येर तें गौण बाह्यभक्ति ॥ ४ ॥ आणीकही जाणावयाचि म्हणून । सांगेन आत्मयाचें लक्षण । तद्रूप राहोनि आत्मार्चन । करीं भजन सुखवरी ॥ ५ ॥

यत्र भावा हि स्पदंते निर्मियंते च येन वा । तमेवात्मानमानंदरूपं जानीहि राघव ॥ ४ ॥

अगा सकळ देहआदिकरूनी । मनबुद्धिअहंकारादिश्रेणि । किंबहुना जें श्रवणीं नयनीं । आसे मनीं दृश्यटवाळ ॥ ६ ॥ यया सर्वांतें भाव ह्मणती । हे सर्वही जिये ठायीं भासती । तें परब्रह्म जाण आनंदमूर्ती । आत्मा ह्मणती तयातें ॥ ७ ॥ आणि जेणें याचा निर्णय कीजे । हे घट पट ऐसें संज्ञा जाणिजे । हेयउपादेयत्वें घेईजे सांडिजे । तेंचि सहजें परमात्मा ॥ ८ ॥ किंबहुना जेणें हें सर्वही जाणसी । ज्याच्या ठाईं भासलें देखसी । तोचि आनंदरूप परियेसी । आत्मा ऐसी संज्ञा जया ॥ ९ ॥ तऱ्ही सूक्ष्मविवेकदृष्टी । विचारूनि पाहसी जैं जगजेठी । तैंचि होय आत्मेनसि भेटि । निश्चय पोटीं दृढ धरीं ॥ ११० ॥ हेंचि आत्मयाचें वोळखण । वोळखोनि तदाकार करीं मन । विश्वानिरासें संपूर्ण । पावती म्हणून जाणसी ॥ ११ ॥ तेंचि निरसन कैसें कीजे । तेंहि सांगों तुज श्लोकव्याजें । तेणेंकरूनि बुझिजे । म्हणून जाणिजे रघुराया ॥ १२ ॥

यद्यज्ज्ञेयमिदं तत्वं नेति संत्यज्य युक्तिभिः । प्राप्यावशिष्टचिन्मात्रं सोऽहमस्मीति भावय ॥ ५ ॥

अगा अहंकारादिकरूनी । जें जें ज्ञेय तुजलागुनी । मनादिइंद्रियें ज्याचेनी । जाणती अरंवसेनि तें तें ज्ञेय ॥ १३ ॥ अगा नेत्रीं जें जें देखिजे । तें तें सर्वथा ज्ञेय जाणिजे । मनें जें जें कांहीं कल्पिजे । निश्चय कीजे बुद्धीनें साच ॥ १४ ॥ श्रवणें जें कांहीं श्रुयमान । तें तें रघुनाथा ज्ञेय जाण । त्वचा कीजे जें जें स्पर्शन । रसास्वादन रसनादिकीं ॥ १५ ॥ वाचा जें जें कांहीं बोलिजे । घ्राणें गंध आस्वादिजे । करचरणें आपादिजे । घेइजे देइजे जें जें कांहीं ॥ १६ ॥ तें तें सर्वही ज्ञेय जाण । ज्ञेय तितुकें दृश्य पूर्ण । दृश्य ज्ञेय तें मिथ्या जाण । कल्पित भान अधिष्ठानीं ॥ १७ ॥ तें श्रुतिमुखें 'नेति नेति'। इतुकियाचा निषध करिती । तें तें त्यजावें सर्वार्थी । सद्युक्तिकरूनियां ॥ १८ ॥ तया ज्ञेयालागीं श्रुति । 'नेति नेति' ऐसें ह्मणती । दृश्य तें वस्तु नव्हे गर्जती । व्यतिरिक्त गति ब्रह्मचि पैं ॥ १९ ॥ सर्व ज्ञेयाहूनि विलक्षण । सर्वा निषेधाचें अधिष्ठान । तेंचि तें परब्रह्म जाण । बोलती म्हणून स्वयें श्रुति ॥ १२० ॥ जें जें ज्ञेय गा तुजलागुनी । तें तें त्यजावें युक्तीकरूनी । त्यजितां उर्वरित जें निर्वाणीं । कोदंडपाणी तोंचि ब्रह्म ॥ २१ ॥ त्या युक्ति कोण कैसिया । त्याही तुज[illegible]गा श्रीरघुराया । जो जाणे [illegible]त्रया । म्हूण आत्मयाची जाणे तो ॥ २२ ॥ आणि आत्मेनि जें जें जाणिजे ।

---

१ अहंकार, इत्यादि परंपरा. २ घेणें व सोडणें या रूपांनीं. ३ श्लोकाच्या रूपानें. [illegible]

स्वप्रकाशें जें प्रकाशिजें तें तें। ज्ञेय जाण सहजें। तें तें त्यजिजे हेचि खूण ॥ २३ ॥ यदर्थी संमति श्रीभागवतीं। श्रीभगवंत बोलिले उद्धवाप्रति। तोचि हंसरूपें ब्रह्मयाप्रति। उपदेशिती सनकादिकां ॥ २४ ॥

संमतिश्लोक ॥ यावन्नानार्थधीः पुंसो न निवर्तेत युक्तिभिः। जागर्त्यपि स्वपन्नज्ञः स्वप्ने जागरणं यथा ॥

जोंपर्यंत युक्तिकरूनि पुरुषासी। नानाधी न निवर्ते निश्चयेंसी। तंव अज्ञान न तुटे गा परियेसीं। जाण तो राशि अज्ञानाचा ॥ २५ ॥ आणि ब्रह्मीं जे नानात्व देखती। ते मृत्यु उपरी मृत्युचि पावती। ऐसें स्वयें बोलतसे श्रुति। आयिक भूपती रघुनाथा ॥ २६ ॥

॥ संमतिश्रुति ॥ मृत्योः स मृत्युमाप्नोति य इह नानेव पश्यति ॥

ते अर्थावरपडे होती। नानापरींचीं दुःखें भोगिती। चौऱ्यांयशीं लक्ष जन्म पावती। कोटिकल्पांतींसुटेचिना ॥ २७ ॥ अगा तो जागाचि परि निजेला। जो नानात्वें विश्व देखों लागला। नाहो निद्रितासि जगदाभास निमाला। हा तंव विश्वाला देखतु असे ॥ २८ ॥ तरी निद्रिस्तुही स्वप्नीं विश्व देखतु। उभयतां भेदु नाहीं निश्चितु। तरी तो निजला हा जागतु। भेद बहुत दोघांजणा ॥ २९ ॥ तरी निद्रिस्तुही स्वप्नीं जागा असे। जागृतिचा व्यवहार करितसे। ह्मणोनि उभयतां भेदु नसे। दोघे पिसे भ्रांतिबळें ॥ ३० ॥ ह्मणोनि नानाकारें[१] विश्व देखतु। स्वप्नस्थाकारें[२] असे भ्रांतु। आतां युक्तीही सांगेन जाण तूं। परीस मातु रघुराया ॥ ३१ ॥ ह्मणोनि त्यजावी नानाबुद्धी। निरासितां उरे शेष अवधि। तोचि युक्ती करूनियां साधीं। युक्ती सुबुद्धी त्या ऐसिया ॥ ३२ ॥

॥ संमति श्लोक ॥ यो जागरे बहिरनुक्षणधर्मिणोऽर्थान् भुंक्ते समस्तकरणैर्हृदि तत्सदृक्षान्।
स्वप्ने सुषुप्त उपसंहरते स एकः स्मृत्यन्वयात् त्रिगुणवृत्तिदृगिंद्रियेशः ॥

जे स्थूळ पदार्थ देहादिकरुनी। जेकीं कीं अनुक्षणधर्मी[३] भरंवसेनी। परिणामवंत नाशवंत तत्क्षणीं। दिसती नयनीं दृश्यपणें जे ॥ ३३ ॥ बाल्यतारुण्यादि जरा। परिणाम क्षणाप्रति नश्वर खरा। ऐसेया पदार्थांतें वीरा। भोगी करणद्वारा[४] जागृतीसि जो ॥ ३४ ॥ त्या बाह्यस्थूला समस्ता अर्था। तत्वतां तोचि आत्मा जाण सर्वथा। जो कीं जागृतीसि भोगितां। घेई सर्वथा युक्तिकरुनी ॥ ३५ ॥ तोचि स्वप्नीं सीताकांता। जागृतीऐसिया भोगी पदार्था। ते वासनामय अंतरीं चित्ता। भोगी तत्वता जागराऐसा ॥ ३६ ॥ तोचि येकु सुषुप्तीचां ठाईं। सर्वांचा उपसंहार करूनि सर्वही। स्वस्वरूप येकसा पाहीं। अनपायी[५] साक्षिभूत ॥ ३७ ॥ तोचि अवस्थांचा द्रष्टा। येकला येकुचि जाण वीरश्रेष्ठा। येथ आशंका असती स्पष्टा। तिहींचा द्रष्टा येकुचि कैसा ॥ ३८ ॥ तंव सर्वही इंद्रियें जागृति देखती। स्थूळ पदार्थांतें इंद्रियें घेती। तियेसिच जागृती

---

१ अनेकत्वयुक्त बुद्धि. २ स्वाप्नामधील आकारांनीं. ३ क्षणोक्षणीं बदलणाऱ्या धर्मांनीं युक्त. ४ इंद्रियांनीं. ५ अपायरहित.

ह्मणती । द्रष्टेपण निश्चिति इंद्रियां आलें ॥ ३९ ॥ तैसेंचि मन प्रकाशी स्वप्नावस्था । तत्संस्कारबुद्धि जे कीं रघुनाथा । तेचि प्रकाशी सुषुप्त्यवस्था । आत्मा देखतां येथ कैंचा ॥ १४० ॥ तरी अवस्थात्रयाचा द्रष्टा । येकुचि आत्मा कैंचा ऋषिश्रेष्ठा । तऱ्ही आत्मा इंद्रियांचा ईशु सुभटा[1] । करी उत्कटा प्रकाशसिद्धि ॥ ४१ ॥ नाहो इंद्रियें आणि प्रकाशक । विश्व तैजस प्राज्ञ हे देख । हे अवस्थांचे अभिमानी सम्यक । अवस्था सकळिक प्रकाशिती ॥ ४२ ॥ येथें आत्म्यासि कैंचें द्रष्टेपण । ऐसें ह्मणसी तरी आइकें वचन । विश्व प्रकाशी जागृति जाण । तरी तो स्वप्न प्रकाशीना ॥ ४३ ॥ तो जागृतिचाचि अभिमानी । परी न प्रकाशी अवस्था दोन्ही । इतुकें सामर्थ्य त्यालागुनी । कासुर्कपाणी असेचिना ॥ ४४ ॥ जो जिये अवस्थेचा अभिमानी । तोचि प्रकाशी तियेलागुनी । दुसरीचें ज्ञान अन्याचेना । भर्वसेनि न करवे ॥ ४५ ॥ अभिमानी आणि अवस्था त्रयासी । येकु आत्मचि स्वयें प्रकाशी । येके काळेंचि सर्वांसी । स्मृत्यन्वयेंसि[2] जाणतु ॥ ४६ ॥ पहिलें स्वप्न देखिलें ऐसें ह्मणे । सुषुप्तिकाळीं स्वसुख भोगणें । तेंचि सुख सांगणें जागेपणें । विषय भोगणें जागृतीसि ॥ ४७ ॥ ऐसें तिहीं अवस्थांचें ज्ञान । एक समयीं येकला करी पूर्ण । आणि अभिमानी विश्व तैजस प्राज्ञ । जाणे संपूर्ण इंद्रियांसहित ॥ ४८ ॥ तैसेंचि बाल्यतारुण्यादिजरा । त्यामाजी भोगिलेंही सुखसंभारा । दिनघटिकादि सर्व पसारा । जाणें रघुवीरा एक समयीं जो ॥ ४९ ॥ ऐसिया सुखेंकरूनि श्रीरामा । जाण अवस्थादिकांचा द्रष्टा आत्मा । ज्यातें प्रकाशी दृश्यगरिमा[3] । त्यावी उपरमा नेतिमुखें ॥ १५० ॥ ऐसिया सद्युक्तीकरूनि । दोन्ही भिन्न केलीं संपूर्ण । द्रष्टा तो आत्मा सर्वज्ञ । दृश्य जाण प्रकाश्य तें ॥ ५१ ॥ ऐसिया सद्युक्तीकरूनि रघुपती । आत नेति मुखें निषेधिति । तें तें त्यजावें गा सर्वार्थी । पावसी अंतीं अवशिष्टातें ॥ ५२ ॥ उरेल जें चिन्मात्र निरंजना । तें सर्वनिषेधें प्राप्त जाणा । स्वयेंचि भेटे ज्ञानघना । जाणतें जाण सर्वांचें जें ॥ ५३ ॥ जेथें ज्ञेयमात्र कांहीं न भासे । केवळ ज्ञानमात्रचि प्रकाशे । तेंचि ब्रह्म पावणें ऐसें । जाण विश्वासें सर्वेश्वरा ॥ ५४ ॥ तोचि मी असें अनुसंधान । दृढ धरूनियां राहे संपूर्ण । ‘भाँवय[4] शब्दें हेचि खूण । भावना अज्ञान कोण्ही ह्मणेल ॥ ५५ ॥ भावना शब्दाचा ऐसा अर्थ । एक पदार्थीं अन्य भाविजेत । पाषाण देव ऐसें ह्मणिजेत । मृत्पिंड[5] भावित गणशगौरी ॥ ५६ ॥ धातूचिया मर्तिपाहीं । तेथ भावी देवो देवी सर्वही । दर्भमुष्टीचा[6] यजमानही । भाविती सर्वही अन्य पदार्थीं ॥ ५७ ॥ आणि येकेचि मूर्तीमाजी जाण । महिषचंडिका आसन । त्रिशुळादिआयुधाभरण । छत्रव्यजनचामरादिक ॥ ५८ ॥ हें येकेचि पितळेचा ठाईं । इहीं चिन्हीं

१ हे उत्तम वीरा. २ स्मृति असल्यामुळें, ३ दिसणाऱ्या पदार्थांचा मोठेपणा. ४ श्लोकांतील ‘कल्पना’ या पदांनीं. ५ मातीचें ढेकूळ. ६ मूठभर दर्भांचें ठिकाणीं कल्पिलेला.

येकचि मूर्ति पाहीं । महिषावमर्द्यादिसर्वही । भावी कांहीं त्याचिमध्यें ॥ ५९ ॥ ययाचें नाम भावना ह्मणिजे । तैसें हें तों नव्हे सहजें । आपणचि आत्मा शुद्ध जाणिजे । तेथें भावना कीजे कोणें कोणाची ॥ १६० ॥ ऐसा हा व्याकरणार्थ । स्वयेंही सिद्ध करी वेदांत । श्रीवसिष्ठाचाही हा मनोगतार्थ । मीही तदन्वयार्थ बोलिलों ॥ ६१ ॥ ह्मणोनि ह्मणे गा श्रीरघुपती । सर्वनिषधें उरे जे चिन्मूर्ति । तेचि निर्धारूनि स्वयें स्थिति । विश्वमूर्ती तद्रूपें राहीं ॥ ६२ ॥ यासीचि नाम गा आत्मार्चन । स्वस्वरूपें राहणें संपूर्ण । इतर तें ययाचें साधन । जाण ह्मूण रघुराया ॥ ६३ ॥ जें कीं सर्वांचा निषेध करूनी । ज्ञानमात्र उरे जें कोदंडपाणी । तें भिन्न नव्हे गा तुजहूनि । सादरें आकर्णी सांगेन तें ॥ ६४ ॥

ज्ञानं न भवतो भिन्नं ज्ञेयं ज्ञानात्पृथक् न हि । अतो न त्वितरं किंचित्तस्माद्भेदो न विद्यते ॥ ६ ॥

अगा ज्ञान जयातें ह्मणिजें । जे सर्वांतें प्रकाशक बोलिजे । तें तुजविण भिन्न न देखिजे । तूंचि सहजें ज्ञानस्वरूप ॥ ६५ ॥ आणि ज्ञानें करूनि जें गमिजे । तयातें ज्ञेय ऐसें ह्मणिजे । ज्ञेयही ज्ञानेसि नव्हे दुजें । ज्ञेय तें जाणिजे निखिल ज्ञान ॥ ६६ ॥ भ्रममात्र जो ज्ञेयाकार । भासे जो कीं जगडंबर । त्याचें अधिष्ठान साचार । ज्ञेय परिकर तेंचि ज्ञान ॥ ६७ ॥ अगा पदार्थी जो चैतन्यांशु । आणि इंद्रियवृत्तिमाजी जो परेशु । येकत्र जालिया होय प्रकाशु । अन्यथा भासु व्यक्तीसि नये ॥ ६८ ॥ एवं घटपटपदार्थजाति । चैतन्यचि अधिष्ठान सुमती । पदार्थ मृगांभतुल्य[2] असती । चैतन्यमूर्ति अखंड ॥ ६९ ॥ इंद्रियवृत्ति आणि पदार्थ । दोन्ही अप्रकाशत्वें मिथ्याभूत । उभयतां चैतन्य अनुस्यूत[3] । जाण निश्चित दनुजांतका ॥ १७० ॥ एवं प्रकाशक उभय प्रकाशिता चैतन्य सर्वत्र गा रघुनाथा । आभास टाकूनियां तत्वतां । पाहें उभयतां काय असे ॥ ७१ ॥ अगा जडीं नसतां चैतन्य । कदापि नव्हे तयाचें भान । इंद्रियवृत्तिमाजी नसतां चिद्घन । पदार्थभान कदा न करी ॥ ७२ ॥ जड जडातें कदा न प्रकाशी । यालागीं चैतन्याचि आपआपणा प्रकाशी । मध्यें आन भासे तेंचि निश्चयेंसि । भ्रांति आपैसी रघुराया ॥ ७३ ॥ एवं ज्ञेय आणि ज्ञान । उभयतां जाण चैतन्यघन । तेंचि तूं रघुनाथा आपण । वांचूनि येक भिन्न परस्परें ॥ ७४ ॥ ज्ञेय ज्ञान आणि आपण । हेंही शब्दाचीच मिरवण । वांचूनि एकचि निखिल चैतन्य । अनुभवें जाण रघुनाथा ॥ ७५ ॥ अगा स्थूळदृष्टी जे बाह्य देखती । त्यांचि कोटि कल्प न तुटे भ्रांति । सूक्ष्मदृष्ट्या अनुभवें पाहती । चैतन्यस्थिति तयां बाणे ॥ ७६ ॥ आपणही सर्वांचा ज्ञाता । तो तंव ज्ञानस्वरूपाचि तत्वतां । ज्ञानचि येतसे ज्ञेयार्था । ह्मणोनि एकार्था स्वयेंचि येत ॥ ७७ ॥ या कारणास्तव गा रघुनाथा । दुसरें नाहीं गा त्रिजगतीं । इतर असंत भेदमतीति । निश्चयार्थी जाण रामा

---

१ उघड करून सांगितलेला अर्थ. २ मृगजळाप्रमाणें. ३ चैतन्याचा संबंध ठेवून असलेलें.

॥ ७८ ॥ सुवर्णाची केली अंबिका[1] । महिषत्रिशूळादि आयुधें देखा । नानारूपें काये सुवर्णीं येका । भेदलेखा[2] होईल ॥ ७९ ॥ नातरी घृताचे थिजलेंपणें । नानाकणिकीं अनेकपणें । भेदलें काय आन होणें । घृताकारणें आलें तेथें ॥ १८० ॥ नाना पटाचिया कुसरी । अनेक चौकडियांच्या भरोवरी । परी येकुचि पट सर्वांपरी । गोठी दुसरी असेचिना ॥ ८१ ॥ नानाकुसरी नानाप्रकार । केले तरी नाना भेदांतर । सर्वत्र येकचि तंतु निर्धार । नाहीं विचार आन कांहीं ॥ ८२ ॥ पाहातां भ्रांतीचिया दृष्टी । नाना विचित्र रंग भासती पटीं । तेथें तो अनेकत्व प्रगटी । नाहीं भेटि तंतविण ॥ ८३ ॥ जो कीं नानाप्रकारांतरी । येकचि तंतु दिसे अंबरीं[3] । त्यासि भेदु पळे दुरिच्या दुरी । तत्व निर्धारीं तो राहे ॥ ८४ ॥ तैसें एकाच ब्रह्माचा ठाई । जेथें ज्ञानादि भासती पाहीं । तैसेंचि हें विश्व विचित्र सर्वही । अनपायीं ऐसें भासे ॥ ८५ ॥ परी तें अज्ञानासिचि रघुनाथा । ज्ञानियासि नाहीं गा तत्वतां । अविचारीं भेदसिद्धि ताता । विचारीं सर्वथा असेचिना ॥ ८६ ॥ ह्मणोनि विचारें पाहातां रघुपती । आपणेंविण न भासे त्रिजगतीं । तेथें नाहींच अन्यव्यक्ति । जाण निश्चितीं विबुद्धनाथा ॥ ८७ ॥ भेदु तो तंव पारमार्थिक असे । पारमार्थिकज्ञानेंही न नासे । भेद ज्ञानें नासता तऱ्ही प्रत्यक्ष दिसे । यालागीं जसे औपाधिक[4] हा ॥ ८८ ॥ अज्ञानउपाधीकरून । ब्रह्मीं भेद भासे जाण । अज्ञान नासल्या चैतन्यघन । ब्रह्म परिपूर्ण पूर्णत्वें ॥ ८९ ॥ केशांतरीं ठेविला स्फटिक । दिसे भेदावला सम्यक । उपाधि गेलिया येका येक । शुद्ध देख भासतसे ॥ १९० ॥ जपाकुसुमाची[5] संगति । शुभ्राचि स्फटीक पावे आरक्ति । निळेन निळेपणाचि व्यक्ती । उपाधीनें भासती रघुराया ॥ ९१ ॥ तैसें सर्व अज्ञानकृत । नानात्वेंचि भेद भासत । उपाधिनिरासें सदोदित । जाण निश्चित अद्वयब्रह्म ॥ ९२ ॥ ह्मणोनि भेदु नाहींच सर्वथा । भेद प्रतीति होतसे भ्रांता । तो भेदु टाकूनि घेईं येकात्मता । मग तूंचि तूं सर्वथा सर्वत्र ॥ ९३ ॥ अगा तूं ऐसें जरी ह्मणसि रघुपती । विष्णुविरिंचिशिवादि[6] मजहूनि भिन्न दिसती । आणि त्यांची कर्तृत्वेंही भिन्न भासती । भेदुव्यक्ति तेणें येतसे ॥ ९४ ॥ तरी आयिक रघुनाथा उत्तर । तद्रुपें करिसी तूंचि व्यवहार । बाहेरि नामरूपाचेंचि वोडंबर । असे अंतर एकत्वें एकु ॥ ९५ ॥

ब्रह्माविष्णुशिवेंद्राद्या यद्यत्कुर्वंति सर्वतः । तदहं चिद्वपुः सर्वं करोमीत्येव भावय ॥ ७ ॥

अगा ब्रह्मा करी विश्वोत्पत्ति । विष्णु पालन करितसे स्थिति । रुद्र संहारी प्रलयांतीं । इंद्रादिक करिती तें आयिका ॥ ९६ ॥ सस्यादि[7] वृद्धि पर्जन्यद्वारा । मघवा[8] करितसे गा रघुवीरा । सूर्य प्रकाशी चंद्र तारा । औषधिसंभारा पोषिती ॥ ९७ ॥ अग्नीनें पचवावें

---

[1] देवीची मूर्ति. [2] भिन्नपणा. [3] वस्त्रांत. [4] उपाधि संबंधाचा. [5] जास्वंदाच्या फुलाची. [6] विष्णु वगैरे. [7] धान्यें वगैरे वाढविणें. [8] इंद्र.

सर्व अन्न । कृतांतें करावें सर्व हरण । वायूनें प्राणादिकांचें चलन । तृषाहरण जळादिकीं ॥ ९८ ॥ तैसेंचि अष्टौलोकपाळ । करिती जो व्यवहार सकळ । आणीकही शेषादि नागकुळ । पृथ्वीतलधारणादिका ॥ ९९ ॥ इत्यादि सर्वत्र जें जें करिती । तद्रूपें तूंचि येकु जानकीपती । ऐसेंचि अनुसंधान विश्वमतीं । सर्वदा चित्तीं धरावें ॥२००॥ जो कीं ज्ञानरूप तूं आपण । तया स्वरूपाचा ठाई सर्व निर्माण । ऐसी अनुभवें जाणोनि खूण । राहावें संपूर्ण रघुराया ॥ १ ॥ अगा अपूर्णत्व बाणल्या आपुलें । तेथें आपणचि कर्तें भोक्तें सर्व जालें । आपणाचिविण काये उरलें । सांग वोहिलें रघुपुंगवा ॥ २ ॥ आपुलिया अनुभवेंकरुनी । पाहें रघुराया विचारुनी । आपुलेविण जनीं वनीं । नाहीं त्रिभुवनीं आपणाविण ॥ ३ ॥ येथें ब्रह्मादिक दुसरेपणें । कर्त्तव्यालागीं भास उरणें । सर्वत्र तुजवांचूनि दुजेपणें । न देखिजे कोण्हें प्रकारेंकरुनी ॥ ४ ॥

अहं सर्वमिदं विश्वं परमात्माहमव्ययः । न भूतं नास्ति नो भावी मत्तोऽन्यदिति भावय ॥ ८ ॥

अगा जें कीं इदमाकारास्पद । दृश्य जें कीं विश्व विशद । तें सर्वही मीचि हा बोध । अनिर्बाध जो कीं उपजे ॥ ५ ॥ ययाचेंचि नाम आत्मार्चन । सर्व विश्व मीचि हें अनुसंधान परमात्मा जो चिदैकघन । तो मीचि पूर्ण पूर्णत्वें ॥ ६ ॥ आणि कालत्रयीं जया व्ययो नाहीं । तो मी निर्वेदु अव्ययो पाहीं । मजविण कोण्ही पदार्थ नसहा । मीचि मी सर्वही सर्वपणें ॥ ७ ॥ आणि मजआधीं हे विश्व नव्हतें । ना आतांही नाहीं दिसतें । पुढेंही नव्हेल मागुतें । मीच मी सर्वार्थे येकला येक ॥ ८ ॥ मजविण आणीक कांहीं । आत्मत्वीं दुजी मातु नाहीं । ऐसेंनि अनुसंधानें राहीं । अनुभवें नाहीं पाहतां दुजें ॥ ९ ॥ भावयशब्दें भावना । हे पूर्वींच निवेदिली लक्षणा । भावयशब्दें याचि अभिधाना । येथें जाणा आलासे ॥ २१० ॥ भावयशब्दाचा अर्थ जाण । तद्रूपचि राहणें परिपूर्ण । ऐसें जें सर्वदा सर्वत्र अनुसंधान ।आपणाविण दुजें न देखे ॥ ११ ॥ अर्थापेक्षा अर्थन । पदाचें सर्वत्र कीजे जाण । येथें ऐसेंचि व्याख्यान । पाहिजे पूर्ण रघुराया ॥ १२ ॥ भावनाशब्दें भावना कीजे । तरी ब्रह्मस्थिति न बोलिजे । तियेतें उपासना म्हणिजे । वर्म सहजें जाण रामा ॥ १३ ॥ येथें बोलिजतसे ब्रह्मस्थिति । उपासनापर न कीजे व्युत्पत्ति येथें ऐसेंचि व्याख्यान सर्वार्थी । केलिया स्थिति सर्व पूर्ण साभे ॥ १४ ॥

एकं ब्रह्म चिदाकारं सर्वात्ममुखमण्डितम् । निष्कं भूरि वाऽशेषमिति भावय यत्नतः ॥ ९ ॥

ययालागीं तूं रघुनाथा । येणेंचि अनुसंधानें राहे तत्वतां । एक ब्रह्म मी नाहीं अन्यथा हेंचि ताता अनुसंधावें ॥ १५ ॥ तेंचि तूं ब्रह्म तदाकार । ज्ञानस्वरूप निर्विकार । सर्वात्मक अखंड निर्धार । निष्कंपतर[3] जाण तूं ॥ १६ ॥ जयासि नाहीं चळविकार । तेंचि निष्कंप निर्विकार । तेंचि तें परब्रह्म साचार । ब्रह्म प्रचुर[4] अप्रमेय ॥ १७ ॥ आणि सर्वात्मक ऐसें ।सर्वही सर्वत्र तेंचि असे । नामरूपादि वरी वरी भासे । विचारें वसे तेंचि तें कीं

---

१ लौकर. २ ध्यानांत ठेवावें. ३ अतिशय कंपरहित. ४ विपुल.

॥ १८ ॥ जैसें पड्रसांचें लोपिजे जीवेंन । त्या जीवना कटुवम्लत्वें घेती जीवजन । तयां पड्रसांचें होतसे भान । परी नेणती जळ जाण सर्वात्मक ॥ १९ ॥ नेणत्यां पड्रसांची प्रतीति । ज्ञानी ते सर्व उदकचि देखती । स्वादुरसभेदें जळाचि जाणती । जळचीं स्थिति रसात्मक ॥ २० ॥ नातरी हेमामाजी कटककुंडल । नामरूपाचि भासे सकळ । परी येक सुवर्णचि केवळ । जाण निर्मळ सर्वात्मक ॥ २१ ॥ नातरी शर्करेचा परिवार । अश्वकुंजरचतुरंगभार । परी सर्वात्मक ते शर्करा साचार । जाण विचार तेथ कैंचा ॥ २२ ॥ घृतकणिकीं अनेकपण । एक घृतासिचि भासे पूर्ण । परि घृताचि वांचूनि नाहीं आन । सर्वात्मक जाण ययापरी ॥ २३ ॥ नाना तरंगलहरी अनेकाकार । भासतां तेंही एकचि नीर । अवयवसमुदाय एकचि शरीर । समुदाय अक्षरें येकी वाचा ॥ २४ ॥ नानारागीं यकाचि गीत । नाना शब्दीं एकाचि अर्थ । तैसें ब्रह्म हें सदोदित । आन भावीत ते भ्रांति ॥ २५ ॥ तैसें सर्वात्मक ब्रह्म जाण । विश्व हें नामरूपाचे अभिधान । परी तें ब्रह्मचि परीपूर्ण । तूंचि तूं निर्वाण परब्रह्म ॥ २६ ॥ तैसें अखंड जें कीं देशेंकाळें । खंडेना जें कीं वस्तुमेळें । तेंचि तें अखंड निराळें । अवस्थाकाळें पालटेना ॥ २७ ॥ तैसें भूरिशब्दें बहुवाचक । जें सर्वत्र पूर्णव्यापक । अशेष शब्दें तेंचि सम्यक । नाहीं आणीक दुजें कांहीं ॥ २८ ॥ अथवा दुसरें व्याख्यान ऐसें । पृथ्वीचे परी अशेष असे । ह्मणजे समग्रपणें तेंचि तें वसे । आन नसे स्वतंत्र ॥ २९ ॥ काष्ठ पाषाण वृक्ष लता । सानूंचि शिखरें पर्वता । रत्नादिमणी धातु सर्वथा । हें सर्व वस्तुता पृथ्वीच जैशी ॥ ३० ॥ तैसें जें भासे पदार्थाकार । दृश्यमात्र जें कीं मनोहर । तें अशेषही निर्विकार । ब्रह्म साचार रघुनाथा ॥ ३१ ॥ नानाप्रयत्नेंकरुनी । ऐसी स्थिति साधी कोदंडपाणी । दुजें न भासे आपणावांचुनी । राहे निर्वाणीं तेणें बोधें ॥ ३२ ॥ हें बाणावयाचे उपाय कोटि । मागां सांगितलें गा जगजेठी । त्यांकरुनी होई या सृष्टीं । तुजविण गोठी नाहींच करीं ॥ ३३ ॥ ऐसा अनुभव बाणलिया । तेंचि आत्मार्चन रघुराया । नाहीं विश्वीं आपणावांचुनियां । अनुभव यया नाम बोलिजे ॥ ३४ ॥

नाहं न चान्यद्वस्त्वस्ति ब्रह्मैवास्ति निरंतरम् । आनंदपूर्णं सर्वश्चेत्यनुद्वेगमुपास्यताम् ॥ ११ ॥

ययालागीं गा श्रीरघुपती । हेंचि अनुसंधान असों दे चित्तीं । मी तंव अहंपणें नयें व्यक्ती । नव्हे सर्वार्थी अन्य वस्तूही ॥ ३५ ॥ मी नव्हे आणीक वस्त्वंतर । किंचित कदाचित् नव्हे सर्वत्र । एक ब्रह्मचि निरंतर । बाह्यांतर मीचि येकु ॥ ३६ ॥ निरंतर ह्मणिजे अखंडदंडायमान । सर्वदा कालत्रयीं अबाध्य जाण । देशें काळें नाहीं खंडन । परिपूर्ण पूर्णत्वें ॥ ३७ ॥ तेंचि तें आनंदघन सर्वत्र । जेथें दुजें नाहीं वस्तुमात्र । तेंचि

१ उदक. २ कडु, अंबट इत्यादि रूपांनीं. ४ गोड, कडु, आंबट, खारट, तिखट व तुरट अशा सहा रसांचें. ४ हत्ती, घोडे, रथ व पायदळ अशीं सैन्याची चार अंगें. ५ शिखरें. ६ निराळा पदार्थ.

उपासावें निरंतर । ह्मणिजे साचार तद्रूपें राहें ॥ ३८ ॥ रात्रिदिवस त्रिकाळीं सर्वदा । यातें अनुद्वेग ह्मणिजे प्रबुद्धा । दृश्यत्यागें प्रपंचबाधा । करूनि बोधा राहावें ॥ ३९ ॥ तेंचि आत्मबोधाचे लक्षण । तेंचि तुजप्रति गुह्य सांगेन । येकाग्र करूनियां मन । जेणें समाधान पावसी ॥ २४० ॥

ग्राह्यग्राहकसंबंधे सामान्ये सर्वदेहिनाम् । योगिनः सावधानत्वमेतदर्चनमात्मनः ॥ ११ ॥

सर्व प्राणियांच्या ठायीं । ग्राह्यग्राहकभाव असे पाहीं । सामान्यकारें सर्वही । अनपायी असतचि असे ॥ ४१ ॥ ग्राह्य जें कीं विषय जात । ग्राहका जीवाचे जे जे भोग्य पदार्थ । ग्राहक तो प्रमाता निश्चित । तेणें घेइजेत सर्वही स्वयें ॥ ४२ ॥ हें सामान्यकार सर्वांसिही असे । परी याचें अंतर नेणिजे भ्रंशें । योगी तो येथें सावधान वसे । तेंही कैसें आइक रामा ॥ ४३ ॥ तरी ग्राह्यगाहक तें दृश्यजात । तें साक्षी चैतन्य प्रकाशित । परी तो साक्षी आपण हें निश्चित । वोळखत योगी ॥ ४४ ॥ जेणें या सर्वांतें प्रकाशणें । तया साक्षियातें जाणणें । आणि सर्वही प्रकाशी जेणें । तें ज्ञान जाणे आपणचि ॥ ४५ ॥ जेथ जाणणयाची सावधानता । तेंचि आत्मार्चन गा श्रीरघुनाथा । साक्षी आपण तोचि सर्वथा । त्यातेंचि तत्वतां वोळखणें जें ॥ ४६ ॥ प्रकाशकातें वोळखणें । ग्राह्य तें ग्राहकपणें जाणणें । तेंचि आत्मार्चन मी ह्मणे । जाण या खुणे रघुनाथा ॥ ४७ ॥ आणि ग्राह्य जें कीं ह्मणिजे । तेंही वास्तव ग्राहकचि सहजें । ग्राहकेविण देखिजे । तरी तेंचि वोलिजें वस्तुदृष्टि ॥ ४८ ॥ हें तंव मागां तुज सांगितलें । तें तुजविण ज्ञान नाहीं वेगळें । ज्ञेय ज्ञानेंसि नव्हे निराळें । एकचि भलें पदत्रय ॥ ४९ ॥ ह्मणोनि ज्ञान तेंचि तूं रघुपति । ज्ञेय तोंचि ज्ञान सर्वार्थी । परस्परें तिन्ही भिन्न नव्हती । एकचि असती तत्वदृष्ट्या ॥ २५० ॥ ऐसें जें साधनत्वें देखणें । तेंचि आत्मार्चन मी ह्मणें । तेंचि तें सर्वदा करणें । जाण ये खुणे त्रिदशाधिपा ॥ ५१ ॥ इये स्थितीनें असतां । कर्त्ता नव्हे कर्म करितां । सर्व तोचि जाला सर्वथा । नायके वार्ता दुजयाचि ॥ ५२ ॥ ऐसें साधनत्वें सर्वदा असतां । वरपडे नव्हिजे संसृतिपंथा । तोचि जाण ब्रह्म तत्वतां । सावधानता कायसी तेथें ॥ ५३ ॥ ऐसें ऐकतांचि सद्गुरुवचन । श्रीरघुनाथ स्वयें संपूर्ण । ब्रह्मानंदें वोसंडलें पूर्ण । प्रपंचभान अस्तवलें ॥ ५४ ॥ त्या सुखाची सुखगोष्टि । ब्रह्मानंदें हेलावे सृष्टि । व्युत्थानानंतरें जगजेठी । करील गोष्टी पुढां कैसी ॥ ५५ ॥ येथें संपलें प्रकरण । तें कीं वोलिजे आत्मार्चन । निजानंदें रंगोनि पूर्ण । मीपण नुरवूनियां ॥ ५६ ॥ सहजानंदसद्गुरूनाथ । पूर्ण कृपे कृपावंत । त्याचेनि सत्ते ग्रंथार्थ । प्रगट झाला सहजत्वें ॥ ५७ ॥ पुढतोपुढती हेचि विनवणी । प्रीति पावो सद्गुरुचरणीं । विनवणी सर्वेचि अर्पूनी । पूर्णपणीं पूर्णत्वें ॥ २५८ ॥

इति श्रीयोगवासिष्ठसारे श्रीवसिष्ठरामसंवादे आत्मार्चनप्रकरणं सप्तमं संपूर्णम् ॥

॥ श्रीः ॥

प्रकरण ८ वें.

आत्मनिरूपण.

श्रीगणेशायनमः ॥ श्रीसद्गुरूचिया कृपादृष्टी । होय अपरोक्ष वस्तूचि भेटि । तेथें शब्दब्रह्मवाक्सृष्टि । पावे पुष्टि काय नवल ॥ १ ॥ यालागीं सर्वदा सर्व काळीं । मन रातलें स्नेहें श्रीगुरुचरणकमळीं । घेवोनि तेथिंची सुखनव्हाळी । आनंदमेळीं निमग्न मी ॥ २ ॥ परमानंदाचिया प्राप्ती । सहज इतर विषयीं होय विरक्ति । यालागीं सर्वही नावडती । सर्वदा तृप्ति परमानंदें ॥ ३ ॥ तैसा निमग्न सद्गुरुचरणीं । ह्मणोनि इतर पदार्थांतें न गणीं । तेही दुजेपणें न देखें न नयनीं । येकुयेकपणीं श्रीसद्गुरू ॥ ४ ॥ अहो मायबाप कुळदेवता । गुरु गुरुत्वें पूज्य तत्वतां । नमनें माझिया चित्ता । येकु येकुलता सर्वत्र गुरु ॥ ५ ॥ अहो इष्टदेवतांच्या नमनीं । वंद्यत्वें गणेश शारदा भवानी । परी देखें येकुचि सद्गुरु नयनीं । दुजेपणीं मुकलों मी ॥ ६ ॥ कां मातेलागीं जैसें बालक । भुले देखे सर्वत्रचि एक । तैसें मन माझें सम्यक । श्रीगुरुचि एक सर्वत्र देखणें ॥ ७ ॥ सद्गुरूचेनि प्रसन्नपणें । पुरुषासि एक ज्ञान होणें । ज्ञानें येकें ब्रह्म पावणें । तरीच निवणें परमानंदें ॥ ८ ॥ तैसें नव्हेचि मजलागीं । ज्ञान ज्ञेय ज्ञाता न विभागीं । एक सद्गुरुचि चहूंभागीं । । न देखें जगीं दुजें कांहीं ॥ ९ ॥ ज्ञान ज्ञेय आणि ज्ञाता । तो सद्गुरुचि एकु तत्वतां । ह्मणोनि आनें मोहँर माझिया चित्ता । नव्हे आतां काय करूं ॥ १० ॥ असा हें तंव बोलावें किती । गुरुज्ञान ज्ञाते जाणती । येर तें शब्दज्ञानी नेणती । आत्मप्राप्ति जयां नाहीं ॥ ११ ॥ सद्गुरुमहिमा काय जाणती । शब्दें गुरुशिष्यत्व लोकीं मिरविती । अंतरीं नरत्वें गुरुसि देखती । तयां प्रतीति ते शब्दवरी ॥ १२ ॥ असो तो वंदुनि सद्गुरुरावो । केला ग्रंथारंभासि प्रस्तावो । येथें नाहीं मज प्रयास भावो । ग्रंथसरावो करावया ॥ १३ ॥ अहो ग्रंथ करावयाचे प्रयास । येव्हडे कासया हे मज साहास । सिद्ध करूनि सद्गुरु परेश । मुखीं घांस घाली माझ्या ॥ १४ ॥ जैसें प्रयासें करुनि जननी । दधि मंथूनियां काढी लोणी । ते आइतें घाली अपत्यवदनीं । गिळितां त्यालागूनि कोण प्रयास ॥ १५ तैसा मंथूनियां हा शब्दसिंधु । मुख्यार्थ काढूनि नवनीतबोधु । घाली मन्मुखीं स्वतः सिद्धु । अतिअगाधु गोडपणें ॥ १६ ॥ तो गिळूनियां नवनीतगोळा । धाऊनि ढेंकर देतसें वेळोवेळां । नाम ग्रंथ जाला । ढेंकरमेळा पदप्रबंधु १७ ॥ ह्मणोनि यालागीं प्रयास नाहीं । ग्रंथ हा आइताचि सिद्ध पाहीं । तो संतांसि

---

१ रममाण झालें. २ इतर. ३ लक्ष्य, ध्यानांत ध्यावयाचा पदार्थ. ४ तृप्त होऊन.

रिझवावया सर्वही । उद्योग पाहीं यथा ग्रंथाचा ॥ १८ ॥ आतां माझें इतुकेंचि करणें । जे सन्मुख करावे संतजन । तयांचें हेंचि वर्म जाण । बोबडें वचनें बोलावें ॥ १९ ॥ अहो वांकुडें पाऊल घाली बाळ । आणि बोबडे बोल बोले रसाळ । देखोनि संन्यासियांसि कळवळ । स्नेहकल्लोळ नसंवरे ॥ १९ ॥ ते सन्मुख होवोनियां तयाप्रति । स्नेहें घेवोनियां लाडविती । जऱ्ही कुरूप तयाची व्यक्ति । आणि वक्रोक्ति वक्र चालणें ॥ २१ ॥ तैसा मी वांकुड्यां पिसाटां बोली । संतकृपा येकाकार करी भली । ते संतोषती यया बोली । ग्रंथनव्हाळी त्यांलागीं हे ॥ २२ ॥ तेंचि परिसा वांकुडे बोले । परमानंदें जे अतिरसाळ । ते देवोनियां मनासि बोल । ग्रंथ सखोल परिसिजे ॥ २३ ॥ इतुकीचि माझी कृत्यतकृता । जें हातासि ये तुमची प्रसन्नता । तेणें सर्वदा तुमची सन्मुखता । हेचि निजात्मता निजभावें ॥ २४ ॥ माझिया श्रीगुरुरायें मजलागूनी । तुह्मी संत दिधलेती माहेर जोडुनी । त्या तुह्मांसि रिझवावयालागुनी । ग्रंथ निर्माणीं बोबड्या बोलें ॥ २५ ॥ वरीवरी जऱ्ही बोबडे बोल । तऱ्ही प्रमेय असे अतिसखोल । तें घेतां अतिरसाळ । सप्रेमळ निवती सुखें ॥ २६ ॥ तो बाह्य देखे जना सकळ । जैसा इक्षुदंड वक्र आणि काळा । परी अंतरीं रसगौल्यतेचा मेळा । रसुरसाळा अति प्रिय ॥ २७ ॥ त्याची जंव जंव ऑटणी कीजे । तंव रसपाक ते शर्करादि निपजे । तये गोडियेचा पारु नेणिजे । ते जाणती सहजें रसज्ञ जे कां ॥ २८ ॥ तैसा ययाचा पदच्छेद कीजे । जंव जंव ययाच्या अंतरीं रिघिजे । तंव तंव प्रमेय गोड पाविजे । तेथें ज्ञातेनि निविजे परमानंदें ॥ २९ ॥ ययालागीं ग्रंथाचें निर्माण । केलें सन्मुख व्हावया सज्जन । संत सन्मुख ते कृतकृत्यता पूर्ण । नाहीं आन त्रिसत्य ॥ ३० ॥ इतुकें बोलतांचि सज्जनीं । माथा डोलविला संतोषोनी । ह्मणती प्रसन्न झालों तुजलागुनी । ग्रंथनिर्माणीं प्रवर्ते आतां ॥ ३१ ॥ ऐसा लाधूनि महाप्रसादु । तेणें उल्हासला बोधु । संतप्रसादें ग्रंथा ववोधु । अतिअगाधु परियेसा ॥ ३२ ॥ तरी मागां आत्मार्चनप्रकरण । संपलें संपूर्ण गोडपण । तेथें आक्षेप करी रघुनंदन । आत्मा किंलक्षण बोळखिजे ॥ ३३ ॥ आधीं आत्मा किंलक्षण जाणावें । तरीच आत्मार्चन करावें । हे आशंका करितां अंतर्भावें । श्रीवसिष्ठा मनीं तंव कळों सरलें ॥ ३४ ॥ आणि ऐसें आत्मार्चन करितां । येथें भेदु भासतसे जी तत्त्वतां । एकीं अर्चनीय देवता । दुसरा कर्त्ता एक आपण ॥ ३५ ॥ तरी जीवब्रह्मोंसि ऐक्य तें कैसें । हेंही सांगावें सावकाशें । तंव गुरु ह्मणती अपूर्व ऐसें । सांगों विश्वेशें ऐकावें ॥ ३६ ॥ वासिष्ठ ह्मणती गा श्रीरघुनाथा । बरवी आशंका केली ताता । तरी आत्मा एवंभूत ऐक आतां । सांगेन तत्वता जैसा असे ॥ ३७ ॥ तरी पूर्वप्रकरणीं आत्मलक्षण ।

---

१ सर्वसंगपरित्याग केलेल्यांस देखील. २ आवरत नाहीं. ३ वेड्या. ४ आटविणें. ५ शब्द तोडणें. शंका.

आणि तदाकारें करणें अंतःकरण । तो साक्षात्कारु निदिध्यासन । सर्वही गुरुखुण सांगितली ॥ ३८ ॥ तथापि दृढीकरणार्थ निरूपण । केलेंचि आत्मयाचें कीजेल जाण । आणि जीवचि ब्रह्म हे खूण । सांगों निर्वाण ब्रह्मात्मैक्य ॥ ३९ ॥ तऱ्ही देहेंद्रिय-संघातेंकरून । आत्मतत्व न कळे भ्रमत्वें जाण । जीव तोचि परमात्मा पूर्ण । केल्या निरसन उपाधीचें ॥ ४० ॥ उपाधीकरितां भ्रमती । शुद्ध आत्मा ऐसा नेणती । ह्मणोनि प्रश्न तुझा रघुपती । तरी आइक स्थिति सांगेन ॥ ४१ ॥ ऐसी प्रतिज्ञा स्वीकारुनी । वसिष्ठ निरूपिती कोदंडपाणी । सांगों आत्मनिरूपण इयें जनीं । प्रकरणाभिधानीं पावलें ॥ ४२ ॥ तेंचि आत्मनिरूपण आतां । सांगिजेल परिसावे श्रोतां । आत्म-निरूपण श्रवण करितां । होय तत्वतां स्वयें तो ब्रह्म ॥ ४३ ह्मणोनि एकाग्र आयि-किजे । आत्मा एवंविध ऐसा जाणिजे । तो तंव विशिष्टचि बोलिजे । स्वयें घेइजे लक्षुनी ॥ ४४ ॥

तस्मिन्देहेंद्रियादीनां संघाते स्फुरति स्वतः । अहं सोऽहमयं भावः स जीवो मलगुंठितः ॥ १ ॥

तरी तेंचि आत्मयाचे स्वरूप जाण । जया उपाधिमेळें आलें जीवपण । उपाधिनिरासें ब्रह्म पूर्ण । हेचि खूण परियेसीं ॥ ४५ ॥ तरी हें जयाच्या ठाईं । देहेंद्रियादिसमूह पाहीं । भासती जाण जेथें सर्वही । तोचि निःसंदेहीं जीव जाण ॥ ४६ ॥ ते सकळही जीव गा रघुनाथा । ब्रह्मीं भासती तत्वतां । आणि देहेंद्रियादिसंघाता । भासणें ताता जयाचे ठायीं ॥ ४७ ॥ हें समष्टिव्यष्टिरूपें असे । यालागीं देहेंद्रियें देह जीवीं भासे । तो जीव हें विश्वासें । रघुवंशें जाणावें ॥ ४८ ॥ मनादि इंद्रियें देहद्वय संपत्ति । स्वतांचि जेथे हे सर्व स्फुरती । तेची जाण जीवाची व्यक्ति । श्रीरघुपती निश्चयें ॥ ४९ ॥ हें न कळे तरी आयिकें दुसरें । जाणतें वर्म सांगों निर्धारें । तरी 'अहं सोयं अयं' जेथें स्फुरे । जाण तें खरें जीवतत्व ॥ ५० ॥ तरी अहं हें देहातें ह्मणे । सोहंशब्दें करण आणि मनें । अयंशब्दें हा आत्मपणें । अपरोक्षगुणें स्फुरतसे ॥ ५१ ॥ परी हें समूळ गुंठित जाणावें । कां जें अहंकार मिश्रित स्वभावें । यालागीं समलत्व ह्मणावें । वर्म जाणावें अयोध्यापती ॥ ५२ ॥ हा मलत्यागु केल्या तेंचि ब्रह्म । यावेंही सांगों तुज वर्म । जीवपणें अहं सोहं इत्यादिभ्रम । नुरे संभ्रम जीवत्वनाशें ॥ ५३ ॥

सर्वमेव चिदाकाशं ब्रह्मेति घननिश्चयें । स्थिति याते शमं याति जीवो निःस्नेहदीपवत् ॥ २ ॥

हें सर्वही जगजाळ । सच्चिदानंद ब्रह्माचि केवळ । ऐसा दृढ निश्चय अढळ । स्थिति निर्मळ पावे जीव ॥ ५४ ॥ असंदिग्धपणें ब्रह्मावबोध । जगत्वी जाला जया विशद । मिथ्या हें जग पावोनि बाध । ब्रह्म निर्विवाद स्फुरे जया ॥ ५५ ॥ तैसीचि बाणल्या

---

१ देह व इंद्रियें हीं एकत्र झाल्यामुळें. २ प्रकरणाच्या नावांत. ३ अनेकत्वाचे व एकत्वाचे ४ इ. ५ मलयुक्तता. 'शबल' असा पाठ. ६ सृष्टिरूपी जाळें. ७ संशयरहित.

अखंडस्थिति । अहं सोहं हे भाव नुपजती । न देखे भिन्नत्वें कैंची विश्वस्थिति । तरीच शांति जीवत्वा ॥ ५६ ॥ सर्वे स्फुरतां ब्रह्मभावो । मग जीवा जीवत्वें कैचा ठावो । स्नेहाभावें दीपाचा अभावो । तैसा जीवभावो मळनाशें ॥ ५७ ॥जंव देहादिक सत्यत्व भासती । अहं सोहं अयं हे व्यक्ति । तंवाचि जीवपणाची स्थिति । जाण रघुपती निश्चयें ॥ ५८ ॥ उपाधिनाशें जीवाची शांति । जीव नाहींच होय गा रघुपती । जळ आटलिया प्रतिबिंबव्यक्ति । त्रिजगतीं पहातां न दिसे ॥५९॥ घट नाशलिया घटाकाश । मठ भंगलिया मठाकाशें । नुरे जैसा प्रतिभास । दर्पणास नेलिया ॥ ६० ॥ तैसें मुख्य उपाधि नाशिलिया । उपाधि गत जीव जाय लया । मग ब्रह्मचि येक येकलिया । उरे रघुराया उपाधिहीन ॥ ६१ ॥ मुख्य उपाधि जो जीवाचा । अंतरसूक्ष्म जो नेटाचा । तोही सांगों आइक वाचा । विवेक साचा रघुनाथा ॥ ६२ ॥ तऱ्ही मन बुद्धि आणि अहंकार । येकचि परी पावलें भेदांतर । उपाधीकरितां व्यापार । तदनुसार नांवें पडती ॥ ६३ ॥ येका अंतःकरणाच्या वृत्ति । व्यापाररूपें चतुर्था विभागती । मन बुद्धि चित्त अहंकार ह्मणती । तेथें चिच्छक्ति जीवत्वें विंबे ॥ ६४ ॥ बुद्धिप्रतिबिंबतें जें चैतन्य । जया उपाधि वशें आलें जीवपण । तेणें विभागलेंनि अहंसोहंपण । उठी अयंपणें त्रिपुटी हे ॥ ६५ ॥ अहंकारें देहोंहं ह्मणतु । सोहंकारें मनबुद्धियोग उठितु । बुद्धीनें आपणा 'अयं' मानितु । उपाधि स्वतंत्र त्रिविध ऐसा ॥ ६६ ॥ हें त्रय नसावें गा रघुनाथा । भासती जो विश्वव्यक्ति समस्ता । जीवत्व दृढावे तेणे करितां । हें नाशतां जीवा नाशु ॥ ६७ ॥ टवाळाचे स्नेह जेव्हांचि सरे । तेव्हांचि दीप कोठें उरे । दर्पण नेलिया मुख्य वोसरे । मुख तें उरे उपाधिहीन ॥ ६८ ॥ तो जीव नाशलिया रघुनाथा । उरे शुद्ध ब्रह्मचि तत्वतां । तेणेंचि होय आत्मनिश्चयार्था । आलें पंथा अनुभवाच्या ॥ ६९ ॥ ऐसिया खुणे सांगेन तुज । तेणें आत्मा कोण हें बुझें । तो जाणतां कृतकृत्यता सहज । सरे व्याज भवभयाचें ॥ ७० ॥ अगा सर्वही ब्रह्मचि असे । जीव तोही ब्रह्मत्वेंचि वसे । परी नाथिलेंचि जीवत्व घेऊनि बैसे । आणी पिसें नेणपणाचें ॥ ७१ ॥ जैसा उत्तम उत्तमत्वा टाकुनी । भ्रमें अधमत्व आपणा मानी । संन्यासी अंत्यज होय स्वप्नीं । नाठवे मनीं उत्तमत्व ॥ ७२ ॥ तैसा स्वयें ब्रह्म असोनी । भ्रमें आपणा जीवत्व आणी । तेणें भ्रंशें स्वस्वरूपापासुनी । शोच्य सर्व गुणी जीवपणें ॥ ७३ ॥

स्वमहत्वं यथोपेक्ष्य कश्चिद्विप्रो दुरीहया । अंगीकरोति शूद्रत्वं तथा जीवत्वमीश्वरः ॥ ३ ॥

अगा कोण्ही एक ब्राह्मण । आपुलें शुद्ध महत्व उपेक्षून । आपुलिया विस्मरणेंकरून । शुद्रपण अंगिकारी ॥ ७४ ॥ शूद्रपणाचीं कर्में करी । तेणें शूद्रपण आपणा निर्धारी । सहस्रीं सांगतांही क्षणभरी । सोय पुरी न धरीच ॥ ७५ ॥ तैसा कर्त्ता भोक्ता येणें

१ प्रतिबिंबाचा स्पष्टपणा. २ प्रतिबिंब. ३ चार प्रकारानीं. ४मी देह आहें. ५ जाण. ६ नसलेलेंच. ७ टाकून.

अध्यासें । ईश्वरासि जीवपणाचें पिसें । तेंचि धरूनियां बैसे । नेणें सर्वांचें ईश्वरत्वा ॥७६॥ आपुलें सत्ताप्रकाशसुख । ब्रह्मत्व सांडी स्वयें अशेखें । ईश्वरत्व ऐश्वर्यादि सम्यक् । विसरे देख जीव भ्रमें ॥७७॥ देहादिकाचेनि अध्यासें । ईश्वरासि जीवपणाचें पिसें । येऱ्हवीं तो स्वयेंचि शुद्ध असे । आत्मा ऐसें जाण रामा ॥ ७८ ॥ आणि वास्तव तरी शरीर नव्हे परी स्वसंकल्पें शरीरभावे । तें शरीर मानी गा स्वभावें । तेणेंचि गौरवें श्लाघतु ॥ ७९ ॥

असत्यमेव संकल्प भ्रमेणेदं शरीरकम् । जीवः पश्यति मूढात्मा बालो यक्षमिवोत्थितम् ॥ ४ ॥

अगा असत्य जें कीं शरीर । जागृतिदशेचें भ्रमसार । स्वयें संकल्पूनि नश्वर । तदनुसार वर्तती ॥ ८० ॥ असत्य देह तें जाण ऐसें । नश्वर परिमाणीं तरी प्रत्यक्ष दिसे । हें निरूपितां सावकाशें । विस्तारु असे ग्रंथासि पैं ॥ ८१ ॥ क्षणक्षणा परिणाम पावतु । बाल्य तारुण्य वार्धक्य भोगितु । इतर शरीरांचा नाश देखतु । नश्वरार्थु प्रत्यक्ष सिद्ध असे ॥ ८२ ॥ आणि शरीरभ्रम जागृतीसि दिसे । स्वप्नीं तो आणीकचि भासे । सुषुप्तीसि तरी कांहींच न दिसें । तरी साच कैसे ह्मणावें गा ॥ ८३ ॥ ऐसें असत्य जें कीं शरीर । तेणें नसतेंचि संकल्पी साचार । त्यातेंचि ह्मणे मी साकार । भ्रमें थोर घेऊनि बैसे ॥ ८४ ॥ हें मनसंकल्पींच तरी साच भासे । मन नसतां कोठेंचि न दिसे । यालागीं मनःसंकल्पित हें सर्वांशें । भासतसे मिथ्याध्यासें ॥ ८५ ॥ ऐसें असत्य हें शरीर । तें भ्रमें संकल्पूनि साकार । आपण असोनि निर्विकार । भ्रमें शरीर आपणा मानी ॥ ८६ ॥ स्वस्वरूपाचें विस्मरण करुनी । विपरीताध्यास होय भरंवसनी । विपरीत तें देहें कोदंडपाणी । नसतें संकल्पूनि आपण ह्मणें ॥ ८७ ॥ तो जीवशब्दें जाण निश्चितु । अतएव मूढ ऐसें ह्मणिजतु । तया सत्य संकल्पूनि मी ह्मणतु । अविवेक युक्तु ह्मणोनियां ॥ ८८ ॥ अगा सत्कर्माचें अनुष्ठान । नाहीं घडलें ईश्वरभजन । स्वप्नींही नेणे साधुसेवन । तो श्रीगुरुचरण काय देखे ॥ ८९ ॥ तया कैंची चित्तशुद्धि । मळिणत्वें विषयाकार बुद्धि । ते काय पावती स्वरूपसिद्धि । ह्मणौनि मूढधी नांव पावे ॥ ९० ॥ आत्मशब्दें बुद्धि जाण । तियेचें सत्कर्मीं नाहीं शोधन । ह्मणोनि सर्वदा ते मळिण । मूढपण यया नाम ॥९१॥ आत्मा बुद्धीचा प्रकाशकु । बुद्धिदर्पणीं भासे बोधार्कु । बुद्धिमालिन्यें आत्मावलोकु । नव्हे निष्टंकु रघुराया ॥ ९२ ॥ जैसें दर्पणाचेनि मळिणपणें । मुखासि वक्रविकार होणें । अतिमालिन्यें न भासणें । दर्पणेंचि करणें प्रकार नाना ॥ ९३ ॥ मुख मुखीं शुद्धचि असे । वक्रादिविरूपभावही नसे । परी दर्पणाचिसारिखें भासे । शुद्ध दिसे जैसें तैसें ॥ ९४ ॥ ह्मणोनि दर्पणाचि साहाणे लाविती । तेणें भासे शुद्ध मुखप्रतीति । परी दर्पणापराधें साहाणे न तोडिती । मुख सर्वार्थी रघुराया ॥ ९५ ॥ तैसी बुद्धिदर्पणासि

---

१ भ्रमामुळें. २ सर्व. ३ निराळ्याच प्रकारचा. ४ झोपेंत. ५ मनानें कल्पना केलेलें. ६ मुर्ख. ७ स्पष्ट निश्चित. ८ वाकडें तिकडें आहेसें दिसणें. ९ बुद्धिरूप आरसास.

सत्कर्मादिकीं । शुद्धता कीजे बरवी येकी । तरीच आत्मोपलब्धि अति निकी । होय निष्टंकी रघुपुंगवा ॥ ९६ ॥ तैसें बुद्धीचें नव्हे शोधन । ह्मणोनि राहिलें मळिणपण । अविवेकें राहे निमग्न । तैसें मूढपण बुद्धीचें ॥ ९७ ॥ तिये बुद्धीसि मळिणत्व जाण । कदापि न घडे स्वस्वरूपदर्शन । ह्मणोनि देहाचि देखे विपरीत भान । यक्षाचें भय पूर्ण बाळका जैसें ॥ ९८ ॥ बागुल साच तरी नाहीं । परी बाळें नसताचि कल्पिला पाहीं । साच मानूनि तो कांपे देहीं । किंबहुना पाहीं देहांतु पावे ॥ ९९ ॥ स्वयें आपणातें विसरे । कल्पित बागुल आविस्फुरे । तेणें आंगा आणी वारें । भयें मरे नसतेनी ॥ १०० ॥ तैसें आपण असतां सुखरूप । नसता देहाचा करी आरोप । देहपणें देहदुःख अमूप । भयकंप मरणवरी ॥ १ ॥ अगा आपलें विसरोनि आत्मपण । मिथ्या भ्रमें देहारोपण । करूनि तदनुसार वर्त्ते आपण । काय अज्ञान वाणूं त्याचें ॥ २ ॥ यदर्थीं दृष्टांत सांगेन । आयिक रघुनाथा तुजलागून । जेणें वर्म याचें संपूर्ण । बूझसी जाण रघुनाथा ॥ ३ ॥

मृत्स्तंभके यथेभत्वं शिशुरध्यस्य वल्गति । अध्यस्यात्मनि देहादीन्मूढस्तद्वद्विचेष्टते ॥ ५ ॥

अगा मृन्मयकुंजराचा ठाईं । बाळक इभत्व आरोपी पाहीं । मग तद्दर्पें पळे दिशा दाही । विश्रांति कांहीं न पवे तो ॥ ४ ॥ जेव्हां मिळेल येखादा सांगता । बाळा हा हस्ती नव्हे रे तत्वतां । हे मृत्तिकाची प्रत्यक्ष दिसतां । कुंजरभ्रांति तया असेचिना ॥ ५ ॥ तेव्हां सावध होवोनियां पाहे । ह्मणे हे मृत्तिकाची आहे । हस्ती ह्मणणें भ्रम आहे । जाणोनि राहे सुखरूप ॥ ६ ॥ तैसे आत्मयाचे ठाईं । नसते कल्पूनी देहादि जें कांहीं मूढ चेष्टे तदनुसार सर्वही । विस्मय पाहीं रघुवर्या ॥ ७ ॥ देहानुसारें चेष्टा करी । कर्त्तव्य भोक्तृत्व घे मस्तकावरी । स्त्रीपुत्राधीन सर्वांपरी । देहबुद्धी वारी होतसे ॥ ८ ॥ विचारितां देह तरी साच नसे । तेथें नाथिलें कल्पूनि मानसें । हेंचि आत्मत्व घेऊनियां बैसे । तदनुध्यासें वर्त्ते आपण ॥ ९ ॥ तुह्मी ह्मणाल सर्वही आत्माचि असे । सर्व दृश्य तें मिथ्या भासे । तऱ्ही साच तेंचि कां न दिसे । मिथ्याचि कैसें लोक घेती ॥ ११० ॥ हें तंव कुंजरदृष्टांतें निरूपिलें । परी तें नाहीं तुह्मासि कळलें । तरी आयिका आतां सांगेन भलें । जेणें उकले भ्रमजाळ ॥ ११ ॥ तरी मृत्तिकेचा जो हस्ती । ते तरी मृत्तिकाचि सर्वार्थीं । परी सावयवत्वें भासे हस्ती । नामप्रतीति अवयवांची ॥ १२ ॥ नामाचिसारिखी आकृति । आकृतीनें नामाची प्रतीति । हें तंव प्रत्यक्ष भासे सर्वार्थीं । सांगणें किती फाडोवाडें ॥ १३ ॥ मस्तकाकार मस्तक दिसे । तेणेंचि मस्तक नाम निर्देशें । कर्ण कर्णापरी भासे । कर्ण ऐसें नाम ठेविती ॥ १४ ॥ नासिक शुंडादंड प्रबळ । चरण चरणत्वें नेत्र गोल । विचारितां मृत्तिकाचि केवळ । कैंचा मे ? अवयवांचा

१ आत्मज्ञान. २ हत्तीच्या दृष्टांतानें. ३ विस्तारानें.

॥ १५ ॥ नाथिला आकारु नाथिलें नाम । मृत्तिकेचा ठाईं केव्हडा भ्रम । तें सत्य मानी तो नराधम । अतिनिःसीम अज्ञानी ॥ १६ ॥ प्रत्यक्ष मृत्तिकाचि दिसे । तेथें नाम रूप मानी कुंजराध्यासें । तेणें आपणा लाविलें पिसें । कोणते दशे आणील तो ॥ १७ ॥ नाना चित्रपट भासे दृष्टी । तेथें अनेका कल्पी सृष्टि । विश्व हस्ती पदाति कोटि । सन्य परिपाठीं चतुर्विध ॥ १८ ॥ तेथ नाना अवयव नानानामें । येके सुखी दुःखी संभ्रमें । येकें व्यवहारें येकें नियमें । येकें निःसीमें ध्यानारूढ ॥ १९ ॥ कूप विहीरी तटाक नदी । आंत जळचरसमृद्धि । अग्नि आणि नानाऔषधि । आधि व्याधि येकासि कल्पी ॥ १२० ॥ किंबहुना पटाचा ठाईं । तोही येकला येक पाही । तेथें नानासर्वरूपें कल्पूनिही । येकुचि येही रूपीं भासे ॥ २१ ॥ नानाकुड्यादिकाचें चित्र । सर्व कल्पीं अति विचित्र । रज्जुसर्पशुक्तिरजतमत्र । निळिमा सर्वत्र आकाशीं ॥ २२ ॥ इत्यादि दृष्टांत सांगों किती । तूं तंव सर्वत्र गा रघुपती । तैसें आत्मत्वीं देहादिव्यक्ति । भासे पंक्ति नामरूपाची ॥ २३ ॥ तें नाथिलेंचि कल्पूनि आपण । करितसे तदनुसार वर्त्तन । तोचि आत्मा अज्ञानेंकरून । वास्तवें देहभान भावित ॥ २४ ॥ तेंचि जऱ्ही विचारेंकरून । वास्तवें जऱ्ही जाणे आपण । तऱ्ही तया नव्हे सुखदुःखभान । कैंचें अज्ञान भ्रम कैंचा ॥ २५ ॥ अगा नाथिलेंचि कल्पुनी । दुजेपणातें सत्यत्वें स्वयें मनीं । सुखदुःख पावे भ्रमेंकरुनी । संसारदैन्य भोगितसे ॥ २६ ॥ तेंचि सद्गुरूचिया कृपाभरें । फिटलें अज्ञानाचें भेंडेरें । तरीच आत्मविचारु संचरे । लाभे निर्धारें आपणायां ॥ २७ ॥ तेंचि सदृष्टांतें सांगेन । आयिकें श्रीरामा चित्त देऊन । जेणें निरसे हें भवअज्ञान । द्वैतभान नाहींच होय ॥ २८ ॥ अहो प्रबोधिलिया जैसें । स्वप्नडिंब नाहींच भासे । स्वयें येकला येकुचि असे । कैंचें पिसें द्वैताचें ॥ २९ ॥

चित्रसर्पः परिज्ञातो न सर्पभयदो यथा । जीवसर्पः परिज्ञातस्तथा न सुखदुःखदः ॥ ६ ॥

तरी चित्रसर्प जंव भासतु । तंव प्राणांतु भयें असें कांपतु । दुःखें होय व्याकुळितु । नेणे मातु मिथ्यत्वाची ॥ १३० ॥ तोचि वातस्व नाहींसा कळला । तेव्हां भयकंप नेणो काय जाला । दुःखत्यागें सुख पावला । उरग जाला काय नेणो ॥ ३१ ॥ तैसा हा जीवसर्प गा रघुपती । अज्ञानी जीवत्वें देखती । कर्त्ता भोक्ता ऐसें ह्मणती । अनुभविती सुखदुःखें ॥ ३२ ॥ आपण कोण्हीयेक जीव असे । भ्रमें दुःख भोगी देहाध्यासें । तंव तंव जन्मांतरें पावतसे । उसंतु नसे क्षणभरी ॥ ३३ ॥ तोचि सद्गुरुकृपालेशें । तेणेंचि विवेकें विचारू वैसें । ह्मणे देहादिक मज दृश्य असे । मी वेगळा असें द्रष्टेपणें ॥ ३४ ॥ जीव ऐसें आपण ह्मणता । या देहेंद्रियांचा प्रकाशिता । तो मी येथें कोण तत्वतां । मन तंव सवया

---

१ पायदळ. २ मालिका; प्रकार. ३ मानसिक दुःखें. ४ शारीरिक दुःखें. ५ भय. येथें 'भिडेरें' असा पाठ आहे. ६ स्वप्नांतील आभास. ७ चित्रांतील साप. ८ साप. ९ विश्रांति.

मी नव्हे ॥ ३५ ॥ मनातें स्वयें असें देखतु । बुद्धि तेही मीचि स्वयें प्रकाशितु । तरी मी ऐसें जो ह्मणतु । कोण हेतु कोणा ठाईं ॥ ३६ ॥ तरी मी ह्मणतां अहंकार । तोही मज दृश्य निरंतर । बुध्यादिकांचा साक्षी साचार । अतिथोर थोरपणें मी ॥ ॥ ३७ ॥ऐसा तो मी कोण येथें । जीव मी ऐसें ह्मणें कोणातें । ऐसा विचारितां विचारु तेथ । मुरे जेथें तो आपण ॥ ३८ ॥ हें जाणणेंचि जाणतां । तंव जीवसर्प गेला गा रघुनाथा । दीपेंकरूनि तम पाहतां । प्रकाशु होता येतसे जैसा॥ ३९ ॥ जैसा निद्रिस्तु निद्रा धरूं जाये । तंव जागेपणा वरपडा होये । स्वप्नीं डिंब जव पाहों पाहे । तंव स्वयेंचि लाहे जयापरी ॥ १४० ॥ तैसें आपुलें जीवत्व पाहों जाये । तंव साक्षित्वचि होता ये । स्वसुखें सुखरूप लाहे । दुःख[1] काय कैचें तेथें ॥ ४१ ॥ जीवपणाचें जें सुखदुःख । तें तत्काळ हारपे तेथें देख । आपला आपण येकला येकु । नेणें वेश सम्यक जीवत्वाचा ॥ ४२ ॥ हें अज्ञानकृत जीवंडवाळ[2] । आपण नेणोनि शुद्ध निर्मळ । होतां सुखदुःखें व्याकुळ । अतितळमळ शीच्यतेचि ॥ ४३ ॥ ऐसें विचारमात्रेंचि रघुराया । पावे आपण आपुल्या ठाया । गेली समूळ अविद्यामाया । सद्गुरुपायां सेवितांचि ॥ ४४ ॥ यालागीं आपणाचि आत्मा असे । तें नेणोनि आंगीं जीवपणाचें पिसे । अविचारें आरंबळतसे । विचारें वसे स्वस्वरूपीं ॥ ४५ ॥ इत्यादि खुणा गा रघुपती । तुज करितसें आत्मव्यक्ति । हें जाणोनि राहें ब्रह्मसंवित्ति । मग नेणपणाची भ्रांति कदा नव्हे ॥ ४६ ॥

स्रजि सर्पोयथाध्यस्तो मालायामेव लीयते ॥ आत्मप्रोतोत्थितो भेद आत्मनेव विलीयते ॥ ७ ॥

अगा जैसा माळेचा[3] ठाईं । सर्प अध्यस्त भासे पाहीं । वास्तव तंव [4]सर्वथा नाहीं । स्रजिच तेंही जैसी जे स्वरूपें ॥ ४७ ॥ ते येकली येक आपुल्या रूपें । स्रजिचि असे निजस्वरूप । तेथें व्यर्थचि भासिजे सर्प । अज्ञानरूपें अध्यासु जो ॥ ४८ ॥ अधिष्ठानीं तंव दुजें नाहीं । आणि तेथें आरोपी जें दुजें कांहीं । यया नाम गा अध्यारोप पाहीं । आपण ते ठायीं भाविती ॥ ४९ ॥ अगा माळेनें सर्प देखिला नाहीं । ना ते आपण सर्प जाली कायी । ना आला गेला मातुं ते कांहीं । नेणे स्वप्नींही कोण्हे काळीं ॥ १५० ॥ तेथें भ्रमेंकरूनियां गा रघुनाथा । सर्पारोप करिती तत्वतां । माळा ते नोहे सर्प तत्वतां व्यर्थ वार्ता वाढविती ॥ ५१ ॥ तोचि विचारूनी पाहिजे । तंव सर्प कोठेंचि न देखिजे माळा ते माळाचि जाणिजे । आरोप सहजें मिथ्याभ्रमु ॥ ५२ ॥ सर्प माळेचा ठाईं आरोपित । तो माळेचिमाजी लयो पावत । व्यर्थ आला गेला ह्मणिजेत । असे निश्चित माळाचि येकी ॥ ५३ ॥ तैसें आत्मयाचा ठाईं । देहादि भासे भेद पाहीं । मन बुद्धि इंद्रियें सर्वही । अहंकारु पाहीं नानाकार ॥ ५४ ॥ इत्यादि चित्रविचित्र गा रघुपती । आत्मयाचा ठाईं भेद देखती । नव्हता भ्रमु कल्पिती । वास्तव स्थिति नेणोनियां

---

१ दुःखी. २ जीवाची उपाधि. येथें 'जगड्वाळ' असा पाठ आहे. ३ माळेचा. ४ गोष्ट.

॥ ५५ ॥ तोचि सद्गुरूचिया कृपादृष्टी । विवेकें प्रवेशे भेदाच्या पोटीं । तंव तो पावे लय उठाउठी । होथे भेटी आपआपणयां ॥ ५६ ॥ रामा येवढा जो भेदु देखिला । त्यासी ब्रह्मांड थोडें वसावयाला । तो सांग पां कोठूनि आला ॥ मागुता गेला कोण्हे ठाईं ॥ ५७ ॥ येक मुंगीचाही मागु दिसतु । आला गेला असे कळतु । आणि भेदु तो कोठें हारपतु । सांग मातु रघुराया ॥ ५८ ॥ येव्हडा भेद आलेपणें दिसे । ना गेला हें ही कोण्हा न भासे । तरी याचा विचारु हाचि असे । जाण सर्वांसें मिथ्या प्रभु ॥ ५९ ॥ अगा अधिष्ठानाचेनि नेणपणें । अध्यस्ताचा आरोप करणें । लिन होये अधिष्ठानें । जागलेपणें दोन्ही मिथ्या ॥ १६० ॥ येव्हडा द्वैतभास उठिला । तो विचारेंचि लया गेला । जेथें भासला तेथेंचि निमाला । आत्मा उगला जैसा जैसा ॥ ६१ ॥ द्वैतारोप आत्मयाचा ठाईं । पाहतां निमाला तेथेंचि पाहीं । यालागीं द्वैताध्यस्त सर्वही । मिथ्या पाहीं तिहीं काळीं ॥ ६२ ॥ मिथ्या तें तंव नाशोनि जाये । परी आत्मा जैसा तैसाचि पाहें । गंधर्वनगर पावे लये । गगन आहे गगनीं जैसें ॥ ६३ ॥ शुक्तिका सत्यत्वें वर्त्तमान । तेथें रजत उद्भवे नाशे आपण । दिसे मावळे जैसें स्वप्न । अधिष्ठान आपण जैसें तैसें ॥ ६४ ॥ यालागीं सर्वही अधिष्ठान । अध्यस्ताभासु तो भ्रम पूर्ण । आयिक यदर्थीं निदर्शन । आत्मखूण जेथें बुझसी ॥ ६५ ॥

नैकमप्यंगदाद्यं च यथैकं हेमसंस्थितम् । उपाधिभिरनेकोऽपि तथत्मैकः स्वरूपतः ॥ ८ ॥

आणीक दृष्टांत गा रघुनाथा । तो तुज सांगैन तत्वतां । जेणें बुझसी वास्तवार्था । आयिक आतां येकाग्र तूं ॥ ६६ ॥ तऱ्ही अनेक जैसे अलंकार । अंगदें कंकणें पदक हार । मुद्रिकादिनानाप्रकार । अति मनोहर नामरूपें ॥ ६७ ॥ चिताक कुंडलें भवँरिया । बोळ वांकी आकाराया । तें येकचि सुवर्ण गा रघुराया । तयाविण या ठाव कैंचा ॥ ६८ ॥ येका सुवर्णाचा ठाईं । नाना अलंकार कल्पिले पाहीं । विचारें अलंकार भिन्न नाहीं । येकचि हेम जैसें ॥ ६९ ॥ त्या लेणियांचेनि संकल्पें । हेमीं अलंकाराभास लोपे । विचारें सुवर्ण येकाचि रूपें । नानात्वें विकल्पें कल्पिताती ॥ १७० ॥ तैसा उपाधीरूनि गा रघुनाथा । आत्मा पावे अनेकता । परी स्वरूपें आत्मचि तत्वतां । विश्व हें भ्रांता-प्रति भासे ॥ ७१ ॥ देहादि प्रपंचेंकरून । येकासिच नानात्वें मानी जन । येथें भ्रमेंवांचूनि नाहीं आन । विचरें संपूर्ण आत्मस्वरूप ॥ ७२ ॥ आणीकही दृष्टांत तुजप्रति । सांगैन ऐकें मंगळमती । अनेक येक हे प्रतीति । येक भ्रांति अनेकपणाची ॥ ७३ ॥

शरीरावयवा यद्वद्विकाराश्च यथा मृदः । अद्वैतं द्वैतवद्भाति तथा स्थावरजंगमम् ॥ ९ ॥

अगा येकचि हें शरीर पाहीं । नाना अवयवाकार भासे सर्वही । परी येकासारिखा येक

---

१ रहाण्यास. २ नाहींसा झाला. ३ द्वैताचे ठिकाणीं आरोप केलेलें, ४ रूपें. ५ समजसील. ५ खरा अर्थ ७ हीं अलंकारांचीं नावें आहेत. ८ अलंकारांच्या.

नाहीं । नामें तयाही तदनुसार ॥ ७४ ॥ नेत्र श्रोत्र आणि नासिक । हस्ती चरण अंगुल्यादिक । अनेक आकार नामें देख । परी होय सकळीक देहाचि येकु ॥ ७५ ॥ ऐसीं अनेकांचीं येकाकारें । भासत असती अतिनिर्धारें । कीं येकाचि मृत्तिका घठमठाकारें । नानाप्रकारें येक भासत ॥ ७६ ॥ घटशरावादिअनेकपात्रें । घडुले रांजणादि विचित्रें । तें मृत्तिकेविण नव्हती स्वतंत्रें । बहुता प्रकारें येक भासे ॥ ७७ ॥ तैसें हें स्थावरजंगमादिक । विश्व अद्वैतीं भासे अनेक । तें द्वैत नेणोनियां लोक । साचचि अनेक मानिती ॥ ७८ ॥ अद्वैताचि द्वैतासारिखें । भासे तैसेंचि अज्ञानी देखे । तेणेंचि भोगी जन्मदुःखें । पशुवेषें वर्त्ततु असे ॥ ७९ ॥ अगा श्वानसूकरादिपशुयाति । भिन्न परस्परें सृष्टि देखती । तैसीच जाण त्याचीही गति । तरी नराकृति धिक् त्याची ॥ १८० ॥ नराकृति ह्मणणें । आणि पशुज्ञानेंकरूनि वर्त्तणें । धिक् जिणें तें लाजिरवाणें । परी निवृत्ति मनें न धरिती ॥ ८१ ॥ असो काय बोलावे अवगुण । जन्मजन्मांतरीं तैसेचि जाण । स्वप्नींही सेविले नाहीं गुरुचरण । कैसें ज्ञान भासे त्यांसी ॥ ८२ ॥ असो ते भावने ऐसेचि धांवती । ह्मणोनि असो त्यांची गति । दृष्टांत ऐकें लक्ष्मीपती । आत्मस्थिति बुझसी जेणें ॥ ८३ ॥

मणितोयघृतादर्शेष्वेकमप्याननं यथा । भात्यनेकमिवात्मापि तथा धीष्वनुबिंबितः ॥ २० ॥

अगा आत्मा येकुचि संतत । तो अनेक मानिती उपाधिगत । उपाधि वशें नाना भावीत । आइक दृष्टांत विबुद्धनाथा ॥ ८४ ॥ स्वच्छ मणि आणि उदक । घृत आणि आदर्श येक । या उपाधीचा ठाईं मुख । दिसे आणिक अज्ञानियांसी ॥ ८५ ॥ विचारें पाहतां गा रघुपती । मणीच्या ठाईं भासे मुखव्यक्ति । तेंचि भासे पैं जळाप्रति । आदर्शीं स्फुर्ति तेचि होये ॥ ८६ ॥ येकाचि मुख उपाधिवशें । अनेकरूपें नेणत्या भासे । परी तें उपाधीऐसेंचि दिसे । अनारिसें भासेना कीं ॥ ८७ ॥ नील आरक्त मणीच्या ठायीं । नीळ आरक्तचि मुख पाहीं । घृतीं पीतादिवर्णी कांहीं । उदकीं पाहीं उदकाऐसें ॥ ८८ ॥ दर्पणु जरी मळिण असिला । तरी मुखीं मळिणाकारू भासला । उपाधिदोष प्रगटला । नाहीं भेदला बिंबासिपैं ॥ ८९ ॥ हें सर्वही जन जाणती । भासतां मुखीं मळिणस्थिति । तरी दर्पणु साहाणे लाविती । परी ना तोडिती । मुख साहाणे ॥ १९० ॥ मुख तें मुखीं मुखाचि ऐसें । परी तें उपाधिसारीखें भासे । वक्रकुरुपादिकठसे । आणिक दिसे अनेकपणें ॥ ९१ ॥ हें उपाधिकरूनि गा रघुपती । भासे मुखाची आकृति । जितुका उपाधि तितुकी व्यक्ति । जानकीपती जाण तूं ॥ ९२ ॥ तैसें बुद्धिआंत प्रतिबिंबतु । आत्मा येकचि अनेक भासतु । जन तोचि मानूनि निश्चितार्थु । असे भ्रांतु

---

१ मडक्याच्या अथवा घराच्या स्वरूपानें. २ ढेरे. ३ चतुष्पाद प्राण्यासारखा. ४ 'शहाणें' असा पाठ. ५ निराळेपणा.

ह्मणौनि ॥ ९३ ॥ बुद्धिभेदेंकरूनि अनेकपण । आत्मयासि आलें गा जाण । जैसें घटाचें अनेकपण । सूर्यासि पूर्ण आणितसे ॥ ९४॥ तैसें शुद्धासि मळिणपण । उपधिवशें आलें पूर्ण । स्वयें प्रकाशक चिद्घन । नित्य निरंजन शुद्धबुद्ध ॥ ९५ ॥ तेंही दृष्टांतमुखें सांगेन । आइक श्रीरामा सावधान । करूनि येकाग्रमन । श्लोकार्थखूण जाण बापा ॥९६॥

धूलिधूमांबुदैर्यद्वन्मालिनीक्रियते नभः । परामृष्टस्तथैवात्मा विशुद्धः प्राकृतैर्गुणैः ॥ ११ ॥

अगा वाहाटुळिया धुळी । नभ धूसर केलें रजमेळीं । शुद्धाचि मळिण तिये काळीं । केलें धुळी आपणाऐसें ॥ ९७ ॥ जो गगनाकडे पाहों जाये । त्याचे नेत्रीं धूळिचि सामाये । एवं धूळिच गगन होये । नसता पाहें दोष आला ॥ ९८ ॥ कां धूम चढे गगनावरी । तेव्हां धूममयचि होय नभ जरी । तें शुद्धातेंचि मळिण करी । अपूर्व परी उपाधीची ॥ ९९ ॥ नातरी गगनभरि अंबुदें[3] निबद्ध । तेणें मळिणें पावलें शुद्ध । गगनीं दाटलें बाध । शुद्धत्वीं विशुद्ध ऐसें भासे ॥ २०० ॥ नातरी वायु असे स्वयें शुद्ध । दुष्ट गंधादिकीं कीजे दुर्गंध । तैसा आत्मा शुद्धबुद्ध । गुणीं अशुद्ध ऐसा भासे ॥ १ ॥ प्रकृतीचे तिन्हीगुण । सत्व रज तम हे जाण । येहीं स्वस्वकृत्यें[4] कीजे मळिण । स्वतः जो निर्गुण गुणी कीजे ॥ २ ॥ सत्वगुणें सात्विक ह्मणती । सात्विककर्त्ताभोक्ता ऐसी प्रतीति । रजसें पावे रजोवृत्ति । कर्तृत्वादिस्थिति गुणान्वयें ॥ ३ ॥ तामसगुणें तामस जाला । तामसपणातें स्वयें आला । एवं गुणाधीन ऐसा भासला । मळिण केला स्वकल्पना ॥ ४ ॥ अपाड गुणा आणि आत्मयासी । जैसें तमा[5] आणि तरणीसी[6] । पृथ्वी आणि गगनासी । चंद्र राहूसी अंतर जैसें ॥ ५ ॥ दोनिलक्ष गांवें[7] चंद्रमंडळ । राहू अर्वाक असे सबळ । पन्नाससहस्र त्याचें मंडळ । येकत्र मेळ तयां कैंचा ॥ ६ ॥ येके नक्षत्रीं वास दोहींसी । चंद्रमंडळाआड येणें राहूसी । यालागीं राहुग्रहण होय जगासी । राहु चंद्रसुर्यासि मळिण करी ॥ ७ ॥ अपाड असतांही मळिण भासे । राहुग्रस्त ह्मणती जन पिसे । आत्मागुणाधीन तैसें । माने ऐसे नेणतां तत्व ॥ ८ विचारीं गा रघुराया । अपाड गुणा आणि आत्मया । परी मळिण भासे नेणोनियां । विचारें तयां संगु कैंचा ॥ ९ ॥ आत्मा तो असंगी अनावृत । शुद्धबुद्ध नित्य मुक्त । अकर्त्ता अभोक्ता अनासक्त । नित्य सदोदीत निरंजन ॥ १२० ॥ ऐसा तो जरी मळिण भासे । हें तों प्रत्यक्ष जाण पिसें । तैसाचि चंचळ ऐसा दिसे । देह वशें तेहीं आयिका ॥ ११ ॥

॥ संमति श्लोक ॥ ॥ आद्यंतवति देहेऽसौ तथाभूत इवेक्षते । वीचिवत्यंभसि स्तंभो यथा भात्यचलश्चलः ॥

आदिअंत जयासि असे । जन्ममरण पावे जे सर्वस्वें । तें देहनामें बोलिजलें असे । नश्वर सर्वांशें क्षणिकत्व ॥ १२ ॥ ऐसिया नश्वर देहाचा ठाईं । एवंभूत आत्मा लक्षिती

---

१ दृष्टांत देऊन. २ धुळीच्या रंगानें. ३ मेघ. ४ आपल्या कर्मांनीं. ५ काळोखास. ६ सूर्याला. ७ योजनें (४ कोस=योजन). ८ अशा प्रकारचा.

पाहीं । भाविती तेथें देह गुण सर्वही । चळणत्वें देहीं तेंचि त्यासी ॥ १३ ॥ देह विकारें विकारवंतु । देहचलनें असे चळतु । देहमरणें असे मरतु । देहत्वें जीतु ऐसेचि ह्मणती ॥ १४ ॥ जैसा जळामाजी स्तंभ असे । तो तरी अचळ सर्वांशें । परी वीचिसंगें चंचळ भासे । लोक पिसे साच मानिती ॥ १५ ॥ जैसा अभ्राचा वेगु चंद्रासी । प्रतिभासे अर्भकासी । तैसा देहधर्म आत्मयासी । कल्पिती भ्रमासि नेणोनियां ॥ १६ ॥ नाहो देहेंद्रियासि तरी जडता । याचोनि संगें आत्मयासि तद्रूपता । अनात्म धर्म आत्मयाचे माथां । भावती नेणतां ह्मणतां तुह्मी ॥ १७ ॥ तरी देहेंद्रियें असंत न दिसती । तें तंव आत्मत्वेंचि दिसती । यालागीं यांसि आत्मा ह्मणती । असे प्रतीति सर्वां जनां ॥ १८ ॥ जरी असत्य आत्मव्यातिरिक्तें । आणि असती मिथ्याभूतें । तरी सत्य ऐसीं कां भासतें । हेंचि निरुतें सांगिजे ॥ १९ ॥ तरी आइक याचें उत्तर । जें कीं बोलिजेल सपरिकर । जेणें संदेहसागराचा पार । पैलतीर पाविजे ॥ २० ॥ तरी सत्याचिया संगती । असत्यही सत्यवत भासती । सत्य रश्मीमृगांभप्रतीति । सत्यव्यक्ति दिसे त्याची ॥ २१ ॥ साच शुक्तिकेचा ठाईं । असत्य रजत भासे पाहीं । तें सत्यसंगें संत सर्वही । भासे देहीं देह त्याचें ॥ २२ ॥ यदार्थी आइकें निश्चयें वचन । रघुनाथा पारिस सावधान । करूनियां येकाग्रमन । जेणें समाधान पावसी ॥ २३ ॥

अग्निसंगाद्यथा लोहमग्नित्वमुपगच्छति । आत्मसंगात्तथा गच्छत्यात्मतामिंद्रियादिकम् ॥ १२ ॥

जैसें अग्निसंगेंकरून । लोह अग्नित्व पावे जाण । जड अप्रकाश जें मळिण । तें देदीप्यमान स्वयें होये ॥ २४ ॥ तैसें देहेंद्रियादि जडजात । माळिण अप्रकाश मिथ्याभूत । आत्मसंगें करूनि यथार्थ । आत्मता निभ्रांत पावती ॥ २५ ॥ अगा सत्याचा ठाईं जें भासे तें असत्यही सत्यसारिखें दिसे । अधिष्ठान नेणोनि लोक पिसे । सत्य ऐसें त्यातें ह्मणती ॥ २६ ॥ अधिष्ठानाचें होतां ज्ञान । तरी सर्वही भासमात्र दृश्य जाण । अधिष्ठान नेणतां भिन्न भिन्न । भासे पूर्ण असुरांतका ॥ २७ ॥ अधिष्ठानाचिसारिखें । अध्यस्त भासे तेणेंचि लेखें । यालागीं त्यासिच सत्यत्वें देखें । लोक निकें तेंचि मानिती ॥ २८ ॥ शुक्तीचां ठाईं रजत अध्यस्त । तें सत्यत्वेंचि लोक मानीत । मा नेणतयाचिसाठीं भ्रांत । नाहींच करीत सत्य वस्तु ॥ २९ ॥ तैसा आत्मा तो नित्य अधिष्ठान । तेथ देहेंद्रियादि मिथ्या भान । तें चैतन्यसंगें भासती चेतन । मुख्यत्वें पूर्ण तेंचि मानिती ॥ २३० ॥ देहेंद्रियादि सत्य मानितां । आत्मस्वरूप कैंचें भ्रांता । यालागीं नेणती तत्वतां । स्वयें आत्मता आपुली ॥ ३१ ॥ तंव श्रीराम ह्मणती जी गुरुमूर्त्ती । जे देहेंद्रियादि आत्मा मानिती । ते ज्ञान जालिया आत्मा देखती । कोण्हे रिती सांगिजे ॥ ३२ ॥

---

१ लाटांबरोबर. २ आत्म्याहून इतर. ३ सविस्तर. ४ देह, इंद्रिय वगैरे सर्व जड पदार्थ. ५ स्थान. ६ हे राक्षसनाशका रामा !

तंव वसिष्ठ ह्मणती गा रघुनाथा । सांगों ययांचीही व्यवस्था । प्रत्यक्ष दृश्य भासत असतां । आत्मा तत्त्वतां कैसा जाणिजे ॥ ३३ ॥ अगा दृश्य भासे भरोवरी । आत्मा निर्धारिजे तेणेंकरीं । हे थोर पाहती कुसरी । रावणारी सांगेन ॥ ३४ ॥ जैशी दृश्य शाखा साधिलिया । सूक्ष्म शशि दिसतसे शाखेवरूनियां । तैसें देहेंद्रियां करूनियां । पाहें आत्मया सूक्ष्म दृष्टी ॥ ३५ ॥ आणीकही दृष्टांत सांगेन । आइकें येकाग्र करूनियां मन । जेणें होईल समाधान । तेंचि निरूपण परियेसीं ॥ ३६ ॥

अदृश्यो दृश्यते राहुर्गृहीतेन यथेंदुना । तथानुभवमात्रात्मा दृश्येनात्मावलोक्यते ॥ १३ ॥

राहू सर्वदा अदृश्य सर्वांसीं । कोण्ही कदा न देखे त्यासी । परी दृश्य चंद्रें त्या अदृश्यासी । सर्वस्वेंसी देखती ॥ ३७ ॥ राहू सर्वदा असे गगनीं । परी त्यातें कोण्ही कदा न देखती नयनीं । चंद्रमंडळासमान आल्या ग्रहणी । सर्वही जनीं देखिजे ॥ ३८ ॥ ग्रहणीं राहू सर्वांसी दिसे । ग्रहण सरल्या कोण्हा न दिसे । दृश्य चंद्र तो अदृश्य प्रकाशे । नवल ऐसें भरताग्रजा ॥ ३९ ॥ यालागीं न दिसे तेंही राहुमंडळ । दृश्य चंद्रें होय प्रत्यक्ष सकळ । तैसें अनुभवमात्रेंचि केवळ । आत्मा निर्मळ प्रत्यक्ष जाला ॥ २४० ॥ तो प्रत्यक्ष असतांही जनासी । भ्रमें अप्रत्यक्ष होय सर्वांसी । तेंचि दृश्य देहेंद्रियांसी । प्रत्यक्ष बुद्धीसि करिताती ॥ ४१ ॥ देहेंद्रियादिदृश्य समस्त । हें तंव जड अप्रकाशवंत । ययासि चळण ज्ञातृत्व । आणी अस्तित्व सत्ता जे कीं ॥ ४२ ॥ जडासि प्रकाश जऱ्ही घडे । तऱ्ही घटपटांसि प्रकाश कां न घडे । यालागीं दृश्याचा प्रकाशकु फुडें । जाण निवाडें परमात्मा ॥ ४३ ॥ आणि देहेंद्रियांचें अस्तित्व । आत्मेनविण न घडे वास्तव । सत्यावेगळें असत्य । नव्हे तें सत्य कदाकाळीं ॥ ४४ ॥ आणि जडासि पाषाणाचे-परी । चळण नव्हे अवसरीं । जडासि चळण आत्मेनकरीं । होय निर्धारीं जाण तूं ॥ ४५ ॥ येणें दृश्यप्रकारें करून । आत्मा साधिजे चिदेकघन । सत्ताप्रकाशक सुखपूर्ण । तेणेंचि वर्तन सर्व दृश्याचें ॥ ४६ ॥ अविचारें सर्व नेणणें असे । विचारें जैसें तैसें भासे । ह्मणौनि आत्मा विचारें प्रकाशे । जाणिजेत असे बुद्धजनीं ॥ ४७ ॥ शुक्तिकेचा ठायीं रजत दिसे । तें अदृश्य परी प्रत्यक्ष भासे । शुक्तिका कोण्हासिही न दिसे । सत्यचि ऐसें रजत मानिती ॥ ४८ ॥ त्याचि दृश्य रजतें करून । शुक्तिका फावे प्रत्यक्ष जाण । त्या रजता लावितां चंदन । सांगें अवसान कोठें त्याचें ॥ ४९ ॥ तें चंदन काय रजतासि लागे । कीं शुक्तिका शोभे चंदनसंगें । दृश्यचि अदृश्य फावों लागे । नवल सांगों काय तुज ॥ २५० ॥ तैसें देहादिकदृश्यजात याचा निर्धारु कीजे जंव निश्चित । तंव आत्माचि होये हस्तगत । मिथ्याभूत देहादिभ्रमु

---

१ यांची देखील. २ कौशल्य. ३ समोर न दिसणारा. ४ घट (घागर) व पट (वस्त्र) यांस. ५ आत्मामुळें. ६ परिणाम. ७ प्रात. ८ खोटा असलेला.

॥ ५१ ॥ तयात्यागीं गा रघुनाथा । दृश्येंसि द्रष्टा आत्मा ये हात । पूर्ण विचारेंचि तत्वतां । नाहीं अन्यथा यया बोला ॥ ५२ ॥ यया उपपत्ति सांगों किती । इतुकेनिच जाणावें विश्वमूर्ती । विचारीं चालितां चित्तवृत्ति । आत्मसंविति स्वयें फावे ॥ ५३ ॥ तुझिया प्रश्नाचें उत्तर । तें सांगितलें सविस्तर । परिसें निरूपण सुंदर । जेणें निर्धार दृढ होये ॥५४ ॥ तऱ्ही ऐसें असतांही गुरुराया । लोक नेणें कां पां आत्मया । देहादि आत्मत्वें घेती स्वामिया । आत्मतत्व नेणोनियां किमर्थ हे ॥ ५५ तंव वसिष्ठ ह्मणती गा रघुपति । सांगेन याचीही निरुक्ति । परस्पराध्यासें तेंचि होती । लोक नेणती तयास्तव ॥ ५६ ॥ जडाचिया संगति । अजडासि जडत्वप्राप्ति । जडासि अजडप्रतीति ऐसी भ्रांति भ्रांतासि पैं ॥ ५७ ॥ ययास्तव आत्मयासि नेणती । आत्मा जडसंगें जड मानिती । तेचि सांगेन श्लोकसंगति । विश्वमूर्ती आयिक तूं ॥ ५८ ॥

आत्मनो जडसंगात्स्यादनात्मत्वं जडस्य तु । स्यादात्मसंगादात्मत्वं जलाग्न्योःसंगवन्मिथः ॥ १४ ॥

आत्मयासि जडसंगती । अनात्मत्व आलें गा रघुपती । आणि जडासि अजड संगती । आत्मप्राप्ति आली दिसे ॥ ५९ ॥ जड जें कीं अंतःकरण । त्यामाजी बिंबलें चैतन्य । तेणेंचि आलें त्या जडपण । सामग्री पूर्ण तैसीच ॥ २६० ॥ बुद्धि अहंकार इत्यादिक । स्थूळलिंगदेह सम्यक । आत्मयासि हें लागलीं देख । जडत्वादि तेणें आलें ॥ ६१ ॥ नेणोनि आत्मानात्मविभाग । देहाचि आत्मयासि ह्मणती सांग । तैसीचि बुद्धि-अंतातें चांग । आत्मांग आरोपिती ॥६२॥ येणें आत्मयासि जडपण । जडसंगेचि जालें जाण । तैसेंचि आत्मसंगती आत्मपण । देहादिकां पूर्ण आलें दिसे ॥ ६३ ॥ देहेंद्रियांतें प्रकाशिता । ते नेणोनियां आत्मसत्ता । देहेंद्रियांतेंचि तत्वतां । आत्मा सर्वथा ह्मणताती ॥ ६४ ॥ येक प्राणतेंचि आत्मा ह्मणती । येक लिंगदेहीं आत्मप्रतीति । येक स्थूळदेहातेंचि ह्मणती । येक भाविती इंद्रियांसी ॥ ६५ ॥ येकासि मन ये आत्मप्रत्यया । येकासि बुद्धि आत्मा गा रघुराया । ऐसें जडातें आत्मा ह्मणोनियां । राहिले वायां नेणपणें ॥ ६६ ॥ परस्परें याच्या संगतीं । जडीं होय आत्मप्रतीति । आणि आत्मयासि जगसंगती । जड बद्ध ह्मणती नेणोनियां ॥ ६७ ॥ जैसें प्रकाशवंता अग्नीसी । जड संगें शीतलता आली त्यासी । हातीं धरिलियासी तयासी । उष्मा सर्वांशी असेचिना ॥६८॥ तैसेंचि अग्नीचेनि संगें । जळही उष्ण हों लागे । तें अग्निच होय सर्वांगें । जाळी वेगें दुसरियासी ॥ ६९ ॥ दोन्ही महद्भूतें तरी होती । परी अग्नि तो तैजसु गा रघुपती । जळ तें असे जडस्थिति । तैजसुगति अजड जाण ॥ २७० ॥ यांसि येरयेरा संगती । परस्परें जडाजड पावती । परि लोक तेंचि घेऊनि बैसती । नेणें सर्वार्थी ह्मणोनियां ॥ ७१ ॥

असत्यजडचिद्‌वंशनवनाच्चिद्‌पुर्जडम् । महाजलगतो वह्निर्यथा रूपं स्वमुज्झति ॥ १५ ॥

---

१ आत्म्याचें ज्ञान. २ स्पष्ट अर्थ 'निर्युति' असा पाठ. ३ सूक्ष्मदेहांत. ४ आपेआप. ५ जाणत नाहीं

देहादिइंद्रियेंअहंकारमन । असत्य जडें दृश्य जाण । यांचेनि संगें चिद्गुचैतन्य । स्वयें जडपण पावलें दिसे ॥ ७२ ॥ जडसंगें जडाचि भासे । असत्यसंगें असत्य दिसे दृश्यसंगें दृश्या ऐसें । संगदोषें भासे तद्रूप ॥ ७३ ॥ अगा शुद्ध वस्तु जे कीं असे । तें इतरसंगें तद्रूपाचि भासे । निजस्वरूप टाकिलें ऐसें दिसे । जड ऐसें भासत ॥ ७४ ॥ शुद्ध स्फटिक शुभ्रवर्ण । आरक्त कुसुमीं आरक्त जाण । कज्जलसंगेंवर्ण कृष्ण । निळें नीळपण दाखवी ॥ ७५ ॥ परि आपुली शुभ्रता टाकून । उपाधिसंगें नाना वर्ण । तैसा आत्मा शुद्ध ज्ञानघन । जडसंगें जाण जडची भासे ॥ ७६ ॥ जैसा वैश्वानर प्रकाशमंत । बहु जलें स्वरूप टाकित । महोन्हदीं[1] टाकिल्या उज्झितें[2] । टाकी निश्चित स्वस्वरूप ॥७७॥ जडजळाचिये संगति । अग्नि आपुलें रूप टाकिती । तैसा आत्मा देहेंद्रियसंगती । तद्रूपगति पावलासे ॥७८॥ नातरी जळ स्वच्छ गोड असे । तें उंसी मधुरपण उल्हासे । क्षारीं क्षारता पावतसे । तीक्ष्णसंगें वसे तिक्त[3] होउनी ॥ ७९ ॥ कटुसंगें कडुचि होत । आम्लीं आम्लपण दावित तैसा आत्मा उपाधिगत । असे भासत देहादिरूपें ॥ २८० ॥ तो तैसाचि नेणोनि भाविती । शुद्धीं जडाची होय प्रतिती । जड रूपाची मानुनि राहाती । नाहींच करिती आत्मयासी ॥ ८१ ॥ ऐसें जडपण मिश्रित । आत्मा होवोनियां निश्चित । तो प्रयत्नें निवडूनी घेइजेत । सुजडप्राप्य ऐसा होये ॥ ८२ ॥ स्वयें आत्मा जडसंगती । जडचि होऊनि ठेला गा रघुपती । तो प्रयत्नें घेइजे गा सुमती । विवेकसंपत्तीकरूनियां ॥ ८३ ॥ आणि या उपाधीचा ठाईं । आत्मा निश्चित असे पाहीं । तो प्रयत्नेंकरूनि साधूनि घेईं येकें येकाग्रही दृष्टांतमुखें ॥ ८४ ॥

इक्षौ गुडस्तिले तैलं काष्ठे वह्निर्दृषद्ययः । धेनावाज्यं वपुष्यात्मा लभ्यते चैव यत्नतः ॥ १६ ॥

अगा जडीं अजडाची प्राप्ति । अतिप्रयत्नें होय सुमती । तें दृष्टांतमुखें तुजप्रति । सांगेन निगुती तें ऐक ॥ ८५ ॥ जैसा इक्षुदंडाचे ठायीं । प्रयत्नें गूळ पाविजे पाहीं । कां तीळ गाळिलिया तैलही । प्राप्त पाहीं होतसे ॥ ८६ ॥ तैसेंचि काष्ठाच्या ठायीं । अग्नि स्वतःसिद्ध असे पाहीं । तो मथन केलिया सर्वही । प्राप्त ते ठायीं रघुनाथा ॥ ८७ ॥ कां दृषद् असे कां भाषण । त्याचें करूनियां चूर्ण । अग्निपाकें लोह संपूर्ण । प्राप्त जाण प्रयत्नें जैसें ॥ ८८ ॥ कां धेनूचा ठाईं आज्य असे । तें दोहनमथनादिकीं प्रत्यक्ष दिसे तैसा आत्मा सिद्ध देहीं वसे । प्राप्त सर्वांशें ज्ञानयत्नें ॥ ८९ ॥ चकारें एवकारें[4] निर्धारिलें । प्रयत्नेंविण अलभ्य जाणविलें । असे जैसें तैसें संचलें । प्रयत्नें भलें प्राप्तसिद्ध ॥ ९० ॥ येकेक काय सांगों तुजप्रति । देहीं आत्मयाची होय प्रतीति । पदार्थमात्रीं गा महामती । आत्मप्राप्ति स्वतःसिद्ध ॥९१॥ सर्व व्यापकपणें आत्माचि असे । पदार्थाकारभ्रमें भासे । तोंचि विचारितां सर्वांशें । आत्माचि असे सर्वत्र येकु ॥ ९२ ॥ तेंचि दृष्टांतें

---

१ मोठ्या डोहांत. २ टाकलेला. ३ तिखट. ४ श्लोकांतील 'च' आणि 'एव' (चैव) या पदांनीं

करूनि सांगेन । एक रघुनाथा सावधान । जणें बुझसी गा संपूर्ण । सर्वत्र खूण आत्मयाची ॥ ९३ ॥

स्फटिकात्मनि नरिध्रे स्थितं खं वीक्ष्यते यथा । तथा सर्वपदार्थेषु चिद्रूपः परमेश्वरः ॥ १७ ॥

जैसा निरंध्रेही जो स्फटिकमणि । त्यामाजी आकाश असे व्यापुनी । आकाश नसतां छिद्रपणीं । न पावे घणीं भेदिलियाही ॥ ९४ ॥ सच्छिद्र व्योमधर्म असे । नभेंविण सच्छिद्र कोण्ही नसे । ह्मणौनि आकाश सर्वत्र वसे । त्याविण नसे रिता ठावो ॥ ९५ ॥ ह्मणौनि स्फटिकाच्या पोटीं । आकाश देखिजे लोकीं दृष्टी । तैसी सर्व पदार्थांच्या पोटीं । होय भेटी आत्मयाची ॥ ९६ ॥ अगा चिद्रुप जो कीं परमेश्वर । तो पदार्थमात्रीं वर्त्ते निरंतर । हें विचारें जाणिजे दृढतर । अविचारें साचार नेणती ॥ ९७ ॥ नाहो ज्ञानस्वरूप आत्मा असे । तरी पदार्थमात्रीं कां चित्कळा नसे । तरु पाषाणादिकीं न प्रकाशे । ज्ञान कां नसे सर्वत्र जडीं ॥ ९८ ॥ तरी ऐक याचें उत्तर । शुद्धी प्रकाश होतसे फार । जड मळिण तो विचार । नाहीं प्रकार प्रकाशाचा ॥ ९९ ॥

दर्पणे बिंबितो ह्यर्कः प्रकाशं कुरुते यथा । तथा प्रकाशयत्यात्मा स्वच्छधीष्वनुबिंबितः ॥ १८ ॥

जैसा सूर्य सर्वां पदार्थांतें प्रकाशी । परी सूर्यकांतीं वृद्धीसि । जडमळिणीं पाषाणीं तैसी । उपलब्धि ऐसी न पाविजे ॥ ३०० ॥ कां चंद्रप्रकाशें सोमकांत । विरों पाहे होय द्रवीभूत । तैसें मळिण पाषाणजात । असती वर्त्तते अतिकाठिण्य ॥ १ ॥ तैसे सर्व इंद्रियांपरिस । अंतःकरणबुद्धि ते शुद्धांस । तेथें स्वप्रकाशे प्रकाशे परेश । घटपटादि वोस बुद्धिहीन ॥ २ ॥ घट पट आणि पाषाण । तेथें नाहीं बुद्धिअंतःकरण । ह्मणौनि अतिजड तें मळिण । ज्ञानप्रकाशन तेथें कैचें ॥ ३ ॥ अगा अंगणीं दर्पण ठेविला । रविकिरणें प्रकाशिलें तयाला । तोही शुद्धपणें आणिकाला । गृहांतिल्यांला प्रकाशी ॥ ४ ॥ तेंचि खापर अथवा पाषाण । रविसन्मुख ठेविल्या कोण गुण । तैसा बुद्धा प्रकाशे आत्मा पूर्ण । सर्वत्र असणें शुद्धाशुद्धीं ॥ ५ ॥ परी शुद्धाअशुद्धासारिखें । प्रकाश भासे उपाधिवशें । येऱ्हवीं तो समसमान असे । न्यून नसे कोण्हे अर्थीं ॥ ६ ॥ परी आत्मा अंतरींच प्रकाशतु । ऐसा तूं धरूं नको हेतु । असे अंतर्बाह्यगतु । सांगेन दृष्टांतु तो ऐक पां ॥ ७ ॥

बहिरंतः स्फुरज्जोतीरत्नकुंभप्रदीपवत् ॥ स्वप्रकाशात्तथैवात्मा स्वच्छधीष्वनुबिंबितः ॥ १९ ॥

रत्नाचिया कुंभाभीतरी । दीप ठेविला अंतरीं । तो अंतर्बाह्य प्रकाश करी । ज्योति सर्वांपरी स्फुरतसे ॥ ८ ॥ रत्नकुंभाचिया स्वच्छता । अंतर्बाह्य सर्व प्रकाशता । तैसा स्वच्छ बुद्धीमाजी बिंबतां । प्रकाशी सर्वथा परमात्मा ॥ ९ ॥ बुद्धीच्याही अंतरीं । आत्मा प्रकाशे स्वप्रकाशकरीं । ह्मणौनि बाह्यअभ्यंतरीं । ज्ञानेंकरीं प्रकाशतु ॥ ३१० ॥ एवं आत्म्यावेगळें कांहीं । बाह्यभ्यंतर दुजें नाहीं । सर्वत्र येकला तो पाहीं । दुसरे नाहीं

---

१ भोकें नसलेला. २ आकाशाचा गुण. ३ प्राप्ति. ४ भांड्यांत. ५ आपल्याच प्रकाशामुळें.

तयाविण ॥ ११ ॥ अहो विश्व हें प्रत्यक्ष दिसतां । येकु आत्माचि कैसा ह्मणता । विचारूनि । सांगा जी महंता । हें तंव चित्ता आनें वाटे ॥ १२ ॥ यदर्थी आइक उत्तर । सांगों दाही प्रकार । विश्व आभासमात्र गोचर । नव्हे साचार वस्तुबुद्धया ॥ १३ ॥

यत्र स्थितेयं विश्वश्रीः प्रतिभामात्ररूपिणी ॥ रज्वां भुजंगवद्भाति स्वयत्मामा सदोदितः ॥ २० ॥

जें कीं सर्वत्र येकाचि प्रकाशित । जें कीं सच्चिदानंद अपरिमित । त्याच्या ठायीं विश्व भासत । जाण तें कल्पित रघुराया ॥ १४ ॥ प्रतिभामात्रचि रूप जगाचें । परी वास्तव तें परब्रह्माचें । रविरश्मीकरीं भास जळाचे । कां कोल्हेरीचे असिवार ॥ १५ ॥ नाना रज्जुचा ठाईं भासु । भासे लटिकाची आभासु । वास्तव विचारितां शुद्धांशु । सावकाश रज्जुचि येकी ॥ १६ ॥ नाना गगनीं जैसी निळिमा । तेणें नीळत्वाच गमे व्योमा । तो भासमात्र गा सुरोत्तमा । नभेंगरिमा जैसी तैसी ॥ १७ ॥ तैसें भ्रमेंकरूनि विशुद्धनाथा । ब्रह्मीं विश्वाची आभासता । आत्माची देहेंद्रियां भाता । भासे अन्यथा भासु जाण ॥ १८ ॥ तेंचि तें आत्मस्वरूप जाण । जें कीं देहेंद्रियांहूनि विलक्षण । वरी भासे तो भास पूर्ण । जाण हे खूण सर्वत्र ॥ १९ ॥ ते सदोदितशब्दें परिपूर्ण । आत्माची जाण चैतन्यघन । निद्रितासि जसें कां स्वप्न । देहादिभान तैसें भासें ॥ २२० ॥ तैसें आत्मयाचां ठाईं । देहेंद्रियादिभास पाहीं । तें ज्ञानें विचारितां सर्वही । आत्माची पाहीं सदोदित ॥ २१ ॥ ऐसा आत्मा तो किम् लक्षण । तेंही तुज सांगों पूर्ण । ऐकें येकाग्र करूनि मन । समाधान जेणें होये ॥ २२ ॥ तें सार्धसप्तश्लोकींकरून । सांगों आत्मा याचें लक्षण । मग पूर्ण तेंचि विवरण । श्रोतां संपूर्ण परिसिजे ॥ २३ ॥ अपरोक्ष जाणतां आत्मलक्षण । तद्रूप राहातां संपूर्ण जाण । वर्तिसे गा तयास लागून । तेंही खूण सांगों मग ॥ २४ ॥ प्रस्तुत आत्मा तो किम लक्षण । सांगों देइजे अवधान । आयिकतांचि समाधान । आनंद पूर्ण कोंदतसे ॥ २५ ॥

आद्यंतरहितः सत्यश्चिद्रूपो निर्विकल्पकः । आत्मा संपूरिताकाशो जीवस्याद्यः परात्परः ॥ २१ ॥

जया आत्मयासि पाहीं । आदि अंत मध्य नाहीं । तो अनादिभूत सर्व देहीं । आधिकाई कोण त्याची ॥ २६ ॥ तयासि नाहीं कार्य लेख । या लागीं आदि नाहीं देख । सर्वां कारणांचें कार्य अशेख । नाहीं अनेक जिये ठायीं ॥ २७ ॥ जे वस्तु उपजलीच नाहीं । त्याची कोण पां माय कायी । जनकाभावें आदि नाहीं । अनादि पाहीं सर्वदा जें ॥ २८ ॥ आदि नसतां नाहीं मध्य । मध्याभावें अंत असाध्य । उत्पत्ति हीना कैंचें बाध्य । सर्व साध्य आदिअंतां ॥ २९ ॥ वंध्येची कन्या तरुणांगीं । गगनाच्यामध्यें कोण

---

१ इतर चमत्कारिक. २ लंकड्याचे; खेळांतील. ३ घोडेस्वार. ४ आकाशांत. ५ आकाशाचा मोठेपणा. ६ प्रकाशक. ७ साडे सात श्लोकांनीं. ८ श्रेष्ठपणा.

विभागी । ते जैसी पाहे सर्वेगी । नित्य निःसंगी सर्वज्ञ जें ॥ ३३० ॥ यालागीं मध्य-नाहीं जयासी । आदिविण अंत कोठें कल्पिसी । ह्मणौनि आद्यंतहीन परियेसी । सत्य सर्वांशीं येणें होये ॥ ३१ ॥ अगा जयासि आदि असे । तें सर्वथा काळांतरीं नासे । लोकांतही असे ऐसें । उपजलें नाशतसे सर्वथा ॥ ३२ ॥ यदर्थीं भगवंत आपण । गीतेसि बोलिलें श्रीकृष्ण । तेंचि आइक संमतिवचन । समाधान जेणें होये ॥ ३३ ॥

संमतिश्लोक ॥ जातस्य हि ध्रुवो मृत्युर्ध्रुवं जन्म मृतस्य च । तस्मादपरिहार्येऽर्थे न त्वं शोचितुमर्हसि ।

जें उपजे नाशे गा रघुपती । तें असत्य जाण सर्वार्थीं । आद्यंतहीन जें विश्वमूर्ती । सत्य त्रिजगतीं तें जाण ॥ ३४ ॥ यालागीं सत्य तें जाणिजे । सत्य तें चिद्रूप सहजें । असत्य तें जड ह्मणिजे । दृश्यव्याजें[१] भासत ॥ ३५ ॥ ब्रह्म तें सर्वांचें साक्षी जाण । ह्मणऊन सत्यरूप ज्ञानघन । संकल्पविकल्प विहीन । निर्विकार पूर्ण ह्मणौनियां ॥ ३६ ॥ जें जीवात्मयाचेंही आदिभूत । तें आकाश व्यापूनि संतत । तेंचि परब्रह्म सदोदीत । जाण निश्चित तमालश्यामा ॥ ३७ ॥ पर जें कीं ब्रह्मादिक । त्याहून पर जें येकायेक । नातरी परशब्दें माया सम्यक् । तत्साक्षी देख परात्पर ॥ ३८ ॥ आणीक लक्षणें रघुपती । आइकावीं एकाग्रमति । जेणें बाणे आत्मस्थिति । श्रवणसंपत्ति जालिया ॥ ३९ ॥

आत्मा विशुद्धश्चैतन्यस्वरूपः शाश्वतो विभुः । निर्विकारः स्वयंज्योतिःस्वभवेऽप्रकाशकः ॥ २२ ॥

व्यापकपणें आत्मा बोलिजे । हें पूर्वींही बोलिलें श्लोकव्याजें । व्यापक तें अतिशुद्ध जाणिजें । तेथ नेणिजे अज्ञानपंकु ॥ ३४० ॥ जेथ अज्ञान निःशेष नाहीं । तोचि शुद्ध आत्मा पाहीं । अथवा गुणद्वयविहीनही । शुद्ध निश्चयीं आत्मरूप ॥ ४१ ॥ नाना वृत्तींचें उपशमन[२] । मी पूर्ण हेंही अनुसंधान । सरे तेचि विशुद्ध खूण । निश्चयें जाण रघुनाथा ॥ ४२ ॥ जेथ निःशेष जडाचें व्यावर्त्तन । तेंचि तें अतिशुद्ध जाण । शुद्ध तेचि चैतन्यघन । निखळ ज्ञानस्वरूपचि ॥ ४३ ॥ जड तितुकें दृश्यजात । अजड तें ज्ञान-घन निश्चित । तेंचि चैतन्यस्वरूप बोलिजेत । अबाधित काळत्रयीं ॥ ४४ ॥ जें ज्ञान बाधे काळेंकरुनी । तेंचि वृत्तिरूप भरंवसेनी । हें अबाधित अखंडपणीं । स्वरूपपणीं प्रकाशत ॥ ४५ ॥ अथवा चैतन्य आणि स्वरूप । दोनी पदें केलिया एवंरूप । अर्थ होतसे पैं तद्रूप । चैतन्यरूप तें ज्ञान ॥ ४६ ॥ जें स्वरूपरूपेंचि ज्ञान । तें चैतन्यरू-पव्याख्यान । आपुल्या स्वरूपींचें अवस्थान[३] । स्वस्वरूप पण तया नाम ॥ ४७ ॥ ज्ञानस्वरूप अजड असे । तेंचि शाश्वत जाण सर्वांशें । जड तितुकें नाशत असे । अशाश्वत ऐसें नाम त्याचें ॥ ४८ ॥ अजड आणि स्वप्रकाशपण । आत्मयासी शाश्वत बोलणें । काळत्रयीं अबाधित पूर्ण । शाश्वतपण आत्मयासी ॥ ४९ ॥ जो कीं शाश्वत निरंतर । तोचि जाण विभु[४] सर्वेश्वर । अशाश्वत तें नश्वर । नियंतृत्व थोर कैचें त्यासी

---

१ दिसणाऱ्या पदार्थांच्या मिषानें. २ शांत होणें. ३ राहणें. ४ सत्ता चालविणारा.

॥ ३५० ॥ पुत्राह्ननि पिता आदि असे । ह्मणौनि नियंतृत्व तेथ वसे । यालागीं सर्वांह्ननि शाश्वत असे । तेथ सर्वांशें विभुत्व जाण ॥ ५१ ॥ आणि जे कीं विकारवंत वस्तु असे । ते तंव नाशिवंत सर्वांशें । अंशमंत तें विकारी वसे । आन नसे यया बोला ॥ ५२ ॥ आत्मा निरंश सर्वांपरी । निरंश तें सहज अविकारी । सांश तें परिणमे नानापरी । ह्मणौनि निर्विकारी निरंतर ॥ ५३ ॥ पयादिक सांश असे । ह्मणौनि दध्याकारें परिणमतसे । विकारनामें अन्य रूपांशें । विकार ऐसें या नाम ॥ ५४ ॥ अंशशब्दें परिणामवादी । सूक्ष्मबिंदुप्रमाणअवधि । ज्यासि असे ते परिणामी सर्वादि । जळपृथ्व्यादि सावयव जें ॥ ५५ ॥ तैसा आत्मा नव्हे अंशमंतु । अंशाभावें नव्हे परिणामवंतु । यालागीं निर्विकार बोलिजेतु । सदोदीतु निरंशें ॥ ५६ ॥ विकारवंत आकारा येईल । आकारु तो सर्वथा नाशेल । यालागीं विकारी ह्मणाल । तो नित्य निर्मळ अविकारी ॥ ५७ ॥ नातरी कोण्ही परिणामवादी बोलती । आत्मपरिणाम विश्व ह्मणती । आणि विश्वाची उत्पत्तिस्थिति । करी स्वशक्ती ऐसा प्रवादु ॥ ५८ ॥ तरी जया सद्गुरुकृपा नाहीं पूर्ण । तया नाहीं आत्मयाचें अपरोक्ष ज्ञान । त्याचे हे जल्पवाद जाण । नव्हे खूण अनुभवाची ॥ ५९ ॥ दुसरियासि जिंकावयाकारणें । नाना परिच्या युक्ति बोलणें । तया जल्प ऐसें ह्मणणें । निश्चय करणें शास्त्रें ऐसा ॥ ३६० ॥ जिगिषाकथाजल्प ऐसें । शास्त्रींही बोलिलेंसे । ह्मणौनि बोलिलें त्रायिसें । सिद्धांताऐसें नव्हेती पैं ॥ ६१ ॥ तरी आइक आतां गा रघुपती । आत्मा अविकारी जाण सर्वार्थीं । याचा परिणाम विश्व ह्मणती । ते तंव नेणती शास्त्रानुभव ॥ ६२ ॥ शास्त्रश्रवण अनुभव जयासी । ते जाणती अपरिणामी निरंशी । विश्व हें अभ्रजाळ जैसें आकाशीं । नाथिलियास कोणें नेमिलें ॥ ६३ ॥ अंबरीं निळिमा केंची तेथ । शुद्ध गगनासि निर्लेप मानित । तें भ्रांतीवांचूनि ईषत् । नाहीं निश्चित रघुनाथा ॥ ६४ ॥ शुक्तीकेचां ठाईं रजत । तें कोणें नेमिलें संतत । कीं शुक्तिका परिणमली तेथ । काय अर्थ बोलावा पैं ॥ ६५ ॥ शुक्तिका जैसी तैसीच असे । तेथ उगेंचि रजत भासतसे । तिसी वल नाहीं कर्त्तव्य न दिसे । कोणा मिसे बोलावें पैं ॥ ६६ ॥ तरी शुक्तिचेनि अज्ञानें । रजताकार शुक्तिकेसि होणें । नसतेंचि रजत भासणें । जाण ये खुणे भ्रमाचिये ॥ ६७ ॥ तेंचि शुक्तिकेचें ज्ञान जालिया । तें प्रत्यक्ष अनुभविलिया । कैंचें रजत केंची माया । जाण रघुराया येणें न्यायें ॥ ६८ ॥ तैसेंचि रज्जूच्या ठायीं सर्पबुद्धि । हे तंव अज्ञानाची समृद्धि । निद्रेमाजी स्वप्नबुद्धि । जाण सुबुद्धी भ्रमुचि तो ॥ ६९ ॥ तैसें निर्विकार वस्तूच्या ठायीं । जगदाभास भासे पाहीं । तें अज्ञानावांचून दुजें नाहीं । ज्ञानें सर्वही

---

१ अंश (भाग) असणारें. २ विकार पावतो. ३ गडबड. ४ जिंकण्याच्या इच्छेनें प्रतिपक्ष्यांस कांहीं तरी थापा मारणें. येथें 'जिगीषुनिमिषा कथाजल्प' असा निरर्थक पाठ आहे.

मिथ्याभूत ॥ ३७० ॥ ह्मणौनियां आत्मा निर्विकार । कोण्हे काळीं देशीं नाहीं विकार । स्वप्रकाश निरंतर । प्रभाकर सप्रभ जैसा ॥ ७१ ॥ रात्रिदिवस दोनी नेणोनी । स्वप्रकाशें प्रकाशे जैसा तरणि । तैसा आत्मा अज्ञानादि नेणोनि । स्वप्रकाशेंकरूनि शोभतु ॥ ७२ ॥ आत्मयासि दृष्टांतु देणें । हें तंव न घडे सर्वस्वपणें । तैसेंचि नाहीं ह्मणौनि बोलणें । दृष्टांत देणें अलौलिक ॥ ७३ ॥ अथवा स्वयं शब्दें स्वतः सिद्ध । आत्मस्वरूप अगाधबोध । ज्योतिप्रकाशे निर्बाध । अति शुद्ध शुद्धाहुनी ॥ ७४ ॥ अहो पराचेनि जें प्रकाशें । त्यासि बोलिजे परप्रकाश ऐसें । परप्रकाश तें जड दृश्य असे । जड तें सर्वांशें मिथ्याभूत ॥ ७५ ॥ तैसें नव्हे आत्मस्वरूप । तें स्वप्रकाशैकचि द्रूप । स्वयंज्योति अमूप । जाण निष्कंप अचळपणें ॥ ७६ ॥ यालागीं आत्मा विशुद्ध चैतन्यघन । स्वस्वरूप नित्य निरंजन । सत्य समर्थ नियंता पूर्ण । आणि अगुण निर्विकारत्वें ॥ ७७ ॥ स्वतःसिद्ध स्वयंज्योति । अनादि आइता प्रकाशमूर्ति । अचळ अढळ स्वयंज्ञप्ति । आइक सुमती चिन्ह आणीक ॥ ७८ ॥

आत्मानुभवमात्रात्मा सर्वगः सर्वसंश्रयः । प्रकाशानंदचैतन्याव्यतिरिक्तोऽनलोष्णवत् ॥ २३ ॥

अनुभवमात्रचि आत्मा असे । परी बोलिजे घेइजे ऐसा नसे । इंद्रियग्राह्य नव्हे सर्वांशें । दृश्य नसे जिये ठाईं ॥ ७९ ॥ दृश्य जेथें अणुमात्र न स्फुरे । वृत्तिमात्रज्ञानस्वरूपीं मुरे । ग्राह्यग्राहक जेथें वोसरे । त्रिपुटी सरे ज्ञेयज्ञानाची ॥ ३८० ॥ अज्ञानवृत्ति निःशेषही । मावळूनि जाती सर्वही । वस्तूवेगळें आन कांहीं । नसे जे ठायीं तो अनुभव जाण ॥ ८१ ॥ अथवा जें कीं स्वरूपज्ञान । तयासि बोलिजे अनुभव पूर्ण । निखिल ज्ञानेंविण नसे आन । तेंचि चैतन्य अनुभवनामें ॥ ८२ ॥ तन्मात्राचि आत्मा असे । अनुभवमात्रचि बोलिजेतसे । तेंचिं स्वरूप जयाचें ऐसें । आन नसे द्वैतलेशु ॥ ८३ ॥ या नांव अनुभवमात्रचि ह्मणिजे । वस्तूवेगळें दुजें नेणिजे । कल्पित तें परिच्छिन्न सहजें । आत्मा जाणिजे सर्वगतु ॥ ८४ ॥ ज्या ज्या दिगंतरा जाय आपण । तों तत्पूर्वीं तेथेंचि असे गगन । तैसें आत्मस्वरूप सर्वत्र व्यापून । असे भरून सर्व देशीं ॥ ८५ ॥ कां वस्तु जे जे निर्माण होये । ते आधींच व्योमें व्यापिली आहे । सर्व देशीं काळीं नित्य पाहें । तैसा आहे सर्वगत आत्मा ॥ ८६ ॥ आत्मा सर्वगतययापरी । ह्मणिजेतसे गा रावणारी । सर्वाश्रय तेणेंचिपरी । त्याभीतरी जग सकळ ॥ ८७ ॥ प्रकाशनंद चैतन्यघन । अव्यतिरिक्तपणेंचि येकपण । ययाचेंही सांगों विवरण । ब्रह्म पूर्ण जेणें भासे ॥ ८८ ॥ प्रकाश आणि आनंद । तिसरें ज्ञान विशद । येहीं तिहीं पदीं अगाध । नाहीं भेद वाच्यपणें ॥ ८९ ॥ अथवा प्रकाशशब्दें सत्ता । घटसन् पटःसन् हें असतां । ऐसी आहंपणाची सर्वसत्ता । तेंचि तत्वतां प्रकाशरुप ॥ ३९० ॥ प्रकाशशब्दें सत्ता रघुपती ।

---

१ मर्यादायुक्त. २ दिसेकडे.

ते वाखाणिली गा तुजप्रति । आकाससत्तेचि एकत्व पावती । वाच्य होती येणे अर्थे ॥ ९१ ॥ तैसेंचि निरतिशय जो आनंद । विषयसुखेंसि एकत्व विशद । पावल्या वाच्यप्रसिद्ध । तत्त्यागें शुद्ध तेंचि उरे ॥ ९२ ॥ तिसरें चैतन्य तें ज्ञान । स्वप्रकाशैकनिरंजन । वृत्तिज्ञानें वाच्य जाण । तेणेंसि भिन्न तेंचि शुद्ध ॥ ९३ ॥ ऐसें सत्ता आनंद प्रकाश । यिहीं तिहीं पदीं येकुचि परेश । अभेदपणें ब्रह्म उदास । भिन्नभास असेचिना ॥ ९४ ॥ जैसा अग्नि आणि उष्णता । वेगळें न निवडे गा सर्वथा । अग्नीचें नाम उष्णता । भिन्न तत्त्वता असेचिना ॥ ९५ ॥ उष्णता तेचि अग्नि । अग्नि तोचि उष्णता जनीं । परस्परें भिन्न नव्हती दोन्ही । येकपणीं येकाचि त ॥ ९६ ॥ नाना वायु आणि गति । येक वायुचि जैसा गा सुमती । अवकाश आणि आकाशस्थिति । भिन्न नव्हती कदाकाळीं ॥ ९७ ॥ नाना आर्द्रता आणि नीर । दोन्ही येकत्र अंबु सर्वत्र । द्रुति आणि पुष्पसार । मनोहर येकत्त्व ॥ ९८ ॥ पर्जन्य आणि धारा । गंध आणि कापुरा । दीपप्रकाश येक वीरा । नाहीं दुसरा भिन्नभावो ॥ ९९ ॥ तैसें प्रकाश आनंद चैतन्य । पदत्रयीं आत्मा येकुचि जाण । तेंचि तें ब्रह्म परिपूर्ण । नव्हे भिन्न वाच्यपदीं ॥ ४०० ॥ आतां आणीकही लक्षणें । सांगों श्रीरामा तुजकारणें । ते आइकतांचि एकाग्रमनें । बुझसी जेणें आत्मस्थिति ॥ १ ॥

निर्नामार्थश्चिन्मात्रः परमात्मावभासकः । सबाह्याभ्यन्तरो व्यापी निष्क्रियो निष्कलोऽक्षयः ॥ २४ ॥

तरी दृश्यविवर्जित चैतन्यमात्र । दृश्यदेहादिविश्वविचित्र । त्याचें नाम रूप त्यजूनि सर्वत्र । ज्ञान मात्र जें निर्विशेष ॥ २ ॥ चित्तकल्पित चैतन्य बोलिजे । तयासीच दृश्य म्हणिजे । चित्त कल्पनेविना जें सहजें । तेंचि जाणिजे आत्मरूप ॥ ३ ॥ तेंचि तें सर्वावरिष्ठ व्यापक । परमात्मा जो अवभासक । जयाचेनि भासें भासे सकळीक । येकानेक जेथें नाहीं ॥ ४ ॥ द्रष्टा दृश्याचा जाणता । एक काळेंचि सर्व भासविता । तोचि आत्मा जाण प्रकाशता । होय तत्वतां प्रकाशकु ॥ ५ ॥ जयाचेनि हें सर्व भासे । जयाचेनि हें सर्व प्रकाशे । तो अवभासकु आत्मा असे । हें रघुवंशें जाणावें ॥ ६ ॥ बाह्य जें कीं घटपटादिस्थूळ । अंतरीं अहंकार मन बुद्धि सकळ । कामक्रोधादिवासनाजाळ । अंतर्बाह्य सकळ विश्वनामें ॥ ७ ॥ यया सर्वांचा जो अवभासकु । तेंचि बोलिजे आत्मा येकु । ऐसा असोनि निष्कलंकु । सर्वाश्रय मुख्य अधिष्ठान हें ॥ ८ ॥ आणीकही लक्षणें रघुपती । आत्मयाचीं सांगेन तुजप्रति । तेंहीं आइकें येकाग्रचित्तीं । विश्वमूर्ती अवधारीं पां ॥ ९ ॥

य आत्मा चिन्मयः स्वच्छः प्रबुद्धोऽप्यच्युतः । हेयग्राह्योज्झितो देशकालजात्याद्यसंगतः ॥ २५ ॥

---

१ वेगळें करतां येत नाहीं. २ प्रकाश, आनंद व चैतन्य या पदांनीं. ३ प्रत्यक्ष दिसणारा देह आणि अनेक प्रकारचें जग.

जो कीं आत्मा चैतन्यमूर्ति । केवळ ज्ञानमात्रचि रघुपती । ह्मणौनि तयातें स्वच्छ ह्मणती । स्वयंज्योति स्वप्रकाशें ॥ ४१० ॥ निर्मळपणेंचि स्वच्छपण । नाहीं अज्ञानादि जेथें मालिन्य । उपाधिगुणकार्य आणि त्रिगुण । नाहीं तें पूर्णचि बोलिजे ॥ ११ ॥ उपाधिहीनासि व्यापकपण । उपाधि तितुका परिच्छिन्न । ह्मणोनि तोचि एक परिपूर्ण । नाहीं न्यून अंतर्बाह्य ॥१२॥ व्यापका कैंचा वृद्धिनाशु । वाढावया रिता नाहीं देशु । क्षय पावणें तरी नव्हे सांशु । नित्य अविनाशु निरूपाधिपणें ॥ १३ ॥ तें जैसें तैसें सर्वदा असे । जग भासतां न वचे अंशें । बुद्धि न पवे जगनाशें । परिपूर्ण असे अखंडपणें ॥ १४ ॥ यालागीं वृद्धि अपचय दोन्हीं । मावळलीं जियेस्थानीं । तें अखंडदंडायमान जनीं वनीं । सर्वत्र सर्वपणीं शोभत ॥ १५ ॥ आणि घेवों जातां इंद्रियें न घवे । टाकितां स्वतःसिद्धपणें न टाकवे । सांडणें मांडणें न संभवे । न झेंपावे बुद्ध्यादिकां ॥ १६ ॥ अगा सांडणें मांडणें दोन्ही । न संभवती जये स्थानीं । घेतां दृश्यत्वें भासे नयनीं । परी विकारपणीं जो उदास ॥ १७ ॥ साकारभास जो असे । तो इंद्रियांदिकीं घेवों येतसे । हें निर्गुण निरंश सर्वांशें । सर्वत्र प्रकाशे स्वप्रकाश ॥ १८ ॥ ह्मणोनि ग्राह्य नव्हे सर्वथा । त्यजूं जातां स्वयेंचि आइता । अपरोक्ष परिपूर्ण सर्वांतरता । नये त्यजितां त्याज्यबुद्धी ॥ १९ ॥ आणि घेवों जातां दुजें नाहीं । परिच्छिन्न नव्हे कोण्हे काळेंही । त्यजूं जातां तेंचि सर्वही । त्यजावें काई सर्वहीपणें ॥ ४२० ॥ ह्मणोनि घेवों जातां कैसें घ्यावें । निरंशपणें घेता न पावे । सांडूं जातां तेंचि सर्वत्र फावे । स्वयेंचि आहे येकलें येक ॥ २१ ॥ जें आपणाहूनि व्यतिरिक्त । बाह्य सांश आणि आकारवंत । परिच्छिन्न तेंचि त्यजिजेत । आत्मा एवंभूत सर्वथा नव्हे ॥ २२ ॥ आत्मा अपरोक्ष सर्वांतर । स्वस्वरूप निरंश निर्विकार । व्यापक निर्गुण निराकार । त्याग साचार कैसा होये ॥ २३ ॥ हेयग्राह्यांहूनि वेगळें । तेंचि तें परब्रह्म निराळें । जें संग न पावे देशें काळें । कोण्हा न कळे असंगपणें ॥ २४ ॥ देश काळ क्षयातें पावती । आत्मा अक्षयी जाण सर्वार्थीं । देश काळादि ब्रह्मीं कल्पिजेती । अविकल्पमूर्ति परब्रह्म ॥ २५ ॥ तैसेंचि जाति वर्ण आश्रमाचार । ते ब्रह्मीं नाहींत जे विकार । ब्रह्म तें निर्गुण अविकार । तेथें नानाकार असतीचना ॥ २६ ॥

संमतिश्लोक ॥ न वर्णा न वर्णाश्रमाचारधर्मा न मे धारणाध्यानयोगादयोऽपि ॥

यालागीं येथें ग्राह्यादिसमस्त । आत्मा येणेंसि व्यतिरिक्त । वर्ते सर्वभूतांतरगत । स्वयें अलिप्त असंगपणें ॥ २७ ॥

ब्रह्मांडे च यथा वायुः सर्वभूतगतस्तथा । स एवभगवानात्मा तनुमुक्तो व्यवस्थितः ॥ २६ ॥

वायु जैसा ब्रह्मांड व्यापुनी । राहिला असे जनीं वनीं । परी संग न पवे तयाचेनि ।

---

१ उपाधि व गुण यांचा परिणाम. २ टाकण्यासारखें अथवा पुढें घेण्यासारखें या दोहोंहून वेगळा. ३ सर्व पदार्थांमध्यें असणारा.

२५

अंतर्बाह्यपणीं वर्ततांही ॥ २८ ॥ कां जैसें आकाश सर्वगत । अंतर्बाह्य असोनि व्यतिरिक्त । तैसा आत्मा असंगत । असे अलिप्त सर्वोपरि ॥ २९ ॥ यालागीं हेयग्राह्य देशकाळ । जातिगुणादिकर्ममेळ । त्याव्यतिरिक्त असंग निर्मळ । न पवे मळ संबंधाचा ॥ ४३० ॥ एवंभूतगुणी जो आत्मा । तोचि षड्गुणैश्वर्य जाण रामा । षड्गुण तेही वीरोत्तमा । सांगेन गरिमा तयांची ॥ ३१ ॥

संमतिश्लोक ॥ ऐश्वर्यस्य समग्रस्य धर्मस्य यशसः श्रियः । ज्ञानवैराग्ययोश्चैव षण्णां भग इतीरणा ॥

समग्रही ऐश्वर्य धर्म जाण । यश श्री लक्ष्मी वैराग्य ज्ञान । हे षड्गुण जेथ संपूर्ण । तो श्रीभगवान् परमात्मा ॥ ३२ ॥ तेंचि भगवान्नामें ब्रह्म पूर्ण । हेचि षड्गुण अंगीकारून । विराजे परब्रह्म आपण । नव्हे सगुण षड्गुणेंही ॥ ३३ ॥ तोचि व्यापकपणें परिपूर्ण । मुक्तीच्या ठायीं उपलब्धि जाण । उपाधिरहित केवळ चिदेकघन । भासे पूर्ण मुक्तीसि पैं ॥ ३४ ॥ नाहीं मुक्तीच्या ठायीं लाभे जरी । तरी अन्यत्र कायि आत्मा अवसरी । आत्मा सर्वत्र असेचि परी । मुक्तीभीतरी केवळ लाभे ॥ ३५ ॥ जागृतिस्वप्नीं आत्मा असे । परी तो देहेंद्रियसमुदायें न भासे । तो केवळ सुषुप्तीसि लाभतसे । जाण तैसें मुक्तावस्थेसी ॥ ३६ ॥ केवळचि सर्वत्र व्यापूनि असे । परी उपाधियोगें विशिष्ट भासे । मुक्तिसी केवळ उरतसे । आन नसे दुजें तेथें ॥ ३७ ॥ आतां मुक्तावस्था ते जाण ऐसी । बाधालिया तुझिया मनासी । केवळचि उपलब्धि कैसी । ते अनुभवासि येयील तुज ॥ ३८ ॥ तरी अगा मुक्तिअवस्थेचें लक्षण । तें एवंविध रघुनाथा जाण । भासतांही प्रपंचभान । बाधित पूर्ण ज्ञानें होये ॥ ३९ ॥ देहादिप्रपंचजात । तें वस्तुज्ञानें होय बाधित । अपरोक्ष स्वस्वरूप जाणत । वासना चित्त नाशोनियां ॥ ४४० ॥ जेथें जें जें कांहीं दृश्यमान । श्रुतदृष्टकल्पितभाव्य जाण । तितुकें आरोपित मायामय पूर्ण । बाधोनि समान ब्रह्मचि भासे ॥ ४१ ॥ अंतर्बाह्य एक चैतन्य । दुसरें न भासे ब्रह्मेंविण । परमानंदाचें आस्वादन । भोक्तेनविण जेथें उरे ॥ ४२ ॥ तेचि मुक्ति जाण पा रघुनाथा । जेथ केवळ लाभे आत्मसत्ता । नेणे देहादिदुःखवार्ता । तेचि तत्वतां मुक्तिजाण ॥ ४३ ॥ केवळ मुक्तिच्या ठायीं ह्मणसि । तरी सर्वत्र चित्कळा परियेसीं । तेही तुज येईल प्रतीतीसी । सांगेन मानसीं दृढ धरीं ॥ ४४ ॥

सैव चिद्घनाभोगभूफणे व्योम्नि भास्करे । धराविवरकोशे च सैव चित्कीटकोदरे ॥ २७ ॥

तरी पृथ्वीच्या ठायीं तेंचि ज्ञान । केवळपणें वर्ते परिपूर्ण । ज्याच्या ठायीं पृथ्वी कल्पित जाण । तें चिद्घन जाणावें जें ॥ ४५ ॥ तेंचि ज्ञानस्वरूप श्रीरघुपती । व्योमीं अंतरिक्ष सूर्यादि । भोगस्थान स्वर्ग ह्मणति । तेथही अनुगती आत्मयाची ॥ ४६ ॥ अथवा भोगीं विरागीं आत्मस्वरूप । पृथ्वी पाताळीं अमप । तेंचि तें सर्वत्र व्यापक

१ प्राप्ति. २ शोभेत. ३ ऐकिलेलें, पाहिलेलें, कल्पिलेलें, अथवा पुढें होणारें. ४ उपभोग.

निष्कंप । चित्स्वरूप देखतसे ॥ ४७ ॥ तेंचि सर्वत्र भासे जेथ । तें तें यक दोन्ही नामें बोलिजेत । परी वस्तुत्वें नाहीं ईषत् । तेंही संक्षिप्त परीयेसीं ॥ ४८ ॥ तया ज्ञानाची रघुपती । धराविवरीं असे व्याप्ती । कोश भांडार संपत्ति । सर्वत्र वर्त्तती व्यापकपणें ॥ ४९ ॥ तेंचि पशुपक्षिकीटकोदरीं । व्यापूनि राहीलें सर्वांतरीं । ज्ञानेंविण गोष्टि दुसरी । नाहीं खरी तिहीं लोका ॥ ४५० ॥ ज्ञान तेंचि ब्रह्मपूर्ण । यया बोल नाहीं आन । जें ज्ञान तेंचि चैतन्य । नित्य निरंजन परब्रह्म ॥ ५१ ॥

न बंधोस्ति न मोक्षोस्ति ब्रह्मवास्ति निरंतरम् । नैकमस्ति न च द्वैतं संवित्स्फारं विजृंभते ॥ २८ ॥

ऐसियासि कैंचें मुक्त बंधन । सर्वाद्य सर्वही चिद्घन । निश्चय अखंड कोंदुन । परिपूर्ण पूर्णत्वें ॥ ५२ ॥ दुसरा पदार्थ साच असावा । तेणें बंधु केलासा कळावा । दुजें नसतां बंधुभावा । नये रौणिवा मोक्षाच्या ॥ ५३ ॥ अज्ञानें बंधु आत्मयासी । तरी अज्ञान साच आहे कोण्हे देशीं । जन्मपत्रिका वंध्यापुत्रासी । कोण तो ज्योतिषी कारितसे ॥ ५४ ॥ अज्ञानाचीं मायबापें कवण । आणि कोणें केलें पाणिग्रहण । हें विचारितां विचारण । पांगुळवाणें होऊनि ठाके ॥ ५५ ॥ जें उपजतां निमतां न दिसे । तें मिथ्याभूत मध्येंचि भासे । तैसे अज्ञान कोणे दिसे । उपजे नासे सांगिजो ॥ ५६ ॥ अविद्या याचें नाम जाण । येणें नामें नव्हे विद्यमान । सत्य रूपासि बंधन । अवटमान सर्वार्थी ॥ ५७ ॥ स्वप्नींचा शत्रु आपणा । जागृतीसि आणी बंधना । मृगांभतारूं बुडवी सधना । अमृता मरण जरी मारी ॥ ५८ ॥ राजा वंध्यापुत्रें जरी बांधिला । सिंह शशविषाणीं बोधिला । प्रतिबिंबें पराक्रमु केला । बिंब ग्रासिला पुरुषार्थें ॥ ५९ ॥ साउली पुरुषाचें करी भक्षण । अंधकार करी भानूचें ग्रसन । शीतें अग्नीचें आच्छादन । अज्ञानें बंधन आत्मयासि तैसें ॥ ४६० ॥ कार्पासतूळा अग्नीशि जाळी । तरी आत्मयासि अज्ञान आकळी । ह्मणौनी बंधन नाहीं कोणे काळीं । असतां मेळीं उपाधीच्या ॥ ६१ ॥ जेथ बंधन जया नाहीं । तेथ मुक्त ह्मणणें तया कायी । यालागीं बंध मोक्ष दोन्ही नाहीं । सबाह्य सर्वही व्यापकपणें ॥ ६२ ॥ अपरिच्छिन्नासि बंधन न घडे । तेंचि मुक्ति होय बंधन विघडे । हें तंव दुजेंनविण अद्वैत फुडे । बंधमोक्ष सांकडें । कदा नव्हे ॥ ६३ ॥ पुनरपि आत्मयाचें लक्षण । श्रीरामा आइक पूर्ण । जो येक ना अनेक चैतन्य । चिन्मात्रघन परमात्मा ॥ ६४ ॥ अगा तें येक ना अनेक । द्वैत ना अद्वैत देख । ना तें नव्हे व्याप्य व्यापक । कांहींयेक स्वप्रकाश ॥ ६५ ॥ येक ह्मणतां दुजें भासे । गणितेनासि दुजें असे । यालागीं येक नव्हे ऐसें । अनेक भासे तरी माया ॥ ६६ ॥ ह्मणौनि येकानेकानिरहित । येक परब्रह्म सदोदीत । ज्ञानमात्रचि विजृंभित । नाहीं द्वैत अणुमात्रीं ॥ ६७ ॥ तें ज्ञानमात्रचि

---

१ पृथ्वीच्या पोटांत. २ खजीने. ३ राज्यांत. ४ सशाच्या शिंगानें. ५ जागा केला. ६ मोजून पाहिलें असता.

निरंजन । येक ब्रह्मस्वरूपचि निर्वाण । तेथें दुजें भासे ते भ्रमस्तम । कल्पित आरोपमात्र ॥ ६८ ॥ अहो शुद्ध ब्रह्माचें ठाईं । आरोपित भासे द्वैत पाहीं । विचारूनि पाहावां सर्वही । ब्रह्मेंविण नाहीं दुजी मातु ॥ ६९ ॥ हें सार्धश्लोकाचें व्याख्यान । येणें बोलिलें आत्मलक्षण । आत्मा एवंभूत पूर्ण । तुजलागून सांगितलें ॥ ४७० ॥ आत्मा आत्मयाची व्यापकता । ज्ञानें दृढ बाणे तत्वतां । तेंही तुज सांगों आतां । श्रीरघुनाथा आइक तूं ॥ ७१ ॥

ब्रह्म चिद्ब्रह्म भुवनं ब्रह्म भूतपरंपरा । ब्रह्माहं ब्रह्म मच्छत्रुर्ब्रह्म मन्मित्रबांधवाः ॥ २९ ॥

जें कीं चित्स्वरूप परब्रह्म । तेंचि तें नित्य येक सम । नाहीं अणुमात्र एक विषय । परात्पर परम परब्रह्म ॥ ७२ ॥ ब्रह्म स्वर्गमृत्युपाताळ । ब्रह्म पर्वतादिकुळाचळ । भुर्भूवःस्वर्गलोकपाताळ । ब्रह्म निर्मळ चौदा भूवनें ॥ ७३ ॥ यया भूतांची जे परंपरा । ते सर्व ब्रह्मचि गा रघुवीरा । सकळ संसाराचा पसारा । ब्रह्मरूप खरा तूं ॥७४॥ किंबहुना श्री रामा जाण । ह्मणे मीच ब्रह्म चैतन्य । ऐसें स्वप्रतीतीनें जाणे जाण । ह्मणे शत्रुगण परब्रह्म ॥ ७५ ॥ पुत्रमित्रकलत्रादि[१]सर्व । येक ब्रह्मचि असे स्वयमेव । देहेंद्रियादिदृश्यैभाव[३] । ब्रह्म तें सर्व सर्वरूपें ॥ ७६ ॥

चिच्चेत्यकलनाबंधस्तन्मुक्तो मुक्तिरुच्यते । चिच्चेत्यखिलमात्मेति सर्वसिद्धांतसंग्रहः ॥ ३० ॥

तंव रघुनाथ ह्मणती श्रीगुरुमूर्ती । एवं चैतन्याचि सर्व त्रिजगतीं । तयासि बंधमोक्ष कां ह्मणती । कोणे अर्थी तें सांगिजे ॥ ७७ ॥ वसिष्ठ ह्मणती गा रघुनाथा । चैतन्य बंध ना मुक्त सर्वथा । परी दृश्यतादात्म्यें पावे बद्धता । तेचि मुक्तता दृश्यनाशें ॥ ७८ ॥ तें चैतन्यचि दृश्यसंगति । बाध्या पावतसे गा रघुपती । दृश्यनाशें तेंचि मुक्ति । ऐसें बोलती विबुधजन ॥ ७९ ॥ अथवा चैतन्य आणि दृश्याचित्त । येकत्र जालिया विंबत । तया नाम बंध बोलिजेत । चित्तव्यतिरिक्त तेचि मुक्ति ॥ ४८० ॥ चित्तचैतन्याचिये गांठीं । बद्धकळा असे गा जगजेठी । चित्तसंगें जीवत्वेंसि उठी । देहोहंपुष्टि थोरावतु ॥ ८१ ॥ चैतन्यासि जो चित्ताध्यासु । तोचि बंधु गा सावकाशु । ध्यास गेलिया स्वप्रकाश । स्वयें परेशु आपणचि ॥ ८२ ॥ चित्ताचेनि अध्यासें । चैतन्यासि देहपणाचें पिसें । तेंचि तुटलिया चित्ताध्यासें । स्वयें प्रकाशे ब्रह्मरूप ॥ ८३ ॥ त्याचें नाम चिदचिग्रंथि । तेणेंचि दृढ होये संसृति । ग्रंथिनाशें सचित्‌शक्ति । ब्रह्ममूर्ति स्वयेंचि असे ॥ ८४ ॥ तिचेंचि नाम मुक्ति बोलिती । हाचि सिद्धांत जाण रघुपती । मग दृश्यादृश्य चिन्मूर्ति । नाहीं व्यक्ति आन कांहीं ॥ ८५ ॥ चित्त चैतन्य सर्व पदार्थ । अखिलही दृश्य तें आत्मा निश्चित । चैतन्यावांचूनि ईषत् । नाहीं पदार्थ कोण्हीही ॥ ८६ ॥ जें जें आइकसी देखसी ।

---

१ मालिका. २ पुत्र, मित्र, स्त्री, आप्त वगैरे सर्व संबंधी. ३ देह, इंद्रियें दिसणारे पदार्थ. ४ दिसणाऱ्या पदार्थांचे ठायीं एकरूपें आसक्त.

जें कीं दृश्यमात्रहृषीकेशी । देशविदेशपृथ्वीआकाशीं । ब्रह्माचि चौपासीं सर्वत्र ॥ ८७ ॥ सर्व वेदशास्त्रांचा मथितार्थ । 'सर्वं खल्विदं ब्रह्म' हा फलितार्थ । ब्रह्मेंवेगळा कोण्ही पदार्थ । नाहीं निश्चित जाण तूं ॥ ८८ ॥

चिदिहास्तीहचिन्मात्रमिदं चिन्मयमेव च । चित्त्वं चिदहमेवेति लोकाश्चिदिति संग्रहः ॥ २१ ॥

अपरोक्ष परोक्ष तें ब्रह्मचि असे । इहपरत्र ब्रह्मचि वसे । परि इहपरत्रादि दोन्हि नसे । कोंदलें असे चैतन्य येक ॥ ८९ ॥ गजज्जाल सर्व ब्रह्मसंवित्ति । ब्रह्मरूपाचि जाण त्रिजगतीं । चैतन्येंविण नाहीं स्थिति । सांगों किती बोलवरी ॥४९०॥ आतां येकें बोलेंचि इतुकें जाण । जितुकें दृश्य तें चैतन्यघन । अंतरबाह्य चैतन्य पूर्ण । अणुमात्र न्यून असेचिना ॥ ९१ ॥ आतां किती सांगों रघुनाथा । तूं तंव ज्ञानस्वरूपाचि तत्वतां । मी ही ज्ञानस्वरूपाचि सर्वथा । मी तूं हे कथा अज्ञानाचि ॥ ९२ ॥ मी तूं जो इत्यादि व्यवहार । चित्स्वरूप ब्रह्म केवळ निर्विकार । आणि तिन्ही लोक चराचर । ब्रह्म निरंतर चिद्रूपें ॥ ९३ ॥ सिद्धांतसंग्रह इतुकाचि । खल्विदं ब्रह्म होंचि । ययाहूनि मातु दुजेयाचि । देहादिदृश्याचि असेचिना ॥ ९४ ॥ आणीकही आइक हेचि स्थिति । ब्रह्मेंविण नाहीं कोण्हीच व्यक्ति । दृश्या दृश्य सर्वही संवित्ति । आइक रघुपती श्लोकार्थें ॥ ९५ ॥

यदस्ति यद्भाति तदात्मरूपं यच्चान्यतो भाति न चान्यदस्ति । स्वभावसंवित्प्रतिभाति केवला ग्राह्यं गृहीतेति मृषा विकल्पः ॥ ३२ ॥

आतां बहु काय बोलों गा रघुपती । जें जें आहे तें तें चैतन्यस्थिति । भासे तितुकें ब्रह्मसंवित्ति । सर्वत्र सर्वत्रीं आत्माचि येकु ॥ ९६ ॥ आत्मयाव्यतिरिक्त दृश्य भासे । तेंही जाण पां आत्माचि असे । असे नाहीं जे जाण मानसें । तेंचि सर्व उल्हासे आत्मपणें ॥ ९७ ॥ नेणोनियां अन्य बोलती । परी द्रष्टादृश्यदर्शनस्फूर्ति । स्फूर्तीसहित सुखसंवित्ति । भिन्नास्थिति स्वप्नींही नाहीं ॥ ९८ ॥ भासता भासन आणि भास्य । व्याप्य व्यापक व्यापनांश । ज्ञान ज्ञेय ज्ञाता परेश । सर्व सर्वस्व चिदानंदु ॥ ९९ ॥ यया उपपत्ति गा रघुनाथा । मागें निरूपिलिया बहुता । ययालागीं जाण सर्व आत्मसत्ता । आन तत्वता असेचिना ॥ ५०० ॥ अगा ज्ञानाच्या ठायीं सर्व भासे । आहे नाहीं हें ज्ञानींच दिसे । सर्वही दृश्यमात्र ज्ञानींच वसे । ज्ञानेंविण नसे रितें कांहीं ॥ १ ॥ इंद्रियें आणि देहाहंकार । सर्व चिन्मात्र जाण निरंतर । स्वभाव मन बुद्धि साचार । चिदैकसार प्रकाशन ॥ २ ॥ सुवर्ण जैसें कटकाकारें । येक सुवर्णाचि आविष्करें । तरी दुजें तेथें न शिरे । नानाकारें तेंचि भासे ॥ ३ ॥ कापुराचें टवळें वाति । दिवी दिवा कापुरांभिंती । तेथें काय दुजें बोलती । कापुरीं वस्ती कापुराची ॥ ४ ॥ जळावरील । लहरिजळ लहरि नामें बोलती

१ चोहींकडे. २ 'हें सर्व ब्रह्मच आहे.' ३ सुखाचें ज्ञान. ४ कडीं वगैरे अलंकाराच्या आकारानें. ५ प्रगट होणें; दिसतें.

बोळ । परी एक नुसतेंचि जळ । कल्पित मेळ लहरीपणें ॥ ५ ॥ आकाशीं गंधर्वनगर दिसें । तें भ्रमें मात्र क्षणेक भासे । येहर्वीं गगन असे । नसतें पिसें नगराकारें ॥ ६ ॥ स्वांबसूत्रींचिया प्रतिमा । अनेकी भासती गा पुरुषोत्तमा । परी तें येक काष्ठचि गा श्रीरामा । नाहीं गरिमा अन्य वस्तूचि ॥ ७ ॥ एकैक सांगावें तुज किती । सर्वत्र येकचि जाण संवित्ति । तेथ ग्राह्यग्राहक भासती । मृषा भ्रांति विकल्पाची ॥ ८ ॥ हा नाथिला भेद रघुनाथा । लोक कल्पिती गा वृथा । दृश्यभासें मी येक भोक्ता । भिन्न तत्वतां देखताती ॥ ९ ॥ येकाचि वस्तूचां ठाईं । भिन्न भाव कल्पिति पाहीं । त्यांचें अज्ञान किती कायी । वर्णूं येहीं नानाशब्दें ॥ ५१० ॥ साखरेचे हस्ती घोडे केले । तयावरी राउत बैसाविले । वहन स्वार अळंकारिले । तेही वेगळे अलंकार नाना ॥ ११ ॥ तेही नानापरींचे असती । चित्रविचित्र नेत्रीं भासती । चतुरंग नानाकृति । मुखीं घालिती तों शर्करा सर्व ॥ १२ ॥ तेथें अश्व गज नाढळती । स्वार आभरणादि न भासती । चवी वेगळालिया नेणिजेती । नाहीं भ्रांति दुजेपणाची ॥ १३ ॥ तेथें शर्करवांचूनि आणीक कांहीं । ना दुजें भासे गोडींचां ठाईं । तैसें विश्वभ्रम पाहीं । विचारें सर्वही ब्रह्मचि असे ॥ १४ ॥ कां पटाच्या ठाईं चित्र लिहिलें । तेथ चतुरंग सैन्य भासलें । आंधारीं पाहातां काय जालें । विचारें भेटलें पटेंविण काये ॥ १५ ॥ कां भिंतीवरील चित्रविचित्र । अश्व कुंजर पदाति सर्वत्र । अग्नि उदक आणि क्षेत्र । प्रसाद विचित्र नानापरी ॥ १६ ॥ येक अश्वारूढ । गजस्कंधांतर । उष्ट्र खर मृग वेसर । शिवालयही मनोहर । मध्य थोर देवो देवी ॥ १७ ॥ तेथही नानासेवा करिती । प्रदक्षिणा नमस्कार घालिती । येक ते समाधिस्थ असती । येक ते पढती वेदशास्त्रें ॥ १८ ॥ एवं विचित्रें नानावर्णें । भूषणें वस्त्रें विचित्राभरणें । नानाकार जतिगुणें । भासे संपूर्ण पाहातया ॥ १९ ॥ तेंचि हातेंकरूनि पाहिजे । कां मूळीं दृष्टि घालिजे । तरी येक भिंतीवांचूनि नेणिजे । वर्णादि सहजें असतीचना ॥ ५२० ॥ तैसें येक मात्र निरंजन । परब्रह्मचि ज्ञानघन । विश्वभास तो भ्रम जाण । सिद्धांत संपूर्ण इतुकाचि ॥ २१ ॥ येक ब्रह्मचि सर्वही असे । ऐसें साक्षात् श्रुति बोलतसे । तेही आइकें साधकारें । जेणें भासे सर्वही ब्रह्म ॥ २२ ॥

समतिश्रुती । एको देवः सर्वभूतेषु गूढः सर्वव्यापी सर्वभूतांतरात्मा ॥
कर्माध्यक्षः सर्वभूताधिवासः साक्षी चेता केवलो निर्गुणश्च ॥

कुड्यादिदृश्याचा प्रकाशकु । तोचि बोलिजे देव येकु । जेथें नाहीं विश्वावलोकु । भाव अनेकु जेथें मावळे ॥ २३ ॥ ब्रह्माविष्णुरुद्रादिक । ऐसे देव बोलिजेती अनेक । यांची यावृत्ति करूनि देख । बोलिजे येक ब्रह्मसि पैं ॥ २४ ॥ 'दीव्यतीति देव' ऐसें । येणें स्वप्रकाशें बोलिजेतसे । स्वप्रकाश त्या देव ऐसें । नाम शब्द वसे द्वितिय पद

१ अज्ञान; मुर्ख पुरुष. २ भोंवतालील. ३ स्वार. ४ हत्ती, घोडे रथ आणि पायदळ या सैन्याच्या चारही अंगांनीं युक्त. ५ हत्ती. ६ हत्तीवर बसलेले. ७ प्रकाशतो. तो देव.

॥ २५ ॥ तो आपुलांचे ठाईं असे शोभत । ह्मणौनि ' सर्वभुतेषु ' बोलिजेत । सर्वभूतीं जो प्रकाशत । सर्वां प्रगटित स्वप्रकाशें ॥ २६ ॥ सर्वभूतांचें ठायीं प्रकाशे । तरी सर्वां प्रगट न दिसे । तो सर्वांतरीं गूढ असे । इंद्रियीं न भासे ह्मणौनि गूढ ॥ २७ ॥ परि गूढ तितुकें परिच्छिन्न । येक वस्तूमाजी जाय लपोन । तरी याचें आयिकतां निवर्त्तन । श्रुतिवचन सर्वव्यापी हें ॥ २८ ॥ तरी आकाशाचे परी । सर्वव्यापी असे सभराभरी । तें परिच्छिन्न कोण्हेपरी । होईल सर्वां प्रकारीं न घडे हें ॥ २९ ॥[१] ह्मणौनि सर्व व्यापूनि असे । परिच्छिन्नत्व तया कदा नसे । तरी काय बाह्य व्यापितसे । अंतर नसे कोणाचें तें ॥ ५३० ॥ तरी आइक याचें उत्तर । सर्व भूतांचा आत्मा अंतर । देहेंद्रियबाह्यप्रकार । सर्वांचें अंतर जें आत्मरूप ॥ ३१ ॥ तरी प्रमातयाचेपरी । जडपणेंचि असे अंतरीं । ना तो कर्माध्यक्ष सर्वांतरीं । प्रेरणा करी बुद्ध्यादिकांचें ॥ ३२ ॥ बुद्ध्यादि इंद्रियांचा नियंता । सर्वज्ञपणें सर्वां चाळिता । रवीचेपरी प्रकाशिता । चळणकरितां सर्वजनां ॥ ३३ ॥ तरी कुलालाचिये[१] परी । इतरपणें भांडादि[२] करी । निमित्त होऊनि भरोवरी । चक्रादिफेरी निराळेपणें ॥ ३४ ॥ तैसें विश्व आणि कर्मे दोन्ही । आत्मेन असती भिन्नपणीं । आत्मा वेगळेपणें राहोनी । करी चाळणी सूर्याऐसी ॥ ३५ ॥ यदर्थी अति भेदु भासतु । येकत्वासि विघातु होतु । ऐसें नव्हे परीयसा सिद्धांतु । सर्वभूताधिगतु निवासपणें ॥३६॥ सव भूतांचा अधिवास । त्याचा ठायीं सर्व भूतांश । भिन्न नव्हे तो परेश । अथवा निवास भूतीं त्याचा ॥ ३७ ॥ तंतूचा निवास पटामाझारी । मृतिका वर्ते घटांतरीं । सुवर्ण जैसें अलंकारीं । लहरीमाझारी जळ असे ॥ ३८ ॥ सुगंध प्रवेशे कापुरीं । कीं कापुर प्रवेशे द्रुतीमाझारी । आकाश अवकाशाभीतरी भेद कुसरी तेथ कैंची ॥३९॥ तैसें सर्व भूतें आणि परमात्मा । येकत्वें एकपणाची महिमा । नाहीं भिन्नपणाची सीमा । भूतें उपरमा[३] ब्रह्मीं जाती ॥ ५४० ॥ तरी काये आत्मा तद्रूप राहतसे । भूतेंचि आत्मा होय ऐसें । तरी आइका हें ऐसें नसे । आत्मा असे सर्वांचा साक्षी ॥४१॥ साक्षी करी ना करविता । स्वयें भोगी ना भोगविता । देता ना तो देवविता । साक्षी आइता द्रष्टेपणें ॥ ४२ ॥ जैसा सूर्य साक्षित्वें वर्त्ततु । अलिप्तपणें सर्वां चेष्टवितु । स्वयें चेष्टेना प्रवर्त्तवितु । सर्वां जाणतु साक्षित्वें ॥ ४३ ॥ अयस्कांताचिया[४] सन्निधी । जड लोहा चेष्टाबुद्धि । तैसें आत्मयाचे वेधीं । सर्वभूतादि वर्त्तती ॥४४॥ तैसा सर्वनियंता सर्वसाक्षी । तद्रूप नव्हे भूतपक्षी । सर्वज्ञातृत्वें सर्वसाक्षी । सर्वांसि अलक्षी ह्मणवी तया ॥ ४५ ॥ तरी दीप जैसा साक्षी होये । गृहाव्यापार तेणें सिद्धी जाये । परी तो जडरूपचि आहे । आपणा काये जाणतुसे ॥ ४६ ॥ तरी 'चेता' येणें पदेंकरून । तो ज्ञानस्वरूप चैतन्यघन । जडत्व नाहीं त्यालागून । तो चिद्घन चिन्मात्र ॥ ४७ ॥ तो स्वयंवेद्य स्वप्रकाश । दीप प्रकाश्यपरी

१ कुंभाराप्रमाणें. २ भांडीं वगैरे. ३ शेवटास, परिणामीं. ४ लोहचुंबकाच्या.

परप्रकाश । तैसा नव्हे हा विश्वाभास । ज्योतिप्रकाशस्वयंभूत ॥ ४८ ॥ नाहो चेता ह्मणतां विकारी । विकारी तें नश्वर सर्वांपरी । तरी हेंही न [1]घडे कुसरी । अविकारी कैसें होये ॥ ४९ ॥ तन्ही केवलपदें बोले श्रुति । अविकारांश ते केवलस्थिती । प्रपंचलहरीं नव्हे विकृति । ह्मणोनि बोलति केवल तया ॥ ५५० ॥ जेथें विकारमात्र नुदेजे । तेंचि केवल ब्रह्म जाणिजे । विश्वस्वप्न जेथें नेणिजे । विचार नुदैजे विचारितां ॥ ५१ ॥ यालागीं जें कीं निर्विकार । तेंचि केवलशब्दें साचार । तरी निर्विकारही गुणथोर । सगुण निर्धार येणें गुणें ॥ ५२ ॥ तरी त्या निर्गुण ऐसें बोले श्रुति । गुणवंत नव्हे तें सर्वार्थी । निर्विकार निर्गुण चैतन्यमूर्ति । व्यक्ताव्यक्तिरहीत जें ॥ ५३ ॥ यालागीं येकावांचून दुजी गोष्टी । पाहतां न दिसे ये सृष्टी । ह्मणोनि समष्टिव्यष्टि । ब्रह्मपुष्टि ब्रह्म हें ॥ ५४ ॥ ब्रह्मावांचूनि दुसरें । अणुमात्र नाहीं हें खरें । नामरूप हें भ्रम संचरे । वास्तव निर्धारें ब्रह्म येक ॥ ५५ ॥ यदर्थी आणीकही श्रुति । येकत्वचि प्रतिपादिती । तेंहि आयिकें आनंदमूर्ति । संमतिश्रुति सांगेन ॥ ५६ ॥

समतिश्रुति ॥ एकमेवाद्वितीयं ब्रह्म नेह नानास्ति किंचन ॥ सदेवसौम्येदमदग्र आसीत् ॥ आत्मा वा इदमेकमेवाग्र आसीत्

नेहनानास्तिकिंचन । येणें नानात्व दूषिन्नलें जाण । येक परब्रह्म निर्वाण । दुजेपणें तृण तेंही नाहीं ॥ ५७ ॥ आदिअंतीं येकचि असे । दुजें सर्वथा तें कांहींच नसे । आत्मेनाविण आन न भासे । तेंचि तें ऐसें सर्वत्र सर्व ॥ ५८ ॥ जें भासे तें भ्रमे गा रघुपती । जैसें इंद्रजाळ नानाव्यक्ति । गगनीं गंधर्वनगरें भासती । रश्मीप्रति मृगांभ जैसें ॥ ५९ ॥ शुक्तीचा ठायीं रजत भासे । सुवर्णी कटककुंडलठसे । रज्जु सर्पधारामाळामिसें । अनेक दिसे जयापरी ॥ ५६० ॥ चंद्राचा ठाईं [2]द्विचंद्रैता । प्रतारकु लोकां समस्तां । पिसांचीं पारवीं तत्वतां । दावी पाहतां भ्रम अनेक ॥ ६१ ॥ ऐसीं उदाहरणें नेणों किती । बोलावीं गा श्रीरघुपती । मागांही अनेका उपपत्ति । मंगळमूर्ती दाविल्या तुज ॥ ६२ ॥ ब्रह्माच्या येकत्वीं श्रुति । यदार्थी गा अनंता असती । त्या सांगतां ग्रंथु अति । विस्ताराप्रति जाईल ॥ ६३ ॥ सर्वां श्रुतींचें तात्पर्य ऐसें । ब्रह्माव्यतिरिक्त अणुमात्र नसे । विश्व हें ब्रह्मींच उल्हासे । मध्यें भासे भ्रमजाळ ॥ ६४ ॥ एवं ब्रह्मावेगळें कांहीं । अणुमात्र दुजें नाहीं । ऐसें जाणोनि सर्वदा राहीं । न देखें कांहीं आपणाविण ॥ ६५ ॥ ऐसें निरूपितां वसिष्ठमुनि । तवं श्रीराम ब्रह्मपणीं । सर्वत्र पाहे [4]ज्ञानेंनयनीं । न देखे जनीं दुजें कांहीं ॥ ६६ ॥ तेणें सुखें सुखावोनी । तटस्थ राहिला कोंदोनी । आन न देखे जनीं । ब्रह्मांड भरोनि पूर्णानंदु ॥ ६७ ॥ न देखे शरीरइंद्रियांदिक । न देखें मनबुद्ध्यादि

१ उदय पावत नाहीं. २ 'येथें अनेक असें कांहीं नाहीं.' ३ दोन चंद्र आहेत असा भ्रम. ४ 'ज्ञानी नयनीं' असा पाठ.

प्राणिक । अहंकार प्रमाता एकानेक । न देखे लोक आपणेंविण ॥ ६८ ॥ न देखे सकळ विश्वरचना । धरा पर्वत गिरि द्रोणी नाना । आकाशादि भूतें नयना । न देखे मनापासूनि । ६९ ॥ आत्मरूपाव्यतिरिक्त । न देखे कांहीं पदार्थजात । ब्रह्मानंदें उचंबळत । राहे तटस्थ निर्विकल्पें ॥ ५७० ॥ तया ब्रह्मसुखाची मर्यादा । नेणिजे तया परमानंदा । कदापि नव्हे हे देहबाधा । परमपदा प्राप्त जाला ॥ ७१ ॥ अंतर्बाह्य नेणें कांहीं । आपणेंसि बुडाला ब्रह्मानंदडोहीं । सुखेंचि सुख हेळावे पायीं । तें जाणती सर्वही अनुभवी जे ॥ ७२ ॥ जया सुखाचिया आवडी । ब्रह्मादिइंद्रपदांची कीजे कुरवंडि । तेथें विषयसुखें काय बापुडीं । असंख्य कोडि स्फुलिंगें[१] ज्याचे ॥ ७३ ॥ ऐसिया सुखीं निमग्न । निमज्जोन्मज्जतां[२] बुडौन । स्वयें राहे होऊनि निर्वाण । वसिष्ठ धन्य ऐसें ह्मणे ॥ ७४ ॥ मुहूर्तां एका जालें व्युत्थान । आंगीं भरलें सुखावतरण । इंद्रियां नाहीं इंद्रियपण । विकळ ज्ञान सुखा भरी ॥ ७५ ॥ जलनिधीसि भरतें उतटे । तें सर्वांही खारियांसि दाटे । तैसें अंतरीं सुख जें कोंदाटे । सर्वत्र प्रगटे पूर्ण द्वारां ॥ ७६ ॥ तेणें सुखें सुखावलीं । ह्मणोनि विषयांवरील धांव मोडली । तेणेंचि सुखें स्फुंजाळलीं । तटस्थ ठेलीं सुखावशेषें ॥ ७७ ॥ अतिप्रयासेंकरून । देहस्मृति धरी रघुनंदन । देहावरी आला ऐसा देखोन । दिधलें आलिंगन वसिष्ठ प्रेमें ॥ ७८ ॥ मग ह्मणे श्रीरामा परियेसीं । स्वरूपलक्षण निरूपिलें तुजपासीं । एवंभूत जाणून आत्मयासी । राहें स्थितीसि तदाकारें ॥ ७९ ॥ ऐसें बोलतांचि मुनि । रघुनाथ लागे गुरुचरणीं । ह्मणे धन्य धन्य तुमची वाणी । सुखाची धणी श्रवणमात्रें ॥ ५८० ॥ श्रीवसिष्ठा तुझिया उपकारा । उत्तीर्ण नव्हिजे जी दातारा । अर्पिलियाही संभारा । नानाउपचारा देहादिकां ॥ ८१ ॥ ह्मणोनि घाली लोटांगण । पुनः पुनः करितसे नमन । वसिष्ठें धरिला आलिंगून । ह्मणे धन्य धन्य वंश तुझा ॥ ८२ ॥ जिये वंशीं ब्रह्मनिष्ठ पुत्र । धन्य तयाचें कुलशीलगोत्र । तूंचि स्वयें ब्रह्म तेथें काय विचित्र । बोलेल वक्त्र किती माझें ॥ ८३ ॥ अगा आत्मस्वरूप जाणोनि । राहिजे तद्रूप निर्वाणीं । तरी ते जीवन्मुक्ति भरंवसेनी । कार्मुकपाणी जाण तूं ॥ ८४ ॥ तरी तेचि जीवन्मुक्ति आतां । लक्षणेंसहित रघुनाथा । सांगैन तें आइकें सीताकांता । जे कीं तत्वतां तुज बाणली ॥ ८५ ॥ हेंचि उत्तरप्रकरणीं । निरूपिती जे श्रीवसिष्ठमुनि । श्रवण करील कोदंडपाणी । तेंचि श्रोताजनीं परिसिजे ॥ ८६ ॥ ऐसा बोलोनि उत्तरार्थु । उगाचि राहिला तटस्थु । निजानंदें रंगूनि स्वार्थु । जाला कृतार्थु ग्रंथार्थें[३] ॥ ८७ ॥ सर्वही ग्रंथीं ब्रह्मनिरूपण । तें वाखाणि थोर समाधान । ब्रह्मानंद जातसे उतटून[४] । सुखसंपन्न सुखत्वें ॥ ८८ ॥ निरूपणामाजी विवरितां ।

---

१ ठिणग्या. २ बुड्या मारीत व वर येत असतां. ३ 'तेथें रंगनाथु । जालों कृ०' असा पाठ.
४ उलथोन' असा पाठ.

तत्काळ समाधीच वरी चित्ता । यया ग्रंथाचें लेखनही करितां । निदिध्यासन स्वयेंचि होये ॥ ८९ ॥ विजातीय प्रपंचाचें निरसन । सजातीय ब्रह्माचें प्रतिपादन । करितां उभयतां निरूपण । समाधान निदिध्यासाचें ॥ ५९० ॥ एवं ग्रंथ लिहितां विवरितां । ब्रह्मसुखीं होय निमग्नता । ह्मणोनि ये ग्रंथीं वर्त्ततां । सुखसंपन्नता ब्रह्मानंदें ॥ ९१ ॥ येथें संपलें हें प्रकरण । गोडाहूनि गोड निरूपण । ऐकोनि तोषती सज्जन । निजानंदें रंगले ते ॥ ९२ ॥ सद्गुरूचेनि प्रसादें । प्रकरण संपलें ब्रह्मानंदें । श्रोते ऐका स्वानंदें । मन अगाध निर्मळ करुनी ॥ ९३ ॥ श्रोतयांसि हेचि विनंती । ग्रंथावगमन पुढतपुढतीं । केलिया ब्रह्मसुखउन्नति । नेणत्याही प्राप्ति समाधानाची ॥ ९४ ॥

इति श्रीयोगवासिष्ठसारे श्रीवसिष्ठरामसंवादे आत्मनिरूपण प्रकरणं अष्टमं संपूर्णम्

॥ श्रीः ॥

प्रकरण ९ वें.

जीवन्मुक्तिप्रकरण.

श्रीगणेशायनमः । श्रीसरस्वत्यैनमः । श्रीमत्सद्गुरवेनमः । वंदितां श्रीसद्गुरुचरण । होय भवभयविध्वंसन । अज्ञान निःशेष नाशोन । सुखसंपन्न ब्रह्मानंदें ॥ १ ॥ यालागीं मुळीं हेंचि करावें । अखंड सद्गुरूतेंचि भजावें । इतुकेनि कैवल्यपद पावावें । ब्रह्म अनुभवावें सिद्धचि ॥ २ ॥ जैसी कां भोजनें तृप्ति होये । बळपुष्टि वाढे क्षुधा जाये । तैसें सद्गुरु-भजनें सर्व पाहें । ज्ञाणती सर्व हें अनुभविये ॥ ३ ॥ ह्मणोनि म्यां हेचि बुद्धि केली । जीवें धरिली सद्गुरुमाउली । तेणेंचि कृतकृत्यताजाली । मावळली संसृति माझी ॥ ४ ॥ वरकड नेणेंचि मी उपावो । ह्मणोनि धरिला धरीं सद्गुरुरावो । तेंहि येक सद्भावो । आन भावो नेणेंचि कांहीं ॥ ५ ॥ कांहीं सेवा नेणेंचि सद्गुरूची । तथापि कृपा असाधारण त्याची । कृपेचिसाठीं होळी अज्ञानाची । आणि स्वस्वरूपाची प्राप्ती जाली ॥ ६ ॥ ऐसें बोलतां श्रोतयांप्रति । तंव हृदयीं आविर्भवली सद्गुरुमूर्ति । आनंदेंकरूनि तींतेंचि प्रार्थीं । तेणें प्रेमाची जाति उदया आली ॥ ७ ॥ ऐकें जी दीनोद्धारणा । मायबापा कृपाघना । तोडूनि माझी देहभावना । आनंदघनामाजीं बुडविलें ॥ ८ ॥ माझें कर्म

---

१ 'तें सज्ञान ब्रह्मानंदें' असा पाठ. २ 'तेणें तें ऐक तूं' असा पाठ. ३ संसार, जन्ममरण ४ प्रगट झाली.

क्रिया करण । तूंचि जालासि चिदैकघन । आतां कर्म करावें कोण । माझें मीपण बुडविलें तुवां ॥ ९ ॥ मी जें जें पाहे वैसें दृष्टी । तें तें तंचि होऊनियां उठी । वाचा बोले जे जे गोठी । शब्द परिपाठी तूंचि तूं ॥ १० ॥ शब्दाच्या आदिअंतीं । शब्दशब्दार्थ भारती । अवघा तूंचि गा आनंदमूर्ति । ऐसी व्यक्ति मजलागीं ॥ ११ ॥ श्रवणीं जें कीं आयकों जाये । तंव आयिकते ऐकणें तंचि आहे । आइकण्या आद्यंतीं तूंचि पाहें । व्यक्ति नये आन कांहीं ॥ १२ ॥ चरण करितां गमनाक्रिया । तरी करविता तूंचि गुरुराया । हस्तीं देणें घेणें तूंचि इया । चाळक स्वामिया तूंचि देखें ॥ १३ ॥ किंबहुना सर्व क्रियाजात । क्रियाजातीं तुजाचि देखत । तें देखणें देखतें निश्चित । तुजव्यतिरिक्त असेचिना ॥ १४ ॥ अहो गुरूचा नेणोनि महिमा । ह्मणोनि वरपडे जालेति भ्रमा । महिमा जाणतांचि उपरमा । संशयगरिमा जातसे ॥ १५ ॥ ऐसा तूंचि तूं सर्वांपरी । मजमाजी बाह्याभ्यंतरीं । नांदसी नुरवूनि उरी । काय करीं मी कर्माक्रिया ॥ १६ ॥ सर्वही करणें न करणें । तूंचि होऊनि चाळिसी करणें । ऐसें केलें मजलागीं येणें । नुरेचि मीपणें तुझा ठाईं ॥ १७ ॥ एवं कांहीं सेवाही न करितां । चरणदर्शनमात्रचि होतां कांहीं नाकळे तत्वतां । स्वयें पुरुषार्था भेळविलें ॥ १८ ॥ पुरुषाचा पुरुषार्थ हाचि । निःशेष निवृत्ति होये दुःखाची । आणि प्राप्ति निरतिशय सुखाचि । व्यक्ति हेचि पुरुषार्था ॥ १९ ॥ सर्व दुःखरूप संसार । जयामाजी जन्ममरण दुर्निवार । त्याची निवृत्ति सविस्तर । तोचि निर्धार दुःखनिवृत्ति ॥ २० ॥ अज्ञानपूर्वक भवशांति । तेचि दुःखाची निःशेष निवृत्ति । सुखामाजी सुखउन्नत्ति । होय प्राप्ति ब्रह्मानंदु ॥ २१ ॥ सर्व आनंदाचें आकारस्थान । तेंचि ब्रह्मानंद सुख जाण । होतांचि सद्गुरूचें दर्शन । प्राप्त आपण न साधितांही ॥ २२ ॥ नाहीं हें तंव न घडे सर्वथा । सद्गुरूचें दर्शन होतां । दुःखनिवृत्ति सुखप्राप्तता । होय हे कथा अघटमान ॥ २३ ॥ तंव चिदचिद्ग्रंथीं नाहीं सुटला । संशय राशि नाहीं छेदिला । कर्माकर्मक्षय नाहीं जाला । ब्रह्मानंदु त्याला कैंचा लाभे ॥ २४ ॥ जंव चिदचिद्ग्रंथि हा असे । संशयसंभावनादि वसे । जंव कर्माकर्म न नासे । तंव न निरासे दुःखनिवृत्ति ॥ २५ ॥ दुःखाची नाहीं जंव निवृत्ति । तंव कैंची होय सुखाची प्राप्ति । यालागीं हें सर्वार्थीं । कदाकल्पांतीं घडेना कीं ॥ २६ ॥ एवं हें होये सद्गुरूचेनि दर्शनें । घडे हा विस्मय मानी मनें । तऱ्ही आइका सांगेन तुह्मांकारणें । वर्म जेणें बुजाल ॥ २७ ॥ तुम्ही सद्गुरूचा नेणा महिमा । ह्मणोनि वरपडे जालेति भ्रमा । महिमा जाणतांचि उपरमा । संशयगरिमा जातसे ॥ २८ ॥ तऱ्ही ये अर्थीं श्रुति असे प्रमाण । येथें विप्रतिपत्ति नाहीं जाण । तेंचि आयिका श्रुतिवचन । जेणें समाधान

---

१ वाणी. २ अनेक क्रिया. ३ चित् व अचित् (ज्ञान व अज्ञान यांच्या घोंटाळ्यांतून मोठा संशय.

पाताल ॥ २९ ॥ येक सद्गुरूदर्शनमात्रेंचि । शांति हृदयग्रंथ्यादि त्रयाचि । तेंचि आइका श्रुति निर्वाणींची । जे उपनिषदाची विधात्री पैं ॥ ३० ॥ ते श्रुति ऐकतांचि क्षणीं । संशयमात्राची होये धुणी । ते श्रुति परिसोनि श्रवणीं । मनन मनीं करावें ॥ ३१ ॥ तेचि श्रुति आतां सांगेन । आइका एकाग्र करूनि मन । जेणें सव संशय नाशोन । समाधान ब्रह्मानंदें ॥ ३२ ॥

संमतिश्रुतिश्लोक ॥ भिद्यते हृदयग्रंथिश्छिद्यंते सर्वसंशयाः । क्षीयंते चास्य कर्माणि तस्मिन्दृष्टे परावरे ॥

हृदयशब्दें अंतःकरण । तेंचि आचित् जड मळिण । त्याचा ठाईं आभासतें चैतन्य । जें कीं ज्ञान स्वप्रकाश ॥ ३३ ॥ जया तें प्रमात्ता हें अभिधान । जें अहं प्रत्यय प्रत्यक्ष जाण । तें अंतःकरणेंसि येकपण । पावतां पूर्ण ग्रंथि दोघां ॥ ३४ ॥ तया परस्पराध्यासें । चित्ताचें जडपण आत्मत्वीं दिसे । आत्मप्रकाशु चित्तीं आभासे । एवं ग्रंथि बैसे जडाजडीं ॥ ३५ ॥ मन तेंचि मी ऐसा अध्यासु । आत्मयासी जाला असे सोसु । तेणें देहादि हा सर्वाभासु । संसारपाशु पडे जेणें ॥ ३६ ॥ जोंवरी चित्तीं अध्यासु मीपणाचा । तोंवरी आत्मयासी संसारबंधु साचा । मन कोटी यत्न करितां याचा । मोक्ष कैंचा होईल ॥ ३७ ॥ तेंचि सद्गुरूचें दर्शन होतां । आत्मानात्मविवेक करी चित्ता । ह्मणे मी आत्मा अकर्ता अभोक्ता । भिन्न चित्ता द्रष्टेपणेंसी ॥ ३८ ॥ मनादिदृश्य मजहूनि भिन्न । मी आत्मा तयाचा साक्षी संपूर्ण । ऐसें जाणतांची होय दहन । स्वयेंचि जाण चिद्चिद्ग्रंथि ॥ ३९ ॥ आपणासि साक्षित्व असतां । अनर्थपरंपरा होतसे वृथा । स्वप्नींही न आइके संसारकथा । दर्शन होतां सद्गुरूचें ॥ ४० ॥ तैसेंचि असंभावनादि[१]संशयजाळ । जें कीं पडलें होतें महाप्रबळ । आत्मसाक्षात्कारीं सबळ । अतिमळ विघ्नरूप ॥ ४१ ॥ साधनचतुष्टयादिसंपत्ति । जालियाही नव्हे आत्मप्रतीति । नानासंशय तेथें उठति । जे कीं देती योनि नाना ॥ ४२ ॥ ते संशय कोण कोण । हें तुजप्रति सांगेन । करूनियां सावधान मन । देऊनि अवधान आयकिजे ॥ ४३ ॥ हा आत्मा स्थूळदेहीं असे । किंवा सूक्ष्मदेहीं वसे । किंवा त्याहूनि वेगळा असे । किंवा सूक्ष्मांशें वर्त्ततो ॥ ४४ ॥ किंवा मध्यम परिमाण । ईश्वरविश्वाहूनि आन । जडरूप अथवा ज्ञान । चिदाचिद्रूप अभिधान ह्मणावें कीं ॥ ४५ ॥ प्रपंच सत्यामिथ्यापणें । कर्में अथवा ज्ञानें मोक्ष साधणें । ऐसें संशय स्वबुद्धी जन । बहुविध व्यसन करिताती ॥ ४६ ॥ बहुविध शास्त्राभ्यासु करितां व्युत्पन्न जाले ताता । बहिर्मुखास अनुभव सर्वथा । जाण निश्चितता इयापरी ॥ ४७ ॥ तेंचि श्रीगुरूचे चरणदर्शनें । महावाक्यादि श्रवणमननें । संशय छेदिजंती प्रमाणें । अपरोक्षपणें आत्मानंदु ॥ ४८ ॥ तैसींच कर्माकर्मं पूर्वसंस्कार । आहेति तो नव्हे आत्मसाक्षात्कार । बुद्धि नव्हे आत्माकार । शुद्ध विचार तोही नुपजे ॥ ४९ ॥ संचित प्रारब्ध

[१] असंभावना वगैरे अनेक संशय.

क्रियमाण । असें हें त्रिविध कर्म जाण । याचा क्षय नव्हतां संपूर्ण । नव्हे दर्शन आत्मयाचें ॥ ५० ॥ पूर्वील्या कर्मासी माझीं ह्मणे । त्याचें फळ असे मज भोगणें । क्रियामाण करी अहंकर्तेपणें । हेंचि नागवणें आत्मप्राप्ति ॥ ५१ ॥ तेंचि सद्गुरूचेनि दर्शनें । सांचितें माझीं नव्हे ह्मणे । तीं भस्म होती वगळेपणें । ब्रह्मखुणे स्वयें असतां ॥ ५२ ॥ माझी ऐसी हे वासना । लिंगदेहीं होती जाणा । तंव त्याचेनि फळभोग दारुणा । पावे यातना संसार कीं ॥ ५३ ॥ तें वासनालिंगरूपशरीर । सद्गुरूदर्शनें भस्मसार । जालें तेव्हांचि कर्मनिर्धार । जाला समग्र शुभाशुभाचा ॥ ५४ ॥ तैसेंचि आपुलिया प्रतीती । क्रियमाण भिन्नत्वें देखती । तेथें अहंकर्तेपणीं न येती । ह्मणोनि नाशती तेंही कर्में ॥ ५५ ॥ जेथिंचा कर्त्ताचि आपण नव्हे । तेथील फळभोगु कोणासि काये । ह्मणोनि क्रियमाणासि वेगळा होये । प्रारब्ध पाहे देहावरी ॥ ५६ ॥ देहाच्या माथां प्रारब्ध कर्म । आपण अभोक्ता परब्रह्म । ऐसा पावोनि उपशम । स्वयें निःसीम आत्मा जाला ॥ ५७ ॥ पर जें कीं ब्रह्मादिसकळ । तें अवर जयासि केवळ । तेंचि ब्रह्म निर्मळ । देखिल्या सकळ इत्यादि लाभे ॥ ५८ ॥ आणीक करितां उपायांतर । कदापि न घडे अल्प प्रकार । ब्रह्म देखिजे जैं परावर । तऱ्हीच संसार भस्म होये ॥ ५९ ॥ आणीक उपाय करितां सृष्टीं । जाती अनेक कल्पकोटि । परी न तुटे संसारपोटी । ब्रह्मेंसि भेटी कदा नव्हे ॥ ६० ॥ सकळ उपायांचा शिरोमणी । तो ब्रह्मसाक्षात्कार इये जनीं । जालिया संसारश्रेणि । भवसेनि तुटोनि जाती ॥ ६१ ॥ तें ब्रह्मदर्शन होतांचि क्षणीं । चिदचिद्ग्रंथि जाये तुटोनि । संशयराशि जाती नाशोनि । क्षयो निर्वाणीं कर्माकर्मा ॥ ६२ ॥ ऐसा अर्थ बोलसे श्रुति । परी माझी ते येथें युक्ति । न तुटता चिदचिद्ग्रंथि । ब्रह्मप्राप्ति कैसी होये ॥ ६३ ॥ जंव असंभावनादिसंशयजाळ । छेदिलें नाहीं जंव सकळ । तंव असंशय ब्रह्म निर्मळ । नव्हे केवळ प्राप्त कदा ॥ ६४ ॥ तैसींच कर्माकर्में जंव असती । तंव तें वासनारूपें परिणमती । वासनाजाळ तेथें ब्रह्मप्राप्ति । कदाकल्पांतीं घडेना कीं ॥ ६५ ॥ ह्मणोनि सद्गुरूचेनि दर्शनें । ग्रंथ्यादित्रयाचें भस्म होणें मग ब्रह्मचि उरे ब्रह्मपणें । तें स्वयेंचि आपण अनुभवावें ॥ ६६ ॥ अहो सद्गुरूचेनि दर्शनें । घडती यया श्रवणमननें । निदिध्यासनें परिपाक होणें । गुरुखुणे साक्षात्कार ६७ ॥ साक्षात्कार तें आत्मदर्शन । जेथें निःशेष जालें दृश्यनिरसन । ब्रह्माकारें वृत्ति स्थिरावोन । समाधान नित्यानंदें ॥ ६८ ॥ ययाचें नाम आत्मदर्शन । हें तंव गुरुदर्शनाउपरि जाण । तत्पूर्वी हें न घडे संपूर्ण । नाहीं छेदन चिदचिद्ग्रंथीचें ॥ ६९ ॥ आतां हेंहीं जरी तुह्मी न मना । ब्रह्मदर्शनाचि जरी ह्मणा । तरी तेंही मानलें माझिया

---

१ फसणें. २ वासनायुक्त असलेला सूक्ष्म देह. ३ कनिष्ठ. ४ संसार परंपरा, पुनः पुनः जन्मास येणे. ५ तीन प्रकारच्या संशयांचे.

मना । ग्रंथ्यादिदहना पावती जेणें ॥ ७० ॥ तरी ब्रह्म तेंचि सद्गुरुनाथु । तेथें संशय धरी तो परम भ्रांतु । तया भ्रांतामाप्ति हे मातु । गुह्य येकांतु बोलोंचि नये ॥ ७१ ॥ ये अर्थी श्रुति प्रमाण । सद्गुरु तोचि ब्रह्म पूर्ण । स्वयें अनुभवही तैसाचि जाण । श्रुतिवचन परिसिजे ॥ ७२ ॥

॥ संमतश्रुति ॥ यस्य देवे परा भक्तिर्यथा देवे तथा गुरौ । तस्यैते कथिता ह्यर्थाः प्रकाशंते महात्मनः ॥

भक्तिशब्दें परम प्रीति । निरंतर अनुराग जो चित्तीं । हेचि मुख्य भक्तीची व्यक्ति । इतर बोलती ते बाह्यसेवा ॥ ७३ ॥ ते भक्ति देवाचे ठाई जैसी । देवशब्दें ब्रह्माचि ऐसी । व्याख्या केली निश्चयेंसी । तेचि मानसीं दृढ धरिजे ॥ ७४ ॥ तया ब्रह्मपणाचा ठाई जे भक्ति । तैसीच सद्गुरूच्या ठाईं अनन्यगति । गुरूनें उपदेशिलें तें प्रकाशती । अर्थसंगति ब्रह्मान्वयें ॥ ७५ ॥ गुरूनें अनुगृहीत पुरुषासी । प्रकाशती अर्थ ब्रह्मरूपेंसी । तरी गुरुवेगळें ब्रह्म तयासी । कोण्हे देशीं उरलें असे ॥ ७६ ॥ ब्रह्मातें इतर जड तों न प्रकाशी । तें स्वसंवेद्य प्रकाश ऐसी । वेद बोले वचनासी । तऱ्ही गुरूनें खुणेसि कैसें प्रकाशिलें ॥ ७७ ॥ गुरुवेगळें तऱ्ही न प्रकाशे । जड तें ब्रह्मातें प्रकाशी कैसें । यया-लागीं ब्रह्म स्वसंवेद्य ऐसें । होय सर्वांशें येणें बोलें ॥ ७८ ॥ सद्गुरु साक्षात्ब्रह्ममूर्ति । तऱ्हीच स्वप्रकाश करी शिष्याप्रति । सद्गुरु सेविल्या सर्व निवृत्ति । ब्रह्मप्राप्ति तेचि तया ॥ ७९ ॥ ह्मणोनि साक्षात् ब्रह्ममूर्ति । सद्गुरु होय निश्चितार्थी । येथेंही जे आन भाव धरिती । ते नरका जाती कोटिकल्प ॥ ८० ॥ सद्गुरुऐक्य आपणेंसी । हेंचि बहु बोले हृषीकेशी । 'आचार्यं मां विजानीयात्' ऐसी । संमति कैसी श्रीभागवतीं ॥ ८१ ॥

संमतिश्लोक ॥ आचार्यं मां विजानीयान्नावमन्येत कर्हिचित् । न मर्त्यबुद्ध्या सेवत सर्वदेवमयो गुरुः ॥

सर्वदेवमयाचि गुरुमूर्ति । सर्वदेव त्याचे उदरास्थिती । मी तोचि गुरु हें निश्चितीं । स्वयें श्रीपति बोलिले ॥ ८२ ॥ आणीकही श्रीभागवतीं आपण । भगवंत बोलिलें स्वमुखेंकरून । श्रीगुरु तोचि मी आपण । नाहीं भिन्न सर्वथैव ८३ ॥ संसारताप शमावया-लागीं । परमामृत भोगिजे अंतरंगीं । तें तिन्ही गुरु तयालागीं । श्लोक प्रसंगीं सांगेन ॥ ८४ ॥

संमतिश्लोक ॥ स वै सत्कर्मणां साक्षाद्द्विजातेरिह संभवः । आद्योऽग यत्राश्रमिणां यथाऽहं ज्ञानदो गुरुः ॥

कां यया संसाराचे ठाई । जन्ममात्र ज्यापासाव पाहीं । तो आदिगुरु पिता पाहीं । पूज्य तोही गुरुत्वें ॥ ८५ ॥ तैसेंचि द्विजपण जेव्हां आलें । सत्कर्माचें जन्म जेथें जालें । उपनयन अध्ययन करविलें । गुरुत्व बोलिलें तयासी ॥ ८६ ॥ जो साक्षात् जाणावा ईश्वर । प्रथमापरीस पूज्य थोर । आतां ब्रह्मपद पूज्यतर । महाथोर योराहुनी ॥ ८७ ॥ सर्वही जे आश्रमवंत । ब्रह्मचर्यादिसंन्यासांत । त्यांसि ज्ञानदाताचि साक्षात् । सदोदीत

१ गोष्ट. २ स्वतःच आपणांस जाणारें. ३ अतिपूज्य. ४ ब्रह्मचर्य, गृहस्थाश्रम, वानप्रस्थ आणि संन्यास

परब्रह्म ॥ ८८ ॥ तो पूज्याहुनी पूज्यतर । साक्षात् परब्रह्म निर्विकार । जयाच्या कृपाकटाक्षें संसार । भस्मसार होऊनि जाये ॥ ८९ ॥ जे कीं ज्ञानमद गुरूतें । उपासूनि येकाग्रचित्तें । संसार तरती बुद्धिमंते । तेंचि श्लोकार्थें परियसा ॥ ९० ॥

संमतिश्लोक ॥ नन्वर्थकोविदा ब्रह्मन्वर्णाश्रमवतामिह । ये मया गुरुणा वाचा तरंत्यजो भवार्णवम् ॥

अगा यया जन्माचां ठाईं । ब्राह्मण क्षत्रिय वैश्य शूद्र पाहीं । तैसेचि चाऱ्ही आश्रमही । तयांमध्यें तोही अर्थकोविद ॥ ९१ ॥ अर्थ ह्मणिजे आपुलें प्रयोजन । तें साध्य मुख्य ब्रह्मस्वरूप पूर्ण । तेंचि साधावें गा निर्वाण । आणिक कारण कोण पुरुषा ॥ ९२ ॥ तेथें कोविद ह्मणजे अत्यंतकुशळ । तत्सुखसाधनीं अतितळमळ । नावडती विषय अमंगळ । प्रवर्ते केवळ आत्मसुखीं ॥ ९३ ॥ यदर्थीही भगवद्वचन । श्रीभागवतीं असे प्रमाण । तेंचि आइकिजे कुशळपण । करी वर्णन बुद्धिमंताचें ॥ ९४ ॥

संमतिश्लोक ॥ एषा बुद्धिमतां बुद्धिर्मनीषा च मनीषिणाम् । यत्सत्यमनृतेनेह मर्त्येनाप्नोति मामृतम् ॥

असत्य मर्त्य जें शरीर । क्षणभंगुर अतिनश्वर । तेणेंकरूनि पावे जो सर्वसार । निर्विकार मत्स्वरूपा ॥ ९५ ॥ मोक्षरूप जें कीं अमृत । सत्य चिद्धन मी निश्चित । त्या मातें जो येणें पावत । बुद्धिमंत तोचि जाण ॥ ९६ ॥ सकळ बुद्धिमंतांमाझारी । बुद्धिमंतु तोचि अवधारीं । कुशळांमाजी कुशळें भारी । अतिचतुरि चतुरपणें ॥ ९७ ॥ ह्मणोनि तोचि निश्चयेंसि जाण । या मनुष्यामध्यें कुशळपण । त्याहीमाजी उत्तम वर्ण । आश्रमधन भाग्यें पावला ॥ ९८ ॥ इतुकी सामग्री भाग्येंकरूनी । लाधली तो भाग्याचा जनीं । आत्मसुख साधी तो भरंवसेनी । धन्य जननी त्याची ॥ ९९ ॥ त्यामाजी जपतपादि जे करिती । ते कुशळ परी तैसे नव्हती । जे सद्गुरूतें शरण जाती । अनन्यगती ते अतिकुशळ ॥ १०० ॥ तो गुरुरूपेंचि मी जाण । जन्मजन्मांतरीं नानाभजन । करूनि केलें मज समर्पण । तेव्हां मी पूर्ण आभारलों ॥ १ ॥ तया आभारलियासाठीं । मी गुरुरूपें प्रगटें सृष्टीं । मग भाग्यें होय मजसी भेटी । सांगों गोष्टी महावाक्याच्या ॥ २ ॥ ते माझी गोष्टी आइकूनि कानीं । मग मद्रूपाच वर्त्तती जनीं । उपदेशमात्रेंचि भरंवसेनी । संसारश्रेणि भस्म करिती ॥ ३ ॥ ते आत्मसुखेंचिकरूनियां जाण । भवार्णव तरती संपूर्ण । न देखती संसारदैन्य । सद्गुरुकरुण क्षेत्रिांचि ॥ ४ ॥ यालागीं ज्ञानप्रदा गुरुहुनी । अधिक नाहीं सेव्य कोणी । संसारदैन्य ज्याचे दर्शनीं । जनीं स्वप्नीं न दिसे ॥ ५ ॥ ह्मणोनि पूर्वद्वयापरीस । ज्ञानदाता सेव्य सावकाश । तो मीचि हेंही तुह्मांस । सांगें श्रीसुदाम्यास ह्मणे हरि ॥ ६ ॥ ज्ञानप्रदागुरूहूनि दुसरा । नाहींच गा यया संसारा । आणि सद्भजनापरीस खरा । धर्म साचोकारा असेचिना ॥ ७ ॥ गुरुवचनाहूनि आणीक धर्म । थोर नाहीं गा येणेंसि सम । महाधर्माचेंही निजधाम । तेंचि परम गुरु

१ अर्थ आपणाविषयीं कुशल. २ क्षणांत नाश होणारे. ३ ऋणी झालों. ४ खरोखर,

भजन ॥ ८ ॥ सद्गुरुभजनाची सरी । नानाधर्म न पावती निमिषभरी । ह्मणोनियां निजमुखें श्रीहरि । बोले थोरी गुरुसेवेची ॥ ९ ॥ चाऱ्ही आश्रम अवलंबितां । तेथील उचित सर्व धर्मही करितां । मी सुखी नव्हे पैं तत्वतां । सद्गुरु सेवितां जैसा होयें ॥ ११० ॥ तेंचि श्लोकांचिये संगती । स्वमुखें बोलिले श्रीपति । तें आइकावें एकाग्रमति । आर्ति श्रोतीं अर्थीकरूनियां ॥ ११ ॥

संमतिश्लोक ॥ नाहमिज्याप्रजातिभ्यां तपसोपशमेन च । तुष्येयं सर्वभूतात्मा गुरुशुश्रूषया यथा ॥

इज्याशब्दें इज्यादिकर्में । जिये ठायीं वर्त्तती स्वधर्में । तो गृहस्थाश्रमु अतिनियमें । चालवितां संभ्रमें न तोषें मी ॥ १२ ॥ तैसेंचि प्रजाति ह्मणिजे उत्कृष्ट जन्म । जें ब्रह्मचर्याख्य अतिधर्म । चाळितांही मी परम । न पवें काम आनंदाचा ॥ १३ ॥ तैसेंचि तपादिनानाक्लेश । वानप्रस्थादि असोसें । ते आचरतांही मी परेश । न पवें संतोष सर्वथा ॥ १४ ॥ उपशमशब्दें संन्यासपण । उपशमादि मुख्यत्वें धर्म जाण । ते आचरतांही दारुण । संतोष पूर्ण मज नव्हे ॥ १५ ॥ सर्वभूतांचा आत्मा जऱ्ही मी । संतोष न पवें आश्रमधर्मीं । तो गुरुसेवनेंकरूनी सुखोत्तमीं । पहुडें संभ्रमीं परमानंदें ॥ १६ ॥ यालागीं गुरुभजनापरता । धर्म नाहीं जाण सर्वथा । ऐसें बोलिला जगत्पिता । ह्मणोनि तत्वतां सद्गुरुचि ब्रह्म ॥ १७ ॥ परी अभाग्य जन जे असती । ते मनुष्याकारें मनुष्य मानिती । व्यक्तीसाठीं परमार्थ हरविती । अढळ भ्रांति दृढ जाली ॥ १८ ॥ अहो भ्रमें-करूनियां मनुष्याकार । जऱ्ही दिसे साकार । तऱ्ही तें ब्रह्म निर्विकार । नाहीं विचार आन येथें ॥ १९ ॥ जैसी जळाची जळगार[३] । गोठोनि जाली जऱ्ही साकार । तऱ्ही साकारत्वें निर्विकार । नाहीं विचार आन कांहीं ॥ १२० ॥ जऱ्ही ते निरखली[४] न विराली । तऱ्ही ते जळरूपेंचि स्थिरावली । तैसी सद्गुरुमूर्ति साकारली । ते ब्रह्मावेगळी कैसी बोलावी ॥ २१ ॥ नाना सुवर्णाचें पेंडुकें केलें । तऱ्ही पाषाणपणा नाहीं आलें । तैसें सद्गुरुरूप साकारलें । नये बोलों बोलें मनुष्यपणीं ॥ २२ ॥ ना शर्करेचा पुरुष केला । नाना अवयवीं विस्तारिला । तऱ्ही तो काय साखरपणा टाकूनि गेला । असे संचला शर्करारूपें ॥ २३ ॥ तेथें नामरूपाचीच मिरवणी । नाहीं आन शर्करेवांचुनी । तैसा सद्गुरु निर्वाणीं । सगुणपणीं शोभतु ॥२४॥ । आणि जगचि ब्रह्म असे जेथ । तेथ सद्गुरु नव्हे काय निमित्त । यालागीं गुरुचि ब्रह्म सदोदीत । लोक भ्रांत ते न मानिती ॥ २५ ॥ असो जनाची जनमति । मजलागीं सद्गुरुचि ब्रह्ममूर्ति । जे तद्वाक्यें बोधले असती । तेचि देखती ब्रह्मत्वें गुरु ॥ २६ ॥ जयासि बोध नाहीं जाला । स्वयें ब्रह्मभाव नाहीं बाणला । ते काय जाणती सद्गुरूला । नाहीं मोडला भ्रांतिफांटा ॥ २७ ॥ असो त्याचें काय काय बोलावें । सद्गुरु परब्रह्मचि स्वभावें । अंधासि सूर्य मूर्यत्वें न भावे । तऱ्ही काये सूर्य जनासि या ॥२८॥

१ उत्कंठा. २ अतिशय, ३ पाण्याची गार, बर्फ. ४ विरघळली. ५ गोळा; अनेक प्रकारांची एक रास.

नेणौनि परीसासि पाषाण मानी । तो टाकूनि देतो उपेक्षुनी । तऱ्ही तो काये परीसपणा-पासुनी । जाय उठोनि देशांतरा ॥ २९ ॥ तैसा गुरु ब्रह्मत्वें न मानिती । तऱ्ही ब्रम्हीं ब्रम्हत्वें ते व्यक्ति । त्याचे दर्शनमात्रेंचि ब्रह्मप्राप्ति । दिव्य लोकांप्रति देईन मी ॥ १३० ॥ माझें दिव्य सद्गुरुचरण । त्याचें केलें म्यां स्पर्शन । तें दिव्याचें दिव्य संपूर्ण । नाहीं आन सर्वथा ॥ ३१ ॥ यालागीं साक्षात् ब्रह्ममूर्ति । सद्गुरु होय निश्चितार्थीं । त्यांचे दर्शनमात्रेंचि नाशती । चिदचिद्ग्रंथि संपयकर्मैं ॥ ३२ ॥ इतुकियालागीं निरूपण । साधूनि सद्गुरूसि ब्रह्मपण । सर्व लाभे तद्दर्शनेंकरून । श्रुत्यर्थें पूर्ण ठायीं ठेविलें ॥ ३३ ॥ ऐसें सद्गुरूसि प्रार्थून । साष्टांगें घातलें लोटांगण । तंव करिती कोण्ही आक्षेपैन । तें निर्वचन परिसावें ॥ ३४ ॥ नाहो मंगलाचरणानिमित्त । सद्गुरूसि वंदितां येकचित्त । ग्रंथविस्तार बहुत । केला दिसत बहु प्रकारें ॥ ३५ ॥ हा तंव नव्हे ग्रंथ-विस्तार । हेंचि ग्रंथाचें ग्रंथसार । बोलिजे सद्गुरूचें ऐश्वर्य फार । हेंचि थोर थोराहुनी ॥ ३६ ॥ म्या तंव करूनियां ग्रंथमिस । सद्गुरुमहिमा बोलें सावकाश । गुरूचें ऐश्वर्य निर्दोष । अतिअसोस मी बोलें ॥ ३७ ॥ तेंचि ग्रंथाचेनि मिसेंकरुनी । गुरुचें ऐश्वर्यचि वाखाणीं । काये करीं पुढें जाउनी । मजलागुनी सर्वत्र तेंचि ॥ ३८ ॥ बुब्दुद जऱ्ही ठायींच स्थिरावला । अथवा वेगें पुढें गेला । तरी तो नव्हे जळावेगळा । न पडे निराळा जळेंविण ॥ ३९ ॥ मंगलाचरण आणि ग्रंथार्थु । अवघा सद्गुरुचा ऐश्वर्यार्थु । सर्वत्र येकुचि परमार्थु । दुजी मातु असेचिना ॥ १४० येक निर्विकल्पसमाधी । जे कीं निरीहस्थिति निरवधि । तेणेंचि राहावें परमानंदीं । तेचि अवधि परम सुखाची ॥ ४१ ॥ तैसें न करितां समाधान । करावें सद्गुरूचें वर्णन । वाखाणावें ऐश्वर्य पूर्ण । हेंचि समाधान निर्विकल्प ॥ ४२ ॥ निर्विकल्पीं जे आनंदप्राप्ति । तेचि सद्गुरुवर्णनीं वर्ते स्थिति । याहूनि येथें सुखोपायगति । प्रयास न लगती योगाचे ॥ ४३ ॥ योगाचेनि बळेंकरून । करावें निर्विकल्प समाधान । निरोधोनि इंद्रियादि मन । स्वरूपस्थ पूर्ण करावें ॥ ४४ ॥ हें सर्व न करितां आटाआटी । मनोवृत्ति न करोनि उफराटी । सद्गुरुदर्शनेंचि सुखकोटि । वर्णनीं भेटि परमानंदाची ॥ ४५ ॥ सद्गुरूचें ऐश्वर्य वर्णितां । लाभे आपुली निजात्मता । नलगे त्यजणें इंद्रियार्था । इंद्रियें सर्वथा कोंडणें नलगे ॥ ४६ ॥ अहो सर्वत्र असे जें सर्वपणें । त्यालागीं कासया समाधि करणें । उघड्या नेत्रींच भोगणें । नलगे घालणें आसनादिक ॥ ४७ ॥ जे सर्वत्र स्वरूप न देखती । जे स्वयें ब्रह्म जाले नसती । साधकपणें आपण देखती । तयासि प्राप्ति समाधिसाधनें ॥ ४८ ॥ अथवा सर्व जिहीं ब्रह्म देखिलें । स्वयें ब्रह्म असतां जाले । परी दुःखदर्शनासि भ्याले । म्हणोनि निराळे निर्विकल्पें ॥ ४९ ॥ येरव्हीं सर्वत्र जें ब्रह्म देखती । स्वयेंही ब्रह्म जाले असती । तैं

---

१ शंका काढणें. २ बुडबुडा, ३ निरिच्छपणा. ४ फार काळ पर्यंत. ५ आस.

सविकल्पें निर्विकल्पें राहातो । किंचिदर्थी नव्हती न्यून ॥१५०॥ ब्रह्मचि स्वयें जालें आपण तेथ । ब्रह्माहूनी अधिक कोण । ब्रह्म ब्रह्मोसि तरी नव्हे न्यून । तें परिपूर्ण सर्वावस्थां ॥ ५१ ॥ यालागीं जे जे अवस्थे राहिजे । ते ते ब्रह्मत्वेंचि असिजे । तेथें न्यूनाधिक काय शोधिजे । ब्रह्मचि सहजें नित्यरूपें ॥ ५२ ॥ यालागीं तो निर्विकल्प असो । अथवा सत्कर्माचरणीं वसो । सविकल्पें अथवा उगाचि बैसो । परो गुरुभजनीं पैसो बुद्धि त्याची ॥ ५३ ॥ तऱ्ही हाचि हा सर्वत्र आपण । करणीं अकरणीं नव्हे न्यून । ह्मणोनि मुख्य समाधि गुरुभजन । तेंचि आपण सर्वदा करीं ॥ ५४ ॥ यालागीं हें मंगलाचरण । आणीं ग्रंथाचेनि निरूपणें । दोन्हीं ब्रह्मत्वें समाधान । नव्हे न्यून समाधीसी ॥ ५५ ॥ यालागीं विस्तार ह्मणों नये येथ । याचिसहित हा सर्वग्रंथ । येणें सद्गुरुऐश्वर्य बोलिजेत । ब्रह्म सदोदित ग्रंथ हा ॥ ५६ ॥ ऐसें करोनियां गुरुस्तवन । तेंचि ब्रह्मरूप मंगलाचरण । करोनि करीं ग्रंथनिर्माण । श्रोतीं सावधान परिसिजे ॥ ५७ ॥ आतां ऐका ग्रंथव्याख्यान । मागां संपलें आत्मनिरूपण । जें गोडाहूनि गोड प्रकरण । तेथें आत्मनिरूपण इतुकें केलें ॥ ५८ ॥ वास्तव आत्मस्वरूप जाणोन । तद्रूपें राहावें स्थितीकरून । सर्वत्र बाणे चिदानंदघन । परिपूर्ण पूर्णानंदें ॥ ५९ ॥ ऐसी सर्वत्र स्थिती बाणलिया । जीवन्मुक्ति साधे साधका तया । मग जीवन्मुक्तिही होऊनियां । स्वच्छेकरोनियां वर्त्ततु असे ॥ १६० ॥ तेचि जीवन्मुक्तिस्थिति कैसी । तेचि जीवन्मुक्तलक्षणेंसी । वसिष्ठ सांगती रघुनाथासी । तेंचि श्रोतियांसि सांगेन मी ॥ ६१ ॥ तें महाराष्ट्रभाषेकरून । यथामति कीजेल व्याख्यान । तें श्रोतीं परिसिजे सावधान । करूनियां मन एकाग्र ॥ ६२ ॥ तऱ्ही आत्मबोध बाणल्या दृढ । तेचि जीवन्मुक्ति अति रूढ । त्या जीवन्मुक्ताचें लक्षण प्रौढ । अतिसुदृढ वसिष्ठ बोले ॥ ६३ ॥ त्यामाजी श्लोकद्वयेंकरून । बोले श्रीवसिष्ठ बोधलक्षण । आत्मबोध तोही किंलक्षण । तेंही निरूपण परिसिजे ॥ ६४ ॥ मग तया जीवन्मुक्ताचें लक्षण । तेंही कीजेल निरूपण श्रोतीं परिसिजे सावधान । परिसतां पूर्ण बाणे मुक्ति ॥ ६५ ॥

तत्त्वावबोध एवैकः सर्वाशातृणपावकः । प्रोक्तः समाधिशब्देन न तु तूष्णीमवस्थितिः ॥ १ ॥

तऱ्ही तत्त्वबोधुचि येकु । सर्वही आशातृष्णातृणाचा पावकु । समाधिशब्दें तोचि येकु । असम्यक् तूष्णींपणें ॥ ६६ ॥ आतां तत्त्व तें काय ह्मणिजे । बोध तो कासया बोलिजे । तेंही सांगों तुज सहजें । श्लोकव्याजें परियेसा ॥ ६७ ॥ अनारोपितरूपतत्व ऐसें । वेदांतीं सिद्धांत केला असे । तेंही रघुनाथा परियेसें । सावकाशें सांगेन ॥ ६८ ॥ तरी जें जें कांहीं दृश्यजात । देहेंद्रियादिसमस्त । श्रुत दृष्ट जें मनोजृंभित । स्थूळसूक्ष्मांत विश्वनामें ॥ ६९ ॥ तें सर्वही ब्रह्मीं आरोपित । ऐसें जाण रामा सुनिश्चित । आरोपित शब्दाचा

---

१ थोंटलें. देखील. २ बसो. ३ सत्कृत्यांत. ४ दुष्कृत्यांत.

अर्थ । तुज यथार्थ सांगितला ॥ १७० ॥ अधिष्ठानवस्तु साच असे । तयाच्या अज्ञानें आन भासे । तें आरोपित जाण विश्वासें । रघुवंशें घेईजे ॥ ७१ ॥ जैसें शुक्ति नेणोनि रजत । कीं रज्जु नेणोनि सर्प भासत । ते ते पदार्थ आरोपित । जाण निश्चित वस्तूचा ठाईं ॥ ७२ ॥ तैसें ब्रह्माचा ठाईं जगज्जाळ । आरोपित आहे हें सकळ । ब्रह्म तें अनारोपित निर्मळ । अति निष्कळ स्वतःसिद्ध ॥ ७३ ॥ तया ब्रह्मासि तत्व बोलिजे । तयासीच अपरोक्षें जाणिजे । तयातेंचि अवबोध ह्मणिजे । ज्ञान सहजें तेंचि जाण ॥ ७४ ॥ एवंकारें येक बोधचि घेतला । तोचि वन्हिरूपें असे बोलिला । तो जाळी आशातृष्णा सकळा । प्रज्वळ जाला प्रत्यक्वृत्ति ॥ ७५ ॥ आशाशब्दें वासनाजाळ । तयाचे संस्कारही सकळ । स्वरूपाआड जे जे समळ । बोलिले सबळ सर्वशब्दें ॥ ७६ ॥ तत्वबोध प्रज्वळलिया वन्हि । सर्वही आशा तृणप्राय होउनी । त्याही बोधें सर्व जाळुनी । केलें निर्वाणीं स्वयंरूप ॥ ७७ ॥ बोधु तोचि समाधि जाण । यथा बोला नाहीं आन । परी तूष्णींपणें राहून । समाधिमिरवण येक करिती ॥ ७८ ॥ येकांतीं तूष्णींभूत बैसला । आणि अंतरीं बोध नाहीं जाला । तो वाउगाचि शीण केला । नाहीं बाणला तत्वबोध ॥ ७९ ॥ येक तो तत्वावबोधें असुनी । विचारतांही जनीं वनीं । वेगळा देहादिकांहुनी । न मिळे मिळणी अहंकाराचे ॥ १८० ॥ जनीं असोनियां जनपणें । नाहीं जयासि जग होणें । जगचि जयासि ब्रह्मपणें । तिये खुणे परिस पां ॥ ८१ ॥

चिदाकारमिदं सर्वं जगदित्येक भावयन् । यस्तिष्ठत्युपशांतस्थः स ब्रह्मकवचःसुखी ॥ २ ॥

चित्शब्दें ब्रह्म पूर्ण । तदाकार सर्वही जन । देखोनि राहे शांतान्तःकरण । ब्रह्मकवच जाण तोचि पुरुष ८२ ॥ ब्रह्माकार जग देखणें । तें जाणिजे ऐसिये खुणे । येणें समानाधिकरणें[1] । येकत्व ह्मणे बोलला ॥ ८३ ॥ तन्हीं येकत्वीं समानाधिकरण असे । येथ नाहीं अनारिसें । तैसेंचि बाधित देखिलें असे । सिद्धांतमिसें वेदांतीं ॥ ८४ ॥ 'यश्चोरः स स्थाणुरेव' । हें समानाधिकरणाचि बरवें । बाधुचि करी स्वयमेव । परी ऐक्यभाव न बोले ॥ ८५ ॥ चोरास्थाणूसि ऐक्यवाद । सर्वा तत्वें न बोले वेद । तेथें चोराचा करूनि बाध । स्थाणुचि सिद्ध प्रतिपादी ॥ ८६ ॥ तैसेंचि रज्जु सर्पाचा ठाईं । तैसीच जाण रजतशुक्तिकाही । समानाधिकरणेंचि पाहीं । इतर बाधूनिही स्थापिलें येका ॥ ८७ ॥ तैसें ब्रह्माकार जग बोलतां । जगाचा बाधुचि तत्वतां । करूनि बोलिले निश्चयार्था । वास्तवता ब्रह्मासी ॥ ८८ ॥ जरी जगब्रह्मासि ऐक्य बोलावें । तरी हें सर्वथा न संभवे । जगा जड नश्वर स्वभावें । ऐक्य ह्मणावें ब्रह्मेंसि कैसें ॥ ८९ ॥ अशेषें कैसें प्रतिपादितां । दोहींसिही अपाड तत्वतां । यालागीं न घडे एकात्मता ।

---

१ दोन पदांची विभक्ति एकच असून त्या परस्पराचा वाक्यांत एकमेकांशी संबंध असतो, तेथें त्या पदांचें 'समानाधिकरण' आहे असें ह्मणतात.

बोधं पूर्णता वस्तूसि बोल ॥ १९० ॥ तैसें चिदाकाराचें व्याख्यान । जगबोध ब्रह्माचि पर्ण । विश्वाचि ब्रह्म हे खूण । सर्वत्र जाण जाणवी ॥ ९१ ॥ एवं व्याख्यान मथितार्थ ऐसा । सर्व जग ब्रह्मरूपचि ठसा । देखें ह्मणूनि रघुवंशा । शांति मानसा स्वयें आली ॥ ९२ ॥ सर्व मग आपणचि असे । तेथें त्या शत्रु मित्र कोण भासे । आपणाविण दुजें न दिसे । ह्मणोनि असे शांतबुद्धि ॥ ९३ ॥ तोचि ब्रह्मकवच बोलिजे । ब्रह्मचि कवच जया सिराजे । कवच दुजें नाहींच कीजे । असे सहजें तेंचि तें ॥ ९४ ॥ जो कीं ब्रह्मपणें सर्वदा असे । आपणाविण दुजें न दिसे । तो सुखी हें बोलतां पिसें । लागेल ऐसें दुजेपणें ॥ ९५ ॥ जो कीं सच्चिदानंदानंद परिपूर्ण । तोचि तो एकला एकपरी जाण । तयासि सुखी ऐसें प्रशंसणें । भिन्नपणें कोण करी ॥ ९६ ॥ ऐसा जीवन्मुक्त जो जाला । तो कोण्हे लक्षणीं पाहिजे लक्षिला । तेंही लक्षण असे बोलिला । वासिष्ठ भला ज्ञातीरावो ॥ ९७ ॥ तेंचि अष्टादशश्लोकेंकरून । बोले जीवन्मुक्ताचें लक्षण । त्याचेंही कीजैल व्याख्यान । श्रोतीं सावधान परिसावें ॥ ९८ ॥

सर्वातीतपदालंबी पूर्णेंदुशिशिराशय: । यस्तिष्ठति सदा योगी स एव परमेश्वर: ॥ ३ ॥

तरी सर्वातीत जे संत वस्तु । तोचि अवलंबु जया निश्चितु । पूर्ण चंद्राचियापरी संततु । शीतळार्थु मनींचा ॥ ९९ आशय जयाचा शीतळ । नेणे द्वैतबुद्धीची तळमळ ब्रह्मपदीं सुनिश्चळ । तोचि अढळ योगेश्वर ॥ २०० ॥ तऱ्ही तो जाण नित्यमुक्त । देहा-कार परमेश्वर संत । तयासि विश्रांति सुनिश्चित । सदोदीत परब्रह्म ॥ १ ॥ तोचि तो जीवन्मुक्त जाण । यया बोला नाहीं आन । आणीक आथिक तयाचें चिन्ह । जो कीं पूर्ण ब्रह्मानंदें ॥ २ ॥

ब्रह्मोपनिषदां तत्वं भावयेदंतरात्मनि । अमतो मुक्तिभाजोऽपि मुक्तिभाजो न संशय: ॥ ४ ॥

अहो अंतरात्मा जो शुद्धबुद्धि । तेणें शोधूनियां उपनिषदाब्धि । तत्प्रतिपाद्य जें ब्रह्म निरवधि । ते तत्वावबोधी बुद्धि नेहटी ॥ ३ ॥ जें का उपनिषदार्थी गर्जत । उपनिषदै-कगम्य जेथ । तें परब्रह्म सदोदित । तेथें बुद्धि निश्चित सदा जयाचि ॥ ४ ॥ स्वरूपानु-संधानीं सुनिश्चळ । ह्मणोनि नाहीं संसारतळमळ । कर्मकर्तृत्वादिक जे मळ । तेथें कर्तृत्वें सकळ न स्पर्शती ॥ ५ ॥ तो बाह्यदृष्टी भोक्ता ऐसा दिसे । परी तो अकर्तेपणें अभोक्ता असे । कर्माकर्म तया न स्पर्शे । भोगपिसें येथें कैंचें ॥ ६ ॥ कर्माकर्म दोषजनित जें सकळ । जेहीं देइजत असे संसारफळ । तें पुण्य तऱ्ही अमंगळ । भवजाळ जेणें होये ॥ ७ ॥ ऐसें पुण्यापुण्यात्मक । दोषरूप जें कर्म सकळीक । तें कांहीं न स्पर्शे तया देख । दृष्टांत श्लोक परिस पां ॥ ८ ॥

---

१ शोभतें. २ शान्यांचा राजा. ३ 'सिजे की' असा पाठ. ४ 'दांत' असा पाठ. ५ 'भोक्ता' असा पाठ.

यथा पर्वतमादीप्तं नाश्रयंति मृगद्विजाः । तद्वद्ब्रह्मविदो दोषा नाश्रयंति कदाचन ॥ ५ ॥

जैसा पर्वतासि सर्वत्र वन्हि । लागलिया वडवाग्नि । मृग पक्षी वनौकें तत्क्षणीं । पर्वत नयनीं न पाहाती ॥ ९ ॥ ते क्षणीं आश्रित हे काय बोलावें । दिशादिशा पळती स्वभावें । तैसें ब्रह्मविदासि दोषीं न स्पर्शावें । स्पर्शतां स्वभावें भस्म होती ॥ २१० ॥ पर्वता ऐसी अचळ स्थिति । तेथें ज्ञानाग्निज्वाळें तेजोमूर्ति । देखोनि दोषवनौकें दिगंता-प्रति । जाती भस्मांतीं लंघूनियां ॥ ११ ॥ कदाचित् कोण्हेकाळीं । दोष न स्पर्शती त्याच्या कपाळीं । ब्रह्मविद्पर्वतें ज्ञानानळीं । प्रदिप्तज्वाळीं प्रकाशतां ॥ १२ ॥ अहो आत्मविदा दोष न स्पर्शती । तेथें विस्मय कोण गा रघुपती । परोक्षज्ञानियासिही नात-ळती । तेथें हे स्थिति काय बोलावी ॥ १३ ॥

संमतिश्लोक ॥ परोक्षमपिविज्ञानं शाब्ददैशिकपूर्वकम् ॥ बुद्धिपूर्वकृतं पापं कृत्स्नं दहति वन्हिवत्

परोक्ष जें कीं शाब्दिक ज्ञान । गुरुमुखें जालें ज्यास संपूर्ण । तेणें बुद्धिपूर्वक केल्या वृजिनें । बाधक त्यालागून घडेना कीं ॥ १४ ॥ परोक्षज्ञानेंचि सर्वातीत । अहंइंद्रियां-दिकां व्यतिरिक्त । बाणलिया पापातें असे जाळित । ज्ञानसामर्थ्य ऐसें असे ॥ १५ ॥ कापुसातुल्य तें जयापरी । अग्नि जाळोनि भस्म करी । तैसें परोक्ष ज्ञान पापा संहारी । रावणारी जाण तूं ॥ १६ ॥ तेथें अपरोक्ष जो कीं ज्ञानाग्नि । तो ब्रह्मविदाच्या दोषा लागुनी । जाळी तेथें कार्मुकपाणी । विस्मय मनीं कोण धरी ॥ १७ ॥ जेव्हांचि अपरोक्ष ज्ञान उदयातें पावलें । तेव्हांचि सकळ दोष त्याचे जळाले । भावनाभ्रांतिभत पळालें । ज्ञानानळें दाहिलें होत्सातें ॥ १८ ॥ तंव श्रीराम ह्मणती जी गुरुमूर्ती । ज्ञानियांच्या ठाई दोष भासती । आणि कामक्रोधादिकही दिसती । ते कोण्हे अर्थी सांगा स्वामी ॥ १९ ॥ वसिष्ठ ह्मणती श्रीरघुनाथा । तेथें रागादि नाहींत गा सर्वथा । परी लौकिक दाविती विपरीतार्था । तेंचि आतां सांगेन ॥ २२० ॥

असंत इव संतोऽपि कोपयंति परं नरम् । निजकर्मगुणोदारं परिपाकं परीक्षितुम् ॥ ६ ॥

आपण तरी स्वतां संत । परी असंतासारिखें दावीत । बलात्कारें कोपवित । कोप-युक्त करिती परां ॥ २१ ॥ कदाचित् ऐसें करी । जेणें परातें क्रोध अंतरीं । उपजे तैसी परिक्षा करी । चित्त अंतरीं कैसें असे ॥ २२ ॥ दुसऱ्यासि क्रोध उपजविला । तऱ्ही तो अपमानील आपणाला । त्याच्या विरुद्धवचनीं चित्ताला । क्षोभ लाभे होईल कीं ॥ २३ ॥ निजकर्माचें जें उदारपण । त्याच्या परिपाकपरीक्षेलागून । विरुद्ध दावी जेणें हे जन । विषाद पूर्ण मानिती ॥ २४ ॥ त्याच्या असत्कारें न कुंसमुसे । सत्कारें-करूनि न संतोषे । समानत्वें अतिहर्षे । नाहीं विशेषें रागद्वेषादि ॥ २५ ॥ जऱ्ही संतें

---

१ अरण्यवासी. २ ब्रह्मज्ञानी हाच पर्वत त्यास. ३ ज्ञानाच्या वणव्यानें. ४ ज्ञान्यास. ५ पाप. ६ 'तेथ वसिष्ठ' असा पाठ. ७ उलटा अर्थ. ८ 'लोभला मला' असा पाठ. ९ दुःखी होतो.

सत्कारिला । असंतें असत्कारु केला । तऱ्ही चित्त न पवे हर्षविषादाला । नाहीं देखिला शत्रुमित्र ॥ २६ ॥ आत्मत्वें सर्वत्र असतां स्थिति । नेणे सुहृदअमित्रव्यक्ति । उदास द्वेष्य बंधु नेणती । आणि न देखती आपपर ॥ २७ ॥ दुसरेपणे आप्तांनाप्त । नाहीं तया प्राप्ताप्राप्त । तो समबुद्धि निश्चित । असें भगवंत पार्था सांगे ॥ २८ ॥

संमतिश्लोक ॥ सुहृन्मित्रार्युदासीनमध्यस्थद्वेष्यबंधुषु । साधुष्वपि च पापेषु समबुद्धिर्विशिष्यते ॥

यालागीं तऱ्ही तो ऐसा असे । परी अज्ञानासि आनची भासे । तो लीलेकरूनि परीक्षामिसें । आपणा ऐसें जगा दावी ॥ २९ ॥ मनीं जनसंग न करावा । जनीं अपमानचि व्हावा । प्रतिष्ठेचा उबगु जीवा । नाहीं वोलावा देहबुद्धि ॥ २३० ॥ देहबुद्धि जेथें दृढ असे । तोचि मानालागीं उल्हासे । जो आत्मानुभवें संतोषे । तृप्त असे निरंतर ॥ ३१ ॥ तोचि जीवन्मुक्त जाण । यया बोला नाहीं आन । परी संस्कारेंही गुणादिदर्शन । जेथें जाण दिसतसे ॥ ३२ ॥ जऱ्हीं अज्ञान असे नाशलें । परी प्रारब्धरूपें शेष राहिलें । तेणें रागादिक भासले । असती देखिले जीवन्मुक्ति ॥ ३३ ॥

ज्ञात्वाप्यसर्पं सर्पोत्थं यथा कंपं न मुंचति । विध्वस्ताखिलमोहोऽपि मोहकार्यं तथात्मनि ॥ ७ ॥

अंधकारीं रज्जु देखिला । तो सर्पबुद्धी[3] दृढ मानिला । निर्धारूनि जंव पाहिला । तंव रज्जुचि संचला रज्जुपणें ॥ ३४ ॥ रज्ज प्रत्यक्षही देखोनी । परी भयकंप न सोडी तिये क्षणीं । तें पूर्वसंस्कारेंकरुनी राहे क्षण दोनी जयापरी ॥ ३५ ॥ दोरीचें अज्ञान तरी गेलें । सर्पबुद्धीसि ही उबडलें । परी भयकंपादि राहिले । संस्कारें भले दृढ असती ॥ ३६ ॥ तेव्हां सर्पदर्शन तरी नाहीं । परी भयकंपु राहिले त्याचे देहीं । तेणें मागता सर्पभ्रमु कहीं । नुपजे कांहीं कंपादिक ॥ ३७ ॥ कारण नाशल्या अज्ञान । कार्य भयकंप राहे जाण । परी तें येक दोनच क्षण । अतिलंबन नाहींच कीं ॥ ३८ ॥ तैसें जीवन्मुक्ताचें मोहजाळ । निःशेषही नाशलें अखिळ तथापि मोहकार्य प्रांजळ । संस्कारें सकळ देहांत राहे ॥ ३९ ॥ तेंचि अज्ञानशेष बाधित करुनी । राहिलें आत्मविदाच्या मनीं । इतुकेनि भव[4]श्रेणि । भरंवसेनि बाधीतना ॥ २४० ॥ नाहो कारण नाशोनि जाये । मग कार्य चिरकाळ कोठें राहे । येक दोनच क्षण होये । परी यावद्दह राहे हें कैसें ॥ ४१ ॥ हें वोलिलें तें यथार्थ । संस्कार राहे क्षण दोनपर्यंत । परी जितुका भ्रम तितुकें गणित । जाण निश्चित संस्काराचें ॥ ४२ ॥ सर्पभ्रमु घटिकाभरि जाला । तऱ्ही भयकंप क्षण दोन राहिला । अज्ञानकृत देहादि भ्रमाला[5] । किती कल्प जाला हें न कळे ॥ ४३ ॥ इतुकिया काळसंबंधीं । संस्कारें राहे प्रारब्धावधि । हे क्षणाहूनि अल्प अवधि । संस्कारबुद्धी अति अल्प ॥ ४४ ॥ यालागीं ज्ञानियाचे ठाईं । मोहकार्य देखिलें असें पाहीं । परी तो न बाधिजे तेणें ही । साक्षित्वें सर्वही वर्त्ततां ॥ ४५ ॥ सर्वातीतपणें प्रकाशत ।

---

१ मिळालेलें व न मिळालेलें २ त्रास. ३ सर्पाच्या भ्रांतीनें. ४ अनेक जन्म. ५ भ्रमेला असा पाठ.

सर्व साक्षी होऊनियां राहात। सूर्य जैसा साक्षित्वें अलिप्त। तैसा वर्तत असोनि देहीं ॥ ४६ ॥ मिथ्याभूत देखे दृश्यजात। तथापि राही क्रिया करित। इंद्रजाळ मिथ्याही जाणत। पाहे विपश्चित कौतुककरीं ॥ ४७ ॥ संस्कारें साच एसेंही दिसे। शुभाशुभ-विषादसंतोषें। परी तें असत्य मानसें। दृढ विश्वासें मानलें जाण ॥ ४८ ॥ तेणें रागादिकीं जऱ्ही कार्य केलें। तऱ्ही त्या आत्मानुवृत्त्या बोधिलें। इतुकेनि तया काय आलें। किंवा बाणलें कर्त्तेपण ॥ ४९ ॥ यदर्थीं वार्तिककार। करिता जाला दृढ निर्धार। रागादिकीं भ्रमपूर। नये अविचार कामवशें ॥ २५० ॥

संमतिवार्तिक ॥ रागादिदर्शनं यच्च ज्ञानिनोऽपि हि चोद्यते। बाधितस्यैव तत्सूते सदप्युक्ते न दूषणम्

यालागीं कामक्रोधादिक। दिसती जीवन्मुक्तिं सम्यक। परी त्या तयासि नव्हती बाधक। आत्मोन्मुख म्हणोनियां ॥ ५१ ॥ कामक्रोधरूपें होये मनोवृत्ति। ते क्षण एक ज्ञानातें आवरिती। तंव सर्वेंचि ब्रह्माकार होये वृत्ति। ते बाधी सर्वार्थीं इतरांसी ॥ ५२ ॥ म्हणोनि रागादिकीं आंवरिलें। जऱ्ही ज्ञान न झांके कांहीं केलें। ज्ञान तेथें बंधन कोणा बोलें। सर्वथा न मिळे जीवन्मुक्ता तया ॥ ५३ ॥

स्फटिकः प्रतिबिंबेन यथा याति न रंजनम्। तज्ज्ञः कर्मफलेनांतस्तथा नायाति रंजनम् ॥ ८ ॥

तेंचि दृष्टांतमुखेंकरुनि। आइक आतां कोदंडपाणी। स्वयेंचि शुद्ध स्फटिक मिळणी। पदार्थ कोण्ही मिळेना ॥ ५४ ॥ स्फटिकसंनिधि ठेविलें। जपाकुसुम तेथेंचि बिंबलें। बाह्यही स्फटिका आरक्त केलें। परी अंतरीं भेदलें नाहींच कीं ॥ ५५ ॥ अंतरीं शुभ्राचा शुभ्रचि असे। बाह्यपणीं आरक्त भासे। तोही अज्ञानें आरक्त दिसे। येरव्हीं वसे जैसा जैसा ॥ ५६ ॥ वास्तव पाहतां बाह्यही नाहीं। तो अंतर्बाह्य शुद्धचि पाहीं। तैसा ज्ञाता कर्मं करूनिहीं। न लिंपे कहीं तत्फळें कदा ॥ ५७ ॥ तो कामरागादिकें कर्मं करू। परी कर्मफळीं न भेळे भीतरू। बाह्य कर्ता दिसे तोहि संचारू। अज्ञाना निर्धारु मानतसे ॥ ५८ ॥ संस्कारें तया विपरीताचि कळे। आनचि देखती तयाचे डोळे। हें जगामध्यें भ्रम मेळें। असो तो बोले भलतेंचि ॥ ५९ ॥ तो कर्मकर्त्ता ऐसा आवडे। परी तो अकर्त्ता सर्वांपाडें। आपुलिया साक्षित्वा निवाडें। धडफुडें जाणतसे ॥ २६० ॥ यालागीं जऱ्ही तो कर्में करी। तरी न बुडे कर्मफळसागरीं। तो अकर्त्ता सर्व प्रकारीं। अंतर्मुखें करी लिंपेना ॥ ६१ ॥

अंतर्मुखतया तिष्ठन्बहिर्वृत्तिपरोपि सन्। परिश्रांततया नित्यं निद्रालुरिव लक्ष्यते ॥ ९ ॥

सर्वदा जो अंतर्मुख राहिला। तरी कर्त्ता नव्हे यया बोला। तो बाह्यवृत्तीवरी जरी आला। दृष्टांत भला परीयेसीं ॥ ६२ ॥ निद्रेंहूनि जो उठला। परी निद्रासुखें असे भरला। कां निद्रा प्रारंभतां तयाला। सुखकल्लोळामाजी असे ॥ ६३ ॥ त्याचें मन

आत्म्याकडे वृत्ति जडलेला. २ जास्वंदीचें फूल. ३ इच्छा आणि प्रीति यांनीं. ४ सर्वांपेक्षां. ५ खरोखर.

निद्रासुखें भरलें । संस्कारें बाह्यकर्म असे उरलें । परी आसक्ति नाहीं ना क्षोभलें । मन मुरालें परमसुखें ॥ ६४ ॥ आतां अंतर्मुख या शब्दाचा अर्थ । तोही सांगों पां यथार्थ । सर्वांचें अंतर ब्रह्म सदोदित । बाह्य तें निश्चित दृश्य स्फुरे ॥ ६५ ॥ वस्तूवेगळें जें जें भान । तें तें बाह्यप्रपंच दृश्य जाण । अहंकारबुद्ध्यादिक मन । आणि सर्वही जन स्थूळसूक्ष्म ॥ ६६ ॥ हे सर्व बाह्य पदार्थ । ते ते ब्रह्माहूनि व्यतिरिक्त । म्हणोनि ते नाशिवंत असती असंत सर्वदा ॥ ६७ ॥ यालागीं सर्वांचें जें अंतर । तें परब्रह्म सत्चार । बाह्यत्यागें तयासमोर । होये निरंतर ते अंतर्मुखता ॥ ६८ ॥ बाह्य देखोनि प्रातिभासिक । परी अधिष्ठानीं दृष्टि सम्यक् । वैसे जरी निष्टंक । अंतर्मुख तेंचि जाण ॥ ६९ ॥ बाह्येंइंद्रियव्यापारेंकरुनी । मन परीश्रांत जालें भ्रमणीं । विश्रांति पावलें अधिष्ठानीं । नुठे तेथुनि उठवितांही ॥ २७० ॥ ऐसा स्वस्वरूपीं असता । बाह्य व्यापारेंही व्यापारतां । तो तेथिंचा नव्हे गा सर्वथा । अनुभवपंथा आश्रयिला ॥ ७१ ॥ जैसा निद्राभरें जो दाटला । पूर्ण निद्रिस्तु तरी नाहीं जाला । तो अंतर्मुखें असे सुखावला । बाह्य व्यापाराला व्यापारें ॥ ७२ ॥ बाह्य व्यापारदर्शनादि करी । परी सुखें सुखावला अंतरीं । तैसा ज्ञानी अंतःसुख सेजारीं । पहुडूनि करी बाह्य व्यापार ॥ ७३ ॥ इतुकेनि सुख नाहीं भंगलें । आपुलें आत्मत्व नाहीं गेलें । असंगपण नाहीं उगवलें । कोणें नेलें पूर्णत्व ॥ ७४ ॥ कर्म करूनि तो अकर्त्ता । भोग भोगोनि तो अभोक्ता । इंद्रियमेळेंकरूनि वर्त्ततां । न मैळे असंगता जयाची ॥ ७५ ॥ त्या जीवन्मुक्ताची स्थिति सांगणें । तें एकेक किती बोलणें । तो आत्मसुखें तोपलेंपणें । काय नेणें वर्त्तलें देहीं ॥ ७६ ॥ तो देहीं असोनि देहातीतु । कर्में करूनि तत्फळें अलिप्तु । निर्विकार असंग सदोदीतु । आनंदभरितु पूर्णत्वें ॥ ७७ ॥ नाहीं जयाची द्वैतबुद्धि गेली । अद्वैतबुद्धि स्थिरावली । तयासिही कर्त्तव्यता उरली । हे तंव बोली अघटमान ॥ ७८ ॥ अहो दुसरें जेथें न स्फुरे । तेथ कर्म कैचें करणें उरे । द्वैतबुद्धीनें निर्धारे । कर्म सपुरें घडों शके ॥ ७९ ॥ ऐसिया आक्षेपासि उत्तर । देता श्रीवसिष्ठ चतुर । सांगे याचाही प्रकार । होऊनि एकाग्र ऐक रामा ॥ २८० ॥ अगा द्वैतदृष्टि जऱ्ही गेली । ब्रह्मैकास्थिती बाणली । तऱ्ही कर्त्तव्यता असे उरली । संस्कारें भली प्रारब्धशेषें ॥ ८१ ॥ अज्ञान जऱ्ही निःशेष सरे । तऱ्ही प्रारब्धेंबाधितशेषसंस्कारें । तेणें इंद्रियग्रामु व्यवहारें । प्रारब्ध खरें चेष्टवी ॥ ८२ ॥

अद्वैते स्थैर्यमायाते द्वैते च प्रशमं गते । योगिनः कर्म कुर्वन्ति पश्यन्ति स्वप्नवज्जगत् ॥ १० ॥

अद्वैतब्रह्मस्थिति अढळ जाली । द्वैतबुद्धि निःशेष विराली । तऱ्ही योगिये कर्मकल्लोळीं । पोहती मेळीं अनुभवाचिये ॥ ८३ ॥ जगस्वप्न संभ्रमटवाळ । तें देखती जैसें

१ कर्मेंद्रियांनीं उद्योग केल्यामुळें. २ निश्चिंतपणा. ३ कधीं न होण्यासारखीं. ४ आत्म्याहून जग निराळें असा भ्रम. ५ प्रारब्धकर्मांचा क्षय भोगानेंच होतो म्हणून. ६ सर्व इंद्रियें. ७ भ्रमाचें कार्य.

मृगजळ । संस्कारें सकळ । कर्म प्रांजळ करिताती ।। ८४ ।। कर्त्ता कर्म आणि करण । हें त्रिपुटी न स्फुरतां कर्माचरण । जीवन्मुक्तासि घडे जाण । द्वैत स्वप्न देखतांतीं ।। ८५ ।। परी यथार्थ न मानिती व्यवहार । आग्रहें न करितां कर्माचार । अहंकर्तृत्वादि संचार । गेला समग्र आत्मत्वें ।। ८६ ।। यथाकाळीं विधि पाळिती । निषेधातें निषेधें गाळिती । उभयता गुणागुण न देखती । अर्भकस्थिति हेतूविण ।। ८७ ।। विधि पाळिलिया गुण होईल । निषेधें दोष मज जडेल । ह्मणौनि प्रवृत्तिनिवृत्तिटवाळ । नसोनि सकळ प्रवृत्ति दिसे ।। ८८ ।। सहस्र जन्मांचिया भरोवरी । तत्कर्मेंचि केली सहस्रवरी । निषेध गाळी त्याभीतरी । तेणें पुरी चित्तशुद्धि जाली ।। ८९ ।। तेणें-करूनि जालें ज्ञान । ज्ञानोत्तकाळीं तेंचि आचरण । संस्कारशेषेंचि जालें जाण । करी ह्मणौनि तेंचि सदा ।। २९० ।। जैसी चेष्टा बाळकाची । स्वभावें येकें मोडी येकें रची । परी उभयतां फळाची । नाहीं इच्छेची सोय जया ।। ९१ ।। तैसें ज्ञानीही कर्में करिती । परी कर्मीं कर्मफळाची नाहीं आसक्ति । करितांही न मोडे जयाची स्थिति । असंगगति अखंड ।। ९२ ।। येक ज्ञानी कर्में करिती । एक ते निर्विकल्पेंचि असती । येक ते कांहींच न करिती । राज्यभोग पावती भूमिकाभेदें ।। ९३ ।।

संमतिश्लोक । प्रारब्ध कर्मनानात्वाद्बुद्धानामन्यथाऽन्यथा । वर्त्तनं तेन शास्त्रार्थे भ्रमितव्यं न पंडितैः । स्वस्वकर्मानुसारेण वर्त्तते च यथायथा । अविशिष्टः सर्वबोधः समामुक्तिरितिस्थितिः ।

त्या ज्ञानाचीया सप्तभूमिका[2] । असती गा रघुनायका । त्यामाजी प्रथम तीन देखा । अज्ञानभूमीका जाणाव्या ।। ९४ ।। जो प्रस्थान करी गमनासी । तो गेलाची ह्मणती काशियेसी । तैसा प्रवर्त्तला जो शुभेच्छेसी । ज्ञान तयासि मासाचिकीं ।। ९५ ।। ह्मणौनि जऱ्ही तिनी भूमिका । तऱ्ही ज्ञानभूमीच सकळिका । ताटीं वैसतसे[3]वो जेविला देखा । हे प्रतीति लोकां होतचि कीं ।। ९६ ।। चौथीपासूनि सातवरी । जीवन्मुक्ति-भूमिका अवधारीं । परी भूमिकांच्या भेदांतरीं । सर्वांपरी ज्ञानचि भेदे ।। ९७ ।। ज्ञान तें अखंड येक विध । तेथेंचि दिसती भूमिकाभेद । भूमिकाभेदें ज्ञान विशद । न पवे बाध रघुनाथा ।।९८।। सुखदुःखाचें भान न व्हावें । अखंड निरतिशय सुख भोगावें । ऐसिये भरे जो होवें । तेणें साधावें सप्तभूमींतें ।।९९।। जो सप्तभूमि पावला । तो दुःखादि दर्शना मुकला । सुखें सुखरूपचि जाला । न पवे दुःखाला देहवरी ।। ३०० ।। तो परें प्रबोधि-लियाही नुमज । सुखें पहुडला सुखसेजे । येर सुखदुःखादि सुझे । परी आनंदसेजे न संडी ।। १ ।। दोघांसि संसृति[4] निमाली । नाहीं स्वात्मसुखाची हानि जाली । येका सुखदुःख दर्शना आलीं । भूमिकामेळीं रघुराया ।। २ ।। भूमिचौथी आणि पांचवी । व्युत्थानेंकाळीं[5] सुखदुःखें अनुभवी । येरव्हीं ब्रह्मानंदसुखानुभवि । भोगिजे सवा ज्ञान-

१ शहाणेसुद्धां. २ सात पायऱ्या. ३ ‘ वैसतसेवो ’ असापाठ. ४ जन्ममरण. ५ देहावर आल्यावेळीं.

वर्ती ॥ ३ ॥ षष्ठी सप्तमी भूमिकेसी । सर्वथा नेणें सुखदुःखें कैसीं । परें बोधिलियाही जयासी । देहस्मृतीसि न येती ॥ ४ ॥ तुरीय पंचमी भूमिकेसी । सुखदुःखदर्शनें नेमेंसी । होती परी अनुभवबळें तयांसी । ऐक्यतेसि न मिळे ॥ ५ ॥ अज्ञानी जैसा लुढोनि जाये । तैसा ज्ञानी सर्वथा नोहे । सर्वांचा साक्षी होऊनि राहे । आपणांवरी तें सुखदुःख नेघे ॥ ६ ॥ विषयसुखें ना सुखावे । दुःखें करूनि ना दुःखावे । अप्राप्तिची चाड न पवे । परिपूर्ण स्वभावें ह्मणौनियां ॥ ७ ॥ प्रारब्ध भोग देहाचे माथां । आपण विदेही अकर्ता अभोक्ता । ऐसा स्वानुभवें सर्वां रिक्तता । निःसंगता भोगितु ॥ ८ ॥ यालागीं दोघांचें सुख येक । दोन्ही पूर्णानंद सम्यक् । परी विशेष तो इतुकाचि देखा । भानसुखदुःख इतरांसी ॥ ९ ॥ ऐसे आइकोनि भूमिका भेद । भेदें वर्त्तनही कळलें विशद । यालागीं रघुराज अतिप्रबुद्ध । परमानंद पावले ॥३१०॥ आनंदें ह्मणे श्रीरघुराया । अत्यंत सुख जालें हें आयिकूनियां । परी भूमिकाभेद स्वामिया । आयिकावया उत्कंठित मी ॥११॥ ते उत्कंठाडोहळे पुरवावया । समर्थ कोण तुजवांचूनिया । तें कृपेकरूनि सांगावया । करीं स्वामिया कृपा मज ॥ १२ ॥ ळळे बाळाचे पाळणीं । दुजें समर्थ कोण माउलीवांचूनी । तेंचि तूं कृपाळू जननी । आपत्यालागूनि प्रसन्न होई ॥ १३ ॥ स्वयें आपण ज्ञातयां वरिष्ठ । रघुराज वसिष्ठाहूनि श्रेष्ठ । तो होऊनियां निकृष्ठ । सद्गुरु श्रेष्ठ स्वयें करी ॥ १४ ॥ अतिविनयेंकरूनि विज्ञापन । सद्गुरूसि करी प्रसन्न । लीलाविग्रहाचें संपादन । विडंबन स्वयें दावी ॥ १५ ॥ असो ते विनवणीचसाठीं । श्रीवासिष्ठ सप्रेमें उठी । ह्मणे सप्तभूमिकांची परिपाठी । तुज जगजेठी सांगेन ॥ १६ ॥ येकि येकि भूमिका सांगतां । चमत्कारु होईल रघुनाथा । ते आपुले ठाईं विचारितां । नसेल तत्वतां ते साधावी ॥ १७ ॥ ऐसें उत्तरोत्तर भूमिका साधोन । राहावें स्वस्वरूपीं स्थिरावोन । तें जीवन्मुक्ति निर्वाण जाण । नाहीं कारण तियेवरी ॥ १८ ॥ ऐसिया भूमिकांचें श्रवण । करीं करूनि एकाग्र मन । हेंचि श्रवणाचें श्रवण । नित्य साधन श्रवणार्थी ॥ १९ ॥ ऐसें बोलतांचि वासिष्ठमुनि । श्रीराम सर्वांगें सावध श्रवणीं । तेंचि निरूपण श्रोतेजनीं । सावधानीं परिसिजे ॥ ३२० ॥

संमतिश्लोक श्रीराम० । सप्तानां योगभूमीनामायासः क्रियते कथम् । कीदृशानि च चिह्नानि भूमिका प्रति योगिनः ॥

जिये ठाईं योगिये रमती । जे कीं चिदानंदघनमूर्ति । तो श्रीराम वसिष्ठप्रति । करी विनंति विनयवृत्त्या ॥ २१ ॥ ह्मणे जी वसिष्ठा गुरुवर्या । उपाय सांगावा भूमिका साधावया । आणि अभ्यासुही याचा स्वामिया । जेणें ओपैतिया होती भूमि ॥ २२ ॥ आणि तया भूमिकांप्रति । चिन्हें कैसीं उदय पावती । तें कृपा करूनि सद्गुरुमूर्ती ।

१ पुरविण्यांत. २ अनुक्रम. ३ नम्रपणानें. ४ प्राप्त.

भजप्रति सांगिजो कां ॥ २३ ॥ ऐसा प्रश्न करितां श्रीवसिष्ठासी । मनीं संतोषला तो महा ऋषि । ह्मणे सांगैन आयिकें भूमिकांसी । आणि साधनांसि प्राप्तीचिया ॥ २४ ॥

संमतिश्लोक श्रीवसिष्ठउवाच ॥ ज्ञानभूमिः शुभेच्छाख्या प्रथमा समुदाहृता
विचारणा द्वितिया च तृतीया तनुमानसा ॥
तत्वापत्तिश्चतुर्थीस्यात्ततोऽसंसक्तिनामिका । पदार्थाभाविनी षष्ठी सप्तमी तुर्यगा स्मृता ॥
आसामंते स्थिता मुक्तिस्तस्यां भूयो न शोचति । एतासां भूमिकानां त्वमिदं निर्वचनं श्रुणु ॥

तंव वसिष्ठ ह्मणती तमालश्यामा । राजीवलोचना पुरुषोत्तमा । जानकीवल्लभा निष्कामकामा । उत्तमोत्तमा रघुवर्या ॥ २५ ॥ आनंदरूपा चिदैकघना । लीलाविग्रहा दीनोद्धारणा । ज्ञानसंपत्तिउद्दीपना । रघुनंदना परियेसीं ॥ २६ ॥ तऱ्ही ज्ञानभूमिका सप्त आहेति । आयिक त्यांच्या नामांची वित्पत्ति । तऱ्ही शुभेच्छा ते प्रथमा बोलती । दुसरी रघुपती विचारणा ते ॥ २७ ॥ तनुमानसा तिसरी भूमिका । चौथी ते सत्वापत्ति देखा । पांचवी असंसक्तिनामिका । षष्ठी ऐका रघुवर्या ॥२८॥ साहावी ते पदार्थाभाविनी । सातवी तुर्यगा निर्वाणीं । तया सप्तांमाजी कोदंडपाणी । कोडिसवाणी मुक्ति वसे ॥२९॥ मुक्तीचा ठाई रघुनाथा । संसारदुःख नाहीं गा सर्वथा । ह्मणोनि भूमिकांची आतां । सांगों तत्वतां कर्तृत्वास्थिति ॥ ३३० ॥ पहिली जे शुभेच्छा बोलती । तियेचें स्वरूप आयिक पां रघुपती । आणि कोण साधनें तेथें असती । तेही गति अवधारीं ॥ ३१ ॥

संमतिश्लोक ॥ प्रवृत्तश्च निवृत्तश्च भवति द्विविधः पुमान् । स्वर्गापवर्गोन्मुखयोः श्रुणु लक्षणमेतयोः ।
कियत्तनामनिर्वाणं वरं संसृतिरेव मे । इति निर्णीय कर्त्ता यः स प्रवृत्त उदाहृतः ॥

तरी यया जगामाझारी । द्विविध पुरुष गा अवधारीं । प्रवृत्त निवृत्त दोनी परी । असे व्यवहारीं वर्तत ॥ ३२ ॥ आतां प्रवृत्तनिवृत्तांचीं लक्षणें । तें सांगेन ऐकें एकाग्रमनें । तरी सकाम धर्मानुष्ठान करणें । स्वर्गाकारणें आणि इहभोगा ॥ ३३ ॥ तो ह्मणे जे निवृत्तिकर्में करिती । ते व्यर्थचि हा शिणु पावती । कर्में करूनि वृथा दवडवी । नाहीं प्राप्ति विषयसुखाची ॥ ३४ ॥ जिये कर्मीं विषयसुख नाहीं । तें कर्म करूनि प्रयोजन काई । यालागीं आत्मा श्रेष्ठ नोहे कांहीं । पुरुषार्थ सर्वही प्रवृत्तिकर्मीं ॥ ३५ ॥ प्रवृत्तेंचि कर्में आचारितां । विषयसुखाची प्राप्ति विशेषता । इहलोकीं आणि स्वर्गाच्या माथां । रंभादिवनिता सुखभोगेंसी ॥ ३६ ॥ नानापरीचीं सुखें भोगणें । तोचि आह्मीं पुरुषार्थ साधणें । यावेगळें तें व्यर्थ शिणणें । काळक्षेपण वृथाचि पैं ॥ ३७ ॥ ऐसा दृढ निश्चय करुनी । सकामें प्रवृत्तिकर्में करी चित्त देउनी । तो तो प्रवृत्त पुरुष गा कार्मुकपाणी । आयिकें करणी निवृत्ताची ॥ ३८ ॥

---

१ पहिली. २ लज्जित, गुप्तरूपानें असा भाव. ३ रंभा, उर्वशी वगैरे अप्सरा. ४ वेळ घालविणें.

संमतिश्लोक ॥ चलार्णवयुगच्छिद्रकूर्मग्रीवाप्रवेशवत् । अनेकजन्मनामंते विवेकी जायते पुमान् ॥
असारा च । संसारव्यवस्थालं ममैतया । किं कर्मभिः पर्युषितैर्दिनं तैरेव नीयते ॥
क्रियातिशय निर्मुक्तं किं स्याद्विश्रमणं परम् । इति निश्चयवान्योंतः स निःशून इति स्मृतः ॥
कथं विरागवान् भूत्वा संसाराब्धिं तराम्यहम् ॥

तर्‍ही तो संसारदुःख तें आठवी । संसार देखे जळती अटवि । तेणें पोळत जाये अति जीवीं । ह्मणे न व्हावी मागुती हे दशा ॥ ३९ ॥ तें दुःख मानितसे कैसें । दोन्ही समुद्र उचंबळती जैसे । येका भेणें जो पळों बैसे । तंव दुसरा दिसे पुढें थोरू ॥ ३४० ॥ दोन्हींचां संधीं सांपडला । अतिशयें तळमळूं लागला । तंव पुढें कूर्म जातां देखिला । भयें वळघला तयावरी ॥ ४१ ॥ कूर्में बाहेर काढिली मान । चालिला नियें वरी बैसोन । तेणें वेटीं घातला नेऊन । तेंहीं क्षणीं बुडों पाहे ॥ ४२ ॥ तो कूर्म गेला समुद्रामीतरी । तो येकला राहिला वेटावरी । तों बुडवावया येती लहरि । येरा सिंधारी भरली ॥ ४३ ॥ जिकडे पाहे तिकडे उदधि । लहरियांची अतिसमृद्धि । समुद्र गडाडे व्याकुळ बुद्धि । न दिसे संधी पळावया ॥ ४४ ॥ तेथेंही जळचरांचे वळसे । तेणें भयें पेटली उमासे । पुढें प्रवेश ना मागें निर्गम नसे । दुःख अतिसोसें पावतु ॥ ४५ ॥ ह्रदय पिटी रडे आर्ती । दुजें नाहीं जें करी उपशांति । तें दुःख सांगेल कोणाप्रति । तळमळी चित्तीं अतुल ॥ ४६ ॥ येक उदधि वोलांडुनि आला । तंव दुसरियाचा वेढा पडला । तेथेंही वर्ते दुःखमेळा । नव्हे निराळा कोण्हेपरी ॥ ४७ ॥ मागें संसाराब्धि टाकुनी । तंव पुढांही भवार्णवप्रवेशनीं । मध्येंही दुःख पावे निर्वाणी । विश्रांति क्षणीं असेचिना ॥ ४८ ॥ पूर्वजन्मीं जरामृत्युदुःखपरंपरा । पावला येकावरी येक अपारा । पुढें हो आगमांजी बाल्यादि जरा । देखे थारा दुःखासी ॥ ४९ ॥ वर्त्तमान असे जिये ठायीं । तंव तेथेंही यमयातना दारुण पाहीं । ते चुकल्या गर्भवासामध्येंही । यातना देहीं अनावर ॥ ३५० ॥ ऐसिया जन्ममरणाच्या कोडी । दिसती संसाराचिया बांदवडीं । ऐसी संसाराचि घडामोडी । होती कोडी असंख्य कल्प ॥ ५१ ॥ ऐसीं मागील दुःखें स्मरे । विश्रांतिलागीं सर्वदा झुरे । ह्मणे किमर्थ दुःखार्जन पुरे । येणें संसारें साधावें ॥ ५२ ॥ ऐसिया भवार्णवामाझारी । नानापुण्यपापें भरोवरी । करितां सद्‍बुद्धि तयातें वरी । मग निर्धारी निश्चळ ऐसा ॥ ५३ ॥ असंख्य जन्मांचे अंतीं । विवेकी होय तयाची मति । मग प्रवर्त्ते या विचाराप्रति । ह्मणे संसृति पुरे आतां ॥ ५४ ॥ अनेक उत्तम जन्म जर्‍ही जाले । तर्‍ही येथें दुःखचि भोगिलें । आतां फुगे हें मन विटलें । काय साधिलें इतकां जन्मीं ॥ ५५ ॥ आतां पुरे हें पुन्हां न करीं । मागुता न प्रवर्ते संसारीं । प्रवृत्तिकर्मेंही दुःख भारी । सर्वथा न करीं असार हें ॥ ५६ ॥ सार

१ भरला. २ 'सिंधारी' असा पाठ. ३ जाण्याचीवाट. ४ निवारण. ५ द्वातारपण, मृत्यु इत्यादि अनेक दुःखें. ६ गोठाण्या. ७ बंदिखान्यांत.

नाहीं जया अंत । तें कर्मादि असार समस्त । बलात्कारें दुःख जोडिजेत । आणि कुश्चित सर्वार्थीं ॥ ५७ ॥ ऐसेंनिही स्वर्गादिफळ जालें । कां इहलोकींचे विषय फळलें । तेही आगमापायी भलें । काय आलें हातासि तेथें ॥ ५८ ॥ देहवर्त्तमानें विषयो सरे । तेव्हां तेणें दुःखें अतिशयें थोरें । तेंचि विषय स्मरस्मरों मरें । आद्यंत विसरें अतिदुःखें ॥ ५९ ॥ अथवा विषय असतां होये देहांतु । तरी तो विषय कोण्हें भोगिजतु । एवं दोहींचिपरी नाडतु । नाहीं अंतु त्या दुःखासी ॥ ३६० ॥ जेणें कर्मफळें दुःख होये । तें फळचि परी सुफळ नोहे । दुःखरूप फळ पावोनि काये । असार होताहे यालागीं ॥ ६१ ॥ यदर्थीं श्रुतिही असे बोलत । ह्मणे कर्म करूनि जे जे लोक प्राप्त । ते सर्वथा क्षयातें पावत । अंतवत ह्मणोनियां ॥ ६२ ॥

संमतिश्रुति ॥ तद्यथेह कर्मचितो लोकः क्षीयते एवमेवामुत्र पुण्यचितो लोकः क्षीयत इति ॥

संमति श्लोक ॥ ते तं भुक्त्वा स्वर्गलोकं विशालं क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशंति ॥

जैसे इहलोकींचे भोग नाशती । ते प्रत्यक्ष आपणातें दिसती । तैसेचि परलोक क्षय पावती । निश्चयार्थीं जाण तूं ॥ ६३ ॥ ऐसीं असार कर्में करुनी । दिवस घालावे शून्यपणीं । जैसीं हारिणें महावनीं । करिती हिंडोनि काळक्षेपु ॥ ६४ ॥ आणि जे आत्मविचार न करिती । ते लोक अंधतमामाजी पडती । जेथ नाहीं सूर्याची गति । ते आत्महनन[2] हें श्रुति स्वयें बोले ॥ ६५ ॥

॥ संमतिश्रुति ॥ असूर्या नाम ते लोका अंधेन तमसा वृताः ॥ तांस्ते प्रेत्याभिगच्छंति ये के चात्महनो जना इति ॥ न चेदिहावेदीन्महती विनष्टिरिति ॥

यालागीं जे आत्मयातें नेणती । ते आत्महननें नाशु पावती । ह्मणोनि तो आत्मविचारप्रती । प्रवर्त्ते सर्वार्थीं नेटेंपाटें ॥ ६६ ॥ ह्मणोनि नित्य नावडे कर्मसंगति । निःशेष उडाली विषयांची प्रीति । ऐसी वैराग्याची स्थिति । साधनें दिसती यामाजी तीं हीं ॥ ६७ ॥ नित्यानित्यवस्तुविवेक । इहामुत्रार्थफलभोगविरागादिक । तिसरें तें शमादिषट्क[3] । यांत सम्यक दिसतसे ॥ ६८ ॥ चौथी ते जाण मुमुक्षुता । चौथें साधन सीताकांता । वैराग्य बाणलें ह्मणे आतां । हे संसारवेथा तरूं कैसी ॥ ६९ ॥ आतां यया भवार्णवा आंत । विचारितां दुःखचि समस्त । तरी विश्रांति ते काय येथ । विचारस्थ स्वयें होत ॥ ३७० ॥ ऐसा अंतरीं निश्चय असे करितु । ह्मणे हा भवाब्धि उतरूं कवणें हेतू । मुक्त व्हावें ऐसें इच्छितु । जाण निश्चितु निवृत्त[4] तोची ॥ ७१ ॥ तोची मुमुक्षु तोची निवृत्त जाण । हेंचि जाणावयाचें लक्षण । मुमुक्षुतेचें जें दृढपण । तेचि जाण शुभेच्छा गा ॥ ७२ ॥ हे प्रथम भूमिका गा रघुपती । शुभेच्छा इयेतें ह्मणती । आतां सांगों इची

---

१ येणारे आणि जाणारे २ आत्महत्या. ३ शम, दम, उपरति, तितिक्षा, श्रद्धा आणि समाधान. ४ संसारापासून मागें फिरलेला

वर्त्तती स्थिति । तेचि ह्मणती साधनें तिचीं ॥ ७३ ॥ अगा संसाराब्धि कैसा तरन । यया विचारीं प्रवर्त्तला सपूर्ण । तेचि शुभेच्छा जाण । आयिक वर्त्तन सांगों तुज ॥७४॥

संमतिश्लोक ॥ ॥ विरागमुपयात्यंतर्वासनास्वनुवासरम् ॥ क्रियासूदाररूपासु क्रमते मोदतेन्वहम् ॥

ग्राम्यासु जडचेष्टासु सततं विचिकित्सति ॥ नोदाहरति मर्माणि पुण्यकर्माणि सेवते ॥

अनन्योद्वेगकारीणि मृदुकर्माणि सेवते ॥ पापाद्बिभेति सततं न च भोगमपेक्षते ॥

स्नेहप्रणयगर्भाणि पेशलान्युचितानि च ॥ देशकालोपपन्नानि वचनान्यभिभाषते ॥

तदाऽसौ प्रथमामेकां प्राप्तो भवति भूमिकाम् ॥ मनसा कर्मणा वाचा सज्जनानुपसेवते ॥

यतः कुतश्चिदानीय ज्ञानशास्त्राण्यवेक्षते ॥ एवं विचारवान्यः स्यात्संसारोत्तरणं प्रति ॥

स भूमिकावानित्युक्तः शेषस्त्वार्य इति स्मृतः ॥

सर्वत्र विषयीं गेली प्रीति जयाची । हेचि व्यक्ति विरागाची । अंतर्वासना सकळ कर्माची । गेली साची प्रवृत्तिकर्मीं ॥ ७५ ॥ जंव जंव क्रियेचा त्यागु करी । तंव तंव सुख पावे अंतरीं । ग्राम्यचेष्टा सर्वप्रकारीं । तो अव्हेरी व्यर्थ ह्मणोनि ॥ ७६ ॥ ग्राम्यविचारीं प्रवर्त्ततां । सद्विचार प्रवर्ते त्याचिया माथां । ह्मणे हे व्यर्थ काळक्षेपता । पाप सर्वथा व्यर्थ विलापी ॥ ७७ ॥ ईश्वरनिष्ठेवांचून । सर्व व्यर्थ प्रपंचव्यवहरण । ह्मणोनि देतसे उपेक्षून । विचारस्थ पूर्ण स्वयें ह ७८ ॥ कोण्हाचेंही वर्म न बोले । प्रांजळपणेंचि स्वयें चाले । निवृत्तिकर्मीं जें पुण्य कळे । त्यासिच आतळे करणीयत्वें ॥ ७९ ॥ तेंही कर्म नव्हे कठीण । अति मृदु दुःखहरण । कोण्हासिही उद्वेग नव्हे दारुण । सुखकारण सर्वांसि जें ॥ ३८० ॥ निरंतर पापाचें भय धरी । पाप न प्रवेशे जयाचे अंतरीं । भोगाची अपेक्षा सर्वोपरी । नाहीं क्षणभरी इंद्रियभोगाची ॥ ८१ ॥ सकळ जनांसि मृदुपण । स्नेहपूर्वक बोले वचन । अति सादरें नम्रतेकरून । सुंदरपण अर्थगांभीर्य ॥८२॥ देहकाळासि उचित । तदनुसार बोले वचनामृत । तेव्हां तो जाण निश्चित । जाहला प्राप्त प्रथम भूमिका ॥ ८३ ॥ अथवा मनसा वाचा कर्मणा[१] । शरण जाय जो सज्जना । आणि सद्गुरूचिया चरणा । अनन्यशरण जो जाला ८४ ॥ पर्वी सद्गुरुही न सेवितां । परी साधुसंगीं अतिप्रीति चित्ता । अध्यात्मशास्त्रें मेळवूनि अतिप्रयत्नता । विचारु तत्वतां करी स्वयें ॥ ८५ ॥ ऐसा संसारतरणाप्रति । विचार करी अहोराति । तोचि भूमिकावंतु गा रघुपती । येर ते ह्मणती आर्य ऐसें ॥ ८६ ॥ जो कीं सन्मार्गातें भजतां । परी उपजली नाहीं मुमुक्षुता । तोचि आर्य गा श्रीरघुनाथा । मुमुक्षु तो सर्वथा शुभेच्छावंतु ॥८७॥ तो ह्मणे मुर्खाचेपरी येथें असोन । साधावें म्यां कार्य कोण । शास्त्रसज्जनेंसि संसारतरण । साधुसंग पूर्ण वैराग्ययुक्त ॥ ८८ ॥ हे शुभेच्छाभूमीचें लक्षण । आणि सांगितलें साधनवर्त्तन । दुसरी विचारणा ते ऐसी जाण । आइकें खूण पर्ण ब्रह्मा ॥ ८९ ॥ प्रथम भूमिकेपासून । वैराग्य सर्व भूमींस जाण । पाहिजे गा अतिनिःशेष निर्वाण । हे सर्वत्र

---

१ मानसनें, वाणीन व कर्मानीं.

खूण जाणावी पां ॥ ३९० ॥ आतां दुसरी भमिका विचारणा । तेही आइकें गा रघुनंदना । सांगों तियेच्याही लक्षणा । जेणें मना संतोष होये ॥ ९१ ॥

संमतिश्लोक ॥ शास्त्र सज्जनसंपर्कैवैराग्याभ्यासपूर्वकम् । सदाचारप्रवृत्तिर्या प्रोच्यते सा विचारणा ॥

अगा पूर्वीलें साधनचतुष्टयसंपन्न । वैराग्यवंत अतिनिर्वाण । जालिया सद्गुरूसि शरण । करी सेवन अनन्यभावें ॥ ९२ ॥ ब्रह्मनिष्ठ आणि शास्त्रज्ञ । हेंचि सद्गुरूचें सर्वत्र लक्षण । मागां निरूपण केलें तुज संपूर्ण । तेचि खूण जाणावी ॥ ९३ ॥ यदर्थीं स्वयें बोलतसे श्रुति । तेही आइक गा रघुपती । तें लक्षणें जाणोनि श्रीगुरुप्रति । शरण होती अनन्यभावें ॥ ९४ ॥

संमतिश्लोक ॥ ॥ तद्विज्ञानार्थं गुरुमेवाभिगच्छेत्समित्पाणिः श्रोत्रियं ब्रह्मनिष्ठमिति ।
आचार्यवान्पुरुषो वेदेति । नैषा तर्केण मतिरापनेया प्रोक्तान्येनैव सुज्ञानाय प्रेष्ठेत्याद्याः ॥

संमतिश्लोक ॥ ॥ तस्माद्गुरुं प्रपद्येत जिज्ञासुः श्रेय उत्तमम् । शाब्दे परे च निष्णातं ब्रह्मण्युपशमाश्रयम् ॥

जिज्ञासा वरी जैं अंतःकरण । जें ईश्वर जाणावा सर्वज्ञ प्रयत्न । तेव्हां सद्गुरूचरणा शरण । हस्तीं उपाहरण घेऊन जाये ॥ ९५ ॥ तया सद्गुरूचें ऐसें लक्षण । श्रोत्रियशब्दें शास्त्रज्ञ । ब्रह्मज्ञानत्वें ब्रह्मनिष्ठ जाण । होआवें शरण तयासि पैं ॥ ९६ ॥ जयासि असे सद्गुरु भेटला । तो आत्मवेत्ता बोलिला । सद्गुरूविण तो आंधळा । जाणे कळा सर्वही जन्ही ॥ ९७ ऐसिया शरण जावें सद्गुरूसी । तयातें भजावें सर्वस्वेंसी । तोचि उपासनीय यथार्थेसी । होय भाविकासि निश्चय ॥ ९८ ॥ सज्जनसंपर्ककरूनि भजन । शास्त्रींही ऐसें लक्षण । गुरुमुखें महावाक्यश्रवण । यथालक्षण करावें ॥ ९९ ॥ तेणें नव्हे जन्ही साक्षात्कार । उठी असंभावनादिसंभार । तन्ही करावा वेदांतविचार । अथवा शास्त्र अध्यात्म जें ॥ ४०० । ऐसें शास्त्रसज्जनसंपर्ककरून । तें वैराग्यपूर्वक बोलिलें जाण । सदाचारप्रवृत्तीचीखूण । तेही संपूर्ण बोलें ऐसी असे ॥ १ ॥ श्रवण करीं यथालक्षण । जें अद्वैत ब्रह्मीं तात्पर्याचें धोरण । सर्वेचि युक्तीकरूनि अनुचिंतन । हेंचि मनन जाणावें ॥ २ ॥ यद्रूप जो सदाचारप्रवृत्ति । वर्त्ते जयासि सर्वार्थी । कां यथोचित वर्णाश्रम करिती । तरी बहुप्रीति श्रवणमननीं ॥ ३ ॥ सर्वांचा संग त्याग करी । सद्गुरूचा संग दृढ धरी । नित्यानित्य विवेक अंतरीं । जागे सर्वांपरी गृहपती जैसा ॥ ४ ॥ गृहाचीं उचितानुचितें । अनुकूळ प्रतिकूळ समस्तें । जाणे जैसा सुनिश्चितें । तैसा पंडित सर्वार्थी ॥ ५ ॥ किंबहुना गा रघुनाथा । प्रथम भमीची सांगितली कथा । वैराग्यादिक समस्ता । तेचि तत्वतां वर्ते यथें ॥ ६ ॥ जेथें इया चिन्हांची संपत्ति । तोचि विचारणाभूमिका निश्चिती । आतां तिसरीचीही स्वरूपस्थिती । येकाग्रचित्तीं परियेंसीं ॥ ७ ॥

---

१ ... २६८ ओवीत सांगितल्याप्रमाणें. २ गुरुकडे जातांना हातीं घेतलेला समिधादि पदार्थ. ३ शास्त्र ... गुरु यांच्या संगतीनें. ४ घराचा यजमान. ५ बरें वाईट.

संमतिश्लोक विचारणाशुभेच्छाभ्यामिंद्रियार्थेष्वसक्तता । यात्र सा तनुता भावात्प्रोच्यते तनुमानसा ॥
यथावच्छास्त्रवाक्यार्थे मतिमाधायर्थे निश्चलाम् ।

शुभेच्छाविचारणाभूमीसि जाहालें असे । परी येथें अतिशयेंसी दृड बैसे । ह्मणौनि नव्हे पुनरक्त ऐसें । क्षीण मानसें होइजे जेथें ॥ ८ ॥ पूर्णभूमीसि श्रवणमनन । तत्परिपाकें करी निदिध्यासन । निदिध्यासनें मन होये जाण । क्षीण ह्मणोनि अभिधान तनुमानसा ॥ ९ ॥ अगा जे कीं अध्यात्मशास्त्रें असती । तेथील निश्चित वाक्यें जें बोलती । श्रुत्यर्थ ब्रह्मात्मैक्यें स्वयें येती । तेथें विमळमति निक्षेपी सदा ॥ ४१० ॥ अथवा वेदांतशास्त्रींचें महावाक्य । जें कीं बोधी ब्रह्मात्मैक्य । तोचि पूर्णार्थ सम्यक् । परब्रह्म येक सच्चिदानंद ॥ ११ ॥ पूर्वीलिया भूमिकांकरून । शुद्धबुद्धि जाली जे निर्माण । जे कीं विक्षेपनिद्राशून्य । तियेतें ब्रह्मीं लीन स्वयें करी ॥ १२ ॥ विजातीय जें देहादिसमस्त । तें तिरस्कारूनियां प्रपंचजात । परब्रह्मीं बुद्धि निक्षेपित । सावधचित्त होऊनियां ॥ १३ ॥ ब्रह्म ध्येय आपण ध्याता । हे विसरूनियां द्वैतकथा । आपण ब्रह्मेंसि ऐक्यता । सुखरूपता राहणें जें ॥ १४ ॥ ययाचें नाम निदिध्यासन । द्वैतअभावें स्वरूपीं स्थिर पूर्ण । जालिया तोचि साक्षात्कार संपूर्ण । येथें तें न्यून इतुकेंचि ॥ १५ ॥ बुद्धि स्वरूपीं राहे । मागुती स्वयेंचि उठोनि जाये । देहादि स्फुरत आहे । मागुता होये सावधान ॥ १६ ॥ पुनरपी सावध होऊन । देहादिप्रपंच तिरस्कारून । बुद्धीतें मागुती वळून । ब्रह्मीं सुलीन स्वयें करीं ॥ १७ ॥ मागुती बुद्धि तेथूनि उठी । प्रपंचाकारें होये दृष्टि । ते मागुती वळूनि ब्रह्मीं नेहटी । जाण जगजेठी निदिध्यासन हें ॥ १८ ॥ निदिध्यासन जे अवस्था । तोचि तनुमानसा रघुनाथा । अभ्यासें मन पावे तनुता । ह्मणूनि तत्वतां तनुमानसा ॥ १९ ॥ मनाचें तनुत्व तें ऐसें । प्रपंचादिसंधान न्यून होतसे । ब्रह्माकार परीणमत असे । तनुत्व ऐसें जाण रामा ॥ ४२० ॥ प्रपंचाकारें जें वहूपण । तेंचि मनाचें दुष्टत्व पूर्ण । प्रपंचक्षयें क्षीण जाण । बुझें खूण रघुवर्या ॥ २१ ॥ ऐसें निदिध्यासन करितां । भूमिका पाविजे गा रघुनाथा । तेचि तनुमानसा तत्वतां । होये सर्वथा तिसरी भूमिका ॥ २२ ॥ तंव रघुनाथ ह्मणती गुरुमूर्ती । परीयेसीं माझी एक विनंती । गुरुकृपा जालियाही कां बाधिती । ज्या बोलिजती असंभवना ॥ २३ ॥ विपरीतभावना । इया कां उठती कोणा कारणा । साक्षात्कारासि अतिदारुणा । होती जाणा विघ्नरूप ॥ २४ ॥ सद्गुरूंनीं दाविलियाही तत्व । विश्वास जाहल्याही ब्रह्मभूत । मागुतें श्रवणमनन कां करीत । आणि साधीत निदिध्यासन ॥ २५ ॥ हे करावया कोण कारण । वस्तुप्राप्तही उरलें साधन । तरी सांग पां हे विवंचून । जेणें अज्ञान फिटे माझें ॥ २६ ॥ तंव वासिष्ठ ह्मणती गा त्रिदशाधिपती । बरवें

१ ज्या स्थितींत मन लहान होतें ती स्थिति.

पुसिलें गा कल्याणमूर्ति । तन्ही आयिक तयाची स्थिति । येकाग्रचित्तीं परीस पां ॥२७॥ तन्ही सद्गुरून दावल परब्रह्म । जें आत्मस्वरूप निरुपम । आपणोंसि अभिन्न सर्वोत्तम । परात्पर निजरूप ॥ २८ ॥ तेंचि तो तेणोंचि काळें । जाला पाहिजे येकेंचि वळ । चित्तसंस्कारें नाकळे । ह्मणौनि बैसले असंभावनी ॥ २९ ॥ श्वेतकेतु आणि भृग्वादिक । ययांसि साक्षात्कार तात्काळिक । जाला परी तैसे विरळे देख । बहुतेक ऐसेचि ॥ ४३० ॥ इतर गुरूचेनि उपदेशें । असंभावनायुक्ताचि ज्ञान होतसे । येथें उद्भवती दोष हे आपैसे । संस्कारविशेषें पूर्वकर्मांच्या ॥ ३१ ॥ तेणें असंभावना विपरीतभावना । ह्या उठती अतिदारुणा । तेणें साक्षात्कार सज्ञाना । नव्हे जाणा अभ्यासेंही ॥ ३२ ॥ हेंचि विशद तुजप्रति । सांगितल गा रघुपति । आतां असंभावना कां न जाती । तही गति सांगेन ॥ ३३ ॥ असंभावना विपरीतभावना । न जावया चारी कारणें रघुनंदना । तें सांगेन देयीं अवधाना । समाधाना पावसी जेणें ॥ ३४ ॥ तन्ही विषयासक्ति आणि प्रज्ञामांद्य । कुतर्क विपर्ययाग्रह विपद । हीं चारी कारणें अतितीव्रबाध । करिती बंध साक्षात्कारा ॥ ३५ ॥ तन्ही हेंही सोडवावयाचीं साधनें । तेंही परिसावीं रघुनंदनें । तन्ही शमदम-श्रवणमनननिदिध्यासनें । भस्म क्षणें होताती ॥ ३६ ॥

संमतिश्लोक । अहं ब्रह्मेतिवाक्यार्थे बोधो यावद्दृढीभवेत् । शमादिसहितस्तावदभ्यसेच्छ्रवणादिकम् ॥

अहो विषयासक्ति असतां । तेणें ब्रह्माभ्यासु न करी सवथा । केलियाही विषयलोलुपता । साक्षात्कारता केवीं होये ॥ ३७ ॥ यालागीं शमदम करीजेती । जे मागां निरूपिले तुजप्रति । तेंचि करावे गा महामती । विषयासक्ति तुटावया ॥ ३८ ॥ दुसरी प्रज्ञामांद्याची तळमळ । प्रज्ञामांद्य अनर्थाचि केवळ । अल्प ज्ञानें करिती कोल्हाळ । मन निश्चळ कदा नव्हे ॥ ३९ ॥ प्रज्ञामांद्यें प्रमाणासंभावना । प्रमाण वेद आण सद्गुरूराणा । तेथेंचि करी असंभावना । ह्मणे होय कीं ना प्रमाण वेद ॥ ४० ॥ श्रीगुरूसि मनुष्यरूपें मानी । निश्चय नाहीं त्याचां वचनीं । प्रज्ञामांद्यें शास्त्रार्थ न मनी । न भेदे ह्मणौनि भुले पैं ॥ ४१ ॥ तें प्रज्ञामांद्य तुटावया । श्रवण करावें गा रघुराया । तेणें प्रज्ञामांद्य आपैसया जाय लया कार्यासहित ॥ ४२ ॥ कार्य जें कीं प्रमाणासंभावना । तेणोंसि लयो पावे गा रघुनंदना । ह्मणौनि करावें वेदांतश्रवणा । गुरुवचना विश्वास होये ॥ ४३ ॥ मग महावाक्यगुरूच्या ठाईं । विश्वास बाणे अनपायीं । तीक्ष्ण प्रज्ञा होय पाहीं । साधे सर्वही कार्य आपुलें ॥ ४४ ॥ तिसरें विघ्न गा रघुपती । कुतर्क ऐसें जया बोलती । जेणें प्रमेया संभावना होती । नाशु करिती सर्वस्वाचा ॥ ४५ ॥ प्रमाण जे कीं महावाक्य । जेणें जाणिजे प्रमेय सम्यक् । प्रमय तेंचि तें परब्रह्म येक । प्रमेय लोक त्यातें ह्मणती ॥ ४६ ॥

१ 'पर परम' असा पाठ. २ आपोआप. ३ स्पष्ट. ४ ज्ञानशक्तीचा मंदपण. ५ उलटपणाविषयीं आग्रह. ६ भोगांवर प्रीति. ७ नाश न होणारा.

तेंचि होय कीं नव्हे ह्मणती । ऐसे कुतर्क नाना करिती । ब्रह्म तें सप्राप्त सर्वार्थी । साधनें योजिती अनेक त्यासी ॥ ४७ ॥ नानासाधनीं जें नव्हे प्राप्त । तें अनायासें आह्मां अनुभूत । तरी तेंचि होय कीं नव्हे ऐसें ह्मणत । जाण निश्चित कुतर्कु हा ॥ ४८ ॥ याचेंचि नांव प्रमेयासंभावना । येणें साक्षात्कारु नव्हे जाणा । साक्षात्कारु ज्यास असंभावना । आनंदघना केंवीं भेटे ॥ ४९ ॥ हें तोडावयाचें साधन । करावें युक्तिकरूनि अनुचिंतन । ययाचेंचि नाम मनन । करावें अनुदिन अनाळसपणें ॥ ५० ॥ युक्तीनें विचारितां सूक्ष्मदृष्टी । तंव होये सर्वत्र ब्रह्मेंसि भेटी । युक्तिविचारें पडे मिठी । ब्रह्मात्मकसृष्टि तेंचि भासे ॥ ५१ ॥ तेणें स्वस्वरूपीं निर्धार होये । ह्मणे मज ब्रह्मेंसि होयें । ब्रह्म मी तेंचि हें होयें । कुतर्क आहे हा व्यर्थचि सर्व ॥ ५ ॥ ऐसा निश्चयो दृढ बाणला । परी विपर्ययाग्रह असे उरला । तोही जावया पाहिजे केला । अभ्यास भला निदिध्यासन ॥ ५३ ॥ विपर्ययाग्रह ह्मणिजे ऐसा । तोही ऐकें जगन्निवासा । ब्रह्मेंविण भास तो विपर्यय ऐसा । देहादि ठसा प्रपंचजात ॥ ५४ ॥ देहीं अहमात्मा हा आग्रह करी । पुत्रादिक हें माझें दृढ धरी । तो विपर्ययाग्रह गा असुरारी । त्यालागीं करीं निदिध्यासन ॥ ५५ ॥ देहादिप्रपंच जेथें स्फुरत । तेथें प्रपंचाकारें होये चित्त । साक्षात्कारु केंचा तेथ । ह्मणौनि करिजेत निदिध्यासन ॥ ५६ ॥ निदिध्यासनाचें लक्षण । विपरीताचें करावें परिवर्जन । येकनिष्ठ करूनि अंतःकरण । करावें लीन स्वस्वरूपीं ॥ ५७ ॥ येणें विपर्ययाग्रह तुटे । आणि हे विपरीतभावना निःशेष आटे । येक स्वरूपींच प्रगटे । त्या नाम गोमटें साक्षात्कार ॥ ५८ ॥ यालागीं गा रघुनाथा । श्रवणादिसाधन करावें सर्वथा । येणें असंभावनादिसमस्ता । जाताती तत्वतां पूर्ण ब्रह्मीं ॥ ५९ ॥ ऐसें आइकोनियां रघुपति । श्रीगुरुचरणीं मस्तक ठेविती । ह्मणे अति सुखावलों सुग्य मूर्ति । नाहीं चित्तीं संशय कांहीं ॥ ४६० ॥ आतां तिसरिये भूमिकेचें लक्षण । सद्गुरुराया सांगा संपूर्ण । आणि उर्वरितां भुमिकांचें कथन । कृपा करून निवेदावें ॥ ६१ ॥ मग संतोषोनि वसिष्ठऋषि । श्रीरामा आलिंगी प्रेमप्रीतीसी । मग ह्मणे धन्य धन्य तव मातेची कुसी । परब्रह्म आलें पोटासी दीनोद्धारा ॥ ६२ ॥ जेणें धन्य सूर्यान्वय । जेणें धन्य माझें आचार्य । जेणें कुळीचें ज्ञानगौरववर्य । तो रघुनाथ मज शिष्य ॥ ६३ ॥ ऐसें बोलोनि सुखावला । पुनरपि आनंदें बोलों लागला । ह्मणे तृतीय भूमिका निर्वाळा । तुज कथिन्या फाडोवाडें ॥ ६४ ॥ जो सर्वदा निदिध्यासन करी । तो तृतीय भूमिकागत निर्धारी । व्युत्थान काळीं राहाटतीपरी । आयिक रावणारी सांगेन ॥ ६५ ॥

संमानिश्लोक । तापसाश्रमविश्रांतैरध्यात्मकथनक्रमैः । संसारनिंदकैस्तद्वद्वैराग्यकथनक्रमैः ॥
शिलाशय्यासनासीनो जरयत्यायुरुन्नतम् । वनवालिविहारेण चित्तोपशमशोभिना ॥

१ 'आळसपणें सदा' असा पाठ. २ दृश्य वस्तूंच्या आकाराचें. ३ त्याग. ४ उरलेल्या. ५ 'आलंगी' असा पाठ. ६ सूर्यवंश. ७ गुरुपणा. स्पष्टपणें.

अंसगसुखसौख्येन कालं नयति नीतिमान् । अभ्यासात्साधुशास्त्राणां संचयात्पुण्यकर्मणाम् ॥
जंतोर्यत्नवदेवेयं वस्तुदृष्टिः प्रसीदति ॥

तापसांचे जे आश्रम । जे कीं वानप्रस्थादि उत्तम । जेथें तपादिसाधनांचे संभ्रम । करूनि विश्राम पावले ॥ ६६ ॥ तये परब्रह्मीं जे निवाले । ते परब्रह्मवेत्ते ह्मणितले । आत्मनिष्ठ तेचि भले । येक वेगळे नामभेदें ॥ ६७ ॥ तयांचेनि संगेकरून । अध्यात्मशास्त्र करिती कथन । तेंचि जाणपां निदिध्यासन । दुसरें जाण साधुसंग ॥ ६८ ॥ अध्यात्मशास्त्राचे श्रवणकथन । अथवा स्वयें कीजे निर्माण । तें सर्वही जाण निदिध्यासन । ह्मणौनि सज्ञान हेंचि करिती ॥ ६९ ॥ हेंचि अध्यात्मशास्त्रें कैसीं । जें निःशेष निवृत्ति संसारासी उपपादिती वैराग्यासी । आणि ब्रह्मासिं आत्मैक्य ॥ ४७० ॥ जे आत्माराम जाले मानसीं । तेही सांगों गा हृषीकेशी । तऱ्ही दोहींचीं लक्षणें ऐसीं । जाण मनासीं सांगेन तें ॥ ७१ ॥ निदिध्यासनाचें ऐसें लक्षण । प्रपंचप्रत्ययाचें कीजे तिरस्करण । परब्रह्माचें आत्मैक्यग्रहण । तैसेंच जाण अध्यात्मशास्त्र ॥ ७२ ॥ तेथ संसारनिंदनें वैराग्यता । वैराग्यें उपरति इंद्रियार्था । ब्रह्मनिरूपणें होये तद्रूपता । तेंचि तत्वतां निदिध्यासन ॥ ७३ ॥ ह्मणौनि स्वआयुष्य जें विस्तृत । तें येणेंकरूनि असे क्षपितें । हें असतां वनावली हिंडत । सुख पावत नानापरी ॥ ७४ ॥ वन देखोनियां अतिप्रीती । तेणें संतोष पावे चित्तवृत्ति । ह्मणौनियां वनविहारण करिती । जेणें उपशांति स्वयें होये ॥ ७५ ॥ समाधानासि विक्षेपों करी । तैसें वनविहारण न करी । वनीं येकांती बैसे शिळेदरीं । शयन करी शिळापृष्ठीं ॥ ७६ ॥ अथवा असंगु जो कीं आत्माराम । याचेनि संगें पावे विश्राम । ऐसा तो नीतिमंत पुरुषोत्तम । काळसंभ्रम अतिक्रमी ॥ ७७ ॥ कां साधुशास्त्राचेनि संभ्रमाभ्यासें । अथवा पुण्यकर्माचरणवशें । वस्तुदृष्टि स्वेच्छा होतसे । अवकाशें ये भूमीसी ॥ ७८ ॥ ज्ञानाची सीमा भूमितृतीयेसी । त्याहूनि वाडी नाहीं विवेकासी । मग स्वरूपस्थिति उत्तरभूमीसी । त्याही तुजपासीं सांगेन ॥ ७९ ॥ आणीकही आत्रांतरभेद असती । तेही सांगेन तुजप्रति । तृतीये भूमीसी अनुभवती । आथिक स्थिति द्विविध त्याची ॥ ४८० ॥ येक श्रेष्ठ येक सामान्य । ऐसें द्विविध असंगपण । दोन्ही वाणती तया संपूर्ण । आइक चिन्ह सामान्याचें ॥ ८१ ॥ सामान्य असंगता ते कैसी । ते आधीं ऐकें गा हृषीकेशी । जे चिन्हें तनुमानसेसीं । तिसरे भुमीसि होताती ॥ ८२ ॥

संमतिश्लोक ॥ तृतीयां भूमिकां प्राप्य बुद्धोनुभवति स्वयम् । द्विःप्रकारमसंगत्वं तस्य भेदमिमं शृणु ।
द्विविधोयमसंसंगः सामान्यः श्रेष्ठ एव च । नाहं भोक्ता च कर्ता च न बाध्यो न च बाधकः ।
इत्यसंजनमर्थेषु सामान्यासंगनामकम् । प्राक्कर्मनिर्मितं सर्वमीश्वराधीनमेव वा ।

१ सांगतात. २ कंटाळा, त्याग. ३ केलेलें. ४ अहर्मळा. ५ पुण्यकारक कर्मे केल्यामुळें. ६ ' असंग. संगता ' असा पाठ.

सुखं वा यदि वा दुःखं कैवात्र ममकर्तृता । भोगाभोगा महारोगाः संपदः परमापदः ॥
वियोगायैव संयोगा आधयो व्याधयो धियः । कालः कवलनोद्युक्तः सर्वभावान्विनाशयन् ॥
तिष्ठतीति विचारो यः सामान्योसावसंगमः ॥

ह्मणे मी सर्वथा नव्हे कर्त्ता । का जो निष्क्रिय मी असें तत्वता । क्रिया असतां कर्तव्यता । ते तंव माथां अहंकाराच्या ॥ ८३ ॥ अहो हा अहंकार गळे जयाचा । त्यासि बाधु कोण कर्त्तव्यतेचा । तो क्रिया ना कर्त्ता तियेचा । अकर्त्ता सर्वांचा अक्रियपणें ॥ ८४ ॥ ऐसें भगवद्गीतेंतही श्रीकृष्ण । अर्जुनाप्रति बोले वचन । अहंकारेंविण कर्त्तेपण । पापपुण्य लिंपिजेना ॥ ८५ ॥

संमतिश्लोक ॥ ॥ यस्य नाहंकृतो भावो बुद्धिर्यस्य न लिप्यते । हत्वापि स इमाँल्लोकान्न हंति न निबध्यते ॥

अहंकारेंविण जें क्रियाचरण । तें सर्वथा न दिसें कर्त्तेपण । यालागीं ह्मणे मी अकर्ता पूर्ण । अक्रिय ह्मणोनि सर्वथा ॥ ८६ ॥ तैसाचि ह्मणे मी अभोक्ता । भोग भोगोनि अलिप्तता । सर्वत्र अहंकारु व्यतिरिक्तता । होचि ज्ञातता जाणावी ॥ ८७ ॥ नित्य तृप्त ह्मणौनी । अभोक्ता मी जनीं वनीं । मी बंधक नव्हे भवसेनी । निर्व्यापार ह्मणोनि कोण्हा न बाधी ॥ ८८ ॥ आणि बाध्य जें कीं दृश्यजात । तेंही मी नव्हे कदाचित । ऐसें पदार्थमात्रीं असंगत । तेंचि निश्चित सामान्य हें ॥ ८९ ॥ हेंचि सामान्य असंगता । जाण निश्चित रघुनाथा । करूनि कसा अकर्त्ता । पुससी तरी आतां सांगेन ॥ ४९० ॥ ह्मणे सुख अथवा दुःख । हें पूर्वकर्मेंचि होये देख । हें अनीश्वरवादी मीमांसक । बोलती सकळीक येणें न्यायें ॥ ९१ ॥ ईश्वरवादियाचेनि मतें । ईश्वराधीन वर्ते । सर्वही ईश्वरेंचि करिजेतें । मी कोण तेथें कर्त्ता भोक्ता ॥ ९२ ॥ ह्मणे भोग अभोगविस्तार । हे सकळही रोगाचे संभार । जे कीं परिणामीं संतापकर । दुःख थोर देताती ॥ ९३ ॥ तैसे जितुकें संपत्तिजात । तितकेंही विपत्ति समस्त । परम आपदा स्वयें मानित । दुःख देत सर्वांपरी ॥९४॥ संपत्ति अर्जितां दुःखकोटि । होये प्राणेसि आटी । व्यय होतां मरणेंसि भेटी । होये अटाटी दुःखाची पैं ॥ ९५ ॥ तैसाचि प्रिय वस्तुचा जो संयोग । तो व्हावया वियोग । वियोगीं तें अतिदुःख अभंग । नित्य रोग तळमळेचा ॥ ९६ ॥ आधि आणि व्याधि दोन्ही । आधि तो मनोदुःख भरंवसेनि । व्याधि शरिरीं रोग निर्वाणीं । दुःख जनीं वनीं देताती ॥९७॥ बुद्धिमंत अतिक्लेश देखती । ते जळजळ न वाहवे चित्तीं । सर्वभाव काळें नाशिजेती । हे विचारास्थिति सर्वदा वर्त्तें ॥ ९८ ॥ सामान्यकारें जे असंगता । ते एवंविचाररूप गा रघुनाथा । आतां सांगों श्रेष्ठ असंगता । जे आइकतां नित्य आनंद ॥ ९९ ॥

संमतिश्लोक ॥ अनेन क्रमयोगेन संयोगेन महात्मनाम् । वियोगेनासतामंतः प्रयोगेणात्मसंविदाम् ॥
पौरुषेण प्रयत्नेन संतताभ्यासयोगतः । करामलकवद्वस्तुन्यागते स्फुटतां दृढम् ।

---

१ ज्ञातेपणा. २ ईश्वर नाहीं असें ह्मणणारे. ३ या प्रकारच्या विचारानें युक्त.

नाहं कर्तेश्वरः कर्त्ता कर्म वा प्राक्तनं मम । कृत्वा दूरतरे नूनमिति शब्दार्थभावनम् ।
संसारांबुनिधेः पारे सारे परमकारणे । यस्मिन्मौनासनं शांतं तच्छ्रेष्ठासंगमुच्यते ।

अगा पूर्वोक्त अभ्यासेंकरून । करितां असंगसंवर्जन[1] । सत्संगेंकरूनि निर्वाण । करित। विचारण आत्मस्वरूप ॥ ५०० ॥ आत्मविचारणेचा प्रयोग । करी पुरुषप्रयत्न अभंग । निरंतर अभ्यास निःसंग । करितां सांग थोरावला ॥ १ ॥ जैसा कीं स्फुटतर करतळामळ[2] । तैसी वस्तु कळे जया सकळ । स्फुट[3] स्वरूपाचि भासे निर्मळ । टाकी तळमळ तेणेंकरूनी ॥ २ ॥ कर्त्तेपणाचें आपुलें माथां । ओझें न घे तो सर्वथा । आणि ईश्वर सर्वांचा नियंता । तोचि कर्त्ता हेंही नव्हे ॥ ३ ॥ अथवा प्राक्तनकर्मेंकरून । नेमें सर्व भोग होती जाण । टाकी शब्दार्थसंधान । राहे निर्वाण स्वस्वरूपीं तो ॥ ४ ॥ प्राक्तनकर्म देहांचा माथां । आणि देहादिकर्में बाधित सर्वथा । ब्रह्मस्वरूप मी कर्माचा भोक्ता । नव्हे तत्वतां ऐसाचि बोधु ॥ ५ ॥ तें स्वस्वरूप कैसें असे । सर्वही जग ज्यामाजी वसे । सर्वांचें कारण सर्वांशें । जें कीं न नाशे काळत्रयीं ॥ ६ ॥ देशें काळें जें अबाधित । जें कीं संसारांबुनिधीचा[4] प्रांत । जें कीं सर्व प्रपंचातीत । स्वप्रकाशमंत परब्रह्म ॥ ७ ॥ त ब्रह्मस्वरूपीं मौनवृत्ति । शांतासनें राहाणें गा सुमती । श्रेष्ठासंग त्यातें ह्मणती । स्वरूपस्थिति जिये नाम ॥ ८ ॥ प्रपंचाच्या तिरस्कारें । स्वस्वरूपीं राहाणें एकाकारें । तो श्रेष्ठ असंग जाण निर्धारें । रघुवीरें आकर्णिजे ॥९॥ आणीक श्रेष्ठ असंगाचें लक्षण । आयिक रघुनाथा संपूर्ण । परब्रह्मीं नित्य अवस्थान । सच्चिद्घन तें कैसें ॥ ५१० ॥

संमतिश्लोक ॥ यन्नांतर्न बहिर्नाधो नोर्ध्वं नाशासु नांबरे । न पदार्थे नापदार्थे न जडे न च चेतने ॥
आश्रितं भासनं शांतमभासं नभसा समम् । अनाद्यंतमजं कांतं तच्छ्रेष्ठासंग उच्यते ॥
सतोषामोदमधुरः सत्कार्यमलपल्लवः । चित्तनालाग्रसल्लीनो विघ्नकंटकसंकटः ॥
विवेकपद्मां रूढोंतर्विचारार्कविकासितः । फलं फलत्यसंसंगां तृतीयां भूमिकामिमाम् ॥

जें कीं अंतर ह्मणतां परिच्छिन्न । बाह्य ह्मणतां दृश्यमान । एवं अंतर्बाह्यविहीन[5] । परिपूर्ण व्यापक जें ॥ ११ ॥ अध ह्मणतां ऊर्द्धाभावो । ऊर्द्ध ह्मणतां आधीं अभावो । एवं अध ना ऊर्द्ध नाहीं निर्वाहो । व्यापक पाहा हो गगन जैसें ॥ १२ ॥ महाप्रलयीं जें उदक । कोण करी ऊर्द्धअधलेख । तेंचि तें सभराभरित[6] येक । नाहीं अनेक कळा-चया ॥ १३ ॥ ना ते पृथ्वी ना तें अंबर । दिशा विदिशा देशांतर । ना तें नव्हे पदा-र्थाकार । अपदार्थसार तेंही नव्हे ॥ १४ ॥ जड ना तें चेतन । नाहीं जडोजडीं अवस्थान दोन्हीं नव्हे जें संपूर्ण । येकलें जाण नित्यपणें ॥ १५ ॥ चेतन जें भावें । जडाजडीं जें न घेपवे[7] । सर्वांचें भासक जें स्वभावें । कोण्हें नाभिभवे[8] अनादिपणें ॥ १६ ॥ सर्वांचें

---

१ 'असंगसंगवर्जन' असा पाठ. २ तळहातावरील आवळा. ३ स्पष्ट. ४ संसाररूपी समुद्राचें तीर. ५ आंत बाहेर नसलेलें. ६ जिकडे तिकडे भरलेलें. ७ घेतां येतें. ८ पराभव पावत नाहीं.

जें आश्रयभूत । ह्मणौनि सर्वांसि न भासत । जैसें मतेसि नेणेना उदरस्थ । तेंचि समस्त प्रकाशी ।। १७ ।। तैसें सकळांचें भासक होये । त्यातें न भासती न नेणती सोये । तें भावावया योग्यही नव्हे । निराकार हें ह्मणौनियां ।। १८ ।। ।। विद्यमानेंही न भासे कोणासी । ह्मणौनि अभावन नाम जयासी । आद्यंतविहीन सर्वांसी । विकारासि उदासपणें ।। १९ ।। निर्विकारत्वें शांत बोलिजे । निरंशपणें विकार नेणिजे । अपरिणामी गगन सहजें । घेपे दीजे येकलेनी ।।५२०।। जन्ममरणशून्य अजत्वें । प्रकाशमंत स्वप्रकाशत्वें तद्रूप राहाणें जैं आत्मत्वें । जाण निश्चितें श्रेष्ठासंग ।। २१ ।। ऐसा तो परब्रह्ममूर्ति । देहीं असोनि नाहीं देह स्थिति । संतोषामोदमधुरगति । आर्थिक व्युत्पत्ति यया पदाची ।। २२ ।। संतोष ह्मणिजे अतिशय तृप्ति । आणिकाची अपेक्षा न करिती । तेणें होय हर्षाची उन्नति । तेणें घमघमिति मकरंदु[२] जैसा ।। २३ ।। तोचि स्वयें ज्ञानकल्पतरु । सत्कर्मफळपल्लवीं ज्या विस्तारु । चित्तनालांतर्गत[३] लीन प्रचुर । ह्मणौनि विघ्नसंभारु न बाधी ज्या ।। २४ ।। ज्ञानफळें असे फळला । इंद्रियपत्रीं विवेकार्क प्रकाशला । वैराग्यपुष्पीं बोथवला । अति शोभला पुष्पींफळीं ।। २५ ।। तृतीय भूमिकेच्या आळां । विस्तारु पावला फुलीं फळां । हे लक्षणीं तरणिवंशभूपाळा[४] । तमालनीळा रघुनाथा ।। २६ ।। हें तृतीय भूमिकेचें लक्षण । तुजप्रति केलें विस्तारें कथन । आतां चतुर्थ भूमिकेचें निरूपण । सावधान परियेसीं ।। २७ ।। पूर्वोक्ता या तिन्ही अवस्था । जागृत्स्थानीं त्रैलोक्यनाथा । हे साधनकोटि जाण सर्वथा । नव्हे तत्वतां साध्यभूमि ।। २८ ।। परी हें अंतरज्ञानसाधन । ह्मणौनि ज्ञानभूमिका हें अभिधान । हें उपचारें ह्मणिजे जाण । साक्षात् ज्ञान हें नव्हे ।। २९ ।। आणि तिहीं भूमिकांसि भेद भासे । ह्मणौनि जागृति ह्मणिजेत असे । आतां चौथीचें लक्षण कैसें । तें येकाग्र मानसें परिसावें ।। ५३० ।।

संमतिश्लोक ।। भूमिकात्रितयाभ्यासाच्चित्तेर्थे विरतेर्वशात् । सत्वात्मनि स्थितिः शुद्धे सत्त्वापत्तिरुदाहृता ।।

भूमिकात्रयअभ्यासेंकरून । चित्त अनात्मपदार्थीं उदासीन । विमुख प्रपंचापासून । चित्त प्रसन्न स्वयें होये ।। ३१ ।। प्रसन्न जालिया स्वयें चित्त । लीन होऊनि ब्रह्मीं राहात । जें कीं सत्तामात्र निरंजन नित्य । चिद्घनभरित परब्रह्म ।। ३२ ।। विषयांचे अरुचीकरुनी । मन उदास होये विटे तेथुनी । मग तीक्ष्ण वृत्ती एकाग्र करूनी । स्वरूप निर्वाणीं घेपतसे ।। ३३ ।। तिये येकावृत्तीकरून । अकस्मात अज्ञान जाये नाशोन । मग ब्रह्मीं पूर्णस्थिति पावोन । जाय चित्तपण वृत्तित्यागें ।। ३४ ।। मनासि नाहीं वस्तुग्राहकपण । ह्मणौनि वृत्तीसहित होय लीन । मग स्वसंवेद्य अनुभव पूर्ण । आपणा आपण चोसंडतु ।। ३५ ।। सत्वशब्दें परब्रह्म जाण । तेथें मनासि होये विश्रामपण । तिये नाम

१ वाढ. २ फुलांतील रस, मध. ३ मनरूपी नाल (देठी) मध्यें राहिलेला. ४ सूर्यश्रेष्ठा.

सत्वापत्ति पूर्ण । हेचि खूण चतुर्थ भूमिकेची ॥३६॥ चतुर्थ भूमिका प्राप्त जयासी । तयाचीं अंतर्बाह्य चिन्हें कैसीं । तेंही सांगेन हृषीकेशी । ते निजमानसीं धरावीं गा ॥ ३७ ॥

संमतिश्लोक ॥ सम्यग्ज्ञानोदये चित्ते पूर्णचंद्रोदयोपमे । निर्विभागमनाद्यंतं योगिनो युक्तचेतसः ॥
समं सर्वं प्रपश्यंति चतुर्थीं भूमिकां गताः । अद्वैते स्थैर्यमायाते द्वैते च प्रशमागते ॥
पश्यंति स्वप्नवल्लोकांश्चतुर्थीं भूमिकामिताः ।

जें कीं निर्विभाग निरंजन । आद्यमध्यप्रांतविहीन । स्वयंज्योति स्वप्रकाशमान । चिद्गगन परब्रह्म ॥ ३८ ॥ निःशेष नाशलिया अज्ञान । तेणें चित्ताचें ब्रह्मीं अवस्थान । उदयो पावे अपरोक्ष ज्ञान । होय युक्तीनें तद्रूप ॥ ३९ ॥ येणेंचि हे रघुनाथा । योगी पावला चतुर्थभूमिका तत्वतां । याचे अंतरींचें चिन्ह परिस आतां । होय प्रसन्नता चित्त ज्याच ॥ ५४० ॥ असंदिग्ध ज्ञान जालें असतां । असंभावनादि गेलया समस्ता । तेणें चित्त पावे प्रसन्नता । पौर्णिमे कलंकहीन हिमांशु जेवीं ॥ ४१ ॥ द्वैततळमळ एकसरी । गेलिया आधिकलंकलहरि । तो चित्ता शुद्धांशु पूर्ण करी । शोभे चिदंबरीं प्रसन्नपणें ॥ ४२ ॥ चित्त राहे सर्वदा ब्रह्मपणें । हेंचि अंतरींचें चिन्ह जाणणें । बाह्य जग देखे चित्स्वरूप पूर्ण । समसमान सर्वत्र ॥ ४३ ॥ अद्वैतीं स्थैर्य पावलिया । द्वैत निःशेष जाय लया । तेव्हां स्वप्नाचियापरी लोकां यया । देखे योगिया चतुर्थ भूमिकेसी ॥ ४४ ॥ सत्वापत्तिभूमिका चौथी । तेथें जग देखे प्रतिभासिकस्थिती । ह्मणौनि इयेतें स्वप्न वोलती । जाण रघुपती निश्चयें ॥ ४५ ॥ हे चौथी भूमिका प्राप्तदशा । मुख्य ज्ञानभूमि हे वीरेशा । करितां पूर्वसंधानअभ्यासा । संप्रज्ञान ऐसा संकेतु इयेसी ॥ ४६ ॥ पंचमीपासूनि सातवीवरी । तिन्ही भूमिकांभीतरी । निर्विकल्पाभ्यास करी । तारतम्यावरी जीवन्मुक्ति ॥ ४७ ॥ सातवी विदेहमुक्ति जाण । पुढें नाहीं तियेहून । तिन्ही अवस्था त्या सुषुप्तिघन । विश्वभान नाहीं ह्मणौनी ॥ ४८ ॥ आतां पांचवे भूमिकेचें लक्षण । सांगों रघुनाथा दे अवधान । जेणें होये समाधान । ब्रह्म निर्वाण पाविजे गा ॥ ४९ ॥

संमतिश्लोक ॥ दशाचतुष्टयाभ्यासादसंसर्गं फलेन च । गूढसत्वचमत्कारात् प्रोक्ता संसक्तिनामिका ॥

चहूं भूमिकांचेनि अभ्यासें । सूक्ष्म ब्रह्मानंद भोगितसे । कोण्हाही फळीं संसर्ग नसे । फळलीच असे जयासी ॥ ५५० ॥ ते हे असंसक्तिनामिका । पांचवी भूमिका रघुकुळटिळका । इयेचीं लक्षणेंही आइका । ब्रह्मसुखा जे पावती ॥ ५१ ॥

संमतिश्लोक ॥ सत्तावशेष एवास्ते पंचमीं भूमिकां गतः । जगद्विकल्पो नोदेति चित्तस्यात्र विलापनात् ॥
पंचमीं भुमिकामेत्य सुषुप्तपदनामिकाम् । शांताशेषविशेषांशस्तिष्ठत्यद्वैतमात्रकः ॥
सुषुप्तघन एवास्ते पंचमीं भूमिकां गतः । गलितद्वैतनिर्भासो मुदितोंतः प्रबोधवान् ॥
अंतर्मुखतया तिष्ठन्बहिर्वृत्तिपरोपिसन् । परिशांततया नित्यं निद्रालुरिव लक्ष्यते ॥

---

१ स्पष्ट. २ 'पुरता कलंकहीन', असा पाठ. ३ मानसिक व्यथेचा कलंक. ४ गाढ झोंप. ५ निरिच्छस्थिति.

सकळांचे निरासेंकरून । केवळ सत्तामात्र उरे निरंजन । तद्रूपेंचि तें असे जाण नेणें भान प्रपंचाचें ॥ ५२ ॥ मन स्वरूपीं जालें लीन । ह्मणौनि न दिसे द्वैतस्वप्न । सुषुप्तीचेपरी स्वरूपीं संलग्न । हेचि जाण पंचमी भूमिका ॥ ५३ ॥ सकळ जें कीं विशेषांश । पशु पक्ष्यादिक मनुष्य । ब्राह्मण क्षत्रिय शूद्र वश्य । स्त्री पुरुष न स्मरे तेथ ॥ ५४ ॥ केवळ अद्वैतमात्र समसमान । तद्रूपें राहाणें तोच होऊन । ह्मणौनि न स्फुरे विशेष भान । दृश्यक्षीण स्वरूपस्थिति ॥ ५५ ॥ द्वैतमात्र न स्फुरे जेथ । केवळ अद्वैतस्थिति निश्चित । अंतरीं सुखानुभवें डुल्लत । प्रबोधयुक्त ह्मणौनियां ॥ ५६ ॥ अर्धसुषुप्तीचियेपरी । लीन असे ब्रह्मानंदसागरीं । तेव्हां पंचमी भूमिका रावणारी । जाण पुरी बाणलीसे ॥ ५७ ॥ बाह्यदृष्टी वृत्तिरूढ ऐसा दिसे । देखतां ऐकतां कर्ता भासे । परी तो अंतर्मुख असे । शांत सर्वांशें ब्रह्मदृष्टी ॥ ५८ ॥ जैसा निद्राभरें जो दाटला । बाह्य जागृत कळे लोकांला । परी इंद्रियवृत्ति असती परतल्या । त्या सुख पावल्या अंतर्मुखें ॥ ५९ ॥ बाह्य कर्मीं परि शांतता । अंतर्मुखें सुखरूपता । यालागीं निद्राळपणें सर्वथा । तैसा तत्वतां भासतु ॥ ५६० ॥ अंतरीं ब्रह्मानंदसुखभरें । बाह्य व्यवहार ऐसा स्फुरे । ते पंचमी भूमिका निर्धारें । ज्ञानद्वारें पावला ॥ ६१ ॥ इहीं लक्षणीं जो आलंकृत । तोचि तो पंचभूमिकागत । आतां षष्ठीचें लक्षण इत्थंभूत । सावचित परियेसीं ॥ ६२ ॥

संमतिश्लोक ॥ भूमिकापंचकाभ्यासात्स्वात्मारामतया दृढम् । अभ्यंतराणां बाह्यानां पदार्थानामभावनात् ।

भूमिकापंचकाचेनि अभ्यासें । स्वस्वरूपींच रमती विशेषें । दृढतर स्थिति स्वरूपींच बैसे । तेणें न स्पर्शे पदार्थजाता ॥ ६३ ॥ अंतरीं मनबुद्धिअहंकार । कामक्रोधमदमत्सर । दंभलोभादिवासनासंभार । न स्पर्शे अंतर इत्यादिकां ॥ ६४ ॥ बाह्य घटपटादिकीं स्मरण । किंबहुना विश्वपदार्थजात । तें कांहीं न स्मरे किंचित । स्वयें डुल्लत ब्रह्मानंद ॥ ६५ ॥ हे पदार्थाभाविनी षष्ठी भूमिका । जाण निश्चयें रघुकुळटिळका । पदार्थमात्राचें अभावन देखा । एका येकाहुनि अधिक ॥ ६६ ॥ आतां षष्ठी भूमिका प्राप्त जयासी तयाचें स्वरूप परियेसीं । ऐकतां चमत्कार चित्तासी । वाटे सर्वांसि रघुराया ॥ ६७ ॥

संमतिश्लोक ॥ यत्र नासन्नसद्रूपो नाहं नाप्यनहंकृतिः । केवलं क्षीणमनन आस्ते द्वैतैक्यनिर्गतः

निर्ग्रंथिः शांतसंदेहो जीवन्मुक्तो विभावनः । अनिर्वाणोपि निर्वाणश्चित्रदीप इव स्थितः ॥

अंतःशून्यो बहिःशून्यः शून्यः कुंभ इवांबरे । अंतःपूर्णो बहिःपूर्णः पूर्णःकुंभ इवार्णवे ॥

तरी येथे षष्ठी भूमिचां ठाईं । योगियाचें ऐसें चिन्ह पाहीं । तो असद्रूप नव्हे कहीं । निरंट नाहीं ह्मणो नये ॥ ६८ ॥ व्यवहार सर्व करितां दिसे । तरी तो असद्रूप ह्मणतां कैसें । आम्हींच ह्मणौनि निर्धारिजे ऐसें । तरी तो न स्पर्शे व्यवहारासी ॥ ६९ ॥ जो कीं अंतरीं सर्व निर्वासन । तो सर्वथा व्यवहारीं नसे जाण । बाह्य दिसे तया देहपण ।

---

१ ज्ञान झालेला २ पांच भूमिकांचा अभ्यास केल्यावर. ३ ज्या अवस्थेंत पदार्थ भासत नाहींत ती.

परी विदेही पूर्ण निरहंकृती ॥ ५७० ॥ जरी अहंकारवंत ह्मणिजे । तरी अहंकृती न देखिजे । अहंकारशून्य ह्मणिजे । तरी देखिजे प्रवर्त्तकु ॥ ७१ ॥ देहेंद्रियांचा प्रवर्त्तकु । सत्तामात्र तोचि येकु । अनहंकृति प्रकाशकु । नाहीं तर्कु कोण्ही तेथें ॥ ७२ ॥ तरी तो काय आहे ह्मणसी । क्षीणमन तो परियेसीं । कल्पनाशून्य सर्वांसी । अहंकारासि कैंचा ठावो ॥ ७३ ॥ अहो ज्याचें गेलें द्वैताद्वैत । होऊनि ठेला उभयातीत । द्वैत ह्मणतां सर्वां व्यतिरिक्त । केवळ उर्वरित परब्रह्म ॥ ७४ ॥ नेणें बाह्य प्रपंचवार्ता । अंतरीं वासनादि शून्यता । ह्मणौनि तो नेणे द्वैतकथा । पर्णपूर्णता परब्रह्मत्वें ॥ ७५ ॥ द्वैत असतां अद्वैत बोलावें । तऱ्ही तें त्रिकाळीं न संभवे । यालागीं अद्वैत केवीं ह्मणावें । ह्मणौनि स्वभावें दोन्ही लक्षणें ॥ ७६ ॥ चिद्रचिद्ग्रंथि तुटला । अहंकारुचि तेथें मावळला । यालागीं तो आत्माराम जाला । ह्मणौनि गळला संदेह त्याचा ॥ ७७ ॥ नाहीं कोण्ही तया भावना । ह्मणौनि न भासे विश्वकलना[1] । तेथ संदेह कोण त्याचिया मना । निर्वासना वर्त्तुतु ॥ ७८ ॥ ऐसा योगी जो जीवन्मुक्त । देहीं असोनि देहातीत । अतिनिर्वाणत्वें वर्त्तत । अहंकारातीत ह्मणौनियां ॥ ७९ ॥ देहीं अहंबुद्धि जया नाहीं । तो देहींचा नव्हे कहीं । देहीं निर्वासन सर्वदा पाहीं । ह्मणौनि विदेही मुक्तपणें ॥ ५८० ॥ जैसी चित्रींची दीपकळिका । नामरूपें भासे लोकां । परी दीपपणाच्या कार्यलेखा[2] । नये देखा कर्तृत्वें ॥ ८१ ॥ अभ्राचेनि वेगें चंद्रासि । वेगु मानिती बाळें जैसीं । तैसें कर्तृत्व जीवन्मुक्तासी । लोक पिसे मानिती ॥ ८२ ॥ बाह्य देहेंद्रियें व्यवहरतां । अंतरीं स्वस्वरूपीं असे स्थिरता । चित्रदीपाचे परी निश्चळता । कां जैसा सविता[3] जन चेष्टवी ॥ ८३ ॥ अंतरीं वासनादि प्रपंच नाहीं । बाह्य देहादिदृश्य न देखे पाहीं । ह्मणौनि अंतर्बाह्यशून्य सर्वही । नभाचे ठायीं घट जैसा ॥ ८४ ॥ नभीं घट अंतर्बाह्य रिता । तैसी योगियासि प्रपंचशून्यता । स्वस्वरूपें अंतर्बाह्य पर्णता । सर्वब्रह्मता बाणलेपणें ॥ ८५ ॥ अंतर्बाह्य वस्तु जयासी । ह्मणउनि पूर्णब्रह्म ह्मणती तयासि । समुद्रजळीं पूर्णता घटासी । जळ चौंपासीं सर्वत्र जया ॥ ८६ ॥ ऐसें अंतर्बाह्य परब्रह्म । तेथ अणुमात्र नाहीं विषम । एकाएक परापरम । निरुपम परिपूर्णत्वें ॥ ८७ ॥ ऐसी स्वरूपस्थिति गा रघुनाथा । षष्ठी भूमीसि जाण तत्त्वतां । तेचि पावलिया स्थिरता । होय तत्वतां सप्तमी तुर्या[4] ॥ ८८ ॥ जिये पावलिये भूमिकेसी । पावण नाहीं गा सर्वस्वेंसी । जे कां वरिष्ठ सर्वां भूमींसी । नाहीं जियेसि कर्त्तव्य कांहीं ॥ ८९ ॥ मुख्य सुषुप्ति ते सप्तमी भूमिका । षष्ठी पंचमी अर्धोन्मीलिका । चतुर्थी ते स्वप्न देखा । जागरलेखा इतरा तिन्ही ॥ ५९० ॥ परें प्रबोधिलियाही चिरकाळें । प्रबोध नव्हे तुर्यामेळें । अखंड स्वरूपानंदेंसि खेळे । कदा नातळे द्वैतप्रपंचा ॥ ९१ ॥

---

१ सृष्टीचें आकलन (ग्रहण) करणें. २ कार्य करण्यास. ३ सूर्य. ४ शेवटची.

संमतिश्लोक ॥ भूमिषट्कचिराभ्यासाद्भेदस्यानुपलंभतः । यत्स्वभावैकनिष्ठत्वं सा ज्ञेया तुर्यगा गतिः ॥
एषा हि जीवन्मुक्तेषु तुर्यावस्थेह विद्यते । विदेहमुक्तिविषयस्तुर्यातीतमतः परम् ॥

हेंचि विदेहमुक्ति पैं जाण । जे हे भवभूमीचें निर्वाण । हे वामदेवशुकादि संपूर्ण । जे अलंकरण सर्वा भूमींचें ॥९२॥ ऋषभदेवादिसनकादिक । जडभरत विदेही जनक । आह्मी सर्वही व्यासमुख्य[1] । असों सम्यक् सप्तमीसी ॥ ९३ ॥ यया सप्तही भूमिका तुजप्रति । सांगितल्या श्रीरघुपती । हेंचि जाण पां सहजस्थिति । जे कविआदि[2] वर्त्तती जिये माजी ॥ ९४ ॥ स्वाभाविक निष्ठा जे रघुपती । तेचि तुर्या सातवी निश्चिती । जेथें भेद न स्फुरे सर्वार्थी । स्वस्वरूपास्थिति अखंड ॥ ९५ ॥ ह्मणोनि चतुर्थ पांचवी माझारी । भासक जाल्या जगल्लहरि । तो ब्रह्मत्वेंचि कर्मे करी । द्वैतपरी असेचिना ॥ ९६ ॥ ऐसा जऱ्ही कर्मे करी । कां निर्विकल्पें राहे अंतरीं । परी स्वरूपस्थिति क्षणहीभरी । न मोडोनि दुसरी नव्हे भावना ॥९७॥ कर्म केलें न केलें दोन्ही । बाधकें नव्हती तयालागुनी । तो सकळ जाला स्वयें निर्वाणीं । प्रकाशी दोन्ही बाध्यबाधक ॥ ९८ तो देहसंगें लिंग न पवे । कर्मे करुनि फळें नाभिभवे[3] । न करितां प्रत्यवायो न संभवे । कोण्या न फावे असंगपणें ॥ ९९ ॥ नाहीं तुह्मी ऐसें बोलिलेती । देहीं असोनि न ये देहसंगती । तऱ्ही देह असतां जीवन्मुक्ति । विदेहमुक्ति तंव नाहीं ॥ ६०० ॥ विदेहमुक्ती श्रेष्ठ बोलती । तैसीच जाली जीवन्मुक्ती । तेव्हां विदेहमुक्तीची प्राप्ति । करावी अंतीं जीवन्मुक्तें ॥ १ ॥ जऱ्ही ऐसें असे सर्वथा । तऱ्ही देहसंगें कैसी विदेहता । तेथ वसिष्ठ ह्मणती गा रघुनाथा । भ्रांति चित्ता नको आणूं ॥ २ ॥ दृढ जीवन्मुक्ती जालिया । तेचि विदेहमुक्ती गा रघुराया । नाहीं प्रयोजन साधावया । अपूर्ण तया काय असे ॥ ३ ॥ जैं कां अपरोक्ष साक्षात्कार । जाला तेव्हांचि तो निर्विकार । देहादिदृश सर्व संभार । विरोनि निराकार ब्रह्मचि जाला ॥ ४ ॥ देह नाशल्या त्या आधिक येईल । कां देह असलिया ब्रह्मता जाईल । काय तया न्युनता येईल । किंवा बाधील[4] कर्माकर्म त्यासी ॥ ५ ॥ ह्मणोनि देह असतां नसतां । तो तंव ब्रह्मरूपची तत्वतां । तेंचि तें रघुनाथा । श्लोकार्थतां[5] परियेसीं ॥ ६ ॥

अद्यैव मरणं वास्तु कल्पांतनिचयेन वा । तज्ज्ञः कलंकं नाप्नोति हेम पंकगतं यथा ॥ ११ ॥

तयाच्या देहासि मरण । आतांचि हो न लगतां क्षण । ना सहस्र कल्पांतीं हो निधन । कां स्थिर पण कोटिकल्प ॥ ७ ॥ जऱ्ही कोटिकल्पांतीं देह पडला । अथवा आतांचि क्षणार्धे गेला । तऱ्ही हानि लाभु नाहीं जाला । असे संचला ब्रह्मत्वेंचि ॥ ८ ॥ चिरकाळ राहिल्या पाप जडेल । किंवा कर्तेपण आंगा येईल । किंवा शीघ्र

---

१ व्यास ज्यांत मुख्य असे. २ कवि, हरि, अंतरिक्ष, प्रबुद्ध, पिप्पलायन, आविहोत्र, द्रुमिल, चमस आणि करभाजन हे. ३ पराभव पावत नाहीं. ४ हरकत. ५ 'श्लोकार्थें' असा पाठ.

मरणें जाईल । काय होईल न्यूनाधिक ॥ ९ ॥ देह पडला अथवा राहिला । शीघ्र कां कल्पांतीं वेचला । तऱ्ही कर्म न बाधी तयाला । कर्तृत्वाला नातळे ॥ ६१० ॥ तो प्रपंचीं असो देहसंगें । नातरी कर्मेंही करो अनेगें । तऱ्ही तो न मैळे कोण्हे प्रयोगें । साक्षित्व आंगें भोगितु ॥ ११ ॥ जैसें पंकगत शुद्ध सुवर्ण । न मैळे पालटे वर्ण । अथवा कसादिकीं नव्हे न्यून । शुद्धपण सर्वथा त्यासी ॥ १२ ॥ ना तरी पद्मपत्रें जळंगत । जळीं असोनि सर्वदा अलिप्त । कां गगन जैसें असंगत । नाहीं खातेजंत धूमादिकीं ॥ १३ ॥ तैसा देह राहो अथवा जावो । परी देहातीता कोण संदेहो । तो स्वरूपप्रतीतीचा रावो । नाहीं अनुभवो देहांतीं ॥ १४ ॥ तत्शब्दें ब्रह्मपूर्ण । तें जाणे तो तज्ज्ञ जाण । तो देहसंगें कलंक संपूर्ण । नपवे क्षण येकही ॥ १५ ॥ घटीं आवरिलें घटाकाश । तें घटधर्मा नातळे सावकाश । घटीं उदक भरल्या वोल्हांश । न पवे निःशेष सर्वथा ॥ १६ ॥ घटीं शुद्ध गंगोदक भरिलें । तेणें नभ पवित्र नाहीं जालें । मद्य घातल्या विटाळलें । नाहीं बुजालें तंदुळीं ॥ १७ ॥ घृत घातल्या नाहीं सोज्वळलें । दुग्धें नाहीं पुष्ट जालें । अग्नि घातल्या नाहीं जळालें । चंदनें नाहीं निवालें तेंही ॥ १८ ॥ तैसे देहीं सत्कर्म घडो । अथवा प्रपंचसंग वाढो । तीर्थी कां चांडालगृहीं पडो । अथवा बुडो मणिकर्णिकेशी ॥ १९ ॥

तनुं त्यजतु वा काश्यां श्वपचस्य गृहेऽथवा । ज्ञानसंप्राप्तिसमये मुक्तोसौ विगताशयः ॥ १२ ॥

तो देहातीत स्वप्रकाश । अद्वयानंद पूर्ण परेश । सर्व साक्षीनिर्विशेष । तया दोष देहत्वें कैंचें ॥ ६२० ॥ देहातीत साक्षीपणें । असतां बाधा कोण गुणें । देह पडतां विधिअविधीनें । काय कारण तीर्थीं अतीर्थीं ॥ २१ ॥ तो तनु त्यजो काशियेसी । अथवा चांडालगृहवासी । परी तो सर्वदा मुक्त परियेसीं । नाहीं तयासि आन भावो ॥ २२ ॥ आतां अथवा कल्पांतीं । पडो अथवा करू स्थिति । जऱ्ही राहिला सत्संगतीं । नसतां संगति हानि काय ॥ २३ ॥ शवासि स्रक्चंदनादिसोहळा । लेववितां अळंकार मेळा । अथवा चंदनकाष्ठीं जाळिला । कां काष्ठीं दाहिला तरी काये ॥ २४ ॥ तैसें देह संबंध आत्मयासी । कोण्ही पदार्थ शुभाशुभासी । नव्हती जाण जीवन्मुक्तासी । देहाभिमानियासी होतील ॥ २५ ॥ जेव्हां जाली ज्ञानप्राप्ति । तेव्हांचि मुक्त तो सर्वार्थी । जयाचे वासनेची शांति । होऊनि स्थिति अखंड ॥ २६ ॥ तयाचें मनाचि गा नाशलें । तें मनपणा न ये कांहीं केलें । तयाचे आशापाश तुटले । अंतर्बाह्य जालें जैसा ॥ २७ तयासि मन असोनि तो अमन । श्रवणेंचि तो अश्रवण । नेत्र असोनि अनयन चरणविहीन चरणेंसी ॥ २८ ॥ सर्व असोनियां बाधलें । तें असतांचि नाहीं जालें ।

---

१ अनेक. २ चिखलांतील ३ कमळाचें पान ४ पाण्यातील. ५ घाणेरडें होत. ६ ओलावा. ७ महाराच्या घरांत. ८ प्रेतास. ९ माळा, चंदन वगैरे उपभोग. १० मन नसलेला.

करूनि अकर्त्तेपण आलें । नाहीं मळलें साक्षित्व ॥ २९ ॥ यालागीं तेव्हांचि तो मुक्त । त्यासि स्थळास्थळ नलगे शोधित । कैकट अथवा पुण्यक्षेत्र । सदोदीत ब्रह्म तया ॥६३०॥ जो कीं सर्वत्रचि आपण जाला । पूर्णत्व आपणचि संचला । तया उत्तम मध्यम भाग उरला । कनिष्ठ कोणा काळा सांग पां ॥ ३१ ॥ देश काळ सर्वही आपण । तीर्थ अतीर्थ क्षेत्र जाण । देह विदेह परिपूर्ण । सर्वही सर्वातीतपण स्वयेंचि ॥ ३२ ॥ तया काळ अकाळ नाहीं । सर्वही तो आपणचि पाहीं । गति अगति भ्रांति सर्वही । तो पूर्ण पाहीं पूर्णत्वें ॥ ३३ ॥ घट फुटलिया घटाकाश । मार्गीचि गेलिया मिळे आकाश । कीं अमार्गींचि पडलें वोस । काळें लाभे आकाश अकाळें नाहीं ॥ ३४ ॥ पुण्यकाळीं तीर्थी घट भंगला ॥ तरीच महदाकाशीं मिळाला । येऱ्हवीं कोणा स्थळासी तो गेला । कीं मध्येंचि राहिला चुकूनियां ॥ ३५ ॥ घट न भंगतां गगन । आन रूप जालें आपण । घटभंगींचि आकाश जाण । येऱ्हवीं काय आन होये ॥ ३६ ॥ यालागीं तो पूर्वींच ब्रह्म आहे । देहांतीं तो काय आन होये । देहविदेहें तेंचि पाहे । आन काय होईल ॥ ३७ ॥ देह असतांचि ब्रह्म जाला । मग देहसंबंध काय तयाला । मग देह असतां नसतां संचला । ब्रह्मत्वें जाला ब्रह्मचि तो ॥३८॥ जाला हें शब्दें बोलावें । परी जालेपण तया न संभवे । तो ब्रह्मचि आहे स्वभावें । जाला ह्मणणें उपचारें ॥ ३९ ॥ ब्रह्मैव सन् ब्रह्माप्येति । विमुक्तः सन् विमुच्यतेति । ऐसें बोलतसे श्रुति । नाहीं व्यक्ति भेदाची ॥ ६४० ॥ ब्रह्म असोनि ब्रह्म होये । मुक्त होतसाता मुक्तचि स्वयें । ऐसें स्वयें श्रुति बोलताहे । उपचार पाहें बोलाचा ॥ ४१ ॥ ब्रह्म जैसें तैसें असे । जालें नाहीं हें सर्वथा नसे । कोण्ही विचार तेथें न भासे । क्रियाफळ ऐसें नाहीं तया ॥ ४२ ॥ चतुर्विध तें क्रियाफळ । येक उत्पत्ति आप्ति केवळ । विकार्य संस्कार्य सकळ । नव्हे फळ सर्वही ॥ ४३ ॥ ह्मणोनि ब्रह्मत्व सिद्धचि आहे । आलें गेलें उपचार हे । देह असतां नसतां नोहे । आपण आहे वस्तूविण ॥ ४४ ॥ अज्ञानें व्यवधान केलें । ह्मणौनि जालें पण या आलें । येऱ्हवीं तेंचि तें संचलें । नाहीं केलें आन कांहीं ॥ ४५ ॥ देह तीर्थी पडल्या कोण स्वार्थ । अतीर्थी पडल्या कोण अनर्थ । हें अज्ञानें कल्पिल्या अर्थानर्थ । देहबुद्ध्यर्थ लागलें ॥ ४६ ॥ देहातीता हें सर्वथा नाहीं । जो देहीं विदेहीं सर्वदा ब्रह्मचि पाही । यया आन नाहीं । संशय कांहीं न धरावा ॥ ४७ ॥ देहाचिया ठाई नैराश्यता । देहाचा साक्षी तो तत्वतां । नैराश्यालंकरणें अलंकृतता । चिन्ह तत्वतां आइक त्याचें ॥ ४८ ॥

गोष्पदं पृथिवी मेरुः स्थाणुराशाः समुद्गिका । तृणं त्रिभुवनं राम नैराश्यालंकृताकृतेः ॥ २३ ॥

जो नैराश्यें अलंकृत अलंकारला । तो गोष्पद मानी ब्रह्मांडाला । आपणाहूनि थोर कोण्हाला । पदार्थाला न देखे ॥ ४९ ॥ ह्मणोनि पृथ्वी मानी गोष्पद । मेरु तो स्तंभ-

---

१ हें एका देशाचें नांव आहे. या देशांत गेलेला मनुष्य अपवित्र होतो असें शास्त्र आहे. २ बरवर. ३ ब्रह्मच असून ब्रह्म होतो. ४ मुक्त असूनच मुक्त होतो. ५ गाईच्या पावला एवढें.

तुल्य विशद । आकाश तें बोटीं निबद्ध । जग समृद्ध तृण जैसें ॥ ६५० ॥ किंबहुना प्रपंचजात । शून्यरूप जालें बाधित । असोनि मिथ्यात्व निश्चित । तें सत्य कदाचित भासेना ॥ ५१ ॥ रज्जुसर्पाची सत्यता । तंवाचि दृढ माने चित्ता । रज्जुज्ञानें यथार्थता । कदाकल्पांता न येचि ॥ ५२ ॥ जंववरी रज्जुच अज्ञान । तंववरी भुंजगाचि सत्यपण यथार्थ । जालिया रज्जुज्ञान । सर्पपण न सांपडे ॥ ५३ ॥ तैसा जगद्भ्रम तंवचिवरी । जंव ब्रह्मज्ञान मति न वरी । साक्षात्कारें जगल्लहरि । क्षणाभीतरीं मालवे ॥ ५४ ॥ ह्मणौनि जग तें तृणतुल्य । तें नाहींचपणें प्रतिभासे केवळ । ह्मणौनि आशेची तळमळ । गेली सकळ नैराश्यें ॥ ५५ ॥ आणीकही लक्षणें गा रघुपती । जीवन्मुक्तांचीं तुजप्रति । सांगैन तें येकाग्रचित्तीं । विश्वमूर्ती परिसावें ॥ ५६ ॥

अंतःशून्यो बहिःशून्यः शुन्यकुंभ इवांबरे । अंतःपूर्णो बहिःपूर्णः पूर्णकुंभ इवार्णवे ॥ १४ ॥

तऱ्ही अंतरीं जो वासनाशून्य । बाह्य नाहीं प्रपंचभान । ऐसें अंतर्बाह्य प्रपंचहीन । तेंचि शून्यपण परियेसीं ॥ ५७ ॥ सूक्ष्मप्रपंच त्या अंतर्वासना । स्थूळ तो नानाव्यक्ति जाणा । दोन्ही शून्य तो रघुनंदना । शून्यपणा येतसे ॥ ५८ ॥ जैसा आकाशीं कुंभ भरितां । अंतर्बाह्य पावे शून्यता । तैसा प्रपंचविहीन तत्वतां । पावे शून्यता जीवन्मुक्त ॥ ५९ ॥ प्रपंच पावल्या शून्यता । मग सर्वत्र बाणे ब्रह्मता । अंतर्बाह्य पावे पूर्णता । प्रपंच सर्वथा ब्रह्मरूप ॥ ६६० ॥ जें जें भासे प्रपंचभान । तें तें अधिष्ठानत्वें पूर्ण चैतन्य । सर्वत्र न दिसे दुजेपण । आनंदघन सबाह्य ॥ ६१ ॥ अंतरीं ब्रह्मानंदें पूर्णता । बाह्यपदार्थ कोण्ही नाहीं रिता । ब्रह्मांडकोटि पावे ब्रह्मता । ब्रह्मेंचि तत्वतां सबाह्य पूर्ण ॥ ६२ ॥ नाहीं दुजें ब्रह्मेंविण । तेथें जगत्व उरलें नाहीं जाण । तया स्वस्वरूपाचि निर्माण । दुजेपण तेथें कैचें ॥ ६३ ॥ तया अंतर्बाह्य काय बोलावें । जेथ दुसरें कांहींच न संभवे । हे गुरुखुण जाणावें स्वभावें । अनुभवें आपुलेनी ॥ ६४ ॥ शास्त्राचार्यउपदेशें । अनुभविलें ब्रह्मचि ऐसें । तेथ काय भासेल अनारिसें । गेलें पिसें दुजेपणाचें ॥ ६५ ॥ ह्मणोनि रितें न भासे तयासी । परिपूर्ण ब्रह्म आनंदरासी । उदकीं बुडालिया कुंभासी । जळ चौंपासीं अंतर्बाह्य ॥ ६६ ॥ घटाचें भान लोपलें[1] । अंतर्बाह्य जळचि जालें । जळेंवांचूनि दुजें नाहीं निराळें । शब्दखोळें नयेचि ॥ ६७ ॥ जळीं परिपूर्ण घट असे । पदार्थीच हा दृष्टांत वसे । हा एकदेशी परी सर्वांशें । सर्वथा मानसें नेघावें ॥ ६८ ॥ पर्णपण तें आपणासहित । परिपूर्ण ब्रह्म सदोदीत । नाहीं वेगळेपणें उरत । जळीं तळपत जळ जैसें ॥ ६९ ॥ आणीकही जीवन्मुक्ताचें । लक्षण सांगेन निर्वाणीचें । परिपर्णपण वासनेचें । गेलें वेचें कल्पनेसहित ॥ ६७० ॥

ईप्सितानीप्सिते न स्तो यस्यांतर्वस्तुदृष्टिषु । सुप्त इव यश्चरति स मुक्त इति कथ्यते ॥ २५ ॥

---

१ 'लोटलें' असा पाठ.

जयाचि बाह्यदृष्टि मोडोनी । अंतर्दृष्टि भरली कोंदोनी । तया ईप्सितें अनीप्सितें दोन्ही । जनीं वनीं उरणें नाहीं ॥ ७१ ॥ वस्तूहूनि दुजें असावें । तऱ्ही तेणें ईप्सितावें । वस्तूविण दुजें भासावें । तऱ्ही ईप्सितावें देहबुद्धी ॥ ७२ ॥ जो आत्मलाभापरतें । न मनी दुजया लाभातें । तैसेंचि दुःखबुद्धी दुजयातें । त्यजावें तेथें कैसें उरे ॥ ७३ ॥ जें निरतिशयसुखसंपन्न । जाला ह्मणौनि नाहीं आन । इतरां सुखांसि अतिशय संपूर्ण । नाहीं जया जाण रघुनाथा ॥ ७४ ॥ तया आत्मलाभसुखापुढें । दुःख कैंचें जेणें चरफडे । ब्रह्मसुखाबाहेरी न पडे । दुःख कोणीकडे जाणेल तो ॥ ७५ ॥ आत्मलाभापुढें लाभ नाहीं । ह्मणौनि तया ईप्सित उरेल कायी । निरंतर सुखीं निमग्न पाहीं । डंडळील कायी तेथूनि तो ॥ ७६ ॥ दुःखभोगें दुःख मानावें । तरीच देहबुद्ध्या न ईप्सावें । त्यजावया उपाय करावे । हेंही स्वभावें नाहीं तया ॥ ७७ ॥ यदर्थी तया किरीटीमति । गीतेसि बोलिला स्वयें श्रीपति । तेचि ऐकावी संमति । एकाग्र श्रोतीं मनोभावें ॥ ७८ ॥

गीताश्लोक ॥ यं लब्ध्वा चापरं लाभं मन्यते नाधिकं ततः । यस्मिन्स्थितो न दुःखेन गुरुणापि विचाल्यते ॥

आत्मसुख पावल्यानंतर । आणीक लाभ न मनी त्याहूनि थोर । जे सुखीं राहिल्या स्थिर । नेणे उत्तर दुःख जालें ॥ ७९ ॥ यालागीं सुखाहूनि थोर असावें । तरीच लाभत्व तेणें इच्छावें । दुःख अलाभत्वें त्यजावें । अनिष्ट स्वयें ह्मणोनियां ॥ ६८० ॥ ह्मणौनि ईप्सितानीप्सिता दोन्हीं । गेलीं सुखस्वरूप वस्तु पावोनी । सुखाचेपणीं अकरणीं । अनीहपणीं सर्वदा ॥ ८१ ॥ इच्छा अनिच्छा जेथें नाहीं । तेथें क्रिया उरेल कैंची कायी । अकर्ता सर्वदा विदेही । मुक्त पाहीं तो येकु ॥ ८२ ॥ आणीकही तयाचें लक्षण । आयिक रघुनाथा सांगेन । जेणें बुझवी संपूर्ण । जीवन्मुक्तपण तें कैसें ॥ ८३ ॥

निर्ग्रंथिः शांतसंदेहो जीवन्मुक्तः स्वभावतः । अनिर्वाणोपि निर्वाणश्चित्रदीप इव स्थितः ॥ १६ ॥

तरी तो स्वभावेंचि मुक्त जाण । तुटला चिदचिद्ग्रंथि संपूर्ण । तो मुक्त जाण ह्मणोन । येऱ्हवीं बंधन ग्रंथि असतां ॥ ८४ ॥ चिदचिद्ग्रंथि तो कैसा । तुज सांगों गा परेशा । तें चित्त देऊनि परियेसा । ग्रंथि कैसा जडाजडें ॥ ८५ ॥ तरी चित्शब्दें ज्ञान अजड । अचित्शब्दें अप्रकाश जड । उभयतां ग्रंथि प्रचंड । पडे सदृढ रघुनाथा ॥ ८६ ॥ ग्रंथाची समूळ मांडणी । आयिकें गा कोदंडपाणी । हा ग्रंथि जाणतां निर्वाणीं । संसार स्वप्नीं भासेना ॥ ८७ ॥ तऱ्ही ब्रह्मस्थानीं महदाकाश । तेंचि बिंबलिया अभ्राकाश । अभ्र तें विद्या सावकाश । तेथें बिंबईश तो ईश्वर ॥ ८८ ॥ देहस्थानीं घट येक असे । घटामाजी जें आकाश वसे । त्यातें कूटस्थ बोलिजे ऐसें । हे माडणी विश्वेशें जाणावी ॥ ८९ ॥ घटामाजी असे जळ । जळस्थानीं बुद्धि निर्मळ । जळीं

१ 'अंतरीं दृष्टि' असा पाठ. २ 'निप्सितें' असा पाठ. ३ ज्यापेक्षा दुसरें उत्तम सुख नाहीं असा सुखानें युक्त. ४ डळमळेल. ५ अर्जुनाला. ६ आशा आणि निराशा

अभ्राकाश सकळ । बिंबे तत्काळ उपाधिवशें ॥ ६९० ॥ बुद्धीजळीं जें ब्रह्मनभ बिंबलें । तेंचि जीवशब्दें चैतन्य बोलिलें । तें अजड चित् ज्ञानबळें । असे निराळें प्रकाशपणें ॥ ९१ ॥ बुद्धिजलस्थानीं अचित । तेथें प्रतिबिंबलें स्वयें चित्त । तें परस्परा-ध्यासें येकत्व । पावोनि निश्चित अहंसंगा ॥ ९२ ॥ देहाच्या संगें अहंस्थिति । हेचि विलासली चिदचिद्ग्रंथि । प्रमाता ये बुद्धिबुंथीं । सर्व ग्रंथीं हेंचि सिद्ध ॥ ९३ ॥ तिये बुद्धीतें मीचि ह्मणे । सर्वथा भिन्न ऐसें नेणे । मन बुद्धि तंव येकपणें । असती अभिन्न निरूपिलीं ॥ ९४ ॥ मनोबुद्धीचा व्यापार । मस्तकीं घेतसे विकार । सुखःदुखादिप्रकार मानी साकार आपणिया ॥ ९५ ॥ मनाचें जडत्व आपणासी । आत्मप्रकाश आला मानसी । एवं ग्रंथि जडाअजडासी । पडली अध्यासीं येरयेरां ॥ ९६ ॥ ऐसें जंववरी अभिन्न दिसे । कोटिकल्पवरी अभ्यास असे । तंववरी देहसंसृति न नासे । हें रघुवंशें जाणिजे ॥ ९७ ॥ बुद्धि आपणाहूनि भिन्न । ऐसें जेव्हां जाणे साक्षी होऊन । बुद्धीचा प्रकाशकु आपण । हेंचि ज्ञान सज्ञानत्वें ॥ ९८ ॥ येणें ज्ञानेंचि तत्काळ । चिदचिद्ग्रंथि तुटे सकळ । तेव्हांचि संसृतिश्रृंखळ । न लगतां वेळ तुटोनि जाये ॥ ९९ ॥ इये संसृतीचें कारण । हा चिदचिद्ग्रंथीं गा जाण । तो तुटला जयाचा पूर्ण । तोचि संपूर्ण जीवन्मुक्त ॥ ७०० ॥ जेव्हां सद्गुरूनें दृश्यावेगळा । केला अचित्ता जडा सकळा । तेव्हां साक्षी होऊनि निराळा । असे चित्कळा बोधरूपें ॥ १ ॥ क्षणा कां संदेह उपजला । बुद्ध्यादिकांहूनि कैसा वेगळा । स्वप्रकाश ज्ञानकळा । साक्षी सकळां मी कैसा ॥ २ ॥ अथवा सद्गुरुवचन प्रमाण । होय कीं नव्हे संदेह पूर्ण । उपजे तें ज्ञानचि अज्ञान । तम दारुण होऊन ठाके ॥ ३ ॥ तैसा नव्हे तो रघुराया । गेला संशय समूळ माया । सकळ संदेह नाहींच तया । गेल्या लया असंभावना ॥ ४ ॥ याळागीं तो शांतसंदेह होये । तो स्वभावेंचि मुक्त आहे । बाह्य मानुषत्व दिसताहे । परी तो नव्हे देहवंतु ॥ ५ ॥ अनिर्वाण ऐसा दिसे । परी तो निर्वाण ब्रह्मचि असे । स्थिति जयाची न भ्रंशें । स्थिर असे चित्रदीप जैसा ॥ ६ ॥ चित्रीं दीप दीपपणें असे । परी तो निचेष्ट सर्वांशें । तैसा देहीं निरहंकार वसे । स्थिति विलासे अढळपणें ॥ ७ ॥ निचेष्ट असावया कारण । तें रघुनाथा तुज सांगेन । स्वरूपास्थिति अढळपण । न भंगे जाण जेणेंकरीं ॥ ८ ॥

अहंकारमयीं त्यक्त्वा वासनां लीलयैव यः । तिष्ठति ध्येयसंत्यागी जीवन्मुक्तः स उच्यते ॥ १७ ॥

अहंकारमयी जे वासना । ते लीलेकरूनि टाकिली जाणा । ह्मणौनि ईहा नुरेचि कर्त्तपणा । अनीहपणें शोभतु ॥ ९ ॥ अगा अहंकारसंवलित । सर्व संकल्प असती उठत । अहंकारेंविण कदाचित । वासना ईषत नुठे कदा ॥ ७१० ॥ स्वरूपाश्रयें असे अज्ञान ।

---

१ ब्रह्म हेंच आकाश. २ बुद्धीच्या आच्छादनांत. ३ भ्रमामुळें. ४ देह पुनःपुनः उत्पन्न होणें ५ संसाराची बेडी. ६ इच्छा.

अज्ञानें अहंदेह उठे जाण । तोही द्विविध अहंकार पूर्ण । विशेष सामान्य येणें रूपें ॥ ११ ॥ जें सामान्यत्वें सर्व देहीं । मी ऐसा अहंकार पाही । मग तोचि द्दढावे विशेषेंही । सांगों तेही खूण तुज ॥ १२ ॥ मी ब्राह्मण क्षत्रिय वैश्यादिक । तैसेंचि आश्रम सकाळिक । येणें रूपें अहंकारु येक । बोलिजे सम्यक विशेष तो ॥ १३ ॥ हा सर्वत्र सर्व देहीं । अनुस्यूत सामान्यत्वें नाहीं । विशेषें ब्राह्मणाचां ठाईं । ब्रह्मत्वें पाहीं वर्त्ततु ॥ १४ ॥ क्षत्रियत्वें क्षत्रियासी । वैश्यत्वें वैश्यासी । शूद्रत्वें जाण शूद्रासी । पितापुत्रासि पितापुत्रत्वें ॥ १५ ॥ तसेचि आश्रमादिकांसी । विशेष अहंकारु परियेसीं । सामान्य तो सर्वांसी । अहंपणेंसि भासतु ॥ १६ ॥ तेथूनि मग सकंल्प विकल्प । संकल्प तो जाण एवंरूप । अशोभन जें विषयस्वरूप । तेंचि शोभनरूप स्वयें करी ॥ १७ ॥ एवं शोभनाध्यास तो संकल्प । तेणें होआवा हा ऐसा आरोप । ते वासना जाण कामरूप । भवपादप[2] वाढे जया ॥ १८ ॥ ते अहंकाराच्या पोटीं । संस्काररूपें राहे शेवटीं । वासनेसारिखेंचि घेऊनि उठी । नेटीपाटीं आनकाळीं ॥ १९ ॥ दिवसा जे जे कामसंकल्प करी । तेचि राहाती अहंकाराभीतरीं । तेचि देखे स्वप्नामाझारीं । तेचि पुरी वासना जाण ॥ ७२० ॥ मग प्रबोधतिये वेळे । अहंकारु स्वयें प्रबळे । तेथें पुर्वकृतसंस्कारमेळें । वासनाफळें उत्फुल्ल होती ॥ २१ ॥ यालागीं अहंकारसंवलित । वासनाजाळ प्रबळ होत । त्या अहंकारासमवेत । वासना त्यक्त जेणें केल्या ॥ २२ ॥ परी अपरोक्ष साक्षात्कारें । न लगती टाकणें बलात्कारें । ते लीलेचिकरूनि वासनाभ्रम विरे । केवळ उरे ज्ञेय जया ॥ २३ ॥ तें ज्ञेय आपण ध्याता । ध्यान जे वृत्ति तदाकारता । हे त्रिपुटी स्फुरे तत्वतां । संप्रज्ञातसमाधि ॥ २४ ॥ जेथें हेचि त्रिपुटी स्फुरे । ते सबीजसमाधि निर्धारें । सविकल्प संप्रज्ञात नामांतरें । नामें मनोहरें इयेसीचि ॥ २५ ॥ ध्याता ध्येय आणि ध्यान । नुरोनि होय समसमान । आपणा आपण परिपूर्ण । निर्बीज जाण समाधि तो ॥ २६ ॥ अथवा ध्येयत्यागाचें लक्षण । तेंही हें एवंविध जाण । ध्येय तें अहंकारें पूर्ण । अखंड चिंतन तें चित्ति ॥ २७ ॥ देहविशिष्ट आत्मजाति वर्ण[4] । ऐसें अहंकारें स्फुरण । ममकारें पुत्रवित्तादिस्त्रीगण । त्यांचें भरणपोषण योजणें जें ॥ २८ ॥ किंबहुना देहबुद्ध्यादिचिंतन । तें तें ध्येय गा संज्ञा जाण । तत्त्यागें त्याचें वर्त्तन । तोचि पर्ण जीवन्मुक्त ॥ २९ ॥ सर्व संग बाधी ह्मणउनी । विक्षेपक त्यजी तयालागुनी । यालागीं निमग्न ब्रह्मपणीं । राहे कोंदोनि ब्रह्मानंदें ॥ ७३० ऐसा निर्बीजसमाधीस्थ । तोचि जाण जीवन्मुक्त । सर्वसंगविनिर्मुक्त । स्वरूपस्थ सर्वदा जो ॥ ३१ ॥ संगुत्यागुही तुजप्रति । सांगों आयिक श्लोकसंमति । सादरें परिसें अयोध्यापती । अर्थप्राप्ति जेणें होये ॥ ३२ ॥ जन्हीं

१ उत्तम पदार्थाची इच्छा. २ संसाररूपी वृक्ष. ३ पूर्वी केलेल्या कर्मांना जोरदार परिणाम ज्यामुळें ४ ' देहविशिष्ट आत्मजातिवर्ण ' असा पाठ.

श्रवणीं नाहीं सादरता । तन्ही तो जाणावा सबाह्य रिता । तो काये पावे श्रवणार्था । दंभी तत्वतां लौकिकीं ॥ ३३ ॥ जया श्रवणीं असे सादरता । तोचि मननीं निजध्यास पुरता । ययाची सांगों व्यवस्था । रघुनाथा परियेसीं ॥ ३४ ॥

संमतिश्रुति ॥ षड्विधैर्लिंगैः सर्वेषां वेदान्तवाक्यानामअद्वैते ब्रह्मणि तात्पर्यावधारणं श्रवणम्

सर्वही वेदांतवाक्यें । तें परब्रह्माचि बोधिती आत्मैक्यें । तेंचि तात्पर्यवाक्य निकें । अवधारीं येकें मानसेंकरीं ॥ ३५ ॥ जें जें बोले वेदशास्त्र वचन । त्याचें कोठें होतें अवसान । ययाचा तात्पर्यार्थ संपूर्ण । घेइजे तें ज्ञान श्रवण होये ॥ ३६ ॥ वेदवाक्याचा तात्पर्यार्थ । त्यामाजी रिघोनि घेईजे अर्थ । त्याचें अवसान पावे तो अर्थ इत्थंभूत । घेइजे निश्चित तें श्रवण ॥ ३७ ॥ अंतर्यामीं पाहिजे एकाग्रता । ते विचारीं जानकीकांता । हे नसोनि कीजे काळक्षेपता । पुण्यजनकता न घडे कांहीं ॥ ३८ ॥ आणि पूर्णश्रवणाचें श्रवण । त्यासिच पुन्यजनकता पूर्ण । श्रवणा न येतां श्रवणपण । पुण्य भाजनें केवीं होये ॥ ३९ ॥ जरी सांग सिद्ध तयाचे याग । तरी तो पुण्यजनीं अभंग । त्यागुचि यागपणा आंग । न पवतां सांग पुण्यही कैंचें ॥ ७४० ॥ त्यालागीं श्रवणीं श्रवणपणें । सिद्धि जाय जरी तात्पर्यावधारेणें । तरी सकळ सिद्धि आणि पुण्यें । तयाकारणें वोळंगती ॥४१॥ यालागीं श्रवणीं सादरता । अवश्य द्यावी गा रघुनाथा । श्रवणाची समूळ कथा । तुज सर्वथा सांगितली ॥ ४२ ॥ येणें श्रवणें सिद्धि होये । अन्यथा तो काळक्षेपु आहे । यालागीं सादर होयें । हें पुनःपुनः पाहें बोलिजेत ॥ ४३ ॥ ऐसी करूनियां एकाग्रता । श्लोकार्थ आइक रघुनाथा । जीवन्मुक्त बाह्यार्था । त्यजी तत्वतां तें कैसें ॥ ४४ ॥

दूरे मुंचति बंधुमंघमिव यः संगाद्भुजंगादिवत् त्रासं यो विदधाति वेत्ति सदृशं रोगं च भोगं च यः ।
स्त्रैणेयस्तृणवद्घृणां प्रकुरुते मित्रेष्वमित्रेष्वपि स्वांतं यस्य समं समंगलमिहामुत्रापि मर्त्योऽश्नुते ॥ १८ ॥

तरी जो कीं सकळ बंधुमात्रसमस्त । सखे सहोदर मित्र गोत । व्याही जामातादि दूरस्थ । टाकी समस्त देहत्यागें ॥ ४५ ॥ जैसी निगडशृंखळा उपेक्षुनी । दुरी टाकिजे द्वेषेंकरुनी । तैसा सुहृद्वर्गी स्नेहें तत्क्षणीं । टाकी भरंवसेनि वैराग्यबळें ॥ ४६ ॥ तैसाचि संगापासाव त्रास धरी । कोण्हाचाही संग न करी । संगें अनर्थ होती भारी । यास्तव न करी संग त्यांचा ॥ ४७ ॥ पुत्रवित्तादिगृहदारा । यांचा संग तंव नाहीं बरा । जैसें सर्पसंगें राहिजे विवरां । मृत्यु खरा न प्रार्थितां ॥ ४८ ॥ त्यांचेनि संगें अनिष्ट होये । त्याचें काय अपूर्व आहे । परी विजातीयाचेनि संगें पाहें । संसारभय कृपेस्तव ॥ ४९ ॥ भरतराजा महाराजचडामणि । सकळ पृथ्वीचे भोग भोगुनी । मग संग दिधले उपेक्षुनी । ज्ञान साधूनि राहिला ॥ ७५० ॥ परम तपस्वी महामुनि । समाधिस्थ होता निरंजनीं ।

---

१ मनानें. २ या प्रकारचा. ३ वेळ घालविणें. ४ पुण्याला पात्र. ५ सार ध्यानांत ठेविल्यानें. ६ तुरुंगांतील बेडी. ७ पुत्र, द्रव्य, घर, स्त्री वगैरे. ८ जडभरत.

व्युत्थान हातां कोण्ही येक हरिणी । तिये वनीं प्राप्त जाली ॥ ५१ ॥ भरत स्नान करितां नदीभीतरीं । तंव सिंहें हाक दिली येकसरी । गर्भिणी हरिणी भयेंकरी । पळाली भारी प्राणलिप्सयां ॥५२॥ नदि उडतां अतित्राणें । तंव गर्भपात जाला तत्क्षणें । तो नदीमाजी पडतां मह्तें तेणें । देखिला नयनें दीनरूप ॥ ५३ ॥ तें अतिसकोमल सुंदर । त्यासि प्राणांतअवस्था देखे ऋषीश्वर । मग सकृप होऊनि सत्वर । काढी आतुर तें पाडस ॥५४॥ त्यासि कोण्ही नाहीं स्तनपानदेता । अनाथ प्राण त्यागील हे चिंता । ह्मणोनि संग्रह जाला करिता । वाढविता जाला कृपेकरुनी ॥ ५५ ॥ सेवटीं त्याचेनि संगेंकरूनी । स्वयें हरिण जाला तो मुनि । त्या भयास्तव संगालागुनी । टाकूनि दुसरे जन्मीं राहिला ॥५६॥ संगें सुखदुःख होय भारी । ह्मणोनि टाकीं तें संसारीं । जडभरत ज्ञानियांमाझारीं । सर्वांउपरी शोभतु ॥ ५७ ॥ येथें स्त्रीपुत्रादिकांचा संग । तो न बाधील गा कैसा सांग । येका येकी संगें बाध अभंग । पावले अव्यंग कलंक कैसा ॥ ५८ ॥ हरिण पतंग आणि मीन । गज भ्रमर हे पांचहीजण । ते पांचा विषयीं पांचांसि जाण । क्षया संपूर्ण पावविलें ॥ ५९ ॥ श्रवणाचा विषय जाण । तेणें शब्दें मृत्यु पावला हरिण । पारधी नादें वेधून । धरी जाण हरिण पाशीं ॥ ७६० ॥ रूप तो नेत्रांचा विषयो रघुपती । तेणें पतंग वेधे दीपें दीप्ती । तो मरण पावे सर्वार्थीं । तैसीच गति भृंगाची ॥ ६१ ॥ रसनेचा विषयो रसु जाण । तेणें रसें मीनासि मरण । त्वचेचा विषय स्पर्शन । कुंजरा मरण तेणेंचि होये ॥ ६२ ॥ घ्राणविषयो गंधु होये । गंधवेधें भृंगासि मृत्यु पाहें । ऐसा येकयेका विषयें नाशु आहे । संगें होताहे सर्वथा ॥ ६३ ॥ ऐसी येकैक संगें बंधप्राप्ति । आणि त्यांहीं लागे दुःखसंतति । ते येकेक सांगों किती तूजप्रति । पुत्रवित्तपरी ते आइक सांगों ॥ ६४ ॥ पुत्रदुःख आरंभापासुनी । तें येकेक ऐकें कोदंडपाणी । पुत्रसंगालागुनी । सतत अनुदिनीं दुःखकोटि ॥ ६५ ॥ पुत्र नसतां अति चरफडी । पठणादिकीं घाली उडी । पुत्रेंविण देहाची कोरडि । व्रततपकोडी पुत्रालागीं ॥ ६६ ॥ पुत्रेंविण धिक् जीवित । संसारचि शून्य मानित । तयालागीं देहादिधन वेचित । दुःख अपारिमित पुत्रार्जनीं ॥ ६७ ॥ पुत्र नसतां दुःखकोटि । अर्जनीं शरीरयना होये आटी । गर्भी राहिल्या करी कष्टी । सदा पोटीं जडजाड्या ॥ ६८ ॥ स्त्रियेचेनि दुःख स्वयें दुखवे । ह्मणे पुत्र नसे हेंचि बरवें । होतां दुःख न साहावे । दुःखें अभिभवे जन्मतां ॥ ६९ ॥ गर्भपात जाल्या अतिदुःख । जन्मतां व्यथेनि कैसें सुख । मातेचे अतिशय दुःख । होये आणीक तें परियेसां ॥ ७७० ॥ पांचवे दिवशीं मृत्यु पावे । वांचलिया रोगें अभिभवे । पंगू वेडें बधिर जाल्या न पवे । सुख नव्हे पितरांसी ॥ ७१ ॥ अपवित्र प्रजा दुःख-

१ भयामुळें. २ प्राण वांचविण्याच्या इच्छेनें. ३ हत्तीला. ४ अनेक दुःखें, ५ 'पठणादिकीं' असा पाठ. ६ अनेक व्रतें आणि तपें.

कोटि । मूर्ख दैन्य इत्यादि गोष्टी । अनपत्य जाल्या दुःख पोटीं । नाहीं भेटी सुखेंसी ॥ ७२ ॥ ज्ञाता जाला तरी दरिद्री होये । समर्थ जाल्या रागु खाये । रोगें भोग भोग न लाहे । तेणें पाहे दुःख पितरां ॥ ७३ ॥ सर्वहीं गुणीं जाला संपन्न । तऱ्हा तो शीघ्राचि पावे मरण । पितरां दुःख अतिदारूण । सुख कोण अनुभवी ॥ ७४ ॥ ऐसें असतां नसतां आदिअंतीं । दुःखावांचूनि नाहीं प्राप्ति । तैसें स्त्री आदिसर्वसंपत्ति । द्रव्याची गति तैसाच ॥ ७५ ॥ द्रव्य नसतां दुःखकोटि । अर्जनीं होय प्राणाची आटी । रक्षणीं आटाटी मोटी । व्ययकाळीं भेटी मरणेंसी ॥ ७६ ॥ अपहार द्रव्य राज्यादिक । करितां अतिशय दुःख । अणुमात्रही नाहीं सुख । दुःखाहूनि दुःख उत्तरोत्तर ॥ ७७ ॥ ऐसिया पदार्थांची संगति । करितां त्रासु मानी मति । जैसा भुजंगदर्शनें त्रासु चित्तीं । तैसा न इच्छिती संगु त्यांचा ॥ ७८ ॥ व्याघ्रादिकादि भयंकर । जेणें होय मरणा निर्धार । त्यांचा त्रासु महाथोर । अतिशय नर मानी जैसा ॥ ७९ ॥ तैसा संगापासाव त्रास मानी । संग न करी पदार्थीं कोण्ही । आसिल्या संग प्रारब्धेंकरुनी । त्रासु मनीं सर्वदा वाहे ॥ ७८० ॥ तैसेंचि स्रक्चंदनवनितादिकें । भोग आहेति जितके । प्राप्त जालिया न मनी निकें । परी न तोखे रोगदृष्टी ॥ ८१ ॥ विषयभोगाकारणें । प्राप्त जाल्याही मनें । संतोषणें नाहीं तेणें । सर्वथा धरणे न बैसे ॥ ८२ ॥ प्राप्त जाल्याही विषयभोग । ते काकविष्टेसमान मानी चांग । मनें मानी जैसे रोग । अतिअभंग वैराग्यबळ ॥ ८३ ॥ तेथें प्रयत्नाची क असे गोठी । भोगाकडे नेदी भिठी । आत्मलाभें नित्य संतुष्टि । आनंदकोटि ब्रह्मानंदें ॥ ८४ ॥ जो तृप्त असे अमृतपानें । तया कांजी कासया सेवणें । नित्य मिष्टान्न सेवी तेणें । तूसें सेवनें घडेना कीं ॥ ८५ ॥ जो इंद्रपद देतां अव्हरी । तो काय भिक्षा मागेल घरोघरीं । तैसा जो निमग्न परमानंदसागरीं । तो काय करी विषयोपभोग ॥ ८६ ॥ जो षण्मासांचा निराहारी । तो सर्वथा विषभक्षण न करी । तेणें पक्वान्नतृप्ति न स्वीकारी । अपूर्वपरी काय येथें ॥ ८७ ॥ तैसा मुमुक्षु साधनदशे । विषयभोग त्यजी मानसें । तेथें ज्ञानी न सेवी हें काय ऐसें । कोणा मिसें बोलवे पां ॥ ८८ ॥ हें काय अपूर्व येथ मानावें । तो स्त्रियादिभोग मनोभावें । न इच्छी हें काय प्रशंसावें । मानी स्वभावें शुभ्रकुष्ट जैसा ॥ ८९ ॥ तैसाचि मित्रा अमित्रांसि सरिसा । सूर्य भलत्या सन्मुख जैसा । सर्व भूतीं सम सरिसा । गगनचीरेशा जेवीं असे ॥ ७९० ॥ गाईची तृषा हरावी । व्याघ्रादि विष होऊनि मारावीं । हे जैसी नाहीं ठेवाठेवी । सर्वां सम भावीं जळ जसीं ॥ ९१ ॥ तैसाचि मित्रा अमित्रां कृपाळु । निष्ठुरत्वें पडों नेदी आडेंळू । चंद्र जैसा कां सुशीतळु । अतिनिर्मळु श्रोत्रियां चोरां ॥ ९२ ॥ त्याचें स्वतां

१ मुलें नसलेला. २ खर्च करतांना. ३ संतोषयुक्त. ४ कोंडा. ५ महामांद्याचा. ६ आश्चर्याची गोष्ट. ७ पादरें कोड. ८ स्पर्श

नें अंतःकरण । तें तत्वज्ञानें जालें समान । तेणें आपण भिन्नाभिन्न । समसमान आत्मत्वें ॥ ९३ ॥ तया नाहीं आपपर । कैंचा बंधु शत्रु मित्र । समसमान सर्वत्र । सर्व पवित्र ब्रह्म जया ॥ ९४ ॥ ऐसें जयाचें वर्त्तन । सर्वत्र सम अंतःकरण । तो देहीं विदेहीं ब्रह्म पूर्ण । स्वानंदघन अनुभवी ॥ ९५ ॥ जें मंगळ होतसाता सम । चिद्घनैकरस परम । तें देहीं विदेहीं निरुपम । भोग परम भोक्तृत्वेंविण ॥ ९६ ॥ सकळ मंगळांचें मंगळ मंगळशब्दें सुखकल्लोळ । जेथूनि मंगळांचें प्राबल्य । तें अंतिमगळ परब्रह्म ॥ ९७ ॥ ऐसा सर्व संगत्याग करुनी । सर्वदा ब्रह्मनंदाचिये धणी । उपेक्षा न पडे काळीं कोणी । आतिनिर्वाणीं परमानंद ॥९८ ॥ मृत्युशब्दें मरणधर्मक जें शरीर । हें जे पावले विवेकी नर । त्या मर्त्य शरीरेंचि महाथोर । सुखसंभार पावले ॥ ९९ ॥ अथवा देहभिमानी जो जीव । तो ब्रह्मचि जाला स्वयमेव । ब्रह्मसुखाचा अनुभव । भोगी जीव-भाग टाकुनी ॥ ८०० ॥ इहलोकीं आणि परलोकीं । परमानंद सुखें अतिसुखी । ऐसा तोचि बोलिजे सुखी । येर तो दुःखी संसारें ॥ १ ॥ इहलोकीं जीवन्मुक्त सुख अनुभवित सर्वदा देख । इच्छेनें पावला जऱ्ही परलोक । तेथेंही देख परमानंदु ॥ २ ॥ कदाचित् जीवन्मुक्तासी । परलोकइच्छा मानसीं । होसरेलिया नेमेंसी । आन सुखासि असेना ॥ ३ ॥ यावत् इच्छा तों ते लोकीं असें । तेथेही ब्रह्मसुखेंचि वसे । त्याचें ज्ञान कदापि न भ्रंशे । भोगांतीं कैसें आन होये ॥ ४ ॥ अथवा इहामुत्राचा अर्थ । देहाविदेह जाणें यथार्थ । विदेहपण काये कृतार्थ । देहीं अनर्थ काये होती ॥ ५ ॥ ह्मणोनि देहींविदेहीं पूर्ण । देशींविदेशीं नव्हे आन । काळींअकाळीं समसमान । चैतन्यघन चिद्रूप ॥ ६ ॥ तया देशकाळवयावस्था । सर्व इत्यादि आत्मसत्ता । नाहीं आपणाहुनि परता । नसे रिता कोणें भावें ॥ ७ ॥ आणीकही जीवन्मुक्ताचें लक्षण । रघुवर्या तुज सांगेन । ऐकें यकाग्र करुनियां मन समाधान जेणें होये ॥ ८ ॥

हृदयात्संपरित्यज्य सर्वं दृश्यं प्रशांतधीः । व्योमसौम्यतऽरोऽव्यग्रः सयुक्तः परमेश्वरः ॥ १९ ॥

आयिका रघुवंशदीपका । दशरथकुळटिळका । परापरव्यापका । प्रकाशका रघु-वर्या ॥ ९ ॥ हृदयशब्दें जाण पां मन । त्या मनापासुनि टाकिजे दृश्यभान । दृश्य तें स्थूळसूक्ष्मात्मक जाण । तें सांगेन चिन्ह रघुवर्या ॥ ८१० ॥ सूक्ष्म तें अंतर्वासना-संपत्ति । मनबुद्ध्यादि जें जें जाणती । तें जाण सूक्ष्म दृश्य गा रघुपती । नाहीं व्युत्पत्ति यया बोला ॥ ११ ॥ याची येकि खूण सांगेन । तेणें बुझसी हें संपूर्ण । इंद्रियें जाणती तें स्थुळ दृश्य जाण । नव्हे आन सर्वथा ॥ १२ ॥ ब्रह्मावेगळें जें जें भासे । तें तें इंद्रयेंकरूनि प्रकाशे । सर्वांचें अंतर्बाह्य असे । तेणें प्रकाश दिसे इंद्रियां ॥ १३ ॥ कार्य कारणातें प्रकाशी । जड अजडातें काय विकाशी । ज्याचेनि प्रकाशें

१ आस्वास. २ देश, काळ, वय वगैरे स्थिति. ३ आपल्याच सामर्थ्यानें.

प्रकाश ज्यासी । तें तयासि जाणती काये ॥ १४ इंद्रिये तितुकीं बहिर्मुखें । तीं प्रपंचाचीं प्रकाशकें । तयांसी परब्रह्म ठाउकें । कोण्हे वेखें पडेल ॥ १५ ॥ तयालागीं मनाबुद्धीचें जाणणें । तें तें सूक्ष्म दृश्य मी ह्मणें । चक्षुरादिकीं प्रकाशणें । स्थूळ ह्मणणें तयासी ॥ १६ ॥ ऐसें जें स्थूळसूक्ष्मात्मक । तें मनापासूनि गेलें सकाळिक । वस्तुता मनाचा ठाईंच भासे देख । मनोळयें निःशेष हारपे ॥ १७ ॥ हें मनोलयप्रकरणीं । मनचि कारण दृश्यदर्पणीं । ऐसे ठायीं ठेविलें निर्वाणीं । तैसाचि मनीं जाणावें गा॥ १८ ॥ नाहो दृश्य तितुकें मिथ्याभूत । तें मनोमयचि मना भासत । हें मानलें परी संशय येथ । सावचित्त परियेसीं ॥ १९ ॥ जऱ्ही मिथ्याचि प्रपंच समस्त । तऱ्ही सत्यासत्य त्यामाजी स्फुरत । घटादि सत्यत्वें मानित । रज्जुसर्प घेत असत्यत्वें ॥ ८२० ॥ स्थूळदेहें तैसें सत्य मानिति । सूक्ष्मजंतु क्षणिक ह्मणती । ऐसी सर्वत्र जनाची प्रतीति । कोणा अर्थीं तें सांगिजे ॥ २१ ॥ असत्य तरी एकचि रूप असावा । सत्य जरी सत्यचि रूप भासावा । असल्या माजींही ह्मणावा । कोण ठेवा असत्यसत्या ॥ २२ ॥ तऱ्ही ऐकें याचें उत्तर । जें सांगिजैल मनोहर । जेणें संदेहसागराचा पार । अतिदुस्वर पाविजे ॥ २३ ॥ तऱ्ही पूर्वापूर्वसंस्कारें । सत्यासत्य इयासि स्फुरे । येऱ्हवीं सत्यासत्य [१]नव्हे खरें । तरी पूर्वाभ्यासपरें मनीं वसती ॥ २४ ॥ स्थूळ पडतां स्थूळचि नाशे । परी लिंगशरीर तैसेंचि असे । लिंगदेहीं सूक्ष्मांशें । संस्कारवशें राहाती ॥ २५ ॥ संस्कारसहित लिंगशरीर । अज्ञानामाजीं वसे सविस्तर । तेणें संस्कारेंचि समग्र । जन्मांतर[२]थोर भासत ॥ २६ ॥ यालागीं जन्मसंस्कारें । दृढतर सत्यासत्य प्रपंच स्फुरे । तेंही आइका दृष्टांतद्वारें । कळे निर्धारें निश्चित ॥ २७ ॥ जागृतीचे सकळ संस्कार । ते स्वप्नीं प्रगटती सविस्तर । जैं पावे जागृतीचें घर । तंव संसार जैसा तैसा ॥ २८ ॥ स्वप्नीं जग सत्यत्वें देखे । तेथेंही रज्वादि रज्जुअहित्वें पाहे निकें । परी सत्य भोगें अति हरिखे । जरी न देखे तरी विषादु ॥ २९ ॥ भयंकपादिकें दुःख पावे । रज्जुज्ञान जालिया हरिखावे । सत्यासत्यही स्वभावें । दोन्ही अनुभवें जाणतु ॥ ८३० ॥ तेथेंही शास्त्रार्थ एके । अग्निसाधन मानी निकें । त्यामाजी साधनें अनित्य येकें । एकानेकें मानितु ॥ ३१ ॥ ज्ञानसाधनें साच मानी । बोधशास्त्रें एके कानीं । जे तप्तशिळाआरोहणि । व्यर्थ मानी तयांतें ॥ ३२ ॥ ऐसे सत्यासत्यप्रकार । स्वप्नीं भासती सविस्तर । प्रबोधलिया दोन्ही असार । येकही निर्धार न राहे तेथें ॥ ३३ ॥ सत्य तेंही असत्य जालें । असत्यही तद्रूप ठेलें । नाहीं सत्यासत्य संचलें । दोन्ही टवाळें असतें होतीं ॥ ३४ ॥ तैसें स्वबोध पावे तंववरी । सत्यासत्य प्रपंचभरोवरी । ज्ञान जालिया सरोभरी । सरे वारी दोहींची ॥ ३५ ॥ जग-

१ रूपानें, येथें 'नेपें' असा पाठ आहे. २ ठायीं ठेविलें=व्यवस्थेनें ठवलेलें ३ पूर्वीचा अभ्यास घडला असल्यामुळें. ४ दोरीवर सर्पाचा भास. ५ तापलेल्या दगडावर चढणें. ६ तुच्छ.

भानें स्वप्नस्थ होता । तंत्र सत्यासत्य मानी तत्वतां । स्वरूपबोधें दोन्ही मिथ्या । स्वयें सत्यता निजबोधें ॥ ३६ ॥ ययालागीं स्वात्मबोधेंकरुनी । दृश्य हारपलें हृदयापासुनी । प्रशांतबुद्धी ययालागुनी । दृश्यअभावनीं शुद्धत्वें ॥ ३७ ॥ निःशेष दृश्याभास जाये । ते शांतबुद्धी ह्मणिजेत आहे । ह्मणौनि ते सौम्यतर पाहे । कूटस्थ होये गगन जैसें ॥ ३८ ॥ अतिशयें सौम्य तो सौम्यतर । प्रपंचोपशमें जाला स्थिर । तोचि तो जाणावा अतिधीर । सर्वदा अव्यग्र ह्मणौनियां ॥ ३९ ॥ प्रपंचसंगें होय व्यग्रता । जे कीं मनासि प्रपंचोन्मुखता । तोचि प्रपंच मिथ्यत्वें बाणतां । चळु चित्ता कदा नव्हे ॥ १४० ॥ स्वरूपाआड प्रपंच वसे । आणि तदाकार जेव्हां मन असे । तोचि व्यग्रता सावकाशें । दृश्य नाशे अव्यग्रपणें ॥ ४१ ॥ दृश्यकंचुक बाधलियावरी । स्वस्वरूपीं विश्रांति होये पुरी । तेचि अव्यग्रता सर्वांपरी । मुक्त तदनुसारी तोचि तो ॥ ४२ ॥ तोचि तो परम ईश्वर । तो नियंता परमेश्वर । बुद्ध्यादिनियंता निर्विकार । परापर परब्रह्म ॥ ४३ ॥ ऐसा जो जीवन्मुक्त ईश्वर । तो करू कां कर्मव्यवहार । अथवा राहो सर्वदा स्थिर । समाधिपार पावो सुखें ॥ ४४ ॥ तऱ्ही तो असंग उदास । नाहीं संग ना कर्मपाश । तेंचि निरूपण सावकाश । परियेसीं परेश रघुनाथा ॥ ४५ ॥

समाधिमथ कर्माणि मा करोतु करोतु वा । हृदयेनास्तसर्वाशो मुक्त एवोत्तमाशये ॥ १९ ॥

ऐसा जो कीं जीवन्मुक्त । तो कर्में करूनि समस्त । विधिनिषेध पाळित । अथवा गाळित दोहींतेंही ॥ ४६ ॥ तो याज्ञादिकें कर्में करू । अथवा सर्व कर्में अव्हेरू । परी बाध न पवे अंतरु । बोधला थोरु ह्मणौनियां ॥ ४७ अथवा निरंतर असो समाधिस्थ । सविकल्प निर्विकल्प तटस्थ । अथवा असा उत्थितचित्त । कादाचित न करो कांहीं ॥ ४८ ॥ हृदयापासाव सर्वही आशा । ज्याच्या गेल्या गा वीरेशा । उत्तमांतःकरण तो परेशा । दृश्यलेशा न स्पर्शे । जो ॥ ४९ ॥ तोचि तो मुक्त आन नाहीं । तेथ संदेह धरिसी काई । तेंचि एकवारें ठेविलें ठायीं । दुसरी नाहीं मातु तेथें ॥ ८५० ॥ आतां बद्धमुक्ताचें मुख्य कारण । तेंही तुजप्रति सांगेन । जेणें तूं बुझसी संपूर्ण । थोर चिन्ह जीवन्मुक्ताचें ॥ ५१ ॥ हाचि जीवन्मुक्तिलक्षणाचा । उपसंहार बोलिजे साचा । हेंही लक्षणीं जीवन्मुक्ताचा । भीतरु साचा वोळखें गा ॥ ५२ ॥

अनात्मन्यात्मधीर्बंधस्तन्नाशो मोक्ष उच्यते । बंधमोक्षौ न विद्येते नित्यमुक्तस्य चात्मनः ॥ २१ ॥

तऱ्ही तेंचि आईकें रघुनाथा । चिन्हीं सांगों जीवन्मुक्ता । बद्धाचीही बद्धता । ऐक तत्वतां ऐसी असे ॥ ५३ ॥ अनात्मा जो अहंकार देहादि । तेथें जयाची आत्मबुद्धी । पुत्रमित्रकलत्राविधि । जाण सुबुद्धी आत्मा जया ॥ ५४ ॥ विचारितां तऱ्ही पुत्रादिक । तो आत्मा नव्हे कीं सकळिक । ययाचा सांगेन तुज विवेक । तेंचि सम्यक परियेसीं

१ अतिसौम्य. २ प्रपंच नाश पावल्यामुळें ३ मनांत. ४ पुत्र, मित्र, स्त्री वगैरे.

॥ ५५ ॥ पुत्रचि आत्मा ह्मणे ऐसें । तरी पुत्र मेलिया स्वयें असे । ऐसा अनुभव जाण मानसें । आत्मा कैसा विचारीं पां ॥ ५६ ॥ पुत्र आत्मा जऱ्ही होये । तऱ्ही तो नाशलिया आत्मा न राहे । पुत्रनाशें स्वनाश होताहे । अथवा पाहे विपरीत ॥ ५७ ॥ आत्मनस्तु कामाये (इं) सर्वंप्रियंभवति । ऐसें बोलेबृहदारण्यश्रुति । पुत्रादि आत्मसुखाचिये प्राप्ती । ह्मणौनि पुत्रार्थी सर्वही जन ॥ ५८ ॥ पुत्राच्या प्रिया आत्मत्वें नाहीं । पुत्रचि आत्मत्वें प्रियत्वें पाही । पुत्रा लेवविले अलंकार सर्वही । सुख काई पुत्रासि होये ॥ ५९ ॥ तेणें आपणाचि संतोषिजे । अथवा पुत्रासि चुबंन दीजे । तेणेंकरूनि तो रडे निबुंजे । तें सुख उपजे कवणासी ॥ ८६० ॥ यालागीं सर्वही आपणाचिकारणें । स्त्री पुत्रादिनानाउपकरणें । ह्मणौनि तयां आत्मा न ह्मणणें । अहंकार खुणे जाण तोचि ॥ ६१ ॥ देह आणि अहंकार । हे तंव आपणा दृश्य गोचर । आपण साक्षी निर्विकार । ह्मणोनि अंतर सर्वांचा ॥ ६२ ॥ तया आपणानेणुनी । देहादिकांसि आत्मा मानी । तोचि बंध गा कोदंडपाणी । दृढपणीं दृढावला ॥ ६३ ॥ अगा संसारदुःख कारण । ह्या बंधावांचूनि नाहीं आन । आणि बंध तो देहात्मबुद्धि जाण । निरयपतन हेंचि बोलिलें ॥ ६४ ॥ देहात्म बुद्धीवांचुनी । बंध नाहीं गा त्रिभुवनीं । जन्ममरण जयाचेनी । अनुदिनीं होतसे ॥ ६५ ॥

संमतिवाक्य ॥ ॥ देहात्मबुद्धिजं पापं न तद्गोवधकोटिभिः ॥

इत्यादि वचनें बहुत असती । देहात्मबुद्धि घातक सर्वार्थी । कोटि गोवध फल्गु होती । नाहीं समाप्ति कल्पांतीहीं ॥ ६६ ॥ आत्महत्ये सममार । ऐकत्र केलिया गोहत्येचे डोंगर । तरी ते देहात्मबुद्धि याहूनि थोर । नये सममार तुलनेसी ॥ ६७ ॥ अगा बद्धतो इतुकाचि असे । देहीं आत्मबुद्धि कळासे । तेणें जन्ममृत्यचे वळसे । अति आवेशें फिरताती ॥ ६८ ॥ आणि मोक्षाचेंही लक्षण । तेंही इतुकेंचि असे जाण । जैसें देहीं बाणलें आत्मपण । अलोट पूर्ण लोटेना जें ॥ ६९ ॥ तैसेंचि आत्मयाचा ठाईं । आत्मबुद्धि दृढावे पाहीं । अज्ञानपण जैसें देहीं । अनपायी दृढ होत ॥ ८७० तेंचि आत्मयाचा ठायीं । आत्मबुद्धि बाणे जैं अनपायी । तेचि मुक्ति गा जाण निश्चयीं । अवधि पाहीं मोक्षाचा ॥ ७१ ॥ ऐसी तृप्तिदीपाचे ठायीं सर्वोपरी । संमति ऐकें श्रावणारी । जेणें संदेहाची अवसरी । फिटोनि पुरी स्थिति बाणे ॥ ७२ ॥

संमतिश्लोक ॥ देहात्मज्ञानवज्ज्ञानं देहात्मज्ञानबाधकम् । आत्मन्येव भवेद्यस्य स नेच्छन्नपि मुच्यते ।

देहाचां ठाईं आत्मा ऐसें ज्ञान । तैसेंचि आत्मत्वीं अविच्छिन्न । देहात्मबुद्धीतें निरसून । उपजे ज्ञान अढळ जया ॥ ७३ ॥ तो जऱ्ही इच्छिना रघुनाथा । तऱ्ही तो

१ 'स्वतःच्या इच्छा पूर्ण करण्यासाठींच जगांतील सर्व पदार्थ प्रिय वाटतात', असें बृहदारण्य उपनिषदांत सांगितलें आहे. २ नरकांत पडणें. ३ तुच्छ. ४ पंचदशी नामक ग्रंथांतील तृप्तिदीप नांवाच्या प्रकरणांत.

मुक्ताचि जाण सर्वथा । मुक्ति बैसे त्याच्या माथां । दवडितां नयेजाये ॥ ७४ ॥ परबोधाची अवधि । हेचि जाण गा सद्बुद्धि । ययाहूनि न चढे सर्वादि । आत्मबुद्धि आत्मत्वीं ॥ ७५ ॥ इतुकेनि होतसे कृतकृत्यता । पुढें साधन नलगे तत्वतां । येथें संमति सांगेन आतां । अवधि तत्वतां बोधादिकांची ॥ ७६ ॥

संमतिश्लोक ॥ ब्रह्मलोकतृणीकारो वैराग्यस्यावधिर्मतः । देहात्मवत्परात्मत्वदार्ढ्ये बोधः समाप्यते ।
सुतिवद्विस्मृतिः सीमा भवेदुपरमस्य हि । दिशाऽनया विनिश्चेयं तारतम्यमवांतरम् ॥

इहलोकींचे भोग नावडती । स्वर्ग भोगही तुच्छ करिती । किंबहुना ब्रह्मलोकसंपत्ति । स्वयें मानिती तृणासमान ॥ ७७ ॥ ब्रह्मलोक मनोमानसें । तेथील भोगही तृणाऐसें । मानलें जया सर्वांशें । वैराग्य वसे यया नाम ॥ ७८ ॥ वैराग्याचा अवधि जाण । ब्रह्मलोक मानी तृष्णासमान । तेथें इतरा भोगांची गणना कोण । वैराग्य पूर्ण यया नाम ॥७९॥ आतां बोधाचा अवधि इतुका । तो जाण रघुकुळटिळका । तऱ्ही देहीं आत्मबुद्धि जैसी लेखा । तैसी लेखा आत्मपणीं ॥ ८८० ॥ आत्मयाचें ठायीं आत्मपण । देहात्मबुद्धी ऐसें जाण । बाणे तें बोधाचें अवसान । दृढतर पूर्ण रघुवीरा ॥ ८१ ॥ तैसीच उपरमाची सीमा । तेही ऐकें पुरुषोत्तमा । विश्वस्मृति जाय उपरमा । जैसी श्रीरामा सुषुप्ति होये ॥ ८२ ॥ प्रपंचाचें विस्मरण । सुषुप्तीसि निःशेष होये जाण । तैसें जालिया प्रपंचोपशमन । तो अवधि पूर्ण उपरमाचा ॥ ८३ ॥ याहूनि नाहीं अधिक कांहीं । हाचि ययाचा अवधि पाहीं । यालागीं जो ऐसा बोध कांहीं । मुक्ति पाहीं यया नाम ॥ ८४ ॥

संमतिश्लोक ॥ वैराग्यबोधोपरमाः सहायास्ते परस्परम् । प्रायेण सह वर्त्तंते वियुज्यंते क्वचित् क्वचित् ।
त्रयोऽप्यत्यंतपक्वाश्चेन्महतस्तपसः फलम् । दुरितेन क्वचित्किंचित्कदाचित्प्रतिबध्यते ।
तत्वबोधः प्रधानं स्यात्साक्षान्मोक्षप्रदत्वतः । बोधोपकारिणावेतो वैराग्योपरमावुभौ ।
वैराग्योपरती पूर्णे बोधस्तु प्रतिबद्धयते । यस्य तस्य न मोक्षोऽस्ति पुण्यलोकस्तपोबलात् ।
पूर्णे बोधे तदन्यौ द्वौ प्रतिबद्धौ यदा तदा । मोक्षो विनिश्चितः किं तु दृष्टदुःखं न नश्यति ।

आणि वैराग्य बोध उपरम । हे परस्परें सखे परम । यांचें सख्य अति उत्तम । तिघे सम यकत्र वसती ॥ ८५ ॥ येक तेथें वसती दोघे जण । परी न राहाती येकयेकाविण । यांचें उपजावयाचें कारण । स्वरूपफळ पूर्ण सांगें तुज ॥ ८६ ॥ वैराग्यप्राप्तीचें कारण । मुख्य विषयीं दोषदृष्टि जाण । विषय तितुका विष दारुण । स्रक्चंदनवनितादिक ॥८७॥ ऐसी दोषदृष्टी जालियावरी । जिज्ञासा उपजे मनाभीतरी । दोषदृष्टि दृढ जालियावरी । प्रीति विषयांतरीं उपजेना ॥ ८८ ॥ विषय टाकावे हेंचि मनीं । निरंतर वर्त्ते ज्याचे अंतःकरणीं । तेचि जिज्ञासा कोदंडपाणी । स्वरूप निर्वाणीं वैराग्याचें हें ॥ ८९ ॥

---

१ जात नाहीं. २ ब्रह्मलोकांतील सुखाची साधनें. ३ झोंप. ४ प्रपंच (संसार) नाहींसा भासणें. ५ माळा, चंदन, स्त्रिया वगैरे सुखोत्पादक पदार्थ. ६ जाणण्याची इच्छा.

ययाचें फळ तेंही आयिक । मागुतें विषयीं मन नव्हे रंक । न धरी भोगाची आळुक । नलगे भूक विषयांची ॥ ८९० ॥ मागुतें विषयीं प्रेम जालें । तऱ्ही वैराग्यफल नाहीं फळलें । पूर्ण वैराग्य नाहीं जडलें । जैसें वमिलें अन्न नापेक्षी ॥ ९१ ॥ आतां बोधोत्पत्तीचें कारण । श्रवण मनन निदिध्यासन । तेणेंचि उपजे ब्रह्मज्ञान । हेतु पूर्ण बोधाचा हा ॥ ९२ ॥ ब्रह्मप्रपंचामिश्रितपणें । जाहाला तेथ विवेक करणें । सत्य घेऊनि असत्य त्यजणें । स्वरूप जाणणें बोधाचें हें ॥ ९३ ॥ बोध जालियाचें फळ हेंचि जाण । नव्हे सत्यासत्यासि ग्रंथनें । नव्हे मोह करी येकपण । हेंचि पूर्ण फळ बोधाचें ॥ ९४ ॥ यमनियमें उपरम उपजे । ह्मणौनि यमादिक हेतु जाणिजे । मनाचा निरोधु जो सहजें । स्वरूप जाणिजे उपरमाचें ॥ ९५ ॥ व्यवहारचा क्षय होणें । हेंचि त्याचें फळ जाणणें । पुनरपि व्यवहारीं न प्रवर्त्तणें । जाण खूण उपरमाची हे ॥ ९६ ॥ एवं वैराग्य बोध उपरम । यांचे हेतु स्वरूपफळ परम । निरूपिलें निरुपम । नसतेंही वर्म सांगों आतां ॥ ९७ ॥ प्रारब्धानुसार गा रघुपती । पूर्वसंस्काररूप हे उठती । या तिघांची येकत्र होये वसति । अथवा होती न्यून कोणी ॥ ९८ ॥ आतां येक असतां दोन्ही नसतीं । तऱ्ही तेणेंकरीं काय प्राप्ति । तेही निरूपिजेल व्यक्ति । सावध श्रीपती परियेसीं ॥ ९९ ॥ बोध तरी दृढतर आहे । वैराग्य उपरम जरी साह्य नव्हे । तरी मुक्ति ययासि सर्वथैव होये । मुक्तिसी पाहें कारण बोधु ॥ ९०० ॥ बोध येक नसतां गा रघुपती । वैराग्य कां उपरम जागती । तऱ्ही उत्तमलोकांची होये प्राप्ति । परी नव्हे मुक्ति सर्वथैव ॥ १ ॥ एसेही गा योगेश्वर । पूर्वीं आतां आहेति थोरथोर । जनकासि वैराग्यविचार । दृढतर नव्हता जाण ॥ २ ॥ तऱ्ही वैराग्याचेंही लक्षण । तत्काळ कीजे संन्यासग्रहण । संन्यास न घेतां मंदपण । आलें जाण विरक्तीसी ॥ ३ ॥ आणि वसिष्ठादिऋषीश्वर । करित ठेले गृहकर्माचार । ज्ञानी तरी अतिशयथोर । परी वैराग्य सपुर तैसें नव्हे ॥ ४ ॥ सर्व विषयीं उदास असती । अतिशयें नाहीं विषयासक्ति । परी संग टाकणें हें मति । नुपजे चित्तीं मंदवैराग्यें ॥ ५ ॥ आणि तुलाधारप्रमुख । ऐसे ज्ञानी आहेति अनेक । परी त्यासि मंदवैराग्य देख । संन्यास सम्यक न घेतीचि ॥ ६ ॥ परी इतुकेनि न्यून काये जालें । प्रपंचसंगें काये बांधले । ते असंगी अकर्ते ज्ञानबळें । कोणा न मैळे चित्तवृत्ति त्यांची ॥ ७ ॥ ते देहीं असोनि विदेहवंत । संग असोनि संगरहित । बोधलेचि जीवन्मुक्त । जऱ्ही करीत राज्यादिकें ॥ ८ ॥ तैसाचि ज्ञानियांमाजी उत्तम । नारददेवऋषिसर्वोत्तम । परी अल्प होतां उपरम । करी कामकलहादिकां ॥ ९ ॥ परी उपरमाचेनि अल्पपणें । काय बोधासि आणिलें उणें । ब्रह्मरूपचि सर्व वर्त्तणें । पुरें उणें काय तेथें

१ प्रेम, आवड. २ गुरफटागुरफट. ३ इंद्रलोक, ब्रह्मलोक वगैरे ठिकाणें. ४ घरांत राहून प्रपंचसंबंधी कर्मे करणें. ५ तुलाधार हें एका वाण्याचें नांव आहे. याची कथा भागवतांत सांगितली आहे.

॥ ९१० ॥ ब्रह्मरूप त्याचा व्यवहार । ब्रह्मरूप त्याचा राज्य भार । ब्रह्मरूप त्याचा कुळाचार । ब्रह्म चराचर सर्वही जया ॥ ११ ॥ एवं वस्तूवेगळें कांहीं । अणुमात्र दुजें नाहीं । तेथ बाधकता तया काई । सर्वत्र पाहीं ब्रह्म जया ॥ १२ ॥ भरतासि अतिवैराग्य होतें । तेणें सार्वभौम टाकिलें राज्यातें । परि पूर्णबोधेंविण होत रितें । हरिणदेहातें पावला तो ॥ १३ ॥ यालागीं मुख्य मुक्तीप्रति कारण । येकु पूर्ण बोधचि सर्वथा जाण । मुक्ति होये वैराग्यउपरमेंविण । ऐसें सामर्थ्य पूर्ण बोधाचें हे ॥ १४ ॥ बोध नसतां मुक्ति नव्हे । जरी वैराग्यउपरम आहे । यालागीं एकला बोधुचि होये । तरी सिद्धि जाये सर्वही ॥ १५ ॥ परी येक असतां दोन्ही असती । येकेंविण येक सर्वथा नसती । ऐसीच परस्परें यांची ख्याति । तिघे सांगाती सख्यत्वें ॥ १६ ॥ परी इतुकेंचि येथ असे । येकु दोघांचा मागु दिसे । परी निःशेष नसतां दुजें नसे । सख्य ऐसें त्रिवर्गाचें ॥ १७ ॥ जैसे सत्व रज तम त्रिगुण । प्राणिमात्रीं असती जाण । परी येकयेकाचें आधिक्य पूर्ण । दोन्ही न्यून परी असती ॥१८॥ परी येकेंविण येकु नाहीं । हे व्याप्तिच तिहीं गुणाची पाहीं । तैसें बोधादिक तिन्ही । सर्वथा नाहीं येकेंविण येकु ॥ १९ ॥ मूळीं दृढ वैराग्य नसतां । तरी बोध नुपजे गा सर्वथा । बोधेंविण उपरमता । कदाकल्पांता उपजेना ॥ ९२० ॥ म्हणोनि ऐसी व्याप्ति असे । यालागीं बोध तेथ सर्वही वसे । हा निर्धार जाणिजे विश्वासें । अनारिसें तेथ नाहीं ॥ २१ ॥ प्रसंगेंकरूनि रघुनाथा । सांगितली बोधाची कथा । यालागीं देहादिबुद्धि सर्वथा । करी घाता सर्वांच्या ॥२२॥ म्हणोनि देहात्मबुद्धि हेंचि बंधन । तियेचा नाशु तोचि मोक्ष जाण । तोचि ब्रह्मज्ञानावांचून । नव्हे क्षीण सर्वथा ॥ २३ ॥ ब्रह्मज्ञानासि उपाय कोटि । केलिया नव्हे ज्ञानेंसि भेटि । ते सद्गुरुदर्शनें उठाउठी । ज्ञानचि भेटी येतसे ॥ २४ ॥ म्हणोनि सद्गुरुकृपावळें । देहबुद्धिबंधन निःशेष नाशे । तोचि मोक्ष हें विश्वासें । रघुवंशें जाणावें ॥ २५ ॥ नित्यमुक्त जो कीं परमात्मा । जीवन्मुक्ताचा महिमा । तयासि बंधमोक्षाची सीमा । नाहीं श्रीरामा विदित त्यासी ॥ २६ ॥ तो नेणे बंधमोक्षासी । बंधमोक्ष कैंचा तयासी । तो आत्माराम स्वरूपेंसी । क्रीडे निश्चयेंसि चिद्रूपीं ॥ २७ ॥ देहबुद्धीची वार्ता नेणे । तेथें देहबुद्धि गेली हें कोण म्हणे । ते गेलिया मोक्ष म्हणणें । येरांन्हीं वासनामुळें उपाधिगतें ॥ २८ ॥ तोचि तो जाण नित्य मुक्त । बंधमोक्षातें नाहीं जाणत । परमानंदें असे डुल्लत । मीपणाची मात टाकूनियां ॥ २९ ॥ अहो पूर्वोक्तलक्षणेंकरूनी । जीवन्मुक्त जाणिजे भरंवसेनी । उपसंहारु मुक्ताचे निरूपणीं । ये लक्षणीं जाणावा ॥ ९३० ॥ मुख्य मुक्ताची सुखसंपन्नता । ते इतुकीचि गा श्रीरघुनाथा । तेचि ते येका बोलें आतां । तुज तत्वतां सांगेन ॥ ३१ ॥

---

१ 'नाश नेऊन' असा पाठ.

दृश्य नास्तीति बोधेन मनसो दृश्यमार्जनम् । संपन्नं चेत्तदोत्पन्ना परा निर्वाणनिर्वृतिः ॥ २२ ॥

दृश्य वास्तव नाहीं या बोधेंकरून । मन होये तें दृश्यविहीन । बोधाचें मुख्य कारण । सद्गुरूचरण महावाक्य ॥ ३२ ॥ तें महावाक्य गुरुमुखेंकरुनी । पदार्थ बरवे शोधूनी । दोन्ही वाक्यार्थ बोधतां भरंवसेनी । बोध निर्वाणीं दृढतर होये ॥ ३३ ॥ ऐसा बरवा बोध जालिया । निःशेष दृश्य जातसे लया । मनाचां ठाईं आपसया । दृश्यमार्जन यया शब्देंनाम ॥ ३४ ॥ अन्यथा इतर बोध ह्मणती । तेणें नव्हे दृश्यसमाप्ति । ते तंव शब्दाचीच वदंती । दृश्यउन्नति जैसी तैसी ॥ ३५ असो ऐसे येणें बोधें सर्वदा । गेली जयाची दृश्यबाधा । मनसंपन्न आरूढबोधा । परमानंदा पावला तो ॥ ३६ ॥ तेव्हां परम सुखें जे निवृति । जियेतें निर्वाण ऐसें बोलती । तेंचि तया होये प्राप्ति । मोक्षस्थिति अखंड ॥ ३७ ॥ निवृत्तिशब्दें निरतिशय सुख । जयासि अतिशयें नाहीं देख । परमकाष्ठा जें निर्वाणक । तेंचि सुख तयाचें ॥ ३८ ॥ निर्वाणनिवृतिआड । असे यया दृश्याचें कवाड । दृश्यमेळें निरुतिशय कोड । अति दुर्वाड रघुपुंगवा ॥ ३९ ॥ सर्वदा सुखचि प्राप्त असे । परी दृश्यसत्यत्वें नाहींसें दिसे । दृश्यसंवलित मंद भासे । निर्वाण असे दृश्यक्षयीं ॥ १४० ॥ सर्व सुखमात्र जें कीं रघुनाथा । तें तंव आत्मसुखचि गा तत्वतां । विषयभोगें सुखसंपन्नता । तेंचि तें तत्वतां जाणावें ॥ ४१ ॥ परी तें दृश्यविपर्यसंवलित । जालें ह्मणोनि सुख किंचित् । दृश्यनाशें अपरिमित । सुख उन्नत सुखकोटी ॥ ४२ ॥ जेथें दृश्य मात्र न स्फुरे । तेथें द्वैत तें सहजचि विरे । मग अद्वैतसुखाचि स्फुर परमानंद धुरे तोचि जाण ॥ ४३ ॥ ययातें परमानंद ह्मणिजे । ययावेगळें दुजें नेणिजे । असें तें सद्गुरुकृपा जाणिजे । येरीं नेणिजे अनुमानीं ॥ ४४ ॥ हेही निर्विकल्पसमाधि । असंप्रज्ञात निर्बीज अवधि । हेचि जाण पैं त्रिशुद्धी । नाहीं वृद्धि ययाहुनी ॥ ४५ ॥ सप्तमी भूमिका ह्मणिजे इयेसी । ज्ञानी अज्ञानी अनुभविती अहर्निशीं । निर्वाण ऐसें ह्मणिजे इयेसीं । सर्वस्वेंसी जाण वापा ॥ ४६ ॥ हाचि मोक्ष हेचि स्थिति । हेचि बोलावी ब्रह्मप्राप्ति । हे जागावी स्वरूपस्थिति । इतर गति न्यून जाण ॥ ४७ ॥ हेंचि समाधान चित्ताचें । हेंचि मुक्तलक्षण मुक्ताचें । जेथें नांवचि पुरे दृश्याचें । परमानंदाचें आरोगणें ॥ ४८ ॥ भोक्ता भोग्य भोग आपण । भोक्तृत्व नाहीं आपणेंविण । ऐसें अभिनव अवस्थान । स्थानमान जेथ नाहीं ॥ ४९ ॥ जेथें सरे शब्दाची वारी । आनंदें आनंदाची भरोवरी । न देखे दुजें मनेंकरीं । आनंदभीतरीं आनंदे ॥ १५० ॥ हे परा निवृत्ती जाण । जें कीं निरतिशय सुख निर्वाण । सच्चिदानंदैकघन । परम पावन पावना ॥ ५१ ॥ ऐसें केवळ परमानंदैकसुख । जेथें न स्फुरे द्वैतमात्र दुःख । दृश्यादृश्य सकाळिक । नाहीं

१ शब्दानें सुचविलेला अर्थ. २ वार्ता, गोष्ट. ३ तेथील. ४ दार. ५ दृश्य पदार्थांचें बनलेलें. ६ शेवटीं, अग्रभागीं. ७ 'इथी' असा पाठ. ८ 'पुरे' असा पाठ. ९ भक्षण.

देख जिये ठाई ॥ ५२ ॥ ऐसें सुखेंकरूनि देणें घेणें । सुखेंचि सुख मोचणें । हेचि मोक्षमुक्ति ह्मणणें । नाहीं नेणणें दृश्य जेथें ॥ ५३ ॥ येचि देहीं याचि डोळा । भोगिजे गा सुखाचा सोहळा । तो दुरी नाहीं दिग्मंडळा । नाहीं पाताळाखालताही ५४

न मोक्षो नभसः पृष्ठे न पाताले न भूतले । सर्वाशासंक्षये चेतःक्षयो मोक्ष इतीष्यते ॥ २३ ॥

ऐसा मोक्ष गा रघुनंदना । नाहीं स्वर्गावरुता जाणा । आणि नाहीं पातालभुवना । खालता ह्मणा नाहींच तो ॥ ५५ तो मोक्ष नाहीं गा भूतळीं । नाहीं लपविला ब्रह्मांडगोळीं । तो न भेटे जपतपधूम्रकल्लोळीं पंचाग्निमेळीं । न भेटेचि कीं ॥ ५६ ॥ त्रिभुवनीं न सांपडे पाहातां । अमित मोल्य देतां नये हाता । तोचि सद्गुरुचरण सेवितां । लाभे आइता स्वतःसिद्ध ॥ ५७ ॥ सद्गुरुचेनि वाक्यवचनें । सर्वांशाचा क्षय प्राप्त होणें । आशासंक्षयो मनें । अतित्राणें पाविजे गा ॥ ५८ ॥ आशानाशें क्षयो जो चित्तासी । तोचि बंधविच्छेद परियेसीं । बळें निग्रह कीजे मनासी । नव्हे तो भूतांसि मोक्षहेतु ॥ ५९ ॥ वायुनिरोधें मन निरोधिती । लयलक्षीं लय पाववीती । ते मूर्च्छा कां जैसी सुषुप्ति । नाहीं संपत्ति विवेकाची ॥ ९६० ॥ विवेकसंपत्तीकरूनि जें ज्ञान । महावाक्यें उठी जें संपूर्ण । तें जगद्वाळ आभास पूर्ण । मग सत्य निर्वाण स्वरूप भासे ॥ ६१ ॥ दृश्यजात मिथ्या बाणालिया । मग कैंचें मन वासना यया । वासनाक्षयेंचि गा रघुराया । मनही विलया जातसे ॥ ६२ ॥ मन नाशावयाचें कारण । येक वासनाक्षयचि जाण । वायुधारणें मूर्च्छित पूर्ण । उठिलया तरुण जैसें तैसें ॥ ६३ ॥ जंव मन निरोधिलें असे । तंव दृश्यजात कहीं न भासे । परी तें निःशेष बाधलें नसे । लीन असे चित्तामाजी ॥ ६४ ॥ चित्त सावध जालियावरी । जैसी तैसी मायाविश्वलहरि जैसीं दिवा बाळें करिती परी । निजोनि झडकरी उठती जैसीं ॥ ६५ ॥ दिवसाची रात्र जाली ह्मणती । ह्मणोनि नेत्र लावूनियां निजती । तेव्हां क्षणैक दृश्न जऱ्ही न देखती । तऱ्ही कोण स्थिति बाणली तयां ॥ ६६ ॥ इतुकेनि काय दृश्य बाधलें । कीं परमानंदसुख लाधलें । व्यर्थीचि स्वसंकल्पें नेत्र झांकिलें । सवेंचि उघडिले सूर्योदयत्वें ॥ ६७ ॥ तया अर्भकांचा खेळणीं । दिवस तैसीच होय रजनी । व्यर्थचि उठती निजोनी । काय निर्वाणीं फावलें तयां ॥ ६८ ॥ तैसें चिरकाल मननिग्रहण । कोलिया काय प्राप्त जालें ज्ञान । आणि ज्ञानेंविण वासना दहन । केलियाही पूर्ण सर्वथा नव्हे ॥ ६९ ॥ सुषुप्तीसि मनोनिग्रह होये । वासना जाळही लया जाये । इतुकेनि संसृति नाहीं पाहे । तरी निजावें काये अहोरात्र लोकीं ॥ ७९० ॥ अहोरात्रीं जैसें कां निजणें । तैसें वायुरोधें चित्तनिग्रहणें । ह्मणोनि वासनाक्षय करींवा ज्ञानें । तेणेंचि मनें क्षय पाविजे ॥ ७१ ॥ बाह्यदृष्टी हा

---

१ जप, तप किंवा धूम्रपानादिकांनीं. २ 'क्षयप्राय' असा पाठ. ३ बंध तुटणें. ४ 'निरूधिलें' असा पाठ. ५ तन्हा, खेळ. ६ रात्र. ७ 'करा ज्ञानें' असा पाठ.

जंव जंव पाहे । तंव तंव क्षीणुचि होत आहे । परी मोक्ष तो सर्वथा ज्ञाता नये । वेढा होऊनि राहे अतिदृढपणें ॥ ७२ ॥ मोक्षालागीं नानासाधनें । ज्ञातेनि सर्वथा न करणें । केलिया दुःखचि पावणें । अति शिणणें जन्मोजन्मीं ॥७३॥ याचा येकुचि उपावो असे । धरावे गुरूचे पाय अतिविश्वासें । तेणें मोक्ष स्वतःसिद्ध वसे । अति प्रयासें कोण काज ॥७४॥ मुक्तता ते इतुकीच जाण । जैसें हातिचें भेटे रत्न । हातिच्यालागीं व्यर्थ प्रयत्न । नसतां शीण जो जो कीजे ॥ ७५ ॥ आणि मोक्षाचेंही मोक्षलक्षण । तेंही एवंविध जाण । जैसें देहाचां ठाईं आत्मपण । दृढतर पूर्ण होय जैसें ॥ ७६ ॥ तैसेंचि आत्मयाचा ठाईं । आत्मत्व बाणे जरी अनपायी । तरी मोक्ष आन नाहीं । न मैळे देहीं वर्त्ततां जाण ॥७७॥ अक्षत्मत्वीं आत्मत्व दृढ बैसे । मग तेथील आनंदु कैसा असे । तो अनुभवी जाणतीं आपैसें । सुखवसें सुखरूप तें ॥ ७८ ॥ सहज आत्मसुख निरतिशय । तेथें नाहीं दुःखलेश आमर्य अनुकूळ ना द्वैय द्वितीय । सांडूनि तृतीय अनुभवावें ॥ ७९ ॥ अनूकूळ तें विषयसुख । जें दुःखभावें अतिआळक । जैसें मार्गीं जातां सुवर्णादिक । भेटल्या सुख जें कीं उपजे ॥९८०॥ तें सुख अतिनिरूपम । नाहीं कोणेंहेसि उपम । तेंचि ब्रह्मसुख जाण परम । अतिसुगम सद्गुरुकृपा ॥ ८१ ॥ देहात्मज्ञान नाशतांचि क्षणीं । सुखाचि न माय सुखपणीं । आत्मसुखासि हेचि व्यवधानी । जाण निर्वाणीं देह बुद्धि हे ॥ ८२ ॥ ते नाशे ते क्षणींच सुख असे । आणि तया बंध कांहीं नसे । मुखें सुखाचि उल्हासे । मोक्ष वसे ऐसाचि जाण ॥ ८३ ॥ हा मोक्ष तरी देशांतरीं नाहीं । स्वर्गपाताळादि शोधितांही । तो तंव अनुभविजे येचि देहीं । सद्गुरुकृपा पाहीं जालिया ॥ ८४ ॥ देहात्मबुद्धीच्या संगती । सर्वत्र स्फुरे दृश्यद्वैतसंपत्ति । द्वैतबुद्धीनें ब्रह्मसुखाची शांति । जाण रघुपती निर्धारें ॥ ८५ ॥ दृश्यनाशें ब्रह्मसुखचि असे । तेथ आत्मत्वीं बंध कोणहा भासे । सर्वथा सम कांहींच नसे । स्वयें उल्हासे ब्रह्मपण ॥ ८६ ॥ तेंचि आर्यिकें त्रिदशाधिपती । निरूपण कीजेल श्लोकसंगती । तें परिसतांचि एकाग्रचित्तीं । स्वरूपस्थिति बाणे जेणें ॥ ८७ ॥

अनंते चित्सदानंदे निर्विकल्पैकरूपिणि । स्थिते द्वितीयस्याभावात्को बंधः कश्च मुच्यते ॥ २४ ॥

ब्रह्म जें अनंत चित्सदानंद । निर्विकल्पैकरूप अगाध । तेथें स्थिति बाणलिया निर्बंद्ध । मग संग बद्ध कवणासी ॥८८॥ आतां एकैक पदाचें व्याख्यान । सांग तुजलागीं सांगेन । सद्गुरुचरणां करूनि नमन । अर्थानुसंधान परियेसीं ॥८९॥ देशकाळवस्तुपरिच्छेदक । कैसें तुजें सांगों सम्यक् । ब्रह्म तें सदा अपरिच्छेदक । नित्य व्यापक परिपूर्ण ॥ ९० ॥ देशें काळें वस्तुता । परिच्छेद नाहींच तत्वतां । हेचि काळत्रयीं अबाधता । नित्यानित्यता ब्रह्माची ॥ ९१ ॥ ग्राम अति थोर जऱ्ही जाला । परी अन्य देशीं नाहीं व्यापला । तो

---

१ 'मुक्तता' असा पाठ. २ रोग, शारीरिक दुःखें. ३ त्रिदश=देव, त्यांचा मुख्य. ४ मळकट. ५ स्पष्ट. ६ अमर्यादा.

देशपरिच्छेदत्वें बोलिला । परिछिन्नत्व पावला अव्यापकपणें ॥ ९२ ॥ ऐसाचि अनेकें दृष्टांतीं । देशपरिच्छेद जाणावा संतीं । जें एकदेशी असोनि देशांतीं । असे समाप्ति जयाची ॥ ९३ ॥ याचें नाम परिच्छेदन । अव्यापकासि घडे जाण । ब्रह्म तें व्यापक परिपूर्ण । अनुभव जाण सिद्धचि ॥ ९४ ॥ तैसेंचि घटपटादिपदार्थ । असती काळपरिच्छेद[1] पावत । काळांतरीं असती नाशत । ह्मणौनि पावत परिच्छेदन ॥ ९५ ॥ नश्वरपण काळपरिच्छेदता । हे तंव आहे पृथ्व्यादिभूतां । हे तंव ब्रह्मीं नाहीं तत्वतां । असे नित्यता ह्मणोनियां ॥९६॥ जें कीं शद्ध नित्य निरंतर । त्यासि नाहीं काळें व्यभिचार । सर्वही वस्तु नश्वर । नित्य निर्विकार परब्रह्म ॥ ९७ ॥ काळें व्यभिचार सर्वांसि होत । जागृतीमाजी स्वप्नसुषुप्ति नाशत । स्वप्नकाळीं दोन्ही नाहींत । दोन्ही भ्रंशत सुषुप्तीसि ॥९८॥ तैसेंचि जे जे अवस्थेचे पदार्थ । ते अवस्थांतरीं नाशु पावत । सुषुप्तिकाळीं नाहींच होत । नाशिवंत सर्वही ॥९९॥ त्या तिहीं अवस्थांचेनि नाशें । नानापदार्थ भ्रंशती तैसे । आत्मा तो अखंड येकचि असे । तो जाणतसे सर्वांशें ॥ १००० ॥ तिहीं अवस्थांचें ज्ञान । आणि जे जे अवस्थेचें जें जें भान । तें सर्व तया अनुसंधान । अविनाशी ह्मणोन एकपणा ॥ १ ॥ यालागीं तिन्ही अवस्थां । जातां येतां आत्मचि तत्वतां । यासि नाहीं काळपरिच्छेदकता । नित्य आयता अविनाशपणें ॥ २ ॥ जैसें आकाश देशें काळें अपरिच्छेद्य । परी वस्तूनें पावे परिच्छेद । वस्तु दुसरी तेणेंसि विरुद्ध । घटादि प्रसिद्ध असेचि कीं ॥ ३ ॥ पंचमहाभूतें पृथ्व्यादिकरुनी । वस्तु असती दुजेपणीं । तेणें आकाश परिच्छेदनीं । पावे निर्वाणीं परिच्छेद ॥ ४ ॥ तैसें परब्रह्म नव्हे जाण । यासि वस्तूप-रिच्छेद[2] न । ब्रह्मा वेगळें नश्वर परिच्छिन्न । दृश्य पूर्ण असत्यत्वें ॥ ५ ॥ तेणें परिच्छेद वस्तूसी । कैसा घडेल कोणे देशीं । यालागीं ब्रह्म अविनाशी । व्युत्पत्ति ऐसी अनंतपदें ॥ ६ ॥ ह्मणोनि देशकाळवस्तुविचारें । अपरिच्छेद्य अविनाश निर्धारें । अनंतपरिपूर्ण येणें प्रकारें । आणीक दुसरें चित्पद ॥ ७ ॥ चित्शब्दें ज्ञान स्वरूप । जे कीं स्वप्रकाश निष्कंप । जडाचें व्यावर्त्त अमूप । ज्ञानस्वरूप स्वप्रकाशें ॥ ८ ॥ सच्चिदानंदपदेंकरुनी । ब्रह्मस्वरूपचि बोलिजे निर्वाणीं । एक एक पद निर्वाणीं । चित्त देऊनि परिसिजे ॥ ९ ॥ सत्शब्दें सत्तारूप असे । तेथें असताची व्यावृत्ति[3] केली असे । ब्रह्म सर्वदा संतचि दिसे । सत् ऐसें बोलिजे कीं ॥ १०१० ॥ आनंदशब्दें परमानंद । जो कीं स्वानुभवैकसुखस्वाद । येणेंचि दुःखाची व्यावृत्ति विशद । करूनि बोध केवळ जो ॥ ११ ॥ नाहो एकेचि वस्तूचीं वाचकें । तीन पदें कोणे निमित्तिकें । तऱ्ही गुणगुणीभाव निके । वर्त्तती कौतुकें परब्रह्मीं ॥ १२ ॥ ब्रह्म नव्हे तें स्वयें गुणी बोलावें । त्याचें तेही गुण

---

१ 'काळच्छेद' असा पाठ. २ 'वस्तूसि परि०' असा पाठ. ३ 'लक्ष्याचे ठिकाणी प्रसक्त झालेले जो दोषादि अर्थ तो विशेषणादि सामर्थ्यानें त्यालक्ष्यीं लागू न होतां, त्याचा तेथून जो पृथग्भाव ती.'

जाणावें । सच्चिदानंद स्वभावें । गुण हे गौरवें वस्तूचे कीं ॥ १३ ॥ तऱ्ही काये गुण-गुणीभाव ऐसा । सांगिजेल एकाग्र परियेसा । घट गुणी तेथें रूपादि ठसा । तोचि गुण ऐसा निर्णयो ॥ १४ ॥ अथवा नीलोत्पल स्वयें गुणी । नीलादिगुण वसती तये स्थानीं । ह्मणोनि नीलगुणें नीलोत्पल गुणी । येही लक्षणीं वर्त्ततसे ॥ १५ ॥ तेथें गुण वेगळे तयाहुनी । गुणी तो वेगळा असे निर्वाणीं । तयांसि परस्परें भेदुचि जनीं । प्रसिद्ध नयनीं देखिजेत ॥ १६ ॥ तैसें हें परब्रह्म सर्वथा नसे । तिन्हीं पदीं ब्रह्मचि प्रकाशे । गुणगुणीभावभेदु नसे । तेंचि तें असे सर्वोत्कर्षें ॥ १७ ॥ जऱ्ही गुणगुणीभाव बोलिजे । तऱ्ही परस्परें त्यां भेदु नेणिजे । एकएका वेगळें किजे । तरी सिद्धि न पविजे ब्रह्मपणें ॥ १८ ॥ हे सर्वही मार्गें विवंचना । स्पष्ट केली असे सज्ञाना । तेंचि एथें करितां निरूपणा । पुनरुक्तपणा येतसे ॥ १९ ॥ यालागीं सत्तादिक ते गुण । ब्रह्म तें गुणी तद्विशिष्ट जाण । ऐसें तूं सर्वथा न ह्मण । अर्थ हा पूर्ण नेणोनियां ॥ १०२० ॥ याचा मुख्यार्थ ऐसाचि असे । ब्रह्म तें वाचक नव्हे सर्वांशें । हीं पदें जाणिजेत लक्ष्यांशें । तेंही सावकाशें परिसावें ॥ २१ ॥ चित्शब्दें स्वप्रकाश । ज्ञानरूप चित्तवृत्तींसि साभास । घट पट प्रकाशी सावकाश । तो वाच्यांश जाणावा ॥ २२ ॥ तें वाच्यांशत्व टाकुनी । स्वप्रकाशत्व घेइजे लक्षुनी । चित्तवृत्ति जे कीं ज्ञानपणीं । टाकिल्या निर्वाणीं स्वप्रकाश फावे ॥ २३ ॥ जैसें लौकिका आकाश । सत्यशब्देंचि वाच्यांश । त्याचे टाकिल्या नामरूपांश । सत्ता सावकाश स्वयेंचि लाभे ॥ २४ ॥ तैसा चित्तवृत्तीनें विषयानंद । त्याचें भोगणें ज्ञातृत्व विशद । भोगिजे जो सुखाचा स्वाद । करूनि बोध वाचकांचा ॥ २५ ॥ विषयानंदाची सुखप्राप्ति । विषयानंदत्वें जाली समाप्ति । परमानंदु येतसे व्यक्ती । सुख-संवित्ति परमानंदें ॥ २६ ॥ ऐसें पदत्रयाचे वाच्यांश । टाकूनियां सावकाश । फावे चित्सुखानंदें स्वप्रकाश । सद्रूपांश नित्यानंदु ॥ २७ ॥ जे कीं गुरुखुणेचे कुशल । ते पावती सच्चिदानंदकल्लोळ । दृश्यगात्रीं पदत्रयमेळ । वाच्यांशमळ टाकिलिया फावे ॥ २८ ॥ ऐसें अनंत चित्सदानंद । परब्रह्म जें कीं अगाध । जेथें सर्व कल्पनेचा बाध । तेंचि तें निर्विवाद नित्यानंदें ॥ २९ ॥ कल्पनामात्रही लेश । जेथ विरतसे निःशेष । तेंचि तें परब्रह्म एकरस । नाहीं भास दुजेपणाचा ॥ १०३० ॥ ऐसा परमानंद जो एकसर । नाहीं दुसरियाचा आभासलेश । तेंचि सच्चिदानंदपदत्रयांश । सावकाश जडादिहीन ॥ ३१ ॥ असत्य जड दुःखादिका । व्यावर्त्तिलें पदत्रयें देख ॥ विश्व यावेगळें आणीक । नाहीं सम्यक् बोलावया ॥ ३२ ॥ जें जें बोलाल नयनीं देखाल । श्रवणीं जें कांहीं आइकाल । घ्राणें घ्राणाल त्वचेनें स्पर्शाल । रसने चाखाल जें जें कांहीं ॥ ३३ ॥ मनें

१ कमळ २ भेदाभेद ३ उल्लेख. ४ आत्मप्रत्यय ५ भेदाभेद दाखविणें. ६ नाकानें.

जें जें कल्पाल । बुद्धीनें जें जें कांहीं बोधाल । सर्वेंद्रियें जें जें कांहीं जाणाल । दृश्य सकळ जड तितुकें ॥ ३४ ॥ तेंही मिथ्याभूत दुःखरूप । स्थूळ सूक्ष्म विश्व अमूप । जें कीं श्रुतदृष्ट असद्रूप । जाण संकल्प चंचलत्वें ॥३५॥ तरी हें तंव कांहींच नाहीं । हें पदत्रय व्यावर्तिलें पाहीं । तरी उरे जें एसकर सर्वही । नाहीं कांहीं दुजें तेथें ॥ ३६ ॥ यालागीं परमानंदें एकरस । ह्मणोनि एकसर । निर्विशेष । ऐसें ब्रह्म तें सावकाश । असमसहास परिपूर्ण तें ॥ ३७ ॥ दुसरियाचेनि अभावें । स्थिर जाला जो कीं अनुभवें । तें ब्रह्मानंद-स्वरूपीं न संभवे । बद्ध स्वभावें आविद्यक ॥ ३८ ॥ तेथें बद्धता काय असे । कोण्हासि बद्धता बोलिजेत असे । बोधें बोधलिया मानसें । बंध नसे काळत्रयीं ॥ ३९ ॥ जेथ अविद्या उरली असावी । बंधमोक्षाची ठेवाठेवी । ते आत्मबोधें गेली आघवी । बद्ध उरवी कोणालागीं ॥ १०४० ॥ सद्गुरूचेनि कृपावलेशें । अविद्या गेली दाही दिशें । सर्वत्र ब्रह्मानंदेंचि उल्हासे । सामरस्य येकपणें ॥४१॥ दुजें असलिया येक बोलिजे । येकीं येक कार्य ह्मणिजे । सामरस्य कोणाचें कोणा कीजे । दुजें नेणिजे आपणेंविण ॥ ४२ ॥ एवं-भूत जो कां आपण । तो सद्गुरुकृपा जाला निर्वासन । त्यासि बाधु तो कोणाचा कोण । मोक्षही जाण कैंचें काय ॥ ४३ ॥ तयासि मोक्ष ना बंधन । तो परिपूर्ण चैतन्यघन । येकायेक परम निर्वाण । आनंद पूर्ण पूर्णत्वें ॥ ४४ ॥ मन मनपणें चैतन्यघन । तयासि मग कैंचें मरण । मन नाशलिया ब्रह्म पूर्ण । मन बंधन सर्वांपरी ॥ ४५ ॥

तस्मादुल्लासमात्रं तु मनसो बंधतां गतम् । मनः प्रशमने राम मोक्ष एवावशिष्यते ॥ २५ ॥

याकारणें गा श्रीरघुनाथा । मनोल्लास मात्रेंचि बद्धता । तें मन होतांचि प्रशमता । मोक्ष आइता स्वतःसिद्ध ॥ ४६ ॥ यालागीं मन ब्रह्मीं लीन कीजे । मन मनपणा येऊंचि नेदिजे । इतुकेनि मुक्तचि सहज । येथें न धरी संशय कांहीं ॥४७॥ हें जीवन्मुक्ताचें लक्षण । जालें संपूर्ण इतुकेनी ॥ ४८ ॥ प्रकरणा-लक्षणीं संपलें निरूपण । जीवन्मुक्तिप्रकरण । चेनि श्रवणें । बद्धही जीवन्मुक्त होणें । यालागीं श्रवण मनन मनें । सादर करणें अनु-दिनीं ॥ ४९ ॥ निजानंदें रंगूनि साचा । अर्थ घेइजे यया प्रकरणाचा । इतुकेनि लाभ स्वात्मसुखाचा । होय सहज पूर्णत्वें ॥ १०५० ॥ ॥ ॥ ॥

इति श्रीयोगवासिष्ठसारे श्रीवसिष्ठरामसंवादे जीवन्मुक्तिप्रकरणं नवमं संपूर्णम् ॥

॥ श्रीः ॥

प्रकरण १० वें.

निर्वाणप्रकरण.

श्रीगणेशायनमः ॥ जयजयाजी श्रीनिजानंद । जयजय परमानंदैकअगाध । जयजय परब्रह्म विशुद्ध । अगाधबोध विशुद्धवर्या ॥ १ ॥ जयजय सच्चिदानंदैकघन । जयजय निरतिशयज्ञानसंपन्न । ज्ञाताज्ञेयज्ञानविहीन । परमपावनपावेना ॥ २ ॥ जयजय परमानंदैकमूर्ती । जयजय अगाधज्ञानसंपत्ती । व्यक्ताव्यक्तरहितास्थिती । अगम्यश्रुति श्रीगुरुवर्या ॥ ३ ॥ जयजयाजी त्रिगुणातीता । जयजय अज्ञानांधतमनिरता । सर्वा वरिष्ठ विश्वभरिता । मना अचिंत्या श्रीगुरुवर्या ॥ ४ ॥ जयजय नित्य निर्मळ । अखिलजनानंदाखिलमंगळ । परमनिधानैक केवळ । नित्य निष्कळ श्रीगुरुवर्या ॥ ५ ॥ जयजय अचिंत्यानंतशक्ती । जयजय जी निखिलानंद चैतन्यमूर्त्ती । परापरसद्गती । चिच्छक्ती श्रीगुरुवर्या ॥ ६ ॥ जयजय पवित्रापवित्र । जयजय व्यापक निरंतर सर्वत्र । विश्वस्थितिलयादिसूत्र । कर्त्ता विचित्र श्रीगुरुवर्या ॥ ७ ॥ जयजय त्रैलोक्यपावन । जयजय जडजीवउद्धरण । जनकृपादिकानिधान । सच्चिद्घन श्रीगुरुवर्या ॥ ८ ॥ जयजय अविद्यापाशनिकृंतन । सामदानउदारैकघन । सौंदर्यवरत्वें जनमोहन । मनमोहन श्रीगुरुवर्या ॥ ९ ॥ जयजय सद्गुरु परातीत । जयजय वाच्यवाचकभावें व्यतिरिक्त । सर्वसाक्षी चिद्रूपस्थित । सर्वातीत श्रीगुरुवर्या ॥ १० ॥ नमोस्तु भवभयविध्वंसन । नमोस्तु शरणैशरण्य । नमोस्तु चिद्रसैकस्वादन । रसां रसन रसत्वें ॥ ११ ॥ नमोस्तु चित्कलाज्योती । नमोस्तु मूर्त्तामूर्त्तमूर्त्ती । नमोस्तु कलातीत चिदैकस्थिती । परेपरती वस्ती ज्याची ॥ १२ ॥ नमोस्तु जिदैकचिद्गगन । भवभयनिर्दलन । नमो आचार्या सिंहवदन । ब्रह्मसंपन्न ब्रह्मरूपा ॥ १३ ॥ ऐसें त्रयोदशश्लोकीं स्तवन । केलें सद्गुरुराया तुजलागून । स्तोत्रें बोलतांचि सुखसंपन्न । मन उन्मन पावतसे ॥ १४ ॥ तयाचि सुखें मंगलाचरण । तेणेंचि छंदें तुझें स्तवेंन । मग ध्यातसें तुझें चरण । सुखसंपन्न सुखरूपा ॥ १५ ॥ तुझें स्वरूप वर्णावया । येव्हडी स्फूर्ति कैंची श्रीगुरुराया । ह्मणोनि मौनचि लागें तुझिया पायां । दृढ धरूनियां हृदयाकाशीं ॥ १६ ॥ जें जें वाचा बोलों जाये । तें तें स्वरूप तुझें नहोनि होये । तूंचि सर्वत्र येकचि आहे । दृष्टि काय देखेल माझी ॥ १७ ॥ जें जें ऐकें देखें बोलें । तें तें तुवां येकाचि कोंदलें । इंद्रियें देती घेती तें सकळें । तूंचि निराळें सर्वत्र

१ पवित्र करणाऱ्या वस्तूसही पवित्र करणारा. २ वेदांसही न समजलेल्या. ३ अज्ञानाचे पाश तोडून टाकणाऱ्या. ४ शरण आलेल्याचें रक्षण करणारा. ५ स्तुति.

॥ १८ ॥ तुजविण आणीक ठावो । पावता कां माझा मनोभावो । तूंचि माझा सर्व सद्भावो । देवाधिदेवो सद्गुरुराज तूं ॥ १९ ॥ तुजपरतें न फावे कांहीं । ह्मणोनि सर्व व्यापारीं तूंचि पाहीं । मज तों तुजविण दुजें नाहीं । तूंचि तूं सर्वही येकपणें ॥ २० ॥ ऐसें विनवितांचि श्रीगुरुनाथु । हर्षे मस्तक असे डोलवितु । ह्मणे पुढारां वदें सिद्धग्रंथु । नको बहुत प्रार्थू मज ॥ २१ ॥ तुझ्या अतिकोमळ वचनीं । मी हर्षनिर्भरु सर्वदा मनीं । तोचि प्रसाद तुजलागूनी । ग्रंथव्याख्यानीं प्रवर्त्तें आतां ॥ २२ ॥ हें आइकोनियां परमामृत । परमानंदें असे डुल्लत । येणें प्रसादेंचि सिद्ध ग्रंथ । जेणें संत निवतील ॥ २३ ॥ तया संतांसि नमन करून । आरंभीलें ग्रंथव्याख्यान । तें श्रोतां होऊनि सावधान । ग्रंथनिरूपण परिसावें ॥ २४ ॥ जीवन्मुक्तिप्रकरण संपलियावरी । पुढां निरूपणा कैंची उरी । ग्रंथसिद्धि जाली सर्वांपरी । नाहीं पुढारी रचना तेथें ॥ २५ ॥ तर्‍ही यया प्रकरणाचें । कारण कोण उठावयाचें । जें जें उपयोगी ज्ञानाचे । आणि साधनाचे सिद्ध जालें ॥ २६ ॥ मुख्य जें कीं ज्ञान । तें मूळभूमिका वैराग्य जाण । तें सांगितलें वैराग्यप्रकरण । विषयीं वितृष्ण तेणें होये ॥ २७ ॥ देहादिप्रपंच यथार्थ भासतां । तंव वैराग्य नुपजे सर्वथा ॥ ह्मणोनि जग मिथ्या भूत तत्वतां । प्रकरण गाथां निरूपिलीं ॥ २८ ॥ येणें दृढवैराग्येंकरुनी । साधनें निरूपिलीं प्रयत्नीं । अंतरंगसाधनें सर्वांहुनी । करितांक्षणीं तत्वप्राप्ति ॥ २९ ॥ ते वासनाक्षय मनोनाश । साधनद्वय हें सावकाश । करितांचि आत्मा परेश । स्वप्रकाश अपरोक्ष होये ॥ ३० ॥ हे सर्व श्रवणाची संपत्ति । यावरी मनन पाहिजे सर्वार्थी । ह्मणौनि आत्ममननप्रकरणोक्ति । जाणिलें श्रुतीचिया पंथा ॥ ३१ ॥ त्याउपरी निदिध्यासन । तें प्रकरणद्वयेंनिरूपण । येक बोलिजे शुद्धप्रकरण । आत्मार्चन दुसरें तें ॥ ३२ ॥ एवं निदिध्यासन जालियावरी । श्रीरघुराज आक्षेप करी । ह्मणे तो आत्मा विलक्षण कैसेपरी । सांग झडकरी श्रीगुरुराया ॥ ३३ ॥ यावरी आत्मतत्वनिरूपण । करिता जाला वसिष्ठ आपण । तया नांव आत्मनिरूपण जाण । बोले प्रकरण यथातथ्य ॥ ३४ ॥ हे सर्व साधनसंपत्ति जालिया । जीवन्मुक्तता बाणे आपसया । ते लक्षणें सांगितलीं रघुराया । नाहीं उपाया वृद्धि येथें ॥ ३५ ॥ तेणें श्रीरघुराज सुखसंपन्न । परमानंदें डुल्ले उलथोन । ब्रह्मानंदें त्रिभुवन । भरे कोंदोन सर्वत्र ॥ ३६ ॥ इतुकेनि जाली कृतकृत्यता । निरूपणाची राहिली कथा । पुढें प्रकरण उपजतां । प्रकार सर्वथा असेचिना ॥ ३७ ॥ आयिकतां जीवन्मुक्तलक्षण । स्वयें जीवन्मुक्त जाला आपण । श्रीरघुनाथ सुखसंपन्न । समाधान पावले ॥ ३८ ॥ या सुखाची सुखगोष्टि । सांगतां भासे सकळ सृष्टि । ब्रह्मानंदाची ये पुष्टी । देहादिव्यष्टि नुरे जेथें ॥३९॥

---

१ 'आरंभील ग्रंथ व्याख्यान' असा पाठ. २ गोष्ट. ३ ज्ञानादिकांचें. ४ दोन प्रकरणांतील वर्णन. ५ हा माझा देह, हा दुसऱ्याचा देह, असा प्रत्येक देहाविषयीं निराळेपणा.

ऐसें रघुनाथाचेनि जाळेपणें । वसिष्ठासि आनंद सहस्रगुणें । जाला तो न जाणिजे मनें। आपला आपण भोगितु असे ॥ ४० ॥ एंव दोघे परमानंदें जाले तृप्त । तेणें ब्रह्मांड आनंदरूप होत । तेणें निरूपणाची हे मात । राहिली तटस्थ परमानंदें ॥ ४१ ॥ तथापि उठावया हें प्रकरण । सांगेन थोर कारण । तें आयिकतां येकाग्रमन । सुखसंपन्न होइजे ॥ ४२ ॥ श्रीरघुनाथ पावले समाधान । तेथें पुढारें संपलें निरूपण । परी श्रीराम आक्षेप पूर्ण । घेऊनि प्रश्न करिता जाला ॥ ४३ ॥ ह्मणे विनंती ऐकिजे सद्गुरुराया । मी आनंदरूपचि जालों स्वामिया । स्वयेंचि सुखरूप असोनियां । जन हा वायां नेणुं कां जाला ॥ ४४ ॥ परी सद्गुरुकृपेवांचून । सर्वथा प्राप्त नव्हे ब्रह्मज्ञान । आत्मा स्वप्रकाश चैतन्यघन । परी सद्गुरुविण प्राप्त नव्हे ॥ ४५ ॥ आपुलेचि कंठींचा मणि । जैसा भ्रमें जाय विसरोनी । मग हिंडे जनीं वनीं । प्राप्तीलागूनि तयाचिये ॥ ४६ ॥ तथापि तो अप्राप्य तयासि । भ्रमें हिंडे दाही दिशीं । मग आप्त भेटलिया मणीसी । प्रत्यक्ष तयासि दाखवी ॥ ४७ ॥ तैसाचि स्वयें आपणासि विसरोनी । नेणपणें जाय भुळोनी । मग व्याकुळ हिंडे देवालागुनी । तीर्थीं वनीं गिरिकपाटीं ॥ ४८ ॥ देवालागीं हिंडे दिशा दाही । तंव देव न भेटे तया कांहीं । जळपाषाणादि आलिंगी बांहीं । आणि देव देहीं तो न देखे ॥ ४९ ॥ जेणें देखे नानास्थानें । तया देवासि स्वयें नेणें । हाले चाले बोले जेणें । तया नेणे स्वयें देवा ॥ ५० ॥ देवो आणि देवीभावो । तया सर्व प्रकाशिता जो देवो । तया अज्ञानें नेणे पाहा हो । जव सद्गुरुरायो भेटला नाहीं ॥५१॥ येक सद्गुरु भेटलियासाठीं । अपरोक्ष आत्मनेसि होये भेटी । अज्ञान पळे उठाउठी । स्वानंदपुष्टि स्वयें पावे ॥ ५२ ॥ तें सर्वही तुझे कृपादृष्टी । मज अपरोक्ष स्वरूपीं भेटि । न देखें मायादिविश्वसृष्टि । ब्रह्मांडकोटि न भासती ॥ ५३ ॥ अवघा स्वानंदाचि हेलावतु । कांहीं न दिसे दुसरा पदार्थु । जैसा महाप्रळयीं जळसंकेतु । भरोनि राहातु सर्वत्र ॥ ५४ ॥ ऐसी स्थिति बाणली सद्गुरुराया । तऱ्ही एक पुसणें असे स्वामिया । हे सर्वदा सर्व स्थिति बाणावया । कठीण उपायांमाजी मन ॥ ५५ ॥ मनोनाश वासनाक्षयेंकरुनी । स्वरूपस्थिति पावावी क्लेशेंकरुनी । तो मनोनिग्रहो भरवसेनीं । दुर्लभ जनां असे स्वामी ॥ ५६ ॥ ऐसेंचि बोलिलेंही असे । मनोनिग्रह कठीण दिसे । तेचि संमति सावकाशें । स्मृति ऐसें बोलत ॥ ५७ ॥

समतिस्मृति ॥ ॥ चंचलं हि मनः कृष्ण प्रमाथि बलवद्दृढम् । तस्याहं निग्रहं मन्ये वायोरिव सुदुष्करम् ॥

या मनाचा स्वभाव ऐसाचि असे । चपळत्वें सर्वदा वसे । तो स्वभावो ययाचा कैसा नाशे । तरी हें कैसें सांगा स्वामी ॥ ५८ ॥ मनोनिग्रहकरणें याचिसाठीं । होतसे जन्म-

---

१ नेणता, अज्ञान. २ हातांनीं. ३ भेट झाल्यानंतर. ४ वासनांच्या नाशानें मनाचा नाश करून. ५ गीता, भारत.

मरणान्त आटी । वासना हे अतिशय लाठी । स्वरूपीं भेटी अतिदुर्लभ ॥ ५९ ॥ आणि ते निर्विकल्पसमाधीचें । साधन हें मानलें साचें । परी तियेविण जीवन्मुक्तीचें । न्यून त्याचें काये होये ॥ ६० ॥ ज्ञानमात्र जालियासाठीं । अपरोक्ष ब्रह्मेंसि होये भेटि । अज्ञान जाय बारा वाटीं । संसारकपाटिं लागतसे ॥ ६१ ॥ तेथ येव्हडी आटी करुनी । कां पां भरावें योगसाधनीं । स्वरूपस्थ राहावें ज्ञानेंकरुनी । जनीं वनीं स्वप्नजागरीं ॥ ६२ ॥ चालतां बोलतां वर्त्ततां । स्वरूपानुभवें सर्वथा । मन वासना न कोंडितां । सांगें उपायार्थाू सोपानांहीं ॥ ६३ ॥ तंव वसिष्ठ ह्मणती गा श्रीरघुपती । धन्य धन्य तुझी भारती । अपूर्व केली गा प्रश्नोक्ति । सुखसंपत्ति तेणें लाभे ॥ ६४ ॥ तऱ्ही आयिक आतां सांगेन । जेणें सहजस्थिति पावसी निर्वाण । नलगे प्राणायामादि आसन । ना मननिरोधन वासनाक्षय ॥ ६५ ॥ वासनाक्षय मनोनाश । ज्ञानपूर्वक केलिया सावकाश । तेणें निर्विकल्पदशा तयास । जीवन्मुक्तास होतसे ॥ ६६ ॥ ज्ञानेंविण मनवासनेचा क्षय करणें । तेणें होये प्रपंच उपसंहरणें । प्रपंचलय तो समाधि बोलणें । नये खुणे अनुभवाचिये ॥ ६७ ॥ मनोलय प्रपंचोपशमन । केलिया न निरोधे अज्ञान । तें अज्ञान असतां आत्मदर्शन । घडे जाण अपरोक्ष ॥ ६८ ॥ ब्रह्मसाक्षात्कारावांचून । सर्वथा न चुके संसरण[1] । तेथें मनोनाश केलिया कार्य कोण । प्रपंचभान काय करी ॥ ६९ ॥ बहुरूपी मनाचा लय करी । वासना अभावें प्रपंच संहारी । ताटस्थ्यें[2] राहे चिरकाळवरी । परी त्यागासि अंतरीं धरूं[3] नेणें ॥ ७० ॥ तेचि सामाधीचेनि उत्थानें । उचित दे राया ऐसें ह्मणे । तरी अज्ञान काय निरसलें तेणें । कीं उठे धरणें संसाराचें ॥ ७१ ॥ यालागीं मनोवासनाक्षयेकरुनी । अज्ञान निरसे भवसेनी । सुषुप्तीसि लयो प्रतिदिनीं । होतां भवश्रेणि न चुकती ॥ ७२ ॥ सुषुप्तिमूर्छनाप्रळयीं । मनोलय होये जागृतीसमयीं । तेथें विश्व ना भासे कांहीं । तरी संसृति कायि निमाली ॥ ७३ ॥ कीं अज्ञान निःशेष काय निमालें । कीं आत्मसुख प्राप्त जालें । यालागीं ज्ञानेंविण क्लेश केले । ते वाया गेले सर्वही ॥ ७४ ॥ मुख्य अज्ञानाचें नाशक । येक आत्मज्ञानचि सम्यक् । वांचूनि साधनें सकळीक । निरर्थक ज्ञानविषईं ॥ ७५ ॥ ययालागीं ज्ञानमात्रेंचि करुनी । अज्ञान निरसे भवसेनी । कार्य प्रपंचसहित कोदंडपाणी । जाय तत्क्षणीं नाशोनि ॥ ७६ ॥ सविलास अविद्या नाशली । तेथें समूळीं संसृति निमाली । ब्रह्मानंदें नित्य नवी दिवाळी । असती नव्हाळी[4] तया सुखाची ॥ ७७ ॥ इतकेंचि मुमुक्षें करावें । येक ज्ञानमात्रचि साधावें । ज्ञानहीअन्य साधनीं न संभवे । येक परिसावें महावाक्य ॥ ७८ ॥ सद्गुरुमुखापासुनी । महावाक्य आयिकावें श्रवणीं । तयाचें मनन करितांचि क्षणीं । पूर्णपणीं स्वयें शोभे ॥ ७९ ॥ महावाक्यश्रवणकाळीं । अज्ञानाची होय होळी । अज्ञानकार्यही तयेवेळीं । होय समूळीं

१ जन्म आणि मृत्यु यांचे फेरे. २ उदासीन. ३ 'धरूनियां' असा पाठ. ४ नवेपणा.

भस्मीभूत ॥ ८० ॥ अज्ञान सविलासु जात खेवो । आत्मा स्वप्रकाशे स्वयें देवो । तो जाणतांचि नाशे भवभेवो । मग होय रावो मोक्षश्रियेचा ॥ ८१ ॥ ऐसें अनंता बोलती श्रुति । आत्मज्ञानेंचि मोक्षप्राप्ति । नलगे उपायांची संपत्ति । आयिकें संमति सांगेन ॥ ८२ ॥

संमतिश्रुति ॥ तमेव विदित्वातिमृत्युमेति नान्यः पंथा विद्यतेऽयनाय ।

तेंचि जें आत्मस्वरूप । स्वप्रकाशे प्रकाशदीप । अचळ निष्कळ निष्कंप । सच्चिद्रूप सत्तामात्र ॥ ८३ ॥ हेंचि येक जाणितलियासाठीं । परममोक्षेंसि भेटि । अतिमृत्यु ह्मणिजे जगजेठी । मोक्ष ऐसी गोष्टि बोलिजे ॥ ८४ ॥ मृत्यु तो अतिक्रमूनि असे । ह्मणोनि अतिमृत्यु बोलिजेतसे । मृत्युव्याजें जन्मही नसे । दोन्हीं नाशें मोक्षस्थान ॥ ८५ ॥ नाहो मुळीं मृत्यु बोलिला असतां । नसता जन्म तेथें कां आटितां । तऱ्ही मृत्यु हें उपलक्षणें सर्वथा । जन्मप्रसंगता आला असे ॥८६॥ 'काकेभ्यो दधि रक्ष्यताम्' हें वचन । बोलतां याचा ऐसा अर्थ जाण । दधि रक्षावें तरी काकापासून । तरी काय लक्षण इतुकेंचि ॥ ८७ ॥ काकापासूनि दधि रक्षावें । तरी मार्जारादिकरूनि खावुवावें । यालागीं उपलक्षण जाणावें । भक्षूं नेदावें उपघातकां ॥ ८८ ॥ ऐसा वाक्याचा अर्थु असे । उपलक्षणें जाणिजेतसे । मृत्यु तेथ जन्मही भासे । दोन्ही नसे तें मोक्षस्थान ॥ ८९ ॥ जन्ममरण दोन्ही नाहीं । तें आत्मस्वरूप मोक्ष पाहीं । तो तो पावे होवोनि विदेही । आत्मा जिहीं जाणितला ॥ ९० ॥ अन्य मार्ग नाहीं जाणावयासी । ऐसें श्रुति स्वयें उपदेशी । येकें ज्ञानमात्रेंचि मोक्षासी । होय प्राप्तीसि कारण ॥ ९१ ॥ तैशाचि आणिकाही श्रुति । ज्ञानमात्रेंचि बोलती मुक्ति । नलगे अन्य साधनसंपत्ति । तेंही श्रोतीं परिसावें ॥ ९२ ॥

संमतिश्रुति ॥ ब्रह्मविदाप्नोति परम् ।

ह्मणोनि ब्रह्मज्ञानेंकरून । ब्रह्मवेत्ता पावे ब्रह्म पूर्ण । नलगे तेथें इतर साधन । क्लेश जाण व्यर्थचि ॥ ९३ ॥ ऐशा किती बोलों श्रुति । ज्ञानमात्रेंचि ब्रह्मप्राप्ति । ब्रह्मविद्ब्रह्मैवभवति । स्वयें श्रुति ऐसें बोले ॥ ९४ ॥ येथ येक ऐसें ह्मणताती । ज्ञानधारा करावी सर्वार्थी । ज्ञान जालिया ज्ञानसंपत्ति । जाणावयाप्रति करणें लागे ॥ ९५ ॥ ते ज्ञानधारा करावया । निरंतर करावें मनोजया । तऱ्ही हेंही नलगे गा रघुराया । ज्ञानचि आत्मया अपरोक्ष करी ॥ ९६ ॥ अहो व्रतबंधेंकरून[३] । विधीनें जो जाला ब्राह्मण । नलगे मी ब्राह्मण अनुसंधान । अहोरात्र जाण घोकणें लागे ॥ ९७ ॥ त्यासि व्रतबंध जालिया सांठीं । पडे ब्राह्मणत्वाची वज्रमिठी । [४]कळासे ब्राह्मणाची

१ संसाराची भीति. २ एक मुख्य वस्तु सांगितली असतां तिच्या सारख्याच दुसऱ्या वस्तूंचेंही ग्रहण करण. (पुढील ८७ ओवी पहा. ३ मुंजीमुळें. ४ घट्ट बसते.

गांठी । टाकितां संकटीं टाकवेना कीं ॥ ९८ ॥ ऐसा आत्मा जाणता खेवो । स्वयेंचि तरी त्या ब्रह्मभावो । ज्ञानधारा न करितां स्वभावो । नव्हे भावो अनारिसा ॥ ९९ ॥ तमेवंविदित्वा या 'एव' कारें । सर्वही दूषिलीं साधनांतरें । ज्ञानधारा हेंही साधन खरें । सर्व प्रकारें दूषिलें असे ॥ १०० ॥ असंभावना विपरीत भावना । यया निःशेष जालिया लीना । तो अपरोक्ष साक्षात्कार जाणा । ज्ञानाभिधाना तेंचि रूप ॥ १ ॥ इतुकेंचि अतिचोकट कीजे । असंभावनारहित ज्ञान साधिजे । तेणेंचि आत्मा अपरोक्ष कीजे । भ्रम निवर्तिजे तेचि क्षणीं ॥ २ ॥ रज्जूतें जाणत खेवो[2] । जाला भुजंगाचा अभावो । मग सर्पत्व जातांचि सर्प वावो । नुरजे नवलावो अपरोक्षाचा ॥ ३ ॥ सर्प-सहित रज्जुचें अज्ञान । रज्जूविषयीं जालें जेव्हां क्षीण । तेथें मागुतें नव्हे सर्पज्ञान । रज्वानुसंधान न करितांहीं ॥ ४ ॥ असंदिग्ध जालें रज्जूचें ज्ञान । मग कां करावें तियेचें अनुसंधान । भयकंपादिक भस्म पूर्ण । समाधान पावला जो ॥ ५ ॥ तैसेंचि अपरोक्ष जालिया ब्रह्मज्ञान । निःशेष निरसलें अज्ञान । मग सत्यत्वें नेघे विश्वस्वप्न । जागृती पूर्ण जालिया ॥ ६ ॥ बुद्ध जालिया जागृती । त्यासी कां होईल प्रतीति । स्वप्नीं पाठी लागला हस्ती । भयें पळती कोण्ही तेथें ॥ ७ ॥ अथवा स्वप्नींचिया भाजें । जागृतीसि कोण्ही भुंजे । स्वप्नीं राया रंकपण साजे । कीं परिवाजें अंत्यजपण ॥ ८ ॥ ऐसी संमति श्रीभागवतीं । बोलिला असे तो विश्वमूर्ती । तेही एकाग्र परिसावी श्रोतीं । भाव चित्तीं धरूनियां ॥ ९ ॥

संमतिश्लोक ॥ तं स प्रपंचमधिरूढसमाधियोगः स्वाप्नं पुनर्न भजते प्रतिबुद्धवस्तुः ॥

ह्मणोनि सकृत् जाणावयासाठीं । मागुता न लगे संसारापाठी । अज्ञान गेले उठा-उठी । कैंची भेटि नेणतयाची ॥ ११० ॥ यालागीं गा श्रीरघुनाथा । ज्ञानधारा नलगे सर्वथा । आत्मा जाणोनि राहें ताता । सांडीं कथा साधनाची ॥ ११ ॥ तरी नाना-साधनांविरहित । मन वासनालय न करित । आत्मा कैसा जाणिजेत । तेही निश्चित सांगों आतां ॥ १२ ॥ ते जीवन्मुक्ताची स्थिति । सर्वदा तेचि स्थितीनें वर्त्तती । मग चालवितां राज्यसंपत्ति । संसृति न पावती ते ॥ १३ ॥ सर्वदा ताटस्थ्येंचि पाहिजे बैसलें । तन्ही जनकें राज्य कां पां केलें । व्यासादिक काय ताटस्थ्यें राहिले । गार्हस्थ केलें वसिष्ठादिकीं ॥ १४ ॥ वाणिज्य करी तुळाधारु । कर्कटी करी मनुष्याहारु । भागवत सांगे श्रीशुकेंद्रु । कर्मांतरु श्रीदत्तसांगें ॥ १५ ॥ ऐसे ज्ञानिये सांगों किती । नारदासि कळीवरी अतिप्रीति । सनकादिक ते सर्वत्र हिंडती । तैसीचि गति जायंताची ॥ १६ ॥ ऐसे सहज स्थितीनें योगेश्वर । येक चालविती सर्वही व्यवहार । परी ते

१ तं एव (त्यालाच) विदित्वा=जाणून. २ तत्काळ. ३ खियेला. ४ संन्याशाला. ५ गृहस्थाचा धर्म. ६ ही राक्षसी असून मनुष्यें भक्षण करीत असे. ही कथा योगवासिष्ठांत आहे.

अकर्त्ते निर्विकार । परावर स्वयें जालें ॥ १७ ॥ येक ज्ञानमात्रेंचिकरून । आत्मस्वरूप अपरोक्ष जाणून । स्वयेंचि जालें ब्रह्म निर्वाण । बाधक कोण व्यवहारतां ॥ १८ ॥ त्यांचा बाह्यदृष्टी व्यवहार दिसे । परी तें अकर्त्तेपणेंचि ब्रह्म असे । तयां नेणोनियां लोक पिसे । वर्त्तती ऐसे त्यातें ह्मणती ॥ १९ ॥ ययालागीं गा विश्वमूर्ती । सांगेन तेंचि सहजस्थिति । ते आयिक पां येकाग्र चित्तीं । सुखसंपत्ति जेणें लाभे ॥ १२० ॥ आधीं सांगों स्वरूप कैसें । व्यवहारही जाणिजेत असें । मग ते स्थितिही अनायासें । बाणे ऐसें सांगेन ॥ २१ ॥ मनादिकांचा लयो न करितां । इंद्रियें कांहीं न कोंडितां । प्राप्त होय निर्विकल्पता । त्या उपायार्था सांगैन ॥ २२ ॥ नाहो इंद्रियप्राणादिनेमेंकरुनी । बैसावें मन निग्रहुनी । वासनेचा नाशु करुनी । समाधानीं राहावें ॥ २३ ॥ वासनाक्षय मनोनाश । योगाभ्यासें जालिया निःशेष । तेंचि निर्विकल्पता सावकाश । समाधि इयेस बोलताती ॥ २४ ॥ आणि तुह्मी बोलतां अनारिसें । जें इत्यादिकां न करितां प्रयासें । निर्विकल्पता होतसें अनायासें । हा संदेह मानसें मानिजेत ॥ २५ ॥ तऱ्ही आयिक याचें उत्तर । सांगिजैल अतिसुंदर । प्रयासेंविण मनोमार । समाधि स्थिर निर्विकल्प ॥ २६ ॥ अगा संकल्प ह्मणिजे याचें नाम । वस्तूवेगळा जो दृश्यभ्रम । तो यथाय मानूनि परम । करी सभ्रम हेयोपादान ॥ २७ ॥ असत्य तें सत्य मानुनी । आणि भोग्यत्वें तया देखोनी । ग्राह्यग्राहकता कल्पुनी । कल्पी मनीं ग्राह्यबुद्धि ॥ २८ ॥ याचें नाम विकल्प ह्मणिजे । इतुकेनि संसृति पाविजे । हे जेथें संकल्प नेणिजे । तेंचि जाणिजे निर्विकल्पता ॥ २९ ॥ असताचि प्रपंच बाधला । नामरूपत्यागें सत्य मानला । निर्विशेषें ब्रह्मचि जाला । संकल्प तयाला कासयाचा ॥ १३० ॥ आपणावांचूनि दुसरें जनीं । देखे तरी संकल्प करी मनीं । सर्वथा नेणे तो ब्रह्मावांचुनी । जागृतिस्वप्नसुषुप्ती-सी ॥ ३१ ॥ देहादिप्रपंचप्रतिभास । जयालागीं सावकाश । तया ब्रह्मावेगळा कोण्ही लश । नाहीं अंश उरला असे ॥ ३२ ॥

संमतिश्लोक ॥ सर्वं ब्रह्ममयं यस्य न तस्य पृथगस्ति वै ॥ एकांतसेवनं व्यर्थं व्यर्थं मौनादिसाधनम् ॥

प्रतीति काय रूप ऐसें । दृश्य सत्यपणें कदा न भासे । दृष्टी तरी साचा ऐसें दिसे । जैसें कां भासे मृगजळ[1] ॥ ३३ ॥ प्रातीतिक विश्वप्रतीति । जालियाही सर्व ब्रह्मसंवित्ति । तेथें संकल्प कासयाचे उठती । तेंचि स्थिति निर्विकल्पा ॥ ३४ ॥ ब्रह्मरूप जाला भूगोल ब्रह्मरूप जाला कुलाचल । ब्रह्मरूप सर्वही नागकुळ । देव सकळ ब्रह्मरूप ३५ ॥ शुद्धाशुद्ध तें ब्रह्मरूपचि भासे । बरें वाईट तितुकें ब्रह्मरूपचि असे । किंबहुना घटपटादि विश्वीं[2] वसे । तें स्वयंभ दिसे परब्रह्म ॥ ३६ ॥ ब्रह्मावेगळे आणुमात्रहीं । न भासे विश्वीं आणि देहीं । देहेचि देहपणें तेथें नाहीं । न देखे कांहीं ब्रह्मेंविण ॥ ३७ ॥ तेथें कल्पित

१ सपाट मैदानांत अति तृष्णेमुळें हरिणाला होणारा पाण्याचा भास. २ जगांत.

आणि कल्पना । केल्याही न भासे सज्ञाना । जेथ उरी नाहीं दुजेपणा । तेथ कल्पना कासयाची ॥ ३८ ॥ यालागीं न करितां अष्टांगयोग । मनोनाश न करितां सांग । वासनाक्षय नलगे अभंग । नलगे व्यंग अन्य साधन ॥ ३९ ॥ उघडांचि डोळां सैर-समाधि । उठतां बैसतां व्यापारसंधी । जागृतीच्या आदिमध्यीं । असे समाधि निर्विकल्प ॥ १४० ॥ क्षण एक देहावरी एतु । तरी देहासंबंधी सुखदुःख जाणतु । तेही आत्म-रूपेंचि देखतु । परिपूर्णस्थितु तोचि पूर्ण ॥ ४१ ॥ हें पंचमी भूमिकेमाझारी । चतुर्थी सुखदुःखलहरी । तेही क्षणा येकाभीतरी । सर्वेचि पुरी वाणे दशा ॥ ४२ ॥ तरी क्षण एक सविकल्प । होईल जाणा समाधिसुख । तेंही तया नव्हे बाधक । बोधला सम्यक ह्मणोनियां ॥ ४३ ॥ अगा ज्ञाता आत्मतत्त्व जाणे । तया नाहीं संसृति पावणें । ब्रह्मानं-दुचि सर्वदा भोगणें । जरी करणें न कोंडिता ॥ ४४ ॥ अथवा सविकल्पही असता । काय संसृति वाजे तयाचे माथां । तो सविकल्पें निर्विकल्पते तत्त्वता । स्थिति सर्वथा भंगेना कीं ॥ ४५ ॥ त्यासि इंद्रियें नेमितां । गुणअवगुण नव्हे सर्वथा । तोचि ब्रह्मसुखीं पहुडतां । कोण व्यथा तया बाधी ॥ ४६ ॥ पर्ण जाणिलें आत्मतत्त्व जेणें । तया नलगे इंद्रियें कोंडणें । मनबुद्ध्यादिकें नियमणें । क्षय करणें वासनेचा ॥ ४७ ॥ तो इंद्रियसमाधानें असे । अथवा व्यवहारदशे वसे । परी तया भ्रांतीचा अतिशयो नसे । स्वरूपीं विशेषें नासोनि गेला ॥ ४८ ॥ तया समाधि दोनीच असती । विश्रांतीचें स्थान वसती । एक निर्विकल्प दुजी ह्मणती । सविकल्पस्थिति अखंड ॥ ४९ ॥ तया-वेगळे तिसरे ठाईं । योगिया सर्वथा राहाणें नाहीं । तरी दोहींचें स्वरूप सांगों कांहीं । त्यांत एक पांहीं सांगितली ॥ १५० ॥ निर्विकल्पसमाधीची खण । तुज सांगितली गा संपर्ण । सविकल्प ते इतुकीचि जाण । द्रष्टा दृश्य दर्शन जेथें स्फुरे ॥ ५१ ॥ जेथें ज्ञेय ज्ञान आणि ज्ञाता । जेथें त्रिपुटी स्फुरे गा रघुनाथा । तियेतें बोलिजे सविकल्पता । समाधि तत्वतां जाण तूं ॥ ५२ ॥ स्वरूपस्थिति तरी आहे परी त्रिपुटी जेथें स्फुरताहे । तोचि ते सविकल्पसमाधि पाहें । निर्धारु होय योगियासी ॥ ५३ ॥ हेचि त्रिपुटी जेथें न स्फुरे । तेचि निर्विकल्प जाण निर्धारें । यया दोहींवेगळें तिसरें । नाहीं खरें योगि-यासी ॥ ५४ ॥ तो इंद्रियें नेमूनि बैसला । अथवा न नेमी कोणा इंद्रियाला । परी पर-ब्रह्मीं ब्रह्मरूप संचला । नव्हे वेगळा प्रपंचरूप ॥ ५५ ॥ दधि मंथनि काढलें लोणी । तें ताकीं घालितां न मिळे मिळणी । तैसा जो कां निघाला प्रपंचाहुनी । तो नय मागुतेनि वर्त्ततां तेथें ॥ ५६ ॥ इक्षुदंडाची कीजे शर्करा । ते ते गाळितां नानाप्रकारा । तऱ्ही तो ऊंस नव्हे कोण्हीहि द्वारा । शर्करा ते शर्करा न ढळेचि ॥ ५७ ॥ तैसें सद्गुरुप्रसादें-

---

१ स्वच्छंद (पूर्ण) अशी समाधि. २ झोंप लागण्यापूर्वी क्षणमात्र, आणि झोंपेंतून उठल्यानंतर देहादिकांचें स्मरण होण्यापूर्वी क्षणभर. ३ ताब्यांत ठेवणें. ४ ' अति सो ' असा पाठ.

करून । देहादिप्रपंचविहीन । स्वयें ब्रह्म जाला तो आपण । तो न पवे देहपणें वर्त्ततांही ॥ ५८ ॥ दुग्ध मथितां घृत होये । मागुतें तें दुग्धीं घालितां दुग्ध नोहे । तैसा ज्ञानी तो अज्ञानी हें । कोणे उपायीं घडेना कीं ॥ ५९ ॥ तैसा ज्ञानी प्रपंचीं वर्त्तत्ता । परी प्रपंच नव्हे सर्वथा । नातरी समाधिस्थ बैसतां । नाहीं तत्वतां विशेष कांहीं ॥ १६० ॥ रत्नपेटिये[१] नाना वेष्टणें बांधलें । तरी तें रत्नपणाहूनि अधिक जालें । किंवा धुळींत पडल्या मुकलें । नाहीं हारविलें रत्नपण ॥ ६१ ॥ तैसा निर्विकल्पें काय होये ज्ञानी । किंवा सविकल्पें होईल अज्ञानी । हे दोन्ही समाधि नव्हे लाभहानी । सर्वत्र निर्वाणिं ब्रह्मचि तो ॥ ६२ ॥ यालागीं समाहित करणें केलीं । तरी विशेषता नाहीं आली । असमाहितें स्थिति बुडाली । हे तंव बोली न घडे कदा ॥ ६३ ॥ यदार्थी श्रीकृष्णभगवंतु । उद्धवाप्रति बोले सिद्धांतु । संमति श्रीभागवतोक्तु । दत्तचित्त[२] परिसिजे ॥ ६४ ॥

संमतिश्लोक ॥ समाहितैः कः करणैर्गुणात्मभिर्गुणो भवेन्मत्सुविविक्त धाम्नः ।
विक्षिप्यमाणैरुत किं नु दूषणं धनैरुपेतैर्विगतै रवेः किम् ॥

श्रीकृष्ण ह्मणती उद्धवासी । अपरोक्ष जाणे जो मज स्वरूपासी । नाहीं असंभावना मळ जयासी । तया पुरुषासि कोण बंध ॥ ६५ ॥ त्रिगुणात्मकें जें इंद्रियें । ते त्रिगुणावृत्ति[३] एकएकाचिये । तें समाहित कोण कोणा आहे । ब्रह्माहूनि काय अधिक होईल ॥ ६६ ॥ तो पावला असे गा निर्वाण । स्वयेंचि परब्रह्म आपण । तो इंद्रियां नेमिल्या होईल कोण । ब्रह्माहुनि थोर दुसरा ॥ ६७ ॥ कीं मुक्तीसिही मुक्ति होये । किंवा तयासी आन कांहीं फळ होय पाहे । किंवा तो स्वर्गादिकासि जाये । फळरूप आहे सर्वांसि तोचि ॥ ६८ ॥ करणें समाहितें असतां । त्रिगुणावृत्त्यांहीं विचारतां । कोण हानि तयाचे माथां । अनात्मा मागुता होईल काय ॥ ६९ ॥ किंवा तो ब्रह्म अब्रह्म होये । कीं जालें जें ज्ञान मागुतें जाये । कीं संसृतिस्वप्नीं[४] बुडोनि राहे । काय होताहे अपकार त्यासी ॥ १७० ॥ जागृत काय स्वप्न देखे । कीं अमृतचि परी मारकें । कीं अग्नि जळे स्वज्वाळकें । नीरें नीर कें बुडोनि जाये ॥ ७१ ॥ अथवा वारियाच्या लहरी । वायुचि उडोनि जाय जरी । विखचि विखकंदु चुरमुरी । कीं मरण भारी मरणातें ॥७२॥ अथवा सूर्येंचि सूर्य भक्षिजे । सूर्यें सूर्य आच्छादिजे । चंद्रें चंद्रकळा ग्रासिजे । तैसें जाणिजे नवल हें ॥ ७३ ॥ तैसें सर्व ब्रह्म जयासि प्रतीति । तयासि इंद्रियनेम कोणाप्रति । तऱ्ही सत्वरजतमोगुणवृत्ति । उठिल्या स्थिति काय भंगे ॥ ७४ ॥ सत्वरजतमोगुणाच्या वृत्ति । क्षण येक चित्तातें आवरिती । परी खवाचि स्फुरे ब्रह्मस्फुर्ति । लया जाती सकळीक ॥ ७५ ॥ पहिलेचि अहाउवाहाचें[५] उठलिया । त्याही बाधित जालिया गा रघुराया । सर्वेचि

१ रत्नें ठेवलेल्या पेटीस. २ चित्त दिलेला. ३ सत्व, रज व तम यांच्या पुनः पुनः उत्पत्तीनें. ४ संसाररूपी स्वप्नांत. ५ उगीचच्या उगीच.

ब्रह्मस्फूर्ति जालिया । जातील लया सर्वही ॥७६॥ ऐसेंच बृहदारण्यश्रुति । सुरेश्वराचार्ये व्याख्यानिंती । न मोडे आत्मविदाची स्थिति । त्रिगुणवृति उठिल्या जरी ॥ ७७ ॥

संमतिवार्त्तिक ॥ रागादिदर्शनं यत्र ज्ञानिनोऽपि हि चोद्यते । बाधितस्यैव तत्सूते सदप्युक्ते न दूषणम् ॥

कामक्रोधलोभादि पाहीं । दिसे ज्ञानियाचे ठायीं । परी ब्रह्मस्फूर्तीनें बाधित सर्वही । न बाधिती कांहीं तयासीं ॥ ७८ ॥ यालागीं इंद्रियेंही न कोंडितां । स्थिति न्यून नव्हे गा सर्वथा । ग्रहणीं व्यापिल्याही सविता । काय न्यनता पावेल ॥ ७९ ॥ काय सूर्यपण त्याचें गेलें । कीं खद्योतें पण आंगासि आलें । कीं स्वप्रकाशपणें हारपलें । काय जालें न्यून त्याचें ॥ १८० ॥ तया मेघाचिया दाटीं । प्रतिबंध जाला जनाचिये दृष्टी । परी सूर्य तो प्रकाशक सकल सृष्टी । नाहीं भेटि अंधकारेंसी ॥ ८१ ॥ तया अभ्राचाही प्रकाशिता । स्वप्रकाशिता होय तो सविता[3] । प्रकाश आच्छादीता सर्वथा । समूळ हे कथा असंबद्ध ॥ ८२ ॥ नाना तिमिरअस्तु जालियावरी । प्रकाश पावे तो तमारि । अभ्र गेलिया लाभ काय करी । सांग निर्धारीं विचारोनियां ॥८३॥ अभ्रेंचि येती आणि जाती । परी तो तैसाचि तेजोमूर्ति । न टाकी आपुली प्रकाशगति । प्रकाशोनि वर्त्तती याचेनि सर्व ॥ ८४ ॥ अभ्र आलें गेलें असतां । परी दोहींचा साक्षी तो सविता । तैसा गुणवृत्त्यादि आत्मवेत्ता । न भले सर्वथा साक्षित्वें ॥ ८५ ॥ तो स्वप्रकाशेंकरुनी । गुणदोष न पवे भरंवसेनी । जडा अप्रकाशा वृत्तींकरुनी । नियमनीं इंद्रियांच्या ॥ ८६ ॥ ऐसें स्वप्रकाशाचे येणें । सूर्यासि जेथें नाहीं लिंपणें । तेथें सूर्यप्रकाशी कोण्हे । इंद्रियवृत्तींनें आवरिती ॥ ८७ ॥ तेथ सूर्यादितेजेंमंतें । तेणें प्रकाशती स्वप्रकासें जेथ । त्या कोण प्रकाशी आत्मयातें । आवरणातें कोण करी ॥ ८८ ॥ यद्‌था स्वयें बोलतसे श्रुति । अग्नि सूर्यादि जेथें न भासती । तेथ इतरांची कोण गति । सर्व प्रकाशती त्याचेनी ॥ ८९ ॥

संमतिश्रुति ॥ न तत्र सूर्यो भाति न चंद्रतारकं नेमा विद्युतो भांति कुतोयमग्निः ।
तमेव भांतमनुभाति सर्वं तस्य भासा सर्वमिदं विभाति ॥

अहो जेथें चंद्रसूर्य न भासती । तारागणें विद्युल्लताचि संपत्ती । तेथें अग्नीची किती दीप्ति । जे प्रकाशती आत्मयातें ॥ १९० ॥ यालागीं सूर्यचंद्रादिकांसी । येकु आत्मा स्वयें प्रकाशी । तो भासतांचि प्रकाशु सर्वांसी । जग हें व्यक्तीसि येतसे ॥ ९१ ॥ नेत्रादिकें प्रकाशकें होती । परी अंधारीं काय वस्तु देखती । तें सूर्यप्रकाशेंचि प्रकाशती । अकिंचित्‌करंगति सूर्याविण यांची ॥ ९२ ॥ सूर्यकांतु प्रकाशकु होये । दर्पणा रूप दिसताहे । परी सूर्यप्रकाशेंचि पाहे । येऱ्हवीं काय प्रकाशती ॥ ९३ ॥ सोमकांत द्रवता होये । परी ते हार्तवटी चंद्रींच आहे । तैसें प्रकाशमंतासि प्रकाशितुचि

---

१ अर्थ स्पष्ट करून सांगतात. २ काजळाचें रूप. ३ सूर्य. ४ सूर्य वगैरे तेजस्वी पदार्थ. ५ यांस सूर्याशिवाय कांहीं करतां येत नाहीं. ६ योग्यता.

जाये । आत्मा पाहे स्वप्रकाशें ॥ ९४ ॥ त्याचा प्रकाश कोण्ही न अभिभवी । ना प्रगट करी उचलूनि दावी । प्रकाशें नाहीं हे ठेवाठेवी । अज्ञानगोवी सवस्वाचा ॥ ९५ ॥ हें रविचंद्रदृष्टांतें सांगितलें । आतां असंगपणेंही तो न मैळे । हें आकाशदृष्टांतें-करूनि बोले । ब्रह्म सांवळें उद्धवाप्रति ॥ ९६ ॥

संमतिश्लोक॥ यथा नभो वाय्वनलांबुभूगुणैर्गतागतैर्वर्तुगुणैर्नसज्जते ।
तथाक्षरं सत्वरजस्तमोमलैरहंमतेः संसृतिहेतुभिः परम् ॥

जैसें हें कीं गगन । अग्नीनें न जाय जळोन ॥ वारेमें न शोषे जाण । उदकें बुडोन न जाय कदा ॥ ९७ ॥ तैसेंचि रजें धूसरादिकीं । न मैळे तें काळीं तिहीं कीं । अथवा षड्ऋतु वर्षादिकीं । गुणविशेषीं तैसें नव्हे ॥ ९८ ॥ शीतें कांकडोनि गेलें गगन । अथवा उष्णें नाहीं गेलें करपोन । पर्जन्यघोलें निथळोन । नाहीं बुडोनि गेलें उदकीं ॥ ९९ ॥ साही ऋतु येती आणि जाती । गगन जैसें तैसें आत्मस्थिती । न बुडे न जळे मैळगती । धूसर नव्हती कदाकाळीं ॥ २०० ॥ कोण्हे ही संगातें नपवे । कोण्हाचेनिही न अभिभवे । त्याच्याचि ठाईं सर्व संभवे । मागुतें मावळे त्याचा ठाईं ॥ १ ॥ आगमापायी षड्ऋतुगण । तेणेंसि संग न पवे गगन । असंगपणें आपणा आपण । शुद्ध संपूर्ण जैसें तैसें ॥ २ ॥ तैसा जो अहंकाराहूनि पर । आत्मा शुद्धबुद्ध निर्विकार । त्यासि सत्वर-जतमादिविकार । न करिती विचित्र आपणाऐसें ॥ ३ ॥ यास्तव रजतमाच्या वृत्ति । अतिमाळिण संसृति देती । तरी आत्मयातें न बाधिती । जऱ्ही उठती स्वकार्यरूपें ॥ ४ ॥ अगा सर्वही अहंकारें बाधता । संसृति अहंकाराचे माथां । तोही विपरीत जाला तत्वतां । तेथ कैंची कथा जन्ममरणाची ॥ ५ ॥ जो देहाकारें परिणमतु । मी देह ऐसा अध्यास-भूतु । तोचि 'ब्रह्मोऽहमस्मि' ऐसा उठतु । उठतांचि भस्मांतु अज्ञानासी ॥६॥ देहाहंकारें सत्वरजतमोवृत्ति । त्या निश्चयें संसृतीतें देती । तोचि 'ब्रह्माहमस्मि' होतां क्षणांतीं । भस्म होती जन्ममरणें ॥ ७ ॥ देहसंग न लगे जयासी । तेथें देह कोण अर्थ बाधील त्यासी । तो असंग सर्वांसी । उदासपणें ॥ ८ ॥ आत्मा सर्वत्र असंग असे । ऐसें श्रुतिही बोलतसे । 'असंगोह्ययंपुरुष' ऐसें । बोलत सर्वांशें आत्मयासी ॥ ९ ॥ ह्मणोनि तो सविकल्पनिर्विकल्पें । असतां न लिंपे पुण्यपापें । असंगपणें विषयीं न तापे । असे अमूपें ब्रह्मानुभवें ॥ २१० ॥ ह्मणोनि देहाहंकारें जें करिजे । तेणें कर्त्तेपणालिंपिजे । अहंकारेंविण जें जें करिजे । ब्रह्मचि सहजें तें तें कर्म ॥ ११ ॥ देहाहंकारें वो ब्रह्मार्त्ति कर्माकर्म तया ब्रह्मस्थिति । ते विश्वाचा जरी संहार करिती । तऱ्ही नपवती बाधु काई ॥ १२ ॥ यदर्थी श्रुतीचीं वचनें । स्वयें बोलिलीं श्रीनारायणें । मुखीं घातलीं अतिप्री-तीनें । जनार्दनें अर्जुनाच्या ॥ १३ ॥

---

१ 'नाहीं आहे' असा पाठ. २ धुळ वगैरे पदार्थांनीं. ३ 'माळवे' असा पाठ. ४ मी ब्रह्म आहे.

संमतिश्लोक ॥ यस्य नाहंकृतो भावो बुद्धिर्यस्य न लिप्यते । हत्वापि स इमाँल्लोकान्न हंति न निबध्यते ॥

जयासि अहंभाव नाहीं । मी देही ब्राह्मण क्षत्रीय वैश्य पाही । तैसें आश्रमाभिमानही । न जागे देहीं जयाचा ॥ १४ ॥ अगा अभिमान तो द्विविध जाण । येकु विशेष येकु सामान्य । याचेंही सांगों लक्षण । सावधान परिस पां ॥ १५ ॥ अहं प्रत्यय सर्व देहीं । मी ऐसा अहंकारु पाहीं । हा सामान्य वर्त्ते सर्वांही । विशेष तो यहीं लक्षणीं जाणा ॥ १६ ॥ मी शूद्र वैश्य अथवा ब्राह्मण । गृहस्थ वनस्थ यति जाण । भिक्षुक उद्यमी धनी गोमान्[1] । हा विशेष अभिमान जाण ऐसा ॥ १७ ॥ या दोन्हीं अभिमानेंकरुनी । विश्व हें बांधलें कळासोनी । त्यासि स्वानुभवें देई टाकुनी । तरी अकर्त्ता जनीं तोचि एकु ॥ १८ ॥ हा द्विविध अहंकार जयाचा केला । त्याची बुद्धि न लिंपे कर्त्तेपणाला । तेणें जगत्रयाचा संहारु केला । तऱ्ही पापाला न लिंपे हो ॥ १९ ॥ जरी तो कर्माचा कर्त्ता होईल । तरी तो पापपुण्यासि लिंपिजेल । त्याची बुद्धि कर्त्तेपणा उठेल । अहंकारु असे देहपणें ॥ २२० ॥ ह्मणोनि अहंकार सांडूनियां कर्में । केलीं तेंचि परब्रह्में । तेंही संस्कारें करी परी नाहीं देहधर्में । हेंचि वर्म अकर्त्तेपणाचीं ॥ २१ ॥ यालागीं सर्व कर्मे केलिया । परी न पवे उणियापुरियां[2] । अथवा निर्विकल्पें राहिलिया । परिपूर्ण तया न्यून पूर्ण काय ॥२२॥ यदर्थी ऐसेंचि बोले श्रुति । ब्रह्मनिष्ठा कर्माकर्में न बाधिती । कर्में न मोडे स्थिति । न केल्या गति न्यून काये ॥२३॥

संमतिश्रुति ॥ एष नित्यो महिमा ब्राह्मणस्य न कर्मणा वर्धते नो कनीयान् ॥

हा नित्य अविशिष्ट ब्राह्मणाचा । ज्ञानमहिमा जाण साचा । कर्म करितां समंध वाढीचा । नव्हे त्याचा कर्म करितां ॥ २४ ॥ कर्में करितां अधिक होईल । किंवा न करितां तुटी होईल । तो जैसा तैसाचि केवळ । नाहीं तळमळ अहंभावाची ॥ २५ ॥ नाहो ब्राह्मण शब्द साधारण । सकल बोलिजती ब्राह्मण । तो कर्म करितां पावे महिमान । न करितां हीन सर्वथा ॥ २६ ॥ एक सामान्य ब्राह्मण असती । ते सर्व कर्मही आचरती । परी ते साधारण बोलिजती । केवळ जातीकरूनियां ॥ २७ ॥ परी ते वेषें करूनियां ब्राह्मण । ब्राह्मणाचें सांगेल लक्षण । वार्तिक बोले सुरेश्वर आपण । तेंचि चिन्ह परियेसा ॥ २८ ॥

संमतिवार्तिक ॥ यस्त्वक्षरपरिज्ञानान्मर्त्योमृत्युं प्रमीयते ॥ स एव ब्राह्मणो नान्यो जगत्यध्यवसीयताम् ॥

जें कीं शाश्वत नित्य अक्षर । परब्रह्म जें निर्विकार । त्याच्या परिज्ञानेंकरूनि संसार । भस्मसार जेणें केला ॥ २९ ॥ मृत्यूउपरी मृत्युहारि । होती ज्या संसाराभीतरी । गेलिया कोटि कल्पांच्या भरोवरी । परी नसे ज्या वारी संसाराची ॥ २३० ॥ ऐसिया संसाराचे धरणें । उठलें ब्रह्माचे अपरोक्ष ज्ञानें । तया तेंचि ब्राह्मण ऐसें ह्मणणें ।

---

१ गाई ज्याच्याजवळ आहेत तो. २ कमजास्तपणाला.

येरु तो जाणणें वेषधारी ॥ ३१ ॥ दुसरें ऐसें व्याख्यान । वस्तूचें जें अपरोक्ष ज्ञान । तेणें मृत्यूचा मृत्यु जें चैतन्य । होय तो ब्राह्मण निश्चयेंसी ॥ ३२ ॥ अगा त्रैलोक्या माझारी । बरवा निश्चयो सर्वांभीतरी । जो ब्रह्म जाणे स्वज्ञानेंकरी । ब्राह्मणत्व वर तयातेंचि ॥ ३३ ॥ इतर तेही ब्राह्मण होती । परी मुख्य ब्राह्मण ते नव्हती । ते सत्कर्मी आचारवंत असती । परी मुख्य ह्मणिजेती पूर्वोक्त ॥ ३४ ॥ यालागीं तोचि तो ब्राह्मण । कर्माधीन कदा नव्हे जयाचें महिमान । महिमान ह्मणिजे स्वरूपज्ञान । नव्हे क्षीण कर्मे करितां ॥ ३५ ॥ यालागीं तो सर्वही कर्मे करू । अथवा तो कांहींच न करू । समाधिस्थ रावो अथवा राज्य करू । कां व्यवहारू गृहस्थाश्रमीं ॥ ३६ ॥ यालागीं कर्म करितां कां न करितां । तोचि ब्रह्मरूप तत्वतां । अगा कल्पही मन ब्रह्मीं लावितां । कर्मे करितां न लिंपे तो ॥ ३७ ॥ तो परमानंदुचि पावेल । परी न देखे तो दुःख कल्लोळ । करितां व्यवहार सकळ । अतिनिर्मळ असंतत्वें ॥ ३८ ॥

संमतिश्लोक ॥ योगरतो वा भोगरतो वा संगरतो वा संगविहीनः । किंचिद्ब्रह्मणि योजितचित्तं नंदति नंदति नंदति यत् ॥

जेणें किंचित कदाचित् चित्त । ब्रह्मीं ठेविलें गा सुनिश्चित । तो परमानंदु पावे अद्भुत । हेलावत ब्रह्मगोळ ॥ ३९ ॥ तो परमानंदुचि श्रीरघुनाथा । पावे निश्चयें जाण सर्वथा । नको आणूं तूं भ्रांति चित्ता । दिव्य सर्वथा देईन मी ॥ २४० ॥ परी तो असो भलत्यापरी । योग साधूनि राहो अंतरीं । अथवा भोग भोगो नानापरी । किंवा संगु करो स्त्रीपुत्रांचा ॥ ४१ ॥ अथवा निःसंग होऊनि वनीं बैसो । कां स्त्रीपुत्रसंगें घरीं वसो । कां योगादि-कर्मे करूनि असो । अथवा नसो गृहाश्रमीं ॥ ४२ ॥ परी तो संगें असंगें न जळे । भोगीं अभोगीं वर्त्ततां न पोळे । पुत्रादिसंगेंकरूनि न मैळे । जरी खेळु खेळे नानापरी ॥ ४३ ॥ यालागीं कर्मी अकर्मी वर्त्ततां । परी तो न पवे अधिक न्यूनता । तो ब्रह्मरूप तत्वता । नेणे कथा जीवत्वाची ॥ ४४ ॥ ह्मणोनि कर्माचरणें वर्त्ततां । परी तो वा न पवे ना रघुनाथा । अथवा समाधिस्थ राहातां । अधिकता काय पावे ॥ ४५ ॥ आतां बहु बोलोनि काय करावें । ब्रह्मनिष्ठासि सर्वत्र निष्ठा होये । तो स्वयेंचि ब्रह्मरूप आहे । न्यून काय होईल त्यासी ॥ ४६ ॥ तो देहीं असोनि देहातीतु । स्वात्मबोधेंचि जो वर्त्ततु । यदर्थी भागवतीं श्रीभगवंतु । बोले मातु श्रीउद्धवासी ॥ ४७ ॥

संमतिश्लोक । देहस्थोऽपि न देहस्थो विद्वान्स्वप्नाद्यथोत्थितः । अदेहस्थोऽपि देहस्थः कुमतिः स्वप्नदृग्यथा ।

अगा देहीं असोनि तो नव्हे । जो सर्व साक्षित्वें वर्त्ते पाहीं । नेणे आपणाव्यतिरिक्त कांहीं । कर्म आपणासि भिन्न न देखे ॥ ४८ ॥ आपुलें स्वरूप न देखे भिन्न । ब्रह्मीं ब्रह्मरूप चैतन्यघन । पूर्वी जो देखतसे विश्वस्वप्न । तें आपणा नेणोनि भ्रांतीस्तव

---

१ स्वतः ज्ञानयुक्त झालेलें असल्यामुळें. २ यज्ञ याग वगैरे ब्राह्मणानें करावयाचीं कर्मे.

॥ ४९ ॥ तो स्वात्मबोधें जाला जागत । देहोस्मिस्वप्न गेलें निभ्रांत। जैसा जागा पुरुष स्वप्नस्थ देखे समस्त स्वप्न मिथ्या ॥ २५० ॥ तैसा जागिन्नलिया काय स्वप्नीचा होये। तैसा ब्रह्मावबोधें संसारी नोहे । येणेंचि दृष्टांतें तूं पाहें । सर्वथा नोहे मोह कांहीं ॥ ५१ तैसा अज्ञानी जाण विपरीत । तो देहस्थ नहोनि देहस्थ । बुद्धि तयाची कुश्चित । आत्मतत्व नेणोनियां ॥ ५२ ॥ जैसा स्वयें ब्राह्मण असतां । तो स्वप्नीं चांडाळत्व होय धरितां । तो नव्हे परी अंत्यजता । स्वये मानिता होय आपणासी ॥ ५३ ॥ मग त्या देहाचेनि सुखदुःखेंकरी । तद्रूपचि होय सर्वांपरी । तैसाचि ज्ञानी गा रावणारी । नहोनि भारी स्वरूप होये ॥ ५४ ॥ यालागीं वास्तव तो देही नव्हे । तेथ देहींचें कर्म बाधील काये। ऐसें उद्धवाप्रति यदुरायें । बोधिलें पाहें स्वरूपज्ञान ॥ ५५ ॥ यालागीं असतां सहजस्थिति । संगासंग बाधं न शकती । मनादिनिरोध करणें न लगती । सहजस्थिति सहजपणें ॥ ५६ ॥ तरी ते सहजस्थिति कैसी असे । मनादिनिरोध न करितां अनायासें । ब्रह्मरूप असिजेत असे । तेंही कैसें सांगेन ॥ ५७ ॥ ऐसें बोलतां श्रीवसिष्ठमुनि । रघुनाथ हर्ष न माय गगनीं । तेंचि पुसावया प्रवर्त्तला प्रश्नीं । प्रत्युत्तर मुनि देता जाला ॥ ५८ ॥ तेंचि निरूपण करावया लागून । प्रवर्त्तलें दशमप्रकरण । येथें नवांही प्रकरणांचें निरूपण । आहे पूर्ण ब्रह्मानंदु ॥ ५९ ॥ ययास्तव हें निर्वाणप्रकरण । गोडपणें पावलें अभिधान । तेंचि कीजैल निरूपण । सावधान परियेसा ॥ २६० ॥ त्यामाजी कितीयेका श्लोकांकरून । प्रथम कीजैल स्वरूपज्ञान वर्त्ततांही व्यवहारें करून । होय भान ब्रह्मचि तया ॥ ६१ ॥ ब्रह्म तें सद्रूप चिद्रूप आनंदरूप । त्रिप्रकारें येक ब्रह्मस्वरूप । तें तिहीं प्रकारें बोळखें अनुरूप । सांगिजे स्वरूप तिहीं श्लोकीं ॥ ६२ ॥ त्यावरी पांच श्लोकेंकरून । याचें कीजैल दृढीकरण । आणि ते वस्तुचि पाहतां स्वूण । सांगिजैल पूर्ण बोधें तैसें ॥ ६३ ॥ त्यांमाजी प्रथम श्लोकीं आनंदांशें । ब्रह्म बोधिजैल वोळखीमीषें । द्वितीय श्लोकीं चित्प्रकाशें । आणि सत्तांशें तृतीय श्लोकीं ॥ ६४ ॥ तेंचि आठा श्लोकीं जाणिजे । सर्वत्र ब्रह्मदर्शन कीजे । तयावरी श्लोकद्वयें वाखाणिजे । स्थिति सहजें ते सहजस्थिति ॥ ६५ ॥ यावरी स्थिति तेचि दृढीकरण । यावत्समाप्ति हें प्रकारण । मध्यें इतर भंगीं निरूपण । कीजैल ज्ञान श्रोते हो ॥ ६६ ॥ परस्परें प्रकरणांची संगति । निरूपिली श्रीरामाची प्रश्नोक्ति । आतां निरूपण श्रीवसिष्ठ जें करिती । तें सावधान श्रोतीं परिसावें ॥ ६७ ॥

दृश्यदर्शनसंबंधादुद्भवेत्परमं सुखम् । तदैकांतिकसंवित्या मनोनाशः परं पदम् ॥ १ ॥

---

१ मी देह आहें असा जो भ्रम तें स्वप्न. २ जागा असणारास. ३ ब्रह्मज्ञान झाल्यामुळें. ४ प्रकरण समाप्तेपर्यंत. ५ विषयसंबंधानें आलेल्या इतर अंगांसंबंधानेंही.

श्रीरामा तुझेनि प्रश्नेंकरुनी । सुखनिर्भर जालें अंतःकरणीं । तऱ्ही आयिक सांगा विस्तारुनी । जोंवरी धणी पावे मन ॥ ६८ ॥ तऱ्ही सहजस्थितीनें असतां । आत्मानुभवें चालतां बोलतां । तेंचि आइकें श्रीरघुनाथा । अपूर्वता इये स्थितीची ॥ ६९ ॥ तरी आत्मयाचें जाणणें । तें अतिसुलभ गा इये खुणें । सोपें आणि सुख पावणें । विटिजेना मनें अनुभवितां ॥ २७० ॥ मनासि तरी अनुभव नाहीं । परी वृत्तिरूप ज्ञानास्तव पाहीं बोली बोललों तो दोष कांहीं । न मनीं देहीं रघुवर्या ॥ ७१ ॥ केवळ शुद्धबुद्धीची जे वृत्ति । ते चैतन्याकारें होतां रघुपती । तेणें आत्मविषयिक अज्ञाननिवृति । होये क्षणाप्रति राघवा ॥ ७२ ॥ अगा तया अज्ञानाचा नाश । होतांचि आत्मस्वरूपप्रकाश । तो स्वयें अनुभव आपणास । सावकाश होतसे ॥ ७३ ॥ यालागीं बुद्धिग्राह्य ह्मणती । हेचि खूण बोलावया रघुपती । येचिविषईं द्वारकापति[1] । पार्थाप्रति बोले गीता ॥ ७४ ॥

संमतिश्लोक ॥ सुखमात्यंतिकं यत्तत् बुद्धिग्राह्यमतींद्रियम् ॥

संमति श्रुति ॥ दृश्यते त्वग्र्यया बुद्ध्या सक्ष्मया सूक्ष्मदर्शिभिः । यन्मनसैवानुदृष्टव्यम् । हृदा मनीषा मनसाभिक्लृप्तो य एनं विदुरमृतास्ते भवंति ॥

यालागीं गा त्रैलोक्यपती । बुद्धिग्राह्य ऐसें ह्मणती । ऐन्हवीं अनुभविजे स्वयें प्रतीती । परी इंद्रियवृत्ति न पावे ॥ ७५ ॥ तरी प्रिय दृश्याचि भेटी । जें कीं दर्शनें स्वयेंचि उठी । दृश्यदर्शनाच्या शंवेटीं[2] । सुखकोटि उद्भवे जें ॥ ७६ ॥ दृश्य देखिली प्रिय वनिता । तियेसीं दर्शनाचा संबंधु होतां । सुख जें होय गा विबुद्धनाथा । आयिकें तत्वतां वर्म सांगा ॥ ७७ ॥ चैतन्य सर्वत्र एकचि असे । तें दृश्यीं स्वतःसिद्धचि वसे । चित्तवृत्ति तें दर्शन ऐसें । तियमाजी भासे चैतन्य ॥ ७८ ॥ होतां दृश्य दर्शनाची भेटि । दोन्ही चैतन्येंसि पडे मिठी । तेथ अज्ञान वळे उठाउठी । सुखकोटि चैतन्यरूपा ॥ ७९ ॥ तें सुख न माये गगनीं । स्वयेंही भरे कोंदुनी । तेव्हां मनवासना जाती निरोनी । दक्ष[3] होनि परमानंदा ॥ २८० ॥ हा भलतयासि अनुभव असे । तो एकांत सेवित्याचा[4] होतसे । एकांतसंवित्ती ह्मणिजे ऐसें । तें सांगों विन्यासें परिस पां ॥ ८१ ॥ घटपटादि जेणें जाणणें । जें स्थूळवृत्तीकरूनि पाहाणें । तें लौकिकज्ञान मी ह्मणें । वृत्तिरूप जाणें एकांतरू ॥८२॥ वृत्तिरूपाचि घटज्ञान असे । परी तत्क्षणींच ते नासे । त्यातें लौकिक ह्मणिजेत असे । स्थिर वसे तें एकांतज्ञान ॥ ८३ ॥ अनेकाकारा जे वृत्तिसंवित्ति । ते लौकिक ऐसें बोलती । एक ब्रह्माकार जे परमांतःकरणवृत्ति । एकांतसंवित्ति ते ह्मणिजे ॥८४॥ दृश्यदर्शनसंबंधेंकरूनि ज्ञान । जें कीं उद्भवे सुख घन । तेंचि निर्वाहक केलिया पर्ण[5] । हेचि खूण एकांताची ॥ ८५ ॥ विषयनाशेंकरूनि नाशलें । ह्मणोनि तें लौकिकज्ञान

---

१ कृष्ण, गीतेंत. २ एकत्र होण्यानें. ३ जी. ४ एकांती झालेलें ज्ञान. 'एकांत सेविती' असा येथें पाठ आहे. ५ अंतःकरणाची शेवटची स्थिति.

जालें । विषयउपाधीनें युक्त भलें । ह्मणोनि आलें लौकिकपणा ॥ ८६ ॥ तेंचि उपाधीच्या त्यागेंकरूनी । निर्वाहातें कीजे संपूर्ण जनीं । तरी तेंचि ज्ञान एकांतपणीं । सुख निर्वाणीं होय ॥ ८७ ॥ तें दृश्यदर्शनयोगेंकरून । तेणें एकांतज्ञानें संपूर्ण । परम सुख उद्भवे जाण । मनोनाशन जेणें होये ॥ ८८ ॥ जेथ मनाचा नाश होये । तेंचि तें परमानंदसुख पाहें । तेंचि आत्मस्वरूप निश्चयें । जें सुख होताहे दृश्यभेटी ॥ ८९ ॥ तरी दृश्य आणि दर्शनव्यक्ति । सांडूनि घेइजे सुखसंपत्ति । केवळ आत्मासुख तें गा सुमती । जाण निश्चिति आन नाहीं ॥ २९० ॥ अगा अखंडज्ञानेंकरून । ज-ही जालें मनोनाशन । त-ही तेंचि परमपद निर्वाण । ब्रह्म पूर्ण तेंचि रामा ॥ ९१ ॥ ऐसेंचि सर्वत्र गा जगजेठी । सकळ दृश्यदर्शनाचिये भेटी । तेंचि पाहातां स्थिरावलेनि दृष्टी । होये भेटी स्वरूपेंसी ॥ ९२ ॥ जें विषयदर्शनें सुख उपजे । तेंचि विषयत्यागें जरी निर्वाह कीजे । तरी तेंचि आत्मसुख जाणिजे । नाहीं दुजें तयाविण ॥ ९३ ॥ सर्वत्रसुखनामें जें जें बोलती । तें तें आत्मसुख जाण विश्वमूर्ती । परी तें अल्प जालें विषयसंगती । विषयिक ह्मणती आत्मसुख तें ॥ ९४ ॥ जैसें एकचि महदाकाश । सर्व जगा देतसे अवकाश । तेणें व्यवहार करिती सावकाश । सुखसंतोष पावती ॥ ९५ ॥ आकाश संबंधेंकरून । घटाकाश मठाकाश भिन्नभिन्न । जालिया तेंचि परिच्छिन्न । सुख संपूर्ण जना नेदी ॥ ९६ ॥ घटाकाशीं काय व्यवहार होईल । किंवा तयामाजी लोक वर्त्ततील । तेथें कोण सुख पावतील । आहरणजळावांचूनियां[1] ॥ ९७ ॥ घटीं जलादिकांचें आहरण । मठीं गृहकर्मादिवर्त्तन[2] । तेथें तितुकेंचि सुख प्राप्त जाण । नाहीं संपूर्ण पूर्णऐसें ॥ ९८ ॥ ऐसेंचि आत्मसुखही येक । तें विषयसंगें जालें अनेक । त्या विषयांसारिखें होय सुख । परी असंख्य संपूर्ण नव्हे ॥ ९९ ॥ परी तें आत्मसुख सर्वत्र जाण । तेंचि विषयसुख ह्मणती नेणोन । ज्ञानी तो तद्रूपें राहोन । सुखसंपन्न सुखत्वें ॥ ३०० ॥ यालागीं हेंचि सुख सर्वत्र पाहीं । दृश्यदर्शनें जें अनपायी[3] । तेंचि अनुभवीं अनुस्यूत[4] देहीं । तेणें पाहीं आत्मसुख ॥ १ ॥ आणीकही आत्मसुखाची खूण । सांगेन विश्वंभरा तुजलागून । ते आइकें येकाग्र करूनि मन । जेणें ब्रह्मज्ञान प्राप्त होये ॥ २ ॥

दृश्यदर्शनसंबंधे सुखसंविदनुत्तमा ॥ दृश्यसंवलितो बंधस्तन्मुक्त्या मुक्तिरुच्यते ॥ २ ॥

अगा दृश्यांसि दर्शन संलग्न[5] । होतांचि सुखस्वरूज्ञान । उद्भवे अतिगहन जाण । थोर जयाहून आन नाहीं ॥ ३ ॥ तेंचि तें सुखस्वरूपज्ञान । तेंचि तें परब्रह्म पूर्ण । दृश्य वेगळें निवडून । स्थिरावोनि घेइजे सुख ॥ ४ ॥ अहो दृश्याचें जें जाणणें । तें होय दर्शनसंबंधेंचि येणें । तेंचि स्थिरावलेनि अंतःकरणें । नाशों नेदिजे घेइजे ऐसें

१ आणलेल्या पाण्याशिवाय. २ घरांतील अनेक प्रकारचीं कर्मे करणें. ३ अविनाशी. ४ सर्वत्र भरलेलें. ५ दृश्य (पहाण्याचा) पदार्थ व दर्शन (पहाणें) यांची गांठ पडल्याबरोबर.

॥ ५ ॥ तेंचि जें दृश्याचें ज्ञान । जालें जेव्हां दृश्याविहीन । त्यासि जालिया स्थिरपण । ब्रह्म परिपूर्ण तेंचि तें कीं ॥ ६ ॥ तेंचि दृश्येंसि जालिया संवलित । तरी तोचि संसार बंध निश्चित । दृश्य दृश्यत्वें सत्य जरी जाणत । तरी तोचि भ्रांत बंधरूपें ॥ ७ ॥ अगा सर्वत्रही ब्रह्मचि असे । ब्रह्मावेगळें अणुमात्रही नसे । परी मध्यें दृश्यत्वें जें भासे । तें मिथ्या ऐसें जाण तूं ॥ ८ ॥ जितुकेंही ज्ञानमात्र जाण । तितुकेंही पूर्ण चैतन्य । दृश्य प्रातिभासिक अध्यस्त हीन । भ्रमेंचि भान स्वप्न जैसें ॥ ९ ॥ तया दृश्यासि युक्त जालें जाण । ह्मणोनि तेंहीं पावलें दृश्यपण । त्याचेनि क्षणिकत्वें क्षणिकपण । पावलें जाण उपाधीयोगें ॥३१०॥ तेंचि दृश्यावेगळें करिबां ज्ञान । जऱ्ही निर्वाहातें कीजे स्थिरावेन । तऱ्ही तेंचि ज्ञान चैतन्यघन । ब्रह्म परिपूर्ण पूर्णत्वें ॥ ११ ॥ तेथें आणीकही येक अनर्थ । जेव्हां तेंचि ज्ञान होये दृश्यसंवलित । तेव्हां तोचि बंध गा सुनिश्चित । दुःखद्वैत संसारिक ॥ १२ ॥ तोचि दृश्याचा योग वेगळा होतां । तोचि शुद्ध गा रघुनाथा । तोचि तो जाण तत्वतां । परम पुरुषार्था पावला ॥ १३ ॥ आणीकही तुज सांगेन स्वूण । जेणें पाविजे ब्रह्म पूर्ण । पावतांचि सुखसमाधान । सच्चिद्धन स्वयें प्राप्त ॥ १४ ॥

शुद्धं सदसतोर्मध्ये पदं लब्ध्वा चलं च तत् । सबाह्यभ्यंतरं विश्वं मा गृहाण विमुंच मा ॥ ३ ॥

दृश्यामाजी जे जे वस्तु संत । घटपटादि जे कीं पदार्थ । ते अस्तिं ह्मणतांचि सत्ता भासत । तेंचि निश्चित ब्रह्मज्ञान ॥ १५ ॥ यालागीं संत वस्तूचा पोटीं । सत्तारूपें ब्रह्मचि उठी । याची विचारमात्रेंचि होय भेटि । पडे गांठि येकत्वें ॥ १६ ॥ घटापटाची आहेपणें जे सत्ता । तेंचि ब्रह्म गा रमाकांता । घटपटत्व त्यजूनि केवळ सत्ता । घेईजे तत्वतां निरंतर ॥ १७ ॥ तैसे असंत जे कीं पदार्थ । ते खपुष्प आणि वंध्यासुत । त्यांचेनि नाहींपणेंचि ब्रह्मसंत । प्राप्त सुनिश्चित निरंशत्वें ॥ १८ ॥ जें पदार्थजाताचें नाहींपण । तेंचि जाण निखिल चैतन्य । विश्वाच्या अभावें आनंदघन । ब्रह्म परिपूर्ण पूर्णत्वें ॥ १९ ॥ आणि नाहींपण जेथ स्फुरत । जेणें नाहींपण जाणिजेत । तेंचि ब्रह्म सदोदीत । जाण निश्चित आनंदरूपा ॥ ३२० ॥ आणि सताअसतांमाझारी । शुद्ध ज्ञान जें कीं रावणारी । अचळ अढळ सर्वांपरी । सबाह्य अंतरीं तेंचि येक ॥ २१ ॥ संत असंत ऐसें जाणिजे । असंत संत जेथें भासिजे । तेंचि तें ब्रह्म जाण सहजें । श्रीरघुराजें जाणावें पैं ॥ २२ ॥ अथवा सत्‌शब्दें द्रष्टा जाणिजे । असंत तें तंव दृश्य सहजें । या दोहींमाजी असोनि प्रकाशिजे । तेंचि निर्व्याजें अचळ वस्तु ॥ २३ ॥ ब्रह्मावेगळें अचळ नाहीं । तेंचि तें सर्वत्र येक पाहीं । विचारें पाहातां लाभे सर्वत्रही । पद अनपायी तेंचि तें कीं ॥ २४ ॥ दृश्य तें दृश्यत्वें सरे । दृश्याभावें द्रष्टाही वोसरे । मध्यें अचळपण जें वावरे । जाण निर्धारें तेंचि ब्रह्म ॥ २५ ॥ ऐसें

१ स्वप्नांतील पदार्थांप्रमाणें भ्रमरूप. २ आहे. ३ निष्कपटपणें, सरळपणें.

स्वस्वरूप सभरांभरी । पावल्या बाह्याभ्यंतरीं । विश्व हें मध्येंचि भासे लहरि । नको रावणारी घेवों त्यातें ॥ २६ ॥ अथवा भासे तें विश्व सांडावें । इयेहीं पडों नको हांवे । सांडीमांडी सोडोनि राहावें । स्वयें अनुभवावें स्वस्वरूपा ॥ २७ ॥ यया विश्वाचें सांडणें मांडणें । सांडोनियां निवांत राहाणें । जें कीं सद्सतामाजी पाहाणें । पद लाधणें तेंचि स्थिति ॥ २८ ॥ आणीकही येक खूण । सांगेन तुज अतिनिर्वाण । तेचि जाणोनि राहें लीन । समसमान पूर्णत्वें ॥ २९ ॥

जडाजडदृशोर्मध्ये यत्तत्वं पारमार्थिकम् । अनंताकाशहृदयं तत्समाश्रय सर्वदा ॥ ४ ॥

घटपटाचें जें वृत्तिज्ञान । जें जाणिजे घटपटादिभान । विश्वभास भासे आपण । तें ज्ञान जाण जडरूप ॥ ३३० ॥ ज्ञान तऱ्ही सर्वत्र येकाचि असे । परी जड जालें दृश्य-जडांशें । ह्मणोनि जड बोलिजेतसे । अजड तें ऐसें स्वरूपभूत ॥ ३१ ॥ येक इंद्रियांच्या वृत्ती । तें जड जाणा रघुपती । येक साक्षित्वें साक्षस्फूर्ति । इंद्रियवृत्ति नसोनियां ॥ ३२ ॥ इंद्रिय आणि इंद्रियवृत्ति । येही पदार्थ जें प्रकाशिजेती । यातें जाणिजे संविति । तें जाण रघुपती अजडज्ञान ॥ ३३ ॥ जडज्ञान तें विषयस्फूर्ति । अजडज्ञान तें द्रष्टा सर्वार्थी । द्रष्टदृश्यातें प्रकाशी जें संविति । तें जाण रघुपती परमतत्व ॥ ३४ ॥ तेंचि कैसें पुससी रघुनाथा । तरी तें अनंत अपरिमित सर्वथा । नाहीं त्रिविध परिच्छेद ताता । तेंचि तत्वतां अनंतवाच्य ॥ ३५ ॥ या दोन्हीं ज्ञानांचें लक्षण । सांगितलें तुज संपूर्ण । यांमाजी जें पारमार्थिक ज्ञान । तेंचि जाण परमतत्व ॥ ३६ ॥ ऐसें परिपूर्ण बाह्याभ्यंतरीं । परिच्छेद न पवे कोण्हेपरी । अवकाशालागूनि न उरे उरी । अतिनिर्धारीं निघोटरूपें ॥ ३७ ॥ जयामाजी दुर्ज्ञेय न शिरे । येकत्वें गणनेसि न पुरे । ऐसें सुखरूप जें उरे । जाण निर्धारें परब्रह्म तें ॥ ३८ ॥ तेंचि आश्रयेंहूनि राहें सर्वदा । तद्रूप भोगीं परमानंदा । जाणुनियां सुखस्वादा । नाहीं मर्यादा जयासी ॥ ३९ ॥ तेथें नेणणें ना जाणणें । नाहीं भोगणें ना पाहाणें । नाहीं तेथें घेणें देणें । अनुभवणें परमानंदु ॥ ३४० ॥

द्रष्टृदृश्यस्य संबंधो बंध इत्याभिधीयते । द्रष्टा दृश्यवशाद्बद्धो दृश्याभावे विमुच्यते ॥ ५ ॥

हें नेणोनियां रघुपती । द्रष्टा दृश्याचि साज देखती । तोचि बंध जाण सर्वार्थी । विश्व देखती साचारपणें जे ॥ ४१ ॥ दृढ जालिया विश्वभावना । तोचि संसारबंध गा रघुनंदना । द्रष्टा जालिया दृश्य आधीना । पावे बंधना सांसारिका ॥ ४२ ॥ हें देहादिदृश्य सत्यत्वें स्फुरतां । द्रष्टेपण आपणा मानितां । तोचि भव तेचि बंधता । संसार पुरता आंगीं वाजे ॥ ४३ ॥ जंव जंव दृश्य हें साच स्फुरे । तंव तंव पडे संसारगुंफिरें । मग तें आकल्पांत न सरे । तेथेंचि मरे उपजे पुढती ॥ ४४ ॥ कोशकाराचियेपरी ।

---

१ जिकडे तिकडे. २ टाकणें आणि घेणें. ३ काल, देश आणि वस्तु असे तीन प्रकारचें. ४ आश्रय करून. ५ संसारांत गुरफटणें. ६ सुरवंट किंवा घुल्याप्रमाणें.

सत्यत्वें तंतूचें घर करी । शेखीं गुंफे तेणेंचिकरीं । मरणावरी तेथेंचि पावे ॥ ४५ ॥ नातरी ऊर्णनाभिका जैसा । ऊर्णा वमूनि करीफांसा । तेणेंचि गुंफे स्वयें सरसा । मरणवळसां पडतसे ॥ ४६ ॥ तैसें देहादिदृश्यमनोविलास । मनकल्पीत हे सकळांश । ते यथार्थ कल्पितां पडे पाश । पावे सावकाश बंधनातें ॥ ४७ ॥ आपणाचि कल्पूनि दृश्य जाणा । तेणेंचि बंधन पावे जैसी ऊर्णा । तिये ऊर्णेचेपरी पावे बंधना । आपण आपणा बांधोनि घे ॥ ४८ ॥ तेचि दृश्यमात्र न स्फुरतां । स्वयें वरी आपुली मुक्तता । तोचि मुक्त जाण गा रघुनाथा । दृश्य तत्वतां न स्फुरे जया ॥ ४९ ॥ वास्तव वस्तूचेनि ज्ञानें । प्रपंचु न देखिजे मनें । तरी तेचि स्वरूपस्थिति जाणणें । नाहीं करणें आन कांहीं ॥ २५० ॥ आणीकही ब्रह्माचें लक्षण । सहजास्थिति जे कीं परिपूर्ण । ओळखोनि बाणे जाण । तेंचि अनुसंधान परियेसीं ॥ ५१ ॥

द्वयोर्मध्यगतं नित्यमस्ति नास्तीति पक्षयोः । प्रकाशकं प्रकाश्यानामात्मानं शुद्धमाश्रय ॥ ६ ॥

जो जो दृश्यपदार्थ देखिजे । श्रवणीं जो जो आइकिजे । तेथें तेथें अस्तित्व साच घेईजे । वस्तु जाणिजे आहेपणें ॥ ५२ ॥ जे जे सत्तारूपें वस्तु पाहे । तेथें अस्तित्वें ब्रह्मचि आहे । जेथें ना ह्मणों जाये । तेथेंचि आहे सर्व भावें ॥ ५३ ॥ सर्वांचें जे अभावरूप । सर्व निराशें उरे निष्कंप । तेंचि तें ब्रह्मरूप । अतिअमूप उदारपणें ॥५४॥ अस्तिनास्तीति या पक्षद्वयीं । मध्य भासे जें अक्षयी । सत्य व्यापक जें सर्वही । जाण अनपायी तेंचि ब्रह्म ॥ ५५ ॥ जे जे प्रकाशमंत पदार्थ । अग्नि चंद्र आणि भास्वंत । विद्युल्लता मनादिसमस्त । यांतें प्रकाशित स्वप्रकाश जें ॥ ५६ ॥ सर्वां प्रकाशांचें प्रकाशन । तोचि आत्मा व्यापक परिपूर्ण । शुद्ध निर्मळ निरंजन । चैतन्यघन पूर्णानंद ॥ ५७ ॥ तेंचि आश्रयावें गा रघुपती । निरंतर राहावें तेचि स्थिति । सांडूनियां दृश्यप्रतीति । अधिष्ठानीं मति स्थिर करीं ॥ ५८ ॥ आणीकही लक्षण गा विश्वमूर्ती । सांगेन तुज त्रिदशाधिपती । तेणें होय ब्रह्मप्राप्ति । सहज स्थिति पावसील ॥ ५९ ॥

द्रष्टृदर्शनदृश्यानि त्यक्त्वा वासनया सह । दर्शनं प्रथमाभासमात्मानं केवलं भज ॥ ७ ॥

हें द्रष्टा दृश्य आणि दर्शन । आणि दृश्याचिया वासना जाण । टाकूनि एकसमयापन्न पहाती खूण ते आइका ॥ २६० ॥ दर्शन अहंकारु मनासंकलित । जो कां आपुला अहंकारु निश्चित । तोचि द्रष्टा जाण इत्थंभूत । चैतन्यमिश्रित जाण कां जें ॥ ६१ ॥ तेणें प्रकाशिली मनोवृत्ति । घेऊनि चक्षुरिंद्रियाची वृत्ति । जे असे दृश्य प्रकाशिती । दर्शन ह्मणती जयातें ॥ ६२ ॥ जेणें दर्शनें जें प्रकाशिजे । तयातें दृश्य ऐसें ह्मणिजे । या त्रयातें निःशेष विसरिजे । आणि टाकिजे वासनेतें ॥ ६३ ॥ सर्व वासनांसहित

---

१ ज्याच्या पोटांतून सूत येतें तो कोळी. २ आहे आणि नाहीं या वादांत ३ सूर्य; तेजस्वी पदार्थ. ४ दाखवितां येय नाहीं असा.

जाण । टाकिजे द्रष्टा दृश्य दर्शन । दर्शनापूर्वीं जें भासन । तेंचि ज्ञान ब्रह्मरूप ॥ ६४ ॥ द्रष्टा दृश्याकार जंव नव्हे । दर्शन दृश्यातें जंव न पवे । तंव स्वप्रकाशें जें जें संभवे । तेंचि जाणावें परब्रह्म ॥ ६५ ॥ दृश्यद्रष्टादर्शनातें । ये त्रिपुटीपूर्वीं प्रकाशी यांतें । प्रकाशमंत स्वतःसिद्धातें । जाण निरुतें परब्रह्म ॥ ६६ ॥ अगा द्रष्टादृश्यदर्शनादि । प्रकाशमंत स्वयें अनादि । तेंचि परब्रह्म जाण सुबुद्धी । जो कां निरवधि परमानंद ॥ ६७ ॥ दर्शन हो दृश्याची भेटि । तंव पहिलेंचि जें प्रकाश प्रगटी । तेंचि ब्रह्म गा नेटीपाटीं । जाण जेगजेठीं रमाकांता ॥ ६८ ॥ अगा याचि इंद्रियांच्या वृत्ति । दृश्यातें जंव झोंबती । तयापूर्वीं जे प्रकाशस्थिति । जाण सुमती तेंचि चैतन्य ॥ ६९ ॥ हा नेत्र जंव रूपातें प्रकाशी । तंव आधींच जे रूप प्रकाशी तयाशी । प्रकाशमंत अनिर्देशी । तें ब्रह्म ऐसी जाण खूण ॥ ३७० ॥ दर्शनें जों दृश्यासि झोंबे । तों त्रिपुटीपूर्वींच जें उभें । स्वप्रकाशें स्वयें शोभे । दृश्यप्रभे न मिळे जें कां ॥७१॥ द्रष्टा दृश्य आणि दर्शन । हें वासनासहित टाकून । ययापूर्वीं जें कां भासन । तेंचि चैतन्य जाणावें पां ॥ ७२ ॥ तोचि आत्मा व्यापक परिपूर्ण । द्वैतादि[1]भावविहीन । केवळ नित्य निरंजन । आनंदघन उपासिजे ॥ ७३ ॥ तयाचें भजन तें ऐसें ॥ आपणेंविण दुजें न भासे । तयाविण अणुमात्रही नसे । स्वयें समरस कर्पूराग्नि जैसा ॥ ७४ ॥ अग्निकर्पूराच्या मिळणीं । एकत्वें नुरतीच गा दोन्ही । ना न येतीच एकपणीं । लेशा निर्वाणीं नुरोनियां ॥ ७५ ॥ जैसा अवकाश अवकाशीं समरसे । तेथें नुरती नामरूपाचे ठसे । कां वीचि[2] जळीं उल्हासे । होय समरसें जळचि एक ॥ ७६ ॥ नातरी गंध आणि परीमळ । कीं प्रकाश आणि उजाळ । सुवर्ण कांतीसि होय मेळ । नुरे अढळ द्वैतांचें तेथें ॥ ७७ ॥ कां माणीक आणि कीळ । रत्न आणि झळाळ । तें येकत्वें नव्हती वेगळ । तैसें निर्मळ भजन जाण ॥ ७८ ॥ नातरी वाचा आणि अर्थ । अर्थत्वें वाचाचि येकत्व । कां वर्ण आणि गीत । स्वयें येकार्थ येक जैसें ॥ ७९ ॥ कां सोनें आणि कांकण । तें सोनपणाचें अभिन्न[3] । तैसें ब्रह्म नेणें आपणाविण । जाण भजन हेंचि मुख्य ॥ ३८० ॥ मुळीं भजन जें ऐसें । तयाचा अर्थ ऐसा असे । सूर्यासि सूर्य प्रकाशी जैसें । भजिजे तैसें तयापरी ॥ ८१ ॥ कां चांदणें भजे चंद्रासी । कां प्रकाशु भजे दीपासी । नातरी शर्करा गोडियेसी । अनन्य[4] ऐसी भजनदशा ॥ ८२ ॥ तयापरी आत्मभजन । श्रीरघुनाथा जाण अभिन्न । उपचारें जे बोल जे बोलिजे भजन । परी अनन्य पण येकत्वाचें ॥ ८३ ॥ सर्वदा जे कीं ब्रह्माकारता । प्रपंचु सत्य न भासे दृष्टी पाहतां । तेंचि भजन गा रघुनाथा । जाण तत्त्वतां सामरस्याचें ॥ ८४ ॥ सर्वदा ब्रह्मपणेंचि असणें । देहबुद्धीसि कदा न स्पर्शणें । तयातेंचि मी भजन

---

१ दुजेपणा वगैरे कल्पना जेथ नाहींत असा. २ लाटा. ३ वेगळी नसणारी. ४ एखादा पदार्थ दुसऱ्या पदार्थांत मिळाला असतां तद्रूपता पावल्यामुळें जो नाहींसेपणा होतो तो.

ह्मणें । येर तें करणें साधनाभ्यास ॥ ८५ ॥ विषय ध्यावयाची वासना । आणि टाकूनि द्रष्टा दृश्य दर्शना । एतत्पूर्वी ययाच्या भाना । घेईं चैतन्या शोधूनियां ॥ ८६ ॥ मग तया चैतन्याच्याच ठायीं । आपणासि अभेदें राहीं । तेंचि भजन सर्वदा पाहीं । जाण अनपायीं ब्रह्मस्थिति हे ॥ ८७ ॥ आणीकही आइक आनंदमूर्ती । आत्मवोळखी सांगों गा तुजप्रति । जियेची असे सकळां अनुभूति । परी ते नेणती अतिभ्रमें ॥ ८८ ॥ सकळांसि तरी अनुभव असे । परी नेणती अज्ञानवशें । आणि उघडें तरी स्वप्रकाशें । तैसें न भासे नानासाधनीं ॥ ८९ ॥ ऐसें सुगम आणि सोपारें । पाविजे गुरुमुखें भक्तीचेनि द्वारें । कांहींच न लागती साधनांतरें । तें स्वयेंचि अवतरे आपणामाजी ॥ ३९० ॥ ऐसी येकी खूण जगन्नाथा । तुजलागीं सांगेन अपूर्वता । ते खूण जाणतांची आत्मता । बाणे तत्वतां ब्रह्मानंदु ॥ ९१ ॥ तेचि आइकतां येकाग्र । मन हें करूनियां अव्यग्र । ऐकतांचि ब्रह्म समग्र । पाविजे अपार सच्चिदानंदु ॥ ९२ ॥ तंव श्रीराम ह्मणती गुरुमूर्ती । येव्हढी ब्रह्मखुणेची स्थिति । इयेच्या श्रवणें पावलों विश्रांति । सुखसंपत्ति परमानंदु ॥ ९३ ॥ मा ते खूण प्रत्यक्ष पावलिया । कोण सुख श्रीरघुराया । हे तंव न कळे जी स्वामिया । तरी सांग तया उपायासी ॥ ९४ ॥ तंव वसिष्ठ ह्मणती गा जानकीपती । तया सांगेन आत्मखुणेची मति । तेचि जाणतां ब्रह्मस्थिति । होय त्रिजगतीं ब्रह्मरूपः ॥ ९५ ॥ ते स्थिति पावतांचि क्षणीं । जे उघड ब्रह्मसुखाची खाणि । ते आतां येकाग्र आकर्णीं । सामाधानीं आरूढ जेणें ॥ ९६ ॥

निद्रादौ जागरस्यांते यो भाव उपजायते । तं भावं भावयन्साक्षादक्षयानंदमस्नुते ॥ ८ ॥

तरी जागृतीअवस्थेच्या अंतीं । जेव्हां प्रवेश करितसे सुषुप्ति । तेव्हां होय जे सुखप्राप्ति । ब्रह्म मूर्ती तेंचि ब्रह्म ॥ ९७ ॥ अहो जागृति जातां जातां । स्वयें सुषुप्ति प्रवेशूं लागतां । या दोहींचां संधीं निर्विकारता । तेंचि तत्वतां ब्रह्म जाण ॥ ९८ ॥ सर्व देहादिइंद्रियप्रपंचाच्या । लोपें संसारु जेथें सर्व वृत्तींचा । तोचि उठावो गा समाधीचा । निर्विकल्पाचा जाण तूं ॥ ९९ ॥ सर्व प्रपंचाच्या उपरमें । लय विक्षेप[१] जेथें शमे । तेथ उरिजे केवळ ब्रह्म । साधन निमे जिये ठाई ॥ ४०० ॥ ऐसें केवळ आनंदरूप । तेंचि परमात्मस्वरूप । सुखें सुख कोंदे अमूप । तेंचि स्वरूप परब्रह्म ॥ १ ॥ ऐसी हे वेदांतगर्भीची उक्ति । अनुभवीं ते अनुभवें जाणती । तैसीच जाण हे स्थिति । भिन्न गति असेचिना ॥ २ ॥ जरी जागृतीच्या अंतीं । आदिप्रवेशु जो सुषुप्तीं । तेव्हां इंद्रियवृत्ति उपरमती । इंद्रियें लय पावती बुद्धींद्रियवर्गें ॥ ३ ॥ पूर्ण लय तरी नाहीं जाला । तरी वृत्तीं विषयव्यापार टाकिला । हेयउपादानाचा मेळा । सर्वही गेला वृत्तीपासाव

---

१ एकाद्या पदार्थाचें वास्तविक रूप मनांत न स्मरतां अवास्तविक रूपानें तो पदार्थ मनामध्यें भासू लागणें तो. २ पुढें होणार पूर्वी सांगितलेलें.

॥ ४ ॥ जया इंद्रियांच्या ज्या वृत्ति । त्या इंद्रियांमाजी प्रवेशती । इंद्रियें मनामाजी लय पावती । संकल्पवृत्ति मन सांडीं ॥ ५ ॥ जैसें अंशुमाळीच्या अस्तमानीं । किरणें प्रवेशती मंडळस्थानीं । मंडळ सामावलें तरणीं । उरे निर्वाणीं सविता येकु ॥ ६ ॥ कां पांगुळ स्वार नेटका । तो जात्या अश्वारूढ जाला निका । तेव्हां त्रिभुवन हिंडतां तया देखा । नाहीं लेखा गमनाचा ॥ ७ ॥ नातरी करचरणविहीन । सूर्यरथीं बैसतां अरुण । तया क्षणीं हिंडतां त्रिभुवन । नाहीं लेखा गमनागमनाचा ॥ ८ ॥ नातरी पवन जालिया साह्यभूत । अग्नि करी त्रैलोक्य भस्मांत । तोचि वायु नसतां सामर्थ्यहत । भस्मीभूत स्वयेंचि होये ॥ ९ ॥ तैसें इंद्रिय सारथि मनासी । तोंचि अश्वरथस्थानीं तयासी । मग पंगु अंगिकारितां त्यासी । त्रैलोक्यासि न पुरे मग ॥ ४१० ॥ तेंचि इंद्रिय साह्य नसतां । मनाची सहज होय स्थिरता । सांडीं संकल्पाचिया लता । बुद्धीरूपता पावलिया ॥ ११ ॥ साह्य असतां पंगूची थोरी । साह्य नसतां अकर्त्ता भिकारी । तैसें मग पंगु इंद्रिय साह्यकारी । अति व्यापारी दक्ष होय ॥ १२ ॥ इंद्रियांविण होय निचेष्टित । सांडीं व्यापारु विकल्प संकल्पान्त । ह्मणोनि इंद्रियें नेमावीं हें मत । बोले अच्युत अर्जुनेसी ॥ १३ ॥

संमतिश्लोक ॥ तस्मात्त्वमिंद्रियाण्यादौ नियम्य भरतर्षभ । तस्माद्यस्य महाबाहो निगृहीतानि सर्वशः । इंद्रियाणींद्रियार्थेभ्यस्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता । यदा संहरते चायं कूर्मोऽगानीव सर्वशः ॥

ऐशा इत्यादि संमति । त्या येथें ल्याहाव्या किती । इंद्रियनिरोधें कुंठित गति । होय सर्वार्थीं मनाची पैं ॥ १४ ॥ येथें कोणी ऐसें करी भावन । श्रीरामावतार वर्त्ततां जाण । कृष्ण पूर्वीही नसतां कोण । संमतिप्रमाण पूर्वासि हें ॥ १५ ॥ रघुनाथाउपरि कृष्णावतार । याचें बोलणें भविष्योत्तर । तें येथें कैसें संमत्यंतर । हा न घडे विचार सर्वार्थीं ॥ १६ ॥ तरी ययाचा विचारु ऐसा असे । पूर्वापर येथें कांहीं नसे । अवतार येकामागें येक होतसे । खंडणा न वसे कोण्हे काळीं ॥ १७ ॥ श्रीरामाचें जालें अवतरण । तत्पूर्वीं होय श्रीकृष्ण । जैसें वारामागें वार संपूर्ण । न कळे खूण आद्यंताची ॥ १८ ॥ शनिवाराउपरि रविवार वसे । तंव मागेंही येक गेलाचि असे । यालागीं गेले अनादि ऐसे । अवतार तैसे सर्वोत्तमाचे ॥ १९ ॥ धर्मसंस्थापनाकारणें । आदिपुरुषें अवतार धरणें । अवतारें विश्वाचें पाळणें । यालागीं न ह्मणें कांहीं ऐसें कांहीं ॥ २० ॥ आणीकही येक विचार । सकळांहूनि वेद अनादितर । तोही भविष्य बोले संमत्यंतर । कथा सार जनकादिकांची ॥ २१ ॥ वरुणहरिश्चंद्रादिकसमस्त । भविष्यचारित्रें बोले वेद महंत । ह्मणोनि दूषण नाहीं किंचित् । भविष्यार्थ असे ऐसा ॥२२॥ यालागीं इंद्रियनियमनें मनोव्यापार । राहिल्या उरे निर्विकार । हें सर्वही सिद्धांताचें

१ अतिशय अनादि (आदि नाहींत असे) २ जागृति, स्वप्न व सुषुप्ति या तीनें अवस्था.

सार । नाहीं विचार आन कांहीं ॥ २३ ॥ ह्मणोनि सर्वेंद्रियांच्या वृत्ति । विषयव्यापार सर्व टाकिती । सर्वही मनाच्या ठाईं वस्ती पावती । स्थिरावती हृदयाकाशीं ॥ २४ ॥ इंद्रियांचे स्थिरावलेपणें । मनें सर्व व्यापार टाकणें । सुषुप्ति नसतां अनुभवणें । सुख भोगणें तुर्य जें कीं ॥ २५ ॥ निद्रेमाजी तरी सुख असे । परी तें नेणिजे अज्ञानांशें । दोहींच्या संधीं सावकाशें । सुख उल्हासे परमानंदु ॥ २६ ॥ तें तरी आत्मसुख निरवडी । परी गुरुमुखेंविण नेणती बापुडीं । तऱ्ही तेंचि अनुभवोनि गोडी । राहें परवडी स्थिरावुनी ॥ २७ ॥ निर्विकल्पदशेचें लक्षण । तें तुज सांगितलें गा संपूर्ण । आणि ये दशेचें फावे जरी चिन्ह । तरी सांग न्यून काय येथें ॥ २८ ॥ येथें सुखाची सुखसंपत्ति । सुखभरें कांहींच नेणती । येकें उठविल्या भोजना प्रति । परी नुठती सुखभरें ॥ २९ ॥ तया सुखासि विक्षेप होतां । विक्षेपकर्त्याच्या करूं धांवे घाता । येव्हडी सुखाची सुखरूपता । तें सांग तत्वतां कोण सुख ॥ ४३० ॥ मैथुनादिविषयसुख । तें नावडे तयासि देख । तेथ इतर भोग अनेक । तेही सकळीक काय इच्छी ॥ ३१ ॥ तेथें लय ह्मणावा तरी नाहीं सुषुप्ति । विक्षेप तरी न भासे विश्वस्थिति । मी येक द्रष्टा भोक्ता हे प्रतीति । न स्फुरती त्या सुखाविण ॥ ३२ ॥ आपणेंसि सुखरूप जाला । तेणें भोक्ताभोग्यभोगाला । विश्वस्वप्न निःशेष मावळला । नेणे मेळा इंद्रियांचा ॥ ३३ ॥ सर्वां वृत्तींच्या उपसंहारें । केवळ निरुपाधिक जें सुख उरे । तेंचि आत्मसुख जाण निर्धारें । जेथें नुरे अवस्थात्रय ॥ ३४ ॥ तैसें जागृतीचेनि उपरमें । सर्व विक्षेप मात्र विरमे । निद्रा होतां लयही शमे । मध्यें निःसीम उरे तें ब्रह्म ॥ ३५ ॥ लय विक्षेप निःशेष नाहीं । सुखानुभव तो जागता पाहीं । तोही ब्रह्मस्थिति अनपायी । हें अनुभवें ठाईं ठेविलें[1] असे ॥ ३६ ॥ ह्मणोनि जागृतीच्या अंतीं । आरंभु होतांचि सुषुप्ती । जो भाव उपजे गा रघुपती । तेंचि स्थिति परमानंदु ॥ ३७ ॥ तो लय विक्षेपाचेनि अभावें । सहजचि ब्रह्मस्थिति स्वयें पावे । तो सुखभाव तेचि वस्तु जाणावें । तेथें नेणवे दुजें कांहीं ॥ ३८ ॥ तो भाव भावितांचि साक्षात । तोचि अनुभविता सदोदीत अक्षयानंद अपरिमित । भोगी संतत ब्रह्मानंदु ॥ ३९ ॥ जया सुखासि कालत्रयीं । आणुमात्र सर्वथा नाश नाहीं । तोचि तो अक्षयानंद पाहीं । भोगीं अनपायी श्रीवल्लभा[2] ॥ ४४० ॥ अथवा सुषुप्तीच्या अंतीं । जेव्हां आवर्त्तता कां जागृति । तेव्हां होतसे सुखप्राप्ति । जाण रघुपती तेंचि चैतन्य ॥ ४१ ॥ सुषुप्तीसि लय पूर्ण असे । नेणोनि परी सुखानुभव वसे । तेंचि सुषुप्ति सरतां मध्यदशे । जागृति नसे पूर्ण जेथें ॥ ४२ ॥ लयापासनि जरी उठिला । विक्षेपावरी तरी नाहीं आला । मध्येंचि स्थितीनें राहिला । तोचि भला परमानंदु ॥ ४३ ॥ तेथूनचि माघारेंही नवजावें[3] । सुषुप्ति वरपडें[4] न व्हावें । पुढें जागृतीवरी न यावें । विक्षेप

---

१ ठाईं ठेविलें=जाणणें. २ हे लक्ष्मीकांता रामा । ३ जाऊं नये. ४ गुंतलेला.

पावे जेणेंकरुनी ॥ ४४ ॥ यालागीं मध्यस्थितीच्या पोटीं । देऊनि धैर्योंसि[1] मिठी । तेथें राहावें गा नेटिपाटीं । सुखकोटि सुखानुभवें ॥ ४५ ॥ जागृति सुषुप्तीचां संधीं[2] । जें सुख उपजे गा निरवधि । तेंचि साक्षात् केलिया सुबुद्धी । आनंदाब्धि प्राप्त स्वयें ॥४६॥ साक्षात् ह्मणिजे तें ऐसें । हें सुख सर्वांसि तन्ही होतसे । परी नेणती अज्ञानवशें । परोक्ष ऐसें जालें तयां ॥ ४७ ॥ प्रत्यक्ष असोनि हें नेणिजे । तेंचि परोक्ष ऐसें जाणिजे । ह्मणोनि परोक्ष सर्वांसि सहजें । जाण निर्व्याजें तेचि खूण ॥ ४८ ॥ जैसा कंठींचा माणि । न जाणे ना देखे नयनीं । तेंचि परोक्ष जाण कोदंडपाणी । सर्व जनीं अनुभविजे ॥ ४९ ॥ आपण आपणा जवळिं असतां । नवांचि गणना स्वयें करितां । दहावा न गणी स्वयें असतां । तेचि परोक्षता जाण विष्णो ॥ ४५० ॥ तैसाचि आत्मा सर्वांसि प्रत्यक्ष असे । अणुमात्रही व्यवधान नसे । तो आपणचि असोनि नेणती पिसे । परोक्ष ऐसें याचें नाम ॥ ५१ ॥ तैसेंचि जागृतीच्या अंतीं । आणि सुषुप्तीच्या आदि जे सुखप्राप्ति । ते साक्षात असोनि अपरोक्षगति नेणोनि करिती जगभ्रम ॥५२॥ तेंचि सुख आत्मत्वें जाणुनी । तैसेंचि राहिजे वोळखोनी । ते सुखरूपींचि राहिजे बुडोनी । साक्षात् जनीं त्यातें ह्मणिजे ॥ ५३ ॥ याचें साक्षात् करणें । अथवा ऐसें व्याख्यान जाणणें । सुषुप्तिजागराचा संधी पावणें । तो भाव करणें अनुभवारूढ ॥५४॥ 'तं भावं भावयन्'[3] ऐसें । मूळीं ग्रंथार्थीं बोलिलें असे । तया सुखाकार होणें सर्वांशें । साक्षात् ऐसें तया नांव ॥ ५५ ॥ जो आपुलाचि स्वरूपानंदु । पावला होता परोक्षवादु । तोचि तदाकारें अक्षयानंदु । स्वतः सिद्ध साक्षात् तो ॥ ५६ ॥ तो भाव भावितांचि क्षणीं । साक्षात् अक्षयानंदाची घणी । भोगी भोक्तेपणेंविण निर्वाणी । जनीं वनीं तद्रूपेंचि ॥ ५७ ॥ ऐसे स्वस्वरूपचि जाणणें । सांगितले प्रकारें येणें । तद्रूपें राहातां जे स्थिति बाणे । तेही लक्षणें सांगों आतां ॥५८॥ आठै श्लोकीं स्वरूपवोळखी । सांगितली तुजप्रति निकी । तद्रूपें राहाणें स्थिति येकी । सांगों अलौकिकी जे दुर्लभा ॥ ५९ ॥ तेही श्लोकद्वयेंकरूनि आतां । स्थिति सांगों गा रघुनाथा । श्रवणमात्रेंचि स्थिरता चित्ता । वरी तत्वतां अनयासें ॥ ४६० ॥

प्रशांतसर्वसंकल्पा या शिलावदवस्थितिः । जाग्रन्निद्राविनिर्मुक्ता सा स्वरूपस्थितिः परा ॥ ९ ॥
अहंतां वर्जयित्वैकां शिलाया हृदयं हि तत् । अनमस्कं महाबाहो मन्मयो भव सर्वदा ॥ १० ॥

सर्व संकल्पाची जे शांति । देहादिइंद्रियें आणि मति । अहंकारमुख्यअंतरगति । ते न भासती जिये ठाईं ॥ ६१ ॥ आणि बाह्यही नानापदार्थ । घटपटादिकरूनि समस्त । विश्वपरंपरा स्वर्ग मृत्य । आणि समस्त व्यक्तिमात्र ॥ ६२ ॥ इत्यादि न स्फुरे मनासी । तेचि संकल्पशांति अतिशयसी । निघोट अछिद्र शिळा जैसी । चेष्टा तैसी गेली त्याची

१ धैर्यानें निश्चय करून. २ निद्रेंतून मध्यें धड निद्राही नव्हे, आणि धड जागेपणाही नव्हे, त्या दोहोंतून वेगळी अशी जी स्थिति ती. ३ 'स्थिति जाणली असतां.'

॥ ६३ ॥ निचेष्ट अनीह जयापरी । पर्वत राहे जैसा अंतरीं । संकल्पशून्यता शिळेचियेपरी । बाह्याभ्यंतरीं अतिशुद्ध ॥ ६४ ॥ एक घेणें एक न घेणें । अथवा पदार्थाकारत्वें स्फुरणें । हें निःशेष नाहीं तैं जाणण । निर्विकल्प ह्मणणें या नांव ॥ ६५ ॥ पदार्थ यथार्थपणें स्फुरे । तेथेंचि सांडी मांडी उरे । तोचि संकल्प जाण निर्धारें । इत्यादिक न स्फुरे तोचि निर्विकल्प ॥ ६६ ॥ ऐसिया संकल्पाच्या लहरी । मालवती अनेका हारी । मागुतां नुपजती क्षणांतरीं । जाण सर्वांपरी निर्विकल्प ॥ ६७ ॥ ऐसी संकल्पाची प्रशांति । राहे शिळेचियापरी अवस्थिती । एकें ब्रह्मेंविण नाहीं स्फुर्ति । जेथ लय पावती जागरनिद्रा ॥ ६८ ॥ सर्वही इंद्रियांच्या वृत्ति । स्थूळ पदार्थ बाह्य घेती । ययाचें नाम जाण जागृति । विक्षेप ह्मणती ययातेंचि ॥ ६९ ॥ हा विक्षेप जेथ निःशेष सरे । आणि लय सुषुप्ति जेथ नुरे । कषायदोष नव्हती निर्धारें । तेंचि स्थान खरें ब्रह्मस्थितीचें ॥४७०॥ इंद्रियांच्या वृत्ती करून । न करिजे स्थूळसूक्ष्मपदार्थग्रहण । सर्वांचा लय होय संपूर्ण । सुषुप्ति जाण तिये नांव ॥ ७१ ॥ इंद्रियांचा लयही असतां । केवळ मनासिच पदार्थाकारितां । वासनारूपें भासे यथार्थता । तें स्वप्न रघुनाथा याचें नाम ॥ ७२ ॥ तरी निद्रा ना स्वप्न जागृति । सर्व संकल्पाची होय शांति । तेचि ते शिळेचियेपरी अवस्थिति । तोचि स्वरूपस्थिति पराकाष्ठा ॥ ७३ ॥ सर्वांही स्थितीहूनि श्रेष्ठ । ते हे स्वरूपस्थिति वरिष्ठ । इये स्थितीहूनि नाहीं विशिष्ट । हेंचि स्पष्ट श्रेष्ठपणें ॥७४॥ तरी ब्रह्म हें एवंभूत असे । तें मागां निरूपिलें सावकाशें । तथापी संमतिविशेषें । जाण सर्वांशें सांगेन ॥७५॥

संमतिश्लोक ॥ सर्वसंकल्पसंशांत प्रशांतघनवासनम् । न किंचिद्भावनाकार तद्ब्रह्म परमं विदुः ॥

संशांत ह्मणिजे निःशेष जाण । सर्व संकल्पांचें भस्म पूर्ण । निबिड वासनेचें संहरण । नव्हे भावन विपरीताचें ॥ ७६ ॥ विषयपदार्थांचें होय उपादान । करणें तोचि संकल्प जाण । संस्कारें होय पदार्थस्फुरण । वासना पूर्ण तिये नाम ॥ ७७ ॥ एक वेळे स्वयें घट देखिला । तो मागुता घटाकार स्फुरला । वासना ह्मणिजे ययाला । याचा मेळा तें घनपण ॥ ७८ ॥ दिवाव्यापारें निद्रा करी । सुषुप्ति तेवीं उठे तदाकारीं । पूर्वदिवशींचें स्फुरे अंतरीं । व्यवहार व्यवहारीं तैसा भासे ॥ ७९ ॥ जैसें पूर्वदिवशीं देखिलें । तें ज्ञान सुषुप्तीं निमालें । परी संस्कारें मनीं राहिलें । तेंचि उद्भवलें अपरादिवशीं ॥ ४८० ॥ तैसें ज्ञान क्षणिक । पदार्थ स्फुरती क्षण एक । तें ज्ञान नाशोनि आणीक । पदार्थ अनेक स्फुरताती ॥ ८१ ॥ तऱ्ही तें ज्ञान नाशलें असतां । तद्रूपेंचि पदार्थ स्फुरे मागुता । तयाचा संस्कार मनीं होता । ह्मणोनि तत्वतां स्फुरे तैसाचि ॥ ८२ ॥ ययाचें नाम जाण वासना । यासि मर्यादा नाहीं रघुनंदना । ह्मणोनियां घनपणाचि अभिधाना ।

---

१ लय विक्षेप कषाय आणि रसास्वाद अशीं निर्विकल्पें समाधीचीं चार प्रकारचीं विघ्नें. २ दुसऱ्या दिवशीं.

आलें जाणा निबिडपणें ॥ ८३ ॥ ह्मणोनि निबिड यया वासना । निःशेष जेथ जालिया लीना । आणि सर्व संकल्पविहीन रघुनंदना । क्षीणपणा पावती जेथें ॥ ८४ ॥ मागुती संस्कारें करुनी । विपरीतभावना नुपजे जे क्षणीं । तेंचि परब्रह्म जाण निर्वाणीं । खूण मनीं दृढ धरीं ॥ ८५ ॥ येथें राहाणें जें ये वृत्ती । तेचि दृढ जाण ब्रह्मस्थिति । ते शिळेपरी निघोटगति । अचळस्थिति अंतर्बाह्य ॥ ८६ ॥ अथवा दुसरें ऐसें व्याख्यान । संकल्प तो एवंविध जाण । स्वस्वरूपापासाव प्रथम स्फुरण । अहंपणें पूर्ण ऐसा जो उठी ॥ ८७ ॥ अहं जीव देही ब्राह्मण । गृहस्थ वानप्रस्थ संन्यासी जाण । अहं काणा बधिर मुकेपण । पंग्वादि[1] पूर्ण जेथें भासे ॥ ८८ ॥ हे ऐसे जे संकल्प उठती । ते शांत जिये ठायीं राहाती । आणि विश्वभावनेची न स्फुरे स्फर्ति । तेचि स्थिति निर्वाण पैं ॥८९॥ भावनेचें रूप तें ऐसें । शुद्ध ब्रह्माचा ठाईं विश्व भासे । तेंचि यथार्थ मानी ऐसें । भावना सर्वांशें हेंचि जाण ॥४९०॥ शुद्ध एकाचि ब्रह्म असतां । विश्वाकारें भावी तेंचि तत्वतां । ते भावना उपजों नेदीं चित्ता । तेचि तत्वतां ब्रह्मस्थिति ॥९१॥ शुद्धस्वरूपापाशूनि । संकल्प उठली जीवोऽहं[2] ह्मणोनि । तेथें ते विपरीतभावना तत्क्षणीं । घटपटपणीं उठताती ॥ ९२ ॥ येकाचि ब्रह्मांचा ठाईं । हे स्त्री हा पुरुष पाहीं । अश्व गज रथ महिषी सर्वही । व्यक्तिमात्र ही ते भावी ॥ ९३ ॥ हे विपरीतभावना जालियावरी । ते उपादेयपणें ग्राह्यबुद्धि करी । त्याचि वासना सहस्रांतरी । ब्रह्मांडभरी उठताती ॥ ९४ ॥ त्या एकएकाच्याकारणें । एरएरांसि[3] होय उठणें । संकल्प होताती विश्वपणें । स्वयें उठणें भावनेतें ॥ ९५ ॥ ते भावना दृढतर जालिया । उठती वासनेच्या चळिया । तेणेंचि प्रपंचु रघुराया । जाणा यालागीं सर्वत्र ॥ ९६ ॥ संकल्प भावना वासना । जेथें निःशेष होती लीना । तेंचि ब्रह्म जाण रघुनंदना । आन विचारणा येथें नाहीं ॥ ९७ ॥ ऐसिया ब्रह्माचा ठाईं । तद्रूपेंचि राहाणें अनपायीं । तरीच ब्रह्मस्थिति बाणे सर्वही । निघोट पाहीं शिळा जैसी ॥ ९८ ॥ ह्मणोनि ब्रह्मस्थिति ऐसी । सर्व संकल्प जाती क्षयासी । जागृति निद्रा स्वप्नेंसी । निश्चयेंसी मावळे जेथें ॥ ९९ ॥ इयेचें नाम निर्विकल्पसमाधि । स्थितिमाजी स्थिति निरवधि । हे साधितां विघ्न तिये संधीं । अति बाधी साधकासी ॥ ५०० ॥ ते चतुर्विधविघ्नें[4]प्रकार । वेदांतीं बोलिले सविस्तर । सांगेन ऐसें सादर । दोष हे थोर कळावया ॥ १ ॥ जयासि दोष कळेना जो मोठा । तऱ्ही तो न वचे दोषाचिया वाटा । यालागीं सांगणें लागे सुरश्रेष्ठा । ऐक उत्कंटा[5] दोषाची ॥ २ ॥ जयासि मार्ग अमार्ग ऐस सुझे । उत्तम मध्यम ऐसें बुझे । तो अमार्गीं न प्रवर्ते सहजें । अधिष्ठी निर्व्याजें सुमार्गचि ॥ ३ ॥ अन्न विष येकत्र केलिया । नेणता तो सेवी न कळोनियां । कळे तो पात्रावरूनियां । उठोनियां पळेचि कीं ॥ ४ ॥ सर्प आणि हार दोन्ही ।

---

१ पांगळेपणा वगैरे. २ मी जीव असें ह्मणून. ३ परस्परांस. ४ चार प्रकारचीं विघ्नें. ५ भयंकरपणा.

नेणता सर्पाचि घे नेणोनी । जाणता अनर्थीं न प्रवर्त्ते कोण्ही । न देखिजे नयनीं सर्वत्र ॥ ५ ॥ ह्मणोनि दोष अदोष कळावया । हें सांगणें घडे गा श्रीरघुराया । अदोष ते व्यतिरिक्त यया । जाणलिया कळतील ॥६॥ तेंचि वेदांत वाक्य आतां । तुज सांगेन गा जानकीकांता । जें ऐकें येकाग्र करूनियां चित्ता । निर्विकल्पता पावसी जेणें ॥ ७ ॥

संमतिवेदान्तसार ॥ अस्य निर्विकल्पस्य लयविक्षेपकषायरसस्वादलक्षणाश्चत्वारो विघ्नाः संभवंति ॥

इये निर्विकल्पसमाधीसी । येथ चारि विघ्नें परियेसीं । लय विक्षेप कषाय रसस्वाद्नेंसीं । लक्षणें यांसि बोलिजेती ॥ ८ ॥ त्यांमाजीं प्रथम लयाचें लक्षण । लय ह्मणिजे सुषुप्ति जाण । तें सांगेन तुजलागून । सावधान परियेसीं ॥ ९ ॥

संमतिवेदान्तसार ॥ तत्र लयस्तावदखंडवस्त्वनवलंबनेन चित्तवृत्तेर्निद्रा ॥

आतां निद्रा ऐसी जाण रघुपती । पूर्ण ब्रह्मीं लावितां चित्तवृत्ति । धारणेनें विकल्प टाकविती । मग विश्वस्थिति न स्फुरे ॥५१०॥ बाह्य प्रपंचानुसंधान गेलें । वस्तूचें अवलंबन तुटलें । मग चित्त वृत्तीसि उबडलें । लीन जालें अज्ञानीं ॥११॥ अज्ञानीं बुडाल्या चित्तवृत्ति । तेचि जाण गा मूढ सुषुप्ति । हे समाधीच्या विघ्नांप्रति । मूळ हें सुमती महाथोर ॥ १२ ॥ येणेंचि विघ्नें किती नाडले । ध्यानमिषें सुषुप्ति पावले । तेहीं लौकिकदंभ संपादिले । नाहीं झेपावलें परमतत्व ॥ १३ ॥ स्वस्थ बैसतांची ते क्षणीं । निद्रा बांधी तयांलागुनी । ते बुडोनि जाती अज्ञानीं । सुख स्वप्नीं न देखती ॥ १४ ॥ पावतां आत्मस्थितीचा गावो । टाकिला दुर्धर मार्ग विपरीत भावो । निद्रा घाला घाली पाहा हो । आन ठावो जोडोनि दिधला ॥ १५ ॥ शमदमादिमार्ग क्रमूनि आला । क्रोधादिव्याघ्रसंग चुकविला । आखरी निद्रांभैंदा सांपडला । घाला घातला महामारकु ॥ १६ ॥ प्रवेशतां ब्रह्मराज्य सिंहासनीं । प्रवेश करितां समाधिद्वारस्थानीं । निद्राभैंदें गचिये धरुनी । बोलों नेदूनि आकळिला ॥ १७ ॥ येऊनि अज्ञानअरण्यांतु । वस्त्वनवलंबन मूळ वनहेतु । मोहफांसा गळा घालितु । निःशेष मारितु स्मृति घेउनी ॥ १८ ॥ हें ना तें ऐसें यया केलें । स्वग्राम ना पर ऐसें जालें । सिद्ध विषयसुखही नेलें । नेण आलें सकलार्थीं ॥ १९ ॥ असो हें किती बोलावें । स्वसुख ना विषयसुख तया न पवे । दोन्ही नेणोनियां राहावें । तयातें जाणावें लय ऐसें ॥ ५२० ॥ अगा अल्पाभ्यासेंकरून । आणि तमोगुणाचें निबिडपण । तेणेंचि लय होय संपूर्ण । जाण खूण रघुपुंगवा ॥ २१ ॥ आतां विक्षेप तोही सांगेन । तो आइकें येकाग्र करूनियां मन । विक्षेप तो महा दारुण । घातक पूर्ण स्वरूपच्युती ॥ २२ ॥

---

१ 'जाणावा सावया' असा निरर्थक पाठ. २ प्रपंचाकडील लक्ष. ३ मिळालें. ४ 'बावेतां' असा पाठ. ५ शमदम वगैरेंचें साधन हा मार्ग. ६ षड्रिपु हे व्याघ्रादिक. ७ निद्रारूपी लुटारूला ८ वस्तु न सांपडणें.

संमति वेदान्तसार ॥ अखंडवस्त्वनवलंबनेन चित्तवृत्तेरन्यावलंबनं विक्षेपः ॥

बैसतां अखंडैकब्रह्माकारें । चित्ताचें वृत्तिरूपज्ञान अवतरें । तें वस्तु सांडोनि धांवे बाहिरें । प्रपंचाकारें जें वर्त्ततां ॥ २३ ॥ सांडोनि आत्मामृतसुखाची गोडी । चित्तवृत्ति धांवे बाहिर सवडी । खेटीं विषयसुखाचिया वरडी । पाडी दरडी धारणेच्या ॥ २४ ॥ वांतान्नोचेंचि करी चर्वण । जैसें निर्मूग पडकलें श्वान । दुःख पावे जऱ्ही ताडण । तऱ्ही उपशमन नव्हेचि तया ॥ २५ ॥ विषय ते दुःखरूपीच असती । अनुभव बाणे जऱ्ही चित्तीं । तऱ्ही तो न सांडीं सीतापती । श्वानस्थिति आपुली ॥ २६ ॥ असो याचें नाम विक्षेप बोलिजे । ब्रह्मसुखत्यागें प्रपंचु अवलंबिजे । हा महाथोर दोष जाणिजे । संसारबीज हेंचि जाण ॥ २७ ॥ अवैराग्येंकरून । विक्षेप होय महादारुण । वैराग्य असतां नव्हे जाण । हेचि खूण येथिंची पैं ॥ २८ ॥ आतां कषाय तो जाण ऐसा । भ्रमें लोक ह्मणती समाधि जैसा । समाधीच्या साम्या पडत ठसा । साधक पिसा गर्वें होये ॥ २९ ॥ त्या कषायासिच समाधि ह्मणती । ऐसें साधक ठकले नेणोकिती । सांगों तयाची स्थिति । परिसें भपति ब्रह्मांडाचिया ॥ ५३० ॥

संमति वेदान्तसार॥लयविक्षेपाभावेऽपि चित्तवृत्ते रागादि वासनया स्तब्धीभावादखंडवस्त्वनवलंबनं कषायः॥

स्वस्वरूपाकार करितां चित्तवृत्ति । साधक साधनपणें राहाती । परी विषयांचें ठायीं अतिप्रीति । राहे चित्तवृत्ति संस्काररूपें ॥ ३१ ॥ त्या विषयरागेंकरून । चित्तवृत्ति राहे स्तब्धोन । लयविक्षेप ना स्वरूपवस्थान । मध्येंचि जाण तटस्थता ॥ ३२ ॥ स्वरूपसुख ना विक्षेप करी । ना निद्राही नये तेव्हां पुरी । हें त्रयही सांडूनि राहे अंतरीं । स्मृति ते पुरी बुडाली ॥ ३३ ॥ वैराग्यबळें विक्षेप गेला । अभ्यासबळें लयही बुडाला । परी सूक्ष्म विषयराग मनीं स्थिरावला । तेणें तुटला आत्मानुभव ॥ ३४ ॥ ऐसे मध्येंचि जें ताटस्थ्य । निचेष्टपणें कांहीं नेणत । सूक्ष्मपणें विषयराग वर्त्तत । जाण निश्चित कषाय हा ॥ ३५ ॥ हें प्रज्ञामांद्येंकरून । स्वस्वरूप न प्रकाशे जाण । अंतरीं विषयासक्ती दारुण । कषाय पूर्ण महाथोर ॥ ३६ ॥ आतां रसस्वाद किल्लक्षण । तेंही सांगों तुजलागून । हाही दोष महादारुण । निर्विकल्प पूर्ण हो नेदी ॥ ३७ ॥

संमति वेदान्तसार ॥ अखंडवस्त्वनवलंबनेन चित्तवृत्तेः सविकल्पकानंदास्वादो रसस्वादः ॥

स्वस्वरूपाकार करितां चित्तवृत्ति । अखंड वस्तूचें अवलंबन करिती । सेविल्या आनंदातें भोगिती । तयातें ह्मणती रसस्वादन ॥ ३८ ॥ आतां अखंड वस्तु तें कैसें । आणि सखंड तें कैसें असे । सविकल्प कोणासि ह्मणतसे । तेंहीं सावकाशें सांगेन ॥ ३९ ॥ तरी येथ ज्ञेय ज्ञान आणि ज्ञाता । हे त्रिपुटी जेथ न स्मरे गा रमाकांता । आपणासहित येकात्मता । भेदु तत्वतां न स्फुरे जेथें ॥ ५४० ॥ आनंदाचेंचि घेणें

१ ओकलेल्या अन्नाचें. २ आळशी. ३ संचकलेलें.

देणें । आनंद आनंदेंचि भोगणें । भोक्ता भोग्य नुरे भोगणेंपणें । तें वस्तु जाणणें अखंडत्व ॥ ४१ ॥ एवं अखंड वस्तूचें ठाई । चित्तवृत्तीसि अवलंबन नाहीं । स्फुरे ज्ञेयत्वें ब्रह्म पाहीं । सखंड येहीं लक्षणीं होये ॥ ४२ ॥ सर्वत्र एक ब्रह्मावांचुनी । दुजें अणुमात्र नसतां जनीं वनीं । तेथ ज्ञाता ज्ञेय ज्ञान तिन्ही । विभागुनि देखतसे ॥ ४३ ॥ एकेचि अखंड वस्तूसी । त्रिखंड केलें गा परियेसीं । आपण ज्ञाता तें ज्ञेय ऐसी । प्रतीति मानसीं वर्त्ते जे कीं ॥ ४४ ॥ ह्मणोनि अखंडासिच सखंड केलें । अखंडाचें अनुसंधान तुटलें । ज्ञातेपणें सुख अनुभविलें । जाण संचलें रसस्वादन ॥ ४५ ॥ आणि अखंड वस्तूचा ठाई । संकल्पमात्राचा उद्भव नाहीं । ह्मणोनि ते दशा निर्विकल्प पाहीं । येर ते तेही सविकल्प ॥ ४६ ॥ जेथें ज्ञाता ज्ञेय ज्ञान स्फुरे । तो सूक्ष्म संकल्प जाण निर्धारें । हे त्रिपुटी जेथ निःशेष विरे । निर्विकल्प धुरे तोचि जाण ॥ ४७ ॥ ध्येयाचेनि अभिव्यक्तपणें[1] । ध्यात्यासि हर्षनिर्भर होणें । तोचि रसस्वाद भी ह्मणें । जाण ये खुणे विबुद्धपती ॥ ४८ ॥ अथवा समाधि-चिये प्रारंभीं । चित्तवृत्ति सुखातें अवलंबी । तेंचि सुखस्वानंदचित्तनभीं । तें पद्मनाभी सरस्वादन ॥ ४९ ॥ हा निर्विकल्पासि दोष थोर । परी दोषत्रयाऐसा नव्हे अनर्थाकार । हा आत्मसुखासि नव्हे व्यभिचार । कोमळप्रकार ह्मणोनि न्यून ॥ ५५० ॥ इतरा ज्या तिन्ही स्थिति । त्या अनर्थाकार फल्गुप्रायं[2] असती । त्या निरर्थक जाण सर्वार्थी । फळ-प्राप्ति कांहींच नाहीं ॥ ५१ ॥ यालागीं दोषचतुष्टयाविरहित । जे निर्विकल्पसमाधि निश्चित । तेचि आत्मस्थिति गा निभ्रांत । यथातथ्य जाण हरी ॥ ५२ ॥ बाहुल्य नेणूनि इये स्थितीसी । दोषचतुष्टयांत विश्रांतीसी । पावती परी भवमोचनासी । न ये कार्यासि रघुराया ॥ ५३ ॥ रसस्वादन येकेपरी । हा साधनरूप गा अवधारीं येणेंचि निर्विकल्प-दशा पुरी । काळेंवरी[3] होतसे ॥ ५४ ॥ अखंड ब्रह्मात्मैक्यज्ञानेंविण । सर्वथा अज्ञान न तुटे जाण । अज्ञान असतां नानासाधन । अप्रमाण केलें तऱ्ही ॥ ५५ ॥ ह्मणौनि दोष-चतुष्टय सांडोनी । निर्विकल्प दशा आश्रयोनी । राहें रघुनाथा तूं निर्वाणीं । मग जनीं वनीं तूंचि तूं पैं ॥ ५६ ॥ अहो दोषचतुष्टयाविरहित । राहे जे स्थिति निश्चित । तेचि ब्रह्मस्थिति गा निभ्रांत । अतिउन्नत ब्रह्मानंदु ॥ ५७ ॥ तेचि पराकाष्ठा गा मंगळमूर्ती । इयेहूनि न चढे ब्रह्मस्थिति । शिळेचेपरी अनन्यगति । परी अजड सर्वार्थी स्वप्रकाशें ॥ ५८ ॥ तरी आतां ऐक गा रघुनाथा । सांडावी शिळेची काठिण्यता । कठीण तें जड अप्रकाशतां तत्वतां । त्यजोनि स्थिरता तैसी घेईं ॥ ५९ ॥ ते जडता टाकूनि शिळेची । तियेची हृदस्थिति स्थिरतेची । निघोटपणें स्थिति वस्तूची । सर्वास्थितीची जननीच हे ॥ ५६० ॥ इयेचोंचि साम अमनस्क बोलिजे । इयेतेंचि उन्मनि ह्मणिजे । सुलीनता

---

१ स्पष्टपणामुळें. २ तुच्छवत्. ३ पुष्कळ वेळ पर्यंत.

ते हेचि जाणिजे । सर्वांउपरि जें वरिष्ठपणें ॥ ६१ ॥ तन्मय होईं महाबाहो । हाचि सर्व साध्याचा रावो । स्थितींमाजी स्थिति निर्वाहो । स्थितीचा उपावो मुगुटमणी ॥ ६२ ॥ आजानूपर्यंत बाहुप्रमाण । यासि महाबाहु ह्मणिजे जाण । तरी रघुनाथा चक्रवर्तिया भूषण । होय निधान राजचिन्हांचें ॥ ६३ ॥ अभयवरदहस्त दोन्ही । विराजतांचि परा-मुक्तिदानीं । क्रोधादिअसुर निर्दाळुनी । अकर्त्तेपणीं शोभताती ॥ ६४ ॥ नाना निर्वा-णस्थितीलागून । रघुनाथापासींच प्राप्तिकारण । द्यावया करा करपण । यालागीं ह्मणोन महाबाहो ॥ ६५ ॥ श्रीगुरूनें ब्रह्मस्थिति । ते जयाचिये न चढे हातीं । ते क्षुल्लकहस्त ह्मणिजेती । स्थूळ सर्वार्थी अप्राप्तपणें ॥ ६६ ॥ तैसा तो नव्हे रघुरावो । तोचि स्वयें ब्रह्मविद्येचा ठावो । सांगतांचि जाला ब्रह्मभावो । महाबाहो यालागीं ह्मणे ॥ ६७ ॥ तुवां तन्मयचि असावें । अनर्थ दोष तयावरी न यावें । संकल्पवासनाभावें न लागावें रघुराया ॥ ६८ ॥ इये स्थितीनें सर्वदा असतां । तरी तूंचि ब्रह्म गा श्रीरघुनाथा । विराली प्रपंचकथा । येकु तत्वतां जगीं तूंचि ॥ ६९ ॥

सत्यानंदचिदाकाशस्वरूपः परमेश्वरः । मृद्भाजनेषु मृदिवत्सर्वत्रास्त्यपृथक् स्थितिः ॥ ११ ॥

आतां षट्श्लोकेंकरून । सांगिजे आत्मा विलक्षण । तोचि तूं परिपूर्ण जाण । आनंदघन परिपूर्ण ब्रह्म ॥ १७० ॥ सत्ता आनंद आणि ज्ञान । तदैक्य तूं चिद्गगन । सर्वांचा नियंता जाण । परिपूर्ण पूर्णानंदु ॥ ७१ ॥ तोचि तूं जाण श्रीरघुपती । तोचि तूं विश्व विश्वमूर्ति । तुजवांचूनियां त्रिजगतीं । दुजी स्थिति असेचिना ॥ ७२ ॥ हे सर्वही विश्व-परंपरा । ब्रह्मरूपचि जाण रघुवीरा । जैस घटशरावादिभांडपसारा । सर्वत्र सैरा मृत्तिका-चि जैसी ॥ ७३ ॥ अगा या मृद्भाजनांचे ठांईं । मृत्तिकवांचूनि दुजें नाहीं । नामरूप तें मिथ्या पाहीं । शब्देंविण कांहीं वस्तु नसे ॥ ७४ ॥ नानाघटशरावादिरांजण । नाहीं वास्तव मृत्तिकेवांचून । ऐसेंचि स्वयें श्रुति बोलती आपण । वाचारंभणनामविकारु ॥ ७५ ॥

संमतिश्रुति ॥ वाचारंभणाविकारोनामधेयं मृत्तिकेत्येव सत्यम् ॥

यालागीं नाम आणि विकार । हा वाचेचानि विस्तार । मृत्तिकेवांचूनि वस्त्वंतर । नाहीं साचार रघुपुंगवा ॥ ७६ ॥ तैसा तोचि सर्वांपरी । नाहीं पृथक् सबाह्यांतरीं । येक येकुलता चराचरीं । नाहीं दुसरी मातु येथें ॥ ७७ ॥ तैसें जग हें नामरूपात्मक असे । नामरूप तें मिथ्या भासे । तें वाचारंभणमात्रचि असे । ब्रह्म सर्वांशें सर्वत्र जें ॥ ७८ ॥

संमतिश्लोक ॥ अस्ति भाति प्रियं रूपं नाम चेत्यंशपंचकम् । आद्यत्रयं ब्रह्मरूपं जगद्रूपं ततो द्वयम् ॥
निस्तत्वे नामरूपे द्वे जन्मनाशयुते च ते । बुद्ध्या ब्रह्माणि वीक्षस्व समुद्रे बुदबुदादिवत् ॥

सत्ता ज्ञान आणि सुख । हें अंशत्रय ब्रह्मचि येक । विश्व हें नामरूपात्मक । श्रुति सम्यक् सर्वत्र बोले ॥ ७९ ॥ यालागीं नामरूपात्मक मिथ्या असे । ब्रह्म तें सत्तासुख-प्रकाश दिसे । ब्रह्मेंविण दुजें कांहींच नसे । सर्वत्र वसे परिपूर्णत्वें ॥ ५८० ॥

---

१ गुढघ्यापर्यंत. २ मडकीं, परळ वगैरे अनेक प्रकारचीं भांडीं. ३ मातीच्या भांड्यांत. ४ नामादि विकार हे वाचिक आहेत.

आपारावारविस्तारसंवित्सलिलवल्गनैः । चिदेकार्णव एकोऽयं स्वयमात्मा विजृंभते ॥ १२ ॥

पारावार नाहीं जयासी । ऐसा ज्ञानसमुद्र चिदेकरासि । विश्ववीचि शोभती जयासी । असे सर्वांसि पूर्णत्वें ॥ ८१ ॥ विश्वलहरीवीचिकरून । येकु चिदाब्धि उल्हासे जाण । नाहीं दुजें तयावांचन । अणुपरिमाणआदिकरूनी ॥ ८२ ॥

भरिताशेषदिक्कुजमनंताकाशनिर्भरम् । एवं वस्तु जगत्सर्वं चिन्मात्रं वारि चांबुधेः ॥ १३ ॥

जैसें आकाश हें सर्वांपरी । विस्तारलें त्रैलोक्यबाह्याभ्यंतरीं । तें रितें नाहीं तिळभरी । सर्व विस्तारी सर्वपणें ॥ ८३ ॥ आकाशीं भरिल्या दिशा विदिशा । स्वर्गमृत्युपाताळ-सरिसा । गिरिगव्हरकुंजविशेषा । दाहाही दिशा परिपूर्ण ॥ ८४ ॥ तैसें देशकाळवस्तु-परीच्छेद । नाहीं काळत्रयीं जया बाध । तेंचि तें अनंतपद निर्बाध । जाण शुद्ध नभजैसें ॥ ८५ ॥ ऐसें सर्वही विश्वमात्र । तें सकळही जाण चिन्मात्र । वस्तूविण नाहीं स्वतंत्र । नसे सर्वत्र जगनामें ॥ ८६ ॥ जैशा समुद्राचिया लहरि । तो समुद्रचि जैसा रावणारी । नाहीं येथ भेदपरी । सभराभरी तोचि तो पैं ॥ ८७ ॥ आकाशदृष्टांतें करून । ब्रह्म ते निःसंग तैसें जाण । ब्रह्म सर्व उपमाविहीन । लौकिकें पूर्ण साम्य घडे ॥ ८८ ॥

निरंशत्वाद्विभुत्वाच्च तयाऽनश्वरभावतः । ब्रह्मव्योम्नोर्न भेदोऽस्ति चैतन्यं ब्रह्मणोऽधिकम् ॥ १४ ॥

जो जो अंशमंत पदार्थ । तो परिणामी होय संतत । जैसें अंशत्वें दुग्ध परिणामत । तें दधि होत जयापरी ॥ ८९ ॥ पृथ्व्यादिकें अंशमतें । तितुकेंही परिणाम पावतें । तैसें आकाश नव्हे सर्वार्थें । ह्मणोनि तयातें निरंश ह्मणती ॥ ९० ॥ ऐसें परिपूर्ण सर्वांपरी । कोंदलेंसे बाह्याभ्यंतरीं । परिछिन्न नव्हे कोणेपरी । असे उजेरी विभुत्वाची ॥ ९१ ॥ आकाशेंविण रिता ठावो । कोण्ही नाहीं महाबाहो । ह्मणोनि व्यापकत्वें निर्वाहो । आन भावो तेथें नाहीं ॥ ९२ ॥ तैसें अनश्वरता तयासी । नाशु नपवे कोण्हे अंसीं । स्थिर सूक्ष्म असंगवेशीं । जाण सर्वांशीं नांदत ॥ ९३ ॥ ऐसें ब्रह्म अपरिणामी निरंश । व्यापक अपरिच्छिन्न उदास । नित्य अनश्वर सावकाश । जैसें आकाश तैसें जाण ॥ ९४ ॥ दोहींची समानता । नाहीं कोण्ही अंशीं न्यूनता । परी येक चैतन्याचि रघुनाथा अधिक तत्वतां ब्रह्मासि पैं ॥ ९५ ॥ गगनाचे ठाईं जडपण । आणि असे प्रकाशवि-हिन । आत्मा स्वयंज्योति प्रकाशमान । चिद्गगन चिदानंदु ॥ ९६ ॥ चैतन्यगुणें श्रीरघु-नाथा । ब्रह्माचे ठाईं हे अधिकता । अप्रकाश जाणोनि तत्वता । स्वयंब्रह्मता साधीं आपुली ॥ ९७ ॥ आणीकही आत्मयाचें ओळखण । तें ही सांगों ऐक चिन्ह । तें होईं ताच जाणोन । खूणसंपन्न तेणें होसी ॥ ९८ ॥

---

१ अनेक जगें याच लाटा. २ स्वर्ग, मृत्यु आणि पाताळ या तिन्ही लोकांत. ३ पृथ्वी वगैरे ज्यांचे भाग पडतात असे पदार्थ. ४ उत्कर्ष. ५ कधींही नाश न पावणारें.

निस्तरंगोऽतिगंभीरः सांद्रानंदसुधार्णवः । माधुर्यैकरसाकार एक एवास्ति सर्वतः ॥ १५ ॥

हे विश्वतरंगरहित । ब्रह्माब्धि जाण सांद्रानंदभरित । अतिगंभीर सदोदीत । उचंबळत ब्रह्मानंदें ॥ ९९ ॥ अतिनिबिडपणें निघोट । सर्व आनंदाहूनि श्रेष्ठ । तो सांद्रानंद अति-उद्भट । सर्वत्र प्रगट सर्वपणें ॥ ६०० ॥ षड्सातें तिरस्कारून । सर्व रसांचें जें रसपण । तेंचि तें येकरस पूर्ण । नाहीं भान नानाव्यक्ती ॥ १ ॥ विषयरस ते नानाकार । ब्रह्म तें येकरस निर्विकार । सर्वां गोडियांचे गोड गव्हर । अतिमधुर माधुर्याचें ॥ २ ॥ शर्क-रेची माधुर्यता । वाचा बोबडी पडे बोलतां । वेगळी न निवडे सर्वथा । जाण तत्वतां माधुर्य ऐसें ॥ ३ ॥ सर्वत्र सदा सर्वपणें । असे सर्वां सर्व येकपणें । जें जें बोलिजे तें तेथें उणें । पूर्ण पूर्णपणें पूर्णाचि वर्ते ॥ ४ ॥ मुका भक्षी जैसी शर्करा । सांगतां न प्रवर्ते जैसी गिरा । परी तो गोडीच जाणे भीतरा । नय बाहिरा बोलवरी ॥५॥ ब्रह्मरसगोडियेसी उपमा । तेथ कोण रस पावेल सीमा । तैसी माधुर्यता निःसीमा । मेघश्यामा ऐसें जाण ॥६॥ स्त्रीसंभोगरतीच्या अंतीं । जे कीं होय सुखाचि प्राप्ति । तें कोटिसुखें बळी दीजेती । तैसी स्थिति आनंदाची ॥ ७ ॥ ब्रह्मपदसुखाचिया गोडी । कीजेती त्या ब्रह्मांडाची कुरवंडी । तैसी जाण आनंदपरवडी । पडे वेंगडी बोलतां वाचे ॥ ८ ॥ हें काय बोलों रमाकांता । ब्रह्मानंद जहूं वाचा नये बोलतां । हा अनुभव ब्रह्मवेत्ता । जाणे तत्वतां ज्याचा तोची ॥ ९ ॥ अगा जें जें विश्वाकार भासे । तेंचि ब्रह्मचि एक उल्हासे । ब्रह्मावेगळें अणुमात्रही नसे । सर्वत्र असे तेंचि तें एक ॥६१०॥ ब्रह्म तें जाण एवंभूत । आणीकही सांगों अद्भुत । तें आइक येकाग्रचित्त । स्वयें निश्चित होईजे तेंचि ॥ ११ ॥

समस्तं खल्विदं ब्रह्म सर्वं मात्मेदमाततम् । अहमन्य इदं चान्यदित्यखंडं न खंडय ॥ १६ ॥

समस्त जितुकें विश्वजात । तितकेंही एक ब्रह्म स्फुरत । ब्रह्मेंविण अणुमात्रही किंचित । नाहीं निश्चित जाण हरी ॥ १२ ॥ हें अहंकारमात्र जें समस्त । आत्मा येकुचि जाण संतत । सर्वत्र येकला येकुचि व्याप्त । सर्वां सर्वगत अनन्यपणें ॥ १३ ॥ ऐसें जें अखंडदंडायमान । पूर्णानंदैकपूर्णघन । तयातें खंडिती अज्ञानपण । आपणा अन्य मानूनियां ॥ १४ ॥ मी आन तो मजहूनि अन्य । तोही तेणेंसी असे भिन्न । ऐसें अज्ञानी करिती खंडण । अहं अन्य ह्मणोनियां ॥ १५ ॥ जग हें मजहूनियां वेगळें । मी तो जगाहूनियां निराळें । ऐसें अखंडासि अज्ञानबळें । खंडिती सगळें एक वस्तु ॥ १६ ॥ ऐसें षट्श्लोकीं करून । सांगितलें आत्मयाचें लक्षण । एवं जाणोनि आत्मा पूर्ण । तद्रूपें जाण राहिजेसु ॥ १७ ॥

यदैव ब्रह्मणो रूपं ततं बुद्धमखंडितम् । तदा विस्तीर्णसंसारः परमेश्वरतां गतः ॥ १७ ॥

जें कीं एवंरूप परब्रह्म । सर्वत्र व्यापक परिपूर्ण सम । अखंड सुखरूप निःसीम । परात्पर जाणसी तेव्हां ॥ १८ ॥ ऐसें जाणतलियासाठीं । तरी तूंचि ब्रह्म गा जग-

---

१ परा, पश्यती, मध्यमा आणि वैखरी या चार वाचांनीं. २ न मोडलेल्या काठीप्रमाणें एक सारखें.

जेठी । परमेश्वर तो तेचि भेटी । पडे तुटी संसाराची ॥ १९ ॥ जेव्हांचि पावसी गा ब्रह्मता । तेव्हांचि संसाराची भस्मता । निःशेष होय गा विबुद्धनाथा । नव्हे मागुता कल्पांतींही ॥ ६२० ॥ स्वस्वरूपब्रह्माच्या ठाईं । अज्ञान तेथ निःशेष नाहीं । तत्कार्य संसार तो कैंचा कायी । मग दुजें नाहीं आपणाविण ॥ २१ ॥

समस्तमेव ब्रह्मेति भाविते ब्रह्म वै पुमान् । पीतेऽमृतेऽमृतमयः को नाम न भवेदिति ॥ १८ ॥

आणि समस्त हें जगज्जाळ । तें देखेचि जो ब्रह्म केवळ । तो स्वयेंचि ब्रह्म हे काय नवल । नित्य निष्कळ तोचि ब्रह्म ॥ २२ ॥

संमतिश्लोक ॥ अनुभूतेरभावेऽपि ब्रह्मास्मीत्येव चिंत्यताम् । अप्यसत्प्राप्यते ध्यानान्नित्याप्तं ब्रह्म किं पुनः ॥

नाहो नसता देह भावितां । पुरुष देहरूपचि होय तत्वतां । जड कीटकी जडातेंचि ध्यातां । भृंगी तत्वतां स्वयें होये ॥ २३ ॥ मा हा तरी अनुभव प्रत्यक्षभूत । आणि स्वयें देह भावितां देहचि होत । तैसें स्वतःसिद्धचि ब्रह्म निश्चित । विचार येथ काइसा पां ॥ २४ ॥ आपण स्वतः ब्रह्मचि असे । आणि सर्वत्र ब्रह्म देखे सर्वांशें । तो ब्रह्म नोहे येथें अनारिसें । कैसें मानसें मानावें पां ॥ २५ ॥ आणि सर्वत्र ब्रह्म देखतां रघुपती । तोचि पुरुष स्वयेंचि असे ब्रह्ममूर्त्ति । येथें नाहीं विप्रतिपत्ति[1] । जाण निश्चिति त्रिवाचा हें ॥२६॥ अगा अमृता प्राशन जो करी । अमृतरूप नव्हेल कोणेपरी । ऐसें कोठें त्रैलोक्या माझारी । अमृत मारी कवणातें ॥ २७ ॥ जेणें जैसी वस्तु सेविजे । तेणें तत्काळ तद्रूपचि होइजे । विषें विष होऊनि मरिजे । अमृतें सहजें अमृतरूप ॥ २८ ॥ यालागीं देहोहं ऐसी भावना जो करी । तो देहरूपेंचि देहधारी । आणि ब्रह्म भावी तो ब्रह्मरूप हरी । जाण निर्धारीं विवेकचंद्रा ॥ २९ ॥ यालागीं जो ब्रह्मचि देखे समस्त । तो स्वयें ब्रह्मचि गा निश्चित । ब्रह्म ह्मणोनि ब्रह्माकार चित्त । करी संतत श्रीरामराया ॥६३०॥

भव्योसि चेत्तदा तस्मात्सर्वमाप्स्यसि निश्चयात् । नोचेद्रघ्वपि संप्रोक्तं यथा भस्मनि हूयते ॥ १९ ॥

यालागीं सर्व ब्रह्म या अनुभवें । रघुपती सर्वदा तुवां राहावें । राहातां परमानंदचि फावे । नाहीं स्वभावें दुजे तेथें ॥ ३१ ॥ जरी तूं भव्य[2] आहेसि गा रघुनाथा । ह्मणजे साधनचतुष्टयीं पुरता । तरी सर्व ब्रह्मदेखतां । सीताकांता सर्व पावसी ॥ ३२ ॥ सर्वशब्दें ब्रह्मचि जाण । तेंचि त गा होसि निर्वाण । ब्रह्मस्वतःसिद्धचि आहेसी पूर्ण । उपचारें जाण ह्मणणें ऐसें ॥ ३३ ॥ साधनचतुष्टयाचें लक्षण । तें सांग पूर्वींच केलें निरूपण । तें पुनरुक्त[3] बोलोन कार्य कोण । तूं तंव संपन्न साधनांतेंही ॥ ३४ ॥ साधनचतुष्टयेंकरून । योग्य जाला आहेसि पूर्ण । तरी सर्व ब्रह्म हे स्थिति संपूर्ण । निश्चयें जाण पावसी ॥ ३५ ॥ पूर्ण ब्रह्मस्थिति बाणावया । हा साधन क्रमुचि रघुवया । चित्तशुद्धि सावधानेंकरूनियां । होतसे यथा त्रैलोक्यपती ॥ ३६

---

१ शंका, संशय. २ कल्याणरूप. ३ पुनः बोललेलें.

इतुकेंचि वर्म नसिजे जरी । तरी जे उपाय करूं सहस्त्रंभरी । जैसा रक्षेमाजी होम करी । व्यर्थ रावणारी सर्वस्वें ॥ ३७ ॥ यया साधनचतुष्टयाविरहित । शुद्ध नसतां जयाचें चित्त । तेथें इतर जे सहस्त्रांत । अति व्यर्थ निर्फळत्वें ॥ ३८ ॥ स्वयें दर्पण जऱ्ही शुद्ध असे । तऱ्हीच तेथें मुख प्रकाशे । तेंचि पारुषें आतां काय रूप दिसे । किंवा भासे रविचंद्र तेथें ॥ ३९ ॥ ह्मणोनि ब्रह्मबोधासि मुख्य कारण । येकि चित्तशुद्धिची पैं जाण । चित्तशुद्धि तेथें निश्चयें जाण । ब्रह्म पूर्ण प्राप्त स्वयें ॥ ६४० ॥ हे मागां तुज निरूपिलें सकळ । श्लोकें 'शिष्यप्रज्ञैवकेंवल'। यालागीं चित्त जालिया निर्मळ । लाभे प्रांजळ स्वात्मसुख ॥ ४१ ॥ नसतां अंतःकरणशुद्धि । नसतां साधनचतुष्टयाची समृद्धि । तेथ प्रयोजितां नानाबुद्धि । वेदांतासिद्धी व्यर्थ होय ॥ ४२ ॥ गुरुसि होय अगुरुत्व । महावाक्यासि ये अवाक्यत्व । साधन तेव्हडें व्यर्थ जात । भस्मीभूत तैसे होये ॥ ४३ ॥ आतां व्यर्थ क्लेशासि दृष्टांत । सांगैन तुज अपरिमित । वाळु घाणां गाळिजेत । क्लेश प्राप्त जयापरी ॥ ४४ ॥ गगनाच्या नाकीं वेसणी । कीं नरशृंगा कीजे चित्रांवणी । कां वांझवृक्षासि घालिजे पाणी । सौभाग्यमिरवणी कांतहीनें ॥ ४५ ॥ मृगांभासि पेहे दीजे । खपुष्पें वंध्यापुत्र शृंगारिजे । शशविषाणाचें औषध कीजे । रोग सहजें नाशती तेणें ॥ ४६ ॥ जऱ्ही नानासाधनें केलीं । तऱ्ही तें कोण्या उपयोगा गेलीं । कूर्माची रोगशुद्धि जाली । काय फळली ब्रह्मविद्या ॥ ४७ ॥ सर्वांगीं नेत्र जाले मयूरासी । परी दोनि देखत नसलिया त्यासी । कोण उपयोग कोण्या कार्यासि । आनंदरासी सांग पा ॥ ४८ ॥ गगनासी करितां पायरिया । कोण्ही येक प्रारंभीं स्वर्गीं जावया । तरी यागु करितां रघुराया । दीक्षिता ये या स्वर्गावरी ॥ ४९ ॥ दधि नसतां भांडेंचि घुसळी । बीज नसतां कृषि वाहिली । तैसीं महावाक्यें जी बोधिलीं । तीं व्यर्थ गेलीं चित्तशुद्धीविण ॥ ६५० ॥ कापुराचि मांसि करूनियां । धांव घेतसे मेघ माखावया । गगनारविंद तोडावया । नानाउपाय कीजे जैसे ॥ ५१ ॥ ययालागीं गा मंगळमूर्ती । तुज जालीसे साधनसंपत्ति । शुद्ध जालिया चित्तवृत्ति । तरी रमापती फावलें तुज ॥ ५२ ॥ जरी तूं पावलासी जाण । यया बोला नाहीं आन । आनंदमूर्त्ती तुझीच गा आण । करीं साधन ब्रह्माभ्यासु ॥ ५३ ॥

अपि विज्ञाततत्वेन त्वयाभ्यस्यमिदं सदा । न नाममात्रात्कतकफलमंबुप्रसादनम् ॥ २० ॥

जरी असंदिग्ध जालें तुज ज्ञान । निश्चयें जाणितलें ब्रह्म पूर्ण । तरी ब्रह्मभ्यासुचि किजे जाण । प्रपंचानुसंधान टाकूनियां ॥ ५४ ॥ अखंड निर्विकल्पसाधनीं । ब्रह्मानुभवें राहीं समाधानीं । तच्चिंतनीं तत्कथनीं । राहें प्रबोधनीं परस्परें ॥ ५५ ॥

---

१ हजारों. २ 'शिष्यप्रज्ञैव' या श्लोकानें. ३ नकाशे काढणें. ४ विषवेला. ५ सशाच्या शिंगानें. ६ शाई. ७ आकाशाचें फूल. ८ प्रपंचाकडचें लक्ष्य.

संमतिश्लोक ॥ तच्चिंतनं तत्कथनमन्योन्यं तत्प्रबोधनम् । एतदेकपरत्वं च ब्रह्माभ्यासं विदुर्बुधाः ॥

तोचि ब्रह्माभ्यासु कैसा असे । तोही सांगों तुज विन्यासें । तें चित्त देऊनी विश्वेशें । सावकाशें परिसावें ॥५६॥ तरी एकाकी असतां रघुपती । ब्रह्म स्थितीनें राहावें ऐकांतीं । तेंचि शिष्य आलिया आपणाप्रति । किजे सुगती ब्रह्मकथन ॥ ५७ ॥ समान भेटलिया प्रबोधन । परस्परें करावें ब्रह्मनिरूपण । सर्वांही पदार्थत्रयांची पूर्ण । येकत्वें खूण जाणावी ॥ ५८ ॥ जैसी शब्दमात्राची प्रवृति । येक परब्रह्मीं पावे विश्रांति । तैसीच सर्व पदार्थजाति । येक ब्रह्मप्रति येकपरत्व ॥ ५९ ॥ हेंचि विचाराचें अवस्थान । करूनि साधावें ब्रह्मसमाधान । अथवा वासनाशमन । करावें जाण अभ्यासें नाना ॥ ६६० ॥ हेंचि दृढ ब्रह्मभ्यसन । षड्गुणैश्वर्यभगवान । श्यामसुंदर कमलनयन । स्वयें श्रीकृष्ण बोलिले ॥ ६१ ॥ अर्जुनाप्रति भगवद्गीता । सांगता जाला जगत्पिता । तेंचि आइकें श्रीरघुनाथा । अभ्यास पुरता परब्रह्माचा ॥ ६२ ॥

संमतिश्लोक ॥ मच्चित्ता मद्गतप्राणा बोधयंतः परस्परम् । कथयंतश्च मां नित्यं तुष्यंति च रमंति च ॥

स्वयें येकला असतां गा महामती । माझ्या स्वरूपीं घालीं चित्तवृत्ति । तें बाहिर नये विषयाप्रति । तैसी स्थिति साधावी ॥ ६३ ॥ प्राणाचेनि परिस्पंदें करून । जऱ्ही न राहेल स्थिर मन । तऱ्ही तयेचि करा प्राणसमर्पण । मद्गतपण करूनियां राहें ॥ ६४ ॥ अथवा प्राणशब्दें इंद्रियें[1] जाण । माझ्या स्वरूपीं घालीं नियमून । समस्त करणें आणि मन । मद्रूपीं समर्पण करीं त्यांचें ॥ ६५ ॥ अर्जुना मन आणि हे प्राण । माझ्या स्वरूपीं केलिया समर्पण । तरी तो तद्रूपचि जाला जाण । ब्रह्म परिपूर्ण पूर्णत्वें ॥ ६६ ॥ मग तया परमानंदाचिया गोडी । कीजे विषयसुखाचिया कुरवंडी । तेचि ते अनुभविजे फुडी । विश्वपरवडी न स्फुरे जेथें ॥ ६७ ॥ येकांत नसतां गा महामति । आणि समान भेटे जरी भाग्योन्नती । तरी बोलती मत्स्वरूपस्थिति । परस्परें डुल्लती ब्रह्मानद ॥ ६८ ॥ परस्परें मत्स्वरूप बोधितां । आनंदु न समाये दोहींचे चित्ता तेणाचि पावे सुलीनता । देहादिवार्त्ता विसरो[illegible] ॥ ६९ ॥ परस्परें बोलतां दोघांजना । आनंद न समाय ब्रह्मांडभुवना । ते मद्रूप होती कुरुनंदना । काय वर्णना करूं त्यांची ॥ ६७० ॥ ते देहभावातें विसरले । परस्परें बोलतेही राहिले । मग ब्रह्मानंदींच बुडाले । नेणती वर्त्तलें बाह्य कांहीं ॥ ७१ ॥ समान भेटतां महामती । शिष्य आला जरी शुद्धमती । तरी मत्स्वरूपकथन तयाप्रति । अतिप्रीती करावें ॥ ७२ ॥ तेणें उभयतां समाधान । मीच प्रगटें पूर्णानंदघन । माझें स्वरूप बोलतांचि पूर्ण । प्रगटें जाण पूर्णानंदु ॥ ७३ ॥ ऐसें चतुःप्रकारें ब्रह्माभ्यास । हाचि निरंतर कारितां जाण परमानंदें डुल्लती पूर्ण । नेणती आपण मजवां चुनियां ॥ ७४ ॥ तेणें परमानंदें डुल्लती

१ इंद्रियें.

माझ्या स्वरूपींच रमती । बाह्य दृश्यावरी कांहींच न येती । वर्त्तलें नेणती देहीं कांहीं ॥ ७५ ॥ ऐसें निरंतर करिती । निरंतरशब्दाची ऐसी व्युत्पत्ति । अंतर नाहीं जयाप्रति । निरंतरस्थिति या नांव ॥ ७६ ॥ करितां ऐसा ब्रह्माभ्यासु । मध्यें असो नेदिजे अवकाशु । अन्य व्यापारीं येकही लेशु । मनीं विषयांशु लागों नेदीं ॥ ७७ ॥ ऐसें निरंतर जाण । करितां ब्रह्माभ्यासु पूर्ण । असंभावनादिदोष दारुण । नाशोनि ज्ञान शुद्ध मी देतों ॥ ७८ ॥ जया ज्ञानातें पावोन । आनंदामाजी होइजे निमग्न । मग तुटे दोघां दोनी पण । परिपूर्ण मज येकत्वें ॥ ७९ ॥ ऐसें स्वमुखें श्रीपति । बोलता जाला अर्जुनाप्रति । तोही श्लोक गीतासंगति । आइक सुमती एकाग्र ॥ ६८० ॥

संमतिश्लोक ॥ तेषां सततयुक्तानां भजतां प्रीतिपूर्वकम् ॥ ददामि बुद्धियोगं तं येन मामुपयांति ते ॥

ऐसें प्रीतिपूर्वक निरंतर । जाले भजती जे महावीर । ते मातेंचि पावती साचार । नाहीं विचार आन येथें ॥ ८१ ॥ ययालागीं श्रीरघुपती । तत्व जाणितलें जरी विश्वमूर्ती । तरी आभ्यासु करी या रिती । सर्वदा चित्तीं हेचि धरीं ॥ ८२ ॥ यया अभ्यासें विण उपाय कोटि । करितां होसी गा हिंपुटी । उदकीं न घालितां कतकपिठी । नव्हे भेटि शुद्ध जळेंसी ॥८३॥ रजें डहुळलें उदक । त्यामाजी घालिजे जऱ्ही फळ कतक । तऱ्हीच शुद्ध जळ प्राप्त सम्यक । येऱ्हवीं देख जैसें तैसें ॥ ८४ ॥ कतकाविरहित गा रघुवर्या । किजे जरी नानाउपाया । तरी न पविजे शुद्ध जळा तया । जाण राया त्रैलोक्याच्या ॥ ८५ ॥ तैसें ब्रह्माभ्यासावांचन । नाहीं ब्रह्मप्राप्तीसि कारण । त्यालागीं नित्य कीजे अभ्यासन । ब्रह्म पूर्ण जेणें प्राप्त ॥ ८६ ॥ तेणें अभ्यासेंकरून । मीच ब्रह्म ऐसें बाणें पूर्ण । राहे ब्रह्मत्वें अनुसंधान । नित्य निमग्न परमानंदीं ॥ ८७ ॥

अहमेव परं ब्रह्म वासुदेवाख्यमव्ययम् । इति स्यान्निश्चयो मुक्तो बंध एवान्यथा भवेत् ॥ २१ ॥

आतां पूर्णबोध तो जाण कैसा । तोही परिसें गा वीरविलासा । तरी मीच परब्रह्म ऐसा । बाणे ठसा अवस्थात्रयीं ॥ ८८ ॥ जें कोठूनि व्यावर्त्तलें नाहीं अनुगत । ऐसें परिपूर्ण व्यापक अखंडित । आकाशादिभूतांचें अद्भूत । तेंचि संतत परब्रह्म मी ॥ ८९ ॥ जया वासुदेवनाम बोलती । सर्व भूतें जेणें आभासती । जेथूनि भूतव्यक्ति उदयातें पावती । आणि निमग्न होती जिये ठाई ॥ ६९० ॥ जें सर्व चराचरांचें जन्मस्थान । तेथ विश्व ऐसें होय कल्पित भान । तेंचि वासुदेवनामें परिपूर्ण । नित्य निर्गुण चिन्मय ॥ ९१ ॥ आणि चराचरविश्वाच्या लयीं । जें कीं अविनाश असे कालत्रयीं । व्यापकपणें नव्हे क्षयी । अनपायी सर्वदा जें ॥ ९२ ॥ ऐसेंचि सर्वदा बोले श्रुति । जे चराचरांची माझे ठायीं उत्पत्ति । स्थिति आणि मत्स्थानीं होय समाप्ति । अद्वय चिन्मूर्ति अखंड मी ॥९३॥

---

१ शब्दाचा अर्थ. २ निवळीच्या बी. ही उगाळून किंवा पूड करून गढूळ पाण्यांत टाकून पाणी स्थिर ठेवलें ह्मणजे कांहीं वेळानें पाण्यांतला गाळ खालीं बसतो.

संमतिश्रुति ॥ मय्येव सकलं जातं मयि सर्वं प्रतिष्ठितम् । मयि सर्वं लयं याति तद्ब्रह्माद्वयमस्म्यहम् ॥

ऐसा निश्चय होतांचि क्षणीं । तेचि मुक्ति वरी तयालागुनि । स्वयें ब्रह्म बाणतां स्वसुखधनि । मुक्त त्रिभुवनीं तोचि येकु ॥ ९४ ॥ ऐसा बोधु जयासि नाहीं । तरी तयासि तोचि बंध पाहीं । मी इंद्रियसमुदाय देही । जीवत्व तेंही बोधु तया ॥ ९५ ॥ अगा ब्रह्मभाव नसतां पोटीं । देहपणें तया संकल्प उठी । मी जीव ऐसें गा जगजेठी । भावना खोटी वऱ्ही वाढे ॥ ९६ ॥ तरी तेंचि जाण गा बंधन । अतिदृढ कळोलें देहत्व जाण । मग करितां नानासाधन । नव्हे मोचन सद्गुरुवांचोनियां ॥ ९७ ॥ आतां तेंचि परब्रह्म कैसं । तें कोणे उपायें जाणिजेत असे । आणि प्रत्यक्ष देहादि भास । तें कैसें निरखे भ्रांति कैसी ॥ ९८ ॥ विश्व आसतां प्रत्यक्ष दृष्टी । आणि सांपडला दिसे देहसंपुष्टीं । ऐसें असोनि ब्रह्मेंचि भेटि । कोणे गोष्टी होतसे ॥ ९९ ॥ तऱ्ही तेंही सांगों रघुनाथा । तें आइकें येकाग्र करूनियां चित्ता । येथें आत्मानुभव पुरता । बाणे तत्वता श्रीराम ॥७००॥

नेति नेतीति नेतीति शेषितं यत्परं पदम् । निराकर्तुमशक्यत्वात्तदस्मीति सुखी भव ॥ २२ ॥

'नेति नेति' ह्मणोनि श्रुति । दृश्यमात्राचा निषेध करिती । श्रुतदृष्ट विश्व जें रघुपती । ते ते व्यक्ति ब्रह्म नव्हे ॥ १ ॥ जें जें जितुकें अकारा आलें । तें तें उत्पत्तिविनाशा पावलें । तें तितुकेंही नश्वर भलें । असे रचलें कल्पित ॥ २ ॥ दृश्य तें ब्रह्म नव्हे ऐसें । श्रुति स्वयें बोलत असे । स्थूळलिंगदेह तैसें । नश्वर असें जाण रामा ॥ ३ ॥ षोडश कळा लिंगदेहीं । एक सतरा कळा ह्मणती पाहीं । तो तंव आत्मा नव्हे पाहीं । देह क्षयी परिणामवंतु ॥ ४ ॥ सोळा कळा लिंगदेहीं भेद । तेही तुज सांगों गा विशद । तरी इंद्रियें जाण दशविध । ऐकें भेद तयांचेही ॥ ५ ॥ चक्षु श्रोत्र आणि स्पर्शन । चौथी रसना पांचवें घ्राण । हें ज्ञानेंद्रियपंचक जाण । ऐक सांगेन कर्मपंचक ॥ ६ ॥ तरी कर चरण वाचा गुदोपस्थ । हें कर्मेंद्रिय पंचक निश्चित । ऐसीं दशेंद्रियें इत्थंभूत । प्राणवृत्त त आइक ॥ ७ ॥ प्राणापानव्यानोदानसमान । आणि सोळावें तें मन जाण । ऐसें षोडश कळांचें हें पूर्ण । लिंगदेह खूण रघुपुंगवा ॥ ८ ॥ सतरावी बुद्धि ही गणितां । तरी सतरा कळा होती गा जानकीकांता । हे येकैक कळा निरसितां । विस्तारु ग्रंथा होतसे ॥ ९ ॥ ह्मणौनि एकाचि दृष्टांतेंकरुनी । स्थूळलिंगदेह निरसुनी । तें पारिस मन येकाग्र करुनी । सुरशिरोमणी अयोध्यापती ॥ ७१० ॥ पंचमहाभूतांचा समूहो । त्याचें नाम बोलिजे स्थूळदेहो । तैसेचि नश्वर जाण निःसंदेहो । ब्रह्म स्वयमेव देह नव्हे ॥११॥ एवं स्थूळ लिंग दोन्ही शरीरें । तें नश्वर दृश्यपणें निर्धारें । हें ब्रह्म नव्हे साचोकारें । तें जाण खरें साक्षिभूत ॥ १२ ॥ जो जयाचा होय द्रष्टा । तो तें दृश्य केवीं होय सुभटा । ह्मणोनि एक न करीं दृश्य द्रष्टा । भिन्न दृष्टा द्रष्टेपणें ॥ १३ ॥ ऐसं नेतिमुखें

---

१ ठसतें; बाणतें. २ ऐकिलेलें आणि पाहिलेलें. ३ देवाच्या मुकुटावरील रत्न.

दृश्यजात । निरसिजेती दृश्य पदार्थ । जें जें उत्पत्ति क्षय असे पावत । तें जाण निश्चित मिथ्या भान ॥ १४ ॥ या स्थूळसूक्ष्माचा साक्षिभूत । सर्व निषेधें उर्वरित । स्वप्रकाशें जें प्रकाशत् । तेंचि निश्चित परमपद ॥ १५ ॥

संमतिश्रुति ॥ अस्थूलमनणुमह्रस्वमदीर्घमचक्षुरश्रोत्रमपाणिपादमिति ॥

जें सर्वांचेंही अधिष्ठान । जेथें सकार्य भासे अज्ञान । जेथें भासे विश्वस्वप्न । होय लीन मागुतें जेथें ॥ १६ ॥ अहो ज्याच अज्ञानें विश्व भासे । आणि ज्याचे ज्ञानमात्रें सर्वही नाशे । तया अविनाशातें जाण ऐसें । जें न नाशे निषेधितांही ॥ १७ ॥ संकल्पाचि निराकरणें । उरे जें सर्वांचें साक्षीपणें । जयासि निराकरण करवेना श्रुतीनें । नेणती करणें तेंचि ब्रह्म ॥ १८ ॥ नेतिनेति ऐसें ह्मणती श्रुति । जेथें मौन धरूनियां राहाती । तेचि ब्रह्म गा ब्रह्ममूर्ती । न भासे व्यक्ति जिये ठायीं ॥ १९ ॥ सर्वां दृश्यांचे निरासपणें । जेथें विचाराचें पुरे पेणें[1]। मनोवृत्तिबलाचें मालवणें । तेंचि जाणणें परब्रह्माचें ॥ ७२० ॥ देहादिकारांचा निरास करून । अवशेषित[2] जें प्रकाशमान । तेंचि परब्रह्म ऐसें जाण । नाहीं आन रमाकांता ॥ २१ ॥ यदर्थीं[3] भगवान सुरेश्वर । बृहदारण्यश्रुतीसि थोर । विस्तार केला आत्मविचार । तोचि येकाग्र परियेसीं ॥ २२ ॥

संमतिवार्त्तिक ॥ अध्यात्मादिपदार्थेभ्यो विविक्तं स्वात्मनि स्थितम् । तन्न पश्यत्यहो कष्टं दौर्भाग्यं दुष्टचेतसाम्

अध्यात्म अधिभूत अधिदैवत । देहादिप्रपंच समस्त । तैसेचि अंतरींचेही पदार्थ । जाण निश्चित अध्यात्मादिक ॥ २३ ॥ यया समस्ताहूनि वेगळें । दृश्यामात्राहूनि निराळें । तेंचि आत्मस्वरूप सकळें । वर्ते सोज्वळ स्वप्रकाशें ॥ २४ ॥ तया नाहीं व्यवधान[4] । नाहीं आपणाहूनि भिन्न । अपरोक्ष आपुलें स्वरूप जाण । प्रकाशमान स्वप्रकाशें ॥२५॥ जयाचिया भेटीलागीं । नलगे पडणें पडणीं आगीं । नलगे जाणें साधनमार्गीं । अंतरंगीं स्वयेंच पाहावें ॥ २६ ॥ आपणा देहीं आपणा आंत । आत्मस्वरूप पाहावें निश्चित । पाहतां क्षणीं स्वयाचि भेटत । परी तें असत स्वतः सिद्ध स्वयें ॥ २७ ॥ यालागीं कासया साधनें । अपरोक्ष वस्तूसि पाहिजे देखणें । हेंचि अंतर आणि स्वतःसिद्धपणें । कांहीं पुसणें लागेचिना ॥ २८ ॥ पाहातां न पाहातां स्वयेंचि असे । तया साधनांचे कां करी वळसे । तें साधनही जयाचेनि प्रकाशे । तें साधनीं कैसें आतुडेल ॥ २९ ॥ डोळा पदार्थातें प्रकाशी । डोळिया दावी ते कोण वस्तु ऐसी । यालागीं आत्मप्रभा आत्मयासी । स्वयें प्रकाशी स्वसंवेद्यत्वें[5] ॥ ७३० ॥ ऐसें प्रगट आणि प्रकाशमंत । स्वयें स्वतःसिद्ध प्रत्यक्षभूत । तयासि न देखती भाग्यहत । दुःख अद्भुत महाथोर ॥ ३१ ॥ अहा कटा हें अतिवोखटें । हें दुष्ट भाग्य या जनांचें उफराटें । स्वतःसिद्ध नेणोनि

१ गति, मजल. २ बाकी उरलेलें. ३ याच अर्थानें. ४ निराळेपणा, आडकाठी. ५ स्वतःच्या जाणतेपणामुळें.

कल्पिती मोठे । विषय गोमटे मानितातीं ॥ ३२ ॥ कामक्रोधलोभादिकींकरून । दुष्ट नष्ट जयांचें मन । तयांचें दुर्भाग्य वाखाणी कोण । अतिदीन अभाग्य जे ॥ ३३ ॥ या दुष्ट भाग्याहूनि थोर । आणीक दुःख नाहीं गा साचार । आत्मस्वरूप प्रत्यक्ष निर्विकार । अभाग्य नर न देखतातीं ॥ ३४ ॥ ऐसेंचि स्वयें श्रुति बोलती । खेदेंकरूनि कपाळ पिटिती । तेंही सुरेश्वराचार्य बोलती । ते आयिक संमति रघुपुंगवा ॥ ३५ ॥

संमतिवार्तिक ॥ प्रत्यक्षगोचरं देवं लोकं चातिप्रमादिनम् । दृष्ट्वा श्रुति शिरस्ताडमनुक्रोशति दुःखिता ॥

प्रत्यक्ष गोचर असतां देवो । हा प्रमादी कैसा पाहाहो । सर्वां प्रकाशी तोचि बोलिजे देवरावो । सिद्ध देवो हो स्वयेंचि असे ॥ ३६ ॥ जन्हीं हा लोक न पाहूं बैसे । जन्हीं पाहातां न पाहातां स्वयेंचि प्रकाशे । जनांच्या नेणत्यातेंही प्रकाशित असे । तो पाहातां कैसे न देखती ॥ ३७ ॥ मी आपणा नेणें ह्मणतां । त्या नेणण्यातें जो प्रकाशिता । तोचि स्वयें स्वतःसिद्ध असतां । सर्वां प्रकाशिता तो नेणती ॥ ३८ ॥ जरी नेणपणाचि स्वरूप याचें । तरी नेणपणेंचि बसणें शिळेचें । असावें हृदय याचें । नेणपणाचे अज्ञान नसावें ॥ ३९ ॥ शुद्ध नेणपण असे सुषुप्तिसी । ते प्रकाशी काय नेणण्यासी । की नेणणें याचें ज्ञान वृक्षासी । ते मूढ वृत्तीसी अतिमूढ ॥ ७४० ॥ तैसें हें नव्हे गा जाण । तेथें नेणणें याचेंही होतसे भान । भान करी तोचि पूर्ण । चिदानंदघन परब्रह्म ॥ ४१ ॥ ऐसें प्रत्यक्षमंत प्रकाशगोचर । त्यातें प्रमादी लोक नेणती पामर । तें देखोनि फोडिती शिर । श्रुतिसंभार कळवळोनी ॥ ४२ ॥ अति अक्रोशें कपाळ पिटिती । आपण प्रवर्त्तलों लोकसंस्थिति । लोकां होईल विषयसक्ति । आपणा नेणती ह्मणोनियां ॥ ४३ ॥ ह्मणौनि प्रवर्त्तलों यया भंगी । नेणों लोक वेधले विषयसंगीं । नेणती आत्मसुख अंतरंगीं । दुःखभोगीं ह्मणती या ॥ ४४ ॥ आह्मी अतिदुःखिता श्रुति होऊन । आक्रोश करितों पुनः पुनः जाण । मग विचारिती आपणा स्थान । कोणा शरण जाऊं ह्मणती ॥ ४५ ॥

संमतिवार्तिक ॥ प्रत्यक्षतममध्येनं नितंतं च स्वयं स्थितम् । अहो कष्टम पश्यंति कं याम शरणं वयम् ।

घटपट प्रत्यक्षामध्यें प्रत्यक्षभूत । देहादिक जे समीप पदार्थ । तेही दृश्यत्वें असती स्फुरत । त्याहूनि समीपस्थ ते प्रत्यक्षतम ॥ ४६ ॥ ययाच्या तीन कोटि असती । येक ते प्रत्यक्ष पदार्थ दिसती । येक ते प्रत्यक्षतर ह्मणती । तिसरी याची गति प्रत्यक्षतम ॥ ४७ ॥ तरी प्रत्यक्ष घटपट देहादिक । प्रत्यक्षतर मन बुद्धि सम्यक् । आणि बुद्धीनें साक्षी जें प्रकाशक । जाण निष्टंकें प्रत्यक्षतम तें ॥ ४८ ॥ ऐसें प्रत्यक्षामाजी प्रत्यक्षतम । तेंचि तें जाण शुद्ध ब्रह्म । येणें हें प्रत्यक्षाचें परम । व्याख्यान उत्तम शब्दाचें या ॥ ४९ ॥ प्रत्यक्ष घटपटदेहादि असे । परी देह अज्ञानें व्यापिलें दिसे । चक्षुरादि प्रमाणेंचि प्रकाशे । स्वयें

१ बेसावध रहाणार. २ दुःखांचा उपभोग घेणारा. ३ अतिशय प्रत्यक्ष. ४ संशय टाकून देऊन.

तरी असे अप्रकाश जड ॥७९०॥ दुसरेनि प्रकाशिल्या प्रकाशे । येऱ्हवीं अप्रकाश पणेंचि असे । दुसरियांसि प्रकाशीना स्वयंप्रकाशे । तेंचि जड ऐसें सर्वार्थीं ॥ ९१ ॥ तैसें नव्हे तें आत्मस्वरूप । तें तंव स्वप्रकाशें प्रकाशदीप । जें ज्ञानाचें उद्दीपें । तमाचा लेप जेथें नाहीं ॥ ९२ ॥ ऐसियासि नाहीं व्यवधान । स्वस्वरूपीं जयाचें अवस्थान । ऐसियातें जे न देखती अंधजन । दुःख दारुण अत्याश्चर्य ॥ ९३ ॥ तरी आतां आह्मीं कोण्हासि जावें शरण । आमचें पारपत्य करील कोण । यालागीं श्रुति भाकिती अति दैन्य । देखोन मूर्खपण लोकांचें ॥ ९४ ॥ हातींचें कंकण न देखती । देखावया दर्पणातें इच्छिती । दर्पणसाधनेंविण नाहीं प्राप्ति । ऐसें जल्पती चतुर ॥ ९५ ॥ आपणासि जिव्हा आहे कीं नाहीं ऐसें । इये जिव्हेनें गा जगातें पुसे । स्वयें आत्मा नेणोनि तैसे । जाणोनि पिसे मिरविताती ॥ ९६ ॥ इतुकियाचा ऐसा मथितार्थ । सर्व दृश्यांचें निरासें उर्वरित । तेंचि जाण पां इत्थंभूत । व्यापक नित्य आत्मस्वरूप ॥ ९७ ॥ जयासि निरसितांही कांहीं । सर्वदा असत्यपणें निरासु नाहीं । तेंचि तं ब्रह्मस्वरूप पाहीं । तेंचि तूंही प्रत्यक्ष नित्यानंद ॥ ९८ ॥ ऐसिये स्थितीनें रघुनाथा । तं सुखी होसी सर्वथा । याहुनि नको अन्यथा । वर्त्ततां वरपडा अनर्था होसी ॥ ९९ ॥ येथें ध्याता ध्येयध्यान सांडूनी । येकत्वें राहें निर्वाणीं । त्रिपुटी कल्पं नको खंडणीं । कोदंडपाणी ब्रह्मासि करूं ॥ ६० ॥

अहं ध्याता परं ध्येयमखंडं खंडसे कथम् । आत्मानं सतत ब्रह्म विद्धि चैकं निरंतरम् ॥ २३ ॥

येका अखंड ब्रह्मासी । खंडपण तें पाप परियेसी । त्रिपुटी कल्पितां येकासी । मा अनेकांसि अनेक पाप ॥ ६१ ॥ येकाचि ब्रह्मासि गा जगजेठी । भावितां ध्याताध्येय ध्यानत्रिपुटी । होती दोषाच्या गा कोटि । तेथ कल्पितां सृष्टि अनेक पावे ॥ ६२ ॥ यालागीं स्वयें आत्माचि ब्रह्म । येक व्यापक निरंतर सम । नाहीं व्यवधान निबिडपरम । अखंड निःसीम परिपूर्णत्वें ॥ ६३ ॥ अखंड निरंतर जे वस्तु । तेथें दुजेपणाची कैं मातु । ऐसिया ब्रह्मातें ध्येय ह्मणतु । आपण मानितु ध्याता ह्मणौनी । ६४ ॥ आपणा जीवत्वें ध्याता ह्मणे । ईश्वरत्वें ब्रह्मासि ध्येयत्वें जाणे । हेंचि अखंडासि खंडणें । नका मनें कल्पूं ऐसें ॥ ६५ ॥ अगा जीवात्मा जो कां आपण । तोचि त्वंपदें शोधितां ब्रह्म पूर्ण । नाहीं परस्पर दोघे भिन्न । येक चिद्घन निरंतर ॥ ६६ ॥ जीवाचे परिच्छिन्नत्वं किंचिज्ज्ञत्व । ऐसें कर्तृत्व आणि भोक्तृत्व । सांडूनि निवडीं शुद्धत्व । आणि अज्ञानत्व देहाध्यासु ॥ ६७ ॥ ईश्वाराचें परोक्षत्व ऐश्वर्यगुण । सांडूनि शुद्ध घेइजे निवडून । तरी दोहींसि अकृत्रिमजाण । नाहीं भिन्नपण स्वानुभवें ॥ ६८ ॥ दोहींचे सोडितां विशिष्ट गुण । हरपोनि जाये दोहींचें दोन्हीपण । येक आपणचि ब्रह्मपूर्ण । उरे निर्वाण

१ उजेड पाडणारें. २ आज्ञेप्रमाणें वर्तन. ३ दुःखयुक्त. ४ 'तत्वमसि' या महा वाक्यांतील 'त्वं' या पदाचा विचार केला असतां.

दुजेनविण ॥ ६९ ॥ ऐसें आपणचि येक ब्रह्म जाण । निरंतर सर्वात्मक परिपूर्ण । हेंचि जाणोनि राहें निर्वाण । चिदानंदघन आपणचि ॥ ७७० ॥ यालागीं ध्येय ध्यान सोडुनी । स्वयें ध्यानपण विसरोनि । राहें येक निर्वाणीं । नको शिणों ध्यानयोगाची ॥ ७१ ॥ जरी करूं ह्मणती ध्यातेयोग । तरी तुज सांगेन सांग । करूनि क्लेश अव्यंग । सांगों योग परियेसीं ॥ ७२ ॥

सोऽहं चिन्मात्रमेवेति चिंतनं ध्यानमुच्यते । ध्यानस्यविस्मृतिः सम्यक् समाधिरभिधीयते ॥ २४ ॥

अगा समाधि आणि ध्यान । सांगों यांचेंही लक्षण । तोचि योग करितां संपूर्ण । समाधान जेणें पावशी तूं ॥ ७३ ॥ तरी 'तत् त्वंपद' शोधिलिया[१] जाण । उरे जें चिद्रूप निरंजन । शद्ध स्वप्रकाश उपाधिहीन । नित्य पूर्ण पूर्णानंदु ॥ ७४ ॥ चिद्रूप चिन्मात्र आनंदघन । तेंचि मी ऐसें चिंतन । त्याचेंचि नाम बोलिजे ध्यान । परिशीलन स्वस्वरूपाचें ॥ ७५ ॥ तया ध्यानाचें लक्षण ऐसें । चित्त स्वरूपाकारकरितसे । तें तेथूनि उठे प्रपंचाध्यासें । मागुतें तैसें तदाकार कीजे ॥ ७६ ॥ ययाचें नाम तिये ध्यान बोलिजे । यया ध्यानातें सम्यक विसरिजे । स्वस्वरूपीं स्थिर राहिजे । समाधि बोलिजे नाम ॥ ७७ ॥ तेंचि समाधीचें लक्षण । आयिकें रघुनाथा संपूर्ण । करूनियां एकाग्रमन । सावधान परियेसी ॥ ७८ ॥

ब्रह्माकारमनोवृत्तिप्रवाहोऽहंकृतिं विना । संप्रज्ञातसमाधिः स्यात् ध्यानाभ्यासप्रकाशतः ॥ २५ ॥

ब्रह्माकारमनोवृत्ति । तिचा प्रवाह कीजे प्रत्यगावृत्ति । तेही सांडूनियां अहंकृति । जीवत्वभ्रांति जे बोलिजे ॥ ७९ ॥ गेलिया निःशेप अहंकारण । मी जीव ऐसें अनुसंधान । तत्त्यागेंचि ब्रह्मरूपस्फुरण होय । पूर्ण अखंड जें कां ॥८०॥ तैलधारा[३]चियापरी । अखंड चित्तवृत्ति ब्रह्मकार करीं । आणि तेथेंचि स्थिरावें रावणारी । समाधि पुरी संप्रज्ञात ॥ ८१ ॥ हे ध्यानाच्या अभ्यासास्तव । समाधि प्रकाशे स्वयमेव । समाधिसंपत्ती चित्तस्वभाव । राहाती सर्व ब्रह्माकार ॥ ८२ ॥ तेव्हां ब्रह्मरूपचि राहे मन । निःशेष नकरी प्रपंचभान । तेंचि अमनस्कसमाधि[४] जाण । चित्तें चित्तपण हरविलें ॥ ८३ ॥ संकल्पविकल्पाचि फरारी । तेंचि जाण या मनाची थोरी । तेंचि राहातां ब्रह्माकारीं । नुरेचि उरी चित्तपणा ॥ ८४ ॥ जेव्हां चित्ताचें अचित्त जालें । तेंव्हांचि संसारादि भय गेलें । दृश्याचें दृश्यपण उबडलें । तेथें कें आलें भय कोणा ॥ ८५ ॥ जेव्हां चित्त असे चित्तपणें । त्याचेंचि नाम दृश्य स्फुरणें । तेव्हांचि शोकमोहादि दारुणें । होती मनेंकरूनियां ॥ ८६ ॥

संमतिश्रुति ॥ कामः संकल्पो विचिकित्सा श्रद्धाऽश्रद्धा धृतिरधृतिर्ह्रीर्धीर्भीरित्येतत्सर्वं मन एवेति ॥

कामसंकल्पादि हें मन सर्व । ऐसें श्रुति बोले मनाचें गौरव । मनेंकरूनि सर्व भवा-

---

१ रिघणें प्रवेश करणें. २ विचार केल्यास. ३ तेलाच्या धारेप्रमाणें. ४ मनरहित समाधि.

दिभाव । होय अभाव मनेंविण सर्वा ॥ ८७ ॥ तेंचि येकें श्लोकसंगती । वसिष्ठ जें रघुनाथा निरूपिती । तेंचि आतां परिसावें श्रोतीं । जेणें विश्रांति पावेल ॥ ८८ ॥

कल्पांत वायवो वांतु यांतु चैकत्वमर्णवाः । तपंतु द्वादशादित्या नास्ति निर्मनसः क्षतिः ॥२६॥

कल्पांतीचा सवेंच वारा । येकत्र मिळोनि सुरश्रेष्ठवरा । वाजो ज-ही सैरावैरा । त-ही दरारा नाहीं त्यासी ॥ ८९ ॥ त्रैलोक्याचा करूनि गोळा । हा वायोने कां अंतराळा । परी अमनस्का भयादि मेळा । नाहीं कळवळा क्षितीचा ॥७९०॥ अथवा सप्तोदधि येकत्र होती । त्रैलोक्यातें बुडवूं पाहाती । त-हीं ज्ञाननिष्ठा नाहीं क्षिती । बाह्य नेणती ह्मणोनिया ॥ ९१ ॥ द्वदशादित्य एकवट होती । ते द्वादशकळीं खडतर तपती । ब्रह्मांडाची रक्षा करिती । परी नेणें सुमती अमनस्क ॥ ९२ ॥ मन स्वरूपीं ब्रह्माकार । तें नेणें हा अंतर्बाह्य विचार । ह्मणोनि न कळे विचार । तेथें विकार काय उपजे ॥ ९३ ॥ मनेंचिकरूनि दृश्यप्रतीति । मनें चराचरें सत्यत्वें भासती । मनें युक्तायुक्त स्फुरती । मनें होती लज्जादिक ॥ ९४ ॥ आधीं मनें प्रपंच कल्पिला । त्यामाजी उत्तम मध्यम भाग केला । तेथेंही बंधादिक मेळा । वोढवला निश्चयात्मक ॥ ९५ ॥ त्यामाजी येकाची लज्जा धरी । येकाचे भयें कांपे थरारी । येक उपजवी एक मारी । संकल्पामाझारी करी जैसें ॥ ९६ ॥ तेंचि मन ब्रह्माकार जालिया । स्वयें मनपण मुकलिया । नेणे वर्त्तणुक मोकळया । अथवा प्रळयामाजी पडलें ॥९७॥ प्रळईं जालिया महामारी । कोणे जाणावी हे प्रळयाची परी । मन बुडालें ब्रह्मानंदसागरीं । याचीच अवसरी नाहींपणा ॥ ९८ ॥ तेथें कल्पितें कल्प्य कल्पना । मावळोनि गेलीं गा रघुनंदना । हे सर्व मनाची विभागलक्षणा । मनक्षयीं भावना सर्वही बुडे ॥ ९९ ॥ तेथें उत्पत्ति प्रलय कोणासी । होती भासती कोणासी । यालागीं जालियाही प्रळयासी । अमनस्कासि क्षिती कैंची ॥ ८०० ॥ ब्रह्मज्ञानेंकरूनियां मन । जयाचें विरोनि जालिया अमन । तोचि तो पूर्णानंदघन । नित्य निर्गुण चित्स्वरूप ॥ १ ॥ तंव श्रीराम ह्मणती श्रीगुरुप्रती । अपूर्व निरूपिली हे ब्रह्मस्थिति । ज्ञानेंकरूनियां इयेची निष्पत्ति । तरी जे ज्ञानव्यक्ति कैसी असे ॥ २ ॥ ज्ञान ऐसें ह्मणिजे कोणासी । प्रगटि कीं गुप्त असे या जनांसी । तें सांगितलें सांग मजपासीं । स्वूण ऐसी अति सोपी ॥ ३ ॥ तंव वसिष्ठ ह्मणती गा रघुकुळज्योती । बरें पुसिलें तुवां विश्वमूर्ती । तरी करीन ज्ञानाची व्यक्ति । प्रगट जनांप्रति अप्रगट जाण ॥ ४ ॥ सर्वांही प्रत्यक्ष अनुभूत असे । परी ते नेणती अज्ञानवशें । आणि तें विचारितां तरी स्वयेंचि वसे । सांगेन ऐसें आयिका ॥ ५ ॥

या चितिः सर्वभूतानामुदयव्ययसाक्षिणी । तां चितिं पश्यतावस्थां पूर्णानंदघनामृताम् ॥ १७ ॥

सर्व भूतांचा उत्पत्तिनाश । साक्षित्वें देखे जो सावकाश । तेंचि ज्ञान पां उदास

---

१ वाहू दे. २ सात समुद्र. ३ बारा सूर्य. ४ मन नाहींसें झालें त्यास. ५ हे रघुकुलदीपका रामचंद्रा.

अनुभूत सर्वांस स्वतःसिद्ध ॥ ६ ॥ तेंचि स्थितीकरूनि ज्ञान । पाहिजे जरी अविच्छिन्न । तरी तेंचि पूर्णानंदघन । ब्रह्म पूर्ण परमामृत ॥ ७ ॥ हें तरी ज्ञान सर्वांसिहीं असे । परी आपुलें आपण नेणती ऐसें । तेंचि विचारितां सावकाशें । वस्तुचि असे चिदानंदघन ॥ ८ ॥ या जगाचें होणें आणि जाणें । उत्पत्ति क्षये इत्यादि वर्त्तणें । तें सर्व जाणें जेणें ज्ञानें । जाण खुण चिद्रूप तेंचि ॥ ९ ॥ आणि आपुलेंही क्रियाजात । देखणें परिसणें घेत देत । यया व्यापारातें जें जाणत । ज्ञान निश्चित सर्वात्मकतें ॥ ८१० ॥ ऐसें सर्वांही व्यापारांतरीं । मन बुद्धि प्रकाशे अंतरीं । साक्षित्वें साक्षिभूत सर्वांपरी । वसे निर्धारीं तेंचि ब्रह्म ॥ ११ ॥ यालागीं सर्वही ज्ञानरूप असे । विश्वाभास तो मिथ्या भासे । जगद्रूपें मनचि उल्हासे । मनेंविण नसे विश्वाभासु ॥ १२ ॥

मनोदृश्यमिदं सर्वं यत्किंचित्सचराचरम् । मनसो ह्युन्मनाभावात् द्वैतं नैवोपलभ्यते ॥ २८ ॥

जें दृश्य चराचर विश्वजाळ । यत्किंचित् श्रुत दृष्ट सकळ । तितुकें मनोमय केवळ । स्वयें निर्मळ मृगांभ जैसें ॥ १३ ॥ रविरश्मीं मृगजळ भासे । तें सम्यक् निरीक्षणेंचि नासे । तया मूळ कायसें । जाण सर्वांशें विवर्त सर्व ॥ १४ ॥ तैसें जाण हें जगडवाळ । असत्वपणेंचि हें निर्मूळ । ब्रह्मींचा विवर्त्तचि केवळ । नाहीं मूळ सत्यपणाचें ॥ १५ ॥ मननिमित्त विवर्तें स्फुरे । मन विराल्या स्वयेंचि विरे । ब्रह्माचेनि सत्यत्वें संस्फुरे । येऱ्हवीं लेंकुरें वांझ जैसीं ॥ १६ ॥ स्वप्नींचिया लेंकुरासी । कवण माय बाप तयासी । हें उठोनि पाहे जागृतीसी । तंव सिद्ध यासि ठाव नाहीं ॥ १७ ॥ तैसें या जगाचें आहेपण । तें तंव सर्वही मनाचें मनपण । तेंचि मन जालिया उन्मन । विश्वभान नाहींच होये ॥ १८ ॥ देहादिअंतर जें द्वैतजात । हेंही सत्यत्वें न स्फुरे जेथ । मग विश्व भासेल काय तेथ । सर्वही कनित्व होऊनि जाये ॥ १९ ॥ यालागीं विश्वाचा उदय रघुपती । होय मनाचिपासाव निश्चितीं । तेंचि उन्मन जालिया शांति । जगप्रतीति कैंची तेथें ॥ ८२० ॥ यालागीं जग तें सर्व मिथ्याभूत । आहे तें ज्ञानमात्रचि समस्त । तेंचि परब्रह्म जाण निश्चित । सर्वगत सर्वही जें ॥ २१ ॥ तेंचि आणिकें श्लोकेंकरून । जेणें बुझसी सर्व ब्रह्म पूर्ण । तेंचि सांगों निजखूण । होय समाधान समाधि ॥ २२ ॥

यदस्पंदं शिवं शांतं यस्यांतर्जगतः स्थितिः । स्पंदास्पंदविलासात्मा स एकोऽत्र चिदाकृतिः ॥ २९ ॥

तरी तें ऐसें देखिजे यथा दृष्टी । तेंचि शिवरूप गा इये सृष्टी । न स्फुरे जेथ विश्वव्यष्टि । शांत जगजेठी या नाम ॥ २३ ॥ निःशेष उपाधीचा उपरम । तेंचि बोलिजे शांत परम । जगामाजी जग हें विषम । येकत्वसम ब्रह्मरूप ॥ २४ ॥ ऐसें शांत शिवरूप कल्याण । पूर्णानंदैकब्रह्म परिपूर्ण । माजी विश्वास्थिति वर्ते जाण । उत्पत्ति

१ सर्व कर्मे. २ मृगजळ. ३ नीटपणें पाहिलें असतां. ४ भ्रम. ५ कल्याणकारक. ६ अनेक विश्वांचा निराळेपणा.

मरण त्यामाजी दिसे ॥ २५ ॥ जगाची उत्पत्ति आणि मरण । दोहींचें जें अत्यंत अभान । तद्विनाशात्मक ब्रह्म जाण । येक चिद्धन चिदाकृति ॥ २६ ॥ तया ज्ञानस्वरूपाचि ठाईं । विश्वोत्पत्तिस्थितिनाश भासती पाहीं । तरी तदात्मकचि जाण सर्वही । जग नाम नाहीं दुजें तेथें ॥२७॥ सकल ज्ञान मात्रचि असे । ज्ञानाच्याचि ठायीं सर्वही भासे । तद्व्यतिरिक्त कांहींच नसे । हें पूर्ण मानसें जाणावें ॥ २८ ॥ ऐसें तें आत्मस्वरूप जाणोनी । राहाताती योगिये निर्वाणीं । तैसेंचि तुवांही राजचूडामणी । ब्रह्मपणीं राहावें गा ॥ २९ ॥ मग देह असो अथवा जावो । परी त्या देहांतीं नाहीं संदेहो । स्वस्थितीनें नाठवे देहभावो । तो बोधाचा रावो बोधस्वरूप ॥ ८३० ॥ ज्ञान-दिनमणि पावतां । तेथ देहात्मबुद्धितम नाशो तत्वतां । आत्मभाव तो पावे सोज्वळतां । स्वयें स्वरूपता स्वरूपदृष्टी ॥ ३१ ॥ जैसें कां रंक पावे राज्यातें । तत्काल हारवी त्या रंकपणातें । कीटकी पावे जैसी भृंगत्वातें । स्वदेहातें विसरे जैसी ॥ ३२ ॥ तैसा अस-तांही देहसंग कोडें । परी तो न पाहे तया देहाकडे । स्वस्वरूपाचि वाडेंकोडें । भोगी निवाडें उमजेविण ॥ ३३ ॥ तेंचि वर्म तूं आइकें आतां । सांगेन तुज अवनिपाळनाथा । तेंचि येकाग्र करूनियां चित्ता । देह नेणता कैसा असे ॥ ३४ ॥

अहिनिर्वलनीमहिरात्मया । जगृहे परिमोक्षणतस्तु पुरा ॥
परिमुच्यति तामुरगः स्वबिले । न निरीक्षत चात्मतया तु पुनः ॥ ३० ॥

तरी महासर्पु अद्भुत । पूर्वीं कांत आत्मत्वें घेता होत । मीच ह्मणोनि देखत पाळित । सुखदुःख पावत तत्संगेंकरुनी ॥ ३५ ॥ मग तेचि सुळींहूनिया सुटली । भुजंगें अनात्म-पणें तत्काळ त्यजिली । तेव्हांचि मी पणाची अहंता गेली । उपेक्षिली परकीयत्वें ॥ ३६ ॥ जऱ्ही वारुळाचे द्वारीं । पडली असे तदाकारीं । परी येतां जातां येरझारी । न स्वीकारी मी ह्मणोनी ॥ ३७ ॥ तैसेंचि अज्ञानदशेच्या ठाईं । आत्मत्वें देह घेत होता पाहीं । तेथील ऊर्मि ज्या कीं साही । घेतु डोईं आपुलिया ॥ ३८ ॥ त्या साहाही ऊर्मि कोण कोण । ऐसें पुरुषोत्तमा सांगेन । तरी क्षुधा पिपासा जन्म । मरण शोक मोह जाण साही ऊर्मि ॥ ३९ ॥ कोण निष्ठा ऊर्मि त्या कोणी । त्याही सांगतों कार्मुकपाणी । तरी क्षुधा पि-पासा वर्त्तती प्राणीं । धर्म अनुदिनीं ययाचे हे ॥४०॥ ऊर्मि दोन्ही क्षुधा आणि तृषा । हे प्राणाचे धर्म गा सर्वेशा । देहीं जरा मृत्युचा वळसा । धर्म ऐसा स्थूळ देहाचा ॥ ४१ ॥ शोक मोह हे मनाचे धर्म । मानसीं वर्त्तती हे अधम । हे जाण षडूर्मीचें वर्म । याहूनि परब्रह्म व्यतिरिक्त ॥ ४२ ॥ यया षडूर्मिवंत हें शरीर । तें हें आत्मत्वें नेवे धीर । आत्मप्रतीति देखे दृश्यतर । स्वयें निर्विकार साक्षी असे ॥ ४३ ॥ जालिया स्वरूपप्राप्ति । तोचि आत्मदेह आत्मत्वें न मानिती । बाह्य दिसतीही तत्संगती ।

१ विस्मरण. २ विश्व उत्पन्न होणें, चालत असणें आणि नाश होणें. ३ तहान. ४ सदा विकारांनीं युक्त असलेले.

परी नाहीं भ्रांतिही देहपणाची ॥ ४४ ॥ जैसा जागृतीच्या ठाईं । देह आत्मत्वें घेतु पाहीं । सुषुप्तीसि अनुसंधान तेंही । न धरी काहीं देहपणें ॥ ४५ ॥ देहाचेंचि नेणे अनुसंधान । तेथें कैचा ह्मणो येईल क्षत्रिय वैश्य ब्राह्मण । ना गृहस्थ वेनीं यति आपण । नेणे जाण रघुवर्या ॥ ४६ ॥ अज्ञानासि देहधारी ऐसा दिसे । परी तो देही नेणे ऐसें । ज्ञानी जाण तो तैसा असे । देह सर्वांशें नेणतु ॥ ४७ ॥ पुरुषपणें पुरुषछाया । सवें असतांही विबुद्धराया । परी अनुसंधान नाहीं तया । तैसा ज्ञानिया वर्त्ततु ॥ ४८ ॥ अगा देहादिकांचा ठाईं । नुठतां आत्मबुद्धि कांहीं । तो देही असलिया पाहीं । बाधील काये आत्मविदा ॥ ४९ ॥ ययालागीं देह असतां कां नसतां । सर्वथा न लिंपे तो आत्मवेत्ता । देहत्वेंचि अनुसंधान तत्वतां । नाहीं सर्वथा तयासी ॥ ८५० ॥ तो देही असोनि देहातीत । देहसाक्षित्वें असे वर्त्तत । तेणें केलियाही जगाचा घात । स्वयें अलिप्त अकर्त्तेपणें ॥ ५१ ॥ तूं जरी ऐसें ह्मणसी सीता कांता । तरी तो होय कर्माचा अकर्त्ता । तरी तो हिंसाकर्म करितां । कैसा अकर्त्ता तो दिसे ॥ ५२ ॥ बुद्धि पर्वक केलियावांचन । कर्म सांग न निपजे जाण । निषेध गाळूनि विधीचें पाळण । कर्त्ता कोण कर्मादिकांचा ॥ ५३ ॥ बरवें वाईट ऐसें तुजे । विधिनिषेध ऐसें बुझे । तरीच तदनुसार कर्म निपजे । कर्त्तेन कीजे विध्यनुसार ॥ ५४ ॥ निषेध करितां पापदर्शन । विधि आचरितां अतिपुण्य । पापपुण्य सुखःदुख भान । तरीच जाण वर्त्ते तैसा ॥ ५५ ॥ पापास भेऊनियां निषेध गाळी । पुण्यातिशयें विधीतें पाळी । तरी देहानुसंधानिची काजळी । त्याचें कपाळीं कैसी नाहीं ॥ ५६ ॥ आणि बुद्धीवांचूनि कर्माचरण । कैसें घडे त्यालागून । निषेधादि येकु विधिपाळन । करी वर्त्तन कैसें जाण ॥ ५७ ॥ तरी आइकें सांगों गा रघुपती । येकाग्र होऊनियां चित्तीं । परिसतांचि पावसी विश्रांति । विश्वमूर्ती विश्वंभरा ॥ ५८ ॥

दोषबुद्ध्यो भयातीतो निषेधान्न निवर्तते । गुणबुद्ध्या च विहितं न करोति यथाऽर्भकः ॥ २१ ॥

स्वस्वरूप जया अवस्थान । तोचि तो स्वयें ब्रह्म पूर्ण । देह तयाचें नव्हे जाण । अनुसंधान तैसें नाहीं ॥ ५९ ॥ लोकदृष्टी जरी देह दिसे । तरी तो देहाचेनि संगें नसे । तो अकर्त्ता अभोक्ता सर्वांशें । प्रारब्धशेषें देह चळे ॥ ८६० ॥ अज्ञानविक्षेपात्मकेंकरून । प्रारब्ध राहिलें असे जाण । तेणेंचि होय देहद्वयभान । कर्माचरण तैच्छेचेंचि ॥ ६१ ॥ परी दोष होईल ह्मणोनि । कर्मी दोषदृष्टी करुनी । न निवर्त्ते निषेधापासुनी । कर्त्तेपणें उदास तो ॥ ६२ ॥ आधीं निषेधात देखेल । निषेधवर्त्तनीं पाप होईल । इतुकें बुद्धीनें नेणोनि केवळ । टाकी सकळ निषेधजात ॥ ६३ ॥ तेणें नानाजन्मजन्मांतरी । साधन करितां सहस्रवरी । निषेध गाळूनि विधिचि करी । निष्ठा

---

१ वानप्रस्थाश्रमांत राहणारा. २ आत्मज्ञान झालेल्या पुरुषास. ३ ते शिल्लक राहिल्यामुळें.

अंतरीं धरूनियां ॥ ६४ ॥ तेणें सत्कर्मांचे अनुष्ठान । निषेधाचें परिवर्जन । करितां सहस्र जन्म जाण । संस्कार पूर्ण तोचि बैसला ॥ ६५ ॥ अगा व्रतबंध केलियावरी । संध्येविण न जेवी ब्रह्मचारी । तो पूर्वींचें निषेधेंकरीं । व्रतबंधावरी सर्व टाकी ॥ ६६ ॥ गायत्रीमंत्राचे उपदेशें । तो विपरीत होऊनि बैसे । मरे तों राहे तेणेंचि अभ्यासें । न नाशे संस्कार त्याचा ॥ ६७ ॥ मा जन्मजन्मांतरीं केलें । तें केवीं राहेल उगलें । कुमारीचे जेव्हां लग्न जालें । तेव्हांचि बाणलें अहेवपण[1] ॥ ६८ ॥ यालागीं संस्कारेंचि करून । प्रवाहेंचि निषेध गाळी जाण । तैसेंचि करी विहिताचरण । गुणागुण नेणोनियां ॥ ६९ ॥ स्नानसंध्यादेवतार्चन । यज्ञदानादि नानासाधन । सांग करी सत्कर्मानुष्ठान । न धरूनि मनीं गुण त्यांचा ॥ ८७० ॥ हें केलिया दोष जाईल । अकरणीं प्रत्यवायें[2] उपजेल । केलिया अभीष्ट फळ होईल । इत्यादि केवळ नाहीं तया ॥ ७१ ॥ पूर्वप्रवाहेंकरून । उगेंचि करी विहिताचरण । तैसेंचि निषेधाचें परिवर्जन[3] । स्वभावें जाण करित असे ॥ ७२ ॥ तो तरी स्वयें उभयातीतु । नेणे पुण्यपापाची मातु । विधिनिषेध दोन्हीं नेणतु । स्वभावें आचरतु सर्वदा ॥७३॥ सत्कर्म स्वयें आचरावें । असत्कर्म सर्वस्वें गाळावें । ऐसा सर्वथा नव्हे इये ठांवे । सहज स्वभावें आचरतु सर्वदा ॥ ७४ ॥ परी वर्त्ततां न वर्तता दोष नाहीं । केल्याचें फळ तेंचि पाहीं । देहीं असोनि तो विदेही । नाहीं कांहीं दोषादोष ॥ ७५ ॥ जैसा बाळक हा जयापरी । गुणदोषातें नेणें अंतरीं । परी संस्कारें बाह्य चेष्टा करी । शुभाशुभपरी नेणोनियां ॥ ७६ ॥ संकल्पविकल्पाविरहित । चेष्टा करी स्वभावपतित । त्या माजी येक अशुभ होत । स्वयें नेणत जयापरी ॥ ७७ ॥ देव पूजिल्या हीत होईल । तोचि टाकिल्या दोष जडेल । हें दोहींच कांहीं नेणें बाळ । करी खेळ संस्कारवशें ॥ ७८ ॥ इंद्रियांच्या ज्या ज्या राहाटी । ज्ञानी नेणतां आत्मदृष्टी । इयापरी तो जगजेठी । करी राहाटी कर्माची हे ॥ ७९ ॥ तया अकर्म आणि कर्म । दोन्ही जालीं तें परब्रह्म । जग तें ब्रह्मत्वें निःसीम । नाहीं विषम अणुमात्र जया ॥ ८८० ॥ ब्रह्म नेणोनियां पाहिजे । तरीच ब्रह्म देखिजे । येऱ्हवीं सर्व ब्रह्म सहजें । नाहीं दुजें वस्तूविण ॥८१॥

अनुत्कीर्णे यथा स्तंभे संस्थिता शालभंजिका । तथा विश्वं स्थितं तत्र तेन शून्यं न तत्पदम् ॥ ३२ ॥

अगा या ब्रह्माचे पोटीं । विश्व संचलें असे जगजेठी । ब्रह्मेंविण विश्वाची गोठी । खोटी भिन्न ह्मणतां ॥ ८२ ॥ जैसा न कोरितां दारुस्तंभ[4] । पुतळिया असती स्तंभ । कोरिलिया पुतळियांचे गलंभ । दिसे भाव नानाकारें ॥ ८३ ॥ स्तंभ न कोरितां सुतारें । तो स्वयंभचि असे पुतळ्याकारें । कोरितां पुतळियांच्या संभारें । उठी निर्धारें स्तंभचि जैसा ॥ ८४ ॥ इतुकियाचा सिद्धांत ऐसा । स्तंभेंविण नाहीं पुतळियांचा ठसा । तैसें

---

१ सौभाग्य. २ केलें नाहीं तर दोष लागेल. ३ त्याग. ४ लांकडाचा खांब.

जगचि हें ब्रह्म परेशा । नाहीं दशा दुजेपणाची ॥ ८५ ॥ नातरी गगनाचे ठाईं । मारुतें सर्वत्र असे पाहीं । भासविल्या भेटे देहीं । येऱ्हवीं नाहीं ऐसाचि गमे ॥ ८६ ॥ ऐसें सकळ विश्व ब्रह्मचि असे । निराळें पाहिलें तरीच दिसे । येऱ्हवीं ब्रह्मपणेंचि वसे । भिन्न नसे आन कांहीं ॥ ८७ ॥ परी तें विश्वावांचन । ब्रह्म तें सर्वथा नसे जाण । सकळ विश्वाचें अधिष्ठान । असे ह्मणोन विश्व तेथें ॥ ८८॥ जैसें पृथ्वियेच्या पोटीं । घटशरावादिभांडीं गोमटीं । असती जाण पां जगजेठी । केली तरी भेटी होतसे ॥ ८९ ॥ नातरी कापुसामाजी कापड । कापुसरूप आहे उदंड । केल्यानिमित्त भासे उघड । दिसे गिवाड कापडपणें ॥ ८९० ॥ नातरी सुवर्णी अळंकार । कटककुंडलादिप्रकार । कां सुषुप्तीमाजी जागर । असे निरंतर अधिष्ठानत्वें ॥ ९१ ॥ जें जयाचें अधिष्ठान । ते वस्तु तद्रूपचि जाण । नव्हती परस्परें दोन्ही भिन्न । तया येकपण तें अखंड ॥ ९२ ॥ उंसामाजी जेसी शर्करा । कां गुळीं गोडी जैसी रघुवीरा । कां परिमळु जैसा कापुरा । शब्द अंबरामाजी जैसा ॥ ९३ ॥ कां शुक्तिकेच्या ठांईं रजत । तैसें ब्रह्मीं विश्वजात । अज्ञानें भिन्नसें भासत । येऱ्हवीं सदोदीत परब्रह्म ॥ ९४ ॥ प्रथम सर्वनिराशेंकरून । साधिजे स्वस्वरूप निर्वाण । मग सर्वत्र सर्व ब्रह्म पूर्ण । नाहीं अपूर्णपूर्णत्वें ॥ ९५ ॥ सर्वही हें जग ब्रह्म पूर्ण । ब्रह्माविण दुजें न देखे आन । हे रघुनाथा सेवटील खूण । जाणिजे पूर्ण ब्रह्म येक ॥ ९६ ॥

यथा न पुत्रिका शून्यः स्तंभोऽनुत्कीर्णपुत्रिकः । तथा भातं जगत्ब्रह्म तेन शून्यं न तत्पदम् ॥३३॥

जैसा कां स्तंभ न कोरितां । पुत्रिकाशून्य नव्हे तत्वतां । तैसें जग वेगळें न भासतां । तदंतगर्त असेचि कां ॥ ९७ ॥ जग भासतां न भासतां । ब्रह्मीं ब्रह्मरूपाचि तत्वतां । नाहीं येथें आन कथा । ब्रह्म सर्वथा ब्रह्मचि येक ॥ ९८ ॥

सौम्यांभसि यथा वीचिर्न चास्ति न च नास्तिच । तथा जगद्ब्रह्मणीदं शून्याशून्यपदं गतम् ॥३४॥

जैसें महान्हदाचां ठाईं । जळगंभीर निमग्न पाहीं । जेथें लहरी पण भासे अनेकही । परी निवाड दोहीं न होये ॥ ९९ ॥ सपाटलेपणें उदकचि दिसे । तेथें वीचि बुद्बुद कांहीं न भासे । तेंचि पाहातां वायुवशें । दिसती सर्वांशें वीचि सर्व ॥ ९०० ॥ तथापि वीचि भासतां न भासतां । सर्वही जळचि तत्वतां । लहरी असे जळात्मता । भासु अन्यथा तो भ्रमु ॥ १ ॥ परी वीचि आणि बुद्बुदाकारें । येक जळचि नाहीं दुसरें । तैसें ब्रह्मचि विश्वाकारें । भासे साचारें नानाकृति ॥ २ ॥ विश्वास आहेनाहींपण । हें कांहीं न बाल ब्रह्मीं जाण । यालागीं जग ब्रह्मासि भिन्नपण । नाहींच प्रमाण सर्वथा॥३॥ भेददृष्टि तरी विश्व भासे । ज्ञानदृष्टी ब्रह्मच असे । ज्ञानाज्ञानभेदें दोन्ही ठसे । येऱ्हवीं

---

१ वायु. २ आकाशांत; शब्द हा आकाशाचा गुण आहे ह्मणून. ३ ज्यामध्यें पुतळी नाहीं असा. ४ मोठ्या डोहांत. ५ लाटा. ६ बुडबुडे.

अन्य ब्रह्मचि येक ॥ ४ ॥ दर्पणामाजी मुख पाहिजे । तरी तेथें दुजें देखिजे । येऱ्हवीं सुखचि सुख तें सहजें । नाहीं दुजें देखतांही ॥ ५ ॥ दर्पणीं काय नवें मुख आलें । कीं दर्पणामाजी होतें ठेविलें । कीं दर्पण न घेतां हारपलें । किंवा लपालें कोणाआड ॥ ६ ॥ यालागीं दर्पणाचिया उपाधी । येकी झाली द्वैतबुद्धि । उपाधित्यागें निरावधि । ब्रह्म निरुपाधि येकयेकलें ॥ ७ ॥ जैसें सुषुप्तीचेनी संगें । स्वप्नीं भासती देह अनेगें । सेखी एकचि उरे निद्रात्यागें । स्वयें निजांगें स्वयंभचि ॥ ८ ॥ तैसें अज्ञानउपाधीनें जग भासे । तेंचि उपाधिनाशें ब्रह्मचि असे । येंकचि भासती अनंत ठसे । परी ते येकचि ऐसें जाण तूं ॥ ९ ॥ ह्मणोनि जे हे विश्वपरंपरा । ते सर्वही ब्रह्मचि गा रघुवीरा । तरुवर पावला विस्तारा । तऱ्ही बीजांकुरा भिन्न कांहीं ॥ ९१० ॥ नातरी अवयव जरी अनेक । नानाआकार नानावेष । नामेंचि दिसती असंख्य । परी देह येक न चुकेचि ॥ ११ ॥ नानाकारें भिन्नभिन्नीं । भेदुनि रुढावला इये जनीं । तो अधिष्ठानज्ञानेंवांचुनी । न जाय प्रयत्नीं कोटिसंख्या ॥ १२ ॥ तेंचि अधिष्ठानज्ञान होतां । भेदु नाशूनि जाय तत्वतां । उरे अधिष्ठान येकात्मता । नाहीं वार्त्ता दुजयाची ॥ १३ ॥ ऐसोनि वस्तुविचारें । सांडूनि सर्व भेदांतरें । राहीं येकात्म निर्धारें । नेणेंचि दुसरें कल्पित जें पैं ॥ १४ ॥ ब्रह्मचि मन बुद्धि आणि प्राण । इंद्रियें सर्व ब्रह्मचि पूर्ण । ब्रह्म देह विदेह जाण । सर्व कल्पना परब्रह्म ॥ १५ ॥ देह देहत्वें ब्रह्म जाण । इंद्रियव्यापार कर्त्ता करण । कर्तृत्वादिही निर्मोन । ब्रह्मचि पूर्ण पूर्णत्वें ॥ १६ ॥ सर्वही जितुका जगदाभास । जाण तें तेंचि ब्रह्म उदास । पाताळ मृत्युलोक स्वर्गास । नित्य निवास सर्वपणें ॥ १७ ॥ दिशा आदिशा अंतराळ । उत्तरदक्षिणादिदिशामेळ । कुळाचळादि नभमंडळ । श्रुतिअदिशा ऐसोंचि बोले ॥ १८ ॥

संमतिश्रुति ॥ स एवाधस्तात्स उपरीष्टात्स पश्चात्य पुरस्तात्स दक्षिणतः स उत्तरतः स एवेदं सर्वम् ॥
पुरुष एवेदं सर्वे यद्भूतं यच्च भव्यम् ॥

पुत्रदारादि सुहृदपणें । ब्रह्मचि स्फुरे रूपेंपणें । ते देणें घेणें चालणें बोलणें । निद्रा जेवणें तद्रूप ॥ १९ ॥ श्रवण श्रवणीय श्रोता । वचन वक्तव्य वक्ता । भोगणें भोग्य भोक्ता । ब्रह्म तत्वतां परिपर्ण येक ॥ ९२० ॥ दृश्य द्रष्टा आणि दर्शन । कर्त्ता क्रियादिकारण । ज्ञाता ज्ञेय आणि ज्ञान । त्रिपुटी पूर्ण ब्रह्म येक ॥ २१ ॥ जें जें मी पाहों जाय दृष्टीं । तें तें सर्वही ब्रह्मरूपेंचि उठी । श्रवणें शब्दार्थ जो घोटी तो ब्रह्मपुष्टि ब्रह्मत्वें ॥ २२ ॥ स्पर्शो जातां स्पर्शना । तो ब्रह्मरूपचि जाण । घ्राणें करितां अवघ्राण । समसमान परब्रह्म ॥ २३ ॥ जे जे रसना घे रसगोडी । ते गोडीसहित ब्रह्म निरवडी । वाचा वाचिक

---

१ रहाण्याचें स्थान समजणें. २ नाहींसें होऊन. ३ दक्षिण उत्तर वगैरे सर्व दिशा. ४ हुंगणें ५ खरोखर.

परवडी । ब्रह्मगोडी ब्रह्मत्वें ॥ २४ ॥ हातहाताचें घेणें देणें । चरणचरणाची गति चालणें । शिश्नशिश्नें रतिसुख भोगणें । ब्रह्मपणें ब्रह्म सर्व ॥ २५ ॥ गुदगुदाचा व्यापारु । व्यापारीं व्यापार निर्विकारु । एवं सकळही येकाकारु । निराकारु पूर्णानंद ॥ २६ ॥ मनाचें मनपण संकल्पन । तें तें जाण ब्रह्म पूर्ण । बुद्धीबुद्धीचें बोद्धव्यपण । चिदानंदघन सदोदीत ॥ २७ ॥ एवं ब्रह्मावेगळें कांहीं । बोलिजे ऐसें दुजें नाहीं । येणें ज्ञानें ज्ञान सर्वही । कुंठित पाहीं कोंदलेपणें ॥२८॥ पाणी कोंदले पाणिये । तरी परिपूर्ण तेथेंचि राहे । इत्यादि सर्व व्यापार पाहे । परिपूर्ण आहे तयापरी ॥ २९ ॥ आकाश कोंदलें प्रकाशीं । येणें जाणें न घडे तयासी । घेणें देणें तेंचि तेणेंसी । नाहीं दुजयासि परिश्रमु तेथें ॥ १३० ॥ दृष्टि कोंदली बुबुळीं । बुबुळ बुबुळा खेंवे वळी । कापुर गुंतला परिमळीं । कल्लोळ कल्लोळीं कोंदे जैसा ॥ ३१ ॥ क्षीराब्धि उचंबळे क्षीरें । तेथें येणें जाणें सहजाचि पुरे । यालागीं ब्रह्मींच ब्रह्म वावरे । नाहीं दुसरे बोलावया ॥ ३२ ॥ जैसें कल्पांतीचें उदक । सभरांभरित आयितें येक । तें कोंदें न घटे निष्टंक । तंव तें नेटक निघोटपणें ॥ ३३ ॥

संमतिश्लोक ॥ किं करोमि क गच्छामि किं गृण्हामि त्यजामि किम् । आत्मना पूरितं सर्वं महाकल्पांबुना यथा ॥

यालागीं जेणें जाणें करणें । जें कीजे तें ब्रह्म होणें । होणें न होणें जेणें भासणें । तें कोंदलें तेणें परब्रह्म ॥ ३४ ॥ यालागीं जैसा आहे तेसिया रितीं । सुखचर्यारांहें सहज-स्थिती । ह्मणोनि प्रेमें आलंगिती । येरयेरां स्थिति बाणली पूर्ण ॥ ३५ ॥ देह जाला रोमांचित । प्रेमें कंठ सद्गद दाटत । नयनीं अश्रु लोटले भरित । जैसें गलित कर्दळीपुट ॥ ३६ ॥ आनंद न माय हृदयांबरीं । तो बाह्य फांकला इंद्रियद्वारीं । स्वेदकण दाटले शरीरीं । सुखोकपरारी देहकंप ॥ ३७ ॥ शुद्धसत्वाचें उत्थान । आनंदें येत स्फुंदन । असकें कोंदलें संपूर्ण । देह मीपण विसरला ॥ ३८ ॥ आनंदु न माये सृष्टीं । वृत्त्यानंदु विराला पोटीं । मग सच्चिदानंदु तटतटीं । सर्व दाटी कोंदलेपणें ॥ ३९ ॥ अष्टही भाव सात्विकगुणीं । सत्य मीनले उपशमनीं । उपशमले सत्वगुणीं । कोंदे निर्वाणीं ब्रह्मसुख ॥ १४० ॥ ब्रह्मसुखीं न कळे दिवाराती । ना न दिसे दृश्याची व्यक्ति । स्वप्रकाश स्वयंज्योति । नित्यानंदतृप्ति नित्यानंदें ॥ ४१ ॥ हें देखोनियां वसिष्ठऋषि । आनंद पूर्ण न माय मानसीं । शिष्याचेनि पूर्णत्वें सद्गुरूसी । आनंदु आकाशीं न माये ॥ ४२ ॥ मग प्रबोधोनि रघुनाथासी । व्युत्थान करी समाधीसी । आळंगी सप्रेमेंसी । ह्मणे ये स्थितीसि कुरवंडी करूं ॥४३॥ मग ह्मणे धन्य धन्य हे स्थिति । धन्य धन्य बा तुझी मति । धन्य धन्य तुझी देहाकृति । ब्रह्मस्थिति बाणली तुज ॥४४॥ तुझ्या भाग्याच्या गणनेसी । तुळना नाहीं ये महीसी । काय वाणूं ये ब्रह्मस्थितीसी । ह्मणोनि पोटेंसि मागुता धरी ॥४५॥

---

१ जिकडे तिकडे भरलेलें. २ सुखानें आचरण करून. ३ घामाचे थेंब. ४ सर्व.

अहो पुत्राचेनि जालेंपणें । पितयासि ते जालेपण बाणे । परी तें न्यून सहस्त्रगुणें । असे उणें शिष्याहुनी ॥ ४६ ॥ शिष्यपणाचेनि जालेपणासाठीं । गुरुशिष्या आनंदी होय भेटी । ना चले ययाहूनि कोटी । आनंदा पुष्टि स्वानंदें ॥ ४७ ॥ तया दोघांसि सुखकोटी । परमानंदें पडली मिठी । जिराली येरयेरां पोटीं । द्वैतसृष्टि मावळली ॥४८॥ ऐसे राहिले मुहूर्त्त दोन्ही । क्षेमामिसें श्रीरामवदनीं । बोधामृताचि रिचउनी । एकपणें शोभतातीं ॥ ४९ ॥ मग अतिप्रयासें करूनियां । क्षेम सुटलें दोघां तया । तरी ऐक्य दोघांचिया आंतुलिया । निविड होवोनियां राहिलें ॥ ९५० ॥ मग ह्मणे जी सद्गुरुनाथा । परमानंदीं बुडालों आतां । नेणिजे दृश्यस्फूर्ति तत्वतां । देहाचा माथांचिरा पडिला ॥ ५१ ॥ आतां वस्तूवांचूनि दुसरें । आणुमात्र न दिसे साचोकारें । सर्वही आत्मानंदभरें । वेगळें नुरे आपणेंविण ॥ ५२ ॥ देहादिसकळप्रपंचजात । हा दृश्यत्वें भिन्न देखत । तो सर्वही जालें ब्रह्मभूत । दुजें तेथें न स्फुरे कांहीं ॥ ५३ ॥ स्वामी तुमचेनि प्रसादेंकरुनी । मीचि येकु जालों त्रिभुवनीं । दुजें न दिसे मजवांचुनी । जनीं वनीं मीचि येकु ॥५४॥ गुरुशिष्यादि-द्वैतगोष्टी । मावळोनि जाली ब्रह्मपुष्टि । तुह्मांसि तंपणें न देखें दृष्टीं । कोंदे सृष्टि ब्रह्मानंदें ॥५५॥ न देखें क्रिया कर्म करण । न देखें मजसहित [illegible]ण । देहादिइंद्रियें प्राण । समसमान चैतन्य देखें ॥ ५६ ॥ माझें ज्ञान आणि अज्ञान । उभयतां उभय चिद्गगन । क्रिया कर्तृत्व गमनागमन । चैतन्यघन चिद्रूपें ॥ ५७ ॥ आतां मज नाहीं कर्त्तव्यता । कर्त्तव्य करणेंचि तत्वतां । मजवेगळें सर्व पहातां । नाहीं रिता ठाव कोण्ही ॥५८॥ मी व्यापक चिद्रूप अनंत । करणक्रियादिव्यवहार समस्त । मजवेगळा मज नाहीं भासत । त्रिविध अंत नाहीं जया ॥ ५९ ॥ ऐसें बोलतां तया विशद । तंव वाचा जाली सद्गद । उठला बोध तुटला बाध । निर्विवाद होऊनि ठेला ॥ ९६० ॥ वसिष्ठ वोवाळी जीवीच्या जीवें । चिद्रत्नांचे वोवाळन दिवे । ह्मणे चिरंजीवी तूं माझेनि जीवेंभावें । काय करावें तुजलागीं ॥ ६१ ॥ तूं आनंदाचें पडपं । तूं आनंदाचें मळरोप । तं चित्प्रकाशाचे चैतन्यदीप । उदंड अमूप परि-पूर्णत्वें ॥ ६२ ॥ तं आनंदादिनियंता सर्वेश्वरु । तं ब्रह्मविद्येचा पूर्ण सागरु । तूं अकर्त्ता अभोक्ता निर्विकारु । सदाचारु जनप्रवृत्ती ॥ ६३ ॥ तूं अनादिपणाचेंही मूळ । तूं सर्वातीत सर्व सकळ । तं अकळ अचळ अढळ । नित्य निर्मळ स्वयंज्योति ॥ ६४ ॥ तूं सच्चिदानंदैकघन । तूं व्याप्यव्यापक विहीन । नित्य निर्गुण निरंजन । ब्रह्म परिपूर्ण अनादिरूप ॥६५॥ तूं कर्त्ताकर्माक्रियाविहीन । तूं अनादीचें मूळस्थान । तूं नित्य निरा-कार निर्गुण । परम पावन पावना ॥ ६६ ॥ तूं सगुणनिर्गुणाची आदि । तूं या आका-राची अवधि । तूं बुद्धीची बोधक बुद्धि । तूं सर्वसिद्धि साधका ॥ ६७ ॥ तुझें स्वरूप तुज कळलें । अपरोक्षानुभवें स्वयेंचि बाणलें । तुझें सुख तुजचिं फावलें । अज्ञान गेलें

---

१ आलिंगन देण्याच्या निमित्तानें. २ खऱ्या स्वरूपानें. ३ प्रतिष्ठा. ४ प्रत्यक्ष अनुभव आल्यामुळें.

तुझें तुझेनी ॥ ६८ ॥ स्वयें आपण स्वतः सिद्ध असतां । तें अज्ञान प्रतिबंधी सर्वथा । तें सद्गुरुप्रसादें विचारूं जातां । मागुती पुरता न लभेचि ॥ ६९ ॥ तेव्हां स्वतःसिद्धि आपला आपण । परिपूर्ण पूर्णानंदघन । तें तूं राहिलासि जाणोन । म्हणौनि धन्य तूंचि एक ॥ १७० ॥ तुझी स्थिति वर्णूं जातां । तेथें वाचा कुंठित गा समस्ता । तुवां जगा उपकार केला आतां । उद्धरणार्थी त्रैलोक्याची ॥ ७१ ॥ तुझी माझी हे गुह्य गोष्टी । ते समूळ फावली प्रसंगें सृष्टी । भाग्याचा जो धरूनि पोटीं । ब्रह्मीं भेटि श्रवणमात्रें ॥ ७२ ॥ मज पाहातां तुझें अवतरण । मनीं धरूनि हेंचि कारण । जें करावें जगदुद्धरण । हेंचि आचरण दाविसी ॥ ७३ ॥ अज्ञानाची येऊनि बुंथी । अंगिकारूं करिसी स्वशक्ती । तेव्हां जनांसि मनुष्यप्रतीति । श्यामलाकृती दाविसी तूं ॥ ७४ ॥ गुरुशिष्याची मिरवणी । करूनि जगा ब्रह्मसुखाची धनी । दिधली तुवां कार्मुकपाणी । जगदुद्धारणीं समर्थ ॥ ७५ ॥ जे अज्ञानार्थासि पावती । ते ज्ञानार्थीचि स्वयें होती । परमानंदें हुल्लती । न समाती ब्रह्मांडीं ॥ ७६ ॥ आणि जे ज्ञानार्थासि न पावती । ते संवादु तरी आइकती । इतुकेनिच तयां ब्रह्मप्राप्ति । ग्रंथाची शक्ती ऐसी असे ॥ ७७ ॥ संप्रदाय या ग्रंथाचा । एकांतसंवादु आमुचा । श्रवणमात्रेंचि स्वसुखाचा । पात्र साचा नित्यानंदु ॥ ७८ ॥ जो जया ठायांसिही न पवे । तो श्रवणमुखेंचि सुखावे । मूर्खासही प्रेम दुणावे । सेखीं पावे ब्रह्मसुख ॥ ७९ ॥ तयाहूनि जो मंद । तया तुझें नाम तें विशद । उच्चारितां परमपद । पावे अगाध ब्रह्मानंदु ॥ १८० ॥ तुझिया नामाचें जें संबोधन । तेंचि पैं नामें सगुणनिर्गुण । बोलिलों तीं भवतारण । संसारदैन्य निर्दळती ॥८१॥ ती भक्ती अथवा अभक्ती । प्रीती अथवा अप्रीती । सावध अथवा व्यग्रमती । उच्चारितां प्राप्ती ब्रह्मसुखाची ॥ ८२ ॥ जरी नेणोनियां गंगाजळ । सेविलियाही निर्मळ कलिमळ । नेणोनि स्पर्शिलया अनळ । पोळी तत्काल स्वतेजें ॥ ८३ ॥ नेणोनि शर्करा घातली तोंडीं । तरी आपणाऐसीच दे गोडी । सेवितांचि अमृत पाडी । कडी फुडी अमरत्वें ॥ ८४ ॥ तसे तुझेनि नामोच्चारणें । उठे संसाराचें धरणें । तोपें वैकुंठींचेनि राज्यपणें । सुख भोगणें नित्यानंदु ॥ ८५ ॥ ऐसे मुक्त मुमुक्षु विषयीजन । सुखी होती श्रवणेंकरून । हा उपकार तुवां रघुनंदन । अवतरोन केला जनां ॥ ८६ ॥ ते तुझे गुण गणनेसी । बोलतां सांकडें जेथें श्रुतीसि । तेथें पाड काइसा इतरांसी । धन्य कुसी मातेची ॥ ८७ ॥ पाझें गुरुत्व सकळां वरिष्ठ । म्हणोनि नाम पावलों वसिष्ठ । तुझेंनि जालों अतिश्रेष्ठ । भाग्य उत्कट गुरुत्वें माझें ॥८८॥ आणि धन्य तयाची मातापिता । हा माझा तुझा संवाद गा रघुनाथा । जे स्वयें बैसोनि आणिती चित्ता । ते पावती तत्वतां ब्रह्मानंदु ॥ ८९ ॥ अगा यया ग्रंथाचेनि

---

१ अंगाचा काळा रंग. २ हाक मारण्यासाठीं घेतलेलें नांव. ३ त्या ... ... देईल. ४ कलियुग मधलें पाप. ५ अग्नि.

श्रवणें । जाणते नेणते यांनीं जाणणें । ब्रह्मसुखाचि त्यां पावणें । जऱ्ही भोगणें संसार सुखा ॥ ९९० ॥ जंववरी हा ग्रंथु श्रवण करिती । तंववरी येक सुख पावती । लेणें ब्रह्मानंदें येक निर्वाहती । येक उठती व्यासंगें ॥ ९१ ॥ परी क्षणभरि जरी ब्रह्मानुंसंधान । तें करी संसार[१]अटवीचें दहन । ऐसें ब्रह्मसुखाचें सामर्थ्य पूर्ण । जाण हे म्हणून रघुपुंगवा ॥ ९२ ॥ जऱ्ही अग्नीचा विस्फुलिंग[२] साना । तऱ्ही तृणराशि करी भस्मी पूर्णा । कां तात्काळ जाळितसे तृणा । पेटला वनामाजी जैसा ॥ ९३ ॥ नातरी अमृताची येक कणिका । सेविल्या अमर करी देवां । कां सदनीं जऱ्ही दीपकाळिका । प्रकाशसुखा मेळवीचि ॥ ९४ ॥

कुलं पवित्रं जननी कृतार्था वसुंधरा पुण्यवती च तेन
अपारसंवित्सुखसागरेऽस्मिन् लीनं परब्रह्मणि यस्य चेतः ॥
स्नातं तेन समस्ततीर्थसलिलैर्दत्ता च सर्वावनिर्यज्ञानां च कृतं सहस्रमखिलादेवाश्च संपूजिताः ।
संसाराच्च समुध्दृतास्वपितरस्त्रैलोक्यपूज्योऽप्यसौ यस्य ब्रह्मविचारणे क्षणमपिस्थैर्यं मनः प्राप्नुयात् ॥

ययालागीं तयाचें कुळ पवित्र । जननी तयाची कृतकृत्य । चरण ठेवी पृथ्वीआंत । तीर्थवंत ते होय ॥ ९५ ॥ त्याचे चरणरज जेथें पडती । त्याचा स्पर्श तीर्थें वांछिती । जेथें वसे ते पवित्र क्षिती । ब्रह्मसंविति जो लाभे ॥ ९६ ॥ क्षणभरही जयाचें चित्त । ब्रह्मविचारीं राहे सुनिश्चित । तोचि गा नर कृतकृत्यार्थ[३] । नाहीं अनर्थ करणीयत्वें ॥ ९७ ॥ सर्वां सत्कर्मांचें फळ । यज्ञयागादिजपतपसकळ । तीर्थव्रतशमदमादिकल्लोळ । या सर्वांचें फळ ब्रह्मसुख ॥ ९८ ॥ तया ब्रह्मविचारांचा ठाईं । क्षण येक चित्त स्थिर पाहीं । तरी दानव्रतादिकें सर्वही । केलीं पाहीं तेणें पुरुषें ॥ ९९ ॥ जो व्यवहार करूनि आणीक । ब्रह्मविचार करी क्षण येक । तरी तोचि पवित्रांहूनि पवित्र देख । निष्कलंक ब्रह्मस्वरूप ॥ १००० ॥ सर्वां तीर्थीं तोचि न्हाला । पृथ्वीदान दिल्हें ब्राह्मणांला । नानापरीचा यज्ञादि मेळा । तेणेंचि केला अश्वमेधादि ॥ १ ॥ सकळ देव तेणें पूजिले । भवापासाव पितर मुक्त जाले । तेणें त्रैलोक्य अर्चिलें । आनंदविलें सर्वांभूतां ॥ २ ॥ येव्हडिया फळाचा भोक्ता । तोचि स्वयें होय गा रघुनाथा । धन्य धन्य होय त्याची माता।पिता । ब्रह्मवेत्ता जो होय ॥ ३ ॥ क्षणभरि चित्त ब्रह्मविचारीं । घालितां त्याची येव्हडी थोरी । मा ब्रह्म जाणें जो साक्षात्कारीं । त्याची थोरी काय बोलों ॥ ४ ॥ तो तंव ब्रह्मरूपचि तत्वतां । तेथें काय करिजे इतर कथा । तो सकळांचा प्रकाशु नियंता । जगा चाळिता ब्रह्मरूपें ॥ ५ ॥ यालागीं ग्रंथाचेनि श्रवणें । उठे संसाराचें धरणें । स्वयें ब्रह्मसुख अनुभवणें । होय पारणें ब्रह्मानंदाचें ॥ ६ ॥ तंव राम ह्मणे जी श्रीगुरुराया । हें मी लाधलों प्रसादें तुझिया । बुडतां भवार्णवामाजी यया । तारिलें

१ संसाररूपी अरण्याचें २ लहानशी ठिणगी. ३ ज्याला दुसरें कांहीं करावयाचें राहिलें नाहीं असा.

स्वामिया कृपा करोनी ॥७॥ या संसारसागरामाझारी । गिळिलों होतो क्रोधादिजळचरीं । तुवां सोडविलें काढूनि बाहेरी । ब्रह्मानंदपुरीं निमग्न केलें ॥ ८ ॥ तरी तुझिया उपकारा उत्तीर्ण । नव्हिजे केल्या देहादि अर्पण । ते नश्वर सर्व पदार्थ जाण । तनु मन धन अर्पी जन्हीं ॥९॥ तुवां दिधलें वस्तु शाश्वत । अचळ पूर्णानंदु भरित । त्यासि शिष्य उत्तीर्ण होइजेत । हा व्यवहार व्यर्थ करणें याचा ॥ १०१० ॥ जें जें गुरुसि कीजे समर्पण । देह पुत्रादिसंपत्ति जाण । तें तें मिथ्या नश्वरहीन । नव्हे समान परब्रह्मेंसी ॥११॥ जन्ममरणांचिया कोडी । असती संसाराची बांदवडी । ऐश्या ययाच्या उतरंडी । करी तडाफोडी गुरुकृपाचि ॥ १२ ॥ जैसें रंकासि अमरत्व देणें । का भणंगासि क्षीराब्धि समर्पणें । मृतासि जैसें अमर करणें । इत्यादि जाणे ययाहुनी ॥ १३ ॥ ऐसिये पदवीचा दाता । तयासि नश्वरें कीजे उत्तीर्णता । हें लज्जित होय बोलतां । काय आतां निवेदावें ॥ १४ ॥ ययालागीं सद्गुरूसि नमन । सद्भावेंचि करावें जाण । आणि मौनेंचि करावें स्तवन । तेंचि भजन सर्वस्वेंसी ॥ १५ ॥ ऐसें बोलोनिया रघुपति । श्रीगुरुचरणांवरी लोळती । येरें उचलूनि आलिंगिलें भीतीं । धन्य त्रिजगतीं ह्मणे आपणां ॥ १६ ॥ श्रीरघुनाथ ब्रह्ममूर्ती । ज्ञानाची देवता अधिष्ठात्री । तोही माझा शिष्य ह्मणती । धन्य त्रिजगतीं मीचि येकु ॥ १७ ॥ परब्रह्म आणि मी बोधकर्त्ता । कोण हे गुरुत्वाची गुरुता । ऐसें स्मरस्मरोनि विस्मयता । करूनि सुलीनता पावला ॥ १८ ॥ दोघां नाठवे दोनीपण । ब्रह्मसुखें ब्रह्म परिपूर्ण । नाठवे देहादिप्रपंचभान । आपणा आपण कोंदले ॥ १९ ॥ जया सुखाची सांगतां गोठी । बोलतां बोली हे गिरा तुटी । असो ब्रह्मरूपचि जाली सृष्टि । सर्वत्र पुष्टि ब्रह्मानंदें ॥ १०२० ॥ तंव विश्वामित्र ह्मणे धन्य । यया दोघांचें गुरुशिष्यपण । मीनलें परस्परें आपणा आपण । दोघां दोनीपण उरेचिना ॥ २१ ॥ शिष्यत्वें रघुनाथ जाला वरिष्ठ । गुरुत्वें श्रीवसिष्ठ श्रेष्ठ । दोघां जालें ऐक्य उत्कट । ब्रह्म स्पष्ट पूर्णानंदु ॥ २२ ॥ दोघांचें जाऊनि दोनीपण । ब्रह्मरूप जालें परिपूर्ण । धन्य माझें आगमन । फळला यज्ञ ब्रह्मफळेंसी ॥ २३ ॥ चित्तशुद्धीलागीं यज्ञादिसाधन । साधक करिती सांग जाण । मग चित्तशुद्धीनें ब्रह्मज्ञान । जें ब्रह्म निर्गुण निर्विकारु ॥ २४ ॥ तो यज्ञ आरंभितांचि क्षणीं । सगुणब्रह्म देखिलें नयनीं । आतां याचीच करितां काहाणी । जाली धनी ब्रह्मानंदयांची ॥ २५ ॥ बाप भाग्य माझें थोर । यज्ञमिसें पावलों निर्विकार । कोण पूर्वसामग्रीचा संभार । सुखसागर प्राप्त मज ॥ २६ ॥ यज्ञादिकर्में चित्तशुद्धीद्वारा । ब्रह्मज्ञान पावे परंपरा । तेचि यज्ञारंभीं येकसरा । ज्ञानसागरामाजी निमग्न ॥ २७ ॥ कोण्ही भोजन सामग्रीलागून । याचना करी मनीं धरून । तो जाय येकाचें घर लक्षून । तों अपूर्वपण

---

१ कामक्रोध इत्यादि भवसमुद्रांतील क्रूर प्राण्यांनीं. २ भिकाऱ्यास. ३ एकत्र झाले. ४ गोष्ट. ५ पूर्वजन्मार्जित कर्मांचा.

तेथें देखे ॥ २८ ॥ वोगरिलीं ताटें आयितीं । सिद्ध असती उभय पंक्ती । तेथें आदरें बैसऊनि जेवविती । अतिप्रीती परमानंदें ॥ २९ ॥ तैसेंचि जालें मजलागून । योगसाधना श्रीरामयाचन । करितां फावलें सगुणनिर्गुण । ब्रह्मपरिपूर्ण चिद्रूप जें कीं ॥ १०३० ॥ मुष्टिधान्यांलागीं मार्गी जातां । तंव तेथें निधि भेटे अवचिता । तेवीं मज ब्रह्मनाथीं तत्वतां । साधन न करितां अलभ्य लाभु ॥ ३१ ॥ तृषाहरणार्थ कांजीप्राशन । करितां फावलें अमृतपान । तैसें जालें मजलागून । ब्रह्म परिपूर्ण लाधलें ॥ ३२ ॥ ह्मणोनि हर्षत माय गगनीं । रघुनाथा आळंगी धांवोनी । प्रेम न समावे तिघांलागुनी । जाले निर्वाणीं ब्रह्मपणीं ॥ ३३ ॥ न कळोनि तन्हीं राजा दशरथ । संवादसुखें सुखोन्मत्त । आनंद पोटीं न समात । क्षेम देत रघुनाथा ॥ ३४ ॥ वसिष्ठविश्वामित्रासि नमून । राजा जाला सुखसंपन्न । सुरवर पन्नग परिवारजन । आनंदें परिपूर्ण डुल्लती ॥ ३५ ॥ सकळां जाली आनंदीआनंदु । रघुनाथ चित्तीं परमानंदु । अवघा कोंदला ब्रह्मानंदु । सुखस्वादु सर्व सभेसी ॥ ३६ ॥ सभेसि पिटिली येक टाळी । जयजयकारु कीजे सकळीं । उत्साह न समाये नभमंडळीं । भूमंडळीं परमानंदु ॥ ३७ ॥ मग आनंदें बैसोनि सभेसी । श्रीरामाचें लक्ष सर्वां जनांसी । पुष्पवर्षाव करिती स्वर्गवासी । सुख विबुधांसी कोंदलसे ॥ ३८ ॥ स्वर्गी नाचती नृत्यांगना । गंधर्व करिती गायना । आनंदु होतसे त्रिभुवना । सर्वां जनां महोत्साह ॥ ३९ ॥ तंव विश्वामित्र ह्मणे रायासी । मी यज्ञफळ पावलों अनायासीं । सगुणब्रह्म देखिलें श्रीरामासी । नाहीं सुखासि मर्यादा ॥ १०४० ॥ तंव प्रसंगें वसिष्ठाचें दर्शन । रघुनाथसंवादें सुखसंपन्न । ब्रह्मानंदें वोसडलों जाण । ब्रह्म निर्गुण असोनि जालें ॥ ४१ ॥ 'ब्रह्मैव सन् ब्रह्माप्येति'। ऐसें स्वयें बोले श्रुति । ह्मणोनि ब्रह्म असोनि ब्रह्मप्राप्ति । जाली गति ऐसी माझी ॥ ४२ ॥ आतां कासया यज्ञादिसाधनें । राहिली सत्कर्मादिक्रियादानें । जपतपव्रतादितीर्थाटनें । ज्याकारणें तें प्राप्त जालें ॥ ४३ ॥ तुझेनि दर्शनें कृतकृत्यता । भेटि जाली श्रीरघुनाथा । जाली जन्माची साफल्यता । कांहीं कर्त्तव्यता नाहीं मज ॥ ४४ ॥ राया तुझें भाग्य थोर । पोटा आला सर्वेश्वर । जयातें पाहाती योगेश्वर । ध्यानीं निरंतर लक्षिती जे ॥ ४५ ॥ नानासाधनीं करून । सर्वत्यागें संन्यास घेऊन । प्रत्यग्वृत्ति करून मन । निरंतर ध्यान करिती ज्याचें ॥ ४६ ॥ अंतरीं पाहातांही न सांपडे । नानासाधनीं साधकां नातुडे । तो पोटा आला वाडेंकोडें । भाग्य गाढें दशरथा तुझें ॥ ४७ ॥ तुझिया भाग्याचें गणन । करूं न शके चतुरानन तेथें एक मुखें मी ब्राह्मण । भाग्यपरिमाण केवीं करीं ॥ ४८ ॥ यांहीवरी वसिष्ठाऐसा गुरु । स्वयें ज्ञानाचा सागरु । उपदेशी ब्रह्मानंदाचा पूरु । अतिथोरु पूर्ण केला ॥ ४९ ॥ यया सुखाहूनियां कोड । नाहीं कोण्ही

१ वाढिलीं. २ श्रीरामचंद्राला मागून. ३ मूठभर दाण्याकरितां. ४ स्वर्गीच्या अप्सरा.

सुख अतिगोड । सरलें साधनांचें कावाड । जाला निबिड ब्रह्मानंदु ॥ १०५० ॥ तथापि कार्यांतर मनीं धरून । करणें असे राक्षसदहन । पुढें जानकीचें परिणयन[1] । होईल लग्नसमारंभें ॥ ५१ ॥ यया कार्यांतरीं घालूनि दृष्टि । मग करी रायासि गोठी । ह्मणे माझें कार्य धरूनि पोटीं । राम जगजेठी देईं मज ॥५२॥ माझा यज्ञ सिद्धी पाववीं । मनींचे मनोरथ पुरवीं । रामलक्ष्मण देईं मनोभावीं । नको गोंवी करूंया यज्ञा ॥५३॥ तंव राजा ह्मणे विश्वामित्रासी । तुह्मीं अतिथोर केलें आह्मासि । उत्तीर्ण नव्होचि उपकारासी । ह्मणोनि चरणासि लागला ॥ ५४ ॥ श्रीरामलक्ष्मण दोघेजण । वसिष्ठ करी विश्वामित्रा अर्पण । रायासि ह्मणे नको निवारण । करूनि जाण राहावूं राया ॥ ५५ ॥ श्रीराम परब्रह्म निर्गुण । तो रामरूपें जाला सगुण । करावया दैत्यनिर्दळण । स्वयें आपण प्रगटला ॥५६॥ ऐसें बोलोनियां रायासी । रामलक्ष्मण दिधले विश्वामित्रापासी । श्रीरामें कार्यसिद्धी केली यज्ञासी । स्वयंवरासि गेले सर्व ॥ ५७ ॥ तेणें आनंदु जाला सर्वां जनांसी । रामराज्य जालें पृथ्वियेसी । सुखसोहळा त्रैलोक्यासी । विपश्चितांसि[2] ब्रह्मानंदु ॥५८॥ येथें समाप्ति जाली ग्रंथासी । व्याख्यान जालें ब्रह्मानंदासी । निजानंदें रंगोनि मानसीं । विनवी श्रोतयां स्वात्मसुखें ॥ ५९ ॥ सद्गुरूचा अंकिला । कीं सद्गुरूचाचि असे केला । निजानंदें जो रंगला । पूर्णपणें सहजचि ॥ १०६० ॥ येथें संपलें निर्वाण प्रकरण । याचें केलें यथामती निरूपण । केवळ भावार्थदीपन । प्रकाशमान परमार्थ ॥ ६१ ॥ भावार्थटीका हे संपूर्ण । मूळ ग्रंथाचें यथामती व्याख्यान । करूनि कल समर्पण । सद्गुरूचरण स्मरोनियां ॥ ६२ ॥ श्रीकृष्णा तटसान्निध । नामें निर्गुणग्राम अगाध । तेथें[3] ग्रंथसमाप्तिबाध । जाला सहज पूर्णत्वें ॥ ६३ ॥ शके पंधराशेंचौऱ्यांसी । शुभकृत्नामसंवत्सरासी । उदगयन माघ शुद्धदशमीसी । ग्रंथ केला समास ॥ ६४ ॥ आनंदसंप्रदायवंशोद्भव । माध्यंदिनीशा अभिनव । वासिष्ठसारग्रंथानुभव । हृदयीं स्वयमेव प्रगटला ॥ ६५ ॥ सर्व शास्त्रांचे मथितार्थ । सर्व वेदांतसंमत । वासिष्ठसार हा ग्रंथ । यथामती वाखाणिला ॥ ६६ ॥ हें वासिष्ठसारटीका । न ह्मणावी जी पुण्यश्लोका । पदपदार्थ पाहातां निका । दृष्टी साधका दिसेना ॥ ६७ ॥ सहज पूर्ण निजानंदें । रंगला तो साधुवृंदें । श्रवण करावा स्वच्छंदें । ग्रंथ निर्द्वंद्व वासिष्ठ ॥ १०६८ ॥

---

१ विवाह स्वयंवर. २ विद्वानांस. ३ यानंतर मोगरेकर रंगनाथाच्या नांवानें प्रसिद्ध असणाऱ्या प्रतींत कांहीं ओंव्या वेगळ्या आहेत त्या याच्या शेवटीं दिल्या आहेत.

मोगरेकर रंगनाथांच्या ग्रंथांतील ओंव्या.

गोदावरीच्या दक्षिण तिरी । तत्क्षेत्र प्रतिष्ठूनि श्री नरहरि । दर्शनमात्रें जगासि तारी । कृपाळु भारी कृपाळुत्वें ॥१६॥ तेथें प्रसिद्ध गा कपिलगोत्रोत्पन्न । श्री नरसिंहांकित अनंत गुण । कुळस्वामी जयासी सिंहासनी । करी रक्षण परंपरेसी ॥ १७ ॥ श्रीमदनंत नामें करून । अवतरला श्रीनारायण । करी जनांचें कलिमलदहन । करी तारण नाममात्रें ॥१८॥ त्रिविध अंत नाहीं जयासि । देशकालादि प्रमाणासी । ह्मणोन अनंत नामें प्रसिद्ध ऐसीं । तारी जगासी स्वप्रकाशें ॥१९॥ तत्पुत्र स्वयें जाण आपण । सर्वत्र ब्रह्मात्मक खूण । ह्मणोनि करितां नामस्मरण । पिता जाण नामठेवी ॥ २० ॥ ब्रह्म अपरोक्ष जाण आपणासी । ह्मणोनि आपेराक्ष संज्ञा त्यासी । पिता नामसंज्ञा ऐसीं । अनामासी नामसंकेत ॥ २१ ॥ तयाचा पुत्र तत्कळावंत । रंगनाथ नामें असे विख्यात । तो ग्रंथार्थी प्रकटीं यथार्थ । वेंचोनि चित्त सद्गुरुचरणीं ॥ २२ ॥ तें करावयाचें कारण । तेंही निमित्त आतां सांगेन । करून तत्वंपदाचें व्याख्यान । निरूपण करीन आतां ॥ २३ ॥ गो शब्दें इंद्रियगण । तयातें प्रकाशी गोविंद पूर्ण । नियंता प्रवर्तक होय आपण । तेंचि अभिधान गोविंद ऐसें ॥२४॥ तयाचा पुत्र विठ्ठल मूर्ति । तो स्वयें प्रकाशाची ज्योति । ऐका नामाची उत्पत्ति । एकाग्र चित्तीं परिसावी ॥ २५ ॥ विठ्ठल नाम या तिनी अक्षरांची विपत्ति । ते कीजेल एकएकाक्षरप्रति । तें सक्ष्मदृष्टीं नाणावें संतीं । प्रबुद्ध जाणती स्वज्ञानें ॥ २६ ॥ संमति । विशेषेण ठसितं भासमानं जगत् लसितं प्रकाशते यस्मिन् स विठ्ठलः ॥ एवं व्याख्यानाची वित्पत्ति । किती लिहावी इये ग्रंथीं । बहुधा प्रकारीं व्याकरण स्थिति । किजेल वित्पत्ती व्याकरणबळें ॥ २७ ॥ जैं स्वस्वरूपाचोनि विस्मरणें । स्थूल सूक्ष्म भासे दृश्यपणें । तें लया पावे स्वप्रकाशें जेणें । तेंचि जाणणें विठ्ठल नाम ॥ २८ ॥ अथवा जयाची स्वप्रकाशमूर्ति । प्रकाशें वर्ततां स्वयंस्थिति । विश्वाभास पावे समाप्ति । न भासे व्यक्ति दुजयाची ॥२९॥ अथवा ज्या अधिष्ठानाचे ठायीं । विस्तृत जें जग प्रकाशे पाहीं । तेंचि तें आधिष्ठानत्वें सर्वही । शोभे कांहीं विठ्ठलनाम ॥ ३० ॥ तेंचि विठ्ठल नाम बोलिजे । विठ्ठल ऐसें त्यासचि ह्मणिजे । त्या प्रीतीस्तव वरिजे । ग्रंथ व्याजें गुरुमहिमा ॥३१॥ ते श्रीमद्विठ्ठलाचिया प्रीति । ग्रंथ पावला हा समाप्ति । करावयाची हे आर्ति । पांडुरंगमूर्ति स्नेहातिशय ॥ ३२ ॥ तत्स्नेहसहित ग्रंथ व्याप्ति । प्रीति पावो सद्गुरुमूर्ति । चरणीं रंगोन अति प्रीति । पावे समाप्ती जिवित्वें ॥ ३३ ॥ आतां न बोलतां श्रीगुरु परंपरा । तरी व्यर्थचि श्रम पावेल गिरा । ह्मणून बोललों येक दोन अक्षरां । प्रसाद पुरा लाभे जेणें ॥३४॥ ईश्वरापासोनियां ज्ञान । तें शिष्यपरंपरेनें आलें पर्ण । तितकें न बोलवितीं सद्गुरुजाण । परी येक दोन तीन वर्णवेंकीं ॥ ३५ ॥ तरी तोचि करणें आह्मां । कांहीं

वर्णूं सद्गुरु महिमा । वर्णितां वाचेचिं गरिमा । जाय उपरमा अवाच्यपणें ॥ ३६ ॥ नानादुर्बळ जरी भक्त असती । भावें समर्पितां गंगावती । तरी तोषे विश्वमूर्ती । समानगति दुर्वारत्न ॥ ३७ ॥ कां त्रैलोक्य प्रगटी जो स्वप्रकाशतेजें । तया सूर्यातें दीपें वोवाळिजे । तेथें भक्तांवांचूनि प्रकाश नेणिजे । परी अभीष्ट दीजे संतोषुनि भक्तां ॥ ३८ ॥ तैसें भक्तिभावें गुरुपरंपरेसी । वर्णनी अल्प चित्सुखासी । तोचि ज्ञानदावाग्नि अविद्येसी । जाळून ब्रह्मानंदासी वाढवी ॥ ३९ ॥ तरी आधी वासुदेवानंद सरस्वती । ते साक्षात सगुणत्वें ब्रह्ममूर्ति । न वर्णवे तयाची कीर्ति । अगुण अमर्ति परमानंदत्वें ॥ ४० ॥ कोणी सिद्धानंद ऐसें ह्मणती । किती वर्षें करूं क्षेत्रीं वस्ती । करूनि देह ठेविला श्रीभागीरथी । सागरप्रति गंगासंगमीं ॥ ४१ ॥ ब्रह्मग्राम उत्तरतीरीं । तेथें परमानंदादिकां प्रबोधकरी । देह ठेउनी गंगातीरीं । ब्रह्मत्ववरी स्वयें आपण ॥ ४२ ॥ तयाचा शिष्य वैकुंठानंद । तो साक्षात आनंदकंद । ब्रह्मपरिपूर्ण पूर्णानंद । ब्रह्मस्वानंद स्वादितां ॥ ४३ ॥ तयाची कीर्ति बोलिजेल । तरी वाचा पवाडु न पाविजेल । तो सर्व प्रकाशक पूर्ण कमळ । नित्य निर्मळ ब्रह्ममूर्ति ॥ ४४ ॥ किती येक काळ गमन । करूनि आनंद वनीं निवासन । पश्चात् बदरिकाश्रमीं निवास पूर्ण । जनतारण करावया ॥ ४५ ॥ अनेक शिष्य बोलिले । ब्रह्मानंदसुखें निवाले । तें बोलों किती जाति बोलिले । असो ते नमिले मनें करोनी ॥ ४६ ॥ प्रगदेहविसर्जन केदारीं । केलें अलकनंदातीरीं । स्वयें ब्रह्मत्व असोनि ब्रह्मत्वावरी । लीलें करी जनसंग्रह ॥ ४७ ॥ तयाचें शिष्यत्व अंगिकारूनी । स्वयें प्रगटला शारंगपाणी । श्रीकृष्णानंद नामें मिरवणी । जनीं वनीं प्रकाशक ॥ ४८ ॥ श्रीकृष्णानंदनामें येणें । तेणें त्रैलोक्यासि उद्धरणें । नामरूपातीत पणें । ब्रह्मनिर्गुण ब्रह्ममूर्ति ॥ ४९ ॥ नामनिर्दोष तें परब्रह्म । सर्वदा सर्वगत सर्वसम । करूनि नामव्याख्यान उत्तम । पावनापावन परब्रह्म ॥ ५० ॥ श्रीकृष्णनाम ब्रह्ममूर्ति । ज्ञातया नामोच्चारें होय प्रतीति । पावोनि पावनी विश्रांति । स्वानंदचित्तीं भोगिती ते ॥ ५१ ॥ तयावरी आनंद पद येणें । ब्रह्मत्वासि आगिलें उणें । येक ब्रह्माभिधान येणें । निराकरणें जडदुःखादि ॥ ५२ ॥ आणि समस्तांहि नियामक बृहत । आकाशाहूनि थोर विस्तृत । तयातेंचि ब्रह्म ऐसें ह्मणिजेत । साक्षेपत ब्रह्म ह्मणवुनी ॥ ५३ ॥ जड विश्वापेक्षा तें चैतन्य । दुःखापेक्षा तें आनंदघन । कल्पितापेक्षा तें अधिष्ठान । सत्ता पूर्ण पूर्णत्वें ॥ ५४ ॥ स्थूळ सूक्ष्मापेक्षा तें बृहत । इत्यादि अपेक्षा ब्रह्म ह्मणिजेत । सर्व व्यावृति त्याज्य निश्चित । इत्थंभूत तेंचि ब्रह्म ॥ ५५ ॥ हें सर्व नसतां कल्पितपणें । इत्यादि नामें कासया ठेवणें । ब्रह्मत्वहि हरवी सच्चिदानंदपणें । आनंदपणें परिपूर्ण ॥ ५६ ॥ शेवटीच्या आनंदें करूनि । सर्वही परमानंदेंचि वाखाणी । परमानंदावांचूनि जनीं । नाहीं कोणी दुजेपणें ॥ ५७ ॥ ज्या ज्या अपेक्षा नाम बोलिजे । तंव त्या जडादिकांसि अभाव सहजें । यालागीं तें न वाखाणिजे । सर्व

आणिजे परमानंद ॥ ५८ ॥ हेंचि जाणावया लागून । आनंदपद मिरवी आपण । ह्मणोनि कृष्णानंद नामें पूर्ण । ब्रह्म निर्गुण अनिर्देश्य ॥ ५९ ॥ नेणोनियां दुजाची मात । येकला येक आनंद भरित । तोचि कृष्णानंद नामें संकेत । जाण हेत ब्रह्माख्यतें ॥ ६० ॥ तेंचि कृष्णनामाचें व्याख्यान । यथाविषणा करीन पूर्ण । न भंगोनियां व्याकरण । शुद्धनिरूपण सांप्रदायें ॥ ६१ ॥ तेंचि संमति श्लोकें करूनी । प्रगट कीजे आर्षवाणी । परिसावें श्रोते जनीं । आनंदक्षणी पावावया ॥ ६२ ॥ संमतिश्लोक । कृषि र्भूवाचकः शब्दो णश्च निर्वृतिवाचकः । तयोरैक्यं परंब्रह्म कृष्ण इत्यभिधीयते । टीका । तरी कृषि या वर्णद्वयें करून । भूवाचक शब्द होतसे जाण । भूसत्ता या धातूचें व्याख्यान । प्रसिद्ध पूर्ण व्याकरणशुद्ध ॥ ६३ ॥ एवं आद्यवर्णद्वय सत्तावचन । करी कल्पिताचें व्यावर्तन । णकार जो कीं तृतीयवर्ण । वाचक पूर्ण निर्वृत्तीचा ॥ ६४ ॥ निर्वृत्ति परमसुख ऐसें । सर्व शास्त्रीं बोलिले असे । परमशब्दें निरतिशय ऐसें । ज्याहूनि नसे सुख थोर ॥ ६५ ॥ निरतिशय सुख तें ब्रह्म जाण । जें कीं परमानंदैक घन । तें सत्तेसी पावतां ऐक्यपण । ब्रह्म परिपूर्ण पूर्णत्वें ॥ ६६ ॥ सत्तासुखाचे अंतरीं । ज्ञान नांदे परव्यापरी । येके वीण येक क्षणभरी । भिन्न परस्परीं पावेना ॥ ६७ ॥ हें स्वगत भेद निरसन मिसें । कां श्रीरामपद व्याख्यानांशें । पूर्वीं सांग निरोपिलें असे । जाणिजे ऐसें सज्ञानीं ॥ ६८ ॥ सत्ता तेंचि जाणावें ज्ञान । ज्ञान तोचि आनंद पूर्ण । तिहीं पदीं एक ब्रह्म निर्गुण । नव्हे न्यून एकत्वें ॥ ६९ ॥ येथें नाहीं गुणीगुण विभाग । तिहीं पदीं एक ब्रम्हचि सांग । म्हणोनि भिन्न नलगे पदांग । एक अव्यंग परब्रम्ह ॥ ७० ॥ ते कृष्णनंद नामें मिरवणी । हाचि मंत्र परम गुह्यस्थानीं । हें महावाक्य कोंडिसवाणी । करी निर्वाणीं साक्षात्कार ॥ ७१ ॥ ह्मणन श्रीकृष्ण नामें येणें । परब्रह्मचि सर्वदा बोलणें । वरी आनंद शब्द पुरवणें । आनंद येणें सर्वत्र पैं ॥ ७२ ॥ ते श्रीकृष्णानंद नाम उच्चारणें । उठिजे स्वरूप साक्षात्कारपणें । ज्ञाते सुखपावती तेणे । नाहीं दैन्य परमानंदपणें ॥ ७३ ॥ 'शब्दादेव अपरोक्षसिद्धि' ऐसें । सिद्धांत शास्त्रीं बोलिलें असे । तेंचि अनुभवाहि येतसे । शब्दें प्रकाशे वाच्य वस्तु ॥ ७४ ॥ लौकिकही शब्दें करून । वाच्यार्थासी तद्रूपपण । करितसे स्वयें जाण । न करितां प्रयत्न शक्ति ऐसी ॥ ७५ ॥ गो मनुष्य घट पट हस्ती । जे जे नामशब्दें भारती । तदाकार होय चित्तवृत्ति । संत बोलती साक्षात्कार तो ॥ ७६ ॥ यालागीं श्रीकृष्णानंद नारायणें । स्वरूप साक्षात्कारचि बोलणें । ह्मणोनि हेंचि उच्चारणें । ब्रह्मसुख जेणें पाविजेत ॥ ७७ ॥ ह्मणोनि सर्वदा हेंचि मी करीं । बुडें श्रीकृष्णानंद सागरीं । नेणे तत्सुखेंवीण दुसरी । मात पुरी सर्वदा ॥ ७८ ॥ असो त्याची कीर्ति वाखाणणें । तरा ग्रंथरूपें केलें बोलणें । संत निवति तत् श्रवणें । अनुदिनीं परमानंद ॥ ७९ ॥ यालागीं सर्वदा सर्वपणीं । ग्रंथरूपनामें तया वाखाणीं । तेव्हांचि विचरे सर्वत्र सर्वपणीं । पूर्णपणीं पूर्णत्वें ॥ ८० ॥ एवं आदिमध्य अवसानीं । गाइला श्रीकृष्ण मंगळ-

चरणीं । ऐसीच उक्ती शिष्टाचरणीं । ग्रंथ परिपूर्णपणीं सिद्ध येणें ॥ ८१ ॥ संमति ॥ ग्रंथादौ ग्रंथमध्यें ग्रंथाते मंगलमाचरणीयमिति शिष्टाचारः । नमस्कारात्मकं अशीर्वादात्मकं वस्तुनिर्देशादिकं चेत्यादि ॥ यथांत नमस्कारात्मक । मंगळाचरण केलें देख । जय शब्दें आशीर्वादात्मक । केलें सम्यक मंगलाचरण ॥ ८२ ॥ आणि वस्तुनिर्देशात्मक । ते सद्गुरूपवर्णन देख । नामरूपावरी निष्टंक । केलें एक मंगल ऐसें ॥ ८३ ॥ एवं आदिमध्यें अवसानीं । नमन आशीर्वाद रूप वर्णनीं । केलें परमप्रेमें करोनी । काया वाचा मनें करोनियां ॥ ८४ ॥ ते प्रीति पावो सद्गुरु रावो । येणें बोधेंचि फळो माझा भावो । आतां क्षमा करो हा सखा सद्गुरुरावो । नित्य मद्भाव नित्यत्वें ॥ ८५ ॥ धारा नाम महानगरी । गोदावरीच्या दक्षिणतीरीं । षोडशक्रोशाभीतरीं । वर्त्ते पुरी अतिविशाळ ॥ ८६ ॥ सदेश दुर्ग पश्चिम तीरीं । महाविशाळ गुहागिरी । तेथें अति कृपाकटाक्ष करी । प्रकाशक शिरीं ठेविला ॥ ८७ ॥ त्या हस्तस्पर्शाचेनि योगें । समाधीच स्वयें पायां लागे । प्रपंच विसरे स्वयें स्वांगें । ब्रह्मचि अंगें होऊन ठेले ॥ ८८ ॥ नेणे दिशा विदिशा अंतराळ । नेणे स्वर्ग मृत्यु पाताळ । नेणे गिरिदरी ब्रह्मांड गोळ । झालों सकळ ब्रह्मचि मीं ॥ ८९ ॥ आत्मस्वरूपावांचूनि कांहीं । दुजेपणाची मात नाहीं । नुरोन देह विदेह पाहीं । ब्रह्मसुख दोहीं सुखरूप ॥ ९० ॥ तेंचि निर्विकल्प सुख जोडी । ग्रंथमिसें स्यां केली उघडी । आतां कासया कीजे शब्दप्रौढी । व्यर्थ वोढी पुनरुक्तीची ॥ ९१ ॥ जें किर ठेविलें होतें सर्वां चोरूनी । तेंचि माझ्या स्वामींनीं मजलागुनी । अतिरहस्य हृदयींचें काढोनी । मद्वदनीं रचिविलें जें ॥ ९२ ॥ तेंचि स्यां ग्रंथमिसें करून । प्रगट केलें जना लागून । सुख पूर्णोद्धारें ग्रंथ संपूर्ण । कवित्वगुण येथें नाहीं ॥ ९३ ॥ येथें नेणोनि अक्षरादि वर्णभेद । अक्षरसाम्य ऱ्हस्वदीर्घ विशद । काव्यमुद्रा वचनावबोध । नेणोनि बाध परबंधाचा ॥ ९४ ॥ ऐसाही रचिला ग्रंथसागर । पूर्णानंद स्वादाचा पूर्णोद्धार । येणें कवित्व न करोनि विचार । बोधसमुद्र आश्रय हा ॥ ९५ ॥ येथें बोधसमुद्रींच घालोनि दृष्टि । ग्रंथान्वयें पदार्थ पुष्टी । पावोनि मोक्षश्रियेच्या पाठीं । बैसिजे सृष्टीं आनंदाच्या ॥ ९६ ॥ आतां हेचि असे माझी विनंती । नमन करून पुढतपुढती । न्यून पाविजे पूर्णार्थीं । ग्रंथसमाप्ति अत्यादरें ॥ ९७ ॥ ॐ तत्सत् ब्रह्मार्पण । करूनि ग्रंथ केला संपूर्ण । जयजयकारें गर्जोन । हेंचि नमन श्रोत्यावक्त्यांसी अत्यादरें ॥ ९८ ॥ इति श्री योगवासिष्ठ निर्वाणप्रकरणं दशमं समाप्तम् ॥

इति श्रीयोगवासिष्ठसारे निर्वाणप्रकरणं दशमं संपूर्णम् ॥

समाप्त.

७२५५४

अमूल्य भेट! अमूल्य भेट!! अमूल्य भेट!!!

वैद्यविद्या.

या नांवाचें अनेक वैद्यकीसंबंधीं विषयांनीं भरपूर १२८ पानांचें पुस्तक एक पोष्ट-कार्डावर नांव पत्ता पाठविणारास फुकट पाठविण्यांत येतें.

वैद्यविद्या पुस्तकांतील मुख्य विषय.

१ ब्रह्मचर्य.
२ ब्रह्मचर्याचें सामान्य स्वरूप.
३ ब्रह्मचर्याचे आठ प्रकार.
४ ब्रह्मचर्य पाळल्यापासून होणारे फायदे
५ प्राचीनकाळीं पाळीत असलेलें ब्रह्मचर्य आणि त्याचा प्रभाव.
६ ब्रह्मचर्याचे अभावापासून होणारी हानि.
७ प्राचीन विद्याभ्यासक्रम.
८ अर्वाचीन विद्याभ्यासक्रम.
९ शिक्षक कसे पाहिजेत.
१० प्राचीन विवाहक्रम.
११ आधुनिक विवाहक्रम.
१२ गर्भाधान आणि त्यासमयीं स्त्रीपुरुषांनीं पाळण्याचे नियम.
१३ ऋतुसमयीं स्त्रीनें पाळण्याचे नियम.
१४ गर्भाधानानंतर स्त्रीनें पाळण्याचे नियम
१५ दाई कशी ठेवली पाहिजे.
१६ उत्तम संतति उत्पन्न करण्याचा प्रकार.
१७ घातुक संवयी जडण्याचीं कारणें
१८ घातुक संवयीपासून होणारे भयंकर परिणाम.
१९ अति योगाचे अनिष्ट परिणाम.
२० वीर्यविकार आणि वीर्य बिघडण्याचीं कारणें.

पत्ताः—राजवैद्य नारायणजी केशवजी काळकादेवी रोड, मुंबई.

मुलें सशक्त व निरोगी व्हावीत, अशी तुमची इच्छा आहे काय ? असल्यास त्यांस डोंगरे यांचें सुप्रसिद्ध बालामृत द्या. एका बाटलीची किंमत १२ आणे, टपालखर्च ४ आणे.

पत्ता—गिरगांव, मुंबई के. टी. डोंगरे

ठिकठिकाणीं भरलेल्या प्रदर्शनांतून सोन्याचांदीचीं पदकें व सर्टिफिकिटें मिळालेला सर्वांत जुना दूषित रक्त शुद्ध करणारा.

डॉ० वामन गोपाळ यांचा—वनस्पतिजन्य आणि आयोडाईज्ड

सार्सापरिला.

रक्त हें मनुष्याचें जीवन आहे. तेंच जर दूषित असलें तर अनेक रोग उत्पन्न होतात हें सांगणें नकोच. तें चांगलें शुद्ध करून चांगल्या रक्ताची वृद्धि करण्यास हा **सार्सापरिला** आज सतत ५० वर्षांच्या अनुभवानें उत्तम ठरलेला आहे. ह्याचा रक्तशुद्धीवर उत्तम प्रकारें उपयोग होतोच—परंतु, उपदंश व त्यापासून होणारे पक्षघातादि भयंकर रोग, संधिवात, गंडमाळा, सर्व शरीरावर देवीप्रमाणें फोड येणें, सर्वांगावर व हातापायांच्या तळव्यावर काळे डाग पडणें, सांधे धरणें, पीनस म्हणजे वास न येणें, एकाद्या ठिकाणचें स्पर्शज्ञान कमी कमी होत जाणें, कच्चीं रसायनें घेतल्यापासून होणारे वाईट परिणाम, जसे:—हिरड्या फुगणें, दांतांतून काळा निघणें, वगैरे सर्व विकार हा **सार्सापरिला** घेतल्यानें साफ नाहींसे होतात व कांहीं अपाय न होता मनुष्य निरोगी व सुदृढ होतो—बहुतेक विद्वान डॉ० सुद्धां रोग्यास त्यास ह्याचाच उपयोग करतात. एका बा० किं. १। रुपया—पो. ख. निराळा. चांगला गुण ण्यास ४ बाटल्या लागतात. ४ बा० एकदम घेतल्यास पोष्टेजसह ४॥ रु. पडतील.

अत्यंत धातुपौष्टिक व शक्तिवर्धक गोळ्या.

बुद्धि व स्मरणशक्ति यांचे आदिस्थान जो, मेंदू व स्नायु ह्याच्या मंद झालेल्या सर्व क्रियांचें पुनर्जीवन होऊन त्यांस चांगली तरतरी आणण्यास व दुसऱ्या मानसिक श्रमांपासून उत्पन्न होणाऱ्या क्षीणतेवर ह्यासारखें दुसरें औषधच नाहीं. यानें क्षुधा व पचनशक्ति वाढते व रक्तशुद्धि होऊन वृद्धि होते. किं० २४ गोळ्यांस १४ आणे. पो. निराळें.

गजकर्णाचें—मलम—किंमत ४ आणे, दर डझनास २ रुपये.

दंतमंजन—किंमत गजकर्णाप्रमाणें.

मालक—गौतमराव केशव.

ठाकुरद्वार, मुंबई.

पुणें एजंटः—एस्. जी. येवलेकर, बुधवार. हल्ली मु. वाई.

प्रोफेसर टी. के. गज्जर यांच्या फार्मसीमध्यें तयार झालेलीं औषधें.

फिवर ड्रॉप्स (ज्वरबिंदु).

सर्व प्रकारच्या तापांवर रामबाण किं० ४ आणे.

ब्लड-प्युरिफाइंग सोल्यूशन (रक्तशोधक)

शरिरांतील रक्त शुद्ध करून अन्नपचन उत्तम प्रकारें करतें.

उपदंशाच्या सर्व विकारावर खात्रीचा उपाय किं. १ रु.

गजकर्णाचें मलम.

याचा एकवार उपयोग केला असतां पुन्हां त्या जागेवर गजकर्ण होत नाहीं, हा मुख्य यांतील गूण आहे किं. ४ आणे.

मलेरिया सोल्यूशन.

हिंवतापांवर नवीनच शोधून काढलेलें खात्रीचें औषध किं. ८ आणे.

जर्मिसाईड (जंतुनाशक)

याचा उपयोग केला असतां प्लेग, कॉल होण्याची मुळींच भीति रहात नाहीं. किं. ८ आणे.

कॉलेरा सोल्यूशन,

कॉलेरा (पटकी), हगवण, यांवर खात्रीचा उपाय किं. ८ आणे.


प्लेग सोल्यूशन.

प्लेगवर रामबाण. हजारों जीव यानें मृत्युमुखांतून वांचविले आहेत. किं. ८ आणे.

सर्व औषधांचा क्याटलाग मागवा.

प्रोफेसर टी. के. गज्जर यांची
फार्मसी. गिरगांव, मुंबई.

सुंदर, मजबूत आणि काळे तुळतुळीत केंस.



ह्या आरशांत तुह्मास तुमचें केंस चांगले दिसतात काय ? किंवा ते गळून पडतात असें दिसतात किंवा निस्तेज असे दिसतात ? जर ते गळून पडत असतील किंवा तुमचे डोक्यांत खाज सुटत असेल किंवा डोक्यांत खवडे वगैरे होत असतील तर त्या करितां

कामिनिया ऑईल. KAMINIA OIL.

हें तेल तुमचे डोक्यास नेहमीं लावीत जा.



हें तेल लाविल्यानें तुमचे केस सुरेख आणि हवे तसे लांबलचक वाढतील. आपले केंस सुंदर असावे असें वाटत असेल तर बाजारांत मिळणारीं हलक्या प्रकारचीं तेलें बिलकुल वापरूं नका. कारण कीं, केंस कोणत्या कारणांनीं गळून पडतात याची माहिती बनविणारास बिलकुल नसते. तर तशा प्रकारच्या तेलांनीं केस गळून पडण्याचें कसें बंद होईल याचा विचार आपण करावा. कामीनिया हें तेल उत्तम वनस्पतीपासून अगदीं नवीन शोधकांनीं बनविलेलें आहे. हें तेल केंस गळून पडणाऱ्या जंतुचा नाश करते यामुळें लौकरच केंस गळण्याचें बंद पडून ते भराभर वाढूं लागतात. या तेलानें केंस रेशमासारखे नरम होऊन मेंदुस थंडाई येते. हें तेल विद्यार्थ्यांस व स्त्रियांस तर आशिर्वादरूपच आहे. कामिनिया तेलाच्या बाटलीबरोबर ' केंस आणि त्याची रचना ' (धि हेअर ॲन्ड इट्स् हेल्थ) नांवाचें पुस्तक गुंडाळलेलें असतें तें प्रत्येकानें वाचण्याची आह्मी शिफारस करितों. किं. १ बाटलीस १ रु. ३ बाटल्यास रु २॥= व्ही.पी.खर्च वेगळा.

एकटे एजंट—धि आंग्लो इंडियन ड्रग ॲन्ड केमिकल कंपनी.

नंबर ३५५, पोष्ट मार्केट, जुमामशीद—मुंबई.

टामसन्स एग्यु फिवर क्युअर.

टॉमसन साहेबांचें हिंवतापावर व कडकीच्या तापावर रामबाण औषध.

पुष्कळ नामांकित डॉक्टरांनीं पसंत केलेलें एक दिवस आड, दोन दिवसांनीं, ३-४ दिवस, अशा पाळीपाळीनें येणाऱ्या हिंवतापावर खात्रीचें व अनुभवलेलें. बाटलीस किंमत १ रु. आणि गोळ्यांचे बॉक्सास १ रु. आमची सही व खुण पाहून बाटली घ्यावी, त्या शिवाय घेऊं नये.

सर्जन विल्यम् मॅकफर्हेयः—मे. टॉ. कं. यांनीं तयार केलेल्या हिंवतापावरील औषधाचा मी उपयोग केला आहे, व मला असें आढळून आलें आहे कीं, मलेरिया तापावर रामबाण औषधानींही हात टेकले. अशा कामींसुद्धां ह्या औषधाचा फार उपयोग झाला. आणि मला असेंही काढळून आलें आहे कीं, कांहीं दिवस हें औषध सदोदित घेतल्यानें रोग्याच्या स्थितींत ननासारखा फरक पडतो. माझें असें मत आहे कीं, हें उपयोगी औषध आहे, व कांहीं काळानें हें लोकांना आवडूं लागेल, अशी माझी खात्री आहे.

पांडुरंग बळिभद्र, जे. पी., वकील हायकोर्ट—मी टॉम्सन आणि कंपनीचें हिंवतापावरील औषध माझ्या घरांत जेवढ्यांना दिलें तेवढ्या सगळ्यांना त्यापासून गुण आला.

डॉ० शांताराम विठ्ठल, एल. एम., जे. पी.—चातुर्थिक वगैरे हट्टी तापावर टॉम्सन आणि पनी यांच्या औषधाचा उपयोग करून हटकून गुण येतांना मीं बरेच ठिकाणीं पाहिलें आहे, आणि खरोखर हें अति मौल्यवान औषध आहे.

टॉमसन आणि कंपनी, औषधांचें दुकान वगैरे.

मुख्य ऑफीस लेबोरेटरी, २१७ कालबादेवी पोष्ट समोर—मुंबई.


राजवंशी व अमीर उमराव यांच्यासाठीं.

आमची राजवंशी नवरत्नयाकुती आणि राजवंशी नपुंसकत्व विनाशक शांढाचें तेल यांच्या उत्तम गुणाबद्दल सर्टिफीकेटा मिळाल्या असून तीं सर्वमान्य अशीं आहेत. ह्या औषधावर आमचा ट्रेड मार्क आहे. आमचे प्रसिद्ध नांवावर विकणाऱ्या नकली औषधाबद्दल फसूं नये ह्मणून खातरी करून घ्या.

अचाट शक्ती देणारी अमुल्य राजवंशी

नवरत्नयाकुती किंमत रु. १०.

नपुंसकत्व नाशक राजवंशी शांढाचे तेल किं. रु. ५



हीं वरील दोन्हीं औषधें मुष्टामैथुनामुळें आलेली अशक्तता नष्ट करितात व नष्ट झालेलें तारुण्य पुन्हा उत्पन्न करितात. स्नायुस देतात. स्वप्नावस्था बंद करितात, स्मरणशक्ती वाढवितात. योगानें भूक वाढते, रक्ताभिसरण चांगलें होतें. फक्त ए लीचे सेवनानें अकालीं येणारी वार्धक्यतेची भीती साहीं पथ्याची जरूर नाहीं. एका डबीमध्यें ४० गोळया असतात. रु आंगच्या अपूर्व गुणामुळें हीं वरील औषधें राजेरजवाड्यां प्रसिद्धीस आलेलीं आहेत.

साधारण अशक्ततेकरितां आरोग्य वर्धीनी पौष्टीक गोळया किं. रु. १.

गुप्त अवयवांवर लावण्यासाटीं वाजीकरण गुतांग लेप किं रु. १.


इतर रोगांकरितां औषधें.

स्तंभन गुटीका किं. रु. २, १.
परम्यावर पिण्याचें औषध किं. २, १
पिचकारीचें औषध किं. रु. ॥, १
गरमीवर स्वदेशी पावडर किं. रु. १
धूपणीवर पिण्याचें औ. किं. रु. २, १
" उपयोगाचें रु. १.
केशवर्धक सुगंधी तेल बा. रु. १
डोळ्याकरितां सुर्मा काळा तोळा किं. १ रु. १-४
" लाल तोळा २-४
पांढरा तोळा. १ रु. ४ ते १६
जुलाबाच्या गोळया रु. ।॥., ।.
कर्णरोगनाशक तेल रु १-४ आ.

दंतमंजन किं. ४ आणे
डझन २। रु.
गांठीवर मलम रु. १-४ आणे.
खोकल्यावर वस्ताद रु. १-४ आ.
गजकर्णाचें मलम ४ आणे.
डझन २। रु.
विंचवाचें वीषावर औषध किं. १-४ आणे.
नारुवर औषध किं. रु. १-४ आ.
खरजेवर मलम रु. २-१ आ.
सांध्यावर औषध रु. १
रक्तशुद्धी करणाऱ्या गोळया किं. रु. २- १

याशिवाय आमचें येथें सर्व प्रकारचीं औषधें आणि भस्में मिळतील. प्रत्येक औषधाबद्दल पोस्टेज निराळा. औषधें व्ही. पी. नें पाठविलीं जातील, बाहेर गांवीं एजंट पाहिजे आहेत. घाऊक माल घेणारांस चांगलें कमिशन मिळेल. प्रत्येक रोगाकरितां सलाह आणि औषधाचे प्राइझलीट आह्मी फुकट पाठवूं.

जगांतील उत्कृष्ट इलाज.



जेम्स यांच्या विद्युत् शक्तिवर्धक गोळ्याः—या बिघडलेलें रक्त सुधारण्यास, नवीन रक्त उत्पन्न करण्यास व अशक्तांस धष्टपुष्ट करण्यास या गोळ्यांप्रमाणें दुसऱ्या कोणत्याही गोळ्या नाहींत, प्राण कुंठणें, थकवा येणें, रक्त कमी होणें, अशक्तता, वगैरे दूषित रक्तापासून उत्पन्न होणारे विकार दूर करण्यांत या गोळ्या अचुक गुणकारक आहेत असें सिद्ध झालें आहे.

धातुदोषसंबंधीं रोगांवर अचुक गुण करणाऱ्या या एकट्याच आहेत. तारुण्यामध्यें इंद्रियांचे अनाचार केल्यामुळें होणारी धातुक्षीणता, धातूचा पातळपणा, स्वप्नावस्था, समजून किंवा नकळत लघवीतून धातु जाणें, मस्तकांतून प्रहार मारणें, डोळ्यापुढें अंधारी येणें, कमरेंत व सांध्यांत कळा मारणें, स्मरणशक्ति मंद होणें, मेंदु कमी होणें, अशक्तपणामुळें मस्तक दुखणें इत्यादि रोगांवर ह्या गोळ्या रामबाण इलाज आहेत.

प्रोफेसर जेम्स यांच्या या विद्युत् शक्तिवर्धक गोळ्या—विद्यार्थी, शाळामास्तर, वकील, व्यापारी, कारकून वगैरे मानसिक काम करणारे लोकांची या गोळ्या मानसिक शक्ति वाढवून शारीरिक शक्तीही वाढवितात. स्त्रियांचे आर्तव दोष, प्रदर, कटीकळ, हिस्टिरिया, क्षुत्पीडा, रक्तनाश होणे, वगैरे इत्यादि सर्व रोगांवर हटकून गुणकारी याच गोळ्या आहेत.

ह्या गोळ्या खाल्ल्या असतां पहिल्याच दिवशीं शरिरांत आश्चर्यकारक रीतीनें शक्ति उत्पन्न होण्यास आरंभ होतो. कामकाज करण्यास उमेद वाटते. मेंदूचें काम शांतपणानें होऊं लागतें, धातू जाण्याचें बंद होतें व त्यापासून शरीराची शक्ति वाढतें. चेहऱ्यावर शरीरप्रकृति सुधारत जाऊं लागल्याचीं चिन्हें दिसूं लागतात, चालण्यास जोर व शक्ति येते. पुढें दुष्ट स्वप्नें पडत नाहींत, मन स्थिर होतें आणि हुशारी येते, भूक चांगली लागते, अन्न उत्तम रीतीनें पचन होतें, व अशक्तपणाचे सर्व विकार एकामागून एक दूर होऊन जातात, उत्तम प्रकृति व खरें तारुण्य हीं या गोळ्यांपासून पुनः प्राप्त होतात, किंमत वीस गोळ्यांच्या कुपीस १–४ (सवा रुपाया) चाळीस गोळ्यांच्या कुपीस २ रुपये. शिवाय टपाल हांशील व्ही. पी. खर्च वगैरे एकापासून तीन कुप्यांपर्यंत चार आणे जास्त पडेल.

न मागवितां मिळालेल्या अभिप्रायांपैकीं कांहीं निवडक उतारे.

मि. जे. सी. ब्रिटो फोंडा येथून लिहितातः—प्रो० जेम्स यांच्या विद्युत शक्तिवर्धक गुटिका घेतल्या त्यामुळें इतर सर्व औषधें, गुटिका किंवा विलक्षण गुणकारी विजेचे पट्टे ह्यापेक्षां माझा अधिक फायदा झाला आहे तरी कृपा करून ह्या गोळ्यांच्या आणखी दोन बाटल्या पाठवून द्याव्या.

पी. शंकर दास मेडिकल ऑफिसर, पातूर (अकोलें) हे लिहितातः—एका बाईला हिस्टिरिया असे व ती बरी होण्याची आशा नव्हती पण तिनें प्रो. जेम्स यांच्या विद्युत् शक्तिवर्धक गुटिका घेतल्यावरोबर ती साफ बरी झाली. मिळण्याचा पत्ता—**धी ॲंग्लो-इंडियन ड्रग आणि केमिकल कंपनी.**

नं. १५५, मार्केट जुमामशीद मुंबई.